म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
सं. क्र. 2६७

REFBK-0002313
REFBK-0002313

# मध्ययुगीन भारत

( अथवा हिंदु राज्यांचा उद्भव, उत्कर्ष आणि उच्छेद

( इ. स. ६००–१२०० )

भाग दुसरा

# हिंदु राज्यांचा उत्कर्ष

अर्थात्

# रजपुतांचा प्रारंभींचा इतिहास

( सुमारें इ. स. ७५० पासून १००० )

हा ग्रंथ

चिंतामण विनायक वैद्य, एम्. ए. एल्एल्. बी,
आनररी फेलो मुंबई युनिव्हर्सिटी

Mahabhārata a Rāmayana, and
Epic India व श्र हाभारत उपसंहार,
संस्कृत वाङ्मयाच कर्ते यांनी लिहिला

REFBK-0002313

( सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत ).

सन १९२३

किंमत ४ रुपये

प्रकाशक
चिंतामण विनायक वैद्य,
सदाशिव पेठ पुणें सिटी,
घर नंबर ३९९.

मुद्रक
केशव रावजी गोंधळेकर,
जगद्धितेच्छु प्रेस ९०७,
शनवार पेठ पुणें सिटी.

ग्रंथ संग्रहालय

# अर्पणपत्रिका

हें पुस्तक ग्रंथकर्त्यानें

कैलासवासी


## लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

यांच्या

**पूज्य व प्रिय स्मृतीस**

ज्यांच्या अनेक गुणांबद्दल, हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाच्या
गहन अभ्यासाबद्दल, तसेंच भारतवर्षाच्या प्राचीन वैभवा-
विषयींच्या अभिमानाबद्दल, आणि शेवटीं या ग्रंथाच्या
लेखनांत ग्रंथकारास वारंवार दिलेल्या प्रोत्सा-
हनाबद्दल सप्रेम, सादर, साभार
अर्पण केलें असे.

सन १९२३ फेब्रुवारी.



७०
७५
८०
८५
९०
३५
३०
२५
२०
१५
काबुल
काश्मीर
कंदाहार
टक्क
भा टी
तोमर
दिल्ली
मुलतान
गुर्जरत्रा
सिंध
कनोज
काशी
गौड-वंग
कामरूप
मेवाड
प्रयाग
चेदी
मोंगीर
उज्जैनी
कालिंजर
धार
पाटण
कोशल
माळखेड
वेंगी
दुस्थान

# प्रस्तावना.

मध्ययुगीन भारताचा हा दुसरा भाग आज आम्ही मराठी वाचकास सादर करीत आहों. पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत सांगितल्याप्रमाणें मध्ययुगीन भारत म्हणजे भरतखण्डाचा मध्ययुगांतील इतिहास असून याची कालमर्यादा इ. स. ६०० पासून १२०० पर्यंतची मानली आहे. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचे मागील प्रस्तावनेंत दाखविल्याप्रमाणें तीन विभाग पडतात. १ आर्यकाल ( इ. स. पू. ५००० पासून इ. स. पू. ३०० ), २ आर्य–बौद्ध काल ( इ. स. पू. ३०० पासून इ. स. ६०० ) आणि ३ हिंदु काल ( इ. स. ६०० पासून १२०० ). या तिसऱ्या काळाचा इतिहास आम्ही लिहीत आहों. या कालास आम्ही हिंदु काळ म्हणतों याचें कारण या काळांत हिंदुधर्म हल्लीं दिसत आहे तसा अस्तित्वांत आला; आणि थोडक्यांत सांगावयाचें तर प्राचीन वैदिक आर्यधर्म आणि बौद्धधर्म यांचा दुसऱ्या कालविभागांत झगडा चालला होता, तो मिटून या काळांत आर्यधर्मास हिंदुधर्माचें रूप दोन्ही धर्मांच्या संमिश्रणानें मिळालें. हिंदुस्थानच्या इतिहासाचें हें मध्ययुगहि म्हणतां येतें. कारण या काळाच्या अन्तीं मुसलमानी सत्ता उत्तर हिंदुस्थानावर प्रचलित झाली आणि नंतर लवकरच म्हणजे सुमारें इ. स. १३०० त दक्षिणेंतहि झाली व हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासास प्रारंभ झाला. यासाठीं आम्ही या इतिहासास 'मध्ययुगीन भारत' हें नांव दिलें आहे

पहिल्या भागाच्या मुखपृष्ठावर या इतिहासास 'हिंदु राज्यांचा उदय, उत्कर्ष, आणि उच्छेद' असें दुसरें नांव दिलेलें आहे, त्याची अन्वर्थकता या प्रस्तावनेंत देणें शक्य आहे. हिंदुकालाचे पुन्हां ठोकळमानानें तीन पोटभाग पडतात, आणि प्रत्येक पोट भागांत हिंदु राज्यें साधारणतः निराळीं दिसतात. पहिल्या दोनशें वर्षांच्या पोटविभागांत पहिलीं हिंदुराज्यें दिसतात म्हणजे आर्य–बौद्ध राजवंश जाऊन नवीन हिंदु राज्यें स्थापित झालेलीं दिसतात. अर्थात् हिंदुराज्यांचा उदय पहिल्या पोटविभागांत

(इ. स. ६५० पासून ८००) दिसतो. दुसऱ्या पोटविभागांत हीं राज्यें कालवश होऊन दुसरीं हिंदुराज्यें उदयास आलीं आणि अतिशय भरभराट पावलीं; अर्थात् या भागांत दिलेल्या राज्यांचा काळ म्हणजे हिंदुराज्यांचा उत्कर्ष होय. हीं राज्यें बहुतेक एकाच वेळीं कालवश होऊन तिसरीं हिंदुराज्यें तिसऱ्या कालविभागांत अस्तित्वांत आलीं आणि त्यांचा उच्छेद महंमद घोरी वगैरे मुसलमान बादशाहांनीं सुमारें २५ वर्षांच्या अवधींतच केला. अर्थात् पुढील भागांत आम्हांस हिंदुराज्यांचा उच्छेद वर्णन करावा लागणार आहे. हा पोटविभाग इ. स.१०००पासून १२०० चा होय आणि त्यांत महंमद गझनवीच्या स्वाऱ्यांपासून तों पृथ्वीराजाच्या पानिपतावरील घनघोर रणसंग्रामापर्यंतचा इतिहास देणें आहे. असो, पुढील भागाची ही अशी रूपरेषा असून या भागांत हिंदुराज्यांचा उत्कर्ष वर्णन करण्याचें गोड व महत्त्वाचें काम करावयाचें आहे. आणि म्हणूनच या भागास मुद्दाम एक प्रकरण शेवटीं "९ वें व १० वें शतक म्हणजे हिंदुस्थानचा अत्यंत सुखी काळ" या नांवाचें जोडलें आहे. त्यांतील विवेचन कितपत मान्य होण्यासारखें आहे हें ठरविणें वाचकांवरच सोंपविलें पाहिजे.

या भागास आणखी एक अत्यंत महत्त्वाचें नांव "रजपुतांचा प्रारंभींचा इतिहास" असें आम्ही दिलें असून त्याची यथार्थता या भागाच्या वाचनानें सहजच दिसून येईल. रजपूत लोक या सुमारास म्हणजे इ. स.८०० च्या सुमारास हिंदुस्थानच्या इतिहासाच्या रंगभूमीवर कोठून अवतीर्ण होतात हा एक हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासास मोठा प्रश्न आहे. त्याचें उत्तर रजपूत हे वैदिक आर्यांचे वंशज असून महंमदी धर्मानें हिंदुस्थानावर जी प्रथम झडप घालून सिंध देश पादाक्रान्त केला तिनें जागे होऊन हिंदुधर्माच्या रक्षणाकारितां पुढें सरसावलेले हे लोक होत. या रजपुतांचीं राज्यें या पोटविभागांत सर्व हिंदुस्थानभर कायम होऊन त्यांच्या शौर्यानें महंमदीधर्म आणखी पांचशें वर्षें हिंदुस्थानच्या बाहेर राहिला. हीं रजपूत राज्यें म्हणजे मुख्यतः मेवाडचे गुहिलोत, सांबरचे चाहमान व कनोजचे प्रतिहार हीं असून यांनीं या काळीं फारच मर्दुमकी गाजविलेली आहे. आणि धर्माच्या प्रोत्साहनानें हे लोक पुढें आले असल्यानें यांची

नीतिमत्ताहि वरिष्ठ दर्जाची व राज्यव्यवस्था उत्तम असे. या गोष्टी या भागांतील विवेचनावरून वाचकांस दिसून येतील.

या भागांत दिलेला इतिहास मराठी वाचकांस बहुतेक अज्ञात असाच आहे. किंबहुना इंग्रेजी वाचकांसहि तो तसाच आहे असें म्हणतां येतें. टॉडचा राजस्तान हा इतिहास प्रसिद्ध आहे पण त्यांत रजपुतांचा प्रारंभीचा इतिहास अगदींच थोडा, आणि बहुतेक दन्तकथात्मक असा आहे. मुसलमानांच्या वेळेपासून पुढचा रजपुतांचा इतिहास टॉडनें दिलेला संगतवार आणि साधार आहे. प्रारंभींचा रजपुतांचा इतिहास टॉडला चांगला देतां आला नाहीं, याबद्दल त्याला दोष देणें शक्य नाहीं. कारण त्याच्या वेळीं शिलालेख वगैरे प्राचीन इतिहासाच्या साधनांचा अभ्यास अगदींच अल्प प्रमाणांत होता. आम्हास सुद्धां हीं साधनें अधिक प्राच्य व पाश्चात्य संशोधकांच्याच प्रयासानें व विद्वत्तापूर्ण चर्चेनें उपलब्ध झालीं आहेत. या संबंधांत कीलहार्न, फ्लीट, स्मिथ, ब्यूलर, होर्नेल, भाण्डारकर डाक्तर व डी. आर., जानसन वगैरे संशोधकांचे येथें आभार मानणें जरूर आहे. पण आमच्या मतें यांची समजूत रजपूत हे बाहेरचे लोक आहेत अशी चुकीची झाल्यानें यांना एकंदर हिंदुस्थानचा संगतवार इतिहास देतां आला नाहीं. वरील अनेक विद्वान संशोधकांच्या शोधांचा फायदा घेऊन आणि या शोधांस हिंदुदृष्टि लावून हा इतिहास आम्हीं तयार केला आहे. व्हिन्सेंट स्मिथनें दिलेला याच कालाचा इतिहास अगदीं त्रोटक व वरील कारणानें कित्येक बाबतींत चुकीचा असून त्यापेक्षां हा इतिहास जास्त विस्तृत व शक्यतेस धरून आहे अशी वाचकांची खातरी होईल असें आम्हांस वाटतें.

पाश्चात्य व प्राच्य संशोधकांच्या वरील चुकीचें निरसन या भागांत आम्ही एका स्वतंत्र पुस्तकांत केलें आहे. आणि रजपूत उपपत्तीनें बाहेरचे शक हूण वगैरे, किंवा या देशांतील गोंड भर वगैरे अनार्य नसून वैदिक आर्यांचेच वंशज आहेत हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानंतरच्या पुस्तकांत म्हणजे चौथ्या पुस्तकांत दुसरी हिंदुराज्य-मालिका अर्थात् हीं प्रारंभींचीं रजपूत राज्यें, यांचा इतिहास दिला आहे. पहिल्या कालविभागाच्या संबंधें जसा ह्युएनत्संग या परकी लेखकाच्या माहितीचा उपयोग होतो

तसा या भागांतील कालासंबंधें म्हणजे इ. स. ८००–१००० पर्यंतच्या कालासंबंधं आरबी प्रवाशांनीं लिहून ठेविलेलीं इतिवृत्तें बरींच उपयोगीं पडतात. त्यांचा उपयोग करून पांचव्या पुस्तकांत या काळाचें सामान्य निरीक्षण राजकीय, धार्मिक, सामाजिक वगैरे दृष्ट्या केलें आहे. तें अन्यत्र कोठें पहावयास सांपडण्यासारखें नसून वाचकांस विशेष मनोरंजक वाटेल. हिंदुस्थानचा इतिहास विशेषतः धार्मिक आहे आणि या कालांत बौद्ध-धर्माचा पूर्ण पाडाव होऊन हिंदुधर्म हल्लींच्या स्थितींत कायम झाला याचें विवेचन या पुस्तकांत विस्तारानें केलें आहे. या धर्मपरिवर्तनाचें श्रेय मुख्यतः कुमारिल व शंकराचार्य यांजकडे असून त्यांचाहि जीवनवृत्तान्त शक्य तितका देण्याचा यांत प्रयत्न केला आहे.

राजकीयदृष्ट्या हिंदुस्थानांत यावेळीं मागील कालाप्रमाणेंच कनोजला महत्त्व होतें; कनोज म्हणजेच हिंद असें लोक परदेशांत समजत. कनोजचे प्रतिहार सम्राट फार ब ि ष्ठ होते. पण त्यांहूनहि बलिष्ठ दक्षिणचें मालखेडचें राष्ट्रकूट राज्य होतें. हा राष्ट्रकूटांचा इतिहास बहुतेक अलीकडील मराठ्यांच्या इतिहासासारखा असून मनोरंजक आहे. बंगालच्या पालांचेंहि साम्राज्य यावेळीं बलसंपन्न होतें.

याप्रमाणें या ग्रंथाची थोडक्यांत रूपरेखा असून तो वाचकांस पहिल्या भागाप्रमाणेंच प्रिय होईल अशी आशा आहे. परिशिष्टांत चार पांच महत्वाच्या पण भानगडीच्या मुद्यांवर विवेचन केलें असून मराठ्यांच्या क्षत्रियत्वाविषयींची नवीन प्रमाणें मांडून विवेचन केलें आहे तें वाचकांनीं अवश्य मनन करण्यासारखें आहे. ग्रंथास सूची व तत्कालीन हिंदुस्थानचा नकाशा जोडला आहे. शुद्धिपत्र दुर्निवार असल्यामुळें याहि ग्रंथास जोडलें आहे, याबद्दल वाचक क्षमा करतील.

पुणें फेब्रुवारी
१९२३. } चिंतामण विनायक वैद्य.

# अनुक्रमणिका.

## पुस्तक तिसरें

### रजपुतांची उत्पत्ति.


| अ. नं. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | रजपूत ... ... ... ... ... ... | १—८ |
| २ | रजपूत परदेशी आहेत काय ? ... ... ... | ९—१६ |
| ३ | अग्निकुलकल्पना खोटी ... ... ... ... | १६—२४ |
| | टि.—पृथ्वीराजरासेची ऐतिहासिक किंमत ... | २५—३१ |
| ४ | अग्निकुळें गुजर आहेत काय ? ... ... ... | ३१—४९ |
| | टि.—स्कंदपुराणांतर्गत देशांची यादी... ... | ४९—५४ |
| ५ | रजपुतांचीं गोत्रें ... ... ... ... ... | ५५—६३ |
| | टि.—अर्वाचीन रजपूत घराण्यांचीं व त्यांच्या पुरोहितांचीं गोत्रें | ६४ |
| | टि.२—गोत्र आणि प्रवर ... ... ... | ६५—७६ |
| | टि.३—३६ राजकुलें अथवा रजपूत घराणीं ... | ७७—८४ |
| | टि.४—रजपूत शब्दाचा अर्थ ... ... | ८५—९७ |
| ६ | आर्यांच्या राजपुतान्यांतील वसाहती ... ... | ९८—१०७ |


## पुस्तक चौथें

### दुसरीं हिंदु राज्यें.

(सु. ७५०—१००० इ. स.)


| | | |
|---|---|---|
| १ | चितोडचे गुहिलोत आणि बप्पा रावळ ... ... | १०८—११८ |
| २ | बप्पाच्या मागूनचे राजे ... ... ... ... | ११८—१२५ |
| | टि.—गुहिलोतांच्या तीन वंशावळी ... ... | १२५—१२७ |
| | टि.२—गुहिलोत मूळचे विदेशी अनार्य होते कीं काय? | १२७—१४० |
| | टि.३—शक्तिकुमाराचा आटपुरा येथील लेख ... | १४०—१४१ |

३ सांबरचे चाहमान ... ... ... ... १४१–१४७
टि.–चाहमानांचा वंशक्रम ... ... ... १४७–१५२
टि.२–हर्षशिलालेख ... ... ... ... १५३–१५५
४ कनोजचे सम्राट प्रतिहार ... ... ... १५६–१७६
टि.१–घटियाळा लेखांत दिलेली प्रतिहार घराण्याची वंशावळ ... ... ... १७७–१७८
टि.२–दौलतपुरा व इतर लेखांचा काळ ... १७८–१७९
टि.३–भंडिकुल ... ... ... ... १७८–१७९
टि.४–तुरुष्क... ... ... ... ... १७८–१८०
टि.५–कनोजच्या सम्राट प्रतिहारी घराण्याची वंशावळ १८१–१८२
टि.६–ग्वालेर येथील भोज–प्रशस्ति ... ... १८३–१८५
५ अनहिलवाड पाटणचे चावडा ... ... ... १८६–१९१
६ धारचे परमार ... ... ... ... ... १९२–२०३
७ बुन्देलखण्डचे चन्देल्ल ... ... ... ... २०४–२१२
टि.–चन्देल्लांच्या उत्पत्तीविषयीं स्मिथचें चुकीचें मत २१२–२१९
८ चेदि ऊर्फ त्रिपूरचे कलचूरी ... ... ... २२०–२२६
९ बंगाल अथवा मोंगीरचे पाल ... ... ... २२७–२३६
१० दक्षिणचे राष्ट्रकूट ... ... ... ... २२७–२५४
११ या काळांतील इतर लहान राज्यें ... ... २५५–२६१
१२ समकालीन आरब लेखक ... ... ... ... २६२–२७०

# पुस्तक पांचवें

## सामान्य परिस्थिति.

१३ भाषा ... ... ... ... ... ... २७१–२७९
१४ धार्मिक परिस्थिति ... ... ... ... २७९–२९२
टि.–कुमारिलभट्ट व शंकराचार्य ... ... २९३–३११
१५ सामाजिक स्थिति व वर्णव्यवस्था ... ... ३१२–३३७
टि.–तत्कालीन हिंदूंचीं नांवें ... ... ३३७–३४०

टि. २—अनुलोम-विवाह व स्मृतिग्रंथ ... ३४१–३४४
१६ राजकीय परिस्थिति ... ... ... ... ३४५–३५९
१६ मुलकी व लष्करी कारभार ... ... ... ३६०–३८५
१८ हिंदुस्थानच्या इतिहासांतील अत्यंत सुखी काळ ३८३–४०५

## परिशिष्ट

१ सूर्यवंशी चंद्रवंशी आर्यांचा वेदांतील माग ... ४०६–४४६
२ ठाण्याच्या शिलाहारांचा एक नवीन ताम्रपट व त्यावरून मिळणारी उपोद्धलक या काळाची माहिती ... ४४७–४५०
३ अर्वाचीन भाषोत्पत्ति ... ... ... ... ४५१–४५३
४ स्मृत्यांतील सामाजिक अक्लिष्ट स्थितीचे दर्शक उतारे ४५४–४५७
५ महाराष्ट्रांतील मध्ययुगीन राजवंश मराठे क्षत्रिय होते ४५८–४६९
६ सूची ... ... ... ... ... ... ४७०–४८०
७ समकालीन राजांचा तक्ता ( इ. स. ७५०–१००० )
८ हिंदुस्थानचा तत्कालीन नकाशा

# शुद्धिपत्र.

(काना मात्रा वेलांटी उकार अनुस्वाराच्या चुका दिल्या नाहींत.)

| पृ. | ओ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | २ | तुरट | तुटक |
| २५ | १८ | मित्यांचा | मित्यांच्या |
| २८ | २१,२६ | आनंद | अनंद |
| ३० | १४ | बरीत | बदीत |
| ३५ | २२ | ती अनन्त | ती अनन्तरा |
| ,, | २५ | अनुक्रम | अनुलोम |
| ४३ | १४ | गेलिश | गेलिक |
| ५४ | ६ | १,१८,९२ | १,१८,०९२ |
| ,, | १४ | ६६ ह. | ३६ ह. |
| ,, | १७ | ३६०० | १६,०००. |
| ६१ | १८ | झालेल्या | झालेल्या लोकांस |
| ६७ | १८ | मंतकतो | मंत्रकृतो |
| ६८ | १६ | चापन | च्यवन |
| ६९ | ११ | दभूह | दृबभूव ह |
| ६९ | २५ | त्यांचा | त्यांच्या |
| ७० | २१ | रस रसः | रसः |
| ७७ | १४ | त्रिंशत् | त्रिंशत्सु |
| ,, | १५ | तेष्य तो...लाधा | तेप्यन्ये-लाथा |
| ,, | २५ | ३६ ही संख्या | ३६ कुलांची यादी |
| ८० | १० | रोसजु | रोसजुत |
| ८३ | ६ | धरील | वरील |
| ,, | ,, | यावयाचा नाहीं | यावयाचे नाहींत |
| ८७ | २९ | परांपते | विशांपते |
| ८९ | २ | राजांचा | राजपुत्रांचा |
| ९० | १७ | प्रदेशांत | प्रदेशांत असून तेथें |

| पृ. | ओ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९२ | १२ | दमन्नस | दमनस्स |
| ,, | १८ | धनकप्कांत | धनकटकांत |
| ९३ | १२ | पुरक्षण | पुररक्षण |
| ९५ | २६ | क्षेत्रं | क्षत्रं |
| १०४ | २६ | भारती लावलेल्या हाकून | हाकून लाविलेल्या भारती |
| ११२ | १५ | अथा | अर्थी |
| ११९ | २७ | पदस्ताः | पहस्ताः |
| १२४ | १४ | शुचिम्र्याचा | शुचिवर्म्याचा |
| १२९ | २६ | भट्टार्कांचा | भटार्कांचा |
| १४० | २८ | नाराऱ्हदा | नागऱ्हदा |
| १४४ | ८ | राज्याच्या | राजाच्या |
| १४७ | २ | असाव कारणें | असावें, कारण |
| १५५ | ५ | हत्वा पधिगामि | हत्वापधिगामि |
| १५७ | २२ | बालननामक म्लेच्छ | बलननामक म्लेच्छाचा |
| ,, | २३ | चतुस्त्रि | चतुर्हस्त |
| १६२ | ७ | ७८० | ७८३ |
| ,, | १६ | श. ७०३ इ. स. ७८० | श. ७०५ इ. स.७८३ |
| १६६ | १० | विजयेस्तु | विजयेच्छु |
| १६८ | १९ | कनोज | हिमालय |
| १७१ | १७ | धरणीवर्ष | धरणीवराह |
| १८५ | २२ | सुश्वर | सुदुश्वर |
| १९३ | ५ | पूर्वीचे | सिंघचे |
| १९५ | २१ | शायंक | सीयक |
| ,, | २५ | सद्गुर्जवेश्वर | सद्गुर्जरेश्वर |
| ,, | २६ | भुक्तैः | भुंक्ते |
| १९८ | ५ | खोट्टिय | खोट्टिग |
| १९९ | ९ | धनदाल | धनपाल |
| २०४ | १८ | मौसरी | मौखरी |

| पृ. | ओ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २०७ | ५ | यर्णन | वर्णन |
| २१६ | १६ | कठिचण | कठिणच |
| ११ | ६ | मूर्जर | गुर्जर |
| २१६ | ६ | मिस्थनें | स्मिथनें |
| २१९ | ९ | गट्टा | गढा |
| २२४ | २५ | शांकरायण | शंकरगण |
| २४२ | २३ | व्हा. | व्हा. १ |
| २४३ | २३ | गंगा | वंग |
| २६२ | १४ | राजस्थानच्या | निरनिराळ्या राजांच्या |
| २६४ | ९ | निरनिराळा | निराळा |
| २७४ | २६ | कायम स्वरूप | कायम |
| २७९ | ७ | पुढील टिप्पणींत | परिशिष्टांत. |
| २८४ | १० | गाजीपुर | मिर्झापुर |
| २९६ | २९ | विंध्यान्तरालानु | विंध्यान्तराल |
| २९७ | १९ | असावें* | असावें. फुली २९६ पानाच्या शेवटीं समजावी. |
| २९८ | ६ | दाक्षिणात्यज्जु | दाक्षिणात्यस्तु |
| ३०४ | १७ | बरीच | फारच |
| ३०७ | १३ | पडला | मागाहून पडला |
| ३०४ | ४ | सर्वांस | बहुतेकांस |
| ,, | २९ | अन्तऽस्थ | अन्तःस्थ |
| ३१३ | १९ | पूर्वी | नंतर |
| ३१४ | २५ | थून तेथून | येथून तेथून |
| ३१७ | ११ | सौंदलिया | संदलिया |
| ३१९ | १० | सवर्णाप्रहीयते | संवर्णात्प्रहीयते |
| ,, | १४ | कालाचीहि | या कालाचीहि |
| ३२२ | २६ | कृतुदीक्षा | कतुदीक्षा |
| ३२६ | २३ | त्रिंश धर्मान | त्रिंशद्धर्मां न |

| पृ. | ओ. | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३३३ | ७ | पूर्वीही | पूर्वी ही |
| ३३८ | २७ | भारणामार्गे | भरणामार्गे |
| ३०७ | १९ | भारणचे | भारपचे |
| ३४९ | ११ | मात्स्यन्याप | मात्स्यन्याय |
| ३५७ | २६ | एकराष्ट्रीय भावना | राष्ट्रीय भावना |
| ३८६ | १४ | युद्धाच्या | बुद्धाच्या |
| ३९१ | १६ | कनोजी क्षत्रिय | कनोजी ब्राह्मण |
| ३७५ | १६ | दान | दान दिलेला गाव: |
| ३८३ | ११ | वेतन | नगदी वेतन |
| ४०५ | १४ | नसल्यानें | असल्यानें |
| ४०७ | १९ | प्रेवेट | प्रेलेट |
| ,, | २९ | प्रवीण | प्रवण |
| ४०८ | २५ | शिष्याच्या | सूतांच्या |
| ,, | १० | सुद्धां | कर्नाटक सुद्धां |
| ४१५ | ४ | पांचालचे वगैरेहि | पांचल चेदि वगैरे |
| ४१६ | २ | विवक्षूया | विवक्षया |
| ४२७ | ११ | यादव आर्य | तुर्वश आर्य |
| ४२८ | १२ | छडा करवूं | छडा लॉवूं |
| ,, | १७ | यदु | यद् |
| ४३४ | ११ | प्रोश्रावयं | प्राश्रावयं |
| ४३६ | ६ | त्याच्या | त्यांचा, |
| ४३८ | २४ | दूचीवतो | दृचींवतो |
| ४३९ | २८ | पारव | पौरव |
| ४४५ | २७ | १०—९ | १०—९३ |
| ४४८ | १३ | इन्द्र | ७ इन्द्र |
| ४५४ | १५ | अरतालं | आरनालं |
| ४५५ | १३ | भोज्यान्नाः कुटुम्बिनः | कुटुम्बिनः ॥ ( भोजयन्नाः ) |

श्री. क्र. 2393

# पुस्तक तिसरें

# रजपुतांची उत्पत्ति

## प्रकरण १ लें.

### रजपूत

इसवी सनाच्या नवव्या शतकाच्या आरंभाला हिंदुस्थानच्या इतिहासाचें स्वरूप सर्वतोपरी बदललेलें दिसतें. त्या काळच्या हिंदुस्थानांतून वैदिक आर्यधर्माचा आणि आर्यबौद्ध—संमिश्र संस्कृतीचा लोप झाला व आजकाल वस्तुतः ज्या स्थितींत हिंदुधर्म दिसत आहे त्या स्थितींत तो दिसूं लागलेला होता. मगधासारखे कांहीं तुरळक भाग सोडले असतां देशांत सर्व ठिकाणीं बौद्ध धर्माचा अवशेषहि दृष्टीस पडत नव्हता. या इतिहासाच्या पहिल्या भागास जोडलेल्या नकाशांतील जवळजवळ तीनचतुर्थांश भाग आर्यबौद्धसंमिश्र म्हणून गुलाबी रंगांत रंगविलेला दिसेल तर या भागास जोडलेल्या नकाशांत प्रायः सर्वच भाग भगव्या रंगाचा झालेला आहे; कारण बौद्धधर्म जाऊन हिंदुधर्मानें त्याची जागा व्यापलेली आहे. पण जसा बौद्धधर्माचा लोप झालेला होता, तसाच वैदिक आर्यधर्म ही आपल्या पूर्वींच्या स्वरूपांत शिल्लक राहिलेला नव्हता. पशुयज्ञाच्या द्वेषाची

भावना हिंदूलोकांच्या अंतःकरणांत खोल रुजली होती, आणि म्हणून बौद्धधर्माला खो देणाऱ्या पूर्वमीमांसा दर्शनाला फार दिवस अग्रेसरत्वाचा मान राखतां आला नाहीं. वस्तुस्थिति अशी झाली कीं बौद्धधर्म व पूर्वमीमांसा या उभयतांनीं एकमेकांचा नाश केला. लोकांच्या मनांत वेदांविषयींचा आदर पुनः उत्पन्न झाला आणि जोरानें बळावला, परंतु त्याबरोबरच यज्ञयागांबद्दलचा आदर नष्ट होऊन गेला. वेदोक्त यज्ञयागांच्या ठिकाणीं इच्छित फलाची प्राप्ति करून देण्याचा गुण आहे असें जें पूर्वमीमांसेंत पुनः पुनः प्रतिपादिलेलें आहें त्यावर हर्षाच्या निधनानंतर इ. स. ६५० च्या सुमारास कांहीं काळ लोकांचा विश्वास बसला हें कांहीं खोटें नव्हें. परंतु ७५० च्या सुमारास पशुयज्ञाच्या द्वेषानें पुनः अशी उसळी मारली कीं पशुयज्ञाचें पुनः म्हणून नांवहि ऐकूं आलें नाहीं.

हिंदुस्थानांत सांप्रत प्रचलित असलेल्या हिंदुधर्मानें या पशुयज्ञांस मान्यता दिलेली नाहीं; आणि या बाबतींत तरी पूर्वमीमांसेची शिकवण, तिनें नष्ट केलेल्या बौद्धधर्माबरोबरच नाश पावलेली आहे. पाहिल्या हिंदुराज्यांचे स्थापक राज्यारोहणप्रसंगीं राजवैभवाचें द्योतक म्हणून अश्वमेध करीत असत. आतां जी हिंदु राजघराण्यांची दुसरी मालिका अधिकारारूढ होऊं लागली त्यांना या अश्वमेधांचें महत्व वाटत नव्हतें. हे नवे हिंदुराजे पुराणांत वर्णिलेल्या व आधुनिक हिंदुधर्मानें सर्वश्रेष्ठ मानलेल्या पंचायनांतील शिव, विष्णु, सूर्य, देवी व गणेश या देवतांचे, विशेष तर शिवाचे श्रद्धावान् उपासक होते. अर्वाचीन हिंदुस्थानांतील शैव सांप्रदाय हाहि हिंदुस्थानच्या इतिहासांतील मागील कालांत भरभराटीस आलेल्या शैव सांप्रदायाहून भिन्न आहे. त्याचें हिडिस स्वरूप बरेच निवळलें होतें, आणि ठाणेश्वरच्या राजघराण्याचा संस्थापक पुण्यभूति याच्या काळांत शिवाच्या तांत्रिक

उपासनेंत अंतर्भूत झालेले किळसवाणे आचार आणि हास्यास्पद विचार आतां प्रचारांत उरले नव्हते, किंवा लोकांना आवडेनातसे झाले होते. याप्रमाणें धर्म–दृष्टीनें विचार केला तर अर्वाचीन हिंदुधर्मास हिंदुस्थानांत वस्तुतः इसवी सनाच्या नवव्या शतकाच्या ठेकळमानीनें आरंभास सुरुवात होते.

गाय आाण बैल यांच्या पवित्रतेबद्दल अत्यंत तीव्र भावना ही या हिंदुधर्माचें एक अत्यंत महत्वाचें अंग आहे. हा विश्वास सांप्रतही जसाच्यातसाच कायम आहे. गाय ही खरोखर वैदिक कालापासूनच पवित्र मानलेली आहे, परंतु वेदकालीन धर्माचारांत गाय व बैल यांच्या यज्ञांचा समावेश होत असे. यावेळीं अहिंसेची भावना अभेद्य झाली होती; आणि त्यामुळें गाय आणि बैल यांचा वध, मग तो वेदोक्त यज्ञासाठींही कां असेना, पंचमहापातकांत गणला गेला; आणि गाईला नुसती दुःखापत करणेंहि पापदायक मानलें जाऊं लागलें. त्या काळीं सर्वश्रेष्ठ ठरलेल्या शिव व विष्णु या दोन्ही देवतांच्या उपासनेनें गाय व बैल यांस पवित्र मानण्याच्या श्रद्धेंत भर पडली. बैल शिवाला पवित्र होता, आणि विष्णूला पूर्णावतारांतील कृष्णस्वरूपांत गाय पवित्र होती. हिंदु व मुसलमान यांच्या मधील निकराच्या झगड्यांतील मोठें मूळ कारण जें गायीच्या ठिकाणीं पवित्र बुद्धि तिला अत्यंत मोठें महत्व आजहि पूर्णपणें तसेंच चालू आहे. सर्व हिंदु संस्थानांत गाय व बैल यांचा वध करणें अथवा त्यांस जबर दुखापत करणें हा आजकालहि फौजदारी कायद्याप्रमाणें घोर अपराध गणला जातो.

सामाजिक दृष्टीनें हि अर्वाचीन हिंदु कालांतील हिंदुस्थानास इ. स. नंतरच्या नवव्या शतकाच्या आरंभास सुरुवात झाल्याचें दाखवितां येईल. जाती त्या काळीं विस्कळित होत्या; सांप्रतच्याप्रमाणें एकमेका-

पासून तुरट झाल्या नव्हत्या किंवा एकींतून दुसरींत प्रवेश न करितां येण्यासारख्या पोटजातीहि अजून उत्पन्न झाल्या नव्हत्या. बौद्धधर्माचा कायमचा पाडाव होऊन पूर्वी बौद्ध धर्माचें परिपालन करणाऱ्यांचा हिंदुसमाजांत समावेश केल्यामुळें बहुधा पुढील काळविभागांत प्रमुख जातींत पोटजाति उत्पन्न झाल्या असाव्यात, आणि जरी अर्वाचीन पोटजातींची उत्पत्ति नवव्या शतकांशीं, अथवा मध्ययुगीन भारताच्या दुसऱ्या काल--विभागाशीं मागें नेऊन भिडवितां आली नाहीं, तरी ती तिसऱ्या कालविभागाशीं जोडण्यास हरकत नाहीं. तिचें संभवनीय कारणही याच कालाशीं जोडावयास पाहिजे. तें कारण म्हणजे बौद्ध धर्मांतून हिंदु धर्मांत येऊन पौराणिक देवतांची उपसना करण्याचे बाबतींत स्थलपरत्वें झालेले भेद हें होय. या काळांत लोकांचें अन्न मांसवर्ज्य झालें आणि पुढील कालविभागांतील पोटजातींच्या वाढींत याहि गोष्टीनें आपल्यापरीनें भर घातली.

याहीपेक्षां अधिक लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, या काळापासून लोकांच्या भाषेंतहि सहज दृष्टीस येण्याजोगा मोठा फरक पडला. हिंदुस्थानांतील अर्वाचीन प्रचलित भाषा याच कालांत उदयास आल्या. त्यांच्या उत्पत्तीच्या कारणांचा विस्तृत विचार स्वतंत्र प्रकरणांत करण्यांत येईल. येथें येवढें सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं अर्वाचीन प्रचलित भाषांचा इतिहास अखंडपणें या काळापर्यंतच मागें सांपडतो; त्याच्या मागें जाऊं शकत नाहीं. आणि म्हणून असेंही म्हणावयास कांहीं हरकत नाहीं कीं ऐतिहासिक दृष्टीनें बोलावयाचें तर हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा या काळाच्या सुमारास प्रचारांत येऊं लागल्या. मागील शतकांत शौरसेनी, मागधी; महाराष्ट्री आणि पैशाची व त्यांचे अपभ्रंश यांत लोकांचे व्यवहार चालत असत; पण आतां नवव्या शतकापासून पुढें हिंदी, बंगाली, मराठी, व पंजाबी या भाषांचा उत्तर, पूर्व, दक्षिण

च पश्चिम हिंद्स्थानांत उदय व वाढ होऊन त्या लोकांच्या बोलण्यांत येऊं लागल्या असें दिसून येईल.

पण या कालांतील या सर्वांहीपेक्षां अधिक चित्तवेधक गोष्ट म्हणटली म्हणजे राजकीय महत्वाच्या क्षितिजावर येणारीं नवीन राजघराणीं होत. हीं घराणीं आजहि राज्यें चालवीत आहेत. खरोखर, असेंहि म्हणावयास हरकत नाहीं कीं आजकाल प्रत्यक्षपणें डोळ्यास दिसत असलेला अर्वाचीन राजकीय हिंदु ( हिंदुलोकानीं व्यापिलेला ) हिंदुस्थानही याच काळांत दृष्टीस येऊं लागतो. ही महत्वाची गोष्ट हिंदुस्थानचा इतिहास लिहिणाऱ्यांच्या ध्यानांत आली असून त्यांपैकीं. सर व्हिन्सेन्ट स्मिथ यानीं असें म्हटलें आहे कीं, याच काळाच्या सुमारास रजपूत हिंदुस्थानच्या इतिहासाच्या रंगभूमीवर अवतरतात, आणि हें म्हणणें योग्यहि आहे. पूर्वीच्या राजघराण्यांचा यावेळीं लोप झाला आहे. आर्यबौद्ध काळांत हिंदुस्थानांत गुप्त व वर्धन ( हीं बहुधा वैश्य असावींत ) हीं प्रमुख राजघराणीं होतीं; त्याचप्रमाणें यवन, शक, हूणादि परकीय राजघराणींही राज्यें करीत होतीं. पण मध्ययुगीन भारतांतील पहिल्या कालविभागांत तीं हळुहळू नाश पावत गेलीं. त्याही काळांत कांहीं क्षत्रिय घराणीं होतीं; हुएनसँगनेंही त्यांनां क्षत्रिय म्हणूनच म्हटलें आहें; परंतु तीं आपल्याला रजपूत म्हणवींत नसत. उत्तरहिंदुस्थानांत वलभीचे मैत्रक, कनोजचे वर्म, व दक्षिणेंत बादामीचे चालुक्य व कांचीचे पल्लव यांस त्यानें क्षत्रिय म्हटलें आहे, रजपूत नाहीं. हींहि राजघराणीं याच काळाच्या सुमारास अस्तंगत झालीं, आणि सर्व हिंदुस्थानभर आपल्याला रजपूत म्हणविण्यांत आनंद मानणारीं नवीं क्षत्रिय घराणीं याच काळीं उदयास आलीं. रजपूत हें नांव मात्र नवें नाहीं; आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, हींच रजपूत राजघराणीं थोड्या कमी

महत्वानें का होईना, आजमितीस राजघराणीं म्हणून नांदत आहेत. खरोखर, ज्यांच्या वंशवृक्षाचीं मुळें अखंडपणें नवव्या शतकापर्यंत मागें गेलीं आहेत अशीं यां व्यतिरिक्त राजघराणीं सगळ्या पृथ्वीच्या पाठीवर कोठें सांपडावयाचीं नाहींत. दुसऱ्या कोणत्याही कारणासाठीं नमलें तरी या एका कारणासाठीं हिंदुस्थानांतील रजपूत अनन्यसामान्य अशा महत्वाचे अधिकारी आहेत.

पण रजपूत हे याहीपेक्षां अधिक लौकिकाला योग्य आहेत. वस्तुतः शूर आणि दाक्षिण्यप्रिय लोक या नात्यानें त्यांचें जें महत्व आहे तें आपल्याला योग्यपणें कळलेंच नाहीं. जगाच्या इतिहासांत अत्यंत वीर्यशाली लोकांच्या कथांप्रमाणेंच यांनीं आपल्या शौर्याचीं वर्णनें तितक्याच ठळकपणें लिहिण्या जोगी प्रभा पसरून आपल्या काळचा इतिहास उज्वलित करून ठेविला आहे. दाक्षिण्यप्रियता, शौर्य, धर्माची शुद्ध परंपरा आणि परकीय धर्म व सत्ता यांच्याशीं चालविलेल्या झगड्यांतील चिकाटी यांपैकीं कोणत्याही गुणाविषयीं मेवाडचे सिसोदे आणि सांबरचे चाहमाण हे जगाच्या इतिहासांत अग्रस्थानीं उल्लेख करण्यास पात्र आहेत. आरबांच्या दिग्विजयसिंधूचा ओघ उत्तर आफ्रिका भिजवून जिब्राल्टरच्या सामुद्रधूनींतून स्पेनमध्यें घुसला व पिऱ्यानिज ओलांडून फ्रान्समध्यें उतरला तेव्हां तेथें लीयर नदीच्या कांठीं फ्रेंच लोकांच्या शौर्य—खडकावर आदळून भंग पावला. त्याच धर्मवेडानें फुगलेला त्याच आरबांच्या दिग्विजय सिंधूचा दुसरा ओघ पूर्वेच्या बाजूला मेसापोटेमिया, इराण व बलुचिस्थान यांस उदरांत घेऊन व सिंधुनद पार होऊन सिंधप्रांत बुडवून पुढें चालला होता, तो गेहलोत रजपुतांनीं थोपवून धरून शतशः विदीर्ण केला. रजपूत लोक ज्याच्या नांवाचा उच्चार उचित अशा आदरानें करितात, आणि ज्याला हिंदुस्थानचा चार्लस मार्टेल म्हणणें

अनाठायीं नाहीं तो बप्पारावळ नसता तर अरबांच्या स्वारी पुढें सगळा हिंदुस्थान चीत झाला असता, आणि प्रसिद्ध इतिहासकार गिबन याच्या वक्तृत्वपूर्ण शब्दांत लिहावयाचें तर आरब धर्मशास्त्र प्रतिपादणाऱ्या पुराणिकांनीं काशीवाराणसींत आजमितीला सुता केलेल्या लोकांना महम्मदीधर्माचीं तत्वें व आचार यांचीं निरूपणें केलीं असतीं. परंतु बप्पारावळ व त्याचे रजपूत यांच्या शौर्यानें हें दुर्दैव टळलें. त्याच्या वंशजांनीं आपल्या विस्तृत आणि दैदीप्यमान इतिहासांत आज तागायत आपल्या स्वातंत्र्याची व हिंदुधर्माची ध्वजा मुसलमान सम्राटांसही न जुमानतां फडकत ठेविली आहे हें पाहून मन उल्हसित होतें. स्वराज्य व स्वधर्म यांचा शेवटला पुरस्कर्ता शिवाजी याच वीराचा वंशज होता. शिवाजीनें मुसलमानांशी दक्षिणेंत संग्राम करून मराठ्यांचें स्वातंत्र्य आणि त्यांचा धर्म यांची पुनः संस्थापना केली हें प्रसिद्ध आहे.

परंतु शेवटीं पश्चिमेकडील आर्य आणि हिंदुस्थानांतील पौर्वात्य आर्य यांच्यांत फार मोठें स्थित्यंतर घडलें. स्पेनमध्यें टेगस नदीच्या तीरावर फ्रँक व स्पॅनिश लोकांनी सतत एक हजार वर्षे निकराचा संग्राम केल्यावर, मूरलोकांचें सामर्थ्य एकाएकीं टग आफ वारमध्यें जित होणाऱ्या पक्षाप्रमाणें ढिलें पडून स्पॅनिश लोकांनीं तत्काळ त्यांचा पराभव केला आणि त्यांस यूरोपच्या बाहेर हांकून लाविलें. हिंदुस्थानांतही सिंधुनदाच्या आसपास आरब व त्यांच्या पाठोपाठ आलेले तुर्क यांच्यांशीं रजपूत व इतर आर्यलोकांच्या पांचशें वर्षे झटापटी चालल्या होत्या. परंतु आम्हीं लिहीत असलेल्या इतिहासाच्या अंतिम काळाच्या सुमारास या झटापटींत रजपुतांनीं एकाएकीं कच खाल्ली आणि तुर्कांनीं व आरबांनीं त्यांचा पराभव केला. रजपुतांनीं राजस्थानच्या डोंगरांत आणि वाळवंटांत आपला धर्म, आपलें स्वातंत्र्य, आपली

कीर्ति आणि आपलें शौर्य यांचें जतन केलें असलें तरी सगळ्या हिंदुस्थानवर जेत्या मुसलमानांचा अंमल चालू झाला. तात्पर्य, हिंदुस्थानांत स्पेन प्रमाणें मुसलमानांची पिछेहाट तर झाली नाहींच, उलट सरतेशेवटीं सर्व हिंदुस्थानदेश त्यांच्या घशांत पडला. पश्चिमेकडील आपल्या आर्य बांधवाप्रमाणें हिंदुस्थानांतील रजपुतांस यश कां लाभलें नाहीं या प्रश्नाचें उत्तर मध्ययुगीन भारताच्या इतिहासकारानें द्यावयास पाहिजे; आणि त्याप्रमाणें आम्ही लिहीत असलेल्या प्रस्तुत पुस्तकांत तें देण्याचा प्रयत्न करणार आहों.

या काळांत उदयास येऊन निदान चारशें वर्षें तरी मुसलमानांच्या स्वाऱ्या मागें परतविणारे हे रजपूत कोण होते आणि ते आले कोठून? आम्ही पूर्वींच सांगितलें आहे कीं, ते हिंदुस्थानवासी आर्य असून वैदिक आर्यांचे अत्यंत पाणीदार असे वंशज होते. आपल्या सनातन धर्माचें त्यांनीं शौर्यानें रक्षण केलें आणि त्यांचा 'हिंदुधर्मसंरक्षक' असा उल्लेख करणें अनुचित होणार नाहीं. कित्येक यूरोपीय आणि एत्तद्देशीय पुराणोतिहाससंशोधक म्हणतात त्याप्रमाणें हे रजपूत म्लेंछ असून त्यांनीं हिंदुधर्माचा अंगिकार केला होता, म्हणजे ते हूण, शक, यूची किंवा जीटी यांपैकीं अवशिष्ट राहिलेले लोक होते, हें खरें आहे काय? मानव–शरीर–वर्णन–शास्त्राच्या अनुरोधानें रजपुतांच्या चेहरेपट्टीवरून ते आर्य आहेत असें स्पष्ट ठरलें असतांहीं सर व्हिन्सेन्ट स्मिथ सारखे प्रसिद्ध इतिहासकार इ० स० सहाव्या शतकाच्या सुमारास हिंदुस्थानांत स्वाऱ्या करणाऱ्या परकीय लोकांचे रजपूत हे वंशज आहेत याच अनुमानाला चिकटून बसतात तेव्हां या पुस्तकांत या विषयाचा सविस्तर विचार करण्याचें आम्ही योजिलें आहे.

# प्रकरण २ रें

## रजपूत हे परदेशीय आहेत काय ?

या काळांत उदयास आलेले व मध्ययुगीन भारतीय इतिहासाच्या या कालविभागावर आपल्या शौर्याची प्रभा पाडणारे रजपूत वैदिक आर्यांचेच वंशज असले पाहिजेत. आपल्या पूर्वजांच्या धर्माच्या संरक्षणासाठीं वैदिक आर्यांखेरीज इतर कोण येवढ्या शौर्यानें लढणार ? परधर्माचा स्वीकार करणारे लोक आपण ज्यांत समाविष्ट झालों त्या धर्माच्या संरक्षणासाठीं त्या धर्मांतच उत्पन्न झालेल्या लोकांपेक्षांही अधिक निकरानें व तीव्रतेनें क्वचित् प्रसंगीं लढतात हें कबूल आहे. परंतु हें नियमानें घडून न येतां बहुश: अपवादात्मकच अधिक असतें. तेव्हां रजपूत वैदिक आर्यांचेच वंशज होते असें अनुमान काढणें स्वाभाविक आहे. त्यांची स्वत:ची परंपराही हेंच स्पष्ट करिते कीं ते सुप्रसिद्ध 'सूर्य व चन्द्र क्षत्रिय कुलांतच उत्पन्न झाले होते. मागें एका ठिकाणीं या ( सूर्यसोमवंशीय ) शब्दांचा अर्थ विशद करितांनां सांगितल्याप्रमाणें इतिहासपूर्व कालांत पंजाबच्या आणि गंगेच्या खोऱ्याच्या मार्गानें हिंदुस्थानांत बाहेरून उतरलेल्या भिन्न टोळ्यांचे ते वंशज होते. तिसरें प्रमाण हें कीं मानवजातिशास्त्रान्वयें १९०१ च्या खानेसुमारीचे वेळीं घेतलेलीं डोक्याचीं व चेहेऱ्याचीं मापें रजपुतांचा आर्यवंशीयत्वाचा हक्क वस्तुत: सिद्ध करितात. त्यांचीं तरतरीत आणि सरळ नाकें, त्यांचीं लांबट डोकीं आणि त्यांचा उंच बांधा हीं ते आर्य आहेत हें स्पष्ट दाखवितात. सर्व पृथ्वीतलावर आर्य वंशाच्या आज याच विशिष्ट खुणा आहेत. नेसफील्ड व इबेटसन प्रभृति अनेक यूरोपीय

शोधकांस रजपूत हे आर्यवंशीय असून वैदिक कालांत हिंदुस्थानांत वसाहत करणाऱ्या प्राचीन क्षत्रियांचे वंशज आहेत या सिद्धान्ताच्या सत्यतेबद्दल संदेह नाहीं.

परंतु मानववंशशास्त्र, परंपरा आणि संभव या सर्वांनाही न जुमानतां इतर कांहीं युरोपीय इतिहासकार व पंडित व त्याचप्रमाणें कांहीं एत्तद्देशीय पुराण–इतिहास–शोधकही हिंदुस्थानच्या इतिहासाच्या रंगभूमीवर आतांच झळकूं लागलेले क्षत्रिय हे परकीय असंस्कृत वंशापासून उत्पन्न झालेले आहेत अशामताचे असून ते हे आपलें मत प्रस्थापित करण्याचाही प्रयत्न करितात. रजपुतांचा इतिहास लिहिणारा प्रसिद्ध इतिहासकार टॉड यानें खरोखर प्रथम हें मत प्रसृत केलें. त्याच्या काळांत इतिहाससंशोधन आणि मानव जातिशास्त्र हीं बाल्यावस्थेंत होतीं; कदाचित् तीं जन्मालाही आलेलीं नसावींत. परंतु ऐतिहासिक–साधन–सामुग्री इतकी उजेडांत आल्यावर आणि मानवजातिशास्त्राची आजच्यासारखी प्रगति झाल्यावरही अजन सर व्हिन्सेन्ट स्मिथसारख्या इतिहासकारांनीं याच कल्पनेचा पुरस्कार करावा हें आश्चर्यकारकच नव्हे तर शोचनीय हि आहे. रजपुतांच्या उत्पत्तीविषयीं लिहितांना मानववंशशास्त्राचे सिद्धांत हे " इतिहासकाराला निरुपयोगी " आहेत असें म्हणून ते विचारांत न घेतां रजपुतांच्या उत्पत्तीविषयीं सर व्ही. स्मिथ म्हणतो "राजपुताना व गंगेचा उत्तर प्रदेश यांत परदेशाहून येऊन राहिलेले लोक तेथील राजे राजवाड्यांशीं झालेल्या युद्धांत पूर्णपणें नष्ट झाले नसावेत अशी जी आजपर्यंत फारा दिवसांपासून अंधुक कल्पना होती व जी आतां चांगल्या पुराव्यानें शाबीत झालेली आहे तिजकडे वाचकांचें लक्ष वेधणें जरूर आहे. त्या युद्धांत पुष्कळसे मेले असले तरी बाकीच्या वंशजांचें प्रमाण आज कालच्या रहिवाश्यांत बरेचसें

मोठें असण्याचा संभव आहे. तत्पूर्वी आलेल्या शक व यउाचि लोकांप्रयाणें हे बाहेरून आलेले लोक हिंदुधर्माच्या सर्वग्राही शक्तीस बळी पडून फारच जलद पूर्ण हिंदु बनून गेले. ज्या जातींनां किंवा कुटुंबांना सरदारकीचा मान मिळाला त्यांचा त्या वेळच्या हिंदु वर्ण-व्यवस्थेमध्यें क्षत्रिय किंवा रजपूत म्हणून समावेश झाला व या रीतीनें पांचव्या व सहाव्या शतकामध्यें हिंदुस्थानांत आलेल्या रानटी टोळ्यांमधूनच उत्तरेकडील परिहार व इतर प्रसिद्ध रजपूत घराणीं उदयास आलीं यांत संशय नाहीं. या उच्च घराण्यांखेरीज राहि-लेल्या इतर सामान्य लोकांस गुजर हें नांव प्राप्त झालें व मानापा-नांत त्यांना रजपुतांच्या खालीं जागा मिळूं लागली. खालीं दक्षिणेस दुसऱ्या एतद्देशीय जाती व घराणीं हिंदुसमाजांत समाविष्ट झालीं व पूर्वींचे गोंड, भर, खारवा, वगैरे लोक चंदेल, राठोड, गहरवाल इत्यादि प्रसिद्ध रजपूत नांवांनीं पुढें आले, व आतां ते सर्व लोक आपल्या पिढ्या चंद्रसूर्यांशीं भिडवूं लागले आहेत." हा उतारा बराच लांबट आहे. परंतु हिंदुस्थानच्या इतिहासांत या वेळेस हीं अतिप्रसिद्ध रजपूत घराणीं उदयास कशीं आलीं या विषयीं यूरो-पीय पंडित व इतिहासकार यांचें काय मत आहे हें दाखविण्यासाठीं हा लांब उतारा देणें आवश्यक आहे. गेहलोत, राठोड, चंदेल व प्रतिहार हीं घराणीं आपण आर्यवंशीय आहोंत असा हक्क सांगत आहेत तरी मुळांत तीं वस्तुतः रानटी, परकीय ( हूण ) किंवा एत-द्देशीय अनार्य ( गोंड वगैरे ) आहेत, असें या इतिहासकाराचें म्हणणें आहे.

मध्ययुगीन व अर्वाचीन कालामध्यें हिंदुस्थानच्या इतिहासांत ज्यांनीं उज्वल कीर्ति संपादन केली आहे तीं रजपूत घराणीं मुळचीं आर्यवंशीय किंवा सिथियन किंवा द्राविडी आहेत हा खरोखर मह-

त्याचा प्रश्न नाहीं. ते अति वीर्यशाली व दाक्षिण्य–प्रिय होते हें कोणासहि नाकबूल करितां येणार नाहीं; आणि त्यांच्या पूर्वपीठिकेंत मानलेल्या कमीपणामुळें त्यांच्या या महत्वास बाध येत नाहीं. परंतु आम्ही या प्रश्नाकडे पाहतों तें फक्त इतिहासाच्या दृष्टीनें. म्हणजे रजपुतांच्या पूर्वपीठिकेचा वरील वृत्तांत इतिहासाला धरून आहे कीं नाहीं, हें पाहणें आहे. वरील मतास रा. देवदत्त रामकृष्ण भांडारकरांसारख्या कांहीं एतद्देशीय इतिहाससंशोधकांनीं पुष्टि दिली आहे; व साहजिकपणें टॉडच्या 'राजस्थानच्या वृत्तांता'च्या विद्वान् नवीन संपादकानें याच मताचा अनुवाद केला आहे. अगदीं अलिकडील शोधांवर रचलेल्या टिपणांसह छापलेल्या या प्रसिद्ध इतिहासाच्या शेवटल्या आवृत्तीस जोडलेल्या उपोद्घातांत सर वुइल्यम क्रुक म्हणतो कीं, "रजपुतांच्या उत्पत्तीवर अलीकडील शोधांनीं बराच प्रकाश पडला आहे. वैदिक काळचे क्षत्रिय व मध्ययुगांतील रजपूत यांच्यामध्यें जी भिन्नता दृष्टोत्पत्तीस पडते ती इतकी मोठी आहे कीं, त्या दोघामध्यें कोणताही संबंध जोडणें शक्य नाहीं. हें आतां पुराव्यानें सिद्ध झालें आहे कीं, बऱ्याचशा रजपूत घराण्यांची उत्पत्ति शक किंवा कुशान लोकांपासून किंवा ४८० इ. स. च्या सुमारास गुप्त साम्राज्याचा नाश करणाऱ्या श्वेतहूणांपासून झाली आहे. हूणांशीं संबंध असलेल्या गुर्जरांनीं हिंदुधर्म स्वीकारला व त्यांच्यातील प्रमुखांमधून उच्च रजपूत घराणीं उदय पावलीं. या लोकांना जेव्हां राजवैभव प्राप्त झालें व त्यांनीं जेव्हां हिंदूंचा धर्म व त्यांच्या समाजव्यवस्था यांचा स्वीकार केला, त्यावेळीं त्यांचा संबंध महाभारत व रामायणामधील प्रमुख वीरांशीं जुळविण्याचा प्रयत्न ओघानेंच करण्यांत आला. यामुळेंच सूर्य व सोम यांचेपासून रजपूत घराण्यांची उत्पत्ति झाली, या अद्भुत कल्प-

नोविषयींच्या आख्यायिकांचा त्यांच्या वृत्तांतात समावेश झाला" (पान ३१). क्रुक पुढें म्हणतो कीं, "रजपुत किंवा क्षात्रिय हें नामाभिधान समाजांतील दर्जावर अवलंबून असे, कुलोत्पत्तीवर नसे; आणि म्हणून त्यावेळीं अपूर्णावस्थेंत असलेल्या जातिभेदाच्या कल्पनांस धक्का न बसतां परदेशीय लोकांचाही या जातींत समावेश होऊं शकला. परंतु हा परकीयांचा स्वधर्मांत करून घेतलेला समावेश सोइस्कर अशा दंतकथांखालीं छपविणें आवश्यक होतें. यामुळेंच बौद्धधर्म व इतर पाखंडी मतांचा उच्छेद करण्याकरितां अर्थात ब्राह्मणांना मदत करण्यासाठीं म्हणून पुराण आर्य ऋषींच्या नेतृत्वाखालीं शुद्धिसमारंभ करून अग्न्युद्भव कुलें उत्पन्न करण्यांत आली, या कथेचा उद्भव झाला. परमार, परिहार, चालुक्य व चौहान या चारच घराण्यांचा या अग्निकुलांत समावेश करण्यांत येतो." हाही विस्तृत उतारा हेंच दाखवितो कीं, रजपूत हे वैदिक क्षात्रियांचे वंशज आहेत हें साधारणपणें भारतीयांस मान्य झालेलें मत अलीकडील आंग्ल संशोधकांस संमत नाहीं, आणि त्याचप्रमाणें पाश्चात्य पंडितांनीं व पुराणेतिहाससंशोधकांनीं रजपुतांची उत्पत्ति परदेशीय आहे असें जें मत प्रचलित केलें आहे त्याच्या पुष्टिकरणार्थ रजपूत घराण्यांच्या अग्निकुलोत्पत्तीच्या सर्वसंमत कथेचा कसा विपर्यास केला जातो हेंही या उताऱ्यानें स्पष्ट होतें.

आम्हीं आपल्या पुस्तकाच्या पहिल्या भागांत यांपैकीं बऱ्याच युक्तिवादांचें खंडन केलें आहे. गुर्जर हे परदेशीय असून पांचव्या शतकाच्या सुरुवातीस हूणांबरोबर इकडे आले हें रा. देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांचें विधान निराधार आहे हें आम्हीं त्या भागांत दाखविलें आहे. स्मिथनें देखील हें कबूल केलें आहे कीं गुर्जर हे या काळाचे सुमारास बाहेरून हिंदुस्थानांत आले असें नुसतें सूचित

करण्यास सुद्धां पुरेसा पुरावा स्थानिक दंतकथांत किंवा परकीयांच्या उल्लेखांत सांपडत नाहीं; मग तें सिद्ध करणें दूरच राहिलें. शिवाय गुर्जरांचे पूर्वज मानलेल्या खिझरांच्या इतिहासावरून हेंच सिद्ध होतें कीं, त्यांनीं आपला देश कधींही सोडला नाहीं. आणखी हेंहि त्यांच्या वर्णनावरून स्पष्ट आहे कीं या दोघांचे स्वभावहि परस्पर विरोधी असे होते. खिझर हे आपल्या घरादारांना चिकटून राहणारे असून व्यापारवृत्तीचे होते, तर गुर्जर हे परिभ्रमणशील असून गुरें पाळण्याचा व चारण्याचा धंदा करीत असत. हिंदुस्थानांतील गुर्जर हे स्वरूपानें सर्वतोपरी आर्य आहेत, त्यांची नाकें पारिशियनच्या नाकांपेक्षांहि अधिक तरतरीत आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे गुर्जर हे परदेशीय आहेत या समजुतीवर उभारलेला हा सर्व सिद्धान्त निराधार आहे; कारण गुजर हे परकीय किंवा सिथियन नसून स्पष्टपणें आर्य आहेत हें पूर्वीच आम्हीं निदर्शनास आणून दिलें आहे. तेव्हां या कल्पनेच्या खंडनासाठीं वापरलेल्या प्रमाणांचें आम्हीं पुनरुद्घाटन येथें करीत नाहीं. आम्ही त्याच भागांत हेंही दाखवून चुकलों आहों कीं, हूण व शकांसारख्या परकीयांचे फारसे वंशज शिल्लक राहणें शक्य नव्हतें; राजसत्ता हातून गेली म्हणजे ती चालविणाऱ्या जातीही नष्ट होतात. तेव्हां या भागांत आम्हीं भांडारकरांच्या कल्पनेच्या दुसऱ्या भागाचा विचार करणार आहों आणि सर व्हिन्सेन्ट स्मिथ व मि. वुइल्यम क्रुक हे भांडारकरांच्याच कल्पनेचा पुरस्कार करतात. भांडारकरांचें म्हणणें असें आहे कीं, "रजपूत हे गुजरांचे वंशज आहेत हें शहाजोग पुराव्यानें शाबित झालें आहे." तेव्हां असें म्हणावयाला हरकत नाहीं कीं, आम्ही आपल्या पहिल्या भागांत भांडारकरांच्या युक्तिवादांतील दुसऱ्या प्रमाणाचें खंडन केलें असून, या भागांत आम्ही या त्यांच्या

पहिल्या प्रमाणाचें खंडन करणार आहोंत. भांडारकरांचा युक्तिवाद अनुमानपद्धतींत पुढीलप्रमाणें मांडतां येईल.

( १ ) रजपूत हे गुजरांचे वंशज आहेत.

( २ ) गुजर हे परकीय देशांतून आलेले आहेत.

सबब, रजपूत हे परकीयांचे वंशज आहेत. आम्ही हें आधींच सिद्ध केलें आहे कीं, गुजर हे परकीय देशांतून आलेले नसून खरे-खुरे आर्य आहेत; तेव्हां पहिल्या प्रमाणांत धरल्याप्रमाणें रजपुतांची उत्पत्ति गुजरांपासून झाली असें जरी धरलें तरी ते अनार्य होऊं शकत नाहींत. परंतु या भागांत येवढ्यावरच न थांबतां आम्हीं असें सिद्ध करून दाखविणार आहोंत कीं, रजपुतांची उत्पत्ति गुजरांपासून झालेली नसून वैदिक क्षत्रिय कुलांत उत्पन्न झालेल्या क्षत्रिय घरण्यांपासूनच झालेली आहे. भांडारकरांनीं आपल्या कल्पनेचें उद्घाटन प्रामुख्यानें आपल्या 'गुजर व हिंदी जनतेंतील परकीय लोक' या निबंधांत केलें आहे. या निबंधांतील त्यांनीं पुढें केलेलीं निरनिराळीं प्रमाणें सर व्ही. स्मिथ व क्रुक यांचेसारख्या इतिहासकारांस मान्य झालीं आहेत व त्यांच्या पुस्तकांतील उतारे आम्हीं वर दिलेच आहेत. शिवाय खुद्द रजपुतांत प्रचलित असलेल्या अग्निकुलांच्या आख्यायिकेनें या प्रमाणांस पुष्टि मिळालेली आहे. अशाच वेळीं संशोधनाची खरी किंमत प्रत्ययास येते. अग्निकुलांची आख्यायिका ही एक केवळ कल्पनेचा बाजार आहे. हें प्रथम सांगितलें पाहिजे कीं, आधुनिक कालांतील एका कवीच्या कल्पनाशक्तीची ती सृष्टि आहे. कवींनीं सांगितलेल्या रम्य परंतु अवास्तव कथा लोकांत एकदां प्रस्तृत होऊन त्यांचा त्या कथांवर विश्वास बसला म्हणजे सामान्य लोकांचीच दिशाभूल होते असें नाहीं, तर स्मिथ व क्रुक यांच्यासारखे इतिहासकार आणि जॅक्सन, भांडारकर यांसारखे संशोधक बुद्धीचे

लोक यांचीही दिशाभूल होते हें या गोष्टीवरून आपल्या निदर्शनास येईल. रजपूत हे परकीय लोकांपासून उत्पन्न झालेले आहेत या मताच्या पुष्टिकरणार्थ उपयोगीं पडलेल्या अग्निकुलांच्या निराधार कल्पित कथेच्या उदाहरणानें इतिहाससंशोधनाची किंमत व उपयुक्तता हीं स्पष्टपणें प्रत्ययास येतात.

---

# प्रकरण ३ रें

## अग्निकुल कल्पना खोटी

पुराणमताभिमानी ख्रिस्ती लोकांची अशी समजूत आहे कीं, ख्रिस्ताचा प्रसाद म्हणून वांटलेल्या भाकरीचें व दारूचें ख्रिस्ताच्या रक्तमांसांत रूपांतर होतें. या मताचें विवरण करीत असतां गिबन म्हणतो कीं, "प्रारंभीं अलंकारिक भाषेंत सांगितलेल्या गोष्टी लोकांच्या विश्वासांत उतरल्या म्हणजे कांहीं कालानें त्यांस न्यायशास्त्रांतील सिद्धांताचें स्वरूप प्राप्त होतें;" हें म्हणणें वास्तविक असून बहुतेक सर्वत्र लागू आहे. बहुतेक लोकप्रिय समजुती कविकल्पनेंतूनच उद्भूत झालेल्या असतात; आणि कालाच्या ओघानें त्या अबाधित सत्यस्वरूप होतात. मानव वंशांची उत्पत्ति सूर्यसोमांपासून खरोखरच झाली असेल हें कोणाही सुबुद्ध माणसाला पटण्यासारखें नाहीं. अशा गोष्टींवर विश्वास ठेवणें खरोखर वेडगळपणाचें आहे. परंतु भारतीय आर्यवंश सूर्यसोमांपासून उत्पन्न झाले ही आख्यायिका फार पुरातन कालापासून चालत आली आहे. ती ऋग्वेदांतही सांपडते. तथापि या धडधडीत वेडगळ दिसणाऱ्या आख्यायिकेलाहि

ऐतिहासिक महत्त्व आहे, आणि आम्ही अन्य ठिकाणीं या आख्यायिकेवरून काय अनुमान काढतां येईल तेंही नमूद केलें आहे. तें अनुमान हें कीं, हिंदुस्थानांत भारती आर्य लोकांच्या दोन निरनिराळ्या टोळ्या आल्या असल्या पाहिजेत. हें अनुमान पहिल्यानें सर ग्रिअरसन यांनीं भाषाविषयक प्रमाणांवरून सुचविलें. असो, याच निरानिराळ्या रजपूत घराण्यांच्या आख्यायिकांसही त्या जर पुष्कळ दिवसांच्या आणि एकरूप असतील तर कांहीं तरी महत्त्व असणें स्वाभाविक आहे. अग्निकुलांच्या उपपत्तीची आख्यायिका कवीच्या कल्पनेंतून अगदीं अलीकडे निर्माण झाली आहे हें निःसंशय सिद्ध झालें नसतें तर ही आख्यायिका ऐतिहासिक दृष्ट्या उपयुक्त ठरती; आणि परकीय लोकांचा हिंदुवर्णव्यवस्थेंत समावेश करून घेण्यांत आलेला आहे या कल्पनेला तिच्या योगानें पुष्टि मिळाली असती. याशिवाय, ही आख्यायिका कवीच्या कल्पनेची सृष्टि आहे. इतकेंच नव्हे तर ती कवीच्या उक्तीचा भ्रान्त अर्थ समजून त्यावर ती उभारलेली आहे आणि शिवाय ती अगदीं अलीकडील आहे; हेंही सिद्ध करितां येईल. इतिहाससंशोधनानें ही गोष्ट स्पष्टपणें निदर्शनास आली असूनही दुर्दैवानें पाश्चात्य पंडितांना ही गोष्ट अजून पुरेशी पटलेली नसल्यामुळें तिच्यापासून स्वाभाविक निघणारीं अनुमानें त्यांनीं काढलीं नाहींत.

वशिष्ठानें अग्नींतून क्षत्रियांचीं चार कुलें निर्माण केलीं ही कथा पृथ्विराजाचा भाट कवि चंद यानें शेवटल्या शूरोदार रजपूत राजाच्या पराक्रमाचें वर्णन करण्यासाठीं रचलेल्या पृथ्विराजरासा या महाकाव्यांत पहिल्यानें प्रसृत केली ही गोष्ट प्रायः सर्वश्रुत आहे. थोडक्यांत ही कथा अशी आहे कीं, राक्षसांनीं अथवा म्लेच्छांनीं पृथ्वीला जेव्हां त्रस्त केलें तेव्हां वसिष्ठानें आपल्या अग्नींतून एका

मागून एक असे चार वीर पुरुष निर्माण केले. पहिला परमार, दुसरा चालुक्य, तिसरा प्रतिहार आणि या तिघांनाही जेव्हां राक्षसांचें निर्दाळण करितां आलें नाहीं तेव्हां शेवटीं चौथा भीमकर्मा चाहमान. काव्याचा नायक पृथ्विराज या चाहमानांचाच वंशज होय. रासे-बरोबर ही कथा लोकप्रिय झाली आणि कालांतरानें सर्व रजपूतांनीं ती सत्य म्हणून मान्यही केली; आणि मौज ही कीं या चारी कुलांतील वंशजांनींही तिला मान्यता दिली. अर्थातच रजपुतांचा इतिहास लिहि-णाऱ्या कर्नल टॉडला ही कथा ग्राह्य वाटली व त्यानें आपल्या इति-हासांत तिचा संग्रहही केला. या चार घराण्यांना आपली वंशपरंपरा सूर्यसोमांशीं नेऊन भिडवितां येत नाहीं; तीं केवळ अग्न्युत्पन्नच आहेत अशी आतां लोकांची प्रचलित समजूत आहे; आणि तीमुळें हीं चार कुलें बाहेर देशांतून आलीं असून ब्राह्मणानीं अग्निशुद्धि संस्काराच्या अवगुंठनाखालीं त्यांचा क्षत्रियांत समावेश केला या पाश्चात्य कल्प-नेला निमित्त मिळालें आहे.

ही आख्यायिका कवीच्या कल्पनेंतूनच नव्हे तर त्या कवीच्या वाक्यांच्या भ्रान्त समजुतींतून निर्माण झाली आहे असें सिद्ध झालें तर तें कित्येकांना अद्भुत वाटेल. वस्तुतः स्वतः चंदालाही हीं क्षत्रिय घराणीं नवीन निर्माण केलेलीं होतीं असें भासविण्याची इच्छा नव्हती असें दिसतें. कारण जुन्या शिलालेखांच्या पुराव्यावरून असें निःसं-देह सिद्ध होतें कीं, नवव्या शतकांत हीं चार निदान त्यांपैकीं तीन घराणीं तरी आपण सूर्यसोमवंशांतच उत्पन्न झालीं आहोंत असेंच म्हणत आणि लोकांचाही तसाच विश्वास होता. कनोज येथें साम्राज्य स्थापणारें प्रतिहार घराणें, जें गुजर अतएव विदेशीय होतें असें सिद्ध करण्याचा भांडारकरादि झटून प्रयत्न करितात तें, सूर्यवंशीय आहे असा दहाव्या शतकांतील एका शिलालेखांत स्पष्ट उल्लेख

आहे. हा ग्वाल्हेरचा भोजाचा शिलालेख या बाबतींत अत्यंत महत्त्वाचा असून कनोजचे सम्राट् प्रतिहार हे सूर्यवंशांतील प्रख्यात वीर पुरुष जो राम त्याचा भाऊ लक्ष्मण यापासून उत्पन्न झाले असें त्यांत म्हटलें आहे. लक्ष्मण हा रामाचा प्रतिहार म्हणजे द्वारपालक असल्यामुळें त्याच्या वंशजांना प्रतिहार हें नाम प्राप्त झालें.* विवक्षित काळांत लोकांत कोणत्या समजुती प्रचलित होत्या हें दाखविण्यापलीकडे असल्या आख्यायिकांना आम्ही किंमत देत नाहीं हें आम्ही पूर्वीच सांगितलें आहे. या आख्यायिकेवरून हें निश्चित सिद्ध होतें कीं, नवव्या शतकांत प्रतिहार घराणें सूर्यवंशीय आहे अशी लोकांची कल्पना होती. मग तेच प्रतिहार अग्निकुलोत्पन्न होते असें बाराव्या शतकांत चंद म्हणेल तरी कसें? त्याचप्रमाणें चंदाच्या पृथ्विराजरासेपूर्वीच्या लेखांतून चाहमान हे याच सूर्यवंशात उत्पन्न झाल्याचा स्पष्ट निर्देश आहे. हर्षाच्या शिलालेखांत ( एपि. इंन्डिया २, पा. ११९ ) चाहमानांची कोणा एका गूवकापासूनची वंशावळ दिलेली आहे, आणि यांतील उल्लेखावरून आम्हांला तर असें खास वाटतें कीं, हें घराणें सूर्यवंशोद्भव असलें पाहिजे (तन्मुक्त्यर्थमुपागतो रघुकुले भूचक्रवर्ती स्वयम् ). पृथ्विराजाच्याच दरबारांतील एका तत्कालीन कवीनें रचलेल्या पृथ्विविजय काव्यावरील लेखांत ( आर. ए. एस. १९०३ ) अजमीरचे हरविलास सारडा यानीं असें सिद्ध केलें आहे कीं, या काव्यांत पृथ्विराजाचें सूर्यवंशोत्पन्न म्हणून वर्णन केलें आहे. हम्मीर महाकाव्यांतही चाहमान हे सूर्यापासून उत्पन्न झाले होते असें म्हटलें आहे. अजमीरच्या वस्तुसंग्रहालयांतील एका लेखांतही याचप्रमाणें उल्लेख केला आहे. यावरून हें निश्चित दिसतें

---

* तद्वंशे प्रतिहारकेतनभृति त्रैलोक्यरक्षास्पदे ।

कीं, नवव्यापासून तेराव्या अथवा चवदाव्याही शतकापर्यंत चाहमाण हे सूर्यवंशीय क्षत्रिय होते अशी समजूत होती. तिसरें घराणें अनहिलपणट्टणचे सोळंकी किंवा चालुक्य यांचें, तें सोमवंशीय आहे असें शिलालेखांतून वर्णिलें आहे. बादामीचे चालुक्य आणि गुजराथचे हे चालुक्य हे निरनिराळे आहेत हें विसरतां कामा नये. येथें येवढेंच सांगितलें म्हणजे पुरे कीं, हे चालुक्य भारद्वाज गोत्रीय असून पृथ्विराजरासेंत याप्रमाणेंच त्यांचें वर्णन केलें आहे. चेदीच्या हयहयांच्या एका शिलालेखांत चालुक्यांच्या या गोत्राचा उल्लेख आला आहे. बिल्हारीच्या शिलालेखांत ( एपि. इंडिया १ पा. २५३-९ ) केयूरवर्ष हैहयानें भारद्वाज गोत्रीय चालुक्य अग्निवर्म्याची कन्या नोहला देवी हिच्याशीं विवाह केला असें म्हटलें आहें. हा शिलालेख अकराव्या शतकांतील आहे असें तज्ज्ञांचें म्हणणें असून त्यांत दक्षिणेकडील चालुक्यांची बिल्हणानें आणि त्याचप्रमाणें पूर्वेकडील चालुक्य राजानीं जी उत्पत्ती दिली आहे तिच्याहून निराळी अशी उत्पत्ति या चालुक्यांची दिली आहे. या लेखांत अशी उत्पत्ति दिली आहे कीं, या चालुक्यांच्या आदिपुरुषाला भारद्वाज द्रोणानें द्रुपदाला मारण्यासाठीं अंजलींत घेतलेल्या पाण्यापासून निर्माण केलें आणि अतएव तोही याच म्हणजे भारद्वाज गोत्राचा होता. भारद्वाज हा सोमवंशीय असल्यामुळें भारद्वाज गोत्रीय चालुक्य हेही सोमवंशीय होत. तेव्हां हे चालुक्य सोमवंशीय असून द्रोणानें निर्माण केले अशी या शिलालेखावरून त्यावेळीं प्रचलित समजूत दिसत असतां वशिष्ठानें त्यांना अग्नीपासून उत्पन्न केलें असें भासविण्याचा बाराव्या शतकांत चंदानें प्रयत्न करावा हें स्वाभाविक दिसत नाहीं.

इतिहाससंशोधकांनीं आतां हें मान्य केलें आहे कीं, ( टॉडच्या राजस्थानाच्या इतिहासाची क्रुकचीच प्रस्तावना पहा.), हीं तीन घराणीं

अग्निकुलोत्पन्न नाहींत. परंतु यापासून स्पष्ट निघणारीं अवश्य अनुमानें त्यांनीं काढलीं नाहींत. चाहमान आणि प्रतिहार हीं दोन्ही महत्त्वाचीं घराणीं, ज्यांच्याविषयीं तीं गुजर असून शुद्धिसंस्कारानें क्षत्रिय करून घेण्यांत आलीं अशी समजूत आहे, तीं अग्निकुलोत्पन्न नसून सूर्यवंशीय आहेत असें नवव्या व दहाव्या शतकांत लोकांचें मत होतें असें सिद्ध झाल्यावर ते परकीय आहेत ही कल्पना ढांसळून पडत नाहीं काय? परंतु येवढ्यानेंच कांहीं सरलें नाहीं. चवथें घराणें जें परमार तेंही चंदानें म्हटल्याप्रमाणें अग्निकुल म्हणतां येत नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, परमारांच्या बाराव्या शतकापासूनच्या शिलालेखांत परमारांची उत्पत्ति वशिष्ठाच्या अग्नीपासून झाली असें म्हटलें असलें तरी रासेंतील कथेहून अगदीं निराळी अशी कथा या लेखांत दिली आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, सुरधेनूला विश्वामित्र बलात्कारानें नेत असतां त्याचें शासन करण्यासाठीं म्हणून वशिष्ठानें परमारांच्या आदिपुरुषास उत्पन्न केलें. उदाहरणार्थ उदेपुर प्रशस्तींत (एपि. इंडिया भा. १) ही कथा दिली असून परमारांचें गोत्र वशिष्ठ आहे असें त्यांत म्हटलें आहे. सर्व हिंदुस्थानभर परमार लोक आपल्याला याच गोत्राचे म्हणवितात आणि चंदानेंही त्यांचें हेंच गोत्र दिलें आहे.

तेव्हां, प्रतिहार, चाहमान, चालुक्य आणि परमार यांच्या उत्पत्तीबद्दल चंदानें आपल्या रासेंत सांगितलेली कथा ही त्याच्या काळीं किंवा त्याच्याही पूर्वींच्या शतकांत प्रसृत असलेल्या व तत्कालीन व तदनंतर काव्यांत ग्रथित केलेल्या आख्यायिकांस धरून आहे असें कसें म्हणतां येईल? याचें उत्तर असें देतां येईल कीं, पृथ्वीराजरासा ही चंदानें रचली नसून दुसऱ्यानेंच कोणी त्याच्या नांवावर १७ व्या शतकांत खपवली आहे; ती शिलालेख विसरून गेल्यानंतर मुसल-

मानांच्या अमलांत पुढल्या काळांत लिहिली गेली असावी; किंवा असें म्हणता येईल कीं, चंदानें आपल्या काव्यांत सांगितलेल्या या कथेचा भावार्थ समजावून घेण्यांत तरी चूक होत असावी. रासा हें काव्य तत्कालिन कवीनें लिहिलें असेल काय याबद्दल श्यामलाल पांड्या यांनीं संदेह व्यक्त केला आहे. या विषयाचें येथें विस्तृत विवेचन करण्याची आवश्यकता नसल्यामुळें त्यावरील आमचे विचार आम्ही टिप्पणींच्या रूपानें देणार आहों. पण कोणालाही हें सहज दिसेल आणि सांगतां येईल कीं, रासेंतील ही कथा केवळ कवीच्या कल्पनाशक्तींतून बाहेर पडली, आणि कालान्तरानें लोकांची ती तशीच घडली असावी अशी भावना झाली. हीं चारी घराणीं म्लेच्छांबरोबर त्यांच्या झालेल्या लढायांनीं प्रसिद्धीस आलीं, आणि यामुळेंच त्यांचा असा निकट संबंध जोडण्यांत आला. परंतु चंदानें सांगितलेल्या कथेचाही विपरीतार्थ यांत झाला आहे असें दिसतें; आणि स्वतः चंदाचाही प्रसिद्ध पौराणिक सूर्यसोमवंशीय उत्पत्ती-व्यतिरिक्त अग्न्युत्पत्तीची कल्पना पुढें मांडण्याचा हेतु नसावा असें वाटतें. चंदानें ज्या प्रसिद्ध छत्तीस राजघराण्यांची नांवनिशी दिली आहे त्यांचा सर्व सूर्य, सोम, आणि यादव वंशीय म्हणून उल्लेख केला आहे यावरून हें स्पष्ट होतें. त्यानें अग्निकुलवंशाचा उल्लेखही केला नाहीं. अग्निकुलें म्हणून मानलेलीं प्रतिहार, चाहमान, चालुक्य व परमार या चार घराण्यांचा त्यानें जुन्या सूर्य सोम किंवा यादव वंशांतच समावेश केला आहे. रासेंतील छत्तीस रजपूत घराण्यांच्या उल्लेखांतील सुरुवातीचा दोहरा पुढीलप्रमाणें आहे. "रवि ससि जाधव वंस । ककुत्स्थ परमार सदावर । चाहुआन चालुक्क । छंद सिलार अभीयर ॥" येथें हें स्पष्ट दिसतें कीं त्यानें परमार, चाहमान, आणि चालुक्य हीं तीन घराणीं पुरातन सूर्य, सोम व यादव वंशांतच

समाविष्ट केलीं आहेत. परमार, प्रतिहार, चालुक्य व चाहमान हे चार वीर वशिष्ठाच्या हांकेबरोबर अग्नींतून बाहेर पडले असें वर्णन करितांना हे चार वीर वशिष्ठानें नवे निर्माण केले असें सांगण्याचा त्याचा हेतु नाहीं. त्याच्या सांगण्याचा आशय येवढाच कीं वशिष्ठाच्या आज्ञेनें पूर्वींच्याच घराण्यांपैकीं हे चार वीर अग्नींतून बाहेर पडले व त्यांनीं राक्षसांबरोबर युद्ध केलें. असो, याप्रमाणें त्याच्याच नांवावर खपत असलेल्या महाकाव्याबरोबर सोळाव्या शतकापासून अर्थविपर्यास केलेल्या या चंदाच्या कथेवर लोकांचा इतका विश्वास बसला कीं, आपल्या पूर्वजांनी शिलांवरील ऐतिहासिक उल्लेखांत आपला केव्हांही अग्निकुल असा निर्देश न करितां सूर्यसोमवंशीय क्षत्रिय असा निर्देश केला आहे हें हीं चारही घराणीं विसरून गेलीं. त्यांचे भाटही ही गोष्ट इतकी पूर्णपणें विसरून गेले कीं, नूतनचंद बुंदिकोट्याचा सूरजमल भाट यानें आपले यजमान चाहमान यांच्या घराण्याची कीर्ति गाण्यासाठीं रचलेल्या हिंदी महाकाव्यांत चंदाच्या कथेच्या अर्थविपर्यासानें सुरू झालेल्या या घोंटाळ्याला क्षत्रियांचे एकंदर पांच वंश कल्पून पूर्णावस्थेस नेऊन सोडलें. बुंदीच्या सुरज मल्लानें रचलेल्या वंशभास्करांत वशिष्ठाच्या यज्ञकुंडाची कथा अधिक विस्तारानें दिली आहे इतकेंच नव्हे तर पहिला चाहमानवीर हा अग्नीपासून कधीं निर्माण करण्यांत आला हेंही नक्की सांगितलें आहे. (हा काल कलियुगापूर्वीं ३९३१ म्हणजे खिस्ताब्दापूर्वीं ६६३२ असा येतो). पुढील दोहोऱ्यांत पहिल्या प्रथमच या पांच वंशांचा त्यानें उल्लेख केला आहे. "भुजभव, मनुभव, अर्कभव शशिभव छत्रनवंश। है चउतिभ शुचिवंस हुव पंचमप्राथितप्रशंस।" बुंदिकोट्याच्या हाडांनीं आपल्या कवीनें आपल्यावर लादलेल्या नव्या वंशाचा स्वीकार केला आणि अशा तऱ्हेनें पहिल्या प्रथम बाराशेंच्या सुमारास अस्तित्वांत

आलेली अग्निकुलांची काल्पित कथा चारी घराण्यांनीं नवी वंशोत्पत्ति मान्य केली १७०० च्या सुमारास ती न्यायप्राप्त सत्य गोष्टीच्या पदवीस जाऊन पोंचल्यानंतर कर्नल टॉडला या आख्यायिकेबद्दल संशय येण्याला जागा नव्हती. आणि त्याच्या सुप्रसिद्ध रजपुतांच्या इतिहासानें तिच्यावर कायमचाच सत्याचा शिक्का बसला. खोटी ठरलेल्या अग्निकुलांच्या काल्पित कथेची थोडक्यांत ही अशी हकीकत आहे. तिचा एका कवीच्या कल्पनाशक्तींत उगम झाला, दुसऱ्या एका कवीनें त्या कवि वचनाचा निराळाच अर्थ केला आणि शेवटीं बुद्धिभ्रंश झालेल्या रजपुतांनींही स्वतः तिचा स्वीकार केला. याच घराण्यांचे जे शिलालेख आहेत त्यांच्या सहाय्यानें या काल्पितकथेचा परिस्फोट करण्यापेक्षां इतिहाससंशोधनाच्या मोलाचें स्पष्टतर अन्य उदाहरण सांपडणार नाहीं. चंदानें अशा तऱ्हेची कथा खरोखरच प्रसृत केली नाहीं; आणि हीं चारही घराणीं ९ ते १३ व्या शतकापर्यंत आपण सूर्यसोमवंशीय आहोंत असेंच म्हणत आणि लोकही त्यांना सूर्यसोमवंशीय असेंच समजत हें आतां स्पष्टपणें निदर्शनास आलें आहे. हीं चार रजपूत* घराणीं परकीय लोकांपासून उत्पन्न झालीं आहेत, या कल्पनेचा सर्वांत बळकट आधार जी ही अग्निशुद्धीची काल्पित कथा तो आतां नष्ट झाला आहे. आतां बऱ्याचशा लेखांवरून हीं घराणीं गुजर आहेत असें दिसतें आणि त्यांनीं सोम किंवा सूर्यवंशांत मागाहून आपला समावेश करून घेतला अशी दुसरी कोटि प्रसृत करणारे लोक वाद घालूं शकतील;

* परमार घराणेंही सूर्यवंशीय म्हणून गणलें जात असतें; कारण मराठ्यांतील परमार घराणीं वशिष्ठ गोत्राचींच असून तीं मराठे वंशावळींत सूर्यवंशीय म्हणून उल्लेखिलीं गेलीं आहेत.

यासाठीं आतां आपल्याला हीं रजपूत घराणीं गुजर होतीं असें दाखविण्याला कांहीं प्रमाणें आहेत काय याचें निरीक्षण करणें आवश्यक आहे.

---

## टिप्पणी–पृथ्विराजरासेची ऐतिहासिक किंमत

पृथ्विराजरासेवरून असें दिसतें कीं, हें काव्य मुसलमानांबरोबर स्वातंत्र्यासाठीं हिंदूनीं केलेल्या लढायांतील हिंदुस्थानच्या नेहमींच्या पानिपताच्या रणांगणावर इ. स. ११९१ सालीं शेवटली लढाई लढणाऱ्या पृथ्विराजाच्या चंद बरदाई नांवाच्या समकालीन असलेल्या मित्रभाटाने रचलेलें आहे. बंगालच्या रॉयल एशिआटिक सोसायटीच्या जरनलच्या पांचव्या भागांत ( १८८७ ) प्रसिद्ध झालेल्या एका विद्वत्ताप्रचुर निबंधांत कविराज श्यामलदास यांनीं रासांत मित्यांचा व त्यांत सांगितलेल्या कित्येक रजपूत राजघराण्यांच्या इतिहासाच्या पुष्कळ चुक्या दाखवून व मुख्यतः मेवाडचा राजा समरसि हा पृथ्विराजाचा समकालीन असून त्याचा मेहुणा होता असें रासेंत सांगितलें आहे, परंतु तो त्याच्या नंतर किती तरी वर्षांनीं जन्मास आला, तेव्हां तो त्याच्याबरोबर लढाईंत असणें शक्य नाहीं असें निदर्शनास आणून देऊन या काव्याचा अस्सलपणा व त्याचें प्राचीनत्व याबद्दल प्रश्न उपस्थित केला आहे. तथापि या काव्याची नवी आवृत्ति नागरीप्रचारिणी ग्रंथमालेनें प्रसिद्ध केलेली (बनारस १९११) संपादन करणारे मोहनलाल पांड्या व श्यामसुंदरदास यांचें असें म्हणणें आहे कीं, रासा अस्सल असून पृथ्विराजाचा सुप्रसिद्ध समकालीन कवि चंद यानेंच रचलेला आहे; व त्यांनीं कविराज श्यामलदास यांनीं पुढें आणलेल्या कोटिक्रमांस उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. सर व्हिन्सेन्ट स्मिथ यांनीं फारावर्षांपूर्वींच

असें मत नमूद केलें आहे कीं, या काव्याला इतिहासाच्या दृष्टीनें फार थोडी किंमत आहे. ( १८८१ चे RAS ) हिंदी भाषेतील या महत्त्वाच्या महाकाव्याच्या मदतीशिवाय रजपुतांचा व विशेषतः पृथ्विराजाचा इतिहास पूर्ण व्हावयाचा नाहीं तेव्हां या विषयावर आमचें काय मत आहे तें सांगणें आवश्यक आहे.

आमच्या मतें पृथ्विराजरासा या महाकाव्याचें, महत्त्वाच्या बऱ्याचशा बाबतींत व विशेषतः अस्सलपणा व प्राचीनतत्वाच्या प्रश्नांत, महाभारताशीं बरेंच साहश्य आहे. अशा वादांत सत्य हें परस्पर विरोधी अशा दोन मतांच्या मध्यंतरीं बहुधा असतें. आमच्या मतें या काव्याचा मूलभाग अस्सल आणि प्राचीन आहे; परंतु या काव्याची दोन वेळां तरी वाढ करण्यांत आली आहे. आम्ही आपल्या हिंदी महाभारतमीमांसेंत ज्याप्रमाणें सध्याचें महाभारत हें व्यासाच्या मूळच्या महाभारताचें सौतीनें दुसऱ्यांदां वाढविलेलें स्वरूप आहे ( पहिली वाढ वैशंपायनानें केली ) असें दाखविलें आहे, त्याप्रमाणेंच पृथ्विराजरासा मूळ चंदानें रचली असावी, नंतर त्याच्या मुलानें तींत भर घालून वाढविली असावी, आणि त्यानंतर १६।१७ व्या शतकाच्या सुमारास कोणा अज्ञात कवीनें तिची वाढ केली असावी असें दिसतें. पुष्कळशा महत्त्वाच्या बाबतींत या दोन महाकाव्यांत पूर्ण साम्य आहे. उदाहरणार्थ भारतीय महायुद्धाचा कवि व्यास हा जसा त्या युद्धांत स्वकर्तृत्वानें चमकतो त्याचप्रमाणें चंद कविहि या काव्यांच्या कथानकांत स्वतः भाग घेणारी एक व्यक्ति आहे. व्यासानें जशा आपल्याला दैवी शक्ति लावून घेतलेल्या नाहींत तशाच त्या चंदानें ही स्वतः लावून घेतलेल्या ( वरदाई या विशेषणानें व्यक्त होत असलेल्या ) नसाव्या. या दैवी शक्तींचा आरोप त्यांच्यावर त्यांच्या मुलानें किंवा त्या काव्याचें दुसरें संस्करण करणाऱ्या कवीनेंच केला असला पाहिजे. व्यासाचा पहिला शिष्य वैशंपायन यानें भारत जसें आपला यजमान राजा जनमेजय यास कथन केलें तसेंच हें काव्य चंदानें आपल्या पत्नीला कथन केलेलें दाखविलें आहे. या गोष्टींमुळें चंदाच्या काव्यांत निदान दोनदां तरी वाढ झाली असावी असें दिसतें.

परंतु मूळ काव्य चंदानें स्वतः लिहिलें हें नाकबूल करणें शक्य नाहीं. जर हें काव्य १६ व्या शतकांत कोणा अज्ञात कवीनें चंदाच्या नांवावर लबाडीनें ठोकून दिलें असतें तर रासेला हल्लीं राजपुतान्यांत निर्विवाद जें प्रामाण्य उपभोगतां येत आहे तें आलें नसतें. वस्तुतः रजपुतांत महाभारताखालोखाल रासेला मान आहे. क्षत्रियांस अत्यंत प्रिय असलेल्या भीषण युद्धाच्या पायावर महाभारत रचलेलें आहे. रासेचा केन्द्रही तद्वत्च अर्वाचीन क्षत्रियांनीं स्वातंत्र्यासाठीं पृथ्वीराजाच्या नेतृत्वाखालीं मुसलमानांबरोबर केलेला एक भयंकर रणसंग्रामच आहे.

या काव्यांतील कोणते भाग प्रक्षिप्त आहेत हें साधारणपणें ठरविण्यासारखीं प्रमाणें देतां आलीं तरी महाभारताप्रमाणें रासेंत पडलेली नवीन भर मूळ रासेहून वेगळी करून दाखाविणें दुर्घट आहे. आम्ही आपल्या Mahabharata: Criticism ( महाभारतमीमांसा ) या पुस्तकांत महाभारताच्या बाबतींत या प्रमाणांचें दिग्दर्शन केलें आहे, परंतु रासा ही जुन्या हिंदींत लिहिलेली असल्यामुळें आम्हांस तितकी सुबोध नाहीं, आणि म्हणून तसा प्रयत्न आम्हांस या बाबतींत करितां येत नाहीं.

या काव्याची वाढ करितांना महाभारताचे अनुकरण करण्याचा हेतुपुरःसर प्रयत्न करण्यांत आलेला आहे यांत शंका नाहीं; तशा तऱ्हेच्या सादृश्याचीं आम्हीं कांहीं ठळक उदाहरणें दाखवून देणार आहोंत.

( १ ) महाभारतायेवढें म्हणजे एक लक्ष ग्रंथाचें काव्य करण्याची हाव या ग्रंथांत दिसून येते. थोर ग्रंथ म्हटला म्हणजे एक लक्षाचा असावा अशी समजूत हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून चालत आली आहे. ( शतसहस्रसंहिता* लिहावयाची ही महाकवींची महत्वाकांक्षा; ) आणि रासेचा एवढा प्रचंड विस्तार करण्याचे प्रयत्नांत कवीस यश आल्यासारखेंच आहे.

---

* मोहनलालांनीं सत ( शत ) सहस्र म्हणजे सात हजार असा अर्थ केला आहे.

( २ ) काव्याचा येवढा दीर्घ विस्तार करण्यास अपरिहार्य असलेल्या स्वतंत्र व विस्तृत अशा पुष्कळशा उपकथांचा याही काव्यांत समावेश करण्यांत आला आहे.

( ३ ) अनेक लढायांचें सविस्तर असूनही हृदयंगम वर्णन करण्याचें यश महाभारताप्रमाणेंच याही काव्यास लाधलें आहे. आधीं पुराण काळच्या लढायांचें वर्णन करणें हेंच कठीण; आणि त्यांत प्रत्येक हकीकतींत निराळीच गोडी लागेल अशा तऱ्हेनें हरएक गोष्टीचें सूक्ष्म वर्णन करणें हें तर अधिकच कठीण आहे.

( ४ ) सृष्टिरचना व सृष्टिसौंदर्य आणि विशेषतः निरनिराळे ऋतु यांचीं वर्णनें करणें ( एका समयामध्यें सर्व ऋतूंचें एकत्र वर्णन करण्याचा रासेंत केलेला प्रयत्न खरोखर अद्वितीय आहे ) ; सांख्यादि दर्शनें आणि विविध शास्त्रें यांचा परिचय करून देणें; राजसत्ता आणि राज्यकारभार यांच्या गुंतागुंतीच्या प्रश्नांचें व संसाराचें सूक्ष्म विवेचन करणें इत्यादि गोष्टी महाभारताचें अनुकरण करण्याच्या उद्देशानें केल्या असल्या तरी त्या प्रत्येकींत वैशिष्ठ्य आणि मोहकता हे गुण भरलेले आहेत; आणि त्यामुळें या काव्यास ‘ महाकाव्य ’ म्हणवून घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.

(५) सर्वांत मौजेची गोष्ट ही कीं, महाभारतांतलि कूटश्लोकांच्या धर्तीवर याही काव्यांत कूटें रचण्याचा प्रयत्न करण्यांत आला असून महाभारतांतल्याप्रमाणेंच हीं कूटें संख्यांकांवर बसविलेलीं आहेत. याचें अगदीं ठळक उदाहरण म्हणजे आनंद विक्रम शकाचें. या काव्यांतील कालाचे सर्व उल्लेख याच शकांत केलेले आहेत. रासेंतील कालाचे उल्लेख चुकीचे आहेत अशी आमची कविराज श्यामलदास यांचेप्रमाणें समजूत नाहीं. मोहनलाल पांड्या यांनीं या सनांचें शोधकबुद्धीनें केलेलें विवरण बरोबर दिसतें; कारण रासेंत दिलेले सगळे सन ९१ या एकाच संख्येनें चुकलेले आढळतात; आणि यामुळें मोहनलाल म्हणतात त्या प्रमाणें कवीनें आनंद विक्रम नांवाचा स्वतंत्र शक उपयोगांत आणला असावा असें दिसतें. हा शक एक तर व्यवहारांत वापरला जात असावा अथवा कवीनें तो नवीनच प्रचारांत आणण्याचा प्रयत्न केला असावा. ज्यांत कवीनें प्रथ-

मच या सनाचा उल्लेख केला आहे व जे आमच्या मतें कूटश्लोक आहेत ते दोन दोहे येथें उद्धृत करणें अवश्य आहे. ते दोहे येणेप्रमाणें:––

एकादससे पंचदह विक्रम साक अनंद।
तिहि रिपुजय पुरहरनको भय प्रिथिराज नरिंद॥
एकादससे पंचदह विक्रम जिम ध्रमसुत्त।
तृतिय साक पृथिराजको लिख्यो विप्रगुन गुप्त॥

यांतील अनंद हा शब्द आनंद या शब्दासाठीं वापरलेला नाहीं असें मोहनलाल पांड्यांचें म्हणणें आहे तें बरोबर आहे. आनंद हा शब्द वृत्ताला जुळत नाहीं. काव्यरचनेच्या सोईसाठीं आनंद यांतील सुरुवातीचा आ ऱ्हस्व करून अ केला असेल असें म्हणावें तर अनंद हा शब्द वापरण्यानें काव्याची हानि करण्यासारखें आहे. पण मोहनलाल पांड्या यांनीं जो या शब्दाचा अर्थ केला आहे तोहि जुळत नाहीं; कारण अनंद म्हणजे नऊऊन, रहित असा अर्थ होईल. त्यांनीं त्याचा एक्क्याण्णव रहित असा अर्थ करण्याचा प्रयत्न केला आहे, तसा तो होऊं शकणार नाहीं. या काव्यांत नव्याच शकाचा उपयोग करण्यांत आला आहे हें त्यांचें मत अर्थातच ग्राह्य आहे. विक्रम संवतांतून ९१ वर्षें वजा केलीं असतां या शकाच्या तारखा बरोबर येतात, परंतु अनंद या शब्दावरून हे ९१ कसे हुडकून काढावयाचे हें कोडेंच आहे. दुसरा दोहा इतकाच गूढ आहे. मोहनलाल पांड्या यांनीं ब्रह्मगुप्ताची ओढाताण करून या दोह्याचा कांहीं तरी अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे ( भाग १ पा. १४५ ) परंतु एक तर विप्रगुन गुप्त याचा ब्रह्मगुप्ताशीं कांहीं एक संबंध नाहीं; दुसरें उपलब्ध असलेल्या माहितिवरून युधिष्ठिर हा विक्रमापूर्वीं १११५ वर्षें होऊन गेला असें ब्रह्मगुप्ताचें मत होतें असें दिसत नाहीं. सर्व हिंदु ज्योतिर्विदांचें असेंच म्हणणें आहे कीं, विक्रम सवंताच्या सुरुवातीस युधिष्ठिर शक ३०४४ होता. नंदाच्या राज्यारोहणापूर्वीं १०१५ वर्षें युधिष्ठिर होऊन गेला होता असें पुराणाचें व विशेषतः भागवताचें म्हणणें आहे.

यावत्परीक्षितो जन्म यावन्नंदाभिषेचनम्।
एतद्वर्षसहस्रं तु ज्ञेयं पंचदशोत्तरम्॥

पहिल्या श्लोकांत नंदाचा व दुसऱ्यांत धर्मसुत अथवा युधिष्ठिर याचा उल्लेख करितांना चंदाच्या मनांत भागवतांतील हाच श्लोक घोळत असावा. परंतु युधिष्ठिर व नंद यांच्या मध्यें चंदानें १११५ वर्षांचें अंतर कां सांगितलें व त्याचप्रमाणें त्यानें आपला तिसरा शक कसा तयार केला याचें स्पष्टीकरण करणें कठिण आहे. आमचें मत असें आहे कीं, लिख्यो विप्र गुन गुप्त म्हणजे काळगणनेचा हिशेब करून त्या ब्राह्मण कवीनें हें कूट रचिलें असा अर्थ दिसतो आणि ज्योतिर्विद ब्रह्मगुप्ताचा येथें कांहींही संबंध नसावा. *

पृथ्विराजरासेचा मूळ भाग चंदानें लिहिला असावा; सगळीच रासा सतराव्या शतकांत रचून त्याच्या नांवावर दडपलेली नाहीं या मताला रासेंत ३६ क्षत्रिय राजघराण्यांची जी यादी दिलेली आहे तिनें चांगलीच पुष्टि मिळालेली आहे; कारण ही यादी १७ व्या शतकाइतकी अलीकडील असणें शक्य नाहीं. "सोरेसे सत्तोत्तरे विक्रम साक बरीत। दिल्लीश्वर चितोडये लेवेंगे बलजीत॥" या दोह्यांत दिल्लीचा मुसलमान बादशहा सं. १६७७ त पुनः चितोड घेईल असें भविष्य सांगितलें आहे, आणि हा दोहा १७ व्या शतकांत रासेंत घुसडण्यांत आला असण्याचा संभव आहे. (याही बाबतींत रासा व महाभारत यांत साम्य आहे. आम्ही आपल्या महाभारतमीमांसेंत महाभारतांतही उदयनाबद्दल असेंच भविष्य असल्याचें दाखविलें आहे.) परंतु येवढ्यानें सर्वच काव्य इतकें मागाहून लिहून चंदाच्या

---

* तर्कच करावयाचा तर नंद म्हणजे ९१ असा अर्थ असावा आणि ९१ ही संख्या नव नंदांच्या कारकीर्दीच्या कालाची द्योतक असावी व पुराणांत सांगितल्याप्रमाणें नंदांची कारकीर्द शंभर वर्षांची नसावी. अथवा १०१५+१०० (नंदांच्या-कारकीर्दीचा काल) १११५ म्हणजे युधिष्ठिरापासून विक्रमाच्या नुकताच पूर्वीं झालेला चंद्रगुप्तापर्यंतचा काल असेंही असूं शकेल. हा सर्वच दोहा अद्यापही कोडेंच आहे. कांहीं लेखकांनीं या दोह्यापासून दोन नंद असावेत अशी जी कल्पना काढली आहे ती मात्र साफ चुकीची आहे हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

नांवावर लादलेलें आहे असें सिद्ध होत नाहीं. या ३६ राजघराण्यांच्या यादीचें पुढील टिप्पणींत विवेचन करून आम्ही असें सिद्ध करणार आहों कीं, ही यादी पृथ्विराजाच्या कालानंतरची असणें शक्य नाहीं. समरसि हा पृथ्विराजाचा समकालीन होता कीं नाहीं याचा विचार आम्ही येथें करणार नसून तिसऱ्या भागांत करणार आहोंत. शिवाय मोहनलाल पांड्या यांनीं या मुद्यावर काय खुलासा केला आहे तो आम्हास दुर्दैवानें अद्याप पहावयास सांपडला नाहीं. त्यांनीं रासेंतील या विषयावरील टिप्पणींत त्याबद्दल आश्वासन देऊन ठेविलें आहे. ( भाग १ पान १४५ )

---

# प्रकरण ४ थें

## अग्निकुलें गुजर आहेत काय ?

रा. डि. आर. भांडारकर यांनीं इंडियन अँन्टिक्वेरीच्या ११ च्या भागांत लिहिलेल्या निबंधांत प्रतिहार, परमार, चालुक्य आणि चाहमान हीं अग्निकुलें म्हणून गणलेलीं घराणीं गुजर आहेत असें प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. ( त्यांचा 'हिंदुजनतेंतील परकी म्लेच्छांचा अंश' हा निबंध पहा ). हें मत चुकीचें आहे हें सिद्ध करणें कठिण नाहीं. या भागांत भांडारकरांनीं आपल्या निबंधांत जीं प्रमाणें पुढें केलीं आहेत त्यांस उत्तर देण्याचें आम्हीं येथें योजिलें आहे.

जाति व लग्न यांच्या पुराण वैदिक इतिहासाबद्दल रा. भांडारकरांचा बराच गैरसमज झाला आहे; तेव्हां त्यांच्या निबंधाच्या सुरुवातीलाच काढलेलीं अनुमानें मान्य करितांना वाचकांनीं सावधगिरी बाळगली पाहिजे. वैदिककालीं कांहीं कालपावेतों आर्य आणि

द्राविड वंशांची बरीच सरमिसळ झाली यांत संदेह नाहीं. आर्यांतील निरानिराळे वर्ण हे जाति स्वरूपापेक्षां वर्गस्वरूपाचेच होते; ब्राह्मण, क्षत्रिय, व वैश्य या तिन्ही आर्य वर्णांत सरसहा लग्नें होत असत; परंतु हे तीनही वर्ण आर्यच असल्यामुळें त्यांत वंश (Race) संकराचा प्रश्नच येत नव्हता. हिंदुस्थानांत येऊन राहिल्यानंतर जेव्हां हे आर्य लोक शूद्र स्त्रियांशीं विवाह करूं लागले तेव्हां वर्णसंकराला सुरुवात झाली. हें मिश्रण कांहीं कालपावेतों अनियंत्रितपणें चाललें होतें. अशा तऱ्हेनें रक्ताचें मिश्रण कांहीं काल चालू होतें हें स्पष्ट रीतीनें सिद्ध करण्याला महाभारतांतील नहुषाची कथा हें उत्कृष्ट प्रमाण आहे. * परंतु उच्च वर्णीय पुरुषांचे शूद्र स्त्रियांशीं होत असलेल्या लग्नांचे परिणाम अत्यंत अनिष्ट होत आहेत हें आढळून आल्यावर लवकरच अशा लग्नांविरुद्ध लोकमत बळावत चाललें. विशेषतः शूद्रांशीं होणारे प्रतिलोम विवाह अनिष्ट आहेत हें स्पष्ट निदर्शनास आलें आणि हेंच मत मनूच्या पुढील श्लोकांत ग्रथित केलें आहे.

जातो नार्यामनार्यायामार्यादार्यो भवेद्गुणैः ।
जातस्त्वनार्यादार्यायामनार्य इति निश्चयः ॥

---

* 'जातिरत्र महाभाग मनुष्यत्वे महामते । संकरत्वात्सर्ववर्णानां दुष्परीक्ष्येति मे मतिः । सर्वे सर्वास्वपत्यानि जनयन्ति सदा नराः । तस्माच्छीलं प्रधानेष्टं ।' इ. नहुषयुधिष्ठिरसंवादावरून असें दिसतें कीं युधिष्ठिराला ब्राह्मणाप्रमाणेंच शूद्रांतही शील आढळून आलें. तेव्हां माणसांच्या वर्तनावरून त्यांच्या वर्णाचें अनुमान करितां येईल असें युधिष्ठिराचें म्हणणें. सर्व ठिकाणीं अबाधितपणें वर्णसंकर होत असल्यामुळें हें असें होतें असें त्याचें मत होतें.

" अनार्य स्त्रीला आर्य पुरुषापासून झालेली संतति गुणानें आर्य असूं शकेल, परंतु आर्य स्त्रीला अनार्य पुरुषापासून झालेली संतति बहुशः गुणानें अनार्यच असणार." याचा परिणाम असा झाला कीं लवकरच शूद्रांबरोबर होणारे प्रतिलोम विवाह निषिद्ध ठरविण्यांत आले, आणि मग याचेंच अनुकरण म्हणून आर्यांतीलहि आपापसांत होणाऱ्या प्रतिलोम विवाहांस प्रतिबंध पडला. मधून मधून शूद्र स्त्रियांशीं अनुलोम विवाह घडत यांत संशय नाहीं, परंतु याज्ञवल्क्यानें शूद्र स्त्रीशीं विवाह करूं नये असें प्रतिपादिल्यामुळें या विवाहास बहुतेक प्रतिबंध पडला.

मेग्यास्थेनीस हिंदुस्थानांत आला असतांना, म्हणजे खिस्ताब्दापूर्वी ३०० वर्षांच्या मुमारास जाति व विवाहव्यवस्था अशा स्थितींत होती. त्यानें असा स्पष्ट उल्लेख केला आहे कीं, " आपल्या जातीबाहेर लग्न करण्याची परवानगी भारतीयांत नाहीं आणि कोणालाही आपला पूर्वापार चालत आलेला धंदा सोडून दुसरा धंदा करितां येत नाहीं. तत्वज्ञानी हे मात्र या नियमाला अपवाद आहेत. आपल्या अंगच्या गुणांनीं त्यांनीं हा हक्क संपादन केला आहे " (मॅकक्रिन्डलचें एन्शंट इंडिया, मेग्यास्थेनीस पा. ८५-८६) मेग्यास्थेनीसच्या काळांत जातींच्या भोंवती अनुल्लंघनीय अशी तटबंदी उभारली गेली होती असें यावरून दिसतें. मग मेग्यास्थेनीसनंतर आलेल्या शक आणि यवन यांचा हिंदुजातींत समावेश झाला असेल तरी कसा ? बौद्ध किंवा हिंदु झाल्यानंतरही त्यांची पूर्वींचीच जात कायम राहत असे हें स्वतः भांडारकरांनींच उद्धृत केलेल्या शिलालेखांत बौद्ध किंवा हिंदु झाल्यानंतर त्यांचा शक किंवा यवन असाच निर्देश केला आहे यावरून सिद्ध होतें. 'मग' ब्राह्मणही मगच राहिले, आणि त्यांची स्वतंत्र उपजात कल्पिली गेली. यवन आणि शक हे मेगॅस्थे-

नीसनंतर हिंदुस्थानांत आले याबद्दल प्रश्नच नाहीं. 'मग' हेही त्यांच्याच प्रमाणें मेगॅस्थेनीसनंतर आले कीं काय हें आम्हांस निश्चित माहित नाहीं. पण त्यांना मग ब्राह्मण म्हणतात यावरूनच हें सिद्ध होतें कीं, ते इतर ब्राह्मणांपासून अलग राहिले; इतर ब्राह्मणांचे आणि त्यांचे लग्न-संबंध झाले नाहींत.

इ. स. पूर्वी ३०० च्या सुमारास जातिव्यवस्था कोणत्या स्थितींत होती हें दाखविण्याला आपल्याजवळ मेगॅस्थेनीसचा ऐतिहासिक पुरावा आहे. त्याचप्रमाणें इ. स. नंतर ६०० च्या सुमारास ती कोणत्या स्थितींत होती हें दाखविण्याला हुएनसँगचे प्रवास-वर्णनांत स्पष्ट असा विदेशीय पुरावा सांपडतो. आम्हीं आपल्या पहिल्या भागांत तो नमूदहि केला आहे. ह्युएनसँग म्हणतो "एका जातींतील स्त्रीपुरुषांचीं लग्नें त्याच जातींतील स्त्रीपुरुषांशीं होतात." (भाग १ पा. ६०) मेगॅस्थेनीसला आढळलेल्या अपवादाचाही येथें उल्लेख केलेला नाहीं; तेव्हां या काळीं जाति या परस्पर भिन्न आणि संबंधरहित अशा स्थितीस पोंचल्या होत्या. तथापि शिलालेखांवरून असें दिसून येतें कीं, क्वचित् ब्राह्मण हे क्षत्रिय कन्यांशीं विशेषतः क्षत्रिय राजकन्यांशीं विवाह करीत असावेत (भाग ६ पा. ६१) आणि वैश्यराजकन्यांचा क्षत्रिय राजांशीं लग्नसंबंध होत असावा. परंतु पुरातन काळच्या व या काळच्या अनुलोम विवाहाच्या परिणामांतील फरक ध्यानांत धरण्याजोगा आहे. फार पुरातन काळीं असलेल्या विवाहापासून झालेली संतति व्यासादिकां-प्रमाणें पित्याच्या जातीची मानली जाई. पुढील काळांत या संततीला आईबापांच्या जातींच्या मधलें स्थान देण्यांत आलें आणि

अशा तऱ्हेनें जातीजातींच्या दरम्यान मिश्र जाती उत्पन्न झाल्या. आणखी कांहीं काळ लोटल्यानंतर हर्षाच्या काळांत आणि तदनंतरच्या शतकांमध्यें अनुलोम विवाहाची संतति आईच्या जातीची मानली जाई असें शिलालेखांवरून दिसून येतें[2]. ब्राह्मणांच्या बाबतींत तरी हा नियम खास होता. उदाहरणार्थ प्रतिहारांच्या एका शिलालेखांत असा उल्लेख आढळतो कीं, एका ब्राह्मणानें ब्राह्मण व क्षत्रिय अशा दोन स्त्रियांशीं विवाह केला; तेव्हां ब्राह्मणीपासून

म्हणून मानलीं गेलेलीं घराणीं गुजर होतीं; व त्यांचा हूणांशीं संबंध येतो; अतएव तीं परदेशीय होतीं, हें सिद्ध करण्यासाठीं रा. भांडारकरांनीं जीं प्रमाणें पुढें आणलीं आहेत त्यांत कितीसें तथ्य आहे याचा विचार करूं. पण त्यापूर्वी हें आणखी सांगणें आवश्यक आहे कीं, एकाद्या जातीचा उल्लेख कोणत्याही संबंधांत दुसऱ्या एकाद्या परकीय जातीबरोबर केला असला म्हणजे तेवढ्यानें ती कांहीं परकीय ठरत नाहीं. ठाणेश्वरचा राजा प्रतापवर्धन यानें हूण आणि गुजर यांचा पराभव केला असें बाणानें हर्षचरितांत म्हटलें आहे, सबब गुजर हे परकीय होते; त्यांचा हूणांशीं रक्तसंबंध होता; आणि तेही हूणांबरोबरच हिंदुस्थानांत आले असें प्रतिपादणें वेडेपणाचें होईल. असल्या उघड उघड भ्रामक दिसणाऱ्या प्रमाणांच्या जोरावर रा. भांडारकर हैहयांनाही परकीय ठरवूं पाहतात. कारण काय तर, पुराणांमध्यें त्यांचा परदेशीय लोकांबरोबर उल्लेख केला आहे. "शक. यवन, पारद. कांबोज यांच्याबरोबर हैहयांचाही उल्लेख केलेला असल्यामुळें हरिवंशाच्या रचनाकालीं, म्हणजे इ. स. नंतर ४ थ्या शतकांत हैहयांची गणनाहि म्लेंच्छांतच केली जात होती हें निर्विवाद होय." (पान १९) परंतु असें म्हणणें खरोखर अयुक्तिक आहे. खास हैहयांना म्लेंच्छ असें मानण्यांत येत असे असा स्पष्ट उल्लेख असावयास पाहिजे. त्यांनीं युद्धांत म्लेंच्छांची मदत घेतली असली म्हणून कांहीं ते म्लेंच्छ ठरत नाहींत. हैहयांची गोष्ट याहीपेक्षां बळकट आहे. हैहय आणि त्यांचा मूळ पुरुष सहस्रार्जुन हे चंद्रवंशीय आर्य होते असें खुद्द हरिवंश आणि इतर सर्व पुराणें एकमतानें सांगत आहेत. इतकेंच नाहीं; हिंदुस्थानच्या सर्व इतिहासांत आणि आजतागायत हैहयांची गणना उत्कृष्ट क्षत्रियांत कर-

ण्यांत येत आहे. पहिल्या भागांत दाखविल्याप्रमाणें त्यांचीं मानववंशसूचक परिमाणें हीं निःसंशय आर्यांचींच आहेत. *

असो, हैहय हे सुव्यक्तपणें आर्य आहेत; त्यांना आर्य, उत्कृष्ट क्षत्रिय म्हणून लेखण्यांतही आलें आहे; परंतु हूणांचा परकीय म्हणून स्पष्टपणें उल्लेख केला आहे व पुराणमताभिमानी हिंदूंनीं त्यांना परकीय अशास्त्र दृष्टीनें वागविलेंही आहे. एकाद्या हिंदी राजानें स्पेन देशांतील स्त्रीशीं विवाह केला म्हणजे ज्याप्रमाणें स्पेन देशांतील लोक हिंदी किंवा क्षत्रिय बनत नाहींत; त्याचप्रमाणें एकाद्या क्षत्रियानें हूण राजकन्येशीं विवाह केल्याचा उल्लेख आला येवढ्यावरून हूणही हिंदु किंवा क्षत्रिय ठरत नाहींत. आम्हीं आपल्या टिप्पणींत हूणांचा ३६ राजघराण्यांत केव्हांही समावेश करण्यांत आला नाहीं हें दाखविलेंच आहे. त्यांना क्षत्रिय म्हणतांना इतरांप्रमाणेंच भांडारकरांचीही दिशाभूल झाली आहे. या अत्यवश्यक गोष्टी निदर्शनास आणल्यानंतर भांडारकर ज्यांना गुजर म्हणतात त्या अग्निकुल घराण्यांतील प्रत्येकाचें ओळीनें परीक्षण करूं. तीं गुजर असलीं तरी तेवढ्यानेंहि परकीय ठरणार नाहींत. कारण पूर्वीं पुष्कळदां सांगितल्याप्रमाणें गुजर हे परकीय नसून मानववंशशास्त्राप्रमाणें उत्कृष्ट आर्यनासिका असणारे आर्य आहेत आणि इतिहासाच्या पुराव्यावरून वेदांत व स्मृतींत सांगितलेले वैश्य आहेत हें आमचें म्हणणें

---

* कायस्थ प्रभु हे आपण सहस्रार्जुनापासून उत्पन्न झालों असें प्रतिपादितात. या अनवश्यक गोष्टीचा या ठिकाणीं भांडारकरांनीं उल्लेख केला आहे. हे प्रभुही परकीय वंशाचे आहेत असें सूचित करण्याचा त्यांचा हेतु असेल. परंतु आकृति व परंपरा यांवरून ते आर्य आहेत असें पूर्णपणें सिद्ध झालें आहे. कदाचित् परदेशीय उत्पत्तीच्या आपल्या कल्पनेंतून कोणत्याही उच्च जातीस भांडारकरांस वगळावयाचें नसेल !

शिल्लक आहे. तथापि भांडारकरांच्या याही मुद्याचा विचार करूं. या अग्निकुल म्हणून मानलेल्या घराण्यांतील सर्वांत प्रमुख घराणें प्रतिहारांचें. कनोजचे सम्राट् प्रतिहार याच घराण्यापैकीं. भांडारकरांस हें मान्य आहे कीं, आपल्या लेखांत त्यांनीं आपल्याला केव्हांही गुजर म्हटलेलें नाहीं; त्यांचीं वत्सराज. नागभट्टादि नांवें आर्यांचीं आहेत; लेखांतून ते आपला उल्लेख सूर्यवंशी म्हणून करितात; त्याच वंशांतील राजांच्या पदरीं असलेले प्रसिद्ध कवि राजशेखर यानें त्यांना रघुकुलतिलक म्हणून संबोधिलें आहे. या गोष्टींनीं तरी भांडारकरांस प्रतिहारांना गुजर ठरविणाऱ्या कारणांचें सूक्ष्म परीक्षण करण्याची इच्छा व्हावयास पाहिजे होती. तें तर बाजूलाच राहिलें; पण "बाहेर देशांतून आलेले म्लेच्छ लोक काय झटकन हिंदु लोकांशी समरस झाले, आणि त्यांना क्षत्रिय म्हणूनच नव्हे तर सूर्यवंशीय क्षत्रिय म्हणूनही मानण्यांत येऊं लागलें !" हें म्हणण्याकरितां याच गोष्टींचा विपर्यास करून त्यांनीं उपयोग केला आहे. खरें पाहिलें तर पुराणकालीं आणि तसेंच आठव्या शतकांतील हिंदुहि आजच्या इतकेच वर्णसंकराविरुद्ध होते. तेव्हां दुसऱ्या ज्या कांहीं प्रमाणांवरून हे क्षत्रिय गुजर वाटतात त्यांचा उलगडा अन्य रीतीनेंच केला पाहिजे हें ठरवावयाला रा. भांडारकरांनीं या गोष्टींवरच विशेष जोर द्यावयास पाहिजे होता.

परंतु भांडारकरांच्या बाजूचीं प्रमाणें तरी काय, आणि त्यांस उत्तरें काय देतां येतात तें पाहूं. पहिलें प्रमाण पुढें करण्यांत येत आहे तें असें कीं, राजोर येथें सांपडलेल्या एका लेखांत हल्लींच्या जयपूर संस्थानाच्या आग्नेय भागांत राज्य करीत असलेल्या एका गौण प्रतिहार घराण्यानें आपल्या स्वतःला गुर्जर प्रतिहार असें म्हटलें आहे. कनोजच्या प्रतिहार घराण्यानें आपल्यास केव्हांही गुजर

म्हटलें नाहीं; तेव्हां या गौण ( छोट्या ) प्रतिहार घराण्यानें आपल्याला जें गुजर म्हटलें आहे तें केवळ कनोजच्या थोरल्या घराण्यापासून आपला वेगळेपणा दाखविण्यासाठींच; आणि अशा तऱ्हेनें विशेषतः आपल्या वसतिस्थानाचा निर्देश करून आपला वेगळेपणा दाखविणें अगदीं स्वाभाविक गोष्ट आहे. नगर आणि कनोज येथील जसे नागर आणि कनोजी ब्राह्मण; त्याचप्रमाणें गुर्जर देशांत राहत होते म्हणून हे प्रतिहार आपल्याला गुर्जर प्रतिहार म्हणतात. स्वतः भांडारकरांनींच हें निदर्शनास आणून दिलें आहे कीं, या भागांत विशेषतः गुजरांचीच वस्ती आहे. इतकेंच नाहीं, तर त्या काळीं याच भागाला गुजरत्रा किंवा गुजराथ म्हणत असत. अर्थात् आठव्या आणि नवव्या शतकांतील गुजरत्रा म्हणजे आजकालचा गुजराथ नसून जयपूर संस्थानाच्या आग्नेय भागापर्यंत पसरलेला दक्षिण राजपुताना होय हें भांडारकरांचें म्हणणें सत्य आहे. तेव्हां या प्रतिहारांनीं आपला वेगळेपणा दाखविण्यासाठीं ज्या देशांत ते राहात व राज्य करीत होते त्या देशावरून गुर्जर प्रतिहार असा आपला स्वतःचा उल्लेख करणें हें अगदीं अस्वाभाविक नाहीं. त्यांनीं आपणांस गुजर म्हटलें आहे तें ते जातीनें गुजर होते म्हणून नव्हे. आणि शिवाय या एका लेखाच्या आधारावर सम्राट् प्रतिहारांना गुजर ठरविणें शक्य नाहीं. *

रा. भांडारकरांनीं दुसरें असें प्रमाण दाखविलें आहे कीं, राष्ट्रकूटांनीं आपल्या लेखांतून आणि आरबांनीं आपल्या प्रवासवर्णनांतून कनोजच्या प्रतिहारांना गुजर म्हटलें आहे. या विधानाबद्दल

---

* गुर्जर प्रतिहार या शब्दसमुच्चयाचा अर्थ गुजर जातीचे प्रतिहार असा करण्याची आवश्यकता नाहीं; गुजराथ देशांतील प्रतिहार असा त्याचा अर्थ होईल.

वाद करणें शक्य नाहीं. कनोजच्या प्रतिहारांबरोबर झालेल्या त्यांच्या लढायांत राष्ट्रकूट आणि आरब हे एकमेकांचे सहायकर्ते होते. राष्ट्रकूट–ताम्रपटांतून जो गुजरांबरोबर झालेल्या लढायांचा उल्लेख आहे तो कनोजच्या प्रतिहारांविषयींचाच. कारण राष्ट्रकूटांबरोबर लढण्यासारखे सामर्थ्यवान् फक्त तेच होते; आणि उत्तर हिंदुस्थानांतील फार मोठ्या प्रदेशावर त्यांचें साम्राज्य पसरलें होतें. त्याचप्रमाणें आरबांनीं जो 'जुझर' राज्याचा उल्लेख केला आहे तोही कनोजच्या राज्याचाच होय. पण येवढ्यावरून कनोजचे राजे हे जातीनें गुजर होते असें सिद्ध होतें काय? हिंदु लोक मुसलमानांना यव म्हणतात म्हणून काय मुसलमान हे वंशानें किंवा जन्मानें यवन म्हणजे ग्रीक ठरतात? रजपुतांचा पहिला सामना झाला तो गिझनीच्या महमदाच्या तुर्कांशीं; तेव्हांपासून ते सर्वच मुसलमानांना तुरकडा असें म्हणूं लागले. पण म्हणून काय हिंदुस्थानांत आलेला प्रत्येक मुसलमान, मग तो अफगाण असो कीं इराणी असो, वंशानें किंवा जातीनें तुर्क झाला म्हणावयाचा कीं काय? दक्षिणराजपुतान्याला पूर्वीं गुजरत्रा ही संज्ञा होती; सिंधमधील आरबांच्या पूर्वेस हा देश लागून असल्यामुळें व या देशावर प्रतिहारांचें राज्य असल्याकारणानें आरबानीं तो देश आणि त्या देशाचे राजे यांचा जुझर या एकाच शब्दानें नामनिर्देश करणें स्वाभाविक आहे. राष्ट्रकूटांनींही त्यांना याच कारणानें गुर्जर म्हटलें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हेंही प्रमाण विफळ आहे, आणि प्रतिहार हे जातीनें सूर्यवंशी रजपूत किंवा क्षत्रिय होते हें स्पष्टपणें सिद्ध करणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्यांविरुद्ध टिकण्यासारखें नाहीं.

एका ब्राम्हणाला एक ब्राम्हण व एक क्षत्रिय अशा दोन स्त्रिया

होत्या, ब्राम्हणी स्त्रीची संतति परिहार ब्राम्हण होत आणि क्षत्रियेच्या संततीला परिहार क्षत्रिय म्हणूं लागले, ही जी प्रतिहारांच्या उत्पत्तीची एका शिलालेखांत दिलेली आख्यायिका तिच्यावर रचलेलें प्रमाण तर याहून ही क्षुल्लक आहे. ( इंडियन अँटिक्वेरि. पुस्तक ११ पा. २४ ) " ब्राम्हणाचें क्षत्रियेशीं लग्न, आणि त्याचा शिलालेखांत सांगितलेला परिणाम हीं विचित्र आहेत; आणि हे परिहार बाहेरदेशांतून आलेले होते या कल्पनेनेंच या आख्यायिकेचा उलगडा होतो." या प्रकरणाच्या सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणें अशा तऱ्हेचीं लग्नें व त्यांचे हे परिणाम विचित्र नसून रोजच्या अनुभवांतले त्यावेळीं होते. आणि हें विचित्र आहे असें धरून चाललें तरी, त्याचा उपयोग प्रतिहार हे बाहेर देशांतून आलेल्या लोकांचे वंशज आहेत हें सिद्ध करण्यासाठीं प्रमाण म्हणून करणें खास अधिक विचित्र आहे. अशा तऱ्हेनें या आख्यायिकेपासून कोणतेंही अनुमान काढतां येईल. हे लोक यावरून नरमांसभक्षक होते असेंही पाहिजे तर म्हणावें ! याप्रमाणें प्रतिहारांच्या बाबतींत तर भांडारकरांनीं विरुद्ध बाजूनें आणलेलीं तीन्हीं प्रमाणें कुचकामाचीं ठरत असून सम्राट प्रातिहार हे रजपुत होते हें सिद्ध करणारीं जीं कारणें आहेत त्यांच्याशीं त्यांची केव्हांही तुलना करितां यावयाची नाहीं. भांडारकरांच्या प्रतिहारविषयक बळकट प्रमाणांचें खंडन केल्यानंतर अग्निकुल म्हणून माजलेलें दुसरें जें चालुक्य किंवा सोलंकी घराणें त्याच्याबद्दल विचार करूं.

चालुक्यांच्या बाबतींत शिलालेखांचा पुरावा नाहीं, हें रा. भांडारकरांनींही कबूल केलें आहे. परंतु ज्या अर्थीं आज ज्या प्रदेशाला गुजराथ म्हणतात तो प्रदेश चालुक्यांनीं जिंकून त्यावर राज्य करावयाला सुरुवात केल्यापासूनच त्या प्रदेशाला गुजराथ हें नांव पडलें.

त्याअर्थी चालुक्य गुजर जातीचे असावेत असें भांडारकरांचें म्हणणें आहे. कारण, चालुक्य हे जर जातीनें गुजर नसते तर त्यांच्या उदयापर्यंत लाट नांवानें प्रसिद्ध असलेल्या प्रांताला गुजरत्रा हें नांव पडावें हें कल्पनेला पटण्यासारखें दिसत नाहीं (सदर पा. २४). त्या काळच्या लेखांनींच हें स्पष्ट दिसतें कीं, आठव्या, नवव्या, व दहाव्याही शतकामध्यें दक्षिण राजपुतान्याला गुजरत्रा हें नांव होतें. परंतु त्यावेळीं आजकालच्या सर्व गुजराथेचा लाट या नांवांत समावेश होत नव्हता. दक्षिण गुजराथ म्हणजे सुरत व त्या भोंवतालचा प्रांत येवढ्यासच लाट म्हणत असत. मध्य गुजराथेस आनर्त म्हणत व उत्तर गुजराथेस कधीं कधीं सारस्वत–मंडल या नांवानें उल्लेखित असत. क्वचित या तिघांचाही निर्देश लाट या नांवानें करण्यांत येत असे. पुढें या तीन्ही भागांस गुजराथ हें नांव प्राप्त झालें तें चालुक्यांचें राज्य प्रस्थापित झालें म्हणून नव्हे तर गुजराथी भाषेमुळें झालें असावें असें दिसतें. पूर्वी एका ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानांतील अर्वाचीन भाषा ९ व्या शतकाच्या सुमारास उदयास आल्या; आणि या भागांतील भाषेला अर्वाचीन गुजराथी भाषेचें स्वरूप येऊं लागलें. गुजराथी भाषा आणि गुजराथी हा शब्द हीं कितीं जुनीं आहेत हें निश्चित करणें कठिण आहे. भाषेचें नांव म्हणून वापरलेला महाराष्ट्री हा शब्द इ. स. पूर्वी पहिल्या शतकांतील वररुचीइतका जुना असला तरी देशाचें नांव दर्शविणारा महाराष्ट्र हा शब्द त्यानंतर बऱ्याच काळानें निदान इ. स. नंतर पांचव्या शतकांतील वराहामिहिरानंतर उपयोगांत आला आहे. यावरून लोकभाषा जी अर्वाचीन महाराष्ट्री तिच्यावरून महराष्ट्र हें त्या देशाचें नांव पडलें असावें अशी कल्पना करणें कठिण नाहीं. त्याचप्रमाणें गुजराथी भाषेच्या वर्चस्वामुळें त्या सर्व भागाल

गुजराथ हें नांव पडलें असावें असें मानणें अयोग्य नाहीं.

परंतु या प्रश्नाशीं आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं. त्या देशाला गुजराथ हें नांव कसें पडलें याचें कांहींही कारण असो; चालुक्यांच्या उदयाच्या सुमाराला या प्रांताला गुजराथ हें नांव पडलें असें मानलें तरी त्यावरून चालुक्य जातीनें गुजर होते असें प्रस्थापित करणें असमंजसपणाचें आहे. देशांचीं नांवें भिन्न भिन्न कारणांनीं पडतात आणि कायम रहातात तींही अत्यंत परस्पर भिन्न कारणांमुळें. उदाहरणार्थ, नार्मन लोकांच्या विजयानंतर इंग्लंडला इंग्लंड हें नांव प्राप्त झालें. आणि नॉर्मन हे तर आँग्ल मुळींच नाहींत. सॅक्सन लोकांशीं त्यांची तुलना केली असतां अँग्ल हे तुच्छ वाटावेत; परंतु सॅक्सनांकडे दुर्लक्ष करून त्या देशाचें नांव अजून आँग्लभूमी असेंच कायम राहिलें आहे. फ्रँक लोकांची सत्ता नष्ट झाली होती; ते सर्वसाधारण गेलिश जनतेंत एकरूप होऊन गेले होते; आणि त्यांच्या अंगचें जर्मन वळण आणि त्यांचे जर्मनसंबंध हीं कधींच सुटून गेलीं होती, अशा वेळीं फ्रान्सला फ्रान्स या नांवानें ओळखण्यांत येऊं लागलें. तें कशाला हिंदुस्थानांत इंग्रजांनीं मद्रास इलाख्यांतील पूर्व जिल्ह्यांना कर्नाटक हें नांव अशा वेळीं दिलें कीं जेव्हां कर्नाटक राजे किंवा कर्नाटक भाषा यांपैकीं एकाचाही येथें अंमल नव्हता. सर्वच दक्षिण हिंदुस्थानाला कर्नाटक म्हणून समजणाऱ्या मराठ्यांनीं दिलेलें नांव इंग्रजांनीं केवळ तसेंच पुढें चालविलें. तेव्हां चालुक्यांच्या काळाच्या सुमाराला त्या प्रांताला गुजराथ हें नांव मिळालें येवढ्यावरूनच चालुक्य हे गुजर होते असें सिद्ध करणें अत्यंत अयुक्तिक आहे.

अग्निकुलत्वाचा आरोप केलेलें तिसरें जें परमाराचें घराणें त्याकडे वळलें असतां आपल्याला असें दिसून येतें कीं, त्यांना

गुजर बनविण्याच्या बाबतींत रा. भांडारकर यांस कोणतेंच प्रमाण आढळेना; तेव्हां, "ते कोणत्या वंशाचे आहेत हें जरी आम्हांस माहीत नाहीं तरी ते परदेशांतून आलेल्या लोकांचे वंशज आहेत अशी आमची (मॉरल) बुद्धि खात्री देते" असें म्हणण्याचा त्यांच्या-वर प्रसंग आला आहे. वंशोत्पत्तीच्या विचारांत (मॉरल) सदसद्विवेक-बुद्धीचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. अशा तऱ्हेच्या एखाद्या लोकांच्या वंशोत्पत्तीच्या विचारासारख्या बाबतींत सद्बुद्धीचा खात्रीचा हवाला हा पहिल्यानेंच वाचावयास सांपडतो. आम्हांला अशी खात्री आहे कीं, वाचकवर्ग भांडारकरांस आपल्या सदसद्विवेकबुद्धीपुरःसर विचार करण्यास सोडून देऊन आमच्याप्रमाणें असेंच म्हणतील कीं, परमार हे गुजर किंवा निदान परदेशीय होते हें सिद्ध करावयास कोणतेंही प्रमाण अथवा अनुमान पुढें आलेलें नाहीं.

शेवटीं आतां आपणास चाहमान किंवा चौहान यांचा विचार करावयाचा आहे. त्यांची उत्पत्तिहि गुजरांपासून झाली हें सिद्ध करितांना तर भांडारकरांचे जे हाल झाले आहेत ते सांगतांना पुरवत नाहींत. हिंदुस्थानच्या वायव्य भागांत सांपडलेल्या एका जुन्या अप्रसिद्ध नाण्यापासून सुरुवात करावी लागून हिमालयांतील शिवालिक डोंगरांशीं कुठें त्यांना विश्रांति मिळाली. त्यांचा हा कोटिक्रम इतका पिक्किकी संशोधन पद्धतीचा मासला आहे कीं, भांडारकरांसारख्या बुद्धिमत्तेचा माणूस त्याला बळी पडला कसा याचेंच आश्चर्य वाटतें. आमची अशी खात्री आहे कीं, रजपुतांच्या गुजर किंवा परकीय वंशोत्पत्तीच्या कल्पनेस जर ते पूर्णपणें भाळले नसते तर आपल्या कोटिक्रमाचें असमंजसत्व त्यांचें त्यासच दिसलें असतें. त्यांचा हा कोटिक्रम कसा सहज दिसून येणाऱ्या निर्भेळ कल्पनेवर उभारला आहे तें पहा.

उत्तर हिंदुस्थानांत कांहीं नाणीं सांपडलीं असून त्यावरील शिक्क्यांत नागरी लिपींत " श्री वासुदेव बहमन " व पेहलवींत " तकान् जाबुलिस्तान् सपर्दलक्षान् " असें लिहिलें आहे. रा. भांडरकरांनीं येथें इतर संशोधकांना सोडून आपल्या सोईसाठीं 'वहमन'च्या ऐवजीं 'चहमन' असें वाचिलें. कारण काय तर पूर्वकाळीं 'व' व 'च' ह्या अक्षरांत इतकें साद्दश्य होतें कीं, एकाच्या ऐवजीं दुसरें सहज चुकून लिहिलें असण्याचा संभव आहे. "

आणि सांगावयाची आवश्यकताच नाहीं कीं, चहमन म्हणजे चाहमान असलें पाहिजे. ( म दीर्घ करून मा वाचावयाचा ) तेव्हां या नाण्यांतील वासुदेव हा चाहमान घराण्यांतील असला पाहिजे. आणि पृथ्वीराज—विजयांत शाकंबरीच्या चाहमान घराण्याचा जनक वासुदेव होता असा उल्लेख आहे त्या अर्थीं त्या घराण्याचा जनक वासुदेव आणि हा नाण्यांतलि चाहमान वासुदेव हे एकच असले पाहिजेत. " " राजशेखराच्या प्रबंध कोशांतही वासुदेव हा चाहमान कुलाचा जनक होता असें सांगितलें असून त्याचा काल वि. सं. ६०८ असा दिला आहे. " या सनामुळें हे दोनही वासुदेव एकच होते हें सिद्ध करण्याचे बाबतींत मोठीच अडचण उत्पन्न झाली. पण भांडारकर या अडचणीनें घोंटाळ्यांत पडले नाहींत. त्यांनीं शांतपणें पटदिशीं असें सांगून टाकलें कीं, " कोशांत दिलेला सन थोडा पूर्वींचा आहे. परंतु या नाण्यावरून इ. स. नं. ६२७ च्या सुमाराच्या दुसरा 'परवेझ खुश्रु' याच्या नाण्यांची अगदीं हुबेहुब प्रतिमा असलेल्या या नाण्यांवरून ( चाहमान वासुदेवाचा ) हा सन इ. स. नं. ६२७ च धरावयास पाहिजे " आपल्या कल्पनेशीं जुळतें आणावयास रा. भांडारकर अक्षरेंच फिरवून थांबत नाहींत सनहि फिरवितात. आणि याहीपेक्षां विचित्र गोष्ट आहे ती ही कीं,

आपल्या मर्जीप्रमाणें एखाद्या लोकांचा वंशही बदलून टाकतात. या नाण्यांत उल्लेखिलेला वासुदेव हूण आहे असें कनिंगहॅमचें म्हणणें आहे. आणि प्रो. रॅप्सनच्या मतें तो 'ससानी' असावा. ( नाण्यावरील शिक्का व त्याचें स्वरूप यांवरून ). पण भांडारकरांस तो खझर वाटतो; मग कां तें त्यांचें त्यांसच माहीत. रा. भांडारकर चाहमान हे गुजर होते हें सिद्ध करितांना कसे साफ घसरले आहेत हें पटवून देण्याला त्यांचा हा युक्तिवाद वाचकांपुढें सविस्तर मांडला असतां पुरे आहे.

परंतु या बाबतींत रा. भांडारकरांनीं सर्वांत मोठी चूक केली आहे ती ही कीं, अहिच्छत्र नगर आणि सपादलक्ष देश हीं त्यांनीं हिमालयांतील शिवालिक टेंकड्यांचा जो डोंगराळ मुलुख आहे त्यांत आहेत म्हणून सांगितलें आहे. असें करण्यांत त्यांनीं खरोखर हिंदुस्थानच्या इतिहासाच्या स्वाभाविक क्रमाचा उच्छेद केला असून, या भागांतून ब्राह्मण व क्षत्रिय हे खालीं दक्षिणेकडे पसरले असें दाखविलें आहे. परंतु रजपूत हे गुजर असले तरी शिवालिक डोंगरी प्रदेशांतून ते पसरले हें बुद्धीला पटावयाचें तरी कसें ? गुजर हे हूणांबरोबरच जेते म्हणून आलेले परदेशचे लोक असतील तर पंजाबच्या मोहक सपाट प्रदेशावर त्यांनीं वसती करावी हें स्वाभाविक. त्यांनीं हिमालयाच्या दुर्गम प्रदेशांत जावें कशाला ? वस्तुतः इतिहास व आख्यायिका हींही आपल्यास असेंच सांगतात कीं तुर्कीपर्यंतच्या बाहेर देशांतून आलेल्या स्वाऱ्यांमुळें ब्राह्मण व रजपुत हे ऐतिहासिक काळांत या डोंगराळ व सरहद्दीच्या गैरसोईच्या मुलखांत गेले; आणि याचप्रमाणें पुष्कळांनीं राजस्थानच्या डोंगराचा व वाळवंटाचा आश्रय केला. तेव्हां रजपूत किंवा गुजर यांचें मूल वसतिस्थान म्हणून शिवालिक डोंगराचा निर्देश करणें समंजसपणाचें नाहीं.

सपादलक्षदेश आणि शिवालिक डोंगराचा प्रदेश हीं एकच होय असें सांगणेंही समंजसपणाचें नाहीं व या शब्दाच्या स्पष्टीकरणार्थ बाबराकडेही जावयास नको. बाबराचें स्पष्टीकरण बहुधा मूळचा व खरा अर्थ विसरून गेल्यानंतरचें असावें. आम्ही एका टिप्पणींत स्कंदपुराणांतील इ. स. ९ व्या शतकाच्या सुमारास हिंदुस्थानांत असलेल्या देशांच्या नांवाची यादी आणि त्या प्रत्येकांत समाविष्ट केलेल्या गांवाची परंपरागत आलेली संख्या सांगणारा उतारा दिला आहे. या यादींत सपादलक्ष हें नांव चार देशांस लाविलें आहे. शाकंबर किंवा चौहानांचा देश हा त्यांपैकीं पहिला होय. हाच शब्द कर्नाटक, मेवाड आणि वरेन्दु यांसही लाविला आहे. वरेन्दु हें नांव कोणत्या प्रांतास लावीत असत हें सांगतां येत नाहीं; परंतु बहुधा त्यानें दिल्ली प्रांताचा निर्देश होत असावा* भांडारकरांनीं पुढें आणलेल्या या नाण्यांत "तक्कान् झबुलिस्तान् आणि सपदलक्षान्" असा जो उल्लेख आहे तो बहुतकरून पश्चिमेस गझनी व आग्नेयीस दिल्लीपर्यंत पसरलेल्या पंजाबाचा असावा आणि फार करून ससानियन राजा वासुदेव बहमन याच्या राज्याच्या समावेश या भागांत होत असावा. कांहींही असलें तरी सपादलक्ष या शब्दानें १। लक्ष टंकड्या दर्शविल्या जात नसून १। लक्ष गांव दर्शविले जातात. आणि ही १। संख्या परंपरेनें शाकंबर, मेवाड, दिल्ली आणि कर्नाटक या भागांस लाविली जात असे असें स्कंदपुराणावरून निर्विवाद सिद्ध होतें.

भांडारकरांनीं अहिच्छत्राहि असेंच चुकीनें हिमालय प्रदेशांत

* अथवा त्यानें मुलतानच्या भोंवतालचा भागही दर्शविला जात असेल. कारण मुल्तानाभोंवती १ लक्ष २० हजार गांव होते असें अल मसूदीनें सांगितलें आहे. ( इलियट भाग १. पा. २३ ).

नेऊन बसविलें आहे. महाभारतांत उल्लेख केलेली जी उत्तर पांचालांची राजधानी ती निःसंदेहपणें हीच; कनिंगहॅमनें हुएनसंगच्या वर्णनावरून अहिच्छत्र म्हणजे रामपूर असें सिद्ध केलें आहे तें यथायोग्य आहे. ' डोंगराच्या कड्यांनीं परिवेष्टिलेली ' या शब्दांवरून हिमालयाची कल्पना मनांत येण्याचें कांहीं एक कारण नाहीं. दक्षिणेकडील ब्राह्मण व क्षत्रिय अहिच्छत्र हें आपलें मूळ वसतिस्थान होय असें समजत तें योग्यच आहे. वैदिक वाङ्मयांत पांचालदेश विद्वान ब्राह्मणांचें वसतिस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. शौर्यशाली पांचाल क्षत्रियांचीही ती मायभूमि होती. तेव्हां चाहमान कुलाचा जनक अहिच्छत्रांतून आला याबद्दल रा. भांडारकरांस आश्चर्य वाटावयास नको. सपादलक्ष हा शब्द चाहमानांनीं आपल्याबरोबर दुसऱ्या देशाला नेला नाहीं; कारण तें कांहीं हॉलंडसारखें परदेशांत घेऊन जाण्याजोगें नांव नाहीं. एखाद्या देशांतील गांवाची संख्या दाखविणारा तो शब्द आहे. तसेंच कर्नाटक किंवा धारवाड यांसही सवालक्ष म्हणत तें त्यांत सवालक्ष गांवें होतीं म्हणून. हें नांव उत्तरेकडून धारवाडांत आणलेलें नाहीं; तसें तें आणतां येणें शक्य नाहीं. हा शब्द कर्नाटकाला लावल्यामुळें भांडारकरांनीं अनुमान काढलें आहे कीं, चाहमानांप्रमाणेंच चालुक्यांचेंही मूळ वसतिस्थान सपादलक्ष नांवाच्या डोंगराळ प्रदेशांत होतें आणि म्हणून तेही परकीय आहेत पण तें असमंजसपणाचें असून अहिच्छत्र व सपादलक्ष यांच्या चुकीच्या लक्षणांवर त्यांनीं जी कल्पना उभारली आहे ती अगदीं सोज्वळ शब्दांत लिहावयाचें तर सपशेल चुकली आहे. आम्हांला तर असें वाटतें कीं, अग्निकुल म्हणून मानलीं गेलेलीं चार घराणीं परकीय आहेत हें सिद्ध करण्याचा भांडारकरांचा प्रयत्न अगदीं फसला असून तो सोडून द्यावयास पाहिजे. अहिच्छत्र आणि मारवाडांतील

नागोर हीं एक होत असें त्यांनीं म्हटलें असलें तरी सपादलक्ष म्हणजे सांबर देश होय असें हरविलास सारडा यांनीं दाखविलें आहे. चाहमान हे रामपुरांतून आलेले असोत किंवा सुरुवातीस नागोरमध्यें रहात असोत, ते गुर्जर होते असें दाखविण्यास काडीचाही पुरावा नाहीं; तेव्हां रजपुतांची उत्पत्ति परकीयांपासून झाली आहे या भांडारकरांनीं शोधून काढलेल्या व जॅक्सन व स्मिथ यांनीं मान्य केलेल्या असमर्थनीय कल्पनेबद्दल याहून अधिक विस्तारानें लिहिण्याची जरूरी नाहीं. रजपूत हे हिंदुस्थानांतील पुराण वैदिक आर्यांपासूनच झालेले आहेत हें सिद्ध करण्याजोगीं आमच्या मतानें जीं विधायक प्रमाणें आहेत त्यांचा पुढील प्रकरणांत आतां आपण विचार करूं.

---

## टिप्पणीः—स्कंद पुराणांतील देशांची यादी

स्कंद पुराणांत दिलेली हिंदुस्थानांतील देशांची यादी त्यांतील गांवांच्या संख्येसहित आहे. महाभारतांत दिलेली हिंदुस्थानांतील देशांची अथवा लोकांची म्हटली तर अधिक बरें यादी हिंदुस्थानच्या इसवी सना पूर्वींच्या इतिहासाच्या संबधानें महत्वाची आहे. वराहमिहिराची यादी अशाच प्रकारें इ. स. च्या पांचव्या शतकासंबधानें महत्वाची आहे. आणि हुएनसंगच्या प्रवासवर्णनांत आपल्याला सातव्या शतकाच्या सुमारास हिंदुस्थानांत असलेल्या निरनिराळ्या देशांच्या व जातींच्या लोकांची सविस्तर आणि यथास्थित माहिती पहावयास सांपडते. स्कंद पुराणाच्या कुमारखंडाच्या एकोणचाळिसाव्या अध्यायांत हिंदुस्थानांतील देशाची ( लोकांची नव्हे ) यादी दिलेली आहे, व ती हिंदुस्थानच्या इतिहासास तितकीच उपयुक्त असून तींत नवव्या शतकाच्या सुमाराची साधारणपणें यथायोग्य अशी माहिती दिली आहे. या यादीवरूनच हें पुराण १० व्या

शतकांतील असावें असें स्पष्टपणें म्हणावयास हरकत नाहीं. कारण त्यांत जुन्या देशांचीं अथवा लोकांचीं नांवें आढळत नसून त्यांतील पुष्कळ नांवें ओळखतां येत नाहींत. हें खरें असलें तरी साधारणपणें नवव्या शतकाला जुळतील, आणि आजतागायत जीं चालू आहेत अशीं निरनिराळ्या देशांचीं किंवा प्रांतांचीं नांवें दिलीं आहेत. या टीपेंत हल्लीं ओळखतां येण्यासारख्या देशांचीं नांवें मुद्दाम दिलीं असून त्यांचा विस्तार व महत्वही सांगितलें आहे. प्रत्येक देशाला जोडलेली संख्या ही त्यांतील गांवांची असून या संख्या बऱ्याच देशांच्या बाबतींत उघडउघड अविश्वसनीय असल्या तरी त्यांत कोठें ही अनिश्चितता नाहीं. यांपैकीं कांहीं देशांतील गांवांच्या संख्या तत्कालीन लेखांतहि आढळत असल्यामुळें त्यांच्या सत्यतेबद्दल बळकट पुरावा सांपडतो. आणि आपल्याला हें लक्षांत घ्यावयाला पाहिजे कीं, या काळांत प्रचलित लोकसमजुतीप्रमाणें देशांतील किंवा प्रांतांतील गांवांची संख्या निश्चित झाली होती.

ही यादी उत्तरेकडून सुरू होत असून नवव्या शतकांतील राजकीय परिस्थितींत वास्तविकपणें प्रतिबिंबित झाली आहे. सुरुवातीला १ लक्ष गांवांचा नेपाळ दिला असून त्याच्या नंतर स्वाभाविकपणेंच ३६ लक्षांचा कान्यकुब्ज येतो. यावरून असें दिसतें कीं या काळीं कान्यकुब्ज साम्राज्य-वैभवाच्या शिखरास पोंचलें असून या विस्तृत साम्राज्यांत औध, गंगेच्या भोंवतालचा प्रदेश, पंजाबचा कांहीं भाग, ग्वाल्हेर प्रांत आणि यमुनेच्या भोंवतालचा प्रदेश यांचा अंतर्भाव होत होता. प्रबंधचिंतामणींत हि कान्यकुब्ज देशांतील गांवांची संख्या इतकीच दिली आहे त्यानंतर येणारा ७२ लाखांचा गाजणक म्हणजे कोणता प्रांत याची कल्पना करितां येत नाहीं. सर्व हिंदुस्थानांत मिळून ९६ कोटी ७२ लक्ष (पुराणांस साजणारी अशीच ही अतिशयोक्ति आहे) येवढी गांवांची संख्या भरून काढण्यासाठीं म्हणून पुराणांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें बहुतकरून वस्तुस्थिति आणि दंतकथा या दोहोंची घालमेल करण्यांत आलेली असावी. नंतर १८ लक्षांचा म्हणजे कान्याकुब्जाच्या निम्मे विस्ताराचा गौड किंवा बंगाल दृष्टीस येतो; आणि त्याचा हा विस्तार असंभवनीय वाटत नाहीं. तदनंतर

# स्कंद पुराणांतील देशांची यादी

कामरूप किंवा आसाम आणि त्याच्याच विस्ताराचा म्हणजे ९ लाखांचा किंवा गौड अथवा बंगाल यांच्या अधीनं असलेला ओड्रियान किंवा ओरिसा हे देश येतात. वेदसंश [याचा अर्थ बहुधा चारभाग असलेला असा असावा ] म्हणून वर्णिलेल्या डाहल अथवा बुंदेलखंडाचाहि विस्तार येवढाच सांगितला आहे. त्याचे मागून याच विस्ताराचे जालंधर आणि लोहपूर अथवा लाहोर यांचा उल्लेख आहे. नंतर आपल्या परिचयाच्या ७ लाखांच्या रटराज्याचा अथवा राष्ट्रकूटांच्या राज्याचा निर्देश केला आहे. येथें आपल्याला तत्कालीन आणि तत्पूर्वकालीन लेखांत उल्लेखिलेल्या साडेसात लाख रट्टपाडीची आठवण होते. पुढें आपल्याला अनोळखी अशा कांहीं देशांचीं नांवें येतात आणि त्यानंतर १। लाख किंवा सपादलक्ष म्हणून सांगितलेले देश आपल्या नजरेस येतात. सपादलक्ष या नांवाचा अर्थ सांगतांना आणि सपादलक्ष देश म्हणजे हिमालयाच्या पायथ्याशीं असलेला शिवालिक डोंगराचा प्रदेश होय असें ठरवितांना रा. भांडारकरांनीं कशी चूक केली आहे याचें आम्हीं पूर्वीं विवरण केलेंच आहे. स्कंद पुराणांतील या उल्लेखावरून असें सिद्ध होतें कीं, सपादलक्ष या नांवानें वरेन्दु, अतिलांगल, सयंभर, मेदपाट, ( हे सांभर आणि मेवाड असावेत याबद्दल प्रश्न नाहीं ) तोमर, कर्नाट आणि पुंगल असे सात निरनिराळे देश ओळखले जात होते. यांपैकीं एखादा शिवालिक प्रांत असू शकेल; मात्र त्याबद्दल खात्री नाहीं. परंतु सपादलक्ष हा शब्द शिवालिक भागांतील १। लक्ष टेंकड्यांवरून निघालेला नाहीं येवढें मात्र निश्चित आहे. अतिलांगलानंतर लगेच ११५१८० गांव अशा संख्येचा उल्लेख केलेला मालव सांगितला आहे.

यानंतर आपल्याला ओळखतां येण्यासारखे महत्त्वाचे देश म्हटले म्हणजे गुर्जरत्रा ( ७०,००० ) सिंध (२०,००० ) कच्छमंडळ ( १६,०२० ) सौराष्ट्र ( ५५,००० ), लाट ( २१,०००), कोंकण ( ३६,००० ), आणि लघु कोंकण ( १६,००० ). येथें गुर्जरत्रा हा शब्द योजण्यांत आला असून गुर्जरत्रा व लाट हे दोन वेगवेगळाले आहेत. शिवाय यादीच्या काळीं गुर्जरत्रा हा शब्द दक्षिण मारवाडाला लावलेला दिसतो तेव्हां

बहुधा स्कंद पुराण हें दहाव्या शतकानंतरचें नसावें असें वाटतें.

या यादींत काश्मीरचा विस्तार ६८,००० चा दिला आहे; त्याला पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें काश्मीरच्या जुन्या कागदपत्रावरून पडताळा मिळतो. यानंतर परंपरागत सांगत आलेल्या परंतु काल्पनिक आणि हिंदुस्थानांतील देशांच्या यादींत आवश्यक ठरल्या गेलेल्या अशा एकपादादि देशांचीं नांवें आलीं आहेत. परंतु आपल्याला कांबोज ( काबुल ), कोसल (मध्यप्रांत), पांच लाखांचा किंवा महाराष्ट्राच्या २/३ विदर्भ (वऱ्हाड), वर्धमान (वढवाण), मगध (६८०००), आणि शेवटीं मूलस्थानपूर हे कोणते देश असावेत हें ओळखतां येतें. सर्व हिंदुस्थान एकंदर ७२ देशांत विभागलेला असून ( यादींत दिलेल्या देशांची संख्या ७५ आहे ) त्यांत ९६ कोटी ७२ लक्ष गांव आहेत असें सांगितलें आहे. ३६००० वेलाकूलांचाही उल्लेख आलेला आहे.—याचा अर्थ समुद्रकिनाऱ्याचे कोस असा आम्ही करितों-आणि त्यामुळें शिकंदराला ही हिंदुस्थानची माहिती देणारांनीं समुद्रकिनाऱ्याची सांगितलेली लांबी अगदीं बरोबर होती या गोष्टीची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं.

ही टीप संपविण्यापूर्वीं ज्या महाभारताची बरोबरी करण्याच्या महत्वाकांक्षेनें स्कंदपुराण रचलें आहे, त्या महाभारताचें अनुकरण करून त्यांत हिंदुस्थानांतील पर्वत व नद्या यांची नांवनिशी दिली आहे ते पर्वत व नद्या सांगण्याचा विचार आहे. त्यांचा समावेश स्कंदपुराणाच्या कुमारखंडाच्या एकोनचाळिसाव्या अध्यायांतच करण्यांत आला आहे. येथेंही ज्यांचा कुलपर्वत म्हणून निर्देश केला आहे त्या मुख्य पर्वतांच्या ओळी महाभारतांतल्याप्रमाणेंच सात आहेत. १ महेन्द्र, २ मलय ३ सह्य, ४ शक्तिमान् ५ ऋक्ष ६ विंध्य आणि ७ पारियात्र. यांतील पहिले चार म्हणजे प्रसिद्ध पूर्व घाट, मलय,-पश्चिम घाट आणि गिरनार होत. ऋक्ष ही अरवली पर्वतांची रांग असून हिंदुस्थानच्या मधोमध पसरलेली विंध्याची रांग आपल्या चिरपरिचयाची आहे. परंतु पारियात्र हा कोणता पर्वत तें मात्र ओळखतां येत नाहीं. त्याच्या पश्चिमेला कौमारखंड आहे व त्यांतून वेदस्मृति व इतर नद्या उगम पावतात असें वर्णन केलें आहे. पश्चिम

विंध्याच्या कांहीं भागास पारियात्र म्हणत असावेत असा तर्क आहे. नर्मदा आणि सरसा खरोखर विंध्यापासूनच उत्पन्न होतात, परंतु शतद्रु आणि चंद्रभागा यांचा उगम ऋक्षांत व्हावा कसा ? ऋषिकुल्य आणि कुमारी या काठेवाडांतील शक्तिमानांतून प्रकट होतात. तापी, पयोष्णी, निर्विन्ध्या, कावेरी, कृष्णा, वेणी, भीमरथी यांचा उगम सह्यापासून होतो. तेव्हां सह्यांतच सातपुड्याचा अंतर्भाव केला पाहिजे. गोदावरीचा उल्लेख केलेला नाहीं हें पाहून तिची विशेषच आठवण होते. कृतमाला व ताम्रपर्णी यांचा उगम मलय पर्वतांत होत असून तृशानु व ऋष्यकुल्या महेन्द्रसंभव आहेत. स्तंभ ( खंबायत ) प्रभास आवन्ति व नागर तीर्थांचीं विस्तृत वर्णनें पाहून बहुधा या पुराणाचा मूळ लेखक किंवा पुढें त्याची सांप्रतची प्रत तयार करणारा लेखक यांचा या तीर्थांबद्दलचा पक्षपात आणि परिचय दिसून येतो व यावरून त्यांचा उत्तर किंवा दक्षिण हिंदुस्थानांशीं विशेष संबंध आलेला नसून तो गुजराथेंत किंवा माळव्यांत जन्मला असावा असें वाटतें.

---

## स्कंद पुराणांत दिलेली देशांची व त्यांतील गांवांच्या संख्येची यादी.

| | | |
|---|---|---|
| १ | नीवृत | ४ कोटी |
| २ | बालाक | २½ ,, |
| ३ | साहाणपुर | १¼ ,, |
| ४ | आंधल | ४ लक्ष. |
| ५ | नेपाल | १ ,, |
| ६ | कान्यकुब्ज | ३६ ,, |
| ७ | गाजणक | ७२ ,, |
| ८ | गौड | १८ ,, |
| ९ | कामरूप | ९ ,, |
| १० | डाहल | ९ ,, |
| ११ | कांतिपूर | ९ ,, |
| १२ | लोहपूर | ९ ,, |
| १३ | पांबिपूर | ७ ,, |
| १४ | रटराज | ७ ,, |
| १५ | हरियल | ५ ,, |
| १६ | द्रढ | ३½ ,, |
| १७ | माचिपूर | ९ ,, |
| १८ | ओडियान | ९ ,, |
| १९ | जालंधर | ९ ,, |
| २० | बंभणवाहक | ३½ ,, |

२१ नीलपूर २१ हजार
२२ अमल १ ला.
२३ वरेन्दु सपादलक्ष
२४ अतिलांगल ११ ह.
२५ मालव १,१८,९२
२६ सयंभर सपादलक्ष
२७ मेवाड ,,
२८ वागुरि ८८ ह.
२९ गुर्जरत्रा ७७ ,,
३० पांडोर्विषय ७० ,,
३१ जहाहुति ४२ ,,
३२ काश्मीर ६८ ,,
३३ कोंकण ६३ ह.
३४ लघु कोंकण ३,६००
३५ सिंधु २२ ह.
३६ कच्छ ३,६००
३७ सौराष्ट्र ५५ ह.
३८ लाडदेश २१ ,,
३९ अतिसिंधु १० ,,
४० अश्वमुख १० ,,
४१ एकपाद १० ,,
४२ सूर्यमुख १० ,,
४३ एकबाहू १० ,,
४४ संजायू १० ,,
४५ शिवदेश १० ,,
४६ कालहस्रंजय १० ,,
४७ लिंगोद्भव १० ,,
४८ भद्र १० ,,
४९ देवभद्र १० ,,
५० चट ३६ ,,
५१ विराट ३६ ,,
५२ यमकोटि ३६ ,,
५३ रामक १८ ,,
५४ तोमर सपादलक्ष
५५ कर्नाट ,,
५६ पिंगल ,,
५७ स्त्रीराज्य ५ ल.
५८ पुलस्त्य १० ,,
५९ कांबोज १० ,,
६० कोसल १० ,,
६१ बाल्हिक ४ ह.
६२ लंका ३६ ,,
६३ कुरु ६४ ,,
६४ किरात $१\frac{१}{२}$ ल.
६५ विदर्भ ५ ,,
६६ वर्धमान १४ ह.
६७ सिंहल १० ह.
६८ पांडु ३६ ,,
६९ भयाणक १ ल.
७० मागध ६६ ह.
७१ मूलस्थान २५ ,,
७२ यावन ४० ह.
७३ पक्षबाहु ४ ,,
७४ पांगु ६० ,,
७५ वरेन्दुक ३० ह.

# प्रकरण ५ वें

## रजपुतांचीं गोत्रें.

प्रतिहार व इतर रजपूत जाती मुळच्या गुजर होत असें अनुमान ज्या पुराव्यावरून काढतां येईल अशी समजूत आहे त्या पुराव्याचें परीक्षण करून व रजपूत परकीय आहेत असा सिद्धांत काढण्यास तो पुरावा पुरेसा नाहीं असें निदर्शनास आणून दिल्यानंतर रजपूत हे वैदिक आर्य आहेत हें सिद्ध करण्यास उपयुक्त असा पुरावा आतां आम्ही वाचकांपुढें मांडणार आहोंत. या पुराव्यांतील पहिलें कलम हें कीं, वैदिक सूत्रांत सांगितलेलींच गोत्रें व प्रवर रजपुतांत दिसून येत असून त्यांनीं आजतागायत त्यांची स्मृति अबाधित राखिली आहे. अनेक वैदिक सूत्रांनीं घालून दिलेल्या या गोत्रप्रवरपद्धतीनें हिंदू आर्यांत जशी आपल्या वंशोत्पत्तीची स्मृति कायम राहिलेली आहे तशी ती जगांतील कोणत्याहि इतर लोकांत राहिलेली आढळून येत नाहीं. वैदिकधर्मीय हिंदू आर्यांस प्रत्येक धर्मकृत्यास प्रारंभ करण्यापूर्वीं आपल्या गोत्राचा व प्रवराचा उच्चार करावा लागतो आणि त्यामुळें या गोत्रप्रवरांचा उच्चार करणाऱ्या प्रत्येक माणसाला प्रत्यहीं ज्यांच्या वंशांत आपण जन्माला आलों त्या आपल्या वैदिक पूर्वजांचें स्मरण घडत असतें. बहुधा वेद रचण्यांत आले तेव्हांपासून आज पांच हजार वर्षांवर, निदान वैदिक सूत्रांच्या रचनाकालापासून आज तीन हजार वर्षें तरी ब्राह्मणांनीं आपल्या वंशोत्पत्तीची आठवण कायम ठेवली आहे. धार्मिक भावनेनें रजपुतांनींही ती शिथिल होऊं दिलेली नाहीं. वस्तुतः दोन हजार वर्षां-

च्या कालावर पसरलेल्या पुराणलेखांच्या पुराव्यावरून हेंच सिद्ध होतें कीं, क्षत्रियांनीं व रजपूतांनीं आपल्या लेखांतून आपल्या गोत्रांचा काळजीपूर्वक व अभिमानानें उल्लेख केलेला आहे. पूर्वकालीन शिलालेखांत किंवा ताम्रपत्रांत आढळत असलेलीं गोत्रें आजकालही प्रसिद्ध रजपूत घराण्यांत दिसून येतात आणि यावरून आपल्याला असें म्हणावयाला कांहीं हरकत नाहीं कीं, हीं रजपुत घराणीं वैदिक क्षत्रियांपासूनच उत्पन्न झालेलीं आहेत. कर्नल टॉड यांनें अग्निकुल म्हणून मानल्या गेलेल्या घराण्यांचीं गोत्रें त्यांच्या गोत्रोच्चारावरून ( टॉड यांनीं गोत्राचार असा शब्द वापरला आहे; परंतु तो चुकीनें वापरलेला असावा. गोत्रोच्चार, गोत्राचा उच्चार, असा तो असावा असा आमचा तर्क आहे ) नमूद करून ठेविलीं आहेत; तीं येणें-प्रमाणें—चाहुमान हे वत्सगोत्राचे असून पंचप्रवरी आहेत; चालुक्य भारद्वाज गोत्राचे असून त्रिप्रवरी आहेत; परमार हे त्रिप्रवरी वासिष्ठ गोत्री आहेत. ( प्रतिहारांचें गोत्र लेखांवरून किंवा संशोधनानें अजून निश्चित झालेलें नाहीं ). या घराण्यांच्या पूर्वकालीन लेखांतही याच गोत्रांचा उल्लेख झालेला आहे हें आम्हीं पूर्वींच निदर्शनास आणून दिलें आहे. परमारांच्या गोत्राचा उल्लेख उदेपूर प्रशस्तींत व इतरही बऱ्याच लेखांत आलेला आहे. उदाहरणार्थ पाटनारायण लेखांतील ( इ. अँ. ४५ भा. ) पुढील चरणांतील उल्लेख लक्षांत ठेवण्यासारखा आहे; "वसिष्ठगोत्रोद्भव एष लोके ख्यातस्तदादौ परमारवंशः.॥" अखिल हिंदुस्थानांतील परमार, मग ते दक्षिणेंतील असोत वा राजपुतान्यांतील असोत, याच गोत्राचे आहेत. पूर्वीं सांगितलेल्या हैहयांच्या लेखांत चालुक्यांच्या गोत्राचा उल्लेख आला असून चाहमानांचें गोत्र बिजोलिया येथील लेखांत "विप्रश्रीवत्सगोत्रेऽभूदहिच्छत्रपुरे पुरा" या चरणांत ( ज. बंगाल. रॉ. ए. सो. पु. ५५ पा. ४१ ) सांगितलें

आहे. राठोडांचें गोत्र गौतम असून गुहिलोतांचें बैजवापायन आहे असें त्यांच्या लेखांवरूनच दिसतें. पूर्वकालीन लेखांत सांगितलेलींच गोत्रें आजपर्यंत या रजपूत घराण्यांत चालत आलीं आहेत आणि यावरून स्वाभाविकपणेंच असें अनुमान निघतें कीं, गोत्रांचें अस्तित्व आणि त्यांची अव्याहत स्मृति व उच्चार यांवरून हीं रजपूत घराणीं वैदिक मूळ पुरुषांपासून उत्पन्न झालेलीं आहेत. असा सिद्धांत पूर्ण सिद्ध होत नसला तरी त्या कल्पनेला यामुळें मोठा आधार मिळालेला आहे.

रजपूत मूळचे अनार्य असून इ. स. नं. ६ व्या किंवा ७ व्या शतकांत आर्यधर्मी क्षत्रिय बनले तेव्हां त्यांनीं आपल्या ब्राह्मण पुरोहितांचीं गोत्रें आपल्या घराण्यासाठीं स्वीकारिलीं या मुद्द्यावर हा दीर्घ काल चालत आलेल्या परंपरेचा पुरावा खोटा पाडण्याचा प्रयत्न करण्यांत येत असून क्षत्रियांनीं आपल्या पुरोहितांच्या गोत्रांचा उपयोग करावा असा सूत्रांत नियम सांगितलेला आहे ( पुरोहितप्रवरो राज्ञाम् ) त्या नियमाचा या मताच्या पुष्टीकरणार्थ उपयोग करण्यांत येतो. गैरसमजामुळें आपल्यांतच कशा चुकीच्या कल्पना उत्पन्न होतात, आणि स्वकीय पंडितांच्या गैरसमजुतीमुळें परकीय पंडित आणि पुराणसंशोधक यांचा कसा भ्रम होतो याचें हें आणखी एक उदाहरण आहे. याज्ञवल्क्यस्मृतीवरील सुप्रसिद्ध मिताक्षरा टीकेच्या कर्त्यानें क्षत्रियांस गोत्रें नाहींत, त्यांनीं आपल्या पुरोहितांचीं गोत्रें वापरावीं व त्या गोत्रांवरून लग्नें ठरवावींत असा खरोखर चुकीचा नियम घालून दिला. द्विजांत म्हणजे आर्यांत असगोत्र विवाहांनाच मात्र शास्त्राची संमति आहे अशा तऱ्हेचें याज्ञवल्क्य स्मृतींत जें वचन आहे त्यावरील विज्ञानेश्वरांची टीका सांप्रत सर्वमान्य झालेली असून स्वाभाविकपणेंच क्षत्रिय राजांच्या लेखांत त्यांच्या गोत्रांचा जो उल्लेख आलेला आहे त्याचें विवेचन करीत असतां

युरोपीय पंडित या टीकेचा आश्रय करितात. हीं राजांचीं गोत्रें जर केवळ उपचार म्हणून वापरलेलीं असतीं, आणि तीं त्यांच्या पुरोहितांच्या गोत्रांवरून उसनीं घेतलेलीं व पुरोहितांस बदलल्याबरोबर बदलण्यासारखीं असतीं तर या पुराण लेखांतील गोत्रांच्या उल्लेखांस कोणतेंही महत्व येऊं शकलें नसतें. उदाहरणार्थ बादामीच्या चालुक्यांनीं किंवा कांचीच्या पल्लवांनीं हीं गोत्रें त्यांचीं स्वतःचीं नसतीं तर आपल्या प्रत्येक दानपत्रांत आपल्या गोत्राचा जो " मानव्यसगोत्राणां चालुक्यानाम् " आणि "भारद्वाजसगोत्राणां पल्लवानाम् । " असा उल्लेख केला आहे तो करण्याची पर्वा बाळगली नसती. पुरोहितप्रवरो राज्ञाम् या सूत्राचा विज्ञानेश्वरानें साफ चुकीचा अर्थ केला आहे. पूर्वकालीन क्षत्रिय आणि अर्वाचीन रजपूत यांना स्वतःचीं गोत्रें होतीं व आहेत याबद्दल आम्हाला काडीमात्र शंका नाहीं. पूर्वकालीन लेखांत जे आपल्याला गोत्रांचे उल्लेख दिसतात ते क्षत्रियांना आपण आर्यवंशांत उत्पन्न झालेले आहोंत हें सांगण्यांत वाटत असलेल्या अभिमानामुळें होत असें म्हणणें जरूर आहे. इतकेंच नव्हे तर प्राचीन कालांत निरनिराळीं घराणीं एकमेकांपासून ओळखण्याला गोत्र हेंच एक साधन होतें; आणि आतां आपण ज्याप्रमाणें आपलीं आडनांवें लावतों त्याप्रमाणें पूर्वीं ब्राह्मण व क्षत्रिय अभिमानानें व आपल्या भिन्न घराण्यांचा निर्देश करण्याच्या जरुरीनें गोत्रांचा उपयोग करीत. आपलीं आडनांवेंहि खरोखर गोत्रांवरूनच आलेलीं आहेत. बारहूत येथील तोरणावरील लेखांत पुढीलप्रमाणें लिहिलें आहे. " गागीपुत्तस बिसदेव पुत्तेन गोतीपुत्तस अगराजस पुत्तेन वछी पुत्तेन धनभूतिना कारितं तोरणं." कनिंगह्यामनें याचें भाषांतर असें केलें आहे कीं, राजा धनभूतीनें उभारलेलें तोरण; जो ( धनभूति ) वत्स गोत्रांतील राणीच्या उदरीं आला, गोत ( कौत्स ) गोत्रीय

राज्ञीचा पुत्र अगराज त्याचा मुलगा. आणि गर्ग गोत्रोत्पन्न राणीचा पुत्र त्रिसदेव त्याचा नातू. येथें राजाची आई, आजी व पणजी यांच्या कुलांच्या गोत्रांचा जो सन्मानानें उल्लेख केला आहे तो या सर्व राण्या आर्य कुलांतच उत्पन्न झालेल्या आहेत हें दाखविण्यासाठींच आहे. कनिंगह्यामनें येथें असा शेरा मारिला आहे कीं, ' रजपूत राण्यांस अद्यापही त्यांच्या माहेर घराण्याच्या नांवावरूनच ओळखण्यांत येतें. हीं नांवें गोत्रांचीं नांवें असतात. याचें कारण असें आहे कीं, स्मृतिवचनाप्रमाणें राजांनीं आपल्या पुरोहितांचीं गोत्रें लावावयाचीं असतात. ' कनिंगहॅमसारख्या सुप्रसिद्ध पंडिताचा आणि इतिहाससंशोधकाचाही विज्ञानेश्वरानें चुकीचा अर्थ केलेल्या स्मृतिवचनामुळें असा घोंटाळा झाला आहे. ( कनिंगहॅमचें बारहूत पानें १२७–१३० ). कारण हें गोत्र राजाचें नसून जर पुरोहिताचेंच असेल तर राण्यांच्याही गोत्रांचा उल्लेख करून तें सांगण्याचें स्वारस्य तरी काय ? त्या काळांत या स्मृतिवचनाचा अर्थ आजच्याप्रमाणें समजत नसत हें स्पष्ट आहे. या विषयावरील विस्तृत टिप्पणींत आम्ही असें दाखविणार आहोंत कीं, या श्रौतसूत्राचा खरा अर्थ असा आहे कीं, राजांना ज्या वेळीं यज्ञ करावयाचे असतील तेव्हां त्यांनीं अध्वर्यु वगैरे याज्ञिक पसंत करावयाचे ते त्यांच्या पुरोहितांच्या गोत्राचे असले पाहिजेत. कारण स्वतः राजाला यज्ञांत यजमान म्हणून सतत बसणें शक्य नसल्यानें त्याला आपला अधिकार प्रतिनिधि म्हणून पुरोहिताला नेहमींच द्यावा लागतो; यज्ञांतील तंत्र निरनिराळ्या प्रवरांत वेगवेगळें असतात; तेव्हां हे याज्ञिक पुरोहिताच्या प्रवरांतील ( गोत्रांतील नव्हे ) असावेत. आमच्या टिप्पणींत दाखविल्याप्रमाणें क्षत्रियांना स्वतःचीं गोत्रें होतीं हें निरनिराळ्या श्रौत सूत्रांतील संकेतांवरूनच सिद्ध होतें, आणि विज्ञानेश्वराच्या

मिताक्षरेंतील नियम चुकीचा आहे याबद्दल आम्हांला अणुमात्र संदेह नाहीं.

यदाकदाचित् कोणाला कांहीं शंका उरलेली असेल तर पुढील निदर्शित केलेल्या लेखांच्या पुराव्यानें ती नाहींशी व्हावयास पाहिजे. विज्ञानेश्वर १२ व्या किंवा तेराव्या शतकांत दक्षिणेंत कर्नाटकांत कल्याण येथें रहात होता. तेथें रजपूत घराणीं मुळींच नव्हतीं, अथवा असलींच तर फारच थोडीं असावींत. क्षत्रियांस स्वत:चीं गोत्रें नाहींत, त्यांना आपल्या पुरोहितांचीं किंवा आचार्यांचीं गोत्रें लावावींत या वचनार्थाचा उत्तर हिंदुस्थानांतील रजपूत घराण्यांतील १० व्या व ११ व्या शतकांतील लेखांत मागमूसही आढळत नाहीं. या लेखांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, रजपूत घराण्यांच्या निरनिराळ्या गोत्रांवरून त्या पूर्वजांचे ते वंशज आहेत असें दर्शविलें जात असे. वसिष्ठानें जेव्हां परमारांचा मूळ पुरुष उत्पन्न केला आणि त्यास आपलें गोत्र दिलें तेव्हां त्यानें तें पुरोहित म्हणून दिलें नाहीं, तर जनक म्हणून दिलें. तद्वतच द्रोणाच्या ओंजळींतील पाण्यापासून उत्पन्न झालेल्या चालुक्यांना कल्चूरी हैहयांच्या लेखांत म्हटल्याप्रमाणें द्रोणाचें भारद्वाज गोत्र प्राप्त झालें तें द्रोण त्यांचा आचार्य किंवा पुरोहित होता म्हणून नसून उत्पादक होता म्हणून होय. येथील चरण स्पष्ट असा आहे कीं—क्षितिधरपरिपाटी सूत्रिते गोत्रे अभवद्वनिवर्मा विश्वविख्यातकर्मा ॥ चाहमानाचें गोत्र वत्स आहे. त्यांच्या एका लेखांत अशी आख्यायिका दिली आहे कीं, ते वत्स गोत्राच्या ब्राह्मणापासून उत्पन्न झाले आहेत. ( विप्रश्रीवत्स गोत्रेऽभूदहिच्छत्रपुरे पुरा। सामन्तोनन्तसामन्त। ). दुसऱ्या एका लेखांत मूळ चाहमान वत्सऋषीच्या नेत्रापासून उत्पन्न झाला असें स्पष्ट म्हटलें आहे. विज्ञानेश्वराच्या मनांतील कल्पना ९ व्या व

दहाव्या शतकांत अस्तित्वांत नव्हती हें सिद्ध करण्यास दिलेलीं वरील उदाहरणें पुरेशीं आहेत. वसिष्ठाच्या अग्नीपासून किंवा भारद्वाजाच्या ओंजळींतून क्षत्रिय वीर उत्पन्न झाले या गोष्टी म्हणजे कल्पित कथा आहेत हें अगदीं उघड आहे; परंतु हेंही तितकेंच स्पष्ट आहे कीं या गोष्टी १० व्या व ११ व्या शतकांत परमार आणि चालुक्य हे वसिष्ठ व भारद्वाज गोत्राचे आहेत असा जो सार्वत्रिक विश्वास होता त्यावर उभारलेल्या आहेत. हीं गोत्रें जीं त्यांना लावण्यांत आलीं तीं पुरोहितांमुळें नसून वंशोत्पत्तीमुळें आहेत; क्षत्रियांत देखील गोत्रानें गोत्रपुरुषापासून उत्पत्ति झाली असाच समज होता; आणि बंदिजनांनीं हीं घराणीं त्या मूळ पुरुषापासून उत्पन्न झालीं आहेत असें दाखविण्यासाठींच कल्पित गोष्टी रचल्या. या लेखांचा अशा तऱ्हेनें उलगडा केला असतां त्यावरून असें स्पष्टपणें सिद्ध होतें कीं मिताक्षरेंपूर्वींच्या शतकांत क्षत्रियांना स्वतःचीं गोत्रें आहेत, व त्या गोत्रांवरून त्या त्या गोत्रांची वंशोत्पत्ति निश्चित होते असा लोकांचा ठाम विश्वास होता. मिताक्षरेच्या काळांत दक्षिणेंतील क्षत्रिय आपलीं गोत्रें विसरूं लागले होते किंवा बौद्ध काळांत आर्य संस्कारांस कायमचे पारखे झालेल्या हिंदुधर्मांत परत घेतांना पुराणमताभिमानी ब्राह्मण क्षत्रिय म्हणून मानण्यास तयार नव्हते असें असण्याचा संभव आहे. बौद्ध काळांत आपलीं गोत्रें विसरल्यामुळें आतां त्यांच्या पुरोहितांचीं गोत्रें तींच त्यांचीं असें मानण्यांत येऊं लागलें. विज्ञानेश्वरानें पुरोहितप्रवरो राज्ञाम् या सूत्राचा सोईस्कर असा अर्थ केला आणि क्षत्रियांस स्वतःचीं गोत्रें नाहींत; त्यांनीं आपल्या पुरोहितांचीं अथवा आचार्यांचीं गोत्रें लावावींत असें प्रतिपादिलें.

मिताक्षरेंत केलेल्या या चुकीच्या विधानाची मीमांसा कशीही

असो, तें चूक आहे, रजपुतांत मिताक्षरेपूर्वी शेंकडों वर्षें स्वतःचीं गोत्रें होतीं; आणि त्या गोत्रांवरून त्यांच्या वंशोत्पत्तीचा निर्देश होत असे याबद्दल शंका उरण्याचें कारण नाहीं. वस्तुस्थिति अशी आहे कीं, आजमितीला राजपुतान्यांत आणि इतर ठिकाणींहीं पुरोहितांच्या गोत्रांहून भिन्न अशीं गोत्रें रजपुतांत आढळतात. याबद्दल आम्ही खास चौकशी केली असून आमच्या चौकशीचा निष्कर्ष या प्रकरणास जोडलेल्या टिप्पणींत दिलेला आहे. येथें असा प्रश्न उद्भवूं शकेल कीं, ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तिघांचींही गोत्रें एकच कशीं ? सूर्य व सोमवंशीय क्षत्रियांचे मूळ पुरुष ब्राम्हण ऋषि हें कसें ? या प्रश्नाचा विचार टिप्पणींत करण्यांत येईलच, तथापि त्याच्या उत्तराचें दिग्दर्शन करणें अवश्य आहे. प्राचीन काळापासून आम्ही ज्या कालविभागाचा विचार करीत आहोंत त्या कालापर्यंत हिंदुस्थानांतलि आर्य असलेल्या वरिष्ठ दर्जाच्या जाती एकमेकांपासून कायमच्या अलग झालेल्या नव्हत्या ही गोष्ट कित्येकांस अश्रुतपूर्व अशी वाटेल. ब्राह्मण व क्षत्रिय हे आपआपसांत शरीरसंबंध करीत इतकेंच नव्हे तर ब्राह्मणांचे क्षत्रिय व क्षत्रियांचे ब्राह्मणही होत. ब्राह्मणाचा क्षत्रिय होई व क्षत्रियाचा ब्राह्मण होई असें दाखविणाऱ्या वैदिक व पौराणिक आख्यायिका पुष्कळ आहेत. पण प्रवरांचे आणि गोत्रांचे ही ऋषि ब्राह्मण आणि क्षत्रिय असे दोघेही आहेत. कित्येक ब्राह्मणांचे प्रवर ऋषि म्हणजे मूळ पुरुष क्षत्रिय राजे आहेत तर क्षत्रियांचे प्रवर ऋषि ब्राह्मण आहेत. वैदिक कालांत प्रचारांत आलेली प्रवर—पद्धति हि खरोखरच एकदेशी आणि वर्णभिन्नत्वावर रचलेली नाहीं. ब्राह्मण व क्षत्रिय यांत भेद करण्याचा कांहीं प्रयत्न श्रौतसूत्रांत केलेला आढळतो; पण ती त्या दोघांत पुढें उत्पन्न झालेल्या विलगपणाची केवळ सुरुवात आहे. परंतु तेव्हांपासून आज

तागायतपर्यंत प्रत्यक्ष ब्राह्मण, रजपूत आणि वैश्य या आर्यवंशांतील तिन्ही वर्णांचे प्रवर व गोत्रें हीं एकच आहेत. तेव्हां रजपूत हे आर्यवंशांत वेदकालीन क्षत्रिय घराण्यांत उत्पन्न झाल्याचा हक्क सांगतात तो कोणत्याही तऱ्हेनें निराधार नाहीं; तो ख्रिस्ती शकापूर्वीं हजारों वर्षें चालत आलेल्या आख्यायिकांच्यावर रचलेला आहे; याबद्दल शंका उरण्याचें कारण नाहीं. आतां हे वैदिक आर्य क्षत्रिय राजपुतान्यांत केव्हां व कसे गेले हें इतिहास व आख्यायिका यांवरून पुढील प्रकरणांत विवेचन करूं.

---

# टिप्पणी–अर्वाचीन रजपुत घराण्यांचीं व त्यांच्या पुरोहितांचीं गोत्रें.

| संस्थानाचें नांव | घराण्याचें नांव | गोत्र. | पुरोहितांचीं गोत्रें |
|---|---|---|---|
| १ उदेपूर ( डुंगरपुर वगैरे ) | गुहिलोत–सूर्यवंशी | बैजवाप त्रिप्रवर | सास्तायन |
| २ जोधपूर ( रतलाम वगैरे ) | राठोड–सूर्यवंशी | गौतम त्रिप्रवर | भारद्वाज |
| ३ जयपूर ( अलवार वगैरे ) | कच्छवाह सूर्यवंशी | मानव ,, | वत्स |
| ४ बुंदिकोटा | चौहान | वत्स, पंचप्रवर | — |
| ५ बिजोलिया ( उदेपुरांतर्गत ) | परमार | वसिष्ठ त्रिप्रवर | — |
| ६ धार ( मराठा ) | परमार, सूर्यवंशी | वसिष्ठ त्रिप्रवर | कारिप |
| ७ भावनगर | गुहिल, चंद्रवंशी, | गौतम त्रिप्रवर | काश्यप |
| ८ घोलेरा (धुंधुका तालुका) | चूडासम ,, | अत्रि | — |
| ९ कच्छ, नवानगर गोंडाळ, मोरवी राजकोट वगैरे. | जाडेजा | अत्रि | |
| १० ध्रांगध्रा, लिमडी वांकानेर, पाटण | झाला | मार्कंडेय, पंचप्रवर | |
| ११ लुनावाडा (रेवाकाठांत) पेठपुर ( महिकाठांत ) | चालुक्य, सोळंकी | भारद्वाज, त्रिप्रवर | |
| १२ रेवाबुंदेलखंड | चावडा ( सोळंकी ) | भारद्वाज त्रिप्रवर | |
| १३ काश्मीर | जम्मुवाल, सूर्यवंशी | ,, ,, | वसिष्ठ |
| १४ गिधौर ( बंगाल ) | चंदेल चंद्रवंशी | चंद्रात्रेय त्रिप्रवर | काश्यप |
| १५ दिल्ली–पाटण (जयपुरांतर्गत) | तुवर | वैयाघ्रपद | भारद्वाज त्रिप्रवर |

# टिप्पणी--गोत्र आणि प्रवर.

क्षत्रियांस स्वतःचीं गोत्रें होतीं, त्यांना स्वतःचीं गोत्रें नसल्याकारणानें त्यांनीं आपल्या पुरोहितांचीं गोत्रें लावावींत असें जें विज्ञानेश्वरानें मिताक्षरेंत सांगितलें आहे तें चूक आहे, हें आमचें मत आम्हीं पूर्वींच नमूद केलें आहे. परंतु गोत्रें हीं शिष्यत्व न दाखवितां वंशोत्पत्ति दाखवीत असतील तर क्षत्रियांचीं व ब्राह्मणांची एकच गोत्रें कशीं, असा प्रश्न पुष्कळदां विचारण्यांत येतो. कारण क्षत्रिय हे ब्राह्मणांपासून उत्पन्न झाले नसून सूर्य व चंद्र वंशांत उत्पन्न झाले आहेत अशी समजूत आहे. शिलालेखांची माहिती नसलेल्या कवींनां आणि भाटांना या शंकेनें पेचांत पाडलें; तेव्हां क्षत्रियांच्या उत्पत्तीबद्दल त्यांनीं मनःकल्पित अशा कथा निर्माण केल्या. गोत्र आणि प्रवर या विषयाचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां हें गूढ उकलेल अशी आमची खात्री आहे; तेव्हां त्या प्रश्नाचा आम्हीं या टिप्पणींत मुळापासून विचार करणार आहोंत.

अगदीं अलीकडील मताप्रमाणें गोत्रऋषि हा सप्तर्षि आणि आठवा अगस्त्य यांपैकीं कोणाचा तरी पुत्र किंबहुना वंशज असावा. अगस्त्याचा अंतर्भाव सप्तर्षींत झालेला नाहीं. ( सप्तानां सप्तर्षीणामगस्त्याष्टमानां यदपत्यं तद्गोत्रमित्याचक्षते । हें बौद्धायनाचें वचन पहा ). यावरून असें दिसतें कीं, मूळच्या भारती आर्यांचीं आठ घराणीं मानण्यांत येत. १ विश्वामित्र २ जमदग्नि ३ भरद्वाज ४ गौतम ५ अत्रि ६ वसिष्ठ ७ कश्यप आणि ८ अगस्त्य.

परंतु महाभारतांतलि एका महत्वाच्या श्लोकांत याच्याहि मागें जाऊन सुरुवातीला चारच गोत्रें होतीं असें सांगितलें आहे.

मूलगोत्राणि चत्वारि समुत्पन्नानि भारत ।
अंङ्गिराः कश्यपश्चैव वसिष्ठो भृगुरेव च ॥

शांतिपर्व अ. २९६.

भृगुप्रवरापासून सुरुवात करणाऱ्या कित्येक सूत्रांतील प्रवराध्यायांत पुरा-

तन कालीं १ अङ्गिरस, २ कश्यप, ३ वसिष्ठ, आणि ४ भृगु हींच चार गोत्रें होतीं या गोष्टीस पुष्टि मिळते. ( याचमुळें भगवद्गीतेंत 'महर्षीणां भृगुरहम् ।' असें म्हटलें आहे. भृगु हा महर्षि अथवा 'प्रवर' ऋषींतील प्रमुख आहे. ) यावरून असें दिसतें कीं, जेव्हां भारतीआर्यांची पहिली किंवा सूर्यवंशी तुकडी हिंदुस्थानांत आली तेव्हां त्यांच्यांत १ भृगु २ अङ्गिरस, ३ वसिष्ठ, आणि ४ कश्यप हीं चार मूळ घराणीं होतीं. ते ब्रह्मदेवाचे मानसपुत्र होते असें सांगितलेलें आढळतें; तेव्हां ते आदिपुरुषच असावेत. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या तीन्ही आर्य वर्णांचे ( त्या काळीं वर्णांना जातीचें स्वरूप आलेलें नव्हतें ) ते आद्यजनक होते.

भृगूचें नांव सप्तर्षींत आढळत नाहीं, परंतु त्याचा वंशज जो जमदग्नि त्याचें नांव सप्तर्षींत आहे; त्याचप्रमाणें अंगिरसाऐवजीं त्याचे दोन नातू भरद्वाज आणि गौतम हे सप्तर्षींत आहेत. तेव्हां पुढें प्रचारांत आलेल्या आठ मूळ घराण्यांची बेरीज करण्यासाठीं या पांचाबरोबर अत्रि, विश्वामित्र आणि अगस्त्य यांचा समावेश केला पाहिजे. चंद्र हा अत्रीचा मुलगा मानलेला आहे आणि बहुतेक चंद्रवंशी रजपुतांचें अत्रि हें गोत्र आहे. तेव्हां आर्यांची दुसरी तुकडी किंवा चंद्रवंशी आर्य यांचा निर्देश अत्रि या मूळ घराण्यानें होतो हें स्पष्ट आहे. अगस्त्याचा समावेश मागाहून करण्यांत आला हें खरें, परंतु तो वैदिक कालांतच झाला होता. कारण अगस्त्य ऋषीचा उल्लेख खुद्द वेदांत आलेला आहे. विश्वामित्र हा भारती आर्य-क्षत्रिय असून वेदकालांतच जेव्हां वर्णांना जातीचें स्वरूप प्राप्त झालेलें नव्हतें आणि निरनिराळ्या कुलांना आपला परंपरागत चालत आलेला धंदा सोडून देऊन दुसरा एखादा आणि त्यांतल्या त्यांत विशेषतः याज्ञिकाचा बौद्धिक धंदा करितां येत असे. अशा काळीं विश्वामित्र तरानें ब्राह्मण होऊन प्रवर ऋषिही झाला. याचा अर्थ असा कीं, विश्वामित्राचे कालांतलें सूर्यवंशी क्षत्रिय घराणें असून आपल्या बुद्धिसामर्थ्यानें आणि थोर धार्मिक गुणांनीं त्यानें ब्राह्मणत्व संपादन केलें. महाभारतानें जतन करून ठेवलेल्या या चार गोत्रांच्या प्राचीन इतिहासावरून असें दिसून येतें कीं,

प्राचीन ऋषींपासून ब्राम्हण आणि क्षत्रिय या दोघांचीही उत्पत्ति झाली असण्यास कांहीं हरकत नाहीं.

प्रवरांच्या उत्पत्तीच्या विचारानें या अनुमानाला अधिकच पुष्टि मिळते. अत्यंत विद्वान पंडितांनाहि प्रवर म्हणजे काय हें सामान्यतः माहीत नसते. कारण ते या प्रश्नाचा अभ्यास क्वचितच करितात. निरनिराळ्या सूत्रांतील प्रवराध्यायांचें अध्ययन केल्यास असें दिसून येतें कीं कुलाचे प्रवर ऋषि म्हणजे ज्यांनीं ऋग्वेदांतील सूक्तें रचलीं व त्या सूक्तांनीं अग्नीची स्तुति केली असे पूर्वज. यज्ञ करणारा यजमान अग्नीची प्रार्थना करितो की "हे अग्ने ! ऋग्वेदांतील सूक्तांनीं ज्यांनीं तुझी स्तुति केली आहे अशा ऋषींचा मीं वंशज आहे" किंबहुना अग्नि त्या ऋषीनें उत्पन्न केलेला अतएव पुत्र असें समजून यजमान हा अग्नीला आपल्या ऋषींच्या नांवानेंच आळवीत असतो. "आर्षेयं वृणीते" या आपस्तंभ सूत्रावरील टीकेंत असें म्हटलें आहे कीं, आर्षेयमृष्यपत्यसम्बन्ध प्रार्थयते संकीर्तयाति। अथवा आर्षेय मृषेरपत्यमग्निं यजमानस्य ऋषिसंतानवात् तं वृणीते प्रार्थयते होत्रादिभिः॥ यावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं यजमान हा प्रवर ऋषीचा वंशज आहे शिष्यपरंपरेंत नव्हे. दुसऱ्या एका सूत्रांत ऋषि या शब्दाचा अर्थ असा सांगितला आहे कीं ( मंतकृतो वृणीते ) ऋषि म्हणजे मंत्राचा कर्ता. गोत्राचा ऋषि हा मंत्रकृत् किंवा मंत्ररचना करणाराच असला पाहिजे असे नाहीं. तो प्रवर ऋषीचा एखादा विख्यात वंशज असल्यामुळें त्याच्या पासून उत्पन्न झालेली शाखा किंवा नवीन घराणें त्यांचें नांव लावूं लागतें. यावरून गोत्रें हीं अनेक आहेत परंतु प्रवर थोडेच आणि ठराविक आहेत, (कारण वैदिक सूक्ताचे कर्ते हे एकदां ठरलेले आहेत ते वाढूं शकणार नाहींत) या वचनाचें सत्य पटून येतें. आतां सूत्रांत आणखी असेंही सांगितलें आहे कीं "एकं वृणीते द्वौ वृणीते त्रीन् वृणीते न चतुरो वृणीते न पंचाति वृणीते।" एक, दोन किंवा तीन ऋषींचा उच्चार करावा परंतु चार किंवा पांचापेक्षां अधिकांचा करूं नये. याचा अर्थ असा कीं एखाद्याच्या पूर्वजांत पांचापेक्षा अधिक ऋषींनीं सूक्तें रचिलीं असलीं तरी त्यानें पांचापेक्षां अधिकांच्या नांवाचा उच्चार करूं नये. प्रवर ऋषि हे बहुधा तीन

किंवा कधीं पांच असतात परंतु ते कधींही चार अथवा पांचापेक्षां अधिक कां असत नाहींत याचा उलगडा या सूत्रावरून होतो. गोत्र ऋषि हा या प्रवर ऋषींपैकीं किंवा त्यांचा एखादा वंशज असतो.

उदाहरणार्थ भारद्वाज गोत्राचे तीन प्रवर आहेत; आंगिरस, बार्हस्पत्य आणि भारद्वाज. गोत्र ऋषी भारद्वाज हा या प्रवर ऋषींपैकींच आहे. परंतु वत्सगोत्राचे भार्गव, च्यावन, आप्नवान, और्व आणि जामदग्न्य हे पांच प्रवर असून वत्स हा त्यांपैकीं नाहीं. तो जमदग्नीचा एक सुप्रसिद्ध वंशज असून त्याच्यापासून उत्पन्न झालेल्या स्वतंत्र शाखेला किंवा गोत्राला त्याचें नांव पडलें आहे. सूत्रांतील आणखी एका नियमाचा उल्लेख करणें आवश्यक आहे. सूत्रांत असें सांगितलें आहे कीं अध्वर्यूनें प्रवर ऋषींचा उच्चार पिढ्यांच्या अनुक्रमानें खालून वर करीत जावा व होत्यानें तो वरून खालीं करीत जावा. याही नियमावरून हेंच सिद्ध होतें कीं प्रवर व गोत्र हीं वंशोत्पत्तिदर्शक आहेत अनुयायित्वदर्शक नाहींत. अंगिरस बृहस्पति आणि भरद्वाज एकानंतर एक उत्पन्न झालेले आहेत; त्याचप्रमाणें भृगु, चायन्न, आप्नवान्, ऊर्व आणि जमदग्नि. * अशी उतरती पिढी आहे.

आतां असा प्रश्न विचारतां येईल कीं सूर्य किंवा चंद्र वंशांत म्हणजे सूर्याच्या किंवा चंद्रांच्या वंशांत उत्पन्न झालेल्या क्षत्रियांच्या पूर्वजांत याच प्रवर ऋषींचीं-किंवा वैदिक सूक्तें रचणाऱ्या ऋषींचीं नांवें कां यावीत ? परंतु आपण प्रवर ऋषींच्या यादीचें निरीक्षण केलें तर आपल्याला असें दिसून येईल कीं तींत सूर्य आणि चंद्र वंशांतील राजांचींही पुष्कळ नांवें आहेत. ऋग्वेदांतील सूक्तकार हे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिन्ही वर्णांतले आहेत ही गोष्ट कित्येकांना ऐकूनही माहीत नसेल. उदाहरणार्थ मांधाता, अंबरीष, युवनाश्व, त्रसदस्यु, पुरुकुत्स हीं प्रवर ऋषींच्या यादींत दिलेलीं नांवें सूर्यवंशांतील प्रसिद्ध राजांचीं आहेत. आणि शुनहोत्र

---

* भार्गवच्यावनाप्नवानौर्वजामदग्न्येति होता । जमदग्निवदूर्ववदप्नवानवच्च्यावनवद्भृगुवदित्यध्वर्यु ॥

च अजमीढ वगैरे चंद्रवंशी राजांची आहेत. भृगु व अंगिरस गण-प्रवरांतील ऋषि यांतच बहुधा क्षत्रिय राजे आहेत असें दिसून येतें. ही गोष्ट याच प्रकरणांत आम्ही वाचकांच्या निदर्शनास आणणार आहोंत. परंतु तत्पूर्वी आम्हीहि ही गोष्ट वाचकांच्या नजरेस आणणार आहोंत कीं प्रवराध्यायांत दिलेल्या प्रवरांचें परीक्षण केल्यास असें दिसून येतें कीं वैदिक कालांतही पुष्कळ क्षत्रिय ब्राह्मण झाले आहेत. त्यांपैकीं कांहींचा येथें उल्लेख येणें प्रमाणें. प्रथम आपण गर्गाची गोष्ट घेऊं. तो चंद्रवंशांतील विख्यात जो दुष्यंतराजा त्याच्या भरत नांवाच्या पुत्राचा पुत्र जो वितथ त्याच्या भूमन्यु नांवाच्या तनयाचा पुत्र असून क्षत्रिय होता. वायु पुराणांतही सांगितल्याप्रमाणें हा गर्ग व त्याचे वंशज ब्राह्मण झाले. दायादाश्चापि गर्गस्य शिनिर्बद्धाद्बभूव । स्मृताश्च ते ततो गार्ग्याः क्षत्रोपेता द्विजातयः ॥ १९१ ॥ अ. ९९. आतां प्रवराध्यायावरून असें दिसून येतें कीं गर्गाचा अंगिरस गणांत उल्लेख केला आहे. आश्वलायन सूत्रांत गर्गाणामांऽगिरस बार्हस्पत्य भारद्वाज गार्ग्य शैन्येति ॥ आङ्गिरस शैन्य गर्गेति वा । असें म्हटलें आहे. गर्ग हे चंद्रवंशीय क्षत्रिय असतां त्यांचा आंगिरस वंशांत समावेश कसा करण्यांत आला याचें स्पष्टीकरण करणें येथें जरूर आहे. ते ब्राह्मण झाले तेव्हां त्यांचा प्रसिद्ध पुरुष शिनि याला आंगिरस ब्राह्मणांनीं आपल्याच पैकीं एक असें मानून आपल्या घरांत दत्तक घेतल्यामुळें सगळ्याच गार्ग्यांचा आंगिरस गणांत प्रवेश झाला. येथें अनुयायित्वाची मोहक कल्पना मान्य होण्याजोगी नाहीं. ( ही दत्तकाची किंवा अनुयायित्वाची दोहींची संभावना पहिल्यानें पार्गिटरनें केली. पुराणें व सूर्य आणि चंद्रवंश यांच्या मीमांसेवर लिहिलेल्या निबंधांत त्यानें या प्रश्नाचा विचार केला असून पुढीलप्रमाणें अनुमान काढलें आहे ( रॉ. ए. सो. जं. .ज १९१९, पांचाल वंश ) ' जे क्षत्रिय ब्राह्मण झाले त्यांना त्यांचा आचार्य गोत्रांत किंवा एखाद्या जुन्या ब्राह्मण घराण्यांतच अंतर्भाव करून त्यांचा ब्राह्मणांत समावेश करण्यांत आला. विश्वामित्राप्रमाणें त्यांना नवीन शाखा किंवा गोत्र स्थापूं देण्यांत आलें नाहीं. ' ) कारण प्रवराची जी मूळ कल्पना कीं यजमानानें अग्नीची प्रार्थना करावयाची आणि त्याला आपल्याकडे आपल्या वैदिक

ऋषि—पूर्वजाप्रमाणें आपल्यास पहावयास सांगावयाचें, तिच्याशीं ही आचार्य गोत्राची कल्पना असंबद्ध आहे. गर्गाला आपल्या आंगिरस कुलांत समावेश करून घेऊनच हें करितां येण्याजोगें होतें; कारण मग त्याला अग्नीची अशी प्रार्थना करितां आली असती कीं 'ज्या माझ्या—आंगिरस नांवाच्या पूर्वजानें तुझी अमुक अमुक सूक्तांत प्रार्थना केली त्याच्या ठिकाणीं कृपा करून मला मान.' या कथेवरून आपल्या ध्यानांत दुसरी अशी एक गोष्ट येण्याजोगी आहे कीं; या ब्राह्मणांना वायुपुराणानें क्षत्रोपेता द्विजातयः' म्हणजे ज्यांचें क्षत्रिय आचार शिल्लक राहिले आहेत, असे ब्राह्मण असें म्हटलें आहे. यावरून कित्येक क्षत्रियांना शिलालेखांत ब्रह्मक्षत्रकुलीन असें विशेषण लावलेलें असतें त्याचेंही इंगित ध्यानांत येण्याजोगें आहे. त्याचा जास्त विचार आम्ही पुढें करणार आहोंत.

हीच गोष्ट कण्वांची ही आहे. कण्व हा चंद्रवंशी असून दुष्यंताचा पूर्वज होता. त्याचा प्रवर आंङिरसाजमीढकाण्व असा आहे. आंगिरसपौरुकुत्सत्रासदस्यव प्रवरांतील विष्णुवृद्धाची हकीकत ही अशीच आहे. वायपुराणांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, विष्णुवृद्ध हा सूर्यवंशी राजा पुरुकुत्स याच्या त्रसदस्यु नांवाच्या मुलाचा मुलगा. त्यानें आङ्गिरस घराण्यांत आपला समावेश करून घेतला व तो ब्राम्हण झाला. मुद्गलाचें ही असेंच उदाहरण आहे. तो चंद्रवंशांतील भर्म्यश्वाचा पुत्र. त्याचे वंशज ब्राम्हण झाले आणि त्यांनीं आङ्गिरस पक्षाचा आश्रय केला. मुद्गलस्यापि मौद्गल्याः क्षत्रोपेता द्विजातयः। एते ह्याङ्गिरस रसः पक्षे संश्रिता कण्वमुद्गलाः॥ वायु. यामुळें आङ्गिरस भार्म्यश्व मौद्गल्य हे त्यांचे प्रवर आहेत. आश्वलायनानें या प्रवरांऐवजीं विकल्पानें दुसरा एक प्रवर दिला आहे तृक्षमुद्दैकेऽङ्गिरसः स्थानें तार्क्ष्य भार्म्यश्व मौद्गल्येति. आंङिरसाऐवजीं ज्या तृक्षाचा उल्लेख केला आहे तो क्षत्रिय राजा असून भर्म्यश्वाचा पूर्वज आहे; आणि तृक्ष भर्म्यश्व व मुद्गल हे तीन चंद्रवंशी पांचाल क्षत्रिय आहेत. अशा तऱ्हेनें या प्रवरांत कोणताही ब्राम्हण मानलेला ऋषि नसून सगळेच क्षत्रिय आहेत. हारितांची गोष्टहि अशीच आहे. आङ्गिरसांबरीषयौवनाश्व असा त्यांचा प्रवर आश्वलायनानें सांगितलेला असून आङ्गिरसाऐवजीं मांधाता हा ऋषि सांगितला

आहे तेव्हां मांधाता-आंबरीष-यौवनाश्व असा प्रवर होतो. आतां ही तीनहीं सूर्यवंशांतील प्रमुख राजांचीं नांवें असून या प्रवरांत एकहि ब्राम्हण आढळत नाहीं. वायु-पुराणांत पुढील श्लोक आहेत. "तस्यामुत्पादयामास मान्धाता त्रीन् सुतान् प्रभुः । पुरुकुत्समम्बरीषं मुचुकुन्दंच विश्रुतम् ॥ अम्बरीषस्य दायादः युवनाश्वः परः स्मृतः । हरितो युवनाश्वस्य हरिताः शूरयः स्मृताः॥ एते ह्याङ्गिरसः पुत्राः क्षत्रोपेता द्विजातयः ॥. या श्लोकांवरून असें दिसून येते कीं हारीत गोत्राच्या ब्राम्हणांच्या प्रवरांत सगळेच क्षत्रिय राजे आहेत. हीं क्षत्रियांचीं ब्राम्हणांत झालेलीं रूपांतरें वेद कालांत झालीं आहेत हें ध्यानांत धरलें पाहिजे. हरित हा युवनाश्व ( पिता ) अम्बरीष ( प्रपिता ) आणि मान्धाता ( प्रपितामह ) यांच्याप्रमाणे सूर्यवंशांत उत्पन्न झाला असतांही त्याचे वंशज ब्राम्हण झाले. युवनाश्व, अंबरीष आणि मान्धाता हे तिघेही प्रवर ऋषि म्हणजे वैदिक सूक्तकार आहेत. हें ऋग्वेदाच्या ऋष्यनुक्रमाणिकेवरून सिद्ध आहे. क्षत्रिय राजे हे जर ब्राम्हणांचे प्रवर ऋषि होऊं शकतात तर क्षत्रियांचे प्रवर ऋषि ब्राम्हण असले तर त्यांत आश्चर्य काय? वैदिक कालांत क्षत्रियांना जर ब्राम्हण होतां येत असे ( हा प्रतिलोम क्रम आहे ) तर ब्राम्हणांना क्षत्रिय व्हावयाला कोणती हरकत होती? ( हा क्रम अनुलोम आहे ). वरच्या वर्णांतून खालच्या वर्णांत जाण्याचा हा क्रम खरोखर मध्य युगापर्यंत चालू होता; कारण सिंध आणि काबूल तेथील चच आणि ललिय यांच्यासारखीं ब्राम्हण घराणीं क्षत्रिय झालीं आणि त्याच्याही नंतरच्या कालांत भट्टी क्षत्रिय अनुक्रमें वैश्य झाले हें प्रसिद्ध आहे.

पुनः प्रतिपाद्य विषयाकडे वळावयाचें तर क्षत्रिय हे प्रवर ऋषि असल्याचीं उदाहरणें आङ्गिरस आणि भृगु वंशांत सांपडतात असें आम्हीं म्हटलें आहे, तेव्हां भृगुचीं उदाहरणें देतों. आश्वलायन सूत्रांत पुढील प्रवर दिले असून त्यांतील सर्व ऋषि क्षत्रिय आहेत हें उघड आहे. ( १ ) श्येतानां भार्गववैन्य पार्थेति ॥ यांतील पृथु व वेन हे प्रत्यक्ष क्षत्रिय राजे आहेत; आणि श्येतगोत्रियांनीं भृगु पक्षांत आपला अन्तर्भाव करून घेतला आहे. ( २ ) मित्रयुवां बाध्र्यश्वेति त्रिप्रवरंवा भार्गवदैवोदासबाध्र्यश्वेति यांतही दिवोदास

आणि वन्ध्यश्व आणि त्याचप्रमाणें मित्रयु हे क्षत्रिय राजे असून हा प्रवर भृगु पक्षाला जोडलेला आहे. ( ३ ) शुनकानां गृत्समदेति त्रिप्रवरं वा भार्गवशौनहोत्रगार्त्समदेति. आतां गृत्समद हा राजा असून क्षत्रिय आहे. तो ऋग्वेदांतील दुसऱ्या मंडलांतील सूक्तांचा प्रसिद्ध कर्ता आहे. त्याची कथा महाभारतांत सांगितली आहे. ( अनुशासनपर्व अ. ३० ) गृत्समद हा वीतहव्य राजाचा पुत्र. वीतहव्य भृगूच्या नुसत्या शब्दानें ब्राह्मण झाला. गृत्समदाला शुनहोत्रानें दत्तक घेतलें. गृत्समदाचा पुत्र सुहोत्र, सुहोत्राचा वर्चस, वर्चसाच्या वंशांत शुनक जन्मला. त्याचे नांवानें गोत्र चालूं झालें. यामुळें शुनकगोत्रीयांना गृत्समद हा एकच प्रवर किंवा भार्गवशौनहोत्र गार्त्समद असा त्रिप्रवर सांगितला आहे. या उदाहरणांवरून असें दिसून येतें कीं भृगु वंशांतही क्षत्रिय आढळतात. विश्वामित्र व अत्रि यांच्या प्रवरगणांतही तुरळक उदाहरणें आहेत परंतु आमच्या समजुतीप्रमाणें वसिष्ठ आणि अगस्त्य यांत मात्र अशीं उदाहरणें दृष्टीस पडत नाहींत.

या विस्तारावरून वैदिक कालांत कित्येक क्षत्रिय ब्राम्हण झाले व त्यांनीं ब्राम्हणांच्या कांहीं विशिष्ट प्रवरांत किंवा ब्राम्हणांच्या मूळ घराण्यांत आपला समावेश करून घेतला असें दिसून येतें. ब्राम्हण हे क्षत्रिय झाल्याबद्दलच्या उदाहरणांचा उल्लेख क्वचित आढळतो. आम्हांला असें एकच उदाहरण आठवतें. भारद्वाजानें निपुत्रिक मेलेल्या भरताचा आपण पुत्र आहोंत असें म्हटलें आहे; परंतु अशाच तऱ्हेनें ब्राम्हणांचे आणखी क्षत्रिय झाले असावेत अशी कल्पना करावयाला हरकत नाहीं. ते तसे मध्ययुगापर्यंत होतहि होते असें आम्ही म्हटलेंच आहे. तेव्हां आर्य म्हणून आणि आर्यांच्या अगदीं मूळच्या चार वंशांत जन्माला आल्यामुळें क्षत्रियांना गोत्रें व प्रवर असलेच पाहिजेत. दुसरें, क्षत्रियमंत्रकर्त्यांचे वंशज या नात्यानें त्यांना गोत्रें असणें आवश्यक आहे. आणि शेवटीं निरनिराळ्या गोत्रांच्या प्रवरांत आणि गोत्रांत संस्कारविधींत थोडेबहुत फरक असल्यामुळें यज्ञसंस्कारांसाठीं तरी कोणत्याना कोणत्या तरी प्रवरांत किंवा गोत्रांत आपला समावेश करून घेणें जरूर असल्यामुळें क्षत्रियांना गोत्रें व प्रवर हीं असलींच पाहिजेत.

क्षत्रियांना ऋषि गोत्रें कशीं या प्रश्नाचें योग्य उत्तर कांहींही असो; एक गोष्ट मात्र निर्विवाद आहे आणि ती पुष्कळशा श्रौत सूत्रावरूनच दिसून येते; ती ही कीं, क्षत्रियांना पुरातन कालापासून प्रवर व गोत्रें होतीं व तीं व ब्राम्हणांची एकच होतीं. कारण प्रवराध्यायांत असा कोठें ही उल्लेख नाहीं कीं त्यांतील प्रवर फक्त ब्राम्हणांचेच आहेत. उदाहरणार्थ आपस्तंब सूत्र घ्या. त्यांत प्रथम प्रवर व त्यांचे उच्चार यांबद्दल नियम दिले आहेत. त्यानंतर पुढील सूत्र आहे. "पुरोहितस्य प्रवरेण राजा वृणीते इति विज्ञायते" येथें राजा हा शब्द वापरलेला असून टीकाकारानें आणखी असें ही म्हटलें आहे कीं, अत्रच वचनात् ब्राम्हणोऽपि राज्यं प्राप्तः पुरोहितस्य प्रवरेण प्रवृणीते म्हणजे राजा ब्राम्हण असला तरी त्यानें पुरोहिताचा प्रवर लावावा. राजाला निकडीचीं अशीं किती तरी कामें असतात; तेव्हां त्याला यज्ञ करावयाचा असल्यास तो स्वतः त्या यज्ञांत नेहमीं हजर रहात नाहीं, आणि राहूं शकणारही नाहीं. त्याला नेहमींच आपल्या पुरोहिताला प्रतिनिधि म्हणून काम सांगितलें पाहिजे; आणि याच कारणानें विधींत कोणताही घोंटाळा होऊं नये म्हणून राजाला यज्ञ करावयाचा असल्यास होता, अध्वर्यु आणि इतर याज्ञिक आपल्या पुरोहिताच्या प्रवराचे शोधून घ्यावे लागतात.

ह्या सूत्राच्या अर्थाच्या गैरसमजुतीनें कालांतरानें त्याचा विपरीतार्थ करण्यांत आला; परंतु येथें हें स्पष्ट दिसत आहे कीं, हें सूत्र फक्त राजांकरितां आहे. त्याचा इतर क्षत्रियांशीं संबंध नाहीं. पुढें आपस्तंब सूत्रांत भृगूपासून सुरुवात करून सर्व प्रवर सांगितले आहेत; परंतु त्यांत ब्राम्हणांचे आणि क्षत्रियांचे असा फरक केलेला नाहीं. पण शेवटीं क्षत्रियांसाठीं स्वतंत्र असे नियम सांगितले असून ते अत्यंत महत्वाचे आहेत. " अथ क्षत्रियाणां यग्रह सार्ष प्रवृणीरन् एळ एवैषां प्रवरः। मानवैल पौरूरवसेति होता ॥ " सार्ष या शब्दाचा खरा अर्थ कळत नाहीं. आश्वलायनांत तो सार्ष्ट्र असा आहे. येथें क्षत्रियांची पौराणिक वंशावळ घुसडून देण्याचा प्रयत्न उघड दिसून येतो. परंतु या प्राचीन म्हणजे बहुधा इ० स० पू० पाचपासून पहिल्या शतकापर्यंत लिहिलेल्या सूत्रात जो पुरा-

णांतील उल्लेख घेतलेला आहे तो तीं पुराणें ज्या स्वरूपांत आज आहेत त्यांमधून घेतलेला नसून त्या काळांत ज्या स्वरूपांत होतीं त्यांमधून घेतला असला पाहिजे. कारण हा प्रवर म्हणजे एक कोडेंच असून आम्हीं तें पुष्कळ वैदिकांस विचारलें परंतु तें अजून उकललें नाहीं. इड किंवा इल हा मनूचा पुत्र. परंतु पुरूरवा हा इडाचा पुत्र नाहीं. अर्वाचीन पुराणां-प्रमाणें इल पुरुषाचें इला या स्त्रींत रूपांतर झालें आणि पुरूरवा हा या इलेचा मुलगा. दुसरें पुरूरवा हा सूर्यवंशी क्षत्रियांच्या पूर्वजांपैकीं नसल्यानुळें हा प्रवर सूर्यवंशीयांना लागू होणें शक्य नाहीं. तिसरें मनु हा मन्त्रकृत् असूं शकेल; पुरूरवा हा तर होताच; परंतु इलानें ऋग्वेदांतील एखादा मंत्र केला आहे असें दिसत नाहीं. तो प्रवर ऋषि असणें शक्य नाहीं.

हें कांहींही असलें तरी या सूत्रांत जो क्षत्रियांसाठीं म्हणून प्रवर सांगि-तलेला आहे तो विकल्पानें सांगितला असून त्याची उत्पत्ति बहुधा पुरा-णांतली दिसते. क्षत्रियानें इच्छेस आल्यास तो वापरावयाचा आहे.

दुसरे जे साधारण प्रवर आहेत त्यांच्या बाबतींत पुढील सूत्रांत हा अर्थ स्पष्ट केला आहे. "अथ येषां मंत्रकृतो नस्युः सपुरोहितप्रवरास्ते प्रवृणीरन्." खिस्तपूर्वकालांतहि क्षत्रिय आपले प्रवर व गोत्रें विसरूं लागले होते असें दिसतें. हें बहुधा बौद्ध धर्माच्या प्रभावानें असेल, कदाचित् बाहेरून परकीयांच्या आलेल्या स्वाऱ्यांमुळें असेल अथवा कदा-चित् लढवय्या पेशामुळें त्रासदायक वैदिक संस्कारांबद्दल स्वाभाविकपणेंच उत्पन्न होणाऱ्या अनास्थेमुळेंहि असेल. अशा क्षत्रियासाठीं या सूत्रानें ही सोय केली आहे कीं, ज्यानां मंत्रकृत् नसेल त्यांनीं आपल्या पुरोहितांचे प्रवर लावावेत. परंतु पुढील सूत्रांत असेंही सांगितलें आहे कीं, अथ येषां स्युरपुरोहितप्रवरास्ते. ज्यांच्या पूर्वजांत मंत्रकृत् असेल त्यांनीं पुरो-हिताचा प्रवर लावूं नये. त्यांनीं आपला स्वतःचाच लाविला पाहिजे असें टीकाकारानें सांगितलें आहे. "आत्मीयानेव प्रवरान् प्रवृणीरन्नित्यर्थः" परंतु चवथ्या सूत्रांत आणखी असें सांगितलें आहे कीं, त्यांनींही सोई-साठीं ( न्यायेन ) पाहिजे तर पुरोहिताचा प्रवर लावावा. ( हा नियम

गोत्राबद्दलचा नाहीं; प्रवराबद्दल आहे, हें आणखी ध्यानांत धरलें पाहिजे. ) या सूत्रांवरून असें खात्रीलायक दिसून येतें कीं, फार प्राचीन काळापासून क्षत्रियांना स्वतःचे प्रवर व गोत्रें होतीं; आणि खिस्तशकापूर्वीपासूनच्या शिलालेखांवरून असें स्पष्ट होतें कीं, क्षत्रियांनीं आपल्या लेखांतून आपल्या गोत्रांचा प्रत्यक्ष उल्लेख केला आहे. श्रौतसूत्रांचाच केवळ नाहीं, स्मृतींचाही आशय असा दिसतो कीं, क्षत्रियांना स्वतःचीं गोत्रे व प्रवर आहेत. तसें नसेल तर "असमानार्षगोत्रजाम्" हा स्मृति नियम क्षत्रियानां कसा लावितां येईल ? वरानें आपल्या स्वतःच्या गोत्राच्या किंवा ऋषीच्या ( प्रवराच्या ) वधूशीं लग्न करूं नये हा नियम क्षत्रिय आणि ब्राह्मण या दोघांनाही लागतो; तेव्हां क्षत्रियानां स्वतःचीं गोत्रे व प्रवर असलेच पाहिजेत. विज्ञानेश्वरानें मिताक्षरेंत सुचविलेला मार्ग निरुपयोगी आहे; कारण अशा रीतीनें प्रवर वेळोवेळीं बदलूं शकेल किंवा अडचण आली असतां तो मुद्दाम बदलतांही येईल व तो अशा रीतीनें ज्या दोन घराण्यांत लग्न संबंध होणें शास्त्राला धरून नाहीं त्यांत पुरोहितांना बदलून लग्न संबंध करून घेतां येतील. अर्वाचीन क्षत्रिय आणि वैश्यहि जाति व कुल किंवा नुखपद्धतीचा अवलंब करून व्यवहारांतही हा नियम पाळीत असतात हें ध्यानांत ठेवले पाहिजे.

शेवटीं कात्यायन लौगाक्षिसूत्रांतील एक महत्वाचें सूत्र आम्ही वाचकांचें नजरेस आणणार आहोंत. "अथ हैके मानवेऽयेकमार्षेयं सार्ववर्णिकं प्रवृणीते । कस्य हेतोरिति । मानव्योहि प्रजा इति । तदेतन्नोपपद्यते । न देवैर्नमनुष्यैरार्षेयं प्रवृणीते । तदेतदन्यत्र ब्राह्मणक्षत्रियाभ्यामितरासां प्रजानामुक्तं भवतीति ।" अर्थ—कांहींचे असे म्हणणें आहे कीं सर्व वर्णांसाठीं किंवा जातीसाठीं मानव हा एकच प्रवर वापरावा कारण सर्वच मनूपासून उत्पन्न झाले आहेत. परंतु हें योग्य नाहीं. कारण प्रत्येकानें जो आपला प्रवर म्हणावयाचा तो देवांच्या किंवा मनुष्यांच्या नांवानें म्हणावयाचा नसून ( आपस्तंब सूत्र ) वैदिक ऋषि किंवा मंत्रकार याच्या नांवानें म्हणावयास पाहिजे; मनु हा मनुष्य असल्यामुळें प्रवर होऊं शकणार नाहीं. हें म्हणणें ब्राह्मण व क्षत्रिय यांस सोडून तादितरांबद्दल सांगि-

तलें आहे. " तेव्हां या सूत्रांत ब्राह्मणांस व क्षत्रियांस एकच नियम लागू सांगितला असून इतरांना मात्र मानव प्रवर पाहिजे तर लावावा असें म्हटलें आहे त्यावरून हें स्पष्ट दिसून येतें कीं क्षत्रियांना तो काळपावेतों आपल्या गोत्राची व प्रवराची साधारणपणें ब्राह्मणांप्रमाणेंच स्मृति कायम होती; आणि ब्राह्मणांना लागू असलेला नियम त्यानांही लागू होता येथें हेंहि आणखी सांगावयास हरकत नाहीं कीं, पुराणांप्रमाणेंही देव, ऋषि व मानव हे भिन्न भिन्न वर्ग आहेत. ज्या क्षत्रियांनीं आपल्या प्रवर ऋषींची आठवण कायम ठेविली होती त्यांना पुढें ब्रह्मक्षत्रिय असें म्हणण्यांत येऊं लागलें. ब्रह्मक्षत्रिय म्हणजे ज्यांना ब्रह्माची प्राप्ति झाली होती असे किंवा ज्यांचा आपला वैदिक ऋषींबरोबरचा संबंध कायम राहिला होता असे क्षत्रिय असा करतां येईल.

याच रीतीनें एका शिलालेखांत परमारांना ब्रह्मक्षत्रकुलीन असें विशेषण लाविलें आहे. आमच्या मतें याचा अर्थ असा कीं ज्या क्षत्रिय कुलांत मंत्रकृत् पूर्वज होऊन गेले अशा घराण्यांपैकीं हें एक घराणें होतें. परमार हे वासिष्ट असून ते वसिष्ठापासूनच उत्पन्न झाले आहेत असा समज आहे. आणि म्हणून ते ब्रह्मोपेतक्षत्रेण कुलीनाः आहेत. ब्रह्मक्षत्र म्हणजे आदौ ब्राह्मणः पश्चात् क्षत्रियः असा अर्थ असावा असें पुष्कळदां सुचविण्यांत येतें; आणि हा अर्थही मान्य करावयाला हरकत नाहीं. कारण गोत्र व प्रवर असलेलीं क्षत्रिय घराणीं ब्राह्मणांपासून, मग प्रत्यक्षतः असोत वा समावेश करून घेतल्यामुळें असोत, उत्पन्न झालीं आहेत अशीच खरोखर समजूत होती. हा समावेश वेदकालांतही झाला असेल. याप्रमाणें गोत्रें व प्रवर या विषयांसंबंधीच्या सूत्रांचा सूक्ष्म विचार केला असतां असा सिद्धांत निघतो कीं, ब्राह्मण व क्षत्रिय यांचीं गोत्रें व प्रवर हीं एकच आहेत आणि प्रवर ऋषींत सुप्रसिद्ध अशा पुष्कळ क्षत्रिय राजांचीहि नांवें आहेत. अर्थात् महाभारतांत स्पष्ट म्हटल्याप्रमाणें एक काळ असा होता कीं, जेव्हां वर्णभेद हे आजच्या सारखे अनुल्लंघनीय झाले नव्हते; तेव्हां वस्तुतः भारती आर्य असा एकच वर्ण होता.

---

# टिप्पणी–३६ राजकुलें अथवा रजपुत घराणीं.

आपल्यांत एकमेकांत शरीसंबंध करण्यासारखीं सर्व मिळून ३६ कुले अथवा घराणीं आहेत अशी रजपुतांत पुष्कळ वर्षांपासून समजूत आहे हें निर्विवाद आहे. ही या ३६ घराण्यांची यादी हिंदु मध्ययुगाच्या दुसऱ्या उपविभागाच्या शेवटीं किंवा तिसऱ्याच्या सुरुवातीस अस्तित्वांत आली असावी; कारण पहिल्या उपविभागांत उच्चवर्णीय आर्यांतील जातींत एकामेकांचा रिघाव व्हावयाला वाव होता हें आपणांस माहीत आहे. या ३६ घराण्यांची नांववार यादी चंदाच्या पूर्वीं कोठें सांपडत नाहीं. तरी पण कल्हणानें इ. स. नं. ११४८ सालीं लिहिलेल्या राजतरंगिणींत ३६ या संख्येचा उल्लेख केला आहे. (भाग ७ श्लोक १६०७ यांत असें म्हटलें आहे कीं, ३६ कुलांत उत्पन्न झालेल्या रजपुतांना स्वतःबद्दलचा इतका अभिमान होता कीं खुद्द सूर्यालाही त्यांनीं आपल्यापेक्षां अधिक उच्च म्हणून मानलें नसतें) प्रख्यापयन्तः संभूतिं षट्त्रिंशत्कुलेषु ये । तेजास्विनो भास्वतोपि सहन्ते नोच्चकैः स्थितिम् । तेष्यन्तेऽनन्तपालाद्या राजपुत्रास्तमत्यजन् ऽ ॥ चंदानें दिलेली यादी पृथ्विराजाच्या काळांतील असावी; ती मागून घुसडली असणें शक्य दिसत नाहीं हें या प्रकरणांत आम्ही सिद्ध करणार आहों. टाडने पांच याद्या दिल्या असून त्यांपैकीं एक रासेच्या पूर्वीची आहे असें त्यानें म्हटलें आहे, परंतु ही पहिली यादी किती जुनी आहे हें त्यानें सांगितले नाहीं. ती मारवाडांतील नाडोल नावाच्या प्राचीन नगरांत एका जतीजवळ सांपडली परंतु त्यांत 'झाला' सारख्या पुढील काळच्या नांवाचा उल्लेख सांपडत असल्याकारणानें आपल्या दृष्टींत आहेत त्यांत रासांतील यादीच खरोखर सर्वांत जुनी आहे. तिसरी यादी चंदाच्याच कालच्या कुमारपालचरित्रांतील आहे, परंतु तींतील नांवाची संख्या ३६ नाहीं. थोडक्यांत असें दिसते कीं ३६ ही संख्या पहिल्या प्रथम चंदानेंच दिली; आणि ग्रीक लोकांना जसें ईलियड त्याप्रमाणेंच रासा ही रजपुतांना आवडती झाली असल्यामुळे ३६ ही संख्या परंपरेनें रजपूत घराण्याच्या कोणत्याही उल्लेखांत येऊं लागली.

परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं, रासेंतील येथील दोह्यांचा अर्थ लावतांना फार घोटाळा झाला आहे. रासेच्या शेवटच्या आवृत्तीच्या संपादकांसही त्यांचा नीट अर्थ कळला नाहीं अशी आमची समजूत आहे. चौकस बुद्धीच्या वाचकासाठीं आम्ही प्रथम त्या कविता देऊन नंतर आमच्या मतें जो त्यांचा अर्थ आहे तो सांगणार आहों. रासेंतील कविता खालील प्रमाणें आहेत.

रवि सशि जादव बंस । ककुत्स्थ परमार सदावर ॥ चाहुवान चालुक । छंद सिलार अभीयर ॥ दोयमत्त (दोयमत) मकवान । गरुअ गोहिल गोहिलपुत ॥ चापोत्कट परिहार । रावराठोर रोसजुत ॥ देवरा टांक सैंधव अनिग (अनंग) । यौतिक प्रतिहार दधिषट ॥ कारट्टपाल कोटपाल हुल । हरितट गोर कला (मा) ष मट ॥ धन्य( धान्य )पालक निकुंभवर । राजपाल कविनीस ॥ कालच्छुरकै आदिदे । बरने बंस छतीस ॥

(भाग १ पा. ५४)

वर जे कंसांत थोडे निराळे पाठ दिले आहेत ते आम्ही स्वतः उदेपूर म्युझियम लायब्ररींत ( पदार्थ संग्रहांतील वाचनालयांत ) असलेल्या रासेच्या प्रतींतून उतरून घेतले आहेत. प्रायः सर्व लोक यांचा अर्थ लावितांना रवि, शशी आणि यादव यांची या ३६ त गणना करितात. टॉडनें आणि आपल्या नव्या आवृत्तींत मोहनलाल पांड्या यांनींहीं हीच चूक केली आहे. परंतु असें केलें असतां ही संख्या ३६ पेक्षां अधिक भरते असें दिसून येईल. आपण ही यादी खालच्या टोकापासून घेतली असतां १ रवि २ शशि व ३ यादव यांचा तींत समावेश करितां यावयाचा नाहीं हें आपल्या चटकन ध्यानांत येईल. हीं नांवें अशीं आहेत.

१ कालच्छुरक ( कलचूरी हैहय )

२ कविनीस

३ राजपाल

४ निकुंभवर

५ धान्य--पालक ( टॉडनें गाळलेलें; मोहनलालनें गाणिलेलें )

६ मट ( टॉडनें गाळलेलें )

७ कमाष ( कलाष )
८ गौर
९ हरितट ( टॉडनें गाळलेलें )
१० हुल (मोहनलालनें चुकीनें हूण असें लावलेलें )
११ कोटपाल
१२ कारट्टपाल
१३ दधिष्टट् ( टॉडनें दिदिओट असें दिलें आहे
१४ प्रतिहार
१५ यौतिक ( टॉड—पाट )
१६ आनिग ( टॉड--अनंग )
१७ सैंधव
१८ टांक
१९ देवरा
२० रोसजुत ( टॉड व मोहनलाल या दोघांनीं गाळलेलें. )
२१ राठोड
————राव ( ? )
२२ परिहार
२३ चापोत्कट
२४ गुहिलोत [ गोहिलपुत्र ] ( टॉडनें गोहिल असें दिलें आहे )
२५ गोहिल
२६ गरुअ ( टॉड व मोहनलाल दोघांनींहि गाळलेलें )
२७ मकवान
२८ दोयमत
२९ अभीयर
३० सिलार
३१ छंद
३२ चालुक
३३ चाहुवान

३४ सदावर
३५ परमार
३६ काकुत्स्थ

वरींचशीं नावें वगळून व रवि, शशि व जाधव यांचा चुकीनें समावेश करूनहि टॉडनें फक्त ३० चीच नांवनिशी दिली असल्याकारणानें त्याच्या चुकांचा विचार करीत बसण्याची जरूरी नाहीं. मोहनलाल हे या तीन नावांचा या ३६ तच समावेश करितांना कसे चुकले आहेत तें मात्र पाहूं. प्रथम त्यांनीं टॉडनेंहि गाळलेली ( २ ) कवर्नास, व ( २० ) रोजसुत आणि (२६) गरुअ हीं गाळलीं आहेत. रोसजु हें राठोडांचें उपपद आहे असा तर्क करणें शक्य नाहीं. राठोडाच्या पूर्वीं राव हें एक उपपद असून तेच स्वतः स्वतंत्र नांव म्हणून मानण्यास हरकत नाहीं. गरुअ असें गोहिलांचें विशेषण होऊं शकणार नाहीं. गुहिलोत हे जरी प्रसिद्ध असले तरी गोहिल नाहींत. ( भावनगरचे गोहिल निराळे आहेत ) अशा रीतीनें मोहनलाल यांस रवि, शशि व जाधव यांचा समावेश करण्याची बुद्धि आली.

परंतु हीं तीन नावें या ३६ कुलांत धरलीं जाऊं नयेत याचें अत्यंत खात्री पटवणारें प्रमाण हें आहे कीं, हीं बाकीचीं नांवें जशीं निरनिराळीं घराणीं दाखविणारीं आहेत तशीं हीं तीन नाहींत. या घराण्यांच्या नांवाचें विशेष महत्व हें आहे कीं, विवाहसबंधांत ब्राह्मणांस जसा गोत्रांचा उपयोग होतो तसाच वस्तुतः रजपूतांस त्यांच्या कुलांच्या नांवांचा होतो. या ३६ घराण्यांत आपआपसांत शरीरसंबंध होऊं शकत नाहीं. चालुक्याचें चालुक्याशीं किंवा चोहानाचें चोहानाशीं लग्न होत नाहीं. रवि शशि व यादव, विशेषतः पहिलीं दोन या अर्थीं कुलनामें नाहींत. तीं मानव वंशांचीं नांवें आहेत; आणि त्यांच्या पोटांत या ३६ घराण्यांचा अंतर्भाव झाला आहे. सूर्यवंश, चंद्रवंश आणि यदुवंश हे पुराणांनीं सांगितलेले प्रसिद्ध वंश आहेत; तीं लग्नसंबधाच्या दृष्टीनें विचार करण्याचीं घराणीं नाहींत. एका सूर्यवंशी माणसाचा दुसऱ्या सूर्यवंशी माणसाबरोबर विवाहसबंध होण्यास कोणतीच हरकत नाहीं. वास्तविक उदेपुरचे गुहिलोत आणि जयपुरचे कच्छवाह हे दोघेही सूर्यवंशी, परंतु त्यांच्यांत विवाह

होतो. सूर्यवंशांत किंवा चंद्रवंशांत आंतल्याआंत शरीरसंबंध करण्याला प्रत्यवाय होता असें पुराणांतही आढळत नाहीं. राम आणि सीता हीं उभयताहि सूर्यवंशीं होतीं; त्याचप्रमाणें अर्जुन व द्रौपदी हीं दोन्ही चंद्रवंशी होतीं. पुराणकाळीं क्षत्रियांना कुलनामें ( आडनावें ) नसून ते फक्त गोत्रें पहात असत; तेव्हां राम वशिष्ट गोत्राचा व सीता गौतम गोत्राची असल्यामुळें त्यांचा विवाह होऊं शकला. कोणांकोणांत विवाहसंबंध होणार नाहीं हें ठरविण्यासाठीं अर्वाचीन कालांत क्षत्रियांनीं कुलपद्धतीचा स्वीकार केला आहे. आणि आम्ही पूर्वीच दाखवून दिल्याप्रमाणें स्मृतींच्या गोत्रशास्त्राची जागा त्यानें व्यवहारांत भरून काढली आहे. तेव्हां रवि, शशि आणि जाधव हीं बाकीच्याप्रमाणें कशीं कुलदर्शक नांवें नाहींत हे स्पष्ट दिसेल. चंदानें त्यांचा उल्लेख केला तो ज्यांत पुढें दिलेल्या ३६ घराण्यांचा समावेश करण्यांत येतो त्या तीन वंशांचा नामनिर्देश करावा येवढ्यासाठींच. या तीन नावांपुढेंच फक्त वापरलेला वंश शब्द अत्यंत महत्वाचा असून शेवटीं वापरलेल्या (बरने बंस छतीस) शब्दाहून त्याचा अर्थ वेगळा आहे.

येथें असा प्रश्न उपस्थित होणें शक्य आहे कीं, यदुवंश हा चंद्रवंशांत मोडत असतां त्याचा मग स्वतंत्र असा उल्लेख कां ? उत्तर—यादव इतर चंद्रवंशियांपासून नेहमींच स्वतंत्र गणले जात असत. ऋग्वेदांत देखील यदुतुर्वशांचा स्वतंत्र उल्लेख आढळतो. हे तुर्वश कालांतरानें लुप्त झाले. यदूनें दिलेल्या शापामुळें यादवांना राज्यपदाचा अधिकार नसल्यामुळें पुराणांतही यादवांचा उल्लेख स्वतंत्रपणें केला आहे व त्यांची गोपालनवृत्ति त्याही काळीं सुटलीं नसल्याकारणानें त्यांचा असा स्वतंत्र उल्लेख करण्यांत आला असावा. तेव्हां यदुवंशाचा चंद्रवंशींहून स्वतंत्र असा उल्लेख असल्यास त्यांत वावगें असें कांहींच नाहीं. त्यांतील हि भाटी, जाडेजा इत्यादि घराण्यांत परस्परांत लग्नसंबंध होऊं शकतात हें दाखविण्यांत आलेंच आहे. तेव्हां जाधव हें ३६ घराण्यांप्रमाणें एखाद्या घराण्याचें नांव नाहीं हें उघड आहे.

यावरून रवि, शशि, आणि यादव यांचा या छत्तीस घराण्यांची गणना करितांना त्यांत समावेश करावयाचा नाहीं; आणि मग अशा रीतीनें ३६

हीं संख्या पुरी करावयाची तर वर दाखविल्याप्रमाणें गरुअ, रोसजुत व कविनीस ही स्वतंत्र घराणीं मानल्याखेरीज गत्यंतर नाहीं हें उघड दिसेल. वंशभास्करचा कर्ता सुरजमल यानें रवि व शशि हे वंश म्हणून धरले आहेत घराणीं नाहींत यावरून तरी हीच गोष्ट सिद्ध होते. त्यानें तिहींच्या ऐवजीं पांच वंश सांगितले आहेत. पूर्वींचे चार–भुजभव, मनुभव, अर्कभव, शशिभव आणि पांचवा शुचिभव (अग्नीपासून झालेला). भुजभव म्हणजे ब्रह्मयानें आपल्या भुजांपासून निर्माण केलेले; मनुभव म्हणजे मनूपासून उत्पन्न झालेले; अर्क किंवा सूर्य आणि शशी हे बाकीचे राहिलेले दोन. आम्ही सुरजमल्लाची याबद्दलची कविता मागेंच उद्धृत केली आहे, आणि आमचें असें मत आहे कीं, चंदानें रवि शशी आणि जाधव हे वंश मानले आहेत, त्यानें जीं ३६ घराणीं सांगितलीं आहेत त्याप्रमाणें घराणीं मानलेलीं नाहींत असें आमचें मत आहे.

पृथ्विराज रासेंत सोळाव्या शतकांत नवीन कविता घुसडण्यांत आल्या असें अनुमान होऊं शकतें परंतु या ३६ घराण्यांच्या यादीचा काळ सोळाव्या शतकांत असणें शक्य नाहीं; ती पृथ्विराजाच्या दरबारांतील चंदभाटाच्या वेळची असली पाहिजे. सोळाव्या शतकांत अस्तित्वांत न राहिलेल्या अशा बऱ्याच घराण्यांची नांवें या यादींत सांपडतात. टॉडला हि या नांवाची घराणीं हुडकून काढणें दुर्घट झालें. तसेंच सोळाव्या शतकांत सुप्रसिद्ध असलेल्या कित्येक नवीन घराण्यांची तींत नांवेंही सांपडत नाहींत. रोसजुत, अनिग, यौतिक, दधिषट्, करट्टपाल, कोटपाल, हरितट, कमाप, मट, धान्यपाळ राजपाल, आणि कविनीस यांचा शोध लावणें कठीण आहे; आणि भट्टी, झाला, वैश्य इत्यादि अर्वाचीन घराण्यांचा तींत मागमूस नाहीं. तिसरें कांहीं नांवें अशी आहेत कीं त्यांच्या निश्चिततेबद्दल शंका उरली नसली तरी तीं दुर्बोध झालीं आहेत. ककुत्स्थ म्हणजे कच्छवाह आणि सदावर म्हणजे तुअर असें मोहनलाल पांड्या यांनीं ठरविलें आहे तें बरोबर आहे; परंतु हीं नांवें व्यवहारांत कधीं वापरलीं जात होती कीं काय याबद्दल मात्र संशय आहे. यावरून असें वाटतें कीं रासेंत दिलेली ही यादी फार जुनी म्हणजे १२ व्या शतकांतील असली पाहिजे.

मोहनलाल यांनीं आपल्या रासेच्या आवृत्तींत प्रत्येक घराण्याच्या निश्चिततेची उपपत्ति दिली आहे त्याच्या युक्ततेचा विचार येथें करावयास हरकत नाहीं. त्यांच्यामतें छंद म्हणजे रांदेल होय. परंतु छंद या नांवानें चंदेल या घराण्याचा उल्लेख होतो असें आम्हांस वाटतें. रासांत चंद शब्द धरील अर्थी काही ठिकाणीं आला आहे. दोयमत आणि दाहिम हीं एकच कीं काय याबद्दल शंका आहे. अनंग म्हणून दाखविलेलें अनिगही कोठें उल्लेखिलेलें सांपडत नाहींत. परिहार आणि प्रतिहार या दोघांचाही या यादींत उल्लेख आहे तेव्हां तीं निरनिराळीं असलीं पाहिजेत. आतां या दोहोंपैकीं मांडोरच्या लेखांतील परिहार कोणते हा प्रश्न आहे. परंतु ते प्रतिहारच असावे, त्याशिवाय त्यांत यावयाचा नाहीं. कारट्टपाल म्हणजे काठी (काठेवाडी) नव्हेत. कारण काठीचा छत्तीस घराण्यांत समावेश केलेला नाहीं. कोटपाल म्हणजे कोण हे सांगितलेलें नाहीं. मट हे जाट असणें शक्य नाहीं, कारण जाट हे रजपूत आहेत हेंच मुळीं इतर रजपूत घराण्यांस मान्य झालेलें नाहीं. शेवटीं धान्यपाल व राजपाल हीं कोणतीं घराणीं हें ठरविण्यांत आलें नाहीं. मोहनलाल यांनीं वगळलेले गरुअ हे गुजर असावेत असें आमचें मत आहे. गुजराचें प्राकृत गुअर असे होईल, व नंतर अक्षरव्यत्यासानें म्हणजे अक्षर मागें पुढें करण्यानें गरुअ असा शब्द तयार झाला असावा. बीर गुजर हें एक सुप्रसिद्ध रजपूत घराणें आहे. गुजर आणि आभीर अथवा अहीर हीं शूद्रांचीं व वैश्यांचीं नांवें आहेत हें खरें. परंतु तीं नांवें त्यांच्यावर राज्य करीत असलेल्या राजघराण्यांना पडलीं तीं घराणीं वैश्य अथवा शूद्र नसून क्षत्रिय होतीं.

ही टिप्पणी संपविण्या पूर्वीं, कांहीं असलें तरी, हुणांचा या ३६ राजघराण्यांत समावेश करण्यांत आला होता आणि अशा तऱ्हेनें परकीय वंशांचा क्षत्रियांत समावेश करण्यांत येत असे या नांवावरून सिद्ध होतें असें जें कित्येकांनीं प्रतिपादिलें आहे त्याचा विचार करणें जरूर आहे. या बाबतींत आम्हांस हें सांगावयाचें आहे कीं रासेच्या यादींतील छत्तीस घराण्यांत हूणांचा निर्देष नाहीं. तींत दिलेलें नांव ज्यांत ऱ्हस्व उ आणि ल आहेत

असें हुल आहे, हूण नाहीं. प्राकृत किंवा दुसऱ्या कोणत्याही भाषेच्या अपभ्रंशांच्या नियमानें हूणाचें हुल होऊं शकणार नाहीं. क्षत्रिय राजांशीं हूण राजकन्यांच्या विवाहाचा उल्लेख लेखांतून आढळतो, त्याचप्रमाणें त्या काळच्या लेखांतून हूण राज्यांचा उल्लेख आला आहे ही गोष्ट खरी. परंतु यावरून हूण राजांना क्षत्रिय समजण्यांत येत असे हें सिद्ध होत नाहीं. त्या काळीं किंवा आजकालही राजे लोक वैश्य, शूद्र किंवा म्लेंच्छही घराण्यांतील स्त्रियांशीं लग्नें करितात परंतु यावरून त्यापैकीं कोणाला क्षत्रिय लेखण्यांत येतें असें सिद्ध होत नाहीं. उदाहरणार्थ प्रस्तुत काळांतही कांहीं क्षत्रिय राजांनीं हूण अथवा इंग्रज, फ्रेंच किंवा स्पॅनिश घराण्यांतील स्त्रियांशीं विवाह केले आहेत. परंतु हे लोक किंवा ह्या स्त्रिया अथवा त्यांची संतति हीं क्षत्रिय समजलीं जात नाहींत. मुसलमानांच्या अमदानींत रजपूत राजकन्या मोगल अथवा इतर मुसलमान बादशहांस अथवा राजांस देण्यांत आल्या आहेत. परंतु यासंबंधांवरून मोगल किंवा मुसलमान यांस क्षत्रिय मानण्यांत येत असे असा सिद्धांत प्रस्थापित करितां येणार नाहीं. तेव्हां या विवाहसंबंधावरून हूण हे क्षत्रिय होतें असें अनुमान काढणें शक्य नाहीं.

मग या ३६ घराण्यांत निर्दिष्ट केलेले हुल हे कोण? या प्रश्नाचें उत्तर देण्याची जबाबदारी आमच्यावर नाहीं; कारण चंदाच्या या यादींत ओळखतां न येणारीं अशीं पुष्कळ नांवें आहेत. तथापि मारवाडच्या खानेसुमारीच्या हिंदी अहवालांत शिसोदे रजपुतांच्या शाखेंत हुल हें नांव आढळतें. यावरून मारवाडांत हुल हें नांव पूर्वीं प्रचारांत होतें व अजूनही आहे इतकें तरी सिद्ध होतें. ( १८९१ व १८९५ चा हिंदी अहवाल भाग २ पान ६ ). गुहिलोतांच्या एका शाखेचें म्हणून हें नांव दिलें आहे. परंतु फार करून ते स्वतंत्र असेंही घराणें असावें. कांहीं कां असेना चंदानें दिलेलें नांव हुल असें आहे, पण हूण नाहीं; आणि हें आम्ही उदेपुर लायब्ररींत रासेच्या प्रतींत तपासून पाहिलें आहे. ते हूणांपासून वेगळे आहेत हें बाप्पारावळा किंवा खोम्माळणयांच्या मुसलमानाबरोबर झालेल्या लढायांत ज्या घराण्यांनीं साहाय्य केलें त्यांत हूण व हुल या दोहोंचाही उल्लेख आहे यामुळें अधिक स्पष्ट तऱ्हेनें हेंच सिद्ध होतें.

( टॉडचें राजस्थान, क्रुकची आवृत्ति भा १ पा. ९० ). मेवाडच्या गुहिलोतांना वारंवार साहाय्य करण्यास जमलेल्या दळांच्या या याद्या पुढल्या काळांतल्या असल्या तरी रजपुतांतील हुल घराणें हूणांपासून वेगळें मानलें जात होतें येवढें तरी त्यांवरून निश्चित होतें.

---

## टिप्पणी—रजपूत शब्दाचा अर्थ.

आपण वैदिक आर्यवंशांत उत्पन्न झालेले अभिजात क्षत्रिय आहोंत असा रजपुतांस अभिमान आहे. आर्य--बौद्ध काळामध्यें पुष्कळशा क्षत्रियांनीं आर्यधर्म आणि आचार सोडून देऊन बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळें दुर्दैवानें हिंदू लेखकांनीं हि कांहींसें दुराग्रहानें व कांहींसें अज्ञानानें रजपूत हे अस्सल क्षत्रिय नाहींत असें मत प्रदर्शित करण्यास कमी केलें नाहीं. इतकेंच नाहीं तर कलियुगांत क्षत्रिय व वैश्य (कारण क्षत्रियांपेक्षां वैश्यांत अधिक बौद्ध झाले होते ) यांचा अंत होऊन ब्राम्हण व शूद्र हे दोनच वर्ण शिल्लक राहतील असें वचन पुराणांत घुसडण्यास ही त्यांनीं मागें पाहिलें नाहीं. पाश्चात्य पंडितांचें या बाबतींतील विरुद्ध मत खोडून टाकण्याचा प्रयत्न केल्यावर हिंदूंच्या धार्मिक पुस्तकांत आलेल्या या विधानांस काय किंमत द्यावी आणि रजपूत या शब्दाचा खरा अर्थ काय या प्रश्नांचाही विचार केला पाहिजे.

पुराणांतील हीं विधानें कवडीमोल आहेत याबद्दल बिलकुल संशय नाहीं; आणि ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें असतां तीं पुराणांत मागाहून घुसडलेलीं आहेत असें दिसून येईल. हा प्रक्षिप्त भाग क्षत्रियांविषयीं मत्सरानें लिहिलेला नसून केवळ दुराग्रह अर्थात् बौद्धधर्माविषयींचें वैर यामुळें उत्पन्न झाला आहे. रजपूत हा शब्द नवा नाहीं असें दाखविणारे जुने उल्लेख

आहेत; अर्थात् तो नवव्या शतकांत पहिल्यानेंच उपयोगांत आणलेला नसून तो जुना, फार प्राचीन काळापासून चालत आलेला असून तो नेहमीं चांगल्या अर्थी वापरला आहे असें सिद्ध करणें कठीण नाहीं. शब्दांना कधीं कधीं दोन अर्थ होऊं शकतात, एक चांगला आणि एक वाईट. परंतु वाईट अर्थ हा बहुधा मागाहून उत्पन्न झालेला असतो हें विसरतां कामा नये. याचीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील; पण ब्राम्हण हाच शब्द येथें पुरेसा आहे. सुरुवातीला तो ब्रम्ह किंवा वेद यांचें परिपालन करण्याचें काम ज्यांच्याकडे सोंपविलें होतें अशा उच्च वर्णाचा निदर्शक असला तरी कालांतरानें पाणी भरण्याचें किंबहुना स्वयंपाक करण्याचें काम या जातीकडे आल्यामुळें तो शब्द अलीकडे पुष्कळदा पाणक्या किंवा आचारी या अर्थाने वापरला जातो हें कबूल केलें जाईल. एका हिंदी म्हणींत हे अर्थ ग्रथित केले आहेत. " ब्राम्हण बबरची, भिस्ती, भिकारी किंवा भांड. " अशाच तऱ्हेनें कित्येक वेळीं रजपूत हा शब्द क्षत्रियांच्या अनौरस संततीला किंवा हलक्या जातीच्या आयांच्या पोटीं जन्मास आलेल्या राजाच्या मुलास लाविला जातो. परंतु तो कांहीं त्याचा मूळ किंवा सर्व सामान्य अर्थ नव्हे हें पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

अलशार येथें आम्हांस सांगण्यांत आलें कीं पराशर स्मृतींत सांगितल्याप्रमाणें ( वैश्यादंबष्ठकन्यायां राजपुत्रः प्रजायते ) रजपुत म्हणजे अशा असवर्ण विवाहापासून उत्पन्न झालेली संतति होय. पण ही कित्येक लोकांच्या तोंडीं आढळून येणारी ओळ पराशर स्मृतींत मुळींच नाहीं असें सुरुवातीलाच सांगण्यास हरकत नाहीं. त्या स्मृतीच्या एकाद्या प्रतींत जर ती आढळत असेल तर ती निव्वळ प्रक्षिप्त आहे. पराशर स्मृतींत पराशराचें म्हणून मानलेल्या या वचनाविरुद्ध पुरावा आहे. शूद्रकमलाकराच्या कर्त्याच्या मताप्रमाणें उग्र म्हणजे "ज्यांना सगळीकडे रजपूत म्हणून म्हणत ते." उग्र म्हणजे क्षत्रियाला शूद्रेपासून झालेला मुलगा, स्पष्ट रीतीनें या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, " अयं च रजपूत इतिभाषायां प्रसिद्धः " उग्राला व्यवहारांत रजपुत म्हणतात. " हें ही मत चुकीचेंच आहे; परंतु त्यावरून

वर सांगितलेलें पराशर स्मृतींतील वचन प्रक्षिप्त आहे असें निर्विवाद सिद्ध होतें. *

बोलण्यांत रजपुत हा शब्द कांहीं वेळा राजांच्या किंवा सरदारांच्या अनौरस मुलांचा निर्देश करण्यासाठीं वापरला जातो ही गोष्ट हिंदी भाषा बोलणाऱ्या प्रांतात खरी आहे. परंतु हा त्याचा सामान्य अर्थ नव्हे, हें तो शब्द महाभारतकाळींही चांगल्या अर्थीं वापरीत असत यावरून सिद्ध करितां येईल. त्या महाकाव्यांत तो शब्द साधारणपणें क्षत्रिय वाचक आहे; † तरी कित्येकदां तो साध्या क्षत्रियासाठीं वापरलेला नसून प्रत्यक्ष राजकुलांतील क्षत्रियांसाठीं वापरलेला आढळतो. अमरकोशांत क्षत्रियाला राजपुत्र हा प्रतिशब्द दिलेला नाहीं या मुद्यावर एखादे वेळीं जोर दिलेला आढळतो. अमरकोशांत तो दिलेला नाहीं हें खरें; परंतु अमरकोश हा कांहीं सर्वच शब्दांचा संग्रह करणारा कोश नाहीं. आणि शिवाय एखाद्या कोशांत एखादा शब्द दिलेला नसला तर तो शब्द अस्तित्वांतच नाहीं किंवा विशिष्ट अर्थीं वापरला जात नाहीं असें सिद्ध होत नाहीं. मृत भाषांतील शब्दांचे अर्थ वाङ्मयांत त्यांच्या केलेल्या उपयोगावरून ठरवावयाचे असतात; आणि महाभारतांत शेंकडों ठिकाणीं रजपूत हा शब्द क्षत्रियार्थीं वापरलेला आहे. महाभारतांतील या अर्थीं तो शब्द वापरल्याचे एकच उदाहरण येथें देणें पुरेसें आहे. महाभारतांत तो या अर्थीं अथवा अधिक उच्च अर्थानें वापरला आहे असें दाखविण्यास आणखी कांहीं श्लोक उध्दृत करितां येतील. परंतु पुष्कळशीं उदाहरणें दाखवीत बसण्याची आवश्यकता नाहीं. खालीं टिपेंत दिलेल्या शांतिपर्वांत ६४ व्या अध्यायांतील श्लोकावरून रजपूत हा शब्द अनेक वेळा निव्वळ क्षत्रिय या अर्थीं वापरलेला आहे

---

* पराशर स्मृति ही कलियुगासाठीं म्हणून रचली आहे. आणि कलियुगांत क्षत्रिय नाहींतच असें सांगण्याचा जर तिचा उद्देश असता तर तींत क्षत्रियांकरितां म्हणुन स्वतंत्र नियम सांगितले आहेत ते सांगितले नसते—

† एते रुक्मरथा नाम राजपुत्रा महारथाः। रथेष्वस्त्रेपु निपुणा नागेपु च परांपते ॥ २० ॥ द्रोणपर्व अ० ११२

असें दिसेल* रजपूत हा शब्द अनेकदां उच्चतर अर्थीं ही वापरलेला आहे. किंबहुना, विराट पर्वांत द्रौपदीला संबोधितांना राजपुत्री हा शब्दहि पुष्कळदां उपयोगांत आणलेला असून येथें राजाची कन्या हा अर्थ अभिप्रेत नसून अभिजात क्षत्रिया येवढाच त्याचा अर्थ आहे. ७ व्या शतकांतील भवभूतींनेंहि कौसल्येच्या बाबतींत हा शब्द याच अर्थीं—राजकन्या म्हणून नव्हे, तर केवळ कुलीन क्षत्रिया म्हणून वापरला आहे हें ध्यानांत धरण्याजोगें आहे. त्याचप्रमाणें बाणानें हर्षचरितांत रजपूत हा शब्द क्षत्रिय सैनिकाचा निर्देश करण्यासाठीं वापरिला आहे.

पाणिनीनें राजपुत्र हा शब्द राजन्य शब्दाहून निराळा अर्थ दाखविण्यासाठीं उपयोजिला आहे असा आक्षेप येणें शक्य आहे. पाणिनीचें हें सूत्र महत्वाचें असून राजपुत्र हा शब्द पाणिनीच्या काळांत प्रचारांत होता हें त्यावरून सिद्ध होतें. तो शब्द त्या सूत्रांत व्युत्पत्त्यर्थीं किंवा मूळार्थीं वापरलेला नाहीं. तो विशिष्ट अर्थीं रूढ झालेला आहे असें दिसतें तें सूत्र असें, "गोत्रोक्षोष्ट्रोरभ्रराजराजन्यराजपुत्रवत्समनुष्याजाद्वुञ्.", (४-२-४१) हें सूत्र तस्य समूहः (४-२-३७) या सूत्रानंतर आलें असून त्याचा अर्थ असा आहे कीं, जेव्हां समूह व्यक्त करावयाचा असेल तेव्हां सूत्रांतील शब्दांस वुञ् किंवा क प्रत्यय लावावा. जसें राजक म्हणजे राजमंडळ किंवा राजांचा समूह, राजन्यक म्हणजे राजन्यांचा किंवा क्षत्रियांचा समूह आणि राजपुत्रक म्हणजे रजपुतांचा समूह. येथें राजन्य आणि राजपुत्र हे वेगवेगळ्या अर्थींच वापरले असले पाहिजेत असें नाहीं; कारण पाणिनीचा संबंध नुसत्या शब्दांशीं; त्यांच्या अर्थांशीं त्याला कांहीं एक कर्तव्य नाहीं. तथापि, हा मुद्दा सोडून देऊं. प्रकृत स्थळीं राजपुत्र हा शब्द राजाचा पुत्र या मूळार्थीं वापरलेला नाहीं हें उघड आहे, कारण 'राजांच्या पुत्रांचा समूह' याला कांहीं अर्थ नाहीं. कदाचित् "राजाचे सर्व राजपुत्र" असा त्याचा अर्थ होऊं शकेल; आणि मग अनेक राज-

---

(२) भैक्ष्यचर्या ततः प्राहुतस्य (शूद्रस्य) सद्धर्मचारिणः ।
तथा वैश्यस्य राजेन्द्र राजपुत्रस्य चैव हि

पुत्रांचा अथवा वेगवेगळ्या राजांचा समूह असा शब्दप्रयोग करणें शक्य आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे राजपुत्र हा शब्द फक्त मूलार्थी किंवा वाईट अर्थींच वापरला जातो असें या सूत्रावरून दिसत नाहीं. उलट असेंही म्हणावयास हरकत नाहीं कीं, वर सांगितल्याप्रमाणें राजपुत्र हा शब्द राजन्य किंवा कोणी तरी क्षत्रिय या अर्थापेक्षां अधिक उच्च अशा, म्हणजे अभिजात क्षत्रिय; नुसता राजाच्या वर्णाचा किंवा जातीचा माणूसच नव्हे तर प्रत्यक्ष राजकुलांत उत्पन्न झालेला, अशा अर्थाचा निदर्शक आहे. महाभारतांत तो जसा राजन्य किंवा सामान्य क्षत्रियाचा प्रतिशब्द म्हणून उपयोगांत आणिला आहे तसाच अनेकदां याही उच्च अर्थानें योजिला आहे.

पाणिनीचें व्याकरण आणि महाभारत यांवरून येवढें तरी खास दिसतें कीं, हा शब्द पुरातन असून हजारों वर्षें प्रचारांत आहे; ( कांहीं लोक म्हणतात त्याचप्रमाणें तो कांहीं ९ व्या शतकांत पहिल्यानेंच उपयोगांत आला नाहीं. ) आणि याचा अर्थ अनौरस, किंवा संकरानें उत्पन्न झालेला पुत्र असा नाहीं. बाणाच्या हर्षचरितांतही तो क्षत्रिय ( कुलीन ) याच अर्थी वापरला आहे. तो शब्द नवीन नाहीं हें दाखविण्याला बाणानें त्याचा उपयोग केला आहे, हे चांगलें प्रमाण आहे. त्याला ९ व्या, १० व्या, किंवा ११ व्या शतकांच्या सुमारास इतकें महत्त्व कां आलें तें पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल. हिंदुस्थानांतून बौद्ध धर्माचें उच्चाटन झाल्यावर क्रमाक्रमानें जातिबंधनें दृढ होऊं लागलीं आणि प्रस्तुत इतिहासाच्या तिसऱ्या कालविभागांत जातीजातींचे परस्पर संबंध कायमचे तुटले, असें आमच्या तिसऱ्या भागांत दिसून येईल. आगाऊ येवढें सांगावयाला कांहीं हरकत नाहीं कीं प्रत्येक जातीनें आपलें क्षेत्र विशेषतः विवाहासाठीं शुद्ध आणि निर्भेळ अशा घराण्यापुरतेंच मर्यादित केलें. आमच्या पहिल्या भागांत हुएनसॅंगचे जे उतारे घेतले आहेत त्यावरून ७ व्या शतकांत क्षत्रिय वर्णाचीं राजघराणीं होतीं हें निर्विवाद आहे, परंतु शेंकडों क्षत्रिय बौद्ध धर्मांत गेले होते; आणि क्षत्रियांचे जे आर्यसंस्कार ते अगदीं विसरून गेले होते. अशा घराण्यांवर या काळीं कडक बहिष्कार घालण्यांत आला—

शिवाय दूरदूर प्रांतांत निरनिराळ्या घराण्यांची जात कितपत शुद्ध राहिली आहे हें ठरविणें कठीण होऊं लागलें आणि त्यामुळें नुसत्या क्षत्रियांतच नव्हे तर ब्राह्मण आणि वैश्यांतही लांबच्या प्रांतांत राहणाऱ्या घराण्यांच्या जातीच्या शुद्धतेचा प्रश्न राहूं नये म्हणून प्रांतभेदानें पोट जाती निर्माण करण्याची प्रवृत्ति वाढूं लागली. त्यामुळें ११ व्या शतकाच्या सुरुवातीला रजपूत हा शब्द जेवढ्या प्रदेशांत क्षत्रिय राजघराणीं प्रामुख्येंकरून एकवटलीं होतीं तेवढ्याच प्रदेशांत वापरण्यांत येऊं लागला. त्या काळच्या लोकांच्या आठवणींतील क्षत्रियराजांशीं ज्यांना आपला संबंध जोडतां आला आणि बौद्ध किंवा परकीय सत्तेनें परंपरा नाहींशी झाल्यामुळें भाटांनीं गाइलेल्या आख्यायिकांवरच अवलंबून न राहण्याची पाळी ज्यांच्यावर आली नाहीं त्यांनाच फक्त क्षत्रियत्वाचा मान लाभला. राजपुत्र या शब्दाला यामुळें विशेष महत्त्व आलें. या रीतीनें छत्तीस क्षत्रिय घराण्यांच्या नांवाची यादी प्रचारांत आली. आणि येवढ्याच घराण्यांमध्यें होणारे विवाहसंबंध योग्य असें ठरलें. हीं घराणीं मुख्यत्वेंकरून हल्लींचा राजपुताना आणि त्यालाच लगत असलेला हल्लींचा सेंट्रल इंडिया (मध्य हिंदुस्थान) या जोड प्रदेशांत आमच्या पहिल्या भागाला जोडलेल्या धर्मस्थितिनिर्देशक नकाशांत दाखविल्याप्रमाणें हुएनसँगच्या काळांतही हिंदुधर्माचें प्राबल्य होतें व बौद्ध धर्माचा फारसा शिरकाव झाला नव्हता, येवढ्या प्रदेशांत एकवटलेलीं होतीं याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. या प्रदेशाबाहेरील क्षत्रिय किंवा मराठे यांच्या क्षत्रियत्वाबद्दल लोकांना निर्विवाद खात्री वाटत नव्हती. अशा तऱ्हेनें मध्य हिंदुस्थानांतील क्षत्रिय व बंगाल आणि दक्षिण मधील क्षत्रिय यांचा एकमेकांशीं संबंध तुटत चालला. ज्या रजपुतांमुळें या मध्य प्रदेशाला त्याचें नांव राजपुताना हें नांव आतां पडलें त्यांची वंशावळ इ. स. नं. ७ व्या किंवा ८ व्या शतकांत राज्य करीत असलेल्या कोणत्या तरी प्रसिद्ध राजापर्यंत येऊन भिडवितां येते हें ध्यानांत धरण्याजोगें आहे. दिसावयास थोडें विचित्र दिसलें तरी हें खरें आहे कीं ९ व्या किंबहुना १२ व्याही शतकांतील एकाच मूळ पुरुषाचे आज हजारों वंशज आहेत. एवंच हिंदुस्थानांतील अन्य कोणत्याही जातींत

किंबहुना खुद्द ब्राह्मणांतही अथवा अखिल जगांतील कोणत्याही लोकांत पहावयास सांपडणार नाहीं अशा तऱ्हेनें रजपुतांनीं आपल्या वंशाची शुद्धता जतन केली आहे.

रजपुतांनीं जवळ जवळ हजार वर्षांच्या अमदानींत आपल्या वंशाची शुद्धता इतक्या पूर्णपणानें पाळली असतां कलियुगांत ब्राम्हण आणि शूद्र हे दोनच वर्ण आहेत ही कल्पना जिचा स्मृति वचनांच्या टीकाकारांवर अत्यंत अनिष्ट परिणाम झाला आहे ती कल्पना पुराणांत कां यावी हें एक गूढच आहे. तथापि पहिल्या भागाला जोडलेला निरनिराळ्या धर्मांची स्थिति दाखविणारा नकाशा पाहिला असतां ह्या गूढाचा उलगडा होईल. धर्मशास्त्रावरील हे टीकाकार आणि निबंधकार पूर्व आणि दक्षिण हिंदुस्थानांतील आहेत; आणि पूर्व, दक्षिण आणि उत्तर हिंदुस्थानांत बौद्ध धर्माचें प्राबल्य मध्य हिंदुस्थानांल्यापेक्षां फार मोठ्या प्रमाणावर होतें; यामुळें जातींना कायमचे व कठीण स्वरूप प्राप्त झाल्यावर दक्षिणेंतील क्षत्रिय म्हणजे मराठे, व त्याचप्रमाणें पूर्वेकडील व उत्तरेकडील क्षत्रिय यांचा मध्य हिंदुस्थानांतील क्षत्रियांबरोबर असलेला संबंध तुटून गेला. बंगाल व औधमधील क्षत्रियांचे बहुधा खस व उत्तरेकडील इतर मोंगोलिटान जातींत विवाहसंबंध घडले होते. आणि महाराष्ट्र व मद्रास कडील क्षत्रियांचे विवाहसंबंध द्रावडी जातींतील राजघराण्याशी झाले होते तेव्हां मध्य हिंदुस्थान व रजपुताना येथील क्षत्रियांनीं पूर्व व दक्षिणेकडील क्षत्रियांना आपल्यांतून वगळले. आज मितीलाही दक्षिण व पूर्वेकडील क्षत्रियांशी शरीर संबंध करण्यास ते नाखूष आहेत.

ब्राम्हण हे मोठ्या प्रमाणांत बौद्ध झाले नव्हते; तसेंच वेद आणि वैदिक संस्कार किंवा आचार हे ते विसरले नव्हते. परंतु क्षत्रिय आणि वैश्यांत हजारों लोक बौद्ध धर्मांत गेले होते आणि त्यांचा वैदिक धर्माशीं कांहीं एक संबंध उरला नव्हता. बौद्ध धर्माचा पाडाव झाल्यावर ते सर्व हिंदुधर्मांत परत आले, त्यावेळीं बहुतेक आपलीं गोत्रें विसरले होते; त्यांना गायत्री सुद्धां येत नसावी. यामुळें स्वाभाविकपणेंच त्यांना शूद्रांप्रमाणें लेखण्यांत आलें. त्यांनीं अजूनहि क्षत्रियांतले कांहीं आचार कायम राखले

होते आणि क्षत्रिय आणि वैश्य म्हणून आपलें वैशिष्ट्य कायम ठेवलें होतें. फार पुरातन काळीं प्रचारांत असलेले वैदिक यज्ञ करणाऱ्या पुलकेशी वगैरेंच्या वंशजांना दुराग्रही ब्राम्हणांनीं बौद्ध धर्माचा उच्छेद झाल्यानंतर हिंदुसमाजाची जी नवीन घडी बसविण्यांत आली तींत क्षत्रिय म्हणून मान्य केलें नाहीं. कालान्तरानें कलियुगांत ब्राम्हण आणि शूद्र हे दोनच वर्ण शिल्लक राहिले आहेत या कल्पनेला प्रारंभ झाला आणि हें मत पुराणांतील ' कलावाद्यन्तयोः स्थितिः ' । या वचनांत प्रगट झालें. हें केव्हां झालें हें नक्की सांगतां येणार नाहीं; परंतु हें वचन १० शतकानंतर आणि तेंही पूर्व किंवा दक्षिण हिंदुस्थानांत उत्पन्न झालें हें नाकबूलकरितां येणार नाहीं. इ. स. नं. १ ल्या शतकांत क्षत्रियांच्या अस्तित्वाबद्दल दक्षिणेंत शंका नव्हती हें ' खतिय दपमान दमनस ' म्हणजे ज्यानें क्षत्रियांचा दर्प जिरविला, या गौतमी पुत्राच्या नाशिकमधील एका लेण्यांतील लेखातील वचनावरून दिसून येतें ( इ. ॲ. पा ३७ ). हे क्षत्रिय म्हणजे "राजपुताना, गुजराथ व मध्य हिंदुस्थांतील राजे" असें प्रस्तुत लेखाबद्दल लिहितांना कानिंगह्यमनें म्हटलें आहे तें मात्र चुकीचें आहे. गौतमीपुत्रानें त्या भागांवर कधींच स्वारी केली नाहीं. या विशेषणाचा अर्थ असा आहे कीं गौतमीपुत्र शातकर्णी, जो शूद्र होता आणि ज्याचें वास्तव्य धनकप्कांत होतें, त्यानें खुद्द दक्षिणेंतीलच क्षत्रियांच्या गर्वाचे हरण केलें. त्याकाळीं दाक्षिणेंत राष्ट्रकूटादि क्षत्रिय होते आणि इ. स नं. १ ल्या शतकांत क्षत्रिय पाहावयास अर्वाचीन राजपुतान्यांत जाण्याची गरज नाहीं. कांचीचे पल्लव आणि बादामीचे चालुक्य हे क्षत्रिय होते असें हुएनसँगनेंच लिहिलें आहे असें नाहीं; त्यांच्या स्वतः च्या शिलालेखांत आणि ताम्रपटांतही त्यांनीं अश्वमेधादि वैदिक यज्ञ केल्याचे उल्लेख असून त्यांनीं आपल्याला क्षत्रिय म्हटलें आहे. उदाहरणार्थ मदुरा येथील देवालयाच्या भिंतीवर खोदलेल्या लेखांत ' श्रीक्षत्रचूडामणिः ' असें विशेषण आहे. तेव्हां इ. स. नं. ७ व्या शतकापर्यंत कलियुगांत क्षत्रियच नाहींत ही कल्पना उदयाला आली नव्हती याबद्दल शंका नाहीं.

कुमारिलभट्टाच्यावेळीं ( इ. स. ६००–७०० ) कलावाद्यन्तयोः

स्थिति: हें वाक्य किंवा ही कल्पना अस्तित्वांत नव्हती असा निश्चय होतो. कारण कुमारिल आपल्या वार्तिकांत राजा शब्दानें क्षत्रिय घ्यावा किंवा कसें हा पूर्वपक्ष चालला असतां राज्य करणारा राजा असा अर्थ घेऊन "तच्च राज्यमविशेषेण चत्वारोऽपि वर्णाः कुर्वाणा दृश्यन्ते" असें लिहितो. म्हणजे कुमारिलाच्या वेळीं चारी वर्णांचे राजे राज्य करीत असलेले दिसत होते. अर्थात् कलियुगांत क्षत्रिय वैश्यच नाहींत हें म्हणणें त्या वेळीं प्रचलित नव्हतें. आणि शिवाय या पूर्वपक्षाचा निकाल राजा शब्दानें क्षत्रिय राजाच घ्यावा अशा सिद्धांतानें केला आहे. अर्थात कुमारिलाच्या वेळीं क्षत्रिय राजे आहेत हें मान्य होतें. किंबहुना त्याच्या पुढील एका वाक्यावरून महाराष्ट्रांत मराठे क्षत्रिय होते असें ही सिद्ध होतें. भाष्यकार शबरानें येथें असें लिहिलें आहे कीं " ननु जनपदपुररक्षणवृत्तिमनुपजीवत्यपि क्षत्रिये राजशब्दमान्ध्राः प्रयुञ्जन्ते" राज्य करणारा तो राजा असें म्हणावें तर जनपद म्हणजे प्रान्त व पुर याचें रक्षण करण्याच्या वृत्तीवर ज्याचें जीवन नाहीं अशा क्षत्रियांना सुद्धा आन्ध्र राजा शब्द लावतात " म्हणजे सामान्य क्षत्रियाला सुद्धां राजा म्हणतात या शबर वाक्यावर कुमारिलानें " दाक्षिणात्यसामान्येनान्ध्राणामिति भाष्यकारेणोक्तम् " असा शेरा मारला. शबराचा काळ सुमारें इ. स. ४०० आणि कुमारिलाचा इ. स. ७०० तेव्हां कदाचित् आन्ध्रामधील चाल कुमारिलाच्या वेळीं दाक्षिणात्यांत विशेष होती. तेव्हां आन्ध्र सामान्यानें असें भाष्यकारानें म्हटलें आहे असें कुमारिल लिहितो. दाक्षिणात्य हा शब्द कुमारिल नेहमीं महाराष्ट्रीयांना लावतो. किंबहुना कुमारिलाच्या वेळीं महाराष्ट्र हें देशाचें नांव व मराठे हें तेथील लोकांचें नांव अद्याप रूढ झालें नव्हतें ( वराहमिहिरांत सुद्धां महाराष्ट्रदेश देशांच्या यादींत दिलेला नाहीं हें भाग १ मध्यें दाखविलेंच आहे ) शिवाय कुमारिलाच्या वेळीं आन्ध्र सत्ता महाराष्ट्रांत नव्हती, शबराच्या वेळीं होती असेंही अनुमान होतें. तें कांहीं असो, दक्षिणेंत व आन्ध्र–महाराष्ट्रांत क्षत्रिय होते आणि ते राज्य करीत नसले तरी त्यांस राजे म्हणण्याचा येथें परिपाठ होता ही गोष्ट वरील वाक्यांवरून सिद्ध होते. तात्पर्य, कलियुगांत क्षत्रिय नाहींत, ही कल्पना धर्मशास्त्रज्ञ कुमारिलास माहित नव्हती म्हणजे

या वाक्याची व यांतील कल्पनेची उत्पत्ति कुमारिलाच्या नंतरची ( इ. स. ७०० नंतरची ) आहे हा निश्चय होय.

या वचनाचें खंडण कलियुगांत मान्य म्हणून मानलेल्या पराशरस्मृतींतच आहे असें आमचें मत आहे. या स्मृतींतील कित्येक वचनांत क्षत्रिय व वैश्य यांचेसाठीं नियम सांगितले आहेत. जर कलियुगांत खरोखरच क्षत्रिय आणि वैश्य नसते तर त्यांच्यासाठीं स्वतंत्र नियम करण्याची आवश्यकता कोणती ? तेव्हां या स्मृतींत तरी या वर्णांच्या लोपाची कल्पना दिसत नाहीं. या स्मृतीचा काल ७ व्या किंवा ८ व्या शतकांत पडेल, तेव्हां तोंपावेतों ही कल्पना उद्भूत झाली नव्हती असें अनुमान करावयास हरकत नाहीं. पराशरस्मृति दक्षिणेंत लिहिली असावी असेंहि आम्हांस वाटतें; कारण तींत सेतुतीर्थाचें पावित्र्य विशेष वर्णिलें आहे. परंतु ती दक्षिणेंत लिहिलेली असो किंवा उत्तरेंत लिहिलेली असो क्षत्रियांचा कलियुगांत लोप झाला असें म्हणण्याचा तिचा रोख दिसत नाहीं.

शूद्रकमलाकर एका दक्षिणी ब्राह्मणानें काशी येथें लिहिला. तेव्हां त्यांतील अभिप्राय दक्षिण आणि पूर्व हिंदुस्थानांतील कल्पनेला धरून असणार. जेथें रजपूत हा शब्द विशेष प्रचारांत आला होता त्या मध्य हिंदुस्थानांतील क्षत्रिय दक्षिण व पूर्वेकडील क्षत्रियांना कमी लेखूं लागले ते ९ व्या आणि १० व्या शतकांत नसून त्यानंतर असे या शतकांत त्यांच्यांत लग्नसंबंध झालेले आहेत यावरून दिसून येईल. तेव्हां या दोन वर्णांच्या लोकांची कल्पना यानंतरच्या शतकांत उत्पन्न झाली व तीही दक्षिणेंत व पूर्वेंत असें स्पष्ट होतें. धर्मशास्त्रावरील लेखकांनीं ही कल्पना उचलून धरली आणि तिच्यावरून निघणाऱ्या अनुमानांचा व्यवहारांत अम्मल केला. यामुळें जे रजपूत आपण शुद्ध म्हणून अभिमान मानीत आणि आजही मानतात त्यांनाही या लेखकांनीं उग्र असें ठरविलें; आणि क्षत्रियांना स्वतःचीं गोत्रें नाहींत, त्यांनीं आपल्या पुरोहितांचीं गोत्रें स्वीकारावीं अशी कल्पना प्रसृत झाली. या विषयाचें अधिक विवेचन करण्याची आवश्यकता नाहीं. आम्हांला शेवटीं एवढेंच सांगावयाचें आहे कीं, रजपूत हे उग्र होत हें वचन खरें नाहीं

इतकेंच नाहीं, तर कलियुगांत क्षत्रिय नाहींत अशी जी पुष्कळ शतकांनंतर कल्पना निघाली तिच्यावर तें रचलेलें आहे. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें असतां कलावाद्यन्तयोः स्थितिः हें वचन प्रक्षिप्त आहे. तसें नसलें तर त्याचा अर्थ असा करितां येईल कीं, कलियुगाच्या शेवटीं शेवटीं क्षत्रिय नाहींसे होतील. प्रस्तुत आपण या वचनाकडे दुर्लक्ष्य करूं आणि क्षत्रिय हे अजूनही अस्तित्वांत आहेत, रजपुत हे त्यांतल्यात्यांत अत्यंत शुद्ध आहेत, आणि रजपुत म्हणजे कुलीन क्षत्रिय असें निर्विवाद आहे.

शेवटीं ही गोष्ट सांगितली पाहिजे कीं, काशींतील प्रसिद्ध भट्ट घराण्यापैकीं कमलाकरभट्ट शूद्र कमलाकर या आपल्या ग्रंथांत 'कलावाद्यन्तयोःस्थितिः' हें वाक्य पुराणान्तरेपि म्हणून उध्दृत करतो. कोणत्या पुराणांतलें हें यावरूनही निश्चित होत नाहीं. शिवाय कमलाकरभट्टाच्या व त्याच्या वडिलांच्या मतें ( हे भट्ट नामांकित विद्वान असून प्रसिद्ध गागाभट्ट शिवाजीस अभिषेक करणारे याच कुलांतील होत. ) कलियुगांत क्षत्रिय वैश्य आहेत असेंच ठरतें. शूद्रकमलाकराच्या शेवटीं पुढील वाक्यें आहेत.

" ननु कलौ क्षत्रियवैश्याभावः उक्तो भागवते एकादशस्कन्धे " इक्ष्वाकूणामयं वंशः सुमित्रान्तो भविष्यति। यतस्तं प्राप्य राजानं संस्थां प्राप्स्यति वै कलौ । देवापियोंगमास्थाय कलापग्राममाश्रितः। सोमवंशे कलौ नष्टे कृतादौ स्थापयिष्यतीति । द्वादश स्कन्धेऽपि " देवापिःशन्तनोर्भ्राता मरुश्चेक्ष्वाकुवंशजः । कलापग्राममासाते महायोगबलान्वितौ ॥ताविहेत्य कलेरन्ते वासुदेवानुशिक्षितौ । वर्णाश्रमयुतं धर्मं पूर्ववत्प्रथयिष्यतः । " विष्णुपुराणेपि " "महापद्मपतिर्नंदःक्षत्रविनाशकृत् " " नन्दश्चकलेरादौ परीक्षितोनन्तरं जातः । XX । पुराणान्तरेपि ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्रा वर्णास्त्रयो द्विजः । युगे युगे स्थिताः सर्वे कलावाद्यन्तयोः स्थितिः ॥ " अतः कथं द्विजसंकरजा उक्ताः । मैवम् । " कलौ च बीजभूतास्तु केचित्तिष्ठन्ति भूतले । " इति विष्णुपुराणात् । " ब्रह्म क्षेत्रं विशः शूद्रा बीजार्थे य इह स्थिताः । कृते युगेतु तैः सार्धं निर्विशेषस्तदाभवन् । " इति मात्स्योक्तेश्च प्रच्छन्नरूपाः स्वकर्मभ्रष्टाः क्षत्रियवैश्याः कलियुगे सन्त्येव क्वचिदित्यस्मत्पितृचरणाः ॥ " वरील उताऱ्यावरून गागाभट्टानें शिवाजीस राज्याभिषेक

कसा केला याचा उलगडा होईल. बीजरूपानें क्षत्रिय वैश्य आहेत म्हणूनच पुढें कृतयुगारंभीं ते वर्ण पुन्हा चालतील, बीजच नष्ट झालें तर कसें चालणार ? बरें खोल विचार केला तर हल्लीं ब्राह्मण ही प्रच्छन्नरूप स्वकर्मभ्रष्ट बीजरूपच बहुतेक आहेत. परंतु बीजाची शुद्धता ठेवणें हेंच महत्त्वाचें आहे. असो.

---

पुरवणी—"कलावाद्यन्तयोः स्थितिः" वाक्याचें उगमस्थान. सदर वाक्य मूळांत कोठचें आहे याबद्दल आम्ही पुष्कळ तपास केला परंतु अद्याप थांग लागला नाहीं. पुण्याचे सुप्रसिद्ध मीमांसाशास्त्रनिष्णात किंजवडेकर शास्त्री यांनीं पुढील उगम दाखविला. पतंजलीच्या महाभाष्यांत 'ब्राह्मणेन निष्कारणो वेदो षडङ्गोऽध्येयो ज्ञेयश्च' असें वाक्य आहे. भाष्य टीकाकार कैय्यट यानें याजवर कांहीं लिहिलें नाहीं. परंतु कैय्यटावरही उद्योत नांवाची टीका नागोजी भट्टानें केली आहे त्यांत तो म्हणतो 'ब्राह्मणेनेत्युक्तेरन्यस्यैवमध्ययनं काम्यमेवेति सूचयतीति कश्चित्' येथें आपलें मत न देतां कश्चितचें मत दिलें आहे. याजवर वाईचे वैद्यनाथ महादेव पायगुंडे यांची छाया येणेंप्रमाणें. 'अत्रारुचिबीजम् । तयोर्नित्याध्ययनविधायकस्मृत्यन्तरादिविरोधापत्तिरितिः । तस्माद्ब्राह्मणपदं त्रैवर्णिकोपलक्षणमिति बोध्यम् । क्षत्रियस्य च वैश्यस्य च साङ्गवेदाध्ययनं ज्ञानं चेत्यर्थः। वस्तुतस्तु कलौ क्षत्रियस्याभावं सूचयितुं तथोक्तमिति यथाश्रुतमेवतत्साधु । तथाच 'कलौ न क्षत्रियाः सन्ति कलौ नो वैश्यजातयः । ब्राह्मणश्चैव शूद्रश्च कलौवर्णद्वयं स्मृतम् ।' इति स्मृतिरिरितितत्वम् । '. यांत पायगुंडे म्हणतात "कश्चित् शब्दावरून ग्रंथकर्त्याला त्या मताविषयीं अरुचि अथवा असंमति दिसते, कारण उघड आहे कीं एकंदर स्मृतिशास्त्रानें क्षत्रियवैश्यासुद्धां त्रैवर्णिकांना वेदाध्ययनाचा स्पष्ट अधिकार दिला आहे, त्या स्मृतीशीं विरोध येतो. तेव्हां ब्राह्मण शब्द भाष्यकारानें त्रैवर्णिकांच्या उपलक्षणानें योजिला आहे आणि म्हणून क्षत्रिय वैश्यांनासुद्धां वेदाध्ययनाचा व वेदज्ञानाचा अधिकार आहे असें जाणावें ( असें नागोजी भट्टाचें मत दिसतें ) पण वस्तुस्थिति पाहिली तर कलियुगांत क्षत्रिय नाहींत हें सुचविण्याकरितां भाष्यकारांनीं

तसें लिहिलें तें यथाश्रुतच बरोबर आहे. आधार ' कलौ न क्षत्रियाः सन्ति ' वगैरे स्मृति वचन आहे हें तत्व होय "

पायगुंड्यांच्या छायेसहित महाभाष्य छापणारा शिवदत्त आपल्या टिप्पणीमध्यें यावरही म्हणतो ' श्रुतीनां कलियुगपरत्वकल्पनं न समञ्जसमिति त्रैवर्णिकानामुपलक्षणमित्येव युक्तम् ' श्रुति कलियुगानें रद्द होत नसल्यानें ब्राह्मण शब्द त्रैवर्णिकांचाच उपलक्षण मानणें योग्य असें शिवदत्ताचें म्हणणें आहे.

वरील उताऱ्यावरून मतें कशीं या बाजूहून त्या बाजूला हेलकावे खात असतात याची कल्पना वाचकांस होईल. आमचें मत ऐतिहासिक दृष्ट्या याजवर येणेंप्रमाणें आहे. प्रारंभापासून अशोकाच्या वेळीं म्हणजे इ. स. पू. २५० सुमारें बौद्ध धर्माचा आर्यावर्तांत पूर्ण प्रसार होईपर्यंत त्रैवर्णिकांना वेदाधिकार होता व ते वेद पठणही करीत. परंतु या वेळीं बहुतेक क्षत्रिय--वैश्य बौद्धधर्मी झाले व वेद सोडून देऊन वेद--विरोधी बनले. अर्थात् पतञ्जलीच्या काळीं म्हणजे इ० स० पू० १५० च्या सुमारास वस्तुस्थिति अशी होती कीं, वेदांचें रक्षण ब्राह्मणांनींच करणें जरूर होतें म्हणून त्यानें वस्तुस्थितीस अनुलक्षून, धर्मशास्त्रदृष्ट्या नव्हे, ' ब्राह्मणेन वेदोऽध्येयः ' असें लिहिलें. कैय्यट इ. स. ६०० च्या सुमारें झाला तेव्हांपर्यंत स्थिति तशीच होती. म्हणून त्यानें कांहीं लिहिलें नाहीं. यानंतर कुमारिल--शंकराचार्यादिकांच्या प्रयत्नानें बौद्ध धर्म हिंदुस्थानांतून नष्ट झाला व क्षत्रिय व विशेषतः रजपूत राजे यांनीं पूर्ववत् आपला अधिकार चालू केला व कित्येक वेदहि म्हणूं लागले. तेव्हां नागोजी भट्टाच्या पूर्वीं म्हणजे इ. स. १००० पासून १४०० पर्यंत वेदाध्ययन क्षत्रियांना काम्य आहे असें मत सुरू झालें. काशीचा नागोजीभट्ट (इ. स. १४००) याबर स्वतः मुग्धच आहे, प्रचलित मत मात्र ग्रथित करितो. पुढें सर्व हिंदुस्थानांत सर्वत्र मुसलमानी अम्मल प्रसृत झाला, क्षत्रिय पुन्हां वेदाकडे दुर्लक्ष करूं लागले, दक्षिणेंत मराठे तर अगदीं वेदविहीन झाले तेव्हां पायगुंडे यांनीं इ. स. १६०० सुमारें कलींत दोनच वर्ण आहेत या एका अप्रसिद्ध वाक्यावर भाष्यकाराचें मूळचें वाक्यच खरें असें प्रतिपादिलें. हल्लीं त्रैवर्णिकांना वेदधर्मा-

विषयीं श्रद्धा आहे तेव्हां शिवदत्त अर्थात्‌च तिन्ही वर्णांना वेदाधिकार आहे असें म्हणतों तें योग्यच आहे. यावरून इतिहास–दृष्ट्या कलींत दोनच वर्ण आहेत हें वाक्य इ. स. १३०० पासून १६०० पर्यंत केव्हां तरी दक्षिण पूर्व प्रांतांत उत्पन्न झालें असें मानतां येईल.

---

# प्रकरण ६ वें

## आर्यांच्या राजपुतान्यांतील वसाहती.

रजपूत किंवा यथायोग्य शब्द वापरावयाचे तर त्यांचे वैदिक क्षात्रिय पूर्वज यांनीं राजपुतान्यांत केलेल्या वसाहती फार प्राचीन नाहींत. हिंदुस्थानांतील महाभारत व रामायण या दोन्ही प्राचीन महाकाव्यांत अशा वसाहतींचा उल्लेख आहे. हा प्रांत हवापाण्याच्या दृष्टीनें आकर्षक नाही, तेव्हां तेथें सहज वसाहत होण्यासारखी नाहीं हें ध्यानांत धरलें पाहीजे. पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें आर्य लोक हे प्राय: शेतकीचा धंदा करीत आणि त्यामुळें स्वाभाविकपणेंच त्यांना जांगल देश किंवा बेताच्या पावसाचा, सुपीक व सपाट प्रदेश आवडत असे. राजपुतान्यांतील पश्चिमभागांतील वाळवंटे आणि पूर्वभागांतील डोंगराळ मुलुख हीं त्यांना वसाहती करण्यालायक नव्हतीं. तेव्हां या प्रांतांत इतिहासपूर्व कालापासून फार दिवसपर्यंत केवळ आभीर, भिल्ल आणि दुसऱ्या कांहीं द्राविडी मूळ जातींचीच वसती राहिली यांत आश्चर्य-कारक असें कांहींच नाहीं. चंद्रवंशीय किंवा दुसऱ्या आर्यशाखे-बरोबर बाहेरून आलेले जे आर्य वसाहतवाले मथुरेपासून दक्षिकडे

पसरत गेले त्यांनीं हा प्रांत तसाच सोडून दिला आणि त्यांतून खाली उतरून आनर्त आणि सौराष्ट्र यांतील सपाट व सुपीक प्रदेशांत वसाहत केली. महाभारतांत असें सांगितलें आहे कीं, जरासंधाच्या त्रासानें खुद्द श्रीकृष्णानें चंद्रवंशीय आर्यांचा आवडता मध्यदेश सोडून दिला आणि द्वारकेची स्थापना केली. आनर्तांचा ( उत्तर गुजराथेचा ) राजा बलरामाचा सासरा होता या कारणामुळेंच फार करून कृष्णाची दृष्टि या प्रांतांकडे वळली असावी. तेव्हां आर्यांच्या अशाप्रकारें द्वारका आणि आनर्त ह्या अर्वाचीन काठेवाड आणि गुजराथेंतील पहिल्या वसाहती. ह्यांतील आर्यांना जेव्हां जेव्हां मध्यदेशांत जावयाचें असें तेव्हां तेव्हां अर्वाचीन राजपुतान्यांतूनच जावें लागे हें खरें, पण तें ते मोठ्या कष्टानें आणि नाखुषीनें करीत. उदाहरणार्थ, महाभारतांत बलराम सरस्वती नदीच्या कांठानें पंजाबांत गेल्याचा उल्लेख असून ही नदी शूद्र आभीरांच्या भीतीनें राजस्थानाच्या वाळवंटांत अंतर्धान पावली असें सांगितलें आहे, श्रीकृष्णांच्या निधनानंतर सौराष्ट्रांतील नूतन वसाहतवाल्या आर्यांच्या कुटुंबांना आणि विधवांना मध्य देशांत पोंचवीत असतांना अर्जुनाला याच आभीरांनीं त्रास दिला. या लोकांचा निर्देश दस्यु आणि म्लेच्छ या शब्दानीं केला आहे रा. भांडारकरांनीं चुकीनें या शब्दाचा अर्थ लुटारू आणि परकीय असा केला आहे. ( भांडारकरांचा हिंदुलोकांत परकीयांचे मिश्रण हा लेख पहा इं. अँ. ४०). वेदांत हिंदुस्थानांतीलं मूळच्या लोकांकरितां दस्यु ही संज्ञा वापरलेली आहे आणि म्लेच्छ ह्मणजे केवळ परकीयच असा अर्थ नाहीं. कारण महाभारतांत दक्षिणेंतील द्रविडांना देखील म्लेच्छ ह्मटलें आहे. ( म्लेच्छ ह्मणजे ज्यांना संस्कृत उच्चार नीट करितां येत नसत ते; मग ते परकीय तुराणी किंवा सिथिक असोत वा मूळचे द्रविड असोत ). तेव्हां आभीर हे परकी नसून मूळचे

द्रविड वंशांचे होते व ते महाभारताच्या कालांत, ह्मणजे इ. स. पू. २९० च्या सुमारास या वालुकामय प्रदेशांत रहात होते.

महाभारतांत या मरु प्रदेशाबद्दल दोन उल्लेख असून या प्रदेशांत आर्यांनी कशी वसाहत केली याची कल्पना येण्यासाठीं त्यांचा निर्देश करणें अवश्य आहे. भारतीय महायुद्धानंतर श्रीकृष्ण आपल्या घरीं द्वारकेला परत जात असतां मरुदेशाच्या सीमेवर उत्तंकानें त्याला हटकलें. त्या भागांत आपला आश्रम बांधणारा उत्तंक हा पहिलाच ब्राह्मण असावा. त्यानें श्रीकृष्णाजवळ अशी तक्रार केली कीं, आपल्याला येथें वारंवार शोष लागतो आणि प्यावयाला पाणी थोडें मिळतें. श्रीकृष्णानें त्याला उत्तर असें दिलें कीं तहान लागेल तेव्हां माझें स्मरण कर; आणि जेव्हां जेव्हां उत्तंकानें स्मरण केलें, तेव्हां तेव्हां श्रीकृष्णानें मेघ पाठविले. या ढगांतून मुबलक पाणी पडे आणि उत्तंकाची तृष्णा तृप्त होई. त्या दिवसांपासून मरु प्रदेशांत उष्णकालांत मेघ येउं लागले; त्या मेघांना उत्तंक मेघ असें नांव पडलें आहे. (महाभारत अश्वमेधपर्व) दुसरी कथा आहे ती या प्रदेशांत भूपृष्टांतून निघणाऱ्या उष्ण वाफांची या उष्ण वाऱ्यांचीही उत्तंकाला फार पीडा होई. हे वारे ह्मणजे त्या प्रदेशांतील किंवा शुष्क पडलेल्या समुद्रांतील वाळवंटाखालीं लपलेल्या धुंधु नामक राक्षसाचे श्वासोश्वास होत, अशी समजूत होती. उत्तंकानें अयोध्येचा सूर्यवंशी राजा कुवलयाश्व याची मदत मागितली, आणि त्या राजानें ती त्याला दिली, ह्या कुवलयाश्वानें वाळवंट उकरून टाकलें, आणि त्या राक्षसाला शोधून काढलें. त्या राक्षसानें आपल्या मुखांतून जे तप्त अग्नीचे लोळ सोडले त्यांत किती तरी क्षात्रिय मृत्युमुखीं पडले. परंतु सरतेशेवटीं राजानें आणलेल्या पाण्यानें तो अग्नी विझवण्यांत आला, आणि त्या दैत्याचा

२३९३

अंत झाला. कुवलयाश्वाला तेव्हांपासून धुंधुमार असें नांव पडलें. (वनपर्व अध्याय २०४) हीच गोष्ट महाभारतांत आणखी एकदां सांगितली असून रामायणांतही सांगितलेली आहे. यावरून ही कथा फार प्रिय झालेली असावी असें दिसतें आणि मरुप्रदेशांतील पहिली वसाहत सूर्यवंशी क्षत्रियांच्या नेतृत्वाखालीं झाली असावी, असें अनुमान होतें.

इ. स. पूर्वीच्या पहिल्या शतकांतील रामायणांतही या भागांत त्या काळीं भेसुर आभीरांची वस्ती होती, असेंच ह्मटलें आहे. युद्धकांडाच्या विसाव्या सर्गांत असें वर्णन आहे कीं, रामानें उद्धट दक्षिण समुद्रावर सोडण्यासाठीं बाण उचलला, तेव्हां तो समुद्रच साक्षात् मनुष्य स्वरुपांत रामापुढें येउन उभा राहिला. समुद्रानें रामाजवळ क्षमा मागितली, आणि अशी प्रार्थना केली कीं, द्रुमकुल्य नांवाच्या माझ्या उत्तरभागांवर हा बाण टाक. तेथें आभीर प्रमुख पुष्कळ लोक राहतात. ते आकृतीनें व कृतीनेंही क्रूर असून दस्यु आहेत. ते माझें पाणी पितात. त्यांचें सांनिध्य मला आतां सहन करवत नाहीं. रामानें त्याप्रमाणें या उत्तर भागावर आपला तो बाण सोडला, आणि त्यामुळें तो प्रदेश निर्जल झाला. तो बाण जेथें रुतला तेथें मात्र एक विहीर झाली. आणि ती व्रण कूप या नांवानें विश्रुत आहे.* द्रुमकुल्य प्रदेश कोणता आणि हा व्रणकूप कोठें आहे

*उग्रदर्शनकर्माणो बहवस्तत्र दस्यवः। आभीरप्रमुखाः पापाः पिबन्ति सलिलं मम। तैर्न तत्स्पर्शनं पापं सहेयं पापकर्मभिः॥ ३०-३१॥ स बभूव तदा कूपो व्रणउत्येव विश्रुतः। सततं चोत्थितं तोयं समुद्रस्येव दृश्यते॥ ३५॥ वरं तस्मै ददौ विद्वान् मरवेऽमरविक्रमः। पशव्यश्चाल्परोगश्च फलमूल रसैर्युतः। बहुस्नेहो बहुक्षीरः सुगन्धिर्विविधौषधिः। रामस्य वरदानाच्च शिवः पंथा बभूव ह॥ ३९॥

हें निश्चयानें सांगणें शक्य नाहीं; परंतु येवढें मात्र खरें कीं हिंदू कवींनीं या भागाबद्दल जें वर्णन केलें आहे कीं राजपुताना हा फार करून पूर्वीं समुद्राचा भाग असावा, तो आतां शुष्क होऊन तेथें जमीन झालेली आहे, आणि कांहीं थोड्याशा सुप्रसिद्ध विहिरींखेरीज तेथें पाणी ह्मणून नाहीं, तें भूगर्भशास्त्राच्या दृष्टीनेंही अगदीं बरोबर आहे. या प्रांताला जी निष्कारण शिक्षा देण्यांत आली ती लक्षांत आणून रामांनीं तो प्रांत अत्यंत सुपीक आणि आरोग्यकारक असा केला, या गोष्टीवरून हें स्पष्ट दिसतें कीं क्रूर आणि अडाणी अशा मूळच्या लोकांस जिंकिल्यानंतर ख्रिस्तीशकाच्या सुरुवातीच्या सुमारास आर्य लोकांनीं पहिल्यानें या भागांत प्रवेश करून वसाहत केली. अशा तऱ्हेनें वसाहत करण्याला मार्ग मोकळा झाला. मरु अरण्य हें सुपीक व आरोग्यकारक असून तेथें जनावरांचे मोठाले कळप बाळगण्याला व हरतऱ्हेचीं धान्यें पिकविण्याला सोय आहे असें लवकरच आढळून आलें. थोडक्यांत आपल्याला असें म्हणावयाला हरकत नाहीं कीं, मरूमध्यें आर्यांची पहिली वसाहत झाली ती बहुधा ख्रिस्ती सनाच्या सुरुवातीला असावी.

पूर्व राजपुतान्याच्या डोंगराळ प्रदेशांवर आर्यांनीं स्वाऱ्या यापूर्वीं केल्या असाव्या. कारण अजमीरानजीक असलेलें पुष्कर तीर्थ अखिल हिंदुस्थानांत अत्यंत पवित्र आहे असें महाभारतांत म्हटलें आहे. आजमितीलाही हिंदुस्थानांत जीं तीन अत्यंत पवित्र क्षेत्रें आहेत—१ पुष्कर २ कुरुक्षेत्र व ३ गंगा त्यांत त्याची गणना करण्यांत येते. परंतु पुष्करतलावांचा शोध फार प्राचीन काळीं लागलेला असला तरी हें क्षेत्र पुष्करारण्यांत आहे असें वर्णन आहे. यावरून दंडकारण्याप्रमाणें पुष्करारण्यहि फार कालपर्यंत वसाहतीखेरीज राहिलें असलें पाहिजे. दंडकारण्यांतल्याप्रमाणें सुरुवातीला फक्त

ब्राह्मणांची वसाहत होऊन महाराष्ट्रांतल्याप्रमाणेंच क्षत्रियांची वसाहत व्हावयाला मध्यंतरीं बराच काळ लोटला असला पाहिजे.

यमुनेचा प्रदेश आणि गुजराथ यांच्यामधील दळणवळणाचा मार्ग सांप्रत जो आहे—म्हणजे राजपुताना रेल्वेच्या रस्त्यानें—तोच प्राचीन काळीं ही असावा. पुष्कर तलावानंतर स्वाभाविकपणेंच अबूच्या उत्तुंग शिखरानें लोकांचें चित्त आकर्षून घेतलें असावें. भोंवतालीं जिकडे तिकडे लहान लहान डोंगर आणि मधेंच हा उंच पर्वत पाहून प्राचीन भारती आर्यांस तो हिमालयाचा मुलगा आहे अशी कल्पना सुचणें सहज आहे. नैसर्गिक भूपृष्ठ रचनेवर रचलेल्या या काव्यसृष्टि-कल्पनेमधून चंदानें सांगितलेली अर्बुद पर्वताची गोष्ट उत्पन्न झाली. वास्तविक या गोष्टीचा मुख्य भाग महाभारताइतकाच जुना आहे. वनपर्वाच्या ८२ व्या अध्यायांत अर्बुद तीर्थाचा उल्लेख असून अर्बुद हा हिमालयाचा मुलगा म्हणून सांगितलें आहे. पूर्वीं पृथ्वींत एक फार खोल असें विवर होतें आणि तें बुजवून टाकण्यासाठीं हा पर्वत उत्तरेकडून आणला असेंही तेथें वर्णन केलें आहे. वासिष्ठाच्या नांवाचाही या पर्वताबरोबर फार प्राचीन काळापासून संबंध जुळलेला आहे. या पर्वतावरील वासिष्ठ ऋषीचा आश्रम हें एक पवित्र स्थान आहे असा महाभारतांत उल्लेख आहे. उत्तंकानें पृथ्वी खणल्याची गोष्ट महाभारतांत दोन ठिकाणीं सांगितलेली आहे. पहिल्या गोष्टींत असें सांगितलें आहे कीं तक्षक नागाचा पाताळापर्यंत पाठलाग करण्यासाठीं पृथ्वीला अत्यंत खोल असें त्यानें विवर पाडलें. त्या विवरांत वासिष्ठाची गाय पडली. तेव्हां तें विवर भरून काढण्यासाठीं हिमालयाचा एखादा मुलगा आणावा अशी वासिष्ठाच्या मनांत कल्पना आली. तो प्रदेश अपवित्र असल्या-मुळें हिमालयानें प्रथम मदत करण्याचें नाकारिलें; परंतु वासिष्ठानें तो प्रदेश पावन करण्याचें वचन दिलें तेव्हां हिमालयाचा एक पुत्र तेथें

गेला व त्यानें तें विवर भरून काढलें. तदनंतर स्वत: वासिष्ठच तेथें जाऊन राहिला व त्यानें तेथें शिवाचें एक देवालय बांधलें. यामुळें त्या शिवाला अचलेश्वर अथवा पर्वताचा ईश्वर असें नामाभिधान प्राप्त झालें. संबंध रजपुत इतिहासांत आणि त्याचप्रमाणें आज मितीलाही अचलेश्वराचें देवालय हें एक रजपुतांचें पवित्र स्थान मानलें जातें. ही येथें वर्णिलेली कथा बहुधा फार प्राचीन असावी. पुढें स्कंद पुराणांत तिचा विस्तार करून ती अर्बुद खंडांत तिसऱ्या अध्यायांत सांगितली आहे. (पुराणांत या पर्वताचें नांव नंदिवर्धन असें दिलें आहे. हिमालयांतून ज्या सर्पाच्या पाठीवर बसून नंदिवर्धन आला त्याचें नांव अर्बुद दिलें आहे.) स्कंद पुराणांत वसिष्ठानें यज्ञ केल्याचा मात्र कोठेंच उल्लेख नाहीं. जुन्या ग्रंथांतील अर्बुदाच्या या उत्पत्तीच्या कथेवरून असा निष्कर्ष निघतो कीं, इ. स. पू. २५० इतक्या प्राचीन कालींही अर्बुद पर्वताला पवित्र स्थानाचा मान प्राप्त झाला होता; आणि त्याच्यावरची पहिली वसाहत कांहीं वसिष्ठ कुलांतल्या आर्यांनीं केली असावी. पुढें याच भागांत उदयास आलेल्या परमारांनीं आपलें वासिष्ठ गोत्र लावलें यांत नवल नाहीं.

वैदिक क्षत्रियांनीं वसाहतीला अनाकर्षक असलेल्या या डोंगराळ- आणि वालुकामय प्रदेशांत ख्रिस्तीशकापूर्वीं किंवा त्या शकाच्या सुरुवातीला जी वसाहत केली ती त्यांच्या पंजाबांतील व गंगेच्या प्रदेशांतील प्राचीन ठिकाणांवर बाहेरून आलेल्या स्वाऱ्यांचें दडपण पडल्यामुळें होय, असा इतिहासदृष्ट्या तर्क करणें कठीण नाहीं. वस्तुस्थितिच अशी आहे कीं, इतिहासाच्या कोणत्याही काळांत शक, कुशान, हूण आणि अगदीं शेवटीं आलेले महम्मदी तुर्क किंवा अफगाण यांच्या स्वाऱ्यांमुळें विपुल जलांनीं युक्त व संपन्न अशा या दोन प्रदेशांतून भारती लावलेल्या हांकून आर्य लोकांस राजपुतान्यानें

नेहमींच आश्रय दिला आहे. आपल्याला विश्वसनीय अशा इतिहासावरून हें माहीत आहे कीं, राजस्थानच्या वाळवंटांत ज्या रजपूत घराण्यानें अगदीं शेवटीं असा आश्रय घेतला तें कनोज येथील राठोडांचे होतें. जयचंदाचा पराभव होऊन अंत झाल्यावर गंगेचा प्रदेश सोडून राठोड घराणीं मारवाडाच्या वाळवंटांत येऊन राहिलीं. वस्तुतः राजपुतान्याला 'रजपुतांची भूमि' हें नांव महम्मदी कालांतच मिळालें. राठोडांच्या पूर्वीं अशाच तऱ्हेनें पुष्कळदां राजस्थानांत देशांतर केल्याचा पुरावा—अगदीं स्पष्ट असा नसला तरी—इतिहासांत सांपडतो. इतिहासांतील अशा तऱ्हेचा पहिला उल्लेख मालवांबद्दलचा, म्हणजे ज्यांना ग्रीक इतिहासकारांनीं मल्लोय म्हटलें आहे त्यांचा आहे. राजपुतान्यांत नगर येथें सांपडलेल्या नाण्यांवरून कनिंगहॅमनें असें अनुमान काढलें आहे कीं, खि. स. पू पहिल्या शतकाच्या सुमारास मालव हे पंजाबांतून मालव देशांत जात असतां राजस्थानांत राहिले असले पाहिजेत; कारण त्या नाण्यांवर ' जय मालवानाम् ' येवढाच शिक्का आहे. ( कनिंगहॅमचा आर्केऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट भाग १४ पाहा ) दुसरा उल्लेख माध्यमिकांचा आहे. त्यांचें राज्य जयपुराजवळ कोठें तरी असावें. शकयवनांनीं त्यांच्यावर स्वाऱ्या केल्या होत्या. गोडरजपुत हे गौड देशांतून म्हणजे ठाणेश्वरच्या भोंवतालच्या प्रदेशांतून (गौड चुकीनें लोक बंगाल समजतात तेथून नव्हे ), येऊन अजमिरांत राहिले असावे असें आख्यायिकांवरून दिसतें. तेथून पुढें चाहमानांनीं त्यांना खो दिला. स्मिथ आणि भांडारकर म्हणतात त्याप्रमाणें मिनमालचे गुजर परकी नसून उलट वैदिक आर्य आहेत असें आमचें मत आहे. पंजाबांतील त्यांच्या मूळस्थानांतून परकीयांनीं त्यांना हाकून लावल्या-

मुळें त्यांनींही मारवाडच्या वाळवंटांत आश्रय घेतला आणि आपलें स्वातंत्र्य कायम राखिलें. ३ ऱ्या व ५ व्या शतकांत कुशान आणि हूण यांच्या स्वाऱ्या झाल्या त्यावेळीं कित्येक रजपूत घराणीं राजपुतान्यांत जाऊन राहिलीं असावीं परंतु याचा उल्लेख सांपडलेला नाहीं. तथापि अशी कल्पना करावयास कांहीं हरकत नाहीं कीं ८ व्या शतकांत आरबांशी शौर्यानें लढून नांवास चढलेले रजपूत हे परकीयांनीं स्वाऱ्या करून पंजाब आणि गंगाप्रदेश यांतून हाकून लावल्या नंतर राजस्थानांत येऊन राहिलेल्या वैदिक आर्यांचे वंशज होते. आम्ही आपल्या पहिल्या भागाला जो हिंदुस्थानांतील धर्म दाखविणारा नकाशा जोडला आहे त्यावरून असें दिसून येतें कीं या राजपुतान्याच्या भागांत बौद्धांचें वर्चस्व नव्हतें इतकेंच नव्हे तर हिंदु व बौद्ध यांचें समप्रमाण ही नव्हतें. हा भाग मुख्यत्वें हिंदूचा देश होता. राजपुतान्याच्या ह्या अरण्यांत आणि डोंगरांत वैदिक क्षत्रियांनीं आपलें स्वातंत्र्य आणि आपला वैदिक धर्म यांचें संरक्षण केलें होतें. आणि येथें हि जेव्हां स्वाऱ्या करणाऱ्या परकीयांना सहज असलेल्या क्रूरतेला, मूर्तिविध्वंसक अशा नूतन धर्मांतील उग्र असहिष्णुतेची जोड देणाऱ्या नव्या परकीयांनीं त्यांच्यावर हल्ले चढविले तेव्हां आपल्या धर्माचें आणि स्वातंत्र्याचें रक्षण करण्याकरितां या वैदिक क्षत्रियांनीं किंवा रजपुतांनीं आपल्या प्रयत्नांची शर्थ करून दाखविली. आणि म्हणूनच या काळांत आपल्याला असा चमत्कार दिसतो कीं राजपुतांन्यात नवीं नवीं रजपूत घराणीं उदयास आलीं आणि त्यांनीं आरबांना नुसतें मागेंच हटविलें नाहीं तर आपल्या नव्या उत्साहांत हिंदुराज्यांची दुसरी परम्परा स्थापिली आणि हिंदुमध्ययुगाच्या दुसऱ्या कालविभागांत हिंदुस्थानावर राज्य केलें.

या रजपुतांत गुहिलोत, चाहमान, प्रतिहार आणि परमार हे सर्वांत प्रमुख होते. पुढील पुस्तकांत आम्ही या घराण्यांचा व त्यांनीं स्थापिलेल्या राज्यांचा इतिहास देणार आहोंत. अर्थात या इतिहासाची सुरवात अर्वाचीन रजपुतांनीं ज्यांना एकमतानें दाक्षिण्ययुक्त शौर्याची जयपताका दिली आहे व ज्यांचें रक्त शुद्ध क्षत्रिय आहे म्हणून मान्य केलें आहे त्या गुहिलोतापासून करणें योग्य आहे.

# पुस्तक चौथें

## दुसरीं हिंदु राज्यें

### ( सुमारें ७५०–१००० इ. स. )

### प्रकरण १ लें

#### चितोडचे गुहिलोत व बाप्पारावळ.

इसवी सनाच्या नवव्या शतकाच्या प्रारंभीं किंवा थोडें पूर्वीं मुसलमानांच्या स्वाऱ्यांस धिटाईनें तोंड देणारीं जीं अनेक राजकुलें राजपुतान्यांत प्रसिद्धीस आलीं त्यांमध्यें मेवाडचें गुहिलोत राजघराणें निःसंशय प्रमुख होतें; व त्याच घराण्याच्या हकीकतीस प्रथम सुरुवात करून आम्ही इतर राजघराण्यांचा इतिहास देणार आहोंत. रजपुतांचीं जीं ३६ कुळें इतिहासांत प्रसिद्ध आहेत तीं सर्वहि मेवाडच्या घराण्यास रामचंद्राचे वंशज ह्या नात्यानें अग्रपूजेचा मान देतात असें टॉडनें आपल्या इतिहासांत नमूद केलें आहे; व जेसलमिअर राज्य वगळतां मेवाडचेंच राज्यानें मुसलमानी स्वाऱ्यांस व भोंवतालीं मुसलमानांचें राज्य जाळ्याप्रमाणें पसरत असतां सर्वांत जास्त म्हणजे ८०० वर्षें टिकाव धरला हीही गोष्ट त्यानें नमूद केली आहे. सभोंवतीं मुसलमानांचें राज्य पसरत असतां मेवाडचें

राज्य आज १२०० वर्षें कायम राहिलें आहे. यांत त्यांचा फारसा मोठेपणा कदाचित् नसेल परंतु अत्यंत बिकट परिस्थितींतसुद्धां शत्रूस हार न जाण्याचें व शत्रूशीं युक्तिप्रयुक्तीनें टक्कर देण्याचें जें निश्चयाचें व्रत मेवाडच्या राजांनीं सतत चालू ठेवलें आहे त्यांतच मेवाड घराण्याची थोरवी आहे. बाप्पा, खुमान, समरसी, भीम, हमीर, सांगा, प्रताप इत्यादि वीर पुरुषांचीं चरित्रें म्हणजे स्वातंत्र्यदेवीचीं अनेक तीर्थेंच होत व त्यांनीं भारताच्या इतिहासास पावनत्व आणलें आहे,* आणि मेवाडच्या राज्यासहि चिरस्थायिता दिली आहे.

ह्या घराण्याचा आद्य व अतिशय प्रसिद्ध पुरुष ह्मणजे बाप्पा रावळ होय. हा अत्यंत पराक्रमी व विख्यात असा पुरुष होऊन गेला. सर्व थोर विभूतींप्रमाणें याच्याहि चारित्र्याविषयीं अनेक मनोरंजक व विस्मयकारक बऱ्याच दंतकथा प्रचलित आहेत. टॉडसाहेबानें राजस्थानांत स्वतः हिंडून तेथील ऐतिहासिक स्थलांचे, त्याचप्रमाणें उपलब्ध असलेल्या शिलापट्टाकांचें व ताम्रपटांचें सूक्ष्म निरीक्षण करून त्याचप्रमाणें लोकांत प्रचलित असलेल्या दंतकथांचें निरीक्षण करून आपला इतिहास लिहिला आहे व त्याचा उपयोगहि फार

---

टीपः—आज तागायत मेवाडचें राजघराणें स्वाभिमानास जागृत राहिलें आहे हें विशेष संस्मरणीय आहे. मेवाडच्या कोणत्याहि राजपुरुषानें मुसलमानी अमलास मान वाकविली नाहीं किंवा मोंगल राजांचे कोणत्याहि दरबारास ह्यांपैकीं कोणीहि हजर राहिले नाहींः—ब्रिटिश अमलाखालीं देखील त्यांचे इभ्रतीस धक्का बसला नाहीं हें त्यांस व ब्रिटिश अधिकारीवर्गास उभयतांस भूषणावह आहे. नुकतेंच १९१२ सालचे दिल्लीदरबारचे समारंभाचे वेळीं देखील आपल्या पूर्वपरंपरेनुरूप मेवाडचे राण्यानें हजर रहावयाचें नाकारलें व ब्रि० सरकारनेंहि ही त्यांची परंपरा मान्य केली हृ प्रसिद्ध आहे.

मोठा आहे. पण वास्तविक पाहतां, टॉडनें ह्या सर्व दंतकथा व ताम्रपटाव-रील लेख चिकित्सक पद्धतीच्या कसोटीस लावावयास हवे होते ह्मणजे त्याचे इतिहासास ज्यास्त विश्वसनीय रूप प्राप्त झालें असतें. परंतु हुषार इन्जीनिअरप्रमाणें इमारतीच्या बळकटीकडे लक्ष न देतां एखाद्या लोभी माणसाप्रमाणें उपलब्ध असलेल्या सर्व सामुग्रीचा उपयोग टॉडनें केला आहे. टॉडचा मुख्य भर सामुग्री गोळा करण्यावरच होता किंबहुना चिकित्सा करण्यास त्यास अवसरच नव्हता. शिवाय इंग्रज तत्त्वज्ञानी ह्यूमप्रमाणेंच त्याचें मत होतें. ह्यूम ह्मणे “ कवि काय किंवा शाहीर काय ह्यांनीं आपलें काव्य चटकदार करण्याक-रितां वस्तुस्थितीचा कितीही विपर्यास केला किंवा सत्यान्वेषण दूर सारून अतिशयोक्तीवर भर दिला तरीही अत्युक्तीच्या बुडाशीं, तसेंच दंतकथेच्या मुळाशीं थोडा फार तरी सत्यांश असतोच. विशेपतः कवी हेच जेव्हां राष्ट्राचे इतिहासकार असतात त्यावेळीं त्यांचें काव्यास थोडा फार अधार असतोच. ” वरील ह्यूमचें म्हणणें ग्राह्य धरूनच आम्हीं देखील ह्या सर्व दन्तकथांचा विचार करणार आहोंत परंतु त्याबरोबरच चिकित्सेच्या तीव्रतर मुशींत त्यांस घालून त्यांत सत्वांश कितीं व हिणकसपणा किती हें ठरविणार आहोंत. ज्याप्र-माणें दंतकथा सत्यान्वेषणाच्या मुशींत हिणकस ठरतील त्याप्रमा-णेंच बरेचसे शिलालेख व ताम्रपट ह्यांचीही गत होईल. एक वृत्त केवळ ताम्रपटावरच खोदलें गेलें म्हणून त्यास खरेपण प्राप्त होत नाहीं. कारण भाकडकथा व अत्युक्तीचीं वर्णनेंही ताम्रपटावर लिहितां येतील. अशी सत्यान्वेषणाची तीव्रतर कसोटी न लावल्यामुळेंच टॉड व आमचा पुष्कळच मतभेद होईल. टॉडच्या इमारतीचा पाया विस्तृत असला तरी खोल नाहीं त्यामुळें त्याचे विधानास पुष्कळ अंशीं बळकटी कमी राहील. शिवाय इतिहासकारास लागणारा मुख्य जो

गुण—म्हणजे पूर्वग्रहाभाव तो टॉडसाहेबांचे अंगीं बहुतकरून नाहींच व त्यामुळेंच वस्तुस्थितीचा विपर्यास होण्याचा बराच संभव असतो. वरील दोष बाजूस ठेविलें तरी टॉडनें आपला इतिहास ज्या काळीं लिहिला त्या काळीं संशोधनांच्या साधनांची बरीच उणीव होती व संशोधनाची योग्य दिशाही बरोबर ठरली नव्हती हें कोणास नाकबूल करतां यावयाचें नाहीं. अशा परिस्थितींत देखील टॉडनें सामुग्री गोळा करण्याचें फार महत्त्वाचें कार्य केलें आहे ह्यांत संशय नाहीं. आणि रजपुतांचा प्राचीन इतिहास जरी संदिग्ध राहिला तरी मुसलमानांच्या अमलानंतरचा टॉडने लिहिलेला त्यांचा इतिहास नेहमींच प्रमाणभूत राहील.

परंतु हल्लीं संशोधनाची सामुग्री उपलब्ध आहे व त्याची जुळवाजुळव मात्र राहिली आहे इतकेंच नाहीं; किंबहुना अजून देखील मेवाड घराण्याचा इ. स. १२०० पर्यंतचा विश्वासनीय इतिहास उपलब्ध नाहीं; व त्या काळची जी कांहीं माहिती सांपडते ती फारच त्रोटक—बरीचशी दन्तकथात्मक अशीच आहे. कालाच्या प्रगतिप्रमाणें अद्याप नवीन माहिती उपलब्ध होईल व आम्ही जी त्रोटक माहिती देणार आहों तीहि कदाचित् खोटी ठरेल. आतांपर्यंत जी माहिती उपलब्ध आहे त्यांतील सत्याची व अत्युक्तीची मिसळ काढून टाकून बुद्धीस पटेल अशा रीतीनेंच इतिहास देण्याचा आम्हीं हा प्रस्तुत प्रयत्न करीत आहों हें वाचकांस प्रारंभींच कळविणें जरूर आहे.

मेवाड घराण्याचा आद्य पुरुष बाप्पारावळ हा हिंदुस्थानचा चार्लस मार्टेलच होय. कारण; ह्या दोन राजपुत्रांच्या चरित्रांत अत्यंत साम्य आहे. दोघेही समकालीन असून दोघांच्या कार्याची दिशाही एकच होती. दोघांनींहि आपलीं आयुष्यें आरब लोकांच्या स्वाऱ्यांशीं तोंड

देण्यांत घालविली. दोघांचें कार्यक्षेत्र मात्र भिन्न होतें. एक फ्रान्समध्यें राहून पूर्वेकडून येणारे मूर लोकांचे हल्ले मागे परतवीत होता तर दुसरा हिंदुस्थानांत राहून पश्चिमेकडून येणाऱ्या अरबांच्या हल्ल्यांस तोंड देण्यांत गुंतला होता. याप्रमाणें या भिन्नदेशीय राजांस शत्रु मात्र एक होता हें आश्चर्यकारक होय. तसेंच ज्याप्रमाणें आस्ट्रियाचा ड्यूक ह्या नात्यानें चार्लस मार्टेल हा फ्रान्सच्या सार्वभौम राजाचा मांडलिक होता त्याचप्रमाणें बाप्पारावळ हाही चितोडच्या मोरी राजाचा मांडलिक होता. रावळ म्हणजे लहानसा राजा; डि. आर. भाण्डारकर म्हणतात त्याचप्रमाणें एक प्रकारचा यति नव्हे. ज्याप्रमाणें हल्लींही 'महाराज' हा शब्द ब्राह्मणास व यतीस लावण्यांत येतो त्याप्रमाणच "रावळ हा शब्द गौण अर्थानें बैराग्यानांही लावण्यांत येत असेल. परंतु महाराज हा शब्द मूळचा जसा मोठ्या राजांचा वाचक आहे त्याप्रमाणें 'रावळ' हा शब्दहि 'मांडलीक संस्थानिक' ह्या अथा मूळचा आहे उदेपुरच्या उत्तरेस नागदा (पूर्वींचे नागऱ्हद) नामक जें लहानसें गांव आहे तेथें बाप्पारावळ राज्य करीत असे, व अरवली पर्वताच्या दऱ्याखोऱ्यांवर व तेथें राहणाऱ्या भिल्ल वगैरे लोकांवर त्याचा अम्मल असे. मूळच्या वलभी राजघराण्याची एक शाखा प्राचीन काळीं इडर येथें प्रस्थापित झाली व त्याच्या कित्येक उपशाखा पसरल्या. त्यापैकीं बाप्पारावळाची उपशाखा होय. मूळची वल्लभी घराण्याची इडर शाखा गुहिलानें स्थापन केल्यानें तीस गुहिलवंश म्हणत असें दिसतें.

याप्रमाणें बाप्पारावळाची परिस्थिति शिवाजीच्या परिस्थितीशींहि जुळते. आणि शिवाजीप्रमाणेंच बाप्पारावळ हा अत्यंत स्वधर्माभिमानी होता व त्यासही गोहिंसक अरबांचा अत्यंत संताप आला होता. शिवाजीनें ज्याप्रमाणें डोंगरांत राहणारे मावळे आपलेसे

करून घेतले होते त्याप्रमाणें बाप्पारावळानेंहि दऱ्याखोऱ्यांत राहणाऱ्या भिल्ल लोकांस आपलेसें केलें होतें; व त्यांच्याच सहाय्यानें त्यानें प्रथम प्रथम अरबांचे हल्ले परतविले. या सुमारास अरबांचा जम हिंदुस्थानांत चांगलाच बसला होता. इ. सन ७१२ सालीं त्यांनीं सिंध प्रांतांत प्रथम प्रवेश करून तो प्रांत जिंकला व सिंध प्रांत हें आपलें मुख्य ठाणें करून त्यांनीं दक्षिण व पूर्व दिशांस स्वाऱ्या करण्याचा उपक्रम सुरू केला. अरबांच्या चितोडवरील स्वारीचा एका ताम्रलेखांत आलेला उल्लेख पहिल्या भागांत आलाच आहे. वाळवंटांतून प्रवास करण्याचा अरबांना नेहमीचाच सराव असल्यामुळें चितोडवर वारंवार हल्ले करणें त्यांना अत्यंत सुलभ होतें व त्यांनीं चितोडला उपद्रव देण्याचा सारखा सपाटा सुरू केला. उपरोक्त लेख म्हणजे नवसरी चालुक्य लेख असून ह्या ताम्रपटांत असें म्हटलें आहे कीं, अरबांनीं कच्छ, चावोटक व मौर्यांवर ( अर्थात हे चितोडचेच असावेत ) स्वाऱ्या केल्या. असो, बाप्पारावळ हा कट्टा शिवोपासक होता व तो नागदा प्रांतांत रहात असलेल्या हारीत नामक शैव साधु पुरुषाचा शिष्य होता. अचलगड व इतर शिलालेखांत असें म्हटलें आहे कीं, ' बाप्पाची निस्सीम भक्ति पाहून हारीत स्वामींनीं हा फार विख्यात होईल असें भविष्य वर्तविलें, व त्यास सार्वभौमाचें निदर्शक असें सुवर्णवलय दिलें.' वरील लेखावरून आपणांस असें अनुमानानें म्हणतां येईल कीं, हारीत ऋषीनें शिष्याची मोठेपणाचीं लक्षणें पाहून त्यास चितोडला जाऊन राजाच्या सैन्यांत नौकरी पत्करून मूर्तिभंजक व गोहिंसक म्लेच्छांस हतवीर्य करण्याचा उपदेश केला. वरील उपदेशानुसार बाप्पा चितोडला गेला असावा व हा चितोडचा सामंत असल्यामुळें ह्याचे स्वाधीन सैन्याची टोळी मोरी राजानें केली असावी व मुसलमा-

नांच्या स्वाऱ्या परतवण्याची कामगिरी त्याजवर सोंपविण्यांत आली असावी.

ज्याप्रमाणें पराक्रमी चार्लस मार्टल हा पुढें पारिसचा मेअर झाला तद्वतच बाप्पारावळाकडे सैनापत्याचे अधिकार हळूहळू सोंपविण्यांत आले असावे, व बाप्पारावळानें मार्टलप्रमाणेंच अरबांवर एका प्रचंड युद्धांत पूर्ण जय मिळविला. या विजयानें बाप्पारावळ अत्यंत विख्यात झाला आणि होता होता त्यास चितोडचें सार्वभौम पद प्राप्त झालें. या विषयीं बऱ्याच आख्यायिका आहेत. एक अशी आख्यायिका आहे कीं, चितोडच्या सर्व सरदारांनीं आपल्या राजाविरुद्ध बंड केलें व त्यास पदच्युत करून बाप्पारावळ यास सार्वभौमत्वाचे गादीवर बसविलें. वरील हकीकत कदाचित खरी असेल. चार्लसमार्टलच्या पेपिन-नामक पुत्रानेंही आपल्या नामधारी सार्वभौम राजास असेंच पदच्युत केलें व त्याचे सर्व अधिकार स्वतः पटकावले; तद्वतच अरबांच्यावर दाखवलेल्या पराक्रमामुळें बाप्पारावळाच्याहि मनांत महत्वाकांक्षा उत्पन्न होऊन त्यानें सार्वभौमपद पटकावलें असेल. परंतु बाप्पारावळाची धर्मश्रद्धा लक्षांत घेतां वरील गोष्टीचा संभव बराच कमी दिसतो. आम्हांला तर असें वाटतें कीं, चितोडचा राजा मरण पावला त्यावेळीं सिंधचे साहसी राजाप्रमाणें अथवा मराठेशाहींतील शाहूप्रमाणें त्यास कोणी संतान अगर वारस नसावा व चितोडच्या राजानें आपले अधिकार शाहूनीं ज्याप्रमाणें पेशव्याकडे, तसे बाप्पारावळकडे सोंपविले असावे. एवढें मात्र निश्चित कीं यानंतर मोरी घराणें लुप्त होऊन गुहिलोत घराणें चितोडास स्थापन झालें व आजतागायत तें अव्याहत चालू आहे. ज्याप्रमाणें फ्रान्स देशांत मार्टलचा नातू चार्लस दी ग्रेटनें मार्टल घराण्याची स्थापना केली त्याप्रमाणें राजपुतान्यांत चिरंतन अशा गुहिलोत घराण्याची स्थापना बाप्पानें केली. त्याच घराण्याच्या पुढें अनेकविध

शाखा झाल्या व त्या राजघराण्यांतील लोकांची संख्या आज मितीस एक लक्षांहून अधिक आहे.

चार्लस मार्टेल हा अल्पवयी होता, बाप्पारावळ हा दीर्घायुषी होता. त्यानें अनेक भार्या वरिल्या होत्या व त्यांस संततिहि बरीच झाली. तो इतका दीर्घकाल जगला कीं, राज्यकारभारास कंटाळून त्यानें युवराजाच्या स्वाधीन सर्व अधिकार केले व आपण शिवोपासक यति झाला. टॉडच्या म्हणण्याप्रमाणें तो उत्तर वयांत इराणांत गेला असावा व तेथें विवाहादिक करून राज्यस्थापना केली असावी. पण एकलिंगाच्या देवळावरील शिलालेख पाहतां* व बाप्पारावळची धर्मश्रद्धा लक्षांत घेतां त्यानें संन्यास धारण केला असावा हेंच जास्त संभवतें.

आतां बाप्पारावळाच्या जन्मशकाचा तसेंच तो चितोडच्या गादीवर केव्हां अधिरूढ झाला व त्यानें राज्यपदाचा केव्हां त्याग केला याचा विचार करूं. दन्तकथादिकांचा विचार करितां वि. संवत ८२० म्हणजे इ. स. ७६३ हा बाप्पारावळाच्या अधिकारत्यागाचा शक ठरतो, व तो चितोडच्या मानमोरी लेखांशीं बराच जमतो. ( पहा टॉड व्हा. नं २ मानमोरीच्या लेखांत असलेला वि. सं. ७७० म्ह० इ. स. ७१३) मोरी घराण्याचा मान हा शेवटचा पुरूष समजला जातो. त्यावरून पाहातां बाप्पारावळची कारकीर्द ७१३ पासून ७६३ पर्यंत केव्हां तरी सुरू

---

* टीपः—वरील हकीकत आम्ही शिलालेखांतील पुढील दोन श्लोकांवरून देत आहों. ते श्लोक असेः—" हारीतराशिवचनाद्वरमिन्दुमौलेरासाद्य स द्विजवरो नृपतिर्बभूव ॥ पर्यग्रहीन्नृपसुताः शतशः स्वशक्त्याजैषीश्च राजकमिलां सकलां बुभोज ॥ दत्वा महीमध्वगुणाय सूनवे नवेन्दुमौलिं हृदि भावयन्नृपः । जगाम बाप्पः परमेश्वरं महो महोदयं योगयुजामसंशयम् ॥

झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. अंदाजें पाहतां त्याच्या राज्यारोहणाचा काल इ. स. ७३० असावा. मेवाड येथील दंतकथाप्रमाणें हा काल इ. स. ७२८ असा टॉडनें दिला आहे. ( टॉड क्रुकची आवृ भा. १ पान २८९ ). अरबलोकांनीं ७१२ सालीं सिंध प्रान्त काबीज केला हें निश्चित आहे; व ह्यानंतरच त्यानीं राजपुतान्यावर स्वाऱ्या केल्या. मौर्य राज्यावरील स्वाऱ्यांचा काळ इ. स. ७३८ च्या पूर्वींचा धरला पाहिजे; कारण त्या वर्षाच्या नवसारी येथील ताम्र लेखांत या स्वाऱ्यांचा उल्लेख आला आहे. सारांश बाप्पारावळाच्या राज्यारोहणाचा काळ इ. सन ७३० धरावयास हरकत नाहीं. अर्थात् सरासरी ३३ वर्षें त्यानें राज्य केलें असावें. राज्यारोहणाचे वेळीं बाप्पारावळचें वयोमान काय असावें हें ठरविणें जरा कठीण आहे. अगदीं किमान वयोमर्यादा धरली तर बाप्पारावळाचें राज्याभिषेकाचे वेळीं वय ३० वर्षांचें असावें, व त्या मानानें त्याचा जन्मशक इ. स. ७०० असावा. जुन्या दंतकथांवरून व मेवाडच्या गुहिलोतांच्या दृढ समजूतीवरून बाप्पारावळचा जन्म शक सं. १९१ ठरला आहे. टॉडनेंही याच समजुतीचा अनुवाद केला आहे; व तो असें म्हणतो कीं, मेवाडचे भाट आणि खुद्द मेवाडचे त्यावेळचे राजेसाहेब हा शक सोडून देण्यास तयार नाहींत. (टॉड क्रूकची आ. भा. १ पान २६८). आतां वरील प्रमाणें मोरी वगैरेच्या लेखांवरून येणारा ७३० शक व दन्तकथांत वर्णन केलेला १९१ शक ह्यांची मिळवणी कशी व्हावी हें एक टॉडचे पूर्वीं झालेल्या इतिहासकारांस कोडेंच होतें, व टॉडनें तें उकलण्याचा प्रयत्नही केला आहे. टॉडच्या म्हणण्याप्रमाणें वल्लभी राजघराण्याचा उच्छेद इ. स. ५२४ सालीं झाला असावा व त्या सालापासूनच नवीन गणनेस आरंभ झाला असावा. परंतु कोरीव लेखांदिकांवरून आपणांस

असें निश्चित समजतें कीं वलभी घराण्याचा शेवटचा पुरुष इ. स. ७६६ त हयात होता, कारण त्यानें त्या सालीं दिलेली सनद उपलब्ध आहे; व म्हणूनच टॉडनें दिलेला शक चुकीचा आहे असें म्हणणें प्राप्त होतें. आमच्या मतें नवीन शकाची स्थापना वलभी घराण्याच्या उच्छेदापासून न धरतां वलभी घराण्याच्या संस्थापनेपासून धरली असतां वरतीं दिलेल्या १९१ शकाचा व इ. स. ७०० शकाचा मेळ बसवितां येतो. भटार्कानें इ. स. ५०९ मध्यें वलभी राज्याची स्थापना केली ( पहा. वंशावळ, भाग १ पा. २९० ). तेव्हां ५०९ मध्यें १९१ मिळवले असतां ७०० संख्या होते, व बाप्पारावळाचा जन्म शक ७०० हा ठरतो. वलभी घराण्याच्या इडर शाखेनें भटार्काचे स्मरणार्थ, त्याचे राज्यसंस्थापनेपासून शकास प्रारंभ केला असावा, व तेव्हांपासूनच तो शक प्रचारांत असावा. प्रसिद्ध पुरुषांच्या सन्मानार्थ नवीन शकाचा उपक्रम करण्याचा प्रघात हिंदुस्थानांत सर्वत्र दिसतो व अशा रीतीनें विचार केला तरच दन्तकथांत वर्णिलेल्या शकाचा व चिकित्सेनें ठरविलेल्या शकाचा योग्य मेळ बसतो.

आतां एवढेंच सांगावयाचें बाकी आहे कीं आमचे मतें "बाप्पा" हें एका व्यक्तीचेंच नांव आहे. बाप्पा शब्दाचा 'बाबा—साधुपुरुष' व पिता असाहि अर्थ संभवतो, व ह्या अर्थावरूनहि बाप्पा म्हणजे गुहिलोत घराण्याचा मूळ पुरुष असा अर्थ निघू शकेल, मग तो मूळ पुरुष आम्ही म्हणतों त्याप्रमाणें बाप्पा नांवाची व्यक्ति असो किंवा खुमान वगैरे वीरांचें तें विशेषण असो. कारण नेपाळ वगैरे ठिकाणीं कोरीव लेखांत मूळ पुरुष या अर्थीं बाप्पा शब्दाचा उपयोग केला आहे. ( उदा० बप्पपादानुध्यात ). तरी आमच्या म्हणण्याच्या यथार्थतेचा विचार आम्ही एका स्वतंत्र टिप्पणांत करणार आहोंत, तूर्त येथें इतकें

सांगणें पुरे आहे कीं, बाप्पा ह्या शब्दाचा व्यक्तिवाचक उपयोग पूर्वकाळीं प्रचलित होता; उदाहरणार्थ बप्पभट्टी हें तत्कालीन एका जैन आचार्याचें नांव प्रसिद्ध आहे व 'बप्पार्य' अशा नांवाचा उल्लेख तत्कालीन कोरीव लेखांत सांपडतो. हे नांव क्षत्रियवाचक देखील आहे असें इ.स.६५५च्या बगुम्रा सनदेंत असलेल्या दूतकाचें नांव श्रीवल्लभ बाप्पा असें नांव आलें आहे त्यावरून समजतें. ( इं. अं. १८ पा. २६९ )

---

# प्रकरण २ रें.

## बाप्पाच्या मागूनचे राजे.

बाप्पाराजानें स्थापन केलेले चितोडचें गुहिलोत राजघराणें जगाचे इतिहासांत अत्यंत विख्यात आहे. बाप्पाचे काळापासून म्हणजे इ. स. ७३० पासून आज तागायत म्हणजे सुमारे १२०० वर्षें तें घराणें अव्याहत चालू आहे; व त्या घराण्याचें ठिकाणहि आजतागायत पुर्वीचेंच आहे. फक्त सध्यां त्या घराण्याची राजधानी चितोड नसून उदेपूर आहे. पण चितोडहि अजून त्यांचेंच ताब्यांत आहे. याहून विशेष आश्चर्याची व कौतुकाची गोष्ट म्हटली म्हणजे या घराण्यांतील सर्व राजपुरुष सारखेच वीर्यशाली, प्रजाहितदक्ष व स्वातंत्र्यप्रिय होते. त्यांच्यावर कितीहि आपत्ति आल्या तरी त्यांनीं आपल्या धर्माचें एकनिष्ठतेनें पालन केलें. हे सर्व राजे आपणांस दाशरथि रामाचे वंशज म्हणवितात व त्यांना रामचंद्राच्या चारित्र्याचा व ब्रीदाचा मोठा अभिमान वाटतो. तसाच या घराण्याचा जो मूळपुरुष बाप्पा–जो आपल्या धर्म–शीलतेनें, स्वातंत्र्य–प्रियतेनें व

शूरत्वानें उदयास आला—त्याचाहि सर्वांस मोठा अभिमान वाटतो. चितोडगड व अचलेश्वर येथील लेखांमध्यें * बाप्पाचा जो गौरव केला आहे तो अगदीं यथार्थ आहे; तसेंच गुहिलोत घरण्याचा जो जागजागीं स्तुतिपर उल्लेख सांपडतो तोही उचित आहे. †

या घराण्याच्या निरनिराळ्या व परस्परांशी विसंगत अशा बऱ्याच वंशावळी उपलब्ध आहेत. त्यामुळें बाप्पाच्या वंशजांचा अनुक्रम ठरविणें कठीण झालें आहे. त्यांतून नुकत्याच सांपडलेल्या आटपुरालेखांत या वंशाचा बराच भिन्न असा क्रम आढळतो. टॉडलाही ‘ आटपुरालेख ’ माहीत होता, पण हल्लीं उपलब्ध झालेल्या लेखांतील यादी टॉडनें दिलेल्या यादीहून बरीच भिन्न आहे. पूर्वींच्या लेखांत उल्लेखिलेल्या राजांची संख्या— अर्थात पृथ्वीराजाचा

---

* बाप्पाची शंकरावरील एकनिष्ठ भक्ति पाहून त्यास सार्वभौमपदसूचक असें एक अंघ्रिवलय हारितानें दिल्याचा उल्लेख खालील लेखांत सांपडतो ‘‘संप्रासाद्भुतमेकलिंगचरणांभोजप्रसादात्फलं यस्मै दिव्यसुवर्णपादकटकं हारीतराशिर्ददौ। बाप्पाख्यः स पुरा पुराणपुरुषप्रारंभनिर्वाहनातुल्योत्साह गुणो बभूव जगति श्रीमेदपाटाधिपः ( भा. ले. पा. ७५ ). तसेंच हारीतात्किलबप्पकोऽघ्रिवलयं व्याजेन लेभे महः क्षात्रं धातृनिभाद्वितीर्य मुनये ब्राह्मं स्वसेवाच्छांलात् ॥—परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं बाप्पा हा ब्राम्हण व हारीत हा क्षत्रिय होता. कवीचा असा आशय आहे कीं बाप्पाची एकलिंगजीवरील निष्ठा ब्राम्हणास साजेल अशी होती व त्याला जो हारीतमुनीकडून प्रसाद मिळाला तो क्षत्रियांस अनुरूप असा होता.

† गुहिलोत घराण्याचा मोठेपणा खालील श्लोकांवरून व्यक्त होतो—यद्वंशो गुहिलस्य राजभगवन्नारायणः कीर्त्यते तत्सत्यं कथमन्यथा नृपतयस्तं संश्रयन्तेतराम् । मुक्तेः कल्पितवेतसः करतलव्यासक्तदण्डोज्वलाः प्राणत्राणाधियः श्रियः समुदयैर्न्यस्तापदस्ताःसदा ॥ एतेऽद्यापि महीभुजः क्षितितले तद्वंशसंभूतयः शोभन्ते सुतरामुपात्तवपुषः क्षात्रा हि धर्मा इव ॥ पान ८५ भावनगर इन्स्क्रिप्शन्स.

समकालीन जो समरसिंह त्याच्या पावेतों—तीस आहे. म्हणजे सरासरी प्रत्येक राजाची कारकीर्द ( १२००—७३० = ४७०) १५ वर्षांची ठरते; व ते बरेचसें संभवनीय दिसतें. परंतु या नवीन आटपुरालेखांप्रमाणें बाप्पारावळपासून फक्त शक्तिकुमारापर्यंत २० राजे होऊन गेले असें म्हटलें आहे. शक्तिकुमाराचा इ. स. ९७७ सालच्या एका लेखांत उल्लेख मिळतो; म्हणजे प्रत्येक राजाची कारकीर्द सुमारे ११ वर्षांची पडते. सकृद्दर्शनीं हे प्रमाण जरा असंभवनीय वाटतें. परंतु त्याबरोबर आपणास तत्कालीन परिस्थितीचाहि विचार केला पाहिजे व ती परिस्थिति लक्ष्यांत घेतां आटपुरालेखांत दिलेला अनुक्रमही खरा असूं शकेल. तो काळ शांततेचा नव्हता. अरबलोकांनीं सिंध प्रांत काबीज केला असून त्यांच्या स्वाऱ्यांचा सपाटा सारखा चालू होता; व त्यामुळें क्षत्रियवीरांस धारातीर्थीं आपले देह वारंवार अर्पण करावे लागत. फार कशाला, अल्लट, नरवाहन, शालिवाहन आणि शक्तिकुमार ह्या चौघांची मिळून २६ वर्षांची ( म्हणजे वि. १००८ ते वि. १०३४ ) कारकीर्द होती असा उल्लेख सांपडतो. अशा तऱ्हेनें विचार केला तर नवीन उपलब्ध झालेला ‘ आटपुरालेख ही ’ खरा असूं शकेल,

किंवा त्या नवीन उपलब्ध लेखाची निराळीच उपपत्ति बसवावी लागेल व ती अशीः—टॉडने आपल्या यादीसंबंधी अशी कल्पना बसविली आहे कीं त्या यादींतील राजांचा अनुक्रमवारी नामनिर्देश एकाच शाखेचा नसून गुहिलवृक्षाच्या अनेक शाखांच्या समकालीन राजांचा संकलित क्रम असेल. आंता गुहिल घराणाच्या बऱ्याच शाखा होत्या हें आपणांस चितोडगड लेखावरून* समजतें, व त्या

* शाखोपशाखाकुलितः सुपर्वा गुणोचितः पत्रविभूषितांगः। कृतास्पदो मूर्द्धनि भूधराणां जयत्युदारो गुहिलस्य वंशः ( B. I. भा. ३, पा. ८५.)

अनेक शाखांत ह्या यादींत दिलेलीं नावें विभागावी व त्या प्रमाणें प्रत्येक शाखेच्या समकालीन राजाची कारकीर्द काढावी.—एकंदरीनें आज आपणांस बाप्पाचा वंशजांचा क्रम व कारकीर्द निश्चयें करून ठरवितां येणार नाहीं हें खरें. तरी पण चितोडगड व अचलेश्वर येथील लेखांस अनुसरूनच आम्ही बाप्पारावळाच्या वंशजांचा क्रम ठरविणार आहों. आटपुरा लेखाच्या नवीन प्रतींत शील व अपराजित राजांचा उल्लेख सांपडतो—पण ह्या दोन्ही राजांचे सातव्या शतकांतील लेख उपलब्ध आहेत, त्यावरून शील व अपराजित हे बाप्पाचे पूर्वजही असावेत व त्यांचीच नांवें बाप्पाच्या अनुवंशजांना दिलीं असावीं असें अनुमान निघतें.

बाप्पानंतर मेवाडचे गादीवर गुहिल राजा आला. त्याची सर्व कारकीर्द शत्रूशीं लढण्यांत गेली. मध्ययुगांतील सर्वच राजांना आरबांशीं तोंड द्यावें लागें; व ह्या काळीं आरबांच्या स्वाऱ्यांचा व रजपुतांच्या उलट हल्ल्यांचा इतका कहर उडाला कीं, त्या प्रदेशभर सर्वत्र मांस व रक्त यांचा सडा शिंपडला गेला व त्या देशास ' मेदपाट ' *( म्हणजे प्राकृत भाषेंत मेवाड ) असें अन्वर्थक नांव प्राप्त झालें. मेदपाट हें नांव जरा अतिशयोक्तीचें वाटतें पण त्यावरून आरब व रजपूत यांजमध्यें किती घनघोर युद्ध चाललें होतें तें उघड होतें. असो, गुहिलानें बाप्पारावळपासून निघालेल्या शाखेस आपलें नांव चालू केलें व ही शाखा गुहिलोत नांवानें प्रसिद्ध आहे. [ गुहिलोत = संस्कृत गुहिलपुत्र; ओत ( पुत्त ) हा प्रत्यय वंशज या अर्थीं राजपुतान्यांत प्रसिद्ध आहे ].

---

* मेदःक्लेदभरेण दुर्जनजनस्याप्लावितः संगरे । मेदपाटाभिधः

गुहिलानंतर भोजराजा गादीवर बसला व भोजानंतर शीलास राज्यपद मिळालें. ह्या दोघांसहि अरबांशीं तीव्र संग्राम करावा लागला, पण त्यांच्या मागून गादीवर झालेल्या कालभोजास अरबांशीं फारच दारुण युद्ध करावें लागलें. कालभोजानंतर त्याचा पुत्र भर्तृपट्ट यास राज्यपद मिळालें; व भर्तृपट्टानंतर सिंहराजा राज्य करूं लागला. त्यासर्वांची कारकीर्द शत्रूशीं लढण्यातच गेली व हे सर्वहि सारखेच रणगाजी निघाले. सिंहानंतर त्याचा मुलगा महायक गादीवर बसला त महायकानंतर खोम्माणास अभिषेक झाला. प्राचीन शिलालेखांत खोम्माणाच्या पराक्रमाची विशेष वर्णनें आढळतात.' आटपुरालेखांत आणखी दोन खोम्माणांचा उल्लेख आहे. त्यापैकीं एक कालभोजाचा मुलगा असावा; व दुसरा सिंहराजाचा मुलगा असावा. आतां सहजच असा प्रश्न उपस्थित होतो कीं कोणत्या खोम्माणाच्या कारकीर्दींत हे युद्धाचे विशेष प्रसंग आले असावेत. टॉडनें खोम्माणरासा ह्यानांवांच्या एका काव्याचा आधार घेऊन ह्या युद्धप्रसंगीं चितोडच्या बाजूनें कोणकोणत्या देशाचे राजे लढले यांची याद दिली आहे; व त्याचप्रमाणें मुसलमानांच्या निरनिराळ्या स्याऱ्यांचाहि अहवाल दिला आहे. तो विचारांत घेतां ती स्वारी ९ व्या शतकाच्या प्रारंभीच झाली असावी असें वाटतें. बाप्पारावळापासून ( म्हणजे इ. स. ७६४ पासून ह्या स्वारीपर्यंतच्या कालाची ( म्ह. अजमासे इ. स. ८२९ ) गणना केली तर सरासरी ६१ वर्षांचा हा काळ ठरतो; व एवढ्या कालांत पांच राजे होऊन जाणें अगदीं स्वाभाविक आहे. अचलेश्वरादि लेखांत बाप्पा—ते—महायक पावेतों जीं नांवें आहेत त्याहून अधिक नांवे आटपुरालेखांत सांपडतात. ( पहा इंडियन

एन्टिक्करी ३९ पा. १९१ ) व ह्या नवीन लेखांप्रमाणें पाहतां ८२९ चे सुमारास कालभोजाचाच पुत्र खोम्माण राजा होता व त्यानेंच अरबांशीं घनघोर संग्राम केला असें सिद्ध होतें.

खोम्माणरासा नामक काव्य आमच्या प्रत्यक्ष अवलोकनांत अद्याप आलें नाहीं व त्यामुळें इतिहासदृष्ट्या तें कितपत विश्वसनीय व महत्त्वाचें आहे हें ठरवितां येत नाहीं. ह्या काव्यांत चितोडच्या संरक्षणाकरतां कोणकोणत्या देशाचे राजे आले वगैरे सांगितले आहे. परंतु अशा काव्यांतील माहिती कितपत विश्वसनीय असते हा प्रश्न राहतोच. ज्याकाळीं कवि काव्य लिहितो त्याकाळीं कवीस माहित असलेल्या सर्व जातींचा तो आपल्या काव्यांत समावेश करतो. त्यामुळें इतिहासाच्या दृष्टीनें अशीं काव्यें गौण ठरातात. होमरनें देखिल आपल्या इलियड नामक काव्यांत सर्व ग्रीक वीरांचा व जातींचा अनेक वेळां उल्लेख केला आहे. त्यावरून होमरच्या वेळीं इतक्या जाति अस्तित्वांत असाव्यात असा बोध होईल. पण ट्रोजन लढाईच्यावेळीं त्या सर्व जाति अस्तित्वांत असतीलच असें नाहीं. तरी पण त्या काव्यावरून एवढें दिसतें कीं बऱ्याच रजपुतांच्या जाति चितोडच्या बाजूनें अरबांविरुद्ध लढल्या असाव्या. अशा तऱ्हेची रजपूतांची एकजूट गिजनीचा महमद ज्यावेळीं हिंदुस्थानांत स्वारी करण्याकरितां आला त्यावेळीं व पृथ्वीराजाचा शहाबुद्दीनशी जो संग्राम झाला त्यावेळींहि दिसली.

तिसऱ्या खोम्माणानंतर अल्लट नांवाचा अत्यंत पराक्रमी पुरुष गादीवर बसला. त्याच्या आईचें नांव महालक्ष्मी असून ती मूळची

राष्ट्रकूट घराण्यांतील होती.* अल्लटाचे मागून त्याचा पुत्र नरवाहन हा गादीवर बसला; त्या नरवाहनाचा एक स्वतंत्र लेख मिळतो. त्यांत अल्लटाच्या मातेचें नांव महालक्ष्मी होतें इतकाच उल्लेख आहे पण त्यांत तिच्या बापाच्या घराण्याचा उल्लेख नाहीं. त्यामुळें तो खोम्माण अगर आटपुरालेखांत म्हटल्याप्रमाणें भर्तृपट्टाचा मुलगा असावा. अल्लटानंतर त्याचा पुत्र नरवाहन यास राज्यपद प्राप्त झालें व नरवाहनानंतर शक्तिकुमार राज्य करूं लागला. परंतु आटपुरालेखांत नरवाहन व शक्तिकुमार यांच्या दरम्यान शालिवाहनाची कारकीर्द झाली असा उल्लेख आहे. या शक्तिकुमाराच्याच वेळेचा हा प्रस्तुत ' आटपुरा ' लेख होय व त्याचा शक विक्रमसंवत् १०३४ ह्मणजे इ. स. ९७७ असा आहे. शक्तिकुमारानंतर शुचिवर्म्याची कारकीर्द झाली. ह्या शुचिर्म्याचा १०२८ वि. सं. मधील शिलालेख उपलब्ध आहे. चितोडच्या लेखांत नरवाहनापर्यंतची नांवे दिली आहेत. अचलेश्वर लेखांत मात्र समरसिंहापर्यंत ( ह्म. वि. स. १३३८ ) सर्व राजांची वंशावळ दिली आहे. असो, ह्या भागांत शुचिवर्म्यापर्यंतच आम्ही इतिहास देत आहोत. शुचिवर्म्यानंतर जे राजे झाले त्याचप्रमाणें गिजनीच्या महमदानें ज्यावेळीं राजपुतान्यावर स्वारी केली त्यावेळीं चितोडच्या गादीवर कोण राज्य करीत होता, वगैरेचा विचार आह्मी पुढील भागांत करूं.—

---

* यासंबंधें अमोघवर्षाच्या इ. स. ८६६ च्या निलगुंद लेखांत असा उल्लेख मिळतो कीं अमोघवर्षानें गुजर( अर्थात कनोजचे ) जिंकले व चित्रकूट किल्यांतील राजांचा पाडाव केला. त्यावरून चितोडच्या राज्याची प्रबळ राष्ट्रांत गणना त्याकाळीं होत असावी, व त्याराष्ट्राचें व दक्षिणेंतील राष्ट्रकूट राज्याचें युद्ध झालें असावें असें दिसतें.

गुहिलोत घराण्याचीं बाप्पारावळपासून—शक्तिकुमारापर्यंतच्या राजांची वंशावळ सांगून तुलनेकरतां अर्स्किनसाहेबांच्या मेवाड गॅझीटीयरमधील राजांचा क्रमाचा उतारा देऊन, व आमच्या म्हणण्याच्या स्पष्टीकरणार्थ कांहीं टीपा देऊन हें प्रकरण पुरें करतो.

---

## टिपण्णी

निरनिराळ्या लेखांतून वर्णिलेल्या गुहिलोत घराण्याची वंशावळः— डि. आर. भांडारकरांच्या इंडियन एन्टिकरी व्हा० ३९ पा ८८ व मेवाड गझीटीयरमध्यें दिल्या आहेत त्या अशा

| | आटपुरालेख | अचलगडलेख | बाणपुरालेख | इ. स. |
|---|---|---|---|---|
| | ( संवत १०३४ ) | सं. १३४२ | सं. १४०९ | |
| | गुहादित्य | बाप्पा—राज संन्यास सं० ८२० | बाप्पा | ७६३ |
| | १ गुहिल | गुहिल | गुहिल | |
| | २ भोज | भोज | भोज | |
| | ३ महेंद्र | ॥ | | |
| | ४ नाग | ॥ | | |
| १ × | ५ शील | शील | शील | |
| × | ६ अपराजित | ॥ | | |
| | ७ महेंद्र (२रा) | ॥ | | |
| २ { | ८ कालभोज | कालभोज | कालभोज | |
| | ९ खोम्माण | ॥ | ॥ | |
| | १० महायक | ॥ | ॥ | |
| | ११ भर्तृपट्ट | ॥ | ॥ | |
| | १२ सिंह | सिंह | सिंह | |
| | १३ खोम्माण (२रा ) | ॥ | ॥ | |
| | १४ महायक | महायक | महायक | |
| | १५ खोम्माण | खोम्माण | खोम्माण | |

१६ भतृपट्ट २ रा ९३६

( त्याची पट्टाभिषिक्त राणी राष्ट्रकूटची असून तिचें नांव महालक्ष्मी असें होतें.

१७ अल्लट अल्लट अल्लट

१८ नरवाहन नरवाहन नरवाहन ९५१

वि. सं. १०२८

१९ शालिवाहन ॥ ॥

२८ शक्तिकुमार शक्तिकुमार शक्तिकुमार ९७७

वि० १०३४

२१ शुचिवर्मन् वि. सं. १०३८ इ. स. ९८१ ते १०००

टीपः—१ विक्रम संवत ७०३ मधील वरील नांवांचा उल्लेख असणारा लेख लांपडला आहे. पण त्यांत उल्लेखिलेला राजा हा नव्हे असें आह्मास वाटतें.

टीपः—२ भांडारकरांदिकांचें असें मत आहे कीं कालभोज किंवा खोम्माण म्हणजेच बाप्पा राजा होय व कालभोजापासून हा वंश वृद्धि पावला असें ते प्रतिपादितात, कारण त्यांच्या मतें गुहादित्यापासून वंशवृक्ष धरिल्यास ८१० वि. सं० ते १०३४ पर्यंत एकंदर २० कारकीर्दी होतात व प्रत्येक राजाच्या वाटणीस फारफार तर १०च वर्षें पडतात. आतां खोम्माण म्हणजे बाप्पराजा असें समजलें असतां प्रत्येक राजाची कारकीर्द २० वर्षांची ठरते ( वि.सं. १०३४—८१० = २२४ = २०वर्षें ). पण प्रत्येक राज्याच्या कारकीर्दीचीं वर्षें काढण्याकरितां बऱ्याच पूर्वजांची खची करावी लागते व गुहिल, भोज, शील, व कालभोज ह्यांस लुप्त करावें लागतें. अचलगड लेखांत बाप्पानंतर ह्या राजांच्या नांवाचा उल्लेख सांपडतो, त्यामुळें हे राजे होऊन गेले असावेत हें जास्त संभवनीय आहे. नरवाहन लेख तर त्याहून जास्त जुना त्यांतही बाप्पा नांवाचा उल्लेख आहेच. त्यामुळें केवळ कांहीं राजांचीं नांवें कमी करून एकंदर राजांची केवळ कारकीर्द वाढवणें हें गैर होय. सर्व राजांचा कारकीर्दी छोट्या असणेंहि संभवतें किंवा आटपुरालेखांत तत्कालीन निरनिराळ्या

शाखांच्या वंशांतील एकत्र दिल्या असतील; वरील दोन्ही पक्ष संभवतात; पहिल्याचें कारण त्यावेळीं राजपुतान्यांवर आरबांच्या झपाट्यानें स्वाऱ्या होत असत. दुसऱ्या पक्षांत शालिवाहनाचें नांव आटपुरा लेखांत सापडतें एवढ्यावरून तर्क काढण्यास आधार सांपडतो; कारण शालिवाहनाचें नांव चितोडच्या राजवंशात येणें अशक्य; शालिवाहनाची राजधानी अटपुरा येथें होती; आटपुरा येथील राजे हे चितोडच्याच शाखेचे असावेत व त्यामुळें त्यांचींही नांवें चितोड वंशावळींत दिलीं असावीत.—फक्त अचलगड लेखांवर जर भिस्त ठेविली तर वि. सं. ८१० ते १०३४ पर्यंत म्हणजे बाप्पापासून शक्तिकुमारपर्यंत आपणांस ११ च राजांचीं नांवें आढळतात; म्हणजे प्रत्येकाची कारकीर्द साधारणपणें २० वर्षांची ठरते.

थोडक्यांत सांगावयाचें तर बाप्पा हें खोम्माणाचें उपनाव नसून आटपुरा-लेखांत प्रथमच उल्लेखिलेल्या गुहादित्याचें होऊं शकेल; आटपुरालेखांत उपशाखेच्याहि नांवाचा उल्लेख असेल तेव्हां साधारणपणें अचलगड लेखाचा क्रमच जास्त विश्वसनीय ठरतो.

---

## टिपणी २ गुहिलोत मूळचे विदेशी अनार्य होते काय ?

रा. डी. आर. भाण्डारकर यांनीं गुहिलोत घराण्याच्या पूर्वेतिहासावर एक निबंध लिहिला आहे. (पहा बेंगाल ग. ए. सो. नवी सेरिज व्हॉ. १ पा. १६७ ते १८७). त्यांत त्यांनीं असें प्रतिपादिलें आहे कीं मेवाडच्या गुहिलोत राजघराण्याचा मूळ पुरुष गुहदत्त नांवाचा एक नागर ब्राह्मण होता. तो मूळचा वडनगरचा रहिवाशी असून मेर जातीचा होता. "वास्तविक पाहतां वलभीचे मैत्रक व नागर लोक हे मूळचे हिंदू रहिवाशी नव्हेत. सहाव्या शतकाच्या प्रारंभीं त्यांनीं गुर्जरांप्रमाणें हूण लोकांसमवेत हिंदुस्थानांत प्रवेश केला." अशा तऱ्हेनें एका भ्रामक विधानानें मि. भाण्डारकरांनीं तीन उच्चतम जातींचा अधःपात करण्याचें श्रेय घेतलें आहे. सर्व हिंदुस्थानभर अस्सल क्षत्रिय म्हणून ज्यांस मान मिळतो त्या गुहिलोत घराण्यास त्यांनीं हीणकस ठरवलें आहे, व त्यांच्या पूर्वजास म्हणजे वलभी घराण्यास परदेशीयत्वाचा शिक्का मारला आहे व

ब्राह्मण वर्गातील एका श्रेष्ठ पोटजातीस म्हणजे नागर ब्राह्मणांना मेर म्ह० अनार्य बनवलें आहे!!! अशा रीतीनें तीन शाखांवर एकदम आघात होत असल्यामुळें वरील विधानांच्या समर्पकतेचा विचार करणें अवश्य झालें आहे.

प्रथमतः भाण्डारकरांचा काय युक्तिवाद आहे तो पाहूं व तो कितपत साधार व तर्कसिद्ध आहे तें मागाहून ठरवूं. ज्या आधारावर भाण्डारकरांनीं आपली इमारत रचली आहे तो असाः—'अलीना लेखांत कांहीं नागर ब्राह्मण प्रतिग्रहीतारांची नांवें दिलीं आहेत. ह्या नांवाच्या शेवटीं "मित्र" असा प्रत्यय आहे.' एवढ्यावरूनच मित्र प्रत्ययान्त नांवें नागर ब्राह्मणांचींच असतात असें त्यांनीं गृहीत धरलें आहे व त्यावरून वलभी राजे ह्यास ज्या अर्थी मैत्रक म्हणतात त्या अर्थी ते नागरच असावेत निदान ते एकाच "मित्र" शाखेचे विभाग असावेत असें अनुमान काढलें आहे. (पा. १८३) व ह्यावरून पुढें असा तर्क बांधिला आहे कीं, 'ज्या अर्थी मित्र व मिहिर एकाच आदित्याचे वाचक शब्द आहेत त्या अर्थी मैत्रक व मिहिर हे एकच असावेत म्हणजे मैत्रक व मिहिर ह्या मेर अथवा 'मऱ्ह' लोकांच्याच उपजाति ठरतात. आतां मैत्रक (म्ह० वलभी) घराणें इ. स. ५०० चे सुमारास म्हणजे ज्या काळीं हूण लोकांनीं हिंदुस्थानांत प्रवेश करून तो जिंकण्यास आरंभ केला त्या वेळींच मैत्रक घराणें उदयास आलें " ह्यावरून असें दिसतें कीं (निश्चित नव्हे!) गुर्जरांप्रमाणेंच मैत्रक जातीचे हे लोक एक विशिष्ट विदेशीय असावेत व त्यांनीं हूणांसमवेतच हिंदुस्थानांत प्रवेश केला." "पूर्वींची अशी पद्धती असे कीं परकीय लोक हिंदुस्थानांत वसति करून राहूं लागले म्हणजे त्यांतील धर्मगुरु(Priest) लोक ब्राह्मण ठरत व त्यांतील क्षात्रवृत्तीचे लोक क्षत्रिय समजत. ह्या रीतीप्रमाणें गुहिलोत लोक मूळचे विदेशीय मेर होत त्यांनीं हिंदुस्थानांत वसति केल्यावर त्यांस एतद्देशीय लोक क्षत्रिय मानूं लागले.' थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे भाण्डारकरांचें म्हणणें खालीलप्रमाणें आहेः—नागर ब्राम्हण हे मूळचे मित्र म्हणजे मेर जातीचे विदेशीय लोक होत. गुहिलोत घराण्याचा मूळ पुरुष नागर असल्यामुळें गुहिलोत घराणें विदेशीय ठरतें.

बरें, गुहिलोत घराणें ही वलभी घराण्याची शाखा धरली तरी तें विदेशीय ठरतें; कारण वलभी राजे आपणांस मैत्रक म्हणवीत म्हणजे त्यांचा मेर लोकांशीं संबंध आलाच. एकंदरीनें गुहिलोत घराण्याचा मूळ पुरुष एक नागर ब्राम्हण समजला काय किंवा गुहिलोत घराणें हें वलभीच्या मैत्रक घराण्यापासून उत्पन्न झालें काय, एतावता, कोणताहि पक्ष स्वीकारला तरी गुहिलोतांचे पूर्वज मेर नांवाचे विदेशीय लोक ठरतात."

इंग्रजी तर्कशास्त्रांत ज्यांस डॉयलेमा म्हणतात तशा तऱ्हेच्या पद्धतीचा युक्तिवाद मांडून भाण्डारकरांनीं आपल्या विधानास पुष्टी देण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या युक्तिवादांत दोन पक्ष अथवा विकल्प आहेत, कोणत्याहि पक्षाचा अवलंब केला तरी सिद्धान्त एकच ठरतो. अशा युक्तिवादाच्या पद्धतींत नेहमीं दोष असतोच असें नाहीं. दोष बहुधा प्रमाणांतच सांपडावयाचा. म्हणजे विकल्पांतील कोणती तरी एक प्रतिज्ञाच सदोष ठरावयाची. म्हणूनच आतां अनुमानांतील एकाच प्रमेयाचा आपण विचार करूं. अनुमानांतील पहिलें प्रमेय दोषपूर्ण आहेच. गुहिलोत घराण्याचा मूळ पुरुष नागर ब्राम्हण धरिला तरी (वास्तविक पाहतां हें विधान शंकनीयच आहे) एवढ्यावरून गुहिलोत विदेशीय होते असें सिद्ध होत नाहीं. कारण हें ज्या जोरावर ठरविणार तो सांखळीचा दुवाच तुटका आहे. मित्र व मिहिर ह्या शब्दांचा कांहीं संबंध नाहीं. त्यामुळें मित्र ह्या शब्दाचा काठेवाडांतील नीच जातीचा वाचक जो मेहर शब्द त्याच्याशीं कसाही संबंध जोडतां येत नाहीं. पहिल्या प्रमेयाचें हें संक्षेपतः निराकरण झालें पण ह्याहून कठिण व विशेष भानगडीचा व महत्वाचा असा दुसरा प्रमेयहि प्रश्न आहे. कारण ह्या प्रमेयानें मेवाडच्या राजघराण्याच्या परंपरेस जबरदस्त धक्का दिला आहे. मेवाडच्या रजपुतांची अशी ठाम समजूत आहे कीं मेवाडचें गुहिलोत घराणें भट्टार्कानें स्थापन केलेल्या वलभीच्या राजघराण्यापासून निघालें आहे आणि भट्टार्काचा वंशसंबंध कनकसेनाशीं असून कनकसेन हिंदुस्थानच्या सूर्यवंशी रामचंद्राच्या वंशांत उत्पन्न झाला आहे.

असो, भाण्डारकरांनीं आपल्या याच्या उलट बनविलेल्या सिद्धान्तास बऱ्याच प्राचीन लेखांचा आधार घेतला आहे हें खरें, पण त्याबरोबर

त्यांनीं हे लेख चिकित्सेच्या व परंपरेच्या कसोटीस लावणें जरूर होतें. ज्याप्रमाणें न्यायासनासमोर एकाच बाजूच्या अनेक साक्षीदारांची कसोशीनें तपासणी करावी लागते व सत्यासत्याचा निर्णय करावा लागतो त्याप्रमाणें शिलालेखांचेंहि आहे. ही एखादी गोष्ट शिलेवर किंवा तांब्यावर लिहिली आहे म्हणून ती सत्यच असली पाहिजे असें नाहीं. बाप्पारावळ हा नागर ब्राम्हण होता कां क्षत्रिय होता हें निर्धोकपणें ठरविण्यास बाप्पाच्या समकालीन लेख आज उपलब्ध नाहीं. बाप्पारावळाचा काळ साधारणपणें इ. स. ७०० ते ७६४ असा ठरतो; परंतु त्या कालांतील असें एकहि प्रमाण उपलब्ध नाहीं कीं ज्या योगें बाप्पारावळाच्या चारित्र्यावर निर्धोक प्रकाश पडेल. दुसरें असें कीं बाप्पारावळसारख्या महशूर व विख्यात अशा मूळ पुरुषांसंबंधीं अनेक विस्मयजन्य अशा दन्तकथा रचिल्या जाव्या हें अगदीं साहजिक आहे. अशा दन्तकथांपैकीं बऱ्याचशा अतिशयोक्तीनें युक्त असतात व त्यामुळें विश्वसनीय असतातच असें नाहीं. बाप्पारावळाविषयीं अशी एक दन्तकथा मेवाडांत अद्याप सांगण्यात येते कीं, बाप्पारावळ (अथवा कोणी त्याचा पूर्वज) ची आई ही पट्टाभिषिक्त राणी असून तिच्या नवऱ्यावर परकीयांनीं स्वारी केली व त्यास पदच्युत करून त्याचे सर्व कुलाचा व राज्याचा नाश केला. अशा स्थितींत ती राणी जंगलांतून पळवाट काढून जात होती. मार्गांतच ती प्रसूत झाली व तिच्या पोटीं बाप्पा जन्मास आला. पण ही कथा खरी असेल असें नाहीं. अशा तऱ्हेच्या गोष्टी अनेक राज्यसंस्थापकांविषयीं उपलब्ध आहेत. पाटणच्या वनराजाच्या जन्मासंबंधीं अशीच हकीकत आहे. दक्षिणेंतील वंशस्थापकासंबंधीं असेंच सांगण्यांत येतें,—नव्हे अशा तऱ्हेचा शिलालेखांत उल्लेख सांपडतो. ही बाप्पाविषयींची कथा माननीय दिसत नाहीं. शिवाय निश्चित पुराव्यावरून असें सिद्ध झालें आहे कीं वलभीचा शेवटचा राजा इ. स. ७६६ त जिवंत असून वलभीच्या राज्यावर होता. म्हणजे बाप्पारावळाची कारकीर्द ७६३ त संपली, त्यानंतर सुद्धां वलभीचा शेवटचा राजा चार वर्षेंपर्यंत वलभीच्या गादीवर होता. यासाठीं प्रथम हें पाहिलें पाहिजे कीं

कोणतीही दंतकथा उत्पन्न होणें साहजिक आहे कीं काय आणि अशा दन्तकथांस तत्कालीन लेखांचा पुरावा कितपत मिळतो ?

तेव्हां आतां बाप्पाविषयीं ज्या अनेक आख्यायिका उपलब्ध आहेत त्यांत कितपत तथ्यांश आहे हें तत्कालीन प्रमाणांवरून ठरवूं. बाप्पारावळ हा जातीनें ब्राह्मण होता अशाविषयीं पहिला स्पष्ट उल्लेख चितोडगड व अचलेश्वर लेखांत सांपडतो. हे दोन्ही लेख एकाच्याच हातचे आहेत व ते अनुक्रमें इ. स. १२७४ व १२८५ म्हणजे बाप्पानंतर ५०० वर्षांनीं लिहिले गेले आहेत. त्यांत बाप्पारावळ हा मूळचा आनंदपुरा येथील विप्र होता असें स्वच्छ सांगितलें आहे.

"जीयादानन्दपूर्वं तदिह पुरं......यस्मादागत्य विप्रः......बाप्पाख्यो', अचलेश्वर लेखानंतर जे लेख लिहिले गेले त्यांनीं वरील परंपरेचा केवळ अनुवाद केला आहे. उदाहरणार्थ एकलिंग महात्म्य व एकलिंग लेखांत असेंच विधान मिळतें; एकलिंग लेखांत तर असें उघड सांगितलें आहे कीं आम्ही फक्त पूर्व कवींचीं वचनेंच प्रमाण सांगत आहों; ह्या पूर्व कवींपैकीं आटपुरा लेखांतील विधानाचा आपणास अवश्य विचार केला पाहिजे. कारण तो लेख बाप्पानंतर ३०० वर्षांनीं—तरी पण अचलेश्वर लेखांपूर्वीं २०० वर्षें आधीं लिहिला गेला आहे. त्या लेखांत वरील अचलेश्वर विधानास थोडी पुष्टि देणारा श्लोक सांपडतो तो असाः—"आनन्दपुराविनिर्गत विप्रकुलानन्दनो महीदेवः। जयति श्रीगुहदत्तः प्रभवः श्री गुहिल वंशस्य."—

हा श्लोक नीट न समजल्यामुळेंच पुढील लेखकांचा घोटाळा उडाला असावा असें आम्हांस वाटतें; पृथ्वीराज रासांतील श्लोकांचा योग्य अर्थ न कळल्यामुळें अग्निकुलासंबंधीं कशी भलतीच उत्पत्ति लावली गेली हें पूर्वीं दाखविलेंच आहे. प्रस्तुत ह्या श्लोकांतील पदांचा स्वतंत्र विचार करूं प्रथम " आनंदपुराविनिर्गतः—यांतील नागर ब्राह्मणांचें पूर्व निवासस्थान जें वडनगर त्याचाच पर्यायवाचक 'आनंदपुर' हा शब्द आहे ह्यास कोणतेंच प्रमाण नाहीं. भाण्डारकरांना ही गोष्ट मान्य आहे. उलट गुहिलोत रजपुतांचें पूर्वनिवासस्थान जें अटपुरा त्यासही आनंदपुर हें नांव होतें.

इतकेंच काय पण आनंदपुर हें नांव बऱ्याच गांवांचें आहे. मग आनंदपुरानें वडनगरचाच अचुक बोध व्हावा हें संभवतच नाहीं. दुसरें, वरील चितोड लेखांवरून यांतील आनंदपुर म्हणजे नागऱ्हदच होय असें स्पष्ट दिसतें. कारण प्रथम श्लोकांत नागऱ्हदाचें वर्णन करून जीयादानन्दपूर्वं तदिह पुरमिळा—असा त्याचाच निर्देश आहे. गुहिलोत घराण्याचा संस्थापक नागर जातीचाच ब्राह्मण होता असेंहि पण ह्या श्लोकावरून सिद्ध होत नाहीं. उलट असेंहि म्हणतां येईल कीं तो नागर ब्राम्हण नसावाच; असता तर ही गोष्ट अचलेश्वर व चितोडचा लेख लिहिणाऱ्यानें मोठ्या अभिमानानें नमूद केली असती; कारण ह्या लांबलचक काव्यात्मक प्रशस्तींचा (राजांचे स्तुतिपर लेख) लेखक स्वतः नागर ब्राम्हण होता, हें आपणांस त्या काव्यांतच आढळतें. "तेनैषापि व्यधायि स्फुटगुणविशदा नागरज्ञातिभाजा विप्रेणाशेषविद्वज्जनहृदयहरा चित्रकूटस्थितेन। एकलिंग महात्म्याचा तर विचारच करावयास नको; कारण तें बरेंच अलीकडच्या काळचें आहे व त्यामुळें इतिहासदृष्ट्या त्यास महत्व मुळींच नाहीं.

परंतु ह्या श्लोकांत अत्यंत महत्त्वाचा शब्द म्हटला तर महीदेव होय. महीदेव ह्याचे दोन अर्थ संभवतात. १ राजा २ ब्राह्मण. प्रस्तुत श्लोकांत त्याचा अर्थ भाण्डारकर म्हणतात त्याप्रमाणें ब्राह्मण नसून मोहनलाल पांड्यांनीं भाण्डारकरांना दिलेल्या उत्तरांत सुचविल्याप्रमाणें "राजा" असाच असावा; कारण 'विप्रकुलानन्दनो महीदेवः' ह्या जागीं विप्र व महीदेव ह्यांमध्यें उघड विरोधभाव दर्शविला आहे व तो काव्याचा रसभंग करीत नाहीं. महीदेव ह्या शब्दाचा अर्थ ब्राह्मण असा समजला तर कवीवर पुनरुक्तीचा दोष येतो. तेव्हां वरील श्लोकावरूनच गुहदत्त क्षत्रिय असावा व त्याचेंच नांव बाप्पा असें दिसतें. परंतु भाण्डारकरांस हें मत मान्य नाहीं. त्यांचे मतें बाप्पा हें महेंद्राजित किंवा कालभोज ह्यांपैकीं कोणाचें तरी एकाचें टोपण नांव असावें. (मेवाड गॅझीटीयरचा कर्ता अर्स्किन ह्याचेंहि असेंच मत आहे.)

भाण्डारकरांच्या मतें * गुहदत्त हें नांव गुहिलाचें असावें. हें अनुमान चुकीचें ठरतें. गुहिल हें बाप्पा राजाचे मागून गादीवर बसलेल्या त्याच्या मुलाचें नांव अशाविषयीं अनेक लेखांतून आधार सांपडतो. तसेंच गुहदत्त हाच बाप्पाराजा असावा हेंहि प्राचीन लेखांवरून ठरतें. असे लेख बरेच अर्वाचीन आहेत म्हणून विश्वसनीय आहेतच असें नाहीं, अशा तऱ्हेची शंका भाण्डारकरांनीं घेतली आहे. पण त्यांनीं अत्यंत प्राचीन जो नरवाहन लेख त्याचा विचार केला असावा असें दिसत नाहीं. हा लेख वि. सं. १०२८ ( म्ह० इ. स. ९७१ ) चा म्हणजे अचलेश्वर, चितोडगड व आटपुरा ह्या तिहींहून प्राचीन आहे. अचलेश्वर व चितोडगड लेखांत बाप्पा हाच मेवाड घराण्याचा संस्थापक होय असें स्पष्ट म्हटलें आहे. व तितक्याच स्पष्टतेनें नरवाहन लेखांत बाप्पाराजाचा संस्थापक असा उल्लेख मिळतो. हा लेख बराच छिन्नभिन्न झालेला आहे व त्यावरील लेखही जागजागीं पुसट झालेला आहे. पण लेखाच्या प्रारंभींच असलेलें बाप्पाचें नांव अगदीं अचुक वाचतां येतें; बाप्पाचेंच 'गुहिलगोत्र नरेन्द्रचंद्र' असें विशेषण ह्या लेखांत सांपडतें; शिवाय बाप्पाच्या पूर्वी कोणत्याहि नांवाचा उल्लेख नाहीं (पहा भाव. इ. पा० ५९). ह्या सर्व प्रमाणांवरून बाप्पारावळच मूळ संस्थापक ठरतो; बाप्पारावळ क्षत्रिय होता; आणि आमच्या मताप्रमाणें गुहदत्त म्हणजे बाप्पारावळ असें ठरलें तर ' महीदेव ' या शब्दाचा अर्थ ' राजा—क्षत्रिय ' असाच केला पाहिजे.

बाप्पारावळ हा गुहिलोत घराण्याचा संस्थापक असून तो राजा ( म्हणजे क्षत्रिय ) असावा असें ह्या नरवाहन नामक सर्वांत प्राचीन लेखावरून दिसतें. म्हणजे इ. स. ९७१ पर्यंतच्या कोणत्याहि लेखांत बाप्पारावळ ब्राह्मण होता असें आढळत नाहीं. आटपुरा लेखांतील 'महीदेव' शब्दाचा ब्राह्मण असा अर्थ ह्यानंतरच्या लेखांत गैरसमजुतीनें मानण्यांत आला असावा, व चितोडगड व अचलेश्वर लेखकाळीं ( म्ह० इ. स. १२७४

---

* वरील कल्पनेचा व अचलेश्वर लेखांचा मेळ बसवणें जवळ जवळ अशक्यच आहे. बाप्पा जर विप्र होता तर कालभोज देखील क्षत्रिय नसून नागर ब्राह्मण होता कीं काय !!!

मध्यें ) ब्राह्मण हाच अर्थ विशेष रीतीनें रूढ झालेला असावा. वस्तुस्थितीस सोडणारा असा "महीदेव" शब्दाचा अर्थ पुढें कां रूढ झाला असावा हें तत्कालीन इतर राजघराण्यांच्या इतिहासांवरून दाखवितां येतें.

विख्यात घराण्यांच्या संस्थापकांसंबंधीं नेहमींच काल्पित गोष्टी सांगण्यांत येतात. कारण अलौकिक पुरुषांच्या जन्माच्या, पराक्रमाच्या, त्यांना मिळालेल्या यशाच्या वगैरे सर्वच गोष्टी अलौकिक असावयाच्या. पुरुषार्थापेक्षां अद्‌भुत गोष्टींवर साधारण माणसांची श्रद्धा चटकन बसते; इतकेंच काय ? पण त्यांना विभूतींच्या पराक्रमाच्या सरळ वर्णनापेक्षां काल्पनिक व अलौकिकत्वनिदर्शक अशा कथाच जास्त हृदयंगम वाटतात. अशा तऱ्हेच्या मनःप्रवृत्तीमुळें मूळ संस्थापकांचीं चरित्रें नेहमींच अद्‌भुत रसानें ओथंबलेलीं असतातः—पण इतिहासकारानें मात्र त्यांतील कवित्वाचा भाग बाजूस काढून त्यांत दडून बसलेल्या सत्याकडेच फक्त लक्ष्य पुरविलें पाहिजे. चालुक्य वंशसंस्थापकांविषयीं अशींच अद्‌भुत वर्णनें शिलालेखांतून मिळतात. ह्या वंशाचा मूळ पुरुष भारद्वाज द्रोणाचार्यांनीं सोडलेल्या अर्घ्यापासून ( म्हणजे चुळक्यापासून ) उत्पन्न झाला अशी आख्यायिका आहे. चालुक्य शब्दावर रचिलेली ही एक कविकोटी आहे हें सहज लक्ष्यांत येण्याजोगें आहे. प्रतीहारवंशाविषयीं अशीच दन्तकथा सांपडते; प्रभु रामचंद्र राजाचा द्वारपालक ( प्रतीहारः ) सदा लक्ष्मण असल्यामुळें प्रतीहारवंशज आपला मूळपुरुष लक्ष्मण होता असें मानतात. प्रतीहार शब्दावर केलेला हा श्लेष सहज ध्यानांत येईल. पौराणिक ऋषिकुलांच्या संस्थापकांविषयीं अशाच अघटित कथा सांगतात, त्याही अत्यंत विलक्षण व प्रसंगीं विक्षिप्त असतात. वेदांतील कथानकांसंबंधीं हीच गत; पण ह्या गोष्टींस विशेष महत्त्व देण्यांत अर्थ नसतो. वेदांत एके जागीं उर्वशी अप्सरेपासून वशिष्ठ ऋषींचा जन्म झाला असें म्हटलें आहे; ह्याच उर्वशीस पुराणांतरीं एखाद्या सामान्य गणिकेचें रूप प्राप्त झालें आहे; आणि वसिष्ठ गणिकापुत्र ठरला आहे. अगस्त्य ऋषींची उत्पत्ति अशीच विक्षिप्त तऱ्हेची आहे. उर्वशीस पाहून मित्रावरुण अत्यंत कामविद्ध झाले व त्यांचें रेतस्खलन झालें तें त्यांनीं

एका कुंभांत टाकलें व त्यापासून अगस्त्य जन्मले. अगस्त्यऋषींचें नांव कुंभ-योनि म्हणूनच प्रसिद्ध आहे. भृगुऋषींच्या जन्माची हकीकत अशीच आहे. पुराणांतील वरील उत्पत्ति वर्णन करण्याची अवश्यकता नाहीं. सर्वच प्रसिद्ध पुरुषांचे जन्म विस्मयकारक किंवा प्रसंगीं खेदाश्चर्ययुक्त असे आहेत. ग्रीक लोकांत देखील त्यांच्या वंशस्थापकांच्या अशाच चमत्कारिक हकीकती प्रसिद्ध आहेत. पण ह्या सर्वच खऱ्या असतात असें नाहीं. साधारण जन-समुदायास विस्मय वाटेल अशाच तऱ्हेनें ह्या हकीकती कालान्तरानें रचिल्या जातात. त्यांच्या बुडाशीं थोडें फार सत्य असतें, निदान त्या सद्बुद्धीनें रचिल्या गेल्या असतील तर त्यांच्यांत दिसून येणारा हेतुहि थोड्याफार प्रयत्नानें प्रकट करतां येतो.

बाप्पारावळ ह्यास ब्राह्मण असें कां समजण्यांत आलें त्याचीही उपपत्ति लावतां येण्याजोगी आहे. सर्व क्षत्रियकुलें अत्यंत धर्मशीलवृत्तीनें आप-आपल्या गोत्रांचें प्रतिपालन करीत वगैरे मुद्यांसंबंधीं आम्हीं अन्यत्र विस्तारानें विवेचन केलेंच आहे. उदेपूर घराण्याचें गोत्र वैजवाप होय. बहुतेक क्षत्रियांचीं व ब्राह्मणांचीं गोत्रें एकच आहेत व अशा तऱ्हेनें भिन्न वर्णांत तींच गोत्रें कशीं प्रचलित आहेत हें एक पुष्कळांस गूढ आहे. हें गूढ उकलण्याचा आम्हीं एका टिपणींत प्रयत्न केला आहे, व तिच्याच अनुरोधानें प्रस्तुत प्रश्न आम्हीं सोडवणार आहोंत. १२ व्या शतकांत विज्ञानेश्वराचें मत प्रचलित होतें; त्या मताप्रमाणें क्षत्रियकुलांनीं आपआपल्या पुरोहितांचींच गोत्रें धारण केलीं व म्हणूनच ब्राह्मण व क्षत्रिय यांचीं गोत्रें एकच असा निष्कर्ष निघतो. हें मत चुकीचें आहे असें आम्हीं आमच्या गोत्रांवरील टीपेंत सिद्ध करून दाखवलें आहे.

विज्ञानेश्वराच्या पूर्वीं दुसरेंच एक मत प्रचलित होतें व त्या मताच्या अनुरोधानेंच बाप्पारावळ ब्राह्मण असावा असें ठरलें गेलें असावें असें आम्हांस वाटतें. त्या मताप्रमाणें गोत्रांत उल्लेखिलेला ऋषि हा त्या कुल-शाखेचा केवळ संस्थापक नसून त्या कुलवृक्षाचाच अत्यंत पुरातन पूर्वज असावा असें ठरतें. परमारकुलाचें वशिष्ठ गोत्र कां? तर त्या कुलाचा पुरातन पूर्वज परमार हा वशिष्ठ ऋषीच्या कुण्डांतून उत्पन्न झाला असें

परमारलेखांत विवेचन आहे. चेदीलेखांत चालुक्य घराण्याची अशीच उत्पत्ति दिली आहे, त्याचें विवेचन पूर्वी आलेंच आहे. भरद्वाजाच्या चुळक्यापासून चालुक्यवंशाचा पूर्वज जन्मला म्हणून चालुक्यकुलाचें भारद्वाज गोत्र होय. चाहमानकुलाच्या उदाहरणानें तर वरील मुद्दा जास्तच स्पष्ट होतो. चाहमानकुलाचें गोत्र वत्स; व कुलाची उत्पत्तिहि अनेक तऱ्हेनें दिली आहे. विजोलिआ लेखांत असें म्हटलें आहे कीं, चाहमानाचा जो पहिला सामंत नामक राजा त्याचा जन्म अहिच्छत्रनिवासी एका वत्सगोत्री ब्राह्मणापासून झाला; व त्यामुळेंच चाहमानकुलाचें गोत्र प्राचीनकाळापासून "वत्स" असें आहे. कालांतरानें चाहमानांच्या गोत्रासंबंधीं दुसरीच उपपत्ति बसविण्यांत आली. १३१९च्या वेळीं म्हणजे चितोडगड व अचलेश्वर लेख ज्यावेळीं लिहिण्यांत आले त्यावेळीं छाछिगदेव राजाच्या सुंडा येथील लेखांत ही उत्पत्ति सांपडते; व तिच्या योगें चाहमानाचा संबंध थेट वत्स ऋषीपर्यंत जोडण्यांत येतो. वत्स ऋषींच्या आनंदाश्रूंपासून चाहमान निर्माण झाला त्यामुळेंच चाहमानवंशाचें गोत्र वत्स असें मानण्यांत येऊं लागलें, अशा तऱ्हेचा लेख सांपडतो. गोत्रोत्पत्ति लावण्याचे हे निरनिराळे प्रयत्न आहेत एवढेंच सिद्ध होतें व अशाच रीतीनें गुहिलोत घराण्याच्या गोत्राची उपपत्ति बाप्पाराजा ब्राह्मण असावा अशा समजुतीनें लावण्यांत आली असावी; म्हणजे ज्याप्रमाणें चाहमान रजपुत कुलाच्या वत्स गोत्रावरून त्या कुलाच्या मूळ पुरुषाची उत्पत्ति एका ब्राह्मणापासन झाली असें मानण्यांत येई, त्याप्रमाणें गुहिलोत घराण्याच्या वैजवाप गोत्रावरून त्या वंशाचा मूळपुरुष जो बाप्पारावळ तो त्या गोत्राचा ब्राह्मण होता असें १३ व्या शतकांत मानूं लागले असावे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ब्राह्मण व क्षत्रिय यांचीं गोत्रें एकच असल्यामुळें त्यांचे मूळ पुरुष ब्राह्मण असावेत असें मानलें गेलें. व ह्या रूढीस अनुसरूनच 'आटपुरा' लेखांतील महीदेव ह्याचा क्षत्रिय असा अर्थ न घेतां 'ब्राह्मण' असा अर्थ घेऊं लागले. पूर्वी सांगितल्याप्रमाणें रजपूत असोत किंवा ब्राह्मण असोत त्यांच्या मूळ उत्पत्तीच्या कथा काल्पनिक असून त्या नेहमींच टाकून देण्याच्या लायक असतात

आणि अशा दन्तकथांपैकीं जेवढा भाग शक्यतेच्या कोटींत असेल तेवढाच घेणें योग्य असतें. असो, आमच्या मतें बाप्पारावळ ब्राह्मण नसून क्षत्रिय होता, व त्यावेळच्या गोत्राच्या भ्रान्त कल्पनेमुळें त्यास ब्राह्मण मानण्यांत आलें असावें, पण याहि पुढें जाऊन दुसऱ्या मुद्याविषयीं जास्त विचार करणें आहे. समजा, भाण्डारकर म्हणतात त्याप्रमाणें बाप्पारावळ हा आनंदपूर अथवा वडनगर येथील एक नागर ब्राह्मण होता व त्याजपासूनच पुढें गुहिलोत घराण्याची उत्पत्ति झाली. पण एवढ्यावरूनच म्हणजे गुहिलोत घराण्याचा संस्थापक झालेला बाप्पा ब्राह्मण असल्यामुळें सर्व गुहिलोत घराणें परदेशीय कसें ठरलें ? त्या काळीं क्षत्रिय कन्या ब्राह्मणानें वरिली तर त्यांची संतति क्षत्रिय मानली जात असे व असे विवाह त्या काळीं होत असत हें आम्हीं पहिल्या भागांत व याहि भागांत दाखविलें आहे. हिंदुधर्मशास्त्रानें अशा तऱ्हेची झालेली संतति क्षत्रिय मानली जात होती आणि पुत्रिका पुत्राची कल्पना हिंदुधर्मशास्त्रास मान्य आहे· बाप्पाचा विवाह जर गुहिलक्षत्रिय घराण्यांतील एकाद्या कन्येशीं झाला असेल तर बाप्पाच्या संततीचा दर्जा त्याच्या मातेच्या दर्जाप्रमाणें समजण्यांत येऊन बाप्पा-रावळची संतति जातीनें क्षत्रियच ठरते· याशिवाय शिलालेखांवरून बाप्पाची पुढील पिढी क्षत्रिय असून क्षत्रिय क्रियाच करीत आली असें दिसतें. तेव्हां एक मध्यें ब्राह्मण झाल्यानें सर्व गुहिलोत वंश ब्राह्मण कसा ठरतो ? तेव्हां बाप्पाराजा हा नागर ब्राह्मण होता हें गृहीत धरलें तरी गुहिलोत घराणें कोणत्याहि प्रकारें विदेशीय ठरत नाहीं. बाप्पानंत-रच्या गुहिलोत घराण्यांतील राजांचा संबंध क्षत्रिय घराण्याशींच झालेला दिसतो. ह्या सर्व हकीकतीवरून एक बाप्पा तेवढाच ब्राह्मण मानण्यांत आला तर सर्व गुहिलोत घराणें ब्राह्मण ठरविणें अनैतिहासिक आहे.

बाप्पारावळ नागर ब्राह्मण होता हें आम्हांला तर साफ खोटेंच वाटतें; पण तो नागर ब्राह्मण होता असें मानलें तरी त्याकाळीं ब्राह्मणांचा क्षत्रिय कन्यांशीं विवाह होत असे. ह्या रूढीप्रमाणेंच बाप्पानें ईदर येथील गुहिल ( गुहिलोत ) घराण्यांतील क्षत्रिय कन्या वरिली असावी; त्या कन्ये· पासून झालेला मुलगा आपल्या आजोळच्या घराण्यांत पुत्रिकापुत्र म्हणून

मानला असावा; पुत्रिकापुत्र अशा तऱ्हेनें पूर्ववंश चालविणारा झाला असावा व त्या मुलाचें नांव गुहिल ( म्हणजे, आजोळचेंच ) ठेविलें असावें; व ह्या गुहिलापासून दुसरा वंशविस्तार झाल्यामुळें त्यास गुहि- लोत ( गुहिलपुत्र ) नांवानें संबोधिलें जात असावें. अशा तऱ्हेचीं उदा- हरणें अनेक देतां येतील. काश्मीर देशाच्या गोनदीयवंशातील बाला- दित्य नांवाचा राजा निपुत्रिक मरण पावला व त्याला दुसरा कोणी पुरुष वारस नसल्यामुळें तो वंशच लयास गेला असता. तथापि आपल्या मागें आपलें राज्य कन्येच्या मार्फत कां होईना पण आपल्याच घरांत रहावें या हेतूनें बालादित्यानें एकुलती एक कन्या नित्य रिवाजाप्रमाणें कोणा राजाला न देतां दुर्लभवर्धन नांवाच्या आपल्या एका अधिकाऱ्यालाच दिली. बालादित्याच्या मृत्यूनंतर इ० स० ६०२ त हा दुर्लभवर्धन ठर- ल्याप्रमाणें गादीवर बसला, व त्याच्या मुलानें आपल्या आजाबाचें नांव घेतलें, हें भाग १ यांत वर्णिलेंच आहे. अशाच रीतीनें बाप्पारावळ ब्राह्मण असूनही त्यानें क्षत्रिय कुलांतील एकुलती एक कन्या वरिली असावी. ह्या कन्येपासून झालेल्या मुलापासूनच पुनः गुहिल घराणें चालू झालें असावें. बाप्पाच्या मुलाचें नांव गुहिल होतें व त्याच्याच नांवावरून वंशास नांव पडलेलें अचलेश्वर लेखांत स्वच्छ सांगितलें आहे* तात्पर्य त्याकाळीं ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांचा विवाह रूढ होता आणि बाप्पा ब्राह्मण मानला तरी त्यानें क्षत्रिय स्त्री केली असावी. सिंधचा छछ व काबूलचा शाही यांची हकीकत पूर्वी आलीच आहे (भा. १). पुत्रिकापुत्रधर्माप्रमाणें ह्या क्षत्रिय कन्यांपासून झालेल्या मुलामुलींस क्षत्रियच समजले जात असे व त्यांचा इतर क्षत्रिय घराण्याशीं विवाहसंबंध होत असे. गुहिलोत घराण्याचा विवाहसंबंध एतद्देशीय क्षत्रियांशींच झाला आहे त्यामुळें गुहिलोत घराणें प्राचीन कालांत देखील अस्सल एतद्देशीय क्षत्रियांत मोडत असे हें उघड आहे.

असो; हा विषय संपवतांना बाप्पारावळसंबंधीं व त्याच्या वंशाविषयीं

---

* बप्पकस्य तनयो नयनेता संबभूव नृपतिर्गुहिलाख्यः । यस्य नामक लितां किल जातिं भूभुजो दधति तत्कुलजाताः ॥

आमचे मत थोडक्यांत देतों तें असें:—उपलब्ध असलेल्या सर्व लेखांत जो अत्यंत प्राचीन नरवाहनलेख ( इ. स ९७१ चा ) त्यावरून बाप्पा-रावळ ब्राह्मण नसून क्षत्रियच असावा असें स्पष्ट दिसतें. आटपुरालेख मागाहूनचा आहे व त्यांतलि 'महीदेव' शब्दाचा अर्थ ब्राह्मण—विप्र असा कां मानला गेला हें आम्ही गोत्रविवेचनावरून दर्शविलेंच आहे. बाप्पा-रावळाचा मूळ वंश गुहिलच असावा. बाप्पाक्षितिपति (क्षत्रिय) गुहिल वंशाचा जणूं काय चंद्रच* होता. या नरवाहनलेखांतील वाक्यावरून असें दिसतें कीं, मूळच्या वलभी घराण्याची एक शाखा नागडा येथें गुहिल घराणें म्हणून प्रसिद्ध होती. ती बहुधा गुहदित्यानें स्थापन केलेल्या ईडर शाखेची उपशाखा असावी. ह्याच गुहिल घराण्यांत अपराजित व शील हे पराक्रमी पुरुष होऊन गेले असावेत; कारण त्यांचे पूर्वींचे लेख उपलब्ध आहेत. बाप्पा त्याच राजवंशांत (द्विजकुलांत नव्हे !) जन्मला असावा. व तो अत्यंत विख्यात झाला. कुलदीपक व पराक्रमी पुरुषांपासून नवीन वंशक्रम मानला जातो त्याप्रमाणें बाप्पा हा गुहिलोत घराण्याचा मूळ पुरुष मानला गेला. बाप्पाच्या पूर्वीच्या पूर्वजांस गुहिल व बाप्पानंतरच्या वंशजांस गुहिलोत अथवा गुहिलपुत्र असें निराळें संबोधण्यांत आलें असावें. बाप्पाचें मूळचेंच नांव बाप्पा असावें. तें त्यास कुलसंस्थापक म्हणून (बाप्पा—बाबा) मागाहून दिलें गेलें नसावें. कारण बाप्पा हें नांव त्या काळीं राजकुलांत देखील प्रचलित होतें. (पहा एपिग्रा. इंडिका पु० ९, बप्पभट्टारक पाद भट्टरसः). बाप्पा अत्यंत धर्मशील होता. तो शिवोपासक असून त्याचा गुरु एकलिंगजीचा परमोपासक हरितमुनि होता. स्वपराक्रमानें बाप्पारावळ उदयास आला व चितोडचा राजा झाला. बाप्पानें हिंदु-राजांच्या रिवाजाप्रमाणें अनेक स्त्रिया वरिल्या असें शिलालेखांतच म्हटलें आहे व त्यास संततिहि पुष्कळ झाली; कारण बाप्पाचे वंशज आजतागा-यत कित्येक हजारांवर असून सर्व राजपुतान्यांत पसरले आहेत. असो; त्याची कारकीर्द मोठी घडामोडीची होती. ती कारकीर्द संपवून वृद्धपणीं

---

* यस्मिन्नभूद्‌गुहिलगोत्रनरेंद्रचंद्रः श्रीबप्पकः क्षितिपतिः क्षितिपीठ-रत्नम् ॥

त्यानें संन्यास घेतला असावा. व उरलेलें आयुष्य ईशचिंतनांत घालविलें असावें. *

शेवटीं भाण्डारकरांचे प्रमाणसरणीचे सर्व दुवे कां दिले आहेत तें थोडक्यांत सांगतों:—आटपुरालेखांतील महीदेव शब्दाचा अर्थ ब्राह्मण असा न करतां क्षत्रिय असाच करणें सर्वथैव युक्त आहे. बरें, ब्राह्मण असा जरी अर्थ घेतला तरी त्यावरून बाप्पा नागरब्राह्मण होता हें कोठेंच सिद्ध होत नाहीं. कारण आनंदपुर म्हणजे वडनगर येथील मूळ रहिवाशी धरिला तरी एवढ्यानेंच तो नागरब्राह्मण होता हें कसें सिद्ध होईल ? काय वडनगरांत दुसरे ब्राह्मणच नव्हते ? शिवाय आनंदपुर हें नांव वडनगरहून अन्य पुरांचेंहि वाचक आहे. किंबहुना चितोडगडच्या लेखांत नागदा हेंच आनंदपुरं† म्हणून स्पष्ट वर्णन आहे. शिवाय नागरब्राह्मण मूळचे मेर जातीचे नव्हते. तर बाप्पाराजादिक तरी त्या सर्वच डळमळीत आधाराच्या योगें परकीय होते हें कसें सिद्ध होणार ?

---

## परिशिष्ट

इंडिअन ॲन्टिक्वरी सन १९१० व्हॉ० ३९ पृ० १९१

शक्तिकुमाराचा आटपुरा येथील लेख.

संवत्सरशतेषु दशसु चतुस्त्रिंशत्यधिकेषु वैशाखशुक्लप्रतिपदि संवत् १०३४. वैशाखशुक्लप्रतिपदातिथौ श्रीनानिगस्वामिदेवायतनं कारापितं ॥ आनंदपुरविनिर्गतविप्रकुलानंदनो महीदेवः। जयति श्रीगुहदत्तः प्रभवः श्रीगुहिलवंशस्य। यस्यान्वये जगति भोजमहेंद्रनागः शीलापराजित महेंद्रजायतैकवीरः ॥ जातैर्यथार्कसमशोभितकालभोजखोम्मापैःभर्तृपट्टैः। सिंहोऽभवत् तदनु तद्भुतीपि जज्ञे खोम्माण इत्यथ सुतोस्य

---

* एकलिंगजीलेख पहा:—दत्त्वा महीमच्छगुणाय सूनवे नवेन्दुमौलिं हृदि भावयन्नृपः। जगाम बप्पः परमेश्वरं महो महोदयं योगयुजामसंशयम् ॥

† यस्मिन्नागह्रदाह्वयं पुरमिलाखण्डावनीभूषणम्।
जीयादानन्दपूर्वं तदिह पुरमिलाखण्डसौंदर्यशोभि ॥

महायकोऽभूत् । खोम्माणमात्मजमवाप सचाथ तस्मात् लोकत्रयैकातिलको जनि भर्तृपट्टः ॥३॥ राष्ट्रकूटकुलोद्भूता महालक्ष्मीरिति प्रिया । अभूद्यस्या भवत् तस्यां तनयः श्रीमदल्लटः ॥४॥ स भूपतिः प्रिया यस्य हूणक्षोणीशवंशजा दर्रायदेवी यशो यस्या भाति हर्षपुराव्हयम् ॥ अविकलकलाधारो धीरः स्फुरद्विलसत्करो विजयवसतिः क्षत्रक्षेत्रक्षतादतिसंहतिः । समजनि जना—प्रतापतरूद्भूतो विभवभवनं विधादेवीनृपो नरवाहनः ॥६॥ चाहमानान्वयोद्भूता श्रीजिजय नृपात्मजा, राजा जयति शालिवाहनः इति ख्यातः प्रतापः ततः ॥८॥ ततः शक्तिकुमारोऽभूत् सुतः शक्तित्रयोर्जितः । भर्तृपट्टाभिधा श्रीश्च प्राप राष्ट्रमधापयत्×॥९॥ श्रीमदाटपुर—युतालयं यस्य वास इति संपदां पदं यत्र सन्ति नृपपुंगवाः समं कल्पपादपपदातगामिनः ॥१०॥

---

# प्रकरण ३ रें

## सांबरचे चाहमान

गुहिलोत घराण्याबरोबर जीं कित्येक रजपुत राजकुलें प्रसिद्धीस आलीं त्यांत सांबरचें चाहमान म्हणजे चव्हाण घराणें अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें आहे. वीर्यशाली वृत्तींत ह्या कुलाची इतर कोणीहि बरोबरी करूं शकत नाहीं, असा टॉडचा अभिप्राय आहे. मारवाडचे राठोड घराण्याची व मेवाडचे गुहिलोत घराण्याची चव्हाण घराण्याशीं पराक्रमाचे बाबतींत तुलना करतां येईल, परंतु एकंदरीनें पहातां चव्हाण घराणेंच अग्रस्थान पटकावील. आजतागायत ह्या घराण्याच्या १२०० वर्षांच्या इतिहासाचें अवलोकन केलें तरी हीच गोष्ट एकतानतेनें दिसून येते. गुहिलोत घराण्याप्रमाणें ह्यांचें मूळ राजधानीचें ठिकाण

जरी आज पूर्वींचेंच नसलें तरी राजपुतान्यांतील बुंदी, कोटा व शिरोही हीं प्रमुख राज्यें ह्यांच्या ताब्यांत आहेत, व येथील राजांच्या पराक्रमाची ख्याति मुसलमानी स्वाऱ्यांपासून सारखी दुमदुमत आहे. फार काय सांगावें, पृथ्वीराज चव्हाण व त्याचा आजा विशालदेव ह्यांच्या काळीं तर सार्वभौमत्वाचाही मान ह्याच घराण्याकडे होता. पानिपतच्या लढाईनंतर ह्या घराण्यास व त्या बरोबरच हिंदूपादशाहीस एकदम उतरती कळा लागली व तेव्हांपासून हिंदुस्थान देश कायमचा गुलामगिरींत सांपडला आहे. तरी पण पृथ्वीराज चव्हाणाच्या अतुल तेजाची व पराक्रमाची प्रभा सर्वत्र पसरली आहे. पानिपतच्या घनघोर समरांगणावर पृथ्वीराज राजाच्या वतीनें आपला कोणीना कोणीतरी पूर्वज खात्रीनें लढला (असावा) असें मोठ्या अभिमानानें प्रत्येक रजपूत घराणें सांगतें—एवढ्यावरूनच पृथ्वीराज चव्हाणाच्या पराक्रमाची महती पटते. अतुल पराक्रमामुळें रजपुतांच्या ३६ कुळांत चव्हाण घराण्यास अग्रेसरत्वाचा मान मिळाला असता; पण पराक्रमाबरोबर जो एक प्रकारचा बाणेदारपणा व अभिमान लागतो तो ह्या कुलांत एकंदरीनें कमी दिसल्यामुळें त्या घराण्यास अग्रेसरत्वाचा मान देतां येत नाहीं. गुहिलोत घराणें व चव्हाण घराणें ह्यांत फारच साम्य आहे. दोन्हीही घराणीं अद्याप चालू आहेत; दोन्हीही सारखींच प्रतापशाली आहेत, पण गुहिलोत घराणें जास्त बाणेदार व करारी असून त्या घराण्यानें मुसलमानांस काय पण इतरांस देखील मान वांकविली नाहीं. चव्हाण घराण्याचा अभिमान मुसलमानी अमदानींत टिकला नाहीं. दिल्लीच्या मुसलमानी राजांचें सार्वभौमत्व त्यांनीं कबूल केलें व ह्या वंशांतील अनेक सरदारांनीं आपलीं इनामें जप्त होऊं नयेत म्हणून मुसलमानी धर्मही स्वीकारला. क्षात्रतेजाबरोबर बाणेदारपणाची वृत्ति ह्या घराण्यांत तितक्याच उज्वल-

तेनें दिसून येत नसल्यामुळें गुहिलोत घराण्यास रजपुतांत श्रेष्ठत्वाचा मान आहे.

असो, ज्याप्रमाणें गुहिलोत घराण्याच्या मूळ संस्थापकाविषयीं थोडीफार माहिती आपणांस सांपडते तशी चव्हाण घराण्याच्या संस्थापकांविषयीं मिळत नाहीं. पृथ्वीराज चव्हाणाच्या चंद बरदाई भाटानें ह्या घराण्याचा जो अग्नीशीं संबंध लावला आहे तो प्रत्यक्ष नसून कविकल्पित आहे हें आम्ही मागें सांगितलेंच आहे. ह्या कुलाचा मूळपुरुष चाहमाण अगर अनाहिल समजला जातो. चाहमाणाचा काळ बुंदीसंस्थानच्या सुरजमल नामक भाटानें दिलेला आहे तो तर संशयास्पदच आहे. ह्या भाटानें आपल्या वंशभास्कर ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, चाहमाणापासून—पृथ्वीराज चव्हाणापर्यंत एकंदर १३६ राजे होऊन गेले; हें म्हणणेंहि इतिहासदृष्ट्या अतिशयोक्तीचें भासतें; कारण पृथ्वीराज रासांत तर पृथ्वीराजाच्या आजापर्यंतच्या राजांची संख्या फक्त ३६ सच सांगितली आहे. बरें ही संख्या बरीच अल्प आहे म्हणून खरीच आहे असेंहि नाहीं; कारण उपलब्ध लेखांचा व वरील संख्येचा मेळ बसत नाहीं. पृथ्वीराजाच्या काळच्या ( ११६७ ) चंद बरदाईसारख्या प्रसिद्ध भाटाला आपल्या पूर्वींच्या २०० वर्षांची विश्वसनीय वंशावळ देतां येऊं नये हें आश्चर्यच होय; वरील सर्व गोष्टींमुळें प्रस्तुत ज्या कालाचा आम्ही विचार करीत आहोंत त्यांतील म्हणजे इ. सन ८०० ते १००० पर्यंतची या वंशाची फारच तुटपुंजी माहिती मिळते; व त्या काळच्या इतिहासाची भिस्त हर्ष टेकडीवरील शिलालेखांवरच ठेवणें भाग पडतें ( एपिग्रॅफिका इंडिका व्हा० २. पा. ११९ ). ह्या सप्त लेखांचे काळ अनुक्रमें वि. सं १०१३ व। १०३० म्ह० इ, स, ९५९ व ९७२ असे आहेत. विजोलिया लेख

सुमारें ह्यानंतर २०० वर्षांनीं म्ह. वि. सं. १२२६ (इ. स. ११६९ )त लिहिला गेला ( पहा....बेंगाल व्हॉ. ४५). हे दोन्ही लेख बरेच जुळतात. जिज्ञासू वाचकांच्या माहितीकरितां वरील लेखांचे उतारे परिशिष्टांत दिले आहेत. या वरील दोन लेखांशिवाय ह्या घराण्यासंबंधीं आणखीहि लेख उपलब्ध आहेत; पण हे प्रस्तुत कालास अनलक्षून नाहींत. एक तर हे इ. स. ८७२ पूर्वींची माहिती देत नाहींत किंवा त्यांत वंशावळ नसून एकाच राज्याच्या पराक्रमाचें विशेष वर्णन असतें.—[ नाडूलच्या चाहमानांविषयीं वि. स. १२१८ चे तीन लेख आढळतात. एपि.ग्रापि.९, इ ६८ पान; कीलहार्ने साहेबानें सुंडा लेण्यांतलि छाछिगदेव ( सं १३१९ ) राजाचा लेख प्रसिद्ध केला आहे. भाण्डारकरांनींहि बरेच लेख प्रसिद्ध केले आहेत.]

नर्मदेच्या उत्तरेस माहिष्मती गांव वरील घराण्याचें मूळ ठिकाण होतें व ह्या घराण्याकडे हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाचा मान वारंवार येत असे, असें चाहमानकुलाचे भाट वर्णन करतात. महाराष्ट्र ते पंजाबपर्यंतच्या सर्व भागांत जरी चाहमानांची वसति झालेली आढळते तरी वरील दोन्ही विधानें अगदीं खरींच आहेत असें नाहीं. वरील घराण्याचें ऐतिहासिक मूळचें ठिकाण म्हणजे मेवाडचे उत्तरेस असलेला सांबर अथवा शाकंबरी प्रदेश होय. अजमीर देखील ह्याच प्रदेशांत मोडतें. हा प्रदेश एकंदर १। लाख खेडीं मिळून झालेला आहे अशी त्या प्रदेशाची ख्याति होती व त्यामुळेंच ह्या प्रदेशास सपादलक्ष असें नांव आहे.*—

भाण्डारकरांचे• मतें ' सपादलक्ष ' हें नांव ' शिवालिक डोंगराळ प्रदेशाचेंच असावें " व शिवालिक प्रदेश हेंच चाहमानांचें आद्य

* स्कंदपुराणांतर्गत कुमारीखडांत वर्णिलेल्या राज्यांची व राज्यांतर्गत खेड्यांची यादी आम्ही पूर्वीं एके ठिकाणीं उल्लेखिली आहे.प्र. ३९ टीप.

वसतिस्थान असावें. अजमीरचें हरविलास सारडा स्पष्ट म्हणतात कीं सपादलक्ष म्हणजे सांबर राज्य होय. ह्यांचें असेंहीं मत आहे कीं बिजोलिया लेखांत वर्णिलेलें चहामानाचें आद्य ठिकाण 'अहिच्छत्र' हें भाण्डारकर म्हणतात त्याप्रमाणें शिवालिक डोंगरांत वसलेलें नसून हल्लींचें राजपुतान्यांतील नागोर शहर होय. ह्या म्हणण्यास कदाचित् आक्षेप घेतां येईल. महाभारतांत 'अहिच्छत्र" हें पांचाल देशांतील अतिप्रसिद्ध ठिकाण आहे. कदाचित् वरील राजपुतान्यांतलि अहिच्छत्राचा पांचाल देशांतील अहिच्छत्राशीं संबंध असेल. असो, आम्हांस थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें आहे कीं चाहमान राजांचा सपादलक्षीय राजे असा जेव्हां जेव्हां उल्लेख मिळतो तेव्हां सपाद लक्षीय ह्याचा अर्थ सांबरचे राजे असाच केला पाहिजे; कारण प्राकृत काव्यांतून सुद्धां चाहमानांना संबरीराय म्ह. सांबरचे राजे असेंच संबोधिले जातें. एकंदरीनें पाहतां सांबर हेंच चाहमानांचें मूळचें ठिकाण असावें.

चाहमानकुलाच्या मूळ संस्थापकांविषयीं लेखांतून काय माहिती आढळते ती आतां पाहूं. हर्षशिलालेखांत गूवकराजापासून वंशावळ दिली आहे. सदहू लेखांतील " आद्य " शब्दाचा अर्थ पूर्वज असा न करतां पहिला राजा असाच केला पाहिजे. बिजोतियालेखांत प्रथम पूर्वजांचा उल्लेख सांपडतो; पण ज्या श्लोकांत तो ग्रथित केला आहे तो श्लोक एक तर घोटाळ्याचा आहे व दुसरें असें कीं तो सर्वथैव विश्वसनीय आहे असें नाहीं. तो श्लोक खाली लिहिल्याप्रमाणे आहे.

विप्रश्रीवत्सगोत्रेऽभूदहिच्छत्रपुरे पुरा।
सामन्तो नन्तसामन्त पूर्णतल्लो नृपस्ततः ॥

सदहू श्लोकाचे दोन अर्थ संभवतात. भाण्डारकरांनीं सुचवल्या-

प्रमाणें विप्र. असा पाठभेद न घेतां विप्रः असा घेऊं. श्लोकातील पूर्ण तल्ल शब्दाचा अर्थ नीट लागत नाहीं. —श्लोकाचा पहिला अर्थ अशा तऱ्हेनें करतां येईल; " पूर्वी अहिच्छत्र पुरांत श्रीवत्सगोत्री एक ब्राह्मण असे; ज्याला सामन्त अनेक आहेत; सामन्तराज ( सरदार ) त्याचा मुलगा ( अगर वंशज ) होय "—अथवा दुसऱ्या तऱ्हेनें श्लोकाचा असा अर्थ संभवतो " पूर्वी अहिच्छत्र पुरांत श्रीवत्सगोत्री सामंत नामक ब्राह्मण असे; अनेक सरदारांनीं युक्त असा जो पूर्णतल्ल ( व्यक्तीचें नांव ) तो सामंताचा पुत्र होय. ,,—

ह्या श्लोकावरून चंदानें दिलेल्या चाहमान कुलाच्या उत्पत्तीस चांगलाच धक्का बसतो. अबूपर्वतांत वशिष्ठ ऋषींचा आश्रम असून त्या आश्रमांत असलेल्या आग्निकुण्डापासून चाहमानांचा पूर्वज निर्माण झाला व त्यामुळें चाहमानकुलाची अग्निकुलांत गणना केली जाते वगैरे हकीगत कल्पनानिर्मित आहे असें ह्या श्लोकावरून स्पष्ट ठरतें; कारण हा श्लोक चंदभाटाच्या पूर्वी २०० वर्षे झाला आहे. तरी पण हा श्लोक सर्वथा ग्राह्य आहे असें मात्र नाहीं. त्या श्लोकांत चाहमानांचा पूर्वज वत्सगोत्री ब्राह्मण होता असें म्हटलें आहे तें शक्य दिसत नाहीं. चाहमानांचें गोत्र वत्स-( वत्स गोत्र ब्राह्मणा-तही प्रचलित आहे ) कां ? ह्या प्रश्नाचें उत्तर त्या घराण्याचा पूर्वज ब्राह्मण असावा म्हणून त्याच्या वंशजांचें गोत्र वत्स अशा तऱ्हेनें देण्याचा प्रयत्न कोणी भाटानें केलेला दिसतो. परंतु श्लोकां-तील काल्पनिक भाग वगळतां खालीलप्रमाणें अनुमान काढण्यास हरकत दिसत नाहीं; अहिच्छत्रपुरांत ( म्हणजे हल्लीचें रामपुर अथवा नागोर ) चाहमान घराण्यांत अत्यंत पराक्रमी असा सामन्त नांवाचा बलाढ्य रजपुताग्रणी होता; त्याला अनेक सरदारांचें साह्य असे; ह्यानेंच पुढें सांबर प्रांत **काबीज** केला व तेथें राज्य स्थापिलें.—

प्रस्तुत श्लोकांत सामन्त हें व्यक्तिवाचक नांवच असाव कारणें पृथ्वी-राजरासांतहि चाहमानानंतर सामन्तदेवाचें नांव दिलें आहे.

हर्षलेखांत गूवकापासूनच वंशावळ दिली आहे व त्यामुळें बिजोलियालेखांत सामन्तापासून गूवकापर्यंत होऊन गेलेल्या राजांची यादी दिली आहे ती यादी अशी:—१ जयराज २ विग्रह ३ श्रीचंद्र ४ गोपेन्द्र व ५ दुर्लभ; यापुढील गूवकराजापासून दुर्लभराजापर्यंत दिलेला क्रम दोन्ही लेखांत बहुतेक सारखाच आहे. फक्त एकच नांव जुळतें करून घेतलें पाहिजे, हर्ष यादीतील ९ व्या नांवाचा (वाक्पतिराज) बिजोलिया लेखांतील बप्पयराज—विंध्यनृपति या नांवाशीं मेळ बसवला म्हणजे झालें. शब्दशास्त्राप्रमाणें तो मेळ सहज बसेल* बिजोलिया लेखांत वाक्पति हे नांव येतेंच; यादींत तें १०वें आहे; यावरून हा द्वितीय वाक्पति असावा व बाप्पय हा पहिला वाक्पति असावा असें अनुमान साहजिकच निघतें. दुर्लभ राजाच्या वेळींच (वि. सं १०३०) हर्षलेख लिहिला असल्यामुळें त्यांत दुर्लभानंतरची नांवें नाहींत. हें ठीकच आहे.

## चाहमान घराण्याचा वंशक्रम

| हर्षशिलालेख | बिजोलियालेख |
| --- | --- |
| वि. स. १०३० | वि. स. १२२६ |
| | सामन्त |
| | + जयराज |
| | + विग्रह |
| | + श्रीचंद्र |
| | गोपेन्द्र, दुर्लभ |

* वाक्पति ह्याच नांवाचा बाप्पय हा प्राकृत भाषेंतील अपभ्रंश दिसतो. अपभ्रंशाचेवेळी क्‌चाप्‌ होतो व त्‌ चा लोप होतो. वाप्पइ, बपय अशा पायऱ्या होतात.

| | |
|---|---|
| १ गूवक ( सु. इ. स ८६८ ) | १ गूवक १ ला |
| २ चंद्र ( ८८३ ) | २ चंद्र ( शशि ) |
| ३ गूवक २ रा ( ८९८ ) | गूवक २ रा |
| ४ चंदन ( ९१३ ) | ४ चंदन |
| ५ वाक्पतिराज् ( ९२८ ) | ५ बाप्पयराज—विंध्य नृपति |
| ६ सिंहराज ( ९४३ ) | ६ सिंह |
| ७ विग्रहराज ( ९५८ ) | ७ विग्रहराज |
| ८ दुर्लभराज ( ९७३ ) | ८ दुर्लभ. |

राजपुताना गॅझीटिअरमध्यें वरील बिजोलिया वंशावळ दिली आहे ( व्हॉ ३ पा. ६५ ). पण त्यांत गूवकाच्या पूर्वी जो पहिला दुर्लभ होऊन गेला त्याचें नाव दिलेलें नाहीं. वास्तविक पाहतां ह्या दुर्लभानें वरील वंश भरभराटीस आणला; तेव्हां त्याचें नांव वगळलें जावें हें आश्चर्य होय. हर्षलेख व बिजोलिया लेख ह्या दोहोंतही दुर्लभाचा स्वच्छ उल्लेख आहे. तेव्हां तो गॅझीटिअरमध्यें यावयास पाहिजे होता हें उघड आहे.

सामन्तदेव व गूवकराज ह्यांचा काळ स्थूलमानानें कोणता ठरतो हें आतां आपण पाहूं. या घराण्यांतील प्रत्येक राजाची कारकीर्द अदमासें १५ वर्षांची ठरते. विग्रहराजाचा काळ वि. स. १०३० म्ह. इ. स ९७३ हें नक्कीच आहे. विग्रहराजाचा आजा वाक्पतिराज ह्याचा कनिष्ठ मुलगा लछमन; त्यानें नाड्डूल येथें ह्या घराण्याची दुसरी गादी स्थापन केली. लछमनचा काळ वि. स. १०३९ म्ह. इ. स ९८२ हें लेखांतून सांपडतें. तेव्हां वाक्पतिचा काळ एक पिढी आधीं म्हणजे ९३३ इ. स. न धरतां ९४३ च धरणें जास्त युक्त दिसतें; व तेव्हांपासून मागील प्रत्येक राजाची कारकीर्द ठोकळ मानानें १५ वर्षांची धरली तर गूवक-राजा इ. स. ८६८ राज्य करीत असावा ( ९७३-१०५ ) व सामन्त राजा इ. स ७७८ मध्यें राज्य करीत असावा. राजपुताना गॅझीटिअरमध्यें सामन्त राजाचा काळ इ. स ७५० असा दिला आहे. परंतु हा काळ कसा ठरविण्यांत आला हें सांगितलें नाहीं. लछमन राजाच्या लेखांतील

कालावरून प्रत्येक कारकीर्दीस कमींत कमी १५ वर्षे देऊन आम्ही सामन्ताचा काळ ७७८ असा ठरवतों; व तो किंवा ७५० निदान हा काळ बरोबर असावा असें आम्हांस वाटतें. आरबांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्यानें जीं गुहिलोत घराण्यासारखीं अनेक घराणीं प्रसिद्धीस आलीं त्यांतच चाहमानांचा समावेश केला पाहिजे. बाप्पारावळ व सामन्तराज बहुतेक समकालीन असावे. कदाचित् बाप्पानंतर किंचित् कालानें सामन्त उदयास आला असावा व त्यानें ८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत सांबर येथें राज्यस्थापना केली असावी. त्याचा वंशज गूवक हा अतिशय प्रसिद्धीस आला असावा व रजपूत राजमण्डलांत त्याची प्रमुखपणें गणना होत असावी. हर्षलेखांत गुवकाविषयीं असें म्हटलें आहे कीं ' यस्मिन्नागाव लोकप्रवरनृपसभालब्धवीरप्रतिष्टः—' सार्वभौम नागभट्ट राजाच्या सभेमध्यें ( दरबारांत ) गूवकास शौर्याबद्दल मोठी प्रतिष्ठा मिळाली. यावरून कीलहार्नसाहेबाचें असें म्हणणें आहे कीं गूवक हा नागभट्टाच्या दरबारांतील एक प्रमुख सरदार होता; हन्सोट लेखांवर स्टेनकोनाऊसाहेबांनीं एक लेख लिहिला आहे त्यावरून देखील कीलहार्नसाहेबाचें अखेरचें मत वरीलप्रमाणेंच होतें असें स्पष्ट दिसतें. परंतु आम्हास असें वाटतें कीं सामन्त हा कदाचित् स्वतंत्र राजा नसेल; तो एकाद्या राजाचा सरदार असेल. पण गूवकाविषयीं वरील विधान संभवत नाहीं. गूवक हा स्वतंत्र राजा असावा; आपल्या पराक्रमानें तो उदयास आला असावा व आरबांच्या विरुद्ध लढणाऱ्या रजपूत राजमण्डलांत त्याची प्रमुखपणें गणना होत असावी. कदाचित् ह्या राजमंडलाचें आधिपत्य (सार्वभौमत्व) नागभट्टाकडे असेल. नृपसभा ह्याचा अर्थ सार्वभौम राजाचा दरबार असा न करतां स्वतंत्र राजांचें मंडळ असा घ्यावा. दुसरें असें कीं हन्सोट लेखांत चाहमानांचा उल्लेख असेलच असें नाहीं; लेखांतील चाहमान शब्द पुसटच आहे; व लेखाचा काळ वि. सं ८१३ म्ह० इ. स. ७५६ म्हणजे गूवकाच्या काळाशीं न जमणारा आहे. तेव्हां हन्सोट लेखावरून गूवक स्वतंत्र राजा होता कीं नागभट्ट सार्वभौम राजाचा सरदार होता हें ठरवणें युक्त नाहीं.

पहिला गूवक व बाप्पारावळ यांमध्यें बरेंच साम्य दिसतें; एक तर दोघेहि अत्यंत पराक्रमी वीर होते; दोघेहि आपल्या शौर्यानें प्रसिद्धीस आले. व कुलांचे संस्थापक म्हणून मानले गेले. दोघांचेंहि पराक्रमक्षेत्र एकच; दोघांनींही मुसलमानांच्या स्वाऱ्या परतवण्याचा आटोकाट यत्न केला; व दोघेहि सारखेच वीर्यशाली होते. दोघेहि सारखेच धर्माभिमानी फार काय सांगावें, दोघेहि सारखेच कट्टे शिवोपासक होते. गुहिलोत घराण्याची व चाहमान घराण्याची "शिव" हीच कुलदेवता होती. गुहिलोत घराण्याची 'एकलिंगजी'वर निस्सीम श्रद्धा; तशीच चाहमानांची सांबरच्या हर्षदेवावर अत्यंत श्रद्धा. हर्षलेखांत तर असेंच सांगितलें आहे कीं गूवक राजानेंच हर्षाचें विस्तीर्ण देऊळ बांधिलें, व त्याच्या पाठोपाठच्या राजांनीं त्या देवळाप्रीत्यर्थ अलोट संपत्ति खर्चून देवळास भव्य स्वरूप दिलें. लेखात असें वाक्य आहे कीं 'श्रीहर्षः कुलदेवोस्यास्तस्माद्दिव्यः कुलक्रमः' श्रीहर्ष हे चाहमानांचा कुलदैवत व त्याच्याच प्रसादानें चाहमान घराणें वैभवास चढलें. गुहिलोत घराण्याची देखील अशी दृढ समजूत होती कीं एकलिंगजींच्या प्रसादानें तें कूळ वैभवास चढलें; एकंदरीनें पाहतां असें दिसतें कीं मुसलमानांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्यानें व आर्यसंस्कृतीचें संरक्षण करण्यामुळें शिवभक्त रजपूत घराणीं पुढें आलीं. तत्कालीन धर्मस्थितीचा विचार करतांना धर्म व राजकारण ह्यांचा कितपत संबंध आहे याचा आम्ही विचार करणार आहोंत. सध्या इतकेंच सांगणें पुरें कीं मुसलमानांच्या स्वाऱ्यांच्या प्रतिकाराचें बिकट काम शिवोपासक लकुलीशसांप्रदायानें पुढारीपणानें आपल्या शिरावर घेतलें होते व चाहमान घराणे वरील सांप्रदायाचें अनुयायी होतें.

गूवकानंतर त्याचा मुलगा चंद्रराज राज्य करूं लागला व त्याच्या नंतर दुसरा गूवक गादीवर बसला. दुसऱ्या गूवकाचा मुलगा चंदन. ह्या चंदनानें दिल्लीच्या तोमर जातीच्या रुद्रेण नामक राजाचा पराभव करून विशाल कीर्ति संपादन केली असें वर्णन आढळतें; त्यावरून असें दिसतें कीं या सुमारास तोमरांचे पाय हिंदुस्थानांत चांगलेच रुजले असून त्यांची मजल राज्यस्थापनेपर्यंत आली होती. चंदन राजाचा मुलगा महाराज वाक्पति

प्रस्तुत राजांमध्यें अत्यंत वीर्यशाली होय. ८०० ते १००० च्या दरम्यानच्या कोणत्याहि चाहमान राजांमध्यें तो श्रेष्ठ ठरतो. वाक्पतीविषयीं हर्ष-लेखांत असें वर्णन आहे कीं त्यानें तंत्रपाळाचा पराभव केला. तंत्रपाळ कोणत्या देशचा राजा होता वगैरे कांहींच माहिती सांपडत नाहीं. वाक्पती विषयीं विजोलिया लेखांत असा उल्लेख आहे कीं वाक्पतीस विन्ध्य नृपति म्हणत; ह्यावरून असें दिसतें कीं सांबर ते विंध्याद्रिपर्यंत त्यानें आपला अधिकार बसविला असावा. राजपुताना गॅझीटिअर (पु ३ ष) च्या मतें पृथ्वीराज रासांत वर्णिलेला माणिकराय तो हाच; परंतु वरील विधानास आधार नसल्याकारणानें कांहींच लिहितां येत नाहीं...असो, पण येवढें मात्र निश्चित आहे कीं वाक्पति राजाच्या कनिष्ठ पुत्रानें म्हणजे लछमनानें इ. स ९४३ मध्यें नाडूल येथें ह्याच घराण्याची एक स्वतंत्र शाखा स्थापन केली. सिरोही येथील हल्लींचें राज आपणांस सदर शाखेचेच वंशज म्हणतात.

वाक्पति राजाचा ज्येष्ट मुलगा सिंहराज सांबरचें राज्य करूं लागला. तो अत्यंत दानशूर असून त्यानें हर्ष देवस्थानास विपुल संपत्ति दिली व हर्ष देवालयाचे छत्र व घुमट सूवर्णाचे करवले असें वर्णन आहे. दानशूरता, वैभव व पराक्रम या बाबतींत सूर्यवंशीं मानलेल्या चाहमानांचा अत्यंत पुरातन पूर्वज राजा हरिश्चंद्र ह्याच्याशी त्याची तुलना सदर लेखांत केली आहे. त्यानें तोमराचा पूर्ण पराभव केला व लछमनानें इतर बऱ्याच राजांस जिंकिलें व बंदीत टाकले असें वर्णन आढळतें. सिंहराजानंतर त्याचा मुलगा विग्रहराज गादीवर बसला. विग्रहराज सर्व बाबतींत सिंहराजाच्याच तोडीचा होता. ह्याच्याच कारकीर्दींत हर्षलेख लिहीला असल्यामुळें त्या लेखांत त्याची विशेष स्तुति केली आहे. हर्षदेवस्थानास त्यानें दोन खेंडीं इनाम दिलीं. विग्रहानंतर त्याचा भाऊ दुर्लभ राज्य करूं लागला. प्रस्तुत पुस्तकांत आम्ही दुर्लभ राजाच्या कारकीर्दीपर्यंतचाच विचार करणार आहोंत. गिझनीचा महंमद ज्या वेळीं हिंदुस्थानावर स्वारी करून आला त्या वेळीं सांबर येथें कोण राज्य करीत होता वगैरेचा विचार पांचव्या पुस्तकांत होईल.

हर्ष लेख १० व्या शतकांत लिहिला गेला; त्यावरून असें दिसतें कीं, दहाव्या शतकापावेतों तरी निदान चाहमान आपणांस सूर्यवंशी म्हणवीत.

इतर लेखांतूनही असाच उल्लेख आहे. चवदाव्या शतकांत देखील हीच समजूत दृढ होती. हम्मीर काव्यांत चाहमान सूर्यवंशी कां झाले, त्यांची उत्पत्ति कशी झाली व त्यांनीं अजमीरास कां गादी स्थापिली व तेथील सरोवराचें नांव 'पुष्कर' असें कां पडलें वगैरेचें सविस्तर वर्णन आढळतें.—तें वर्णन मनोरंजक असल्यामुळें येथें देतो. 'एकदां ब्रह्मदेवाच्या मनांत यज्ञ करण्याचें आलें व त्याकरतां तो आकाशमार्गानें पृथ्वीतलाचें निरीक्षण करूं लागला. अजमीर प्रांत पहात असतां त्याचे हातांतील कमल पृथ्वीवर पडलें; तेव्हां यज्ञाची हीच जागा असें ठरवून ब्रह्मदेवानें तेथेंच यज्ञ करविला. यज्ञसंरक्षणार्थ त्यानें सूर्यापासून चाहमानांस निर्माण केलें.—ह्या यज्ञाच्या जागींच पुष्कर पडलें, तेथें सरोवर उत्पन्न झालें व त्या सरोवराचें नांव पुष्कर (कमलसरोवर) असें पडलें, ब्रह्मदेवाचें हें एकच कां ठिकाण आहे, ब्रह्मदेवाचीं देवालयें हिंदुस्थानांत अन्यत्र कोठेंहि कां नाहींत वगैरेचा खुलासा वरील आख्यायिकेवरून स्पष्टपणें होतो.—चाहमानांची उत्पत्ति सूर्यवंशापासून कशी झाली हेंहिपण सांगितलें आहे. मग तें खरें असो वा नसो, पण चाहमानांच्या उत्पत्तीच्या निरनिराळ्या कथांवरून एवढें मात्र खास दिसतें कीं, निरनिराळ्या घराण्यांच्या उत्पत्तीच्या कथा कवींस वाटल्या तशा त्यांनीं रचिल्या असाव्या.—व त्यास ऐतिहासिक आधार असेलच असें नाहीं. कोठें शब्दावर कोटी दिसेल तर कोठें सर्व मदार कल्पनेच्या भरारीवर दिलेली असते; कोठें दन्तकथेच्या जोरावर इतिहासांतील गूढ कोडीं उकलण्याचा प्रयत्न असतो. वरील आख्यायिकेवरून चंदभाटानें चाहमान कुलाचा अग्निकुलाशीं जोडलेला संबंध नवीन ठरतो. एकंदरीनें असें दिसतें कीं, चाहमान हे सूर्यवंशी क्षत्रिय असावेत व त्यांचा प्रवेश हिंदुस्थानांत फार प्राचीन काळीं झाला असावा. अर्वाचीन चाहमान आपणास सूर्यवंशी न समजतां अग्निवंशी मानतात हा वस्तुस्थितीचा विपर्यास होय.

---

## हर्ष शिलालेख.

एपिग्राफिआ इंडिका व्हा. २ पा. १२१.

आद्यः श्रीगूवकाख्यप्रथितनरपतिश्चाहमानान्वयोभूत् श्रीमन्नागा ( द्य? ) लोकप्रवरनृपसभालब्ध ( ब्ध ) वीर प्रतिष्ठः । यस्य श्रीहर्षदेवे वरभवनमयी मौतली–कीर्ति–मूर्तिर्ल्लोकेद्यापि स्थिरैषा प्रतपति परमैः— ˘ — ˘ [ गैठं? ] ॥ १३ ॥

पुत्रः श्रीचंद्रराजो भवदमलयशास्तस्य तीव्रप्रतापः सूनुस्तस्याथ भूपः प्रथम इव पुनर्गूवकाख्यः प्रतापी । तस्माच्छ्रीचंदनोभूत्क्षितिपतिभयदस्तोमरेशं सदर्पं हत्वा रुद्रेण भूपं समर [ भुवि ] [ ब* ] लाद्ये [ नलब्धा ] जयश्रीः ॥ १४

ततः परमतेजस्वी सदा समरजित्वरः
श्रीमान्वाकपति राजाख्यो महाराजो भवत्सुतः ॥ १५ ॥

येनादैन्यं स्वसैन्यं कथमपि दधता वाजिवल्या मुमुक्षुप्रागेव त्रासितेभः सरसिक [रि] रटाड्डिंडि मौडिं ˘ ˘ वन्दक्ष्माभर्तुराज्ञां समदमभि [व] हत्वा गतोनंतपार्श्वक्ष्मापालस्तंत्रपालो दिशि दिशि गमितो हीनिषण्णः प्रसण्ण (न्न)ः शूरस्येदं ॥ १६ ॥

लोकैर्योहि महीतले ननु हरिश्चंद्रोपमो गीयते त्यागैश्च [र्य] जयैषु की- [र्तिX] [र+] मला धर्मश्च यस्योज्व [ज्ज्व] लः ।

येनादायि हराय मंदिरकृते भक्त्या प्रभूतं वसु श्रीमद्वाक्पतिराजसूनुरसमः श्रीसिंहराजो भवत् ॥ १७ ॥

हैममारोपितं येन शिवस्य भवनोपरि। पूर्णचंद्रोपमं स्वीयं मूर्त्ते य [ श ] ˘ [पि?] डक [ म् ] ॥ १८ ॥

...तोमरनायकं सलवणकं सैन्याधिपत्योद्धतं युद्धे येन नरेश्वराः प्रतिदिशं निर्ना ( ण्णा ) सिता जिष्णुना ।

कारावेश्मनि भूरयश्च विधृतास्तावाद्धि भावद्गृहे तन्मुक्त्यर्थमुपागतो रघुकुले भूचक्रवर्ती स्वयम् ॥ १९ ॥

[न्विX] ग्रहराजो भूत्तत्सुतो वासवोपमः ।
वंशलक्ष्मीर्जयश्रीश्च येनैते विधुरोध्दृते ॥ २० ॥

श्रीसिंहराजरहिता किल चिंतयंती भीतेव
संप्रति विभुर्ननु को ममेति ।
येनात्मवा (बा) हुयुगले चिरसन्निवासं संधीरितेति
ददता निज [राX] जलक्ष्मी: ॥ २१ ॥
येन दुष्टदमनेन सर्वत: साधिताखिलमही
स्व. वा (बा) हुभिः ।
लीलयैव वशवर्तिनी कृता किंकरीव निजपादयोस्तले ॥ १२ ॥
यस्य चारुचरितं सतां सदा शृण्वतां जगति कीर्त्तितं जनैः ।
हृष्टिजात घनरोमकं ...जायते तनुरलं महुर्म्मुहु ॥ २३ ॥

मुक्ताहारैः सुतारैः प्रतरलतुरगैश्चारुवस्त्रैश्च शस्त्रैः
कर्प्पूरैः पूगपूरैर्म्मलयतरुवरैर्हेमभारैरपारैः । उद्यद्दानैः समानैश्चलकुल-गिरिभिर्दन्तिवारैः सदारैर्न्निर्व्याजैः प्रातिर— ⌣⌣ भिरिति मृतैः प्राभृतैर्यः सिषेवे ॥ २४ ॥

छत्रधारावर ग्रामो द्वितीयः शंकराणकः [।X] तेनेमौ हर्षना [थाय] [भ]क्त्या दत्तौ सशासनौ ॥ २५ ॥

श्रीमद्दुर्लभराजेन योनुजेन विभूषितः [।X] लक्ष्मणेनेव काकुत्स्थो विष्णु-नेव हलायुधः ॥ २६ ॥

[महा] राजावली चासौ शंभुभक्तिगुणोदया श्रीहर्षः कुलदेवोस्यास्तस्मा-द्दिव्यः कुलक्रमः ॥ २७ ॥

अनंतगोचरे श्रीमान् पण्डित औत्तरेस्व (श्व) रः पंचार्थलाकुलाम्नाये विश्वरूपो भवद्गुरुः ॥ २८ ॥

---

## बिजोलिया लेख:—

जर्नल ऑफ रायल एशिॲटिक सोसायटी ऑफ बेंगाल व्हा ४. भा. १ पा. ४१—

विप्रश्रीवत्स गोत्रेभूदहिच्छत्रपुरे पुरा सामंतोनंतसामंत पूर्णतल्लो नृपस्ततः १२ तस्मा ज्जीजयराज विग्रहनृपौ श्रीचंद्रगोपेंद्रकौ तस्माद्दुर्ल-भगूर्वकौ शशि नृपो गुवाकसचंदनौ श्रीमद्वप्पय राज विंध्य नृपतिः श्री सिंह-

राग्विग्रहौ श्री मदूर्गुलभगुंदु वाक्पति नृपाः श्री वीर्यरामोनुजः १३ श्री चंडोवनिपेतिराणकधर श्री सिंहटो सल स्तद्भ्राताथ ततो पिवीसल नृपः श्रीराज देवीप्रियः पृथ्वीराज नृपोथ तत्तनुभवो रासल्य देवी विभुस्तत्पुत्रो जयदेव इत्यवनिपः सौमल्लदेवीपतिः १४ हत्वा पधिगामिचला भिधयसो राजादि वीरत्रयं क्षिप्र क्रूर कृतांत वक्र कुहरे श्रीमार्गदुर्गान्वितं श्रीमत् सोलण दण्डनायकवरः संग्रामरंगांगणे जीवन्नेव नियंत्रितः करभके येनष्टनि---सात् १५ अर्णो राजोस्य सूनुर्द्धतहृदयहरिः सत्व वाशिष्ट सीमो गांभीर्यौदार्यवर्यः समभवदपरा लब्ध मध्यो नदीत्सः तच्चित्रं जंतजाद्यः स्थितिरवृत महापंक हेतुर्न्नमथ्यो न श्रीमुक्तो न दोषाकर-रचितरतिर्निजिव्हाधि सेव्यः १६ यद्राज्यं कुशवारणं प्रतिकृतं राजांकुशेन स्वयं येनात्रैव न चित्रमेतत्पुनर्मन्यामहे तं प्रति ताच्चित्रं प्रति भासते सुकृतिना निर्वाण नारायण न्यक्काराचरणेन भंगकरणं श्रीदेवराजं प्रति ॥ १७ ॥ कुवलय विलासकर्ता विग्रह राजो जानिस्ततो चित्रं तत्तनयस्तच्चित्रं यत्र जडक्षीण सकलंकः ॥ १८ ॥ भादानत्वंचकभादानपते परस्य भादानः यस्य दधत् करवालः करालः करतलाकालितः ॥ १९ ॥ कृतांत-पथसज्जोभूत् सज्जनो सज्जनो भुवः वैकुंतंकुतपालागाद्यतो वैकुंत-पालकः ॥ २० ॥ जाबालिपुरं ज्वालापुरं कृतापाल्लिका पिप्पली वात-तूलतुल्यं रोषात्तव्दलं न सौर्येण ॥ २१ ॥ प्रतोल्यां च वलभ्यां च येन विश्रामितं यशः ढिल्लिकाग्रहणश्रान्त माशिकालाभलंभितः ॥ २२ ॥ तज्येष्ठभ्रातृपुत्रो भूत् पृथ्वीराजः प्रभूपमः तस्मादर्जित दीनागोहेम पर्वत दानतः ॥ २३ ॥ आतधर्मरतेपि पार्श्वनाथ स्वयंभुवे दत्तं मोराक्ररी ग्रामं भुक्तिमुक्तिश्च हेतुना ॥ २४ ॥ स्वर्णादिदाननिवहैर्दशभिर्महद्भि-स्तोलानरनैर्गरदानचयैश्च विप्राः येनार्चिताश्चतुर भूपति वस्तपाल-माक्रम्य चारु मनसाद्धिकरी गृहीतः ॥ २५ ॥ सोमेश्वरालब्धराज्य-स्ततः सोमेश्वरो नृपः सोमेश्वरनतो यस्माज्जन सोमेश्वरो भवत् ॥ २६ ॥ प्रतापलंकेश्वर इत्याभिख्यां यः प्राप्तवान् प्रौढ प्रथुप्रतापः यस्याभिमुख्ये वरवैरिमुख्या केचिन्मृताः केचिदभिद्रुताश्च ॥ २७ ॥

तृतीयायां तिथौ वारे गुरौ

तारे च हस्तके व्राद्धिनाम नियोगे च करणे तैतले तथा संवत् १२२६ फाल्गुन व ॥ ३ ॥ ताभारेवणा यामयेरंतराले गुहिलपुत्र रांदावर महंघणसिंहाभ्यां दत्तक्षेत्र डोहली १

---

# प्रकरण चौथें.

## कनोजचे सम्राट प्रतीहार

गुहिलोत व चाहमान यांजप्रमाणेंच आरबांचा प्रतीकार करण्यांत प्रतीहार घराणें ह्याच काळीं उदयास येऊन गुहिलोत घराण्याप्रमाणें भरभराट पावलें. हिंदुस्थानचा अगदीं उत्तरे कडील प्रदेश प्रतीहारानीं हळू हळू काबीज करून थेट कनोजच्या सम्राटपदावर आपला अधिकार बसविला. टॉड् या घराण्यास गुहिलोत अगर चाहमान घराण्याइतका मान देत नाहीं; कदाचित त्याचें कारण असें असावें कीं मुसलमानी अमदानींत ह्या घराण्यास उतरती कळा लागली होती व सध्या तर हें घराणें नामशेष झालें आहे.—परंतु टॉड्नंतर अलीकडे नवीन लेख उपलब्ध होत असून त्यांत प्रतीहार घराण्याचा फारच उत्कर्ष दृष्टोत्पत्तीस येतो. स्मिथ व भांडारकर यांनीं हें संशोधनाचें कार्य काळजीपूर्वक केलें असून या घराण्याचा संगतवार इतिहास लावला आहे. अगदीं अलीकडील संशोधनावरून असें निश्चित दिसतें कीं ,कनोजचे वर्म घराण्याचें सम्राटपद नवव्या व दहाव्या शतकांत प्रतीहार घराण्याकडे अव्याहत चालू होतें. प्रतीहार घराण्याविषयीं सर्व उपलब्ध माहिती स्मिथ साहेबानीं १९०९ च्या रायल ए. सो. जर्नलमध्यें अत्यंत सुंदर रीतीनें ग्रथित केली आहे. पण

स्मिथच्या मतें प्रतीहार घराण्याचा समावेश गुर्जर जातींत होतो व गुर्जर हें एतद्देशीय लोक नव्हत. वरील मताचें खंडन आम्हीं पूर्वीं केलेंच आहे; तें थोडक्यांत असें:—एकतर प्रतीहार हें गुर्जर नव्हेत; आणि दुसरें असें कीं, गुर्जरलोक देखील एतद्देशीयच होत. स्मिथ साहेबाचें वरील चुकीचें विधान वगळतां त्यांनीं दिलेला प्रतिहारांचा इतिहास माननीय आहे; त्याचाच आधार घेऊन पण अलीकडे उपलब्ध झालेल्या नव्या माहितीची त्यांत भर टाकून व स्मिथसाहेबांनीं उल्लेखिलेल्या लेखांची प्रत्यक्ष तपासणी करून व त्यांचा नीट अर्थ लावून प्रस्तुत प्रकरण आम्हीं लिहित आहोंत.

१९०३-४ च्या ऑर्किऑलाजिक रिपोर्टांत भोज राजाचा सागरताल येथील लेख छापला आहे. त्याची नक्कल जिज्ञसू वाचकांच्या सोईसाठीं मुद्दाम पुढें दिली आहे; ह्या लेखावरून प्रतीहार घराण्याच्या उत्पत्तीची व या प्राचीन राजांची चांगली माहिती मिळते. ह्या घराण्यांत प्रथम प्रसिद्धीस आलेला राजा म्हणजे नागभट होय. स्मिथच्या मतें नागभटाचा काळ इ. स ७२८ ते ७४० होय. प्रतीहार घराण्याचा मूळ पुरुष प्रभूरामचंद्राचा भाऊ त्याचें नेहमीं द्वारपालाचें म्हणजे प्रतीहारीचें काम करणारा लक्ष्मण हा मानण्यांत येत असल्यामुळें हें घराणें सूर्यवंशांत गणलें जात होतें. नागभटाविषयीं खालीलप्रमाणें वरील लेखांत उल्लेख आहे:—“ प्रतीहारी ( द्वाररक्षक ) चें चिन्ह धारण करणाऱ्या ह्या कुलांत नागभटाचा जन्म झाला. पापरत बालननामक म्लेंछ राजा विरुद्ध त्याचें शस्त्र सारखें उपसलेलें असे; त्यामुळें तो जणूं काय जन्मतःचतुस्त्रि असावा असा भास होई”— या वर्णनावरून असें दिसतें कीं मूर्तिभंजक आरबांच्या विरुद्ध लढून यानें विजय संपादिला असावा. अरबांनीं सिंधप्रांत जिंकून पूर्वेकडील प्रांत काबीज करण्यास आरंभ केला

होता, वगैरे हकीगत पूर्वी आलेलीच आहे. ह्या अरबांविरुद्ध विजय संपादून ज्याप्रमाणें बाप्पारावळनें कीर्ति मिळविली तद्वतच नागभटानेंही मिळविली, व ज्याप्रमाणें बाप्पानें गुहिलोत घराण्याची किंवा सामंतदेवानें चाहमान घराण्याची स्थापना केली त्याप्रमाणेंच प्रतीहारी घराण्याची स्थापना नागभटानें केली. स्मिथच्या म्हणण्याप्रमाणें 'भिन्माल' शहर ही नागभटाची राजधानी होय. परंतु लेखांतून याविषयीं कांहींच उल्लेख मिळत नाहीं. कदाचित् प्राचीन काळीं लेख लिहविणारांना स्थलें अत्यंत परिचित असल्यामुळें त्यांचा नामनिर्देश लेखांतून करणें महत्त्वाचें वाटलें नसेल; पण आम्हांस स्थलांची माहिती असणें फारच अवश्यक झालें आहे; किंबहुना स्थलांच्या माहितीच्या अभावीं इतिहासाची संगतीच जुळणार नाहीं:—असो, पृथ्वीराज चव्हाणाचे काळीं नाहरराय प्रतीहारीचें ठिकाण (जोधपुराजवळील) मंडोर होतें हें निश्चित आहे. त्यावरून असें वाटतें कीं, प्रतीहार घराण्याची गादी नागभटाचे वेळीं देखील मंडोर येथेंच असावी. नाहरराय व पृथ्विराज चव्हाण यांमध्यें पडलेल्या लढ्याचें वर्णन पुढें येईलच.— दुसरें असें कीं, मंडोरला उध्वस्त स्थितींत असलेले प्राचीन वाडे, व पाली भाषेंत लिहिलेले शिलालेख सांपडतात. त्यांवरून असें दिसतें कीं, प्राचीन काळीं मंडोर हें फार भरभराटीचें व महत्वाचें ठिकाण असावें. (पहा टॉड् पा. २१०; व्हॉ १). मंडोर गांव प्रतीहारांचें मूळ राजधानीचें ठिकाण कां असावें ह्यास तिसरें कारण असें कीं, मारवाडांतील मुख्य ठिकाण मंडोरच होतें. राठोड लोकांनीं प्रथम प्रतीहार घराण्याचा आश्रय करून त्यास पादाक्रान्त करून आपणच गादी बळकावली. ह्याच राठोड लोकांनीं पुढें जोधपूर येथें म्हणजे मंडोरनजीक थोड्या मैलांच्या अंतरावर नवी राजधानी स्थापन केली. असो; राठोड

वंशाच्या इतिहासाकडे लक्ष दिलें तर त्यांनीं मंडोर येथें असलेल्या प्रतीहार घराण्याचा आश्रय केला असावा हें उघड दिसतें. एकंदरींत नागभटाची गादी बहुतेक मंडोर येथें असावी असें आम्हांस वाटतें. पुनः असें कीं, भिनमाल येथें ८ व्या शतकाच्यापूर्वीं व्याघ्रमुखाचे वंशज 'चाप' वंशाचे राजे राज्य करीत असत, हें मागील भागांत आलेंच आहे. तेव्हां भिनमाल येथें नागभटाची राजधानी होती हें असंभाव्य दिसतें. तथापि आमच्या विधानावर आक्षेप असा येऊं शकतो कीं, भिनमाल व मंडोर हीं दोन्हीं गांवें मारवाडांत असून एकाच राजछत्राखालीं होतीं. ह्या सर्व प्रदेशास पूर्वीं गुर्जरत्रा असें म्हणत. गुर्जरत्रा म्हणजे मारवाड प्रांत गुजराथ नव्हे. [गुजराथ प्रांत त्या काळीं लाट नांवानें प्रसिद्ध होता]. ह्या प्रांतांत एकछत्रीराज्य असल्यामुळें तें भिनमाल येथेंच असावें; अर्थात् मंडोर येथें दुसरें राज्य असणें असंभवनीय दिसतें. अशा तऱ्हेनें सर्व बाजूंनीं विचार करतां नागभटाचें मूळ ठिकाण कोणतें हें ठरविणें ज़रा कठीणच आहे असें म्हणावें लागतें. तें कोठें तरी मारवाडांतच असावें. कारण ८ व्या शतकाच्या प्रारंभीं मारवाड प्रांतावर जितक्या आरबांच्या स्वाऱ्या होत तितक्या सांबर अगर चितोड प्रांतावर होत नसत. नागभट तर अरबांवर पराक्रम गाजवून व त्यांचा पाडाव करून प्रसिद्धीस आला तेव्हां त्याचें कार्यक्षेत्र कोठें तरी मारवाडांतच असावें. अरबांनीं सिंधप्रांत ७१२ त काबीज केला; तेव्हां त्यानंतर थोडक्याच वर्षांनीं त्यांनीं मारवाडाकडे मोर्चा वळविला असावा; म्हणजे नागभटाचा काळ स्मिथनें ठरविल्याप्रमाणें इ. स. ७२८ ते ७४७ असावा हें युक्तच आहे.

नागभटाच्या मागून त्याचा पुतण्या ककुस्थ (किंवा कक्कुक) हा गादीवर बसला. स्मिथच्या म्हणण्याप्रमाणें त्याची कारकीर्द

इ. ७४० ते ७५२ पर्यंत असावी. ककुस्थानंतर देवशक्ति ऊर्फ देवराज राज्य करूं लागला. त्याची कारकीर्द इ. स. ७५५ ते ७७० पर्यंत असावी. त्या कुलांत स्वपराक्रमानें अतिशय प्रसिद्धीस आलेला व सम्राटपद पावलेला वत्सराज हा त्याचाच मुलगा होय. वत्सराजानेंच कनोजवर स्वारी केली व तेथील भंडिकुल राजाचा पाडाव करून तो साम्राज्यपदाचा मालक झाला. वत्सराजाच्या पराक्रमाविषयीं भोजाच्या शिलालेखांत खालालप्रमाणें उल्लेख आहेः— "ख्याताद् भंडिकुलान्मदोत्कटकरिप्राकार दुर्लंघतो यः साम्राज्यमाधिज्यकार्मुकसखासंख्ये हटादग्रहीत्"— ह्या श्लोकाचा अर्थ इतिहासकारांनीं नीट लावलेला नाहीं, त्यामुळें विपर्यास होण्याचा संभव आहे; यासाठीं वरील श्लोकाचा थोडा जास्त विचार करणें अवश्य आहे.

श्लोकाचा सरळ अर्थ असा आहे कीं, 'प्रसिद्ध भंडीकुलापासून, जणूं काय मदोत्कट हत्तींच्याच तटामुळें दुर्गम असणारें साम्राज्यपद लढाईंत आपल्या धनुष्याच्या सहाय्यानें त्यानें पराक्रमानें हिसकावून घेतलें' वत्सराजानें साम्राज्याधिकार आपल्याकडे घेतला त्याचा अर्थ काय होतो तें आतां पाहूं. फार प्राचीन कालापासून साम्राज्य म्हणजे काय व सामंत कोणास म्हणावें हें उत्तर हिंदुस्थानांत महशूरच आहे. याविषयीं अगदीं पहिला उल्लेख महाभारतांत सभापर्वांत सांपडतो. त्याठिकाणीं श्रीकृष्णाचे तोंडीं असें वाक्य आहे "ब्राह्मणाच्या भीतीनें सर्व क्षत्रियांनीं मिळून राजकूट स्थापन केलें व मगध देशच्या जरासंधास त्याचा अधिपति केलें." पांडवांनीं जरासंधाचा पाडाव केल्यावर त्यांच्याकडे सार्वभौमपदाचा मान आला किंवा नाहीं हें ठरवितां येत नाहीं; पण एवढें मात्र खरें कीं, महाभारतकालीं म्हणजे (इ. सनापूर्वीं सु. ३००

वर्षें) मगधदेशाकडेच साम्राज्यपद होतें. त्यावेळीं मगधांत नंद-वंश नांदत असावा. चंद्रगुप्तराजानें सार्वभौमत्वाचे अधिकार जास्त दृढमूल केले व अशोकराजानें स्वपराक्रमानें साम्राज्यपदाचा कोट रचिला; आणि अशोकराजाच्या पाटलीपुत्र राजधानीस सार्वभौममहत्व मिळालें. पुढें त्याच ठिकाणीं निरनिराळ्या वंशांचे सम्राट निरनिराळ्या काळीं झाले. पाटलीपुत्रांत शेवटीं गुप्तराजे साम्राज्य करूं लागले. ह्या गुप्तराजांचे मुख्य पुरुष म्हटले तर समुद्रगुप्त व चंद्रगुप्त होत. यानंतर हूणांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केला त्यावेळीं त्यांनीं गुप्तांचा पाडाव करून त्यांची राजधानी उध्वस्त केली; त्यावेळेपासून पाटलीपुत्र नगराचे महत्त्वास उतरती कळा लागली. ह्यापुढें हर्षानें कनोज येथें सार्वभौमपद कसें स्थापन केलें वगैरे हकीकत पहिल्या पुस्तकांत आलीच आहे. हर्षानें आपल्या राज्यव्यवस्थेनें इतर राजांस अगदीं अंकित केलें होतें, व त्याजजवळ ६०००० गजसैन्य असून तो स्वत: पराक्रमी वीर होता हें विस्तारानें सांगावयास नकोच.— कनोज शहरास त्यामुळें फारच महत्त्व प्राप्त झालें होतें; ह्या काळीं ज्या त्या पराक्रमी राजास असें वाटे कीं, आपली गादी कनोजला असावी. मुसलमानी अमदानींत अशीच गोष्ट दिसून येते. ज्या त्या मुसलमान सरदारास असें वाटे कीं आपण दिल्लीच्या बादशाहाचा पाडाव करून तेथें तक्तनशीन व्हावें. साधारणत: शूर पुरुष महत्त्वाकांक्षी असतातच. मांडोरच्या वत्सराजानें महत्त्वाकांक्षेच्या भरीस पडूनच कनोजवर स्वारी केली व त्यांत त्याला यश मिळालें. वर्मघराण्यास आधींच उतरती कळा लागली होती; त्यांत वत्सराजासारख्या प्रतापी राजानें हल्ला केल्यावर कनोज टिकाव धरूं शकलें नाहीं ह्यांत नवल नाहीं. साधारणपणें इतिहासाचा असा एक नियम दिसतो कीं, कोणत्याही राज्याची भरभराटीची

सामान्य मर्यादा म्हणजे २०० वर्षे होय; त्यानंतर भरभराटीची स्थिति संपून ऱ्हासास सुरवात होते. असाच प्रकार कनोज येथील वर्म घराण्यासंबंधीं दिसतो.

भोजाच्या वरील लेखांत वर्मघराण्याचा शेवटचा पुरुष कोण होता, तसेंच वत्सराजानें कोणत्या शकांत स्वारी केली वगैरे गोष्टींचा उल्लेख नाहीं. वत्सराजानें इ. स. ७८१ नंतर कनोजवर स्वारी केली असावी असें एका जैन ग्रंथाच्या शेवटच्या उल्लेखा-वरून म्हणतां येतें. स्मिथ म्हणतो कनोजच्या गादीवर त्यावेळीं इंद्रराज असावा; व वरील म्हणण्यास एका जैनलेखाचा तो आधार घेतो. "शक ७०२ मध्यें इंद्रायुध उत्तरेकडील प्रदेशांवर राज्य करीत होता; कृष्णराजाचा मुलगा श्रीवल्लभ दक्षिणेकडे राज्य करीत होता, अवंती नामक राजा (अवंती नगरीचा नव्हे!) पूर्वेकडील प्रदेशावर राज्य करीत होता, वत्सराज पश्चिमेकडील प्रदेशावर व सौर्यांच्या मुलखाचें आधिपत्य जयवराहांकडे होतें"—या उताऱ्या-वरून उघडच दिसतें कीं, शके ७०२ म्ह० इ. स. * ७८० मध्यें कनोजच्या गादीवर इंद्रराज अथवा इंद्रायुध राजा असावा व मारवाडांत वत्सराज राज्य करीत असावा.

येथें श्लोकांतलि अवन्तिभूपति या शब्दाविषयीं खुलासा करणें अवश्यक आहे. "अवंति भूपति" याचा अर्थ अवंतीचा अगर माळव्याचा राजा असा न करतां अवंति नांवाचा राजा असा कर-णेंच जास्त प्रशस्त होय. कारण अवंति भूपतीचें राज्य पूर्वेकडील

---

* शाकेष्वब्दशतेषु सप्तसु दिशं पंचोत्तरेषूत्तरां ।
पातीन्द्रायुध—नाम्नि कृष्णनृपजे श्रीवल्लभे दक्षिणाम्
पूर्वां श्रीमदवन्ति—भूभृति नृपे वत्सादिराजेऽपराम्
सौर्याणामधिमण्डले जययुते वीरे वराहेऽवति ॥

असें श्लोकांत स्पष्ट म्हटलें आहे. व अवंती तर पूर्वेकडे नाहीं. म्हणजे इंद्रायुधाचा जरी ७८० मध्यें वत्सराजाकडून पराभव झाला होता तरी ७८३ मध्यें तो कनोजच्या गादीवरच होता. पराभूत सम्राट गादीवर कसा असूं शकेल ह्या प्रश्नाचें उत्तर हिंदुस्थानच्या इतिहासांतील नानाविध घडामोडींचा विचार केला असतां सहज ध्यानांत येईल.—मोडकळीस आलेल्या राजवंशाच्या शेवटच्या राजपुरुषाच्या नांवानें त्याच्या हयातींत कारभार चालविला जातो व त्याच्या पश्चात् विजयी वंशाकडे गादी चालू होते. हेंच काय, पण इतिहासांत असे दाखले मिळतात कीं, सार्वभौम घराण्याचा उच्छेद झाला तरी त्या घराण्यांतलि अगदीं दूरचा वंशज हयात असला तर त्याला बरेच लोक मिळतात, व नूतन राजाविरुद्ध बंड उभारलें जातें. एकंदरींत लोकांना जुन्याविषयीं व जुन्या राजघराण्याविषयीं फारच अभिमान असतो. अधिकारसूत्रें कोणाकडे असलीं तरी चालतलि, पण नांवाचा अधिकार मात्र पुरातन राजवंशाकडे असावा असा जनतेचा आग्रह असतो. जनता ही अत्यंत पुराणप्रिय असते. जनतेचा अशा तऱ्हेचा ऋतु जाणूनच जेते लोक जितांच्या राजघराण्याचा विध्वंस एकदम करीत नाहींत. ह्यास अगदीं अलीकडील उदाहरणें द्यावयाचीं म्हणजे तीं मराठेशाहींत व इंग्रजी अमदानींत सहज सांपडतील. एवढेंच काय, परंतु जुन्या व पराभूत राजघराण्याच्या वतीनेंच अधिकार चालविला जावा, ह्याकरितां विजयी सैन्यांत व त्यांच्या राजकटांत परस्पर रणें माजतात. दिल्लीचें राज्यपद पूर्वापार मोंगल घराण्याकडे चालत ठेऊनच आपण सर्व सूत्रांचें चालक व्हावें, खजिना, सैन्य, करभार वगैरे कारभार आपणांकडेच असावेत अशाबद्दल १८ व्या शतकांत देखील इंग्रज, मराठे व अफगाण यांमध्यें सारखी चुरस

चालली होती. पूर्वेकडील प्रांत इंग्रजांनीं बळकाविले होते, दक्षिणेकडील व पश्चिमेकडील प्रांत मराठ्यांनीं व अफगाणांनीं आपल्या हस्तगत करून घेतले होते; व हे तिघेहि दिल्ली राजघराण्याच्या रक्षणार्थ आपआपसांत यादवी करीत होते. ८ व्या शतकांत वत्सराजाच्या काळीं हीच गोष्ट दिसून आली. वत्सराजानें तर पश्चिमेकडून स्वारी करून कनोजचें साम्राज्य पादाक्रांत केलें. बंगालाधिपति गोपालराजानें (म्ह० अवंतीनें) त्याच्यावर पूर्वेकडून व राष्ट्रकूटांनीं (म्ह० मराठ्यांनीं) दक्षिणेकडून स्वाऱ्या केल्या. पालवंशाच्या लेखांवरून तसेंच राष्ट्रकूटांच्या लेखांवरून सदरहू धुमाकुळीचें स्वरूप लक्षांत येतें. वत्सराजानें गोपालराजाचा पुरा मोड करून गौड व वंग (पूर्व व पश्चिम बंगालप्रांताच्या) अधिपतींचीं राजचिन्हें (म्हणजे २ छत्रें) काबीज केलीं; पण राष्ट्रकूटांचा राजा ध्रुव यानें वत्सराजास चांगलाच हात दाखवून त्यानें हस्तगत केलेलीं वंग व गौड येथील छत्रें आपल्या स्वाधीन करून घेतलीं व खुद्द वत्सराजास गुर्जरप्रांत म्हणजे मारवाडांत हटविलें.

वरील हकीकत राष्ट्रकूट लेखांत सांपडते; परंतु त्याबरोबरच वत्सराजाची व गोपालाची लढाई कोठें झाली, वत्सराजाचा पराभव ध्रुवानें कोठें व कसा केला याविषयीं कांहींच माहिती मिळत नाहीं. त्याप्रमाणें लढाईच्या वेळीं प्रत्येकाजवळ किती सैन्य होतें व तें कोणकोणत्या प्रकारचें होतें याविषयीं पण उल्लेख सांपडत नाहीं. तरी वरील हकीकतीचे जोरावर असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, वत्सराजाचा प्रदेश रखरखींत व रुक्ष असल्यामुळें त्याजजवळ गजसैन्य नसावें. त्याचे सैन्यांत विशेषतः तिरंदाजांचा भरणा असावा व पुष्कळ घोडदळही असावें (रजपूत लोक घोड्यावर बसण्यांत पटाईत असतातच). बंगालच्या व कनोजच्या राजांजवळ गजसैन्य

असावें. हर्षाचें गजसैन्य ६०००० होतें हें इतिहासावरून दिसतें, तेव्हां त्याच्याच गादीवर बसणाऱ्यांजवळ गजसैन्य मुख्यतः असेलच. म्हणूनच भोजलेखांत हत्तीच्या कोटानें वेष्टिलेलें होते तरी सुद्धां कनोजचें साम्राज्य वत्सराजानें घेतलें असें वर्णन आहे. मराठ्यांच्या गजसैन्याची व घोडदळाची पूर्वीपासून प्रसिद्धीच आहे. (ह्यूएनत्संगकृत वर्णन पहा तसेंच हर्षचरित पहा भाग १ ला.) त्यामुळेंच वत्सराजानें जरी कनोजचा व बंगालचा पाडाव केला, तरी त्यांस राष्ट्रकूटांचा पराभव करितां येईना.

अशा रीतीनें कनोज जिंकण्याचा वत्सराजाचा बेत विफल झाला; परंतु वत्सराजाच्या मुलानें आपल्या पित्याचा उद्देश अतुल पराक्रमानें सिद्धीस नेला. वत्सराजाच्या मुलाचें नांव नागभट होतें व ह्या नागभटाला ( अर्थात दुसरा ) च कनोजच्या साम्राज्यसंस्थापकाचा मान मिळतो. नागभटाच्या दिग्विजयाचें वर्णन देणारे चार श्लोक भोजलेखांत सांपडतात व त्यांवरून त्याच्या पराक्रमाची कल्पना होते. नागभटानें प्रथम कनोजच्या सामन्तांचा पराभव केला व नंतर कनोजवर हल्ला चढविला. आंध्र, सैन्धव, कलिंग, विदर्भ इत्यादिक राजे कनोजचे सामन्त असल्यामुळें त्यांचा प्रथम पाडाव करून त्यांस त्यानें आपले अंकित केलें व त्यांस खंडणी देणें भाग पाडिलें. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत एक विशेष गोष्ट दिसून येते ती अशी कीं, येथें परस्पर युद्धें होत, पण त्यांत पराभूत झालेल्याचा प्रांत खालसा होत नसे; हरल्यास नुसता करभार देणें प्राप्त होई. दिग्विजय मिळवणें ह्याचा अर्थ इतर सर्व राज्यें खालसा करून आपला अंमल बसवणें असा नसून, फक्त आपलें आधिपत्य कबूल करावयास भाग पाडणें एवढाच होता. सार्वभौमपद मिळविणें ह्याचा अर्थ असाच कीं, इतर सर्व राजांस आपलें वर्चस्व कबूल

करावयास लावणें; म्हणजे इतर राजे सार्वभौम राजाचे ' मांडलिक ' होत असत; पण तेवढ्यामुळें त्यांचे राज्य करण्याचें काम परतंत्रतेनें न चालतां पूर्वीप्रमाणेंच चाले. असो, अशा रीतीनें दिग्विजय संपादन केल्यावर नागभटानें बंगालाधिपतीचा पराभव केला. याच बंगालाधिपतीनें पूर्वी कनोजच्या इंद्रराजाचा पाडाव केला होता, व त्याचे जागीं चक्रायुधाची स्थापना केली होती. चक्रायुध सम्राटानें पुन्हां वंगाधिपतीचा आश्रय घेतला. येवढ्या क्षुल्लक सबबीवर * नागभटानें त्याच्यावर स्वारी केली व त्यांत त्याला यशहि मिळालें. अशा तऱ्हेच्या क्षुल्लक सबबी काढून विजयेत्सु व महत्त्वाकांक्षी वीर आपला कार्यभाग साधीत असतात. मुसलमानी अमदानींत असाच देखावा दृष्टीस पडतो. दिल्लीचा अधिपति शहाअलम् ह्यानें इंग्रजांचा आश्रय पत्करला येवढ्याच सबबीवर मराठ्यांनीं दिल्लीवर स्वारी केली, व शहाअलम् यास पदच्यूत करून बाबर घराण्यांतील दुसऱ्या एका पुरुषास त्याच्या गादीवर बसविलें. असो, नागभटानें चक्रायुधास जिंकिलें पण पदच्युत मात्र केलें नाहीं. ' विनयनम्रवपुर्व्यराजत् '— उलट त्यास गादीवर ठेवून सामन्तास साजेल अशा विनयभावानें तो त्याशीं वागूं लागला. त्यामुळें लोकांमध्यें तो फारच प्रिय झाला. कांहीं काळ गेल्यानंतर नागभटानें आपल्या स्वतःस साम्राज्यपदाभिषेक करविला, व आपणच कनोजचें राज्य करूं लागला. बुचकला लेखांत ( ए. इ. पा. १९८ ) तर वत्सराज व नागभट या दोघांनाहीं सार्वभौमत्व निदर्शक विशेषणें दिलेलीं आढळतात. "परम भट्टारक महाराजाधिराज परमेश्वर " असा किताब दोघांनाही लावला आहे त्यावरून असें दिसतें कीं, वत्सराजानेंच खरोखर कनोजचा पाडाव प्रथम केला. नागभट तर सम्राटपदाभिषिक्त झाला यांत संशय

* पराश्रय कृत स्फुट नीचभावम्

नाहींच; प्रश्न एवढाच आहे कीं, नागभटाचें ठाणें कनोजला होतें कीं, दुसऱ्या कोठें होतें. बुचकला लेख सुमारें इ०स० ८१५ त लिहिला गेला. पण त्यांतही कनोजाविषयीं कांहींच उल्लेख नाहीं. स्मिथचा असा अंदाज आहे कीं, नागभटानें ८१० च्या सुमारास आपली गादी कनोज येथें स्थापिली; नंतर कांहीं वर्षांनीं म्हणजे इ० स० ८१६ मध्यें चक्रायुधासमवेत वर्मघराण्याचा शेवट झाला असावा. ( पुस्तक पहिलें. पाहा )

कनोजचा पाडाव करून साम्राज्यपदावर तक्तनशीन झाल्यावर नागभटानें कनोजच्या सर्व सामन्तांस आपलें वर्चस्व कबूल करणें भाग पाडलें. लेखांतून त्यानें जिंकिलल्या देशांची ( अर्थात तद्देशीय सामन्तांची ) याद दिली आहे, त्यावरून कनोजच्या साम्राज्याची मर्यादा ठरवितां येते. नागभटानें आनर्त ( उत्तर गुजराथ ), माळवा, किरात (विंध्यप्रांत), तुरुष्क, वत्स (अलाहाबाद), मत्स्य, ( जैपूर ) व इतर देशांतील किल्ले हस्तगत केले; म्हणजे असें दिसतें कीं, कनोजचें साम्राज्य उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस काठियावाड-पर्यंत, व पूर्वेस अलाहाबाद ते पश्चिमेस पंजाबपर्यंत होतें. “ तुरुष्क ” हें कोणत्या प्रांताचें नांव असावें हें निश्चित ठरविणें कठीण आहे. स्मिथच्या मताप्रमाणें तुरुष्क म्हणजे सिंधप्रांत होय. सिंधप्रांत इ. स. ७१२ त आरबांनीं जिंकिला होता. ह्या लेख ८६० मधील आहे, तेव्हां ह्या लेखाच्यावेळीं नागभटाला आरबांचा पाडाव करतां आला व तो कसा हें एक गूढच आहे. आमचे मतें तुरुष्क प्रांत कोणता हें आम्ही एका टीपेंत सविस्तर सांगणार आहोंत.

दुसऱ्या नागभटाच्या कारकीर्दीचा काळ इ. स. ८०० ते ८२५ पावेतों असावा असें स्मिथ म्हणतो, व तें संभवनीय दिसतें. चक्रायुधास आश्रय देणाऱ्या वंगाधिप धर्मपालाचा त्यानें पुरा मोड केला

असल्यामुळें त्यास प्रबळ असा शत्रूच नव्हता; तरीपण वत्सराजा-प्रमाणें नागभटाचाही राष्ट्रकूटांनीं पराभव केलाच. तथापि नागभटाचा राष्ट्रकूटांनीं पुरा पिच्छा पुरविला असें दिसत नाहीं; नाहीं तर कनोजचें सम्राटपद राष्ट्रकूटांकडेच आलें असतें.—नागभटानंतर कनोजची गादी निदान आठ पिढ्यापावेतों तरी त्याच्याच वंशजांकडे चालत होती.

नागभटाच्या पश्चात् त्याचा मुलगा रामचंद्र राज्यकारभार पाहूं लागला. त्यानें ८२९ पासून ८४० पर्यंत राज्य केल्यानंतर मिहिर ऊर्फ भोजराजास राज्यपद प्राप्त झालें. प्रतीहारी घराण्यांत भोजराजाइतका प्रतापी पुरुष झाला नाहीं; व त्याची कारकीर्दहि सर्वांत जास्त ५० वर्षांची झाली; (इ. स. ८४० ते ८९०). तसेंच त्याचा राज्यविस्तारहि सर्वांत जास्त होता. सागरताल लेखांत भोजराजाची अतिशय स्तुति केली आहे; कदाचित् त्याचें कारण असेंही असूं शकेल कीं हे लेख त्याचे कारकीर्दींतच लिहिले गेले. पण एवढें मात्र खरें कीं, त्याची सत्ता पश्चिम ते पूर्वसमुद्रापर्यंत, व कनोज ते विंध्यपर्वतापर्यंत सारखीच मानली जात असे. कनोजचा महत्त्वाचा प्रतिस्पर्धी बंगालचा राजा होय; त्याचाहि भोजराजानें पाडाव केला होता; परंतु त्यास राष्ट्रकूटांचा पराभव होईना; उलट, ८६७ च्या ‘ बगुम्रा ’ सनदेवरून असें दिसतें कीं, जरी भोजराजाची सत्ता सर्वत्र पसरली होती तरी राष्ट्रकूटांचा राजा ध्रुव निरुपम यानें त्याचा पराभव केला ( धामव्याप्तदिगन्तरोऽपि मिहिरः सद्रश्यवाहान्वितः). यावेळीं देखील मिहिराचे सैन्यांत विशेष अश्वदळाचाच भरणा असावा असें वाटतें. बिलहारी व काशी येथील लेखांवरून (एपि० इंडि पा. २९२) असें दिसतें कीं, चेदी (हैहय) देशाचा हैहय कोक्कलदेव हा भोजाचा समकालीन असावा व त्याचे भोजराजास पाठबळ असावें. “ भोजे

वल्लभराजे श्रीहर्षे चित्रकूटभूपाले । शंकरगणेच राजनि यस्या-सीदभयदः पाणिः" त्या श्लोकांत कोक्कलदेवाची केलेली स्तुति जरा अतिशयोक्तीची वाटते. पण त्यावरून असें दिसतें कीं कनोजचें साम्राज्य आग्नेयी दिशेस यमुना नदीपर्यंत पसरलें होतें.

भोजराजाच्या राज्यव्यवस्थेचें वर्णन अल मसऊदी नांवाच्या अरबी प्रवाशानें ८५१ मध्यें लिहून ठेविलें आहे. तो म्हणतो, "जूझरच्या राजाच्या ताब्यांत अत्यंत प्रतापी सैन्य आहे. त्याचें अश्वदळ निरुपम आहे; व त्याचे जवळ उंटाचेंही सैन्य आहे. तो अत्यंत संपत्तिमान् असून त्याचे राज्यांत चोरांचें बिलकुल भय नाहीं." ( इलियट भा. १ पाहा ) याचा अर्थ असा कीं, कनोजचें सम्राटपद वर्मघराण्याकडे असतानां कनोजच्या सैन्यांत 'गजदळ' विशेष असे, परंतु कनोजचें सम्राटपद प्रतीहारी घराण्याकडे आल्यापासून सैन्यांत अश्वदळासच फार महत्व आलें. याचें कारण इतकेंच कीं प्रतीहारी घराणें मूळचें मारवाडचें; मारवाडांतील लोकांना घोड्यावर बसण्याचा विशेष शोक व प्रत्यक्ष संग्रामांत चपळपणा-मुळें घोड्याचा विशेष उपयोग. आरब लोक तर कनोजच्या राज्याला 'जूझर' चें गुर्जरांचें राज्य असें म्हणत त्याचें कारण एकतर प्रतीहारी घराण्याचा मूळ देश गुर्जरत्रा ( हल्लींचें मारवाड ) होय व दुसरें असें कीं आरबांनीं जिंकिलेल्या व वसाहत केलेल्या सिंध प्रांताच्या लगतचा प्रदेश गुर्जरत्राच होता. ह्या कारणामुळें प्रती-हारी घराण्याचे वैरी व आरबांचे सहायक राष्ट्रकूटलोकहि प्रतीहारांना "गुर्जर" असें संबोधीत. पण कनोजच्या प्रतीहार घराण्यांनीं आप-णास कधींच गुर्जर म्हणवून घेतलें नाहीं हेंहि लक्षांत घेण्याजोगें आहे.

भो॰ाच्या पाठीमागून त्याचा मुलगा महेंद्रपाल ऊर्फ निर्भयराज-गादीवर बसला. त्याची कारकीर्द इ. स. ८९० ते ९०८ पर्यंत

असावी. त्याचा राजकवि प्रसिद्ध कवि व नाटककार राजशेखर होता. राजशेखरच्या ग्रंथांतून देखील स्वतःविषयीं 'महेंद्रपाल व त्याचा मुलगा महीपाल यांचा गुरु' असे उल्लेख सांपडतात. भोजराजानें कमाविलेल्या मोठ्या राज्याचा त्यानें उत्तम प्रतिपाळ केला. ताम्रपटावरून वगैरे त्याच्या राज्याचा विस्तार सहज ठरवितां येतो. सौराष्ट्र, अवध व पंजाबांतील कर्नाळ प्रांत त्याच्या राज्यांत मोडत. चालुक्याधिपति बलवर्मराजाच्या ताम्रपटांत महेंद्रपालाविषयीं 'महाराजाधिराज परम भट्टारक—परमेश्वर' अशा तऱ्हेचा उल्लेख आहे, त्यावरून असें दिसतें कीं, महेंद्रपाल चक्रवर्ती बादशहा असून (गुजराथेंतील) चालुक्यवंशाचा हा राजा त्याचा सामंत होता. तसेंच खुद्द कनोजदरबारांतून देऊं केलेल्या वालकीय प्रांतांतील एक खेड्याच्या इनाम लेखावरून (दिघ्वा—डुबौलि) औधप्रांत कनोजच्या साम्राज्यांतच मोडत असे हें उघड दिसतें. ललतपुराजवळ उपलब्ध झालेल्या 'सियाडोनीं' लेखावरून (लेखाचा काळ इ. स ९०३) साम्राज्यान्तर्गत सामन्तांच्या राज्यव्यवस्थेविषयीं व खुद्द कनोज येथील राजकीय परिस्थितीविषयीं बरीच माहिती सांपडते. अर्थात त्याचा विचार एका स्वतंत्र प्रकरणांत करणें जास्त सोईचें होईल. महेंद्रपालाच्या कारकीर्दींत हे लेख लिहिले असल्यामुळें त्यांचा फक्त निर्देश येथें केला आहे

महेंद्रपालानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र गादीवर बसला; त्याचें नांव (दुसरा) भोज होय. त्याची कारकीर्द फारच लहान म्हणजे अवघी २ च वर्षांची झाली. (९०८ ते ९१० इ. स.). भोजानंतर त्याचा धाकटा भाऊ महीपाल गादीवर आला; त्याचीं इतर नांवें क्षितिपाल, हेरंबपाल व विनायकपाल हीं होत. निरनिराळ्या लेखांवरून त्याची कारकीर्द इ. स. ९१० ते ९४० (स्मिथ—रा.

ए. सो. ज. १९०९ पान २६९ पहा.) पर्यंत असावी असें दिसतें. ह्या राजाच्या कारकीर्दींतच कनोजला उतरती कळा लागली असें म्हणावें लागतें. राष्ट्रकूटलेखांत तर असें म्हटलें आहे कीं, तिसऱ्या इंद्रराजानें ९१५ ते ९१७ चे सुमारास कनोजवर स्वारी केली व कनोजचा पाडाव केला. पंप नामक कानडी कवीच्या कवितेवरून असें दिसतें कीं, त्याचा आश्रयदाता जो अरिकेसरी कर्नाट त्याच्या पित्यानें म्हणजे नरसिंह चालुक्यानें कनोजवर स्वारी केली व आपले घोडे गंगा–यमुनेच्या संगमावर नेले. ह्यावरून असें दिसतें कीं, नरसिंह चालुक्य हा इंद्रराजाचा मांडलीक असून त्यानें त्यास कनोजच्या स्वारींत सहाय्य केलें असावें.—असो, अशा तऱ्हेनें कनोजचा पराभव झाला, तरी कनोजचें वैभव महीपालाच्या कारकीर्दींत पूर्ववतच होतें; ह्या राजाच्या दरबारांतच राजशेखरानें लिहिलेल्या बालभारत उर्फ प्रचंडपांडव ह्या नाटकाचा प्रयोग केला गेला.

हद्दल लेख ९१४ डिसेंबर (२२) मध्यें लिहिले गेले, त्यांत सामंताधिपति धरणीवर्ष नांवाच्या चापराजानें देऊं केलेल्या सनदांचा उल्लेख आहे. (इंडि. ॲंटि. १९० पहा.) त्यांत महीपाल सार्वभौम राजा असून काठेवाड त्याच्या साम्राज्यांत मोडत असे, असें लिहिलें आहे. (राजाधिराज परमेश्वर महीपाल देवपादप्रसादतः समनुशासता). यावरून असें ठरतें कीं, ९१४ पर्यंत तरी काठेवाड कनोजच्या साम्राज्यांत मोडत होतें. दुसरें असें कीं, ९६१ मध्यें चापघराणें लयास गेलें व अनाहिलवाड येथें मूलराज चालुक्यानें नवे स्वतंत्र राज्य स्थापिलें; म्हणजे कनोजच्या ताब्यांतून काठेवाड गेल्याची अलीकडील जास्तींत जास्त मर्यादा म्हणजे ९६१ ही होय. स्मिथ म्हणतो, " तिसऱ्या गोविंदराजानें महीपाला-

च्या कारकीर्दींतच सुमारें ९१६ चे सुमारास गुर्जरांवर स्वारी केली त्यावेळींच त्यानें काठेवाड जिंकिलें असावें. म्हणजे इंद्रराजानें कनोजवर स्वारी केल्यानंतर थोड्याच वर्षांनीं काठेवाड प्रांत कनोजच्या ताब्यांतून सुटला. व कनोजला उतरती कळा लागली. तरी पण इ. स. ९३१ मध्यें कनोजच्या साम्राजाची पूर्वेकडील हद्द बनारसपर्यंत होती, हें असत व बनारस लेखांनीं ( अनुक्रमें इ. स. ९१७ व ९३१ ) वरून उघड दिसतें. या लेखांतून महीपाल हें नांव न येतां महीशपाल व विनायकपाल हीं नांवें येतात. खजुराहो येथील एका मोडक्या लेखांत असें वर्णन आहे कीं, क्षितिपालानें एका चन्देल्ल ( बहुधा हर्ष असावा ) राजाच्या सहाय्यानें आपलें गत वैभव व सम्राटपद पुन: मिळविलें ९१६ त इंद्र ( तिसरा ) राजानें कनोजचा पाडाव केल्यानंतरचा हा इतिहास व लेख आहे हें उघडच आहे.

महीपाला नंतर त्याचा मुलगा देवपाल राज्यारूढ झाला. त्याचा कारकीर्द इ. स. ९४० ते ९५५ पर्यंत असावी ९४८ च्या ‘ खजुराहो ’ लेखांत त्यास “ राजाधिराज ” असेंच म्हटलें आहे, व त्यानें यशोवर्मा चंदेल्लास दिलेल्या वैकुंठ उर्फ विष्णूच्या मूर्तिचा उल्लेख केला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, देवपाल हा अधिराज असला तरी त्याची सत्ता उतरत चालली होती. त्यास इतरांचें सहाय्य घ्यावें लागे व त्याबद्दल मोबदलाही देणें भाग पडे. ह्या वैकुंठमूर्तीची हकीगत खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.—भोट उर्फ तिबेटच्या राजानें हीं मूर्ती मूळ कैलासाहून आणिली ( एपि. इ.I. १३४) ती त्यानें कीर देशाच्या ‘ साही ’ राजास दिली; साहीराजास देवपालानें गजदळ साह्यार्थ दिलें व साहीनेंही उपकर्तीची आठवण म्हणून ही मूर्ती देवपालास नजर केली; देवपालानें ती यशोवर्म्यास दिली.

देवपालानंतर त्याचा सावत्र भाऊ विजयपाल हा राज्य करूं लागला. त्यानें इ. स. ९५५ ते ९९० पर्यंत राज्य चालविलें. मथनदेव नामक एका सरदाराच्या राजौर लेखांत (पहा एपि.इं.III. २६६ ) त्यास अधिराज असें म्हटलें आहे........

त्यावरून कनोजची सत्ता अद्याप थोडीफार मानली जात असावी असें दिसतें. वास्तविक पहातां कनौजचा ऱ्हास एकसारखा होत होता; विजयपालाच्या कारकीर्दींत गुजराथ प्रांत तर मूलराज सोलंखी यानें कनोजपासून हिसकाऊन घेतला होता. माळवा प्रांतही स्वतंत्र झाला असून तेथें विख्यात मुंजराज राज्य करीत होता. जज्होटी-चें राज्य चन्देल्लाच्या हातांत असून तेही अतिशय प्रबल होत होते; व जवळ जवळ ह्या राज्यानें ग्वालेर प्रांत आपला-सा केला असून कनोजची सत्ता झुगारून दिली होती. एतावता वज्रदामन खेरीजकरून इतर मांडलिक राजे व सरदार कनोजला मानीतनासे झाले होते. ह्या राजाच्या कारकीर्दीविषयीं इतर माहिती उपलब्ध नाहीं. पंजाबचा जयपाळ व सबक्तगीन ह्यां-मध्यें इ. स. ९९० मध्यें जो घोर संग्राम झाला त्यावेळीं विजयपा-ळानें जयपाळास सहाय्य केलें असावें; विजयपाळानंतर राजपाळ गादीवर बसला व त्यानें इ. स. ९९० ते १०२० पावेतों राज्य केलें असावें असें स्मिथ म्हणतो. ह्या राजाच्या अमदानींतच कनो-जचें राज्य विलयास गेलें; गिजनीच्या महमदाच्या हिंदुस्थानावरील स्वारीचा विचार या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत आम्ही करणार असल्यामुळें कनोजचा ऱ्हासाचाही विचार तेथेंच करणें इष्ट होईलः-

प्रतीहार घराण्याचा वर दिलेला इतिहास थोडक्यांत येणें प्रमाणें आहे. पहिल्या नागभटानें गुजरत्रा उर्फ मारवाड येथें आरबांचा पाडाव केल्यानंतर राज्यस्थापना इ. स. ७२५ मध्यें केली; त्याचा

नातू म्हणजे दुसरा नागभट यानें ८१९ चे सुमारास कनोजचा पाडाव करून कनोज ही आपली मुख्य राजधानी केली. ८०० ते १००० या दरम्यानच्या इतिहासांत ह्या घराण्यांत भोज व महेंद्र-पाल यांसारखे अत्यंत पराक्रमी व वैभवयुक्त असे राजपुरुष होऊन गेले. त्यांचे कारकीर्दींत कनोजच्या साम्राज्याचा पूर्ण विस्तार झाला. बहुतेक संपूर्ण आर्यावर्त त्यांचे ताब्यांत होतें; त्यांचे वेळी प्रजाहि अत्यंत सुखी असे. कारण त्यांची शासनपद्धति न्यायपूर्ण व शांतता जनक अशी होती. या घराण्याची दफ्तराची व दानपत्रांची पद्धत सहाजिकपणेंच हर्षाच्या पद्धतीप्रमाणें होती. प्रत्येक राजाच्या आज्ञापत्रांत पूर्वी होऊन गेलेल्या राजांची माहिती विस्ताराशिवाय दिलेली असते. अशा तऱ्हेचा प्रघात हर्षाच्या तशाच मोंगल बादशहांच्या दानपत्रांत व आज्ञापत्रांत दिसतो. तसेंच प्रत्येक राजाच्या पट्टराणीच्या नांवाचा उल्लेख पत्रांत सांपडतो; व कित्येक ठिकाणीं उपास्य देवताहि दिलेल्या असतात. आमच्या म्हणण्याच्या स्पष्टीकरणार्थ भोजराजाच्या दौलतपुरा दानपत्रांतील व महेंद्रपालाच्या दिघ्वा डुबौली लेखांतील उतारे खालीं देतों.

| | | |
|---|---|---|
| परमवैष्णव — | देवराज | भूमिकादेवी |
| " माहेश्वर — | वत्सराज | सुंदरीदेवी |
| " भगवतीभक्तो — | नागभट | |
| " आदित्य भक्त— | रामभद्र | अप्पादेवी |
| " भगवतीभक्तो — | भौज | चंद्रभट्टारिका |

महेंद्रपाल

| | | |
|---|---|---|
| " परम वैष्णव — | भोज ——— | देहनागा |
| " आदित्यभक्त — | महीपाल......, | महादेवी |

वरील शिक्याच्या मायन्यावरून साहजिकपणेंच हर्षाच्या शिक्याच्या

मायन्याची आठवण होते. हर्षाच्या मायन्यांतही प्रत्येक राजाच्या आईचें नांव दिलेलें आहे व उपास्यदेवतेचा उल्लेख आहे. हर्षाच्या व प्रतीहाराच्या उपास्यांत बराच फरक आहे. हर्ष हा कट्टा बौद्ध मतानुयायि असल्यामुळें त्याच्या लेखांतून सौगताचा ऊर्फ बुद्धाचा उल्लेख मिळतो ( जसाः— परम सौगत राज्यवर्धन ). ८०० ते १००० या दरम्यान आर्यावर्तांत बुद्धमत जवळ जवळ लुप्तच झालें असून पंचायतनापैकीं कोणत्यातरी देवतेची उपासना सुरू होती. शैव व वैष्णव मतांतील तीव्र विरोध थंडावला असून किंवा उत्पन्न झाला नसून हिंदुधर्मांत सहिष्णुतेचा पूर्ण फैलाव त्यावेळीं झाला होता. अशा तऱ्हेचा फरक कां व कसा उत्पन्न झाला याची मीमांसा एका प्रकरणांत आम्ही करणार आहोंत; तुर्त इतकेंच सांगणें पुरे आहे कीं ज्याप्रमाणें बुद्धधर्मकाळीं पितापुत्रांचा धर्म भिन्न असला तरी पितापुत्रांत वैमनस्य उत्पन्न होत नसे त्याप्रमाणेंच ह्याकाळीं पितापुत्रांची उपास्य–दैवतें भिन्न असलीं तरी राजकारणाच्या घडींत बिघाड होत नसे; एवढेंच काय पण राज-कुटुंबांत देखील एकाच वेळीं भिन्न देवतांची पूजा अर्चा निर्वेधपणें होत असे. परमत व परदैवत सहिष्णुता हा हिंदुधर्माचा मुख्य विशेष आहे व हा गुण ह्या कालीं पूर्णपणें दिसून येत असे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बुद्धाची उपासना मागें पडून शिव, विष्णु, सूर्य, देवी किंवा गणेश यांपैकीं कोणत्या तरी देवतेची प्राधान्यें-करून उपासना अविरोधानें सुरू असे. असो, एका लेखकानें सुचविल्याप्रमाणें त्या कालांतील राजे शाक्त होते कीं काय ह्याचा विचार पुढें करूं–सध्यां इतकेंच सुचविणें इष्ट आहे कीं, ‘ अन्तः शाक्ताः ’ हें प्रसिद्ध वाक्य दांभिकांना उद्देशून आहे, त्याचा सद्भाविकांशीं संबंध नाहीं.

हर्षाचा दस्तऐवज व दानपत्रें यांजप्रमाणें प्रतीहार राजाचे लेख अत्यंत संक्षिप्त असतात, व त्यांत स्तुतिपर वर्णन अगदीं कमी असतें. प्रतीहार राजाच्या लेखांत एक विशेष गोष्ट दिसते ती अशी कीं, प्रतीहार घराण्यांतील राजांचें कांहींतरी एक सांकेतिक अन्यनांव असतें त्यास विरुद असा शब्द लावला आहे, हें सांकेतिक नांव लेखाच्या शेवटच्या श्लोकांत आढळतें; उदाहरणार्थ, वरील महेंद्रपाळाच्या लेखाचे शेवटीं 'श्रीमद्भाकप्रयुक्तस्य शासनस्य स्थिरायतेः' असे शब्द आहेत, त्यावरून असें दिसतें कीं, 'भाक' हे महेंद्रपालाचे सांकेतिक नांव होय, भोजाचें बिरुद नांव प्रभास व महीपालाचें श्रीहर्ष असें होतें, (पहा इंडि. ऍंटि १५० ते १४१) भोज उर्फ मिहिर याचें आणखी एक नांव सांपडतें तें 'आदिवराह' हें होय; भोजराजानें आदिवराह ह्या शिक्क्याचीं बरींच नाणीं पाडलीं असावीं, कारण १०२० च्या "सियाडोनी" येथें सांपडलेल्या लेखांतून आदिवराह द्रम्मांचा (रुपयांचा) उल्लेख आहे.—असो; ज्याप्रमाणें लेखाचे शेवटच्या ओळींत राजांचीं बिरुद नांवें दिलेलीं असतात, त्याचप्रमाणें दानपत्रांतून—जे दूत दानपत्र लिहिल्यावर ठिकाणी जाऊन प्रसिद्ध करीत अशा राजदूताचेंहि नांव दिलेलें असतें हा एक प्रतीहार राजांच्या दानपत्रांचा विशेष आहे.

---

## टिप्पणी १

## ' घटिआला ' लेखांत दिलेली प्रतीहार घराण्याची वंशावळ.

मि० भांडारकर यांनीं एपि. इंडि. व्हा. ९ पा. २९९ मध्यें घटिआला येथें उपलब्ध झालेली प्रतीहार घराण्याची वंशावळ दिली आहे. ह्या वंशावळीचा व कनोजच्या सम्राट घराण्याच्या वंशावळीचा मेळ बसविला असतां दोघांचा मूळ पुरुष एकच असून नागभटापासून या घराण्याच्या दोन निरनिराळया शाखा झाल्या असाव्या असें दिसतें. प्रस्तुत वंशावळी वरून नागभटाचा काळ इ. स. ७०१ ( वि. सं. ९१८–१६० ) असावा असें ठरतें व कनोजच्या वंशावळीप्रमाणें तो काळ ७२५ ठरतो. ह्या दोन्ही काळांत विशेष तफावत नसल्यामुळें नागभटापासूनच पुढें वंश विभक्त झाले. कदाचित् नागभट हा जो एकदां कनोजेस गेला तो परत मांडोरला आलाच नाहीं; व मांडोरला पूर्वापार रीतीप्रमाणें प्रतीहार घराणें चालत असावें. दोन्ही घराणीं एकच असल्यामुळें मांडोरचें घराणें कनोजचें मांडलिक होऊं शकत नाहीं.— असो, वरील लेख जोधपुरापासून १८ मैलांवर घाटिआलास सांपडला, कदाचित् तेथेंच मांडोर असेल. कक्कुक राजानें वि. सं. ९१८ मध्यें एक विजयस्तंस बांधिला असें त्या लेखांत म्हटलें आहे. लेखांत दिलेला वंशक्रम खालीं लिहील्याप्रमाणें आहे:— एका हरिश्चंद्र नांवाच्या ब्राह्मणानें भद्रानामक क्षत्रियकन्येशीं विवाह केला, व या विवाहापासून त्यास नांवाचा मुलगा झाला. नरभट ह्याचाच मुलगा व या नरभटाचा मुलगा नागभट. नागभटानंतरची वंशावळ अशी आहे १ तत, २ यशोवर्मा, ३ चंदक, ४ शिलुक, ५ भोट, ६ भिल्लादित्य, ७ कक्क; ८ कक्कुक. कक्कुकाच्या आईचें नांव दुर्लभादेवी होय. ( कक्कुक हें नांव कनोज घराण्यांत देखील आढळतें; ). कक्कुक राजा पराक्रमी तसाच विद्वान्‌हि होता. त्यानें जिंकिलेले देश येणेप्रमाणें:——त्रावणी, वल्ल, माड ( जेसलमीरचें नांव अद्यापपावेतों माडच आहे–भांडारकर ), आर्य, गुर्जरत्रा, लाट व पर्वत. आर्य व पर्वत हें नांव कोणत्या प्रांतांचें असेल हें समजत नाहीं. गुर्जरत्रा म्हणजे मारवाड होय व ' लाट ' म्हणजे अलीकडील गुजराथप्रांत होय. एकं

दर्शीनें प्रतीहार घराण्याची मूळची शाखा मांडोर येथें चालूं असावी. मांडोर येथील शाखा कनोजसारखीच प्रतापी होती.

आतां एकच शंका रहाते ती अशीः---सामन्त या नात्यानें या वंशावळींत सम्राट घराण्याचा कोठेंच उल्लेख सांपडत नाहीं; वर सांगितल्याप्रमाणें कक्कुक हा कनोज येथील घराण्याचा समवंशीय असल्यामुळें त्यानें कनोजचा उल्लेख केला नसावा.

दुसरें असें कीं मांडोरचें घराणें आपणांस कनोजच्या सम्राट घराण्याच्या तोडीचें समजत असावें व त्यामुळें कनोजच्या घराण्याचा उल्लेख करण्याचें कारणच नाहीं.

कक्कुक हा प्रतापी तसाच विद्वान्ही होता. त्यानें कांहीं सुभाषितें रचिलीं आहेत, त्यांतील २-३ सुभाषितें लेखांत दिलीं आहेत ती येथें दिलीं असतां वाचकांचें थोडें फार मनोरंजन होईल.

वल्लकी काकलीगीतं शरच्चंद्रश्च मालती ।
विनीता स्त्री सतां गोष्ठी कक्कुकस्य प्रियाणि षट् ॥
न्यायमार्गो गुरोर्भक्तिः पुत्रे स्नेहः कृतज्ञता ।
प्रिया वाग् नागरो वेषः कक्कुकस्य प्रियाणि षट् ॥

## २—दौलतपुरा व इतर लेखांचा काळ.

या दौलतपुरालेखांत भोजदेवानें दिलेल्या गुर्जरत्रांतील डेडानक ( डीडवाना ) विषयांतील एका खेड्याच्या दानाचा उल्लेख आहे; या लेखावर १०० संवत असा आंकडा दिला आहे. १०० हा आंकडा हर्षसंवताचा असावा असें पूर्वीं मानण्यांत येई, परंतु मि. भांडारकरांनीं हा आंकडा १०० नसून ९०० असा वाचावा असा शोध लावला व त्यामुळें प्रतीहार राजांच्या काळाचा मेळ बरोबर बसतो. भाण्डारकर यांनीं केलेली प्रतीहारी घराण्यांतील पुरुषांच्या कारकीर्दीची कालगणना प्रशंसनीय आहे. परंतु १०० या आंकड्यांचा ९०० शीं मेळ कसा बसवतां येईल येवढा प्रश्न येईल; तथापि भाण्डारकरांनीं सुचवलेला काळ बरोबर आहे.

पेहवा लेखः—हा लेख भोजकालीनच होय व त्यावर हर्षसंवत्सर दिला असावा. लेखावर हर्ष असा शब्द नाहीं. तथापि यावरून हर्ष-संवत्सर इ. स. ९५० नंतरही चालू असावा असें दिसतें. साधारण मानानें उत्तर हिंदुस्थानांत सामान्यतः विक्रम संवत् प्रचलित असे व दाक्षिणेंत शालिवाहन शक चालू असे; या काळाच्या नवीन घराण्यांतील कोणा हि राजाला आपला शक सुरू करावा असें वाटलें नाहीं. सर्व जण उत्तरेंत विक्रमसंवत् मानीत व दाक्षिणेंत शालिवाहन शक मानीत. असें कां ? याचा सविस्तर विचार पुढें एका प्रसंगाला करावयास पाहिजे.

---

## ३—भंडीकुल

भोजराजाच्या सागरताल लेखांत असें सांगितलें आहे कीं, वत्सराजानें भंडीकुलापासून साम्राज्यपद हिसकावून घेतलें. बाणाच्या हर्षचरितांत भंडी-नामक हर्षाचा एक मामा होता असा उल्लेख आला आहे, तेव्हां त्या भंडीचा व कनोजच्या घराण्याचा कांहीं संबंध आहे काय ? असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. वत्सराजानें जेव्हां कनोजा जिंकलें तेव्हां इंद्रायुध नांवाचा राजा कनोजच्या गादीवर अधिष्ठित होता; तेव्हां अशी कल्पना बसविणें शक्य आहे कीं, इंद्रायुध भंडीकुलांतील पुरुष होता व हर्षचरितांत उल्लेखिलेला भंडी हा त्याच कुलांतला असावा. – आमच्या पुस्तकाच्या पहिल्या भागांत आम्हीं असा तर्क बसविला आहे कीं, हर्षाची आई यशोमती व तिचा भाऊ भंडी हे मौखरी घराण्याच्या एका उपशाखेंतील एका कुलांतले असावे. मुख्य मौखरी घराणें कनोजमध्यें राज्य करीत होतें. हर्षाच्या निधनानतर या उपशाखेंतील कोणीतरी पुरुष कनोजच्या गादीवर बसला असून त्याच्यापासून वर्म घराणें सुरू झालें असावें. त्या वर्मांचा पूर्वज भंडी असावा व अलीकडील वंशजांचें नांवही भंडी असावें; त्यामुळें ह्या अलीकडील इंद्रायुधास भंडीकुलोत्पन्न असें म्हणणें इतिहासास अनुसरून होईल.

---

## ४— तुरुष्क

सुमारें ८५० सालीं लिहिलेल्या सागरताल लेखांत "तुरुष्क" असें एका प्रदेशाचें नांव सांगितलें आहे. तुरुष्क हें कोणत्या प्रांताचें नांव असावें हें समजत नाहीं. तुरुष्क हा शब्द "तुर्क" या शब्दापासून निघाल्याचा बराच संभव आहे. पण तुर्कांनीं इ. स. १० वे शतकाचे उत्तरार्धांत म्हणजे सबक्तगीनाचे वेळीं हिंदुस्थानांत प्रवेश केला. त्याच्या आधीं तुर्कांचा उल्लेख हिंदुस्थानांत आल्याचा सांपडत नाहीं. महाभारतांत तुरुष्क हा शब्द कोठेंहि उपलब्ध नाहीं. भागवतांत तुरुष्क हा शब्द सांपडतो; पण भागवत हा ग्रंथ ८ वे शतकानंतर लिहिला गेला तेव्हां त्याचाहि फारसा उपयोग नाहीं.— स्मिथनें असा तर्क बसविला आहे कीं, तुरुष्क—तुर्क— हें आरबांचें नांव असावें; पण आम्हांस असें वाटत नाहीं. अरबांना "ताजिक" अशी संज्ञा आहे व प्रसंगीं त्यांना बर्बर असेंहि म्हणत. पण ८५० चे पूर्वी त्यांना तुरुष्क असें कोठेंच म्हटलेलें आढळत नाहीं. पण आम्हांस जो तर्क पसंत वाटतो तो असाः—इ. स. ६०० ते ८०० पर्यंत हिंदुस्थानांत एकावर एक सारख्या स्वाऱ्या करण्यांत अरबांचें सैन्य संपत आलें असून त्यांना नवीन स्वारीकरितां तयार होणाऱ्या सैन्याचा तुटवडा पडूं लागला असावा, व हिंदुस्थानांत अगणित संपत्ति मिळाल्यामुळें बगदादचे खलीफही आपला काल ऐषआरामांत घालवूं लागले होते. अशा वेळीं हिंदुस्थानांत म्हणजे सिंधमध्यें जें सैन्य अरबांतर्फे पाठवलें जात असावें त्यांत तुर्क लोकांचा भरणा विशेष होत असावा; आज ज्याप्रमाणें हिंदी सैन्य इंग्रजांच्या वतीनें जर्मनांशीं लढलें त्याप्रमाणें पगारी तुर्कांचा आरबांच्या सैन्यांत झपाट्यानें प्रवेश होत असावा; त्यामुळें ९ व्या शतकानंतर सर्वच परकीयांना तुर्क असें नांव एतद्देशीय लोक देत असावे.

---

## ५ कनोजच्या सम्राट प्रतिहारी राजांची वंशावळ.

१ मांडोरचा नागभट—नागभटाचा एक भाऊ
इ. स. ७२५ ते ७४०.

- २ कक्कुक ( नागभटाचा ) पुतण्या
  इ. स. ७४० ते ७५५
- ३ देवशक्ति
  इ. स. ७५५ ते ७७०
  - ४ वत्सराज ( इ. स. ७७० ते ८०० ) त्यानेंच कनोज काबीज केलें.
    - ५ नागभट ( दुसरा ) कनोजचा सम्राट
      ( इ. स. ८००—ते ८२५ )
      - ६ रामचंद्र ( इ. स. ८२५ ते ८४० )
        - ७ मिहिर ऊर्फ भोज ( सर्वांत प्रतापी )
          इ. स. ८४० ते ८९०
          - ८ महेंद्रपाल ( इ. स. ८९० ते ९०८ )
            - ९ भोज ( दुसरा )
              इ. स. ९०८ ते ९१०
            - १० महीपाल ( त्यास क्षितिपाल अगर विनयपाल असें म्हणतात )
              इ. स. ९१० ते ९४०

११ देवपाल
इ. स. ९४० ते ९५३

१२ विजयपाल
इ. स. ९५३ ते ९९०

१३ राज्यपाल
इ. स. ९९० ते १०१८

राज्यपालाच्या कारकीर्दीत गिझनीच्या महंमदानें कनोजवर स्वारी केली व कनोजशहर लुटलें. तेव्हांपासून कनोजचा व प्रतीहारी घराण्याचा ऱ्हास झाला.

---

६ अॅर्किआलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिआ १९०३–४ पा. २८०

ग्वालेर येथील भोजाची प्रशस्ति.

ओम् नमो विष्णवे ।
शेषादितलरधवलाधरभागभासि—
वक्षःस्थलोल्लसितकौस्तुभकान्तिशोणं ।
श्यामं वपुःशशिविरोचनबिम्बचुम्बि—
व्योमप्रकाशमवतान्नरकाद्विषो वः ॥१॥
ज्योतिर्बीजमकृत्रिमे

गुणवति क्षेत्रे यदुप्तं पुरा श्रेयः कन्दवपुस्ततस्समभवद्भास्वानतश्चापरे मन्विक्ष्वाकुककुस्थमूलपृथवः क्ष्मापालकल्पद्रुमाः ॥२॥

तेषां वंशे सुजन्मा क्रमनिहितपदे धाम्नि वज्रेषु घोरं रामः पौलस्त्यहिंस्रं क्षत-विहितसमित्कर्म चक्रे पलाशैः श्लाघ्य—

स्तस्यानुजोसौ मघवमदमुषो मेघनादस्य संख्ये सौमित्रिस्तीव्रदण्डः प्रतिहरणविधेर्यः प्रतीहार आसीत् ॥३॥ तद्वंशे प्रतिहारकेतनभृति त्रैलोक्यरक्षा-स्पदे देवो नागभटः पुरातनमुनेर्मूर्तिर्बभूवाद्भुतं । येनासौ सुकृतप्रमाथि बलनम्लेच्छाधिपाक्षौहिणीः

क्षुन्दानस्फुरदुग्रहेतिरुचिरैर्दोर्भिश्चतुर्भिर्व्वभौ ॥ ४ ॥ भ्रातुस्तस्यात्मजो भूत्कलितकुलयशाः ख्यातक कुस्थनामा लोके गीतः प्रतीक पृथुवचनतया कक्कुकः क्ष्माभृदीशः । श्रीमानस्यानुजन्मा कुलिशधरघरामुद्वहन्देवराजो यश्शे च्छिनोरुपक्षक्षापितग--

........तिकुलं भूभृतां सन्नियन्ता ॥ ५ ॥

तत्सूनुः प्राप्य राज्यं निजमुदयगिरिस्पर्शि भास्वत्प्रतापः । क्ष्मापालः प्रादुरासीन्नतसकलजगद्वत्सलो वत्सराजः । यस्यैतास्संपदश्च द्विरदमदसुरास्वादसान्द्रप्रमोदाः पद्माक्षीराक्षिपन्त्यः प्रणयिजनपरिष्वंगकान्ताविरेजुः ॥६॥

ख्या ( ताद् ) भण्डि.

........कुलान्मदोत्कटकरिप्राकारदुर्लङ्घतो

यःसाम्राज्यमधिज्यकार्मुकसखा संख्ये हटादग्रहीत् । एकः क्षत्रियपुङ्गवेषु च यशो गुर्वीन्धुरं प्रोद्वह--न्निक्ष्वाकोः कुलमुन्नतं सुचरितैश्चक्रे स्वनामाङ्कितं ॥७॥

आद्यः पुमान्पुनरपि स्फुटकीर्तिरस्मा--

ज्जातस्स एव किल नागभटस्तदाख्यः ।

यत्रान्ध्र सैन्धव विदर्भ कालिंग भूपैः

कौमारधामनि पतङ्गसमैरपाति ॥ ८ ॥

त्रय्यास्पदस्य सुकृतस्य समृद्धिमिच्छु--

र्यः क्षत्रधामविधिबद्धबलिप्रबन्धः ।

जित्वा पराश्रयकृतस्फुटनीचभावं

चक्रायुधं विनयनम्रवपुर्व्यराजत् ॥ ९ ॥

दुर्वारवैरिवरवारणवाजिवारयाणौघसंघट

.........नघोरघनान्धकारं ।

निर्जित्य वङ्गपतिमाविरभूद्विवस्वा--

नुद्यन्निव त्रिजगदेकविकास कोषः ॥ १० ॥

आनर्त मालव किरात तुरुष्कवत्स--

मत्स्यादि राजगिरि दुर्ग हटापदारैः ।

यस्यात्मवैभवमतीन्द्रियमाकुमार--

माविर्वभूव भुवि विश्वजनीन वृत्तेः ॥ ११ ॥

तज्जन्मा राम—

नामा प्रवरदारिबलन्यस्तभूभृत्प्रबन्धैराबध्नन्वाहिनीनां प्रसभमधिपती-नुद्धत क्रूरसत्वान् । पापाचारान्तरायप्रमथनरुचिरः सङ्गतः कीर्तिदारै-स्त्राता धर्मस्य तैस्तैस्समुचितचरितैः पूर्ववन्निर्वभासे ॥ १२ ॥

अनन्यसाधनाधीन प्रतापाक्रान्तदि—

..................ङ्मुखः ।

उपायैस्सम्पदां स्वामी यः सव्रीडमुपास्यत ॥ १३ ॥

अर्थिभिर्व्विनियुक्तानां सम्पदां जन्म केवलं ।

यस्याभूत्कृतिनः प्रीत्यै नात्मेच्छाविनियोगतः ॥ १४ ॥

जगद्वितृष्णुः स विशुद्धसत्वः
प्रजापतित्वं विनियोक्तुकामः ।
सुतं रहस्यव्रतसुप्रसन्नात्सूर्यादवा—

......पन्मिहिराभिधानं ॥ १५ ॥

उपरोधैकसंरुद्ध विन्ध्यवृद्धेरगस्त्यतः
आक्रम्य भूभृतां भोक्ता यः प्रभुर्भोज इत्यभात् ॥ १६ ॥

यशस्वी शान्तात्मा जगदहितविच्छेद निपुणः
परिष्वक्तो लक्ष्म्या न च मदकलङ्केन कलितः
बभूव प्रेमार्द्रो गुणिषु विषयः सूनृत—

.......................गिरा—

मसौ रामो वाग्रे स्वकृतिगणनायामिह विधेः ॥ १७ ॥

यस्याभूत्कुलभूमिभृत्प्रमथनव्यस्तान्यसैन्याम्बुधेर्व्यूढावस्फुटितारिलाजनिवहान्हु-त्वा प्रतापानले गुप्ता वृद्धगुणैरनन्यगतिभिः शान्तैस्सुधोद्भासिभिर्धर्म्मापत्य यशः प्रभूतिरपरा लक्ष्मी पुनर्भू—

.................र्भया ॥ १८ ॥

प्रीतैः पालनया तपोधनकुलैः स्नेहाद्गुरूणांगणै र्भक्त्या भृत्यजनेन नीतिनिपुणै र्वृन्दैररीणां पुनः । विश्वेनापि यदीयमायुरमितं कर्तुं स्वजीवैषिणा तन्निम्ना विदधे विधातरि यथा सम्पत्पराधाश्रये ॥ १९ ॥

अवितथमिदं यावद्विश्वं श्रुते—
............रनुशासना—
भवति फलभाक्कर्ता नेशः क्षितीन्द्रशतेष्वपि ।
अधरितकलेः कीर्त्तेर्भर्त्तुस्मतां सूक्तैरमू—
द्विधुरितधियां सम्पद्वृद्धिर्यदस्य तदद्भुतं ॥ २० ॥
यस्य वैरिवृहे द्रङ्गान्दहतः कोपवन्हिना
प्रतापादर्णसां राशीन्पातुर्नैव तृष्णमावभौ ॥ २१ ॥
कुमार इव विद्यानां
.........वृन्देनाद्भुतकर्मणा ।
यः शशासासुरान्घोरान्स्त्रैणेनास्त्रैकवृत्तिना ॥ २२ ॥
यस्याक्षपटले राज्ञः प्रभुत्वाद्विश्वसम्पदः ।
लिलेख मुखमालोक्य प्रातिलेख्यकरो विधिः ॥ २३ ॥
उद्दामतेजःप्रसरप्रसूता
शिखेव कीर्त्तिर्द्युमणिं विजित्य ।
जाया जगद्भर्तु—
ओ. १६...—रियाय यस्य
चित्रं त्विदं यज्जलधीन्स्ततार ॥ २४ ॥
राज्ञा तेन स्वदेवीनां यशःपुण्याभिवृद्धये ।
अन्तःपुरपुरं नाम्ना व्यधायि नरकद्विषः ॥ २५ ॥
यावन्नभः सुरसरित्पसरोत्तरीयं
यावत्सुश्वरतपः प्रभवः प्रभावः ।
सत्यञ्च यावदुपरिस्थमवस्यशेषं
तावत्पु——
ओ. १७ नातु जगतीमियमस्य कीर्तिः ॥ २६ ॥

पातुर्विश्वस्य सम्यक्करममुनिमतश्रेयसस्सम्विधानादन्तर्वृत्ति र्विवेकः स्थित इव पुरतो भोजदेवस्य राज्ञः । विद्वद्वृन्दार्जितानां फलमिव तपसां भट्ट धन्नेक सूनुर्बालादित्यः प्रशस्तेः कविरिह जगता साक (?) मा कल्पवृत्तेः ॥२७॥

× × × ×

# प्रकरण ५ वें

## अनहिलवाड पाटणचे चावडा.

चावडा घराण्याचा मध्ययुगीन कालांतील संगतवार इतिहास देणें जरासें कठीणच आहे; एकतर प्राचीन इतिहासाचीं मुख्य साधनें म्हणजे शिलालेख, दानपत्रें, व आज्ञापत्रें. परंतु त्या घराण्यासंबंधीं माहिती देणारे कोणतेच लेख उपलब्ध नाहींत. मुंबई-गॅझिटिअर ( व्हॉ १ ) मध्यें गुजराथची हकीकत देतांना ह्या घराण्याविषयीं थोडी फार माहिती दिली आहे. पण गॅझिटिअरची सर्व भिस्त प्रबंध व बखरी यांसारख्या आधारावर; शिवाय गॅझिटिअरच्या लेखकानें प्रमाणभूत मानलेले सर्वच प्रबंध व बखरी आमच्या अवलोकनांत आल्या नसल्यामुळें या प्रबंधांतून दिलेल्या वर्णनांत भाकडकथांचा कितपत भाग आहे हें ठरवण्यास मार्ग नाहीं. मूलभूत प्रमाण ग्रंथ प्रत्यक्षपणें पहाण्यांत न आल्यामुळें तर्कास व युक्तिवादास थोडाच अवसर मिळणार. साधारणपणें पहातां प्रबंधांतून वर्णिलेला इतिहास, बखरींतल्याप्रमाणें सर्वथैव विश्वसनीय नसतो; प्रबंधांतून वस्तुस्थितीचा विपर्यास, व अत्युक्तीचा प्रकार बराच असतो. प्रबंधांची वगैरे रचनाच अशी असते कीं त्यायोगें वाचकवर्ग थक्क व्हावा. त्यामुळें पुष्कळदां सत्याच्या थोड्याशा आधारावर कल्पनेचे मनोरे रचलेले असतात. असो. प्रस्तुत चावड्यांचा इतिहास आम्हीं मुख्यत्वें करून मुंबईच्या गॅझेटिअर ( व्हा. १ ) ला अनुसरून देणार आहोंत व त्याबरोबरच 'मुक्तसंकीर्तन' व 'प्रबंधचिंतामणि' या ग्रंथांत वर्णिलेल्या इतिहासाचा विचार करणार आहोंत.

एकंदरीनें विचार करतां चावड्यांचें घराणें आम्हीं ज्या कालाचा इतिहास लिहीत आहोंत त्या काळींच उदय पावलें असावें हें निर्विवाद आहे. उत्तर गुजराथेंतील सारस्वत मंडल हें त्याचें मुख्य ठिकाण असावें; चावड्यांचें घराणें अत्यंत प्रबल झालें व त्यांची स्वतंत्र राजघराण्यांत गणना होऊं लागली; परंतु ८०० ते १००० पर्यंत हें घराणें स्वतंत्र नव्हतें. सार्वभौम कनोजच्या राज्याच्या मांडलिकांत याची गणना होत असावी.

चावडा घराण्याची भिनमालच्या चापोत्कट अथवा चाप कुलांच्या उपशाखेंत गणना केली पाहिजे. चापकुलांतील एक लहानसें सरदार घराणें पंचसर येथें नांदत असे; या घराण्यांतील शेवटचा पुरुष एका 'भूयड' कडून मारला गेला. हा भूयड कोण कोठील वगैरे विषयीं कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. चापसरदाराची राणी गर्भवती होती; ती वनांतून जात असतां प्रसूत झाली. तिला जो मुलगा झाला तोच या कुलाचा संस्थापक वनराज होय. वरील हकीकतींत व बाप्पारावळ किंवा दक्षिण चालुक्य वंशाच्या संस्थापकाच्या जन्माच्या दन्तकथेंत अगर इतर कित्येक राजांच्या हकीकतींत बरेंच साम्य आहे. परंतु आमच्या मतें वनराजाच्या जन्माच्या हकीकतींत बरेंच तथ्य आहे; व वनराजाच्या कथेवरून इतर राजांच्या दन्तकथा रचण्यांत आल्या असाव्या. वनराजानें स्वतःच्या पराक्रमावर आपलें नशीब काढलें व राज्यसंस्थापना केली. प्रथम प्रथम त्यानें भिल्लादिलोकांच्या सहाय्यानें लूट वगैरे मिळवून द्रव्यसंचय करण्याचा उपक्रम सुरू केला. एकदां तर त्यानें शिवाजीप्रमाणें कान्यकुब्ज नगरास जात असलेल्या सरकारी मुख्य खजिन्यावर

छापा * घालून तो हस्तगत करून घेतला. ह्या प्रचंड लुटीच्या जोरावर त्याला सैन्य उभारितां आलें व या सैन्याच्या साहाय्यानें तो राज्य स्थापन करूं शकला. हल्लींच्या गुजराथ प्रांताच्या उत्तरेस त्यानें अनहिलपुर नांवाचें शहर इ. स.+ ७४६ च्या सुमारास वसविलें व हें शहरच त्याच्या राजधानीचें ठिकाण झालें. हा काळच असा होता कीं, त्यावेळीं कनोजच्या साम्राज्यास उतरती कळा लागली होती. त्यामुळें अंगांत थोडीशी धमक व कर्तबगारी असलेल्या वीर पुरुषास स्वतंत्र राज्य स्थापतां येई. बाप्पारावळ यास अशाच तऱ्हेनें चितोडचें राज्य स्थापन करतां आलें; मांबरच्या सामन्तदेवानें आपल्या पराक्रमाच्या जोरावर असाच कालाचा फायदा घेतला व राज्य स्थापिलें. मांडोरच्या नागभटाचें उदाहरण तर प्रसिद्धच आहे. पण बाप्पारावळ इत्यादिकांस आपल्या राज्य-स्थापनेकरतां आरबांविरुद्ध सतत झगडावें लागलें. नवसरी सनदेवरून असें दिसतें कीं, आरबांनीं कोणत्यातरी चापराजाचा पराभव केला; पण त्यावरून वनराजास आरबांशीं सामना करावा लागला

---

* वरील विधान प्रबंधचिंतामणीवरून केलें आहे:—प्रबंधचिंतामणींत असें सांगितलें आहे कीं कनोजचा एक धंचकुल नांवाचा सरदार गुजराथेंत आला होता व तो करभार वसूलाचें काम सहा महिने करीत होता. तो परत जात असतां वनराजानें त्याचेवर एका खिंडींत छापा घातला व त्यास ठार करून जामदारखाना लुटिला. त्याला २४ लाख रौप्य द्राम्म मिळाले.

\+ इंडियन ऍंटिक्विरी ( व्हा. ४ पा. १४७ ) मध्यें एका जुन्या पोवाड्याच्या आधारानें एक लेख लिहिला आहे त्यांत अनहिलवाड स्थापनेचा काल संवत् ८०२ असा दिला आहे. संवत् ८०२ चा व इ. स. ७४६ चा मेळ बसतो. हाच काळ मेरुतुंग यानें प्रबंधचिंतामणींत दिला आहे.

वगैरे कांहींच निश्चितपणें सांगतां येत नाहीं. एवढें मात्र खरें कीं, वनराजानेंच अनहिलवाड येथें एक प्रबळ राज्य स्थापिलें व त्या राज्याची दिवसेंदिवस भरभराट होत गेली.

बाप्पारावळप्रमाणेंच वनराज दीर्घायुषी असून त्याची कारकीर्दही बरीच मोठी होती. त्याची कारकीर्द इ. स. ७६९ ते ८०९ पर्यंत मानण्यांत येते; अनहिलवाडची स्थापना जर इ. स. ७४६ मध्यें झाली तर वनराजाच्या कारकीर्दीसही तेथूनच सुरवात झाली पाहिजे. मग वनराजाची कारकीर्द इ. स. ७६९ पासून कां मानण्यांत येते हें आज समजत नाहीं.—वनराजानंतर त्याचा मुलगा योगराज ( सुकृतसंकीर्तनांत त्याचें नांव जोगराज असें दिलें आहे ) राज्य करूं लागला. त्याची कारकीर्द इ. स. ८०६ ते ८४१ पर्यंत मानण्यांत येते. ह्यावेळीं कनोजच्या गादीवर भोज राज्य करीत असावा व जोगराज हा भोजाधिराजाचा मांडलिक झाला असावा. जोगराजानंतर रत्नादित्य गादीवर बसला व त्याच्या पश्चात् वैरिसिंहाकडे राज्यसत्ता आली. वैरिसिंहानंतर इ. स. ८९६ मध्यें खेमराज राजा झाला व त्यानंतर ८८१ मध्यें मुंडराज सिंहासनारूढ झाला. मुंडराजाचेंच भूयड असें नांव होतें. ( मुंडराजाऐवजीं कांहीं ठिकाणीं चामुण्ड असें नांव आढळतें पण तें बरोबर नाहीं. ) भूयडानंतर ९०८ मध्यें घाघड उर्फ राहप गादीवर आला व त्याच्या नंतर ९३७ पासून ९६१ पर्यंत ह्या कुलांतील शेवटच्या राजपुरुषानें राज्य केलें. ह्याचें नांव ज्ञात नाहीं, असें मुंबई गॅझीटिअर मध्यें म्हटलें आहे ). हा शेवटचा राजा राज्य करीत असतां त्याच्या मूलराज सोलंखी नामक भाच्यानें त्याला पदच्युत केलें व स्वतः

राज्य पटकाविलें. सुकृतसंकीर्तननामक ग्रंथांत या राजाचें नांव भूभट असें दिलें आहे. *

पाटणच्या चावड्यासंबंधीं जैन प्रबंधकारांनीं दिलेली माहिती एवढीच. चावडा घराण्यांतील राजपुरुषांची यादी व त्यांच्या कारकीर्दीची शकावली; याशिवाय इतर माहिती सांपडत नाहीं. चावड्याच्या राजधानीच्या ठिकाणीं जे कांहीं पडिक भाग, देवळें, राजवाडे वगैरे अवशेष आहेत त्यांवरून थोडे फार तर्क बसवितां येतात. बाप्पारावळ व इतर रजपूत राजांप्रमाणें चावडा घराणें निस्सीम शिवोपासक असावें असें वाटतें. पुढें पुढें त्यांनीं जैन पंडितांसहि आश्रय दिला असावा. चावडा घराणें कनोजच्या साम्राज्याचें मांडलिक असल्यामुळें त्यांस स्वतंत्र युद्धाचे प्रसंग फारच थोडे आले असावे. याप्रमाणें पाटणच्या चावड्यांची हकीकत फारच त्रोटक असल्यामुळें ती येथेंच संपते.

चाप घराण्याच्या दुसऱ्या एका उपशाखेची उपलब्ध असलेली थोडीशी माहिती येथें सांगून हें प्रकरण पुरें करूं. इंडिअन एन्टि-

---

* प्रबंधचिंतामणींत राजांची याद व त्यांचे कारकीर्दीचे समाप्तीचे संवत खालीलप्रमाणें आहेत.

१ योगराज ८७८ सं.
२ रत्नादित्य ८८१ ,,
३ खेमराज ९२२ ,,
४ चामुण्ड ९३८ ,,
५ अकडदेव ९६५ ,,
६ भूयडदेव ९९१ = इ. स. ९३४

१ योगराजानें अरुदेश्वरीचें वकथश्वरीचें मंदिर बांधिलें व 'भुयडदेवा'नें पट्टण येथील भूयदेश्वराचें मंदिर व तट बांधिला.

किरी न्हा. १२ पा, १९३ मध्यें धरणीवराहानें देऊं केलेली एक सनद छापिली आहे. ह्या सनदेचा शक ८३९ म्हणजे इ. स. ९१७ असा आहे. ह्या सनदेवरून असें दिसतें कीं, वढवान ( वर्धमान ) येथें चाप घराण्याची एक उपशाखा नांदत असावी, व तिची कनोजच्या मांडलिक राजांत गणना होत असावी. धरणीवराहाच्या सनदेवरून तो कनोजच्या महीपाल राजाधिराजाचा मांडलिक होता हें उघड दिसतें ( राजाधिराज परमेश्वर श्री महीपालदेव प्रसादत: समनुशासता ). अर्थात् धरणीवराहाचा काठेवाडांतील चूडासम घराण्याशीं कांहीं संबंध नसावा.—या दानपत्रांत धरणीवराहाच्या पूर्वींच्या ४ राजांचीं नांवें दिलीं आहेत, तीं अशीं १ विक्रमार्क, २ अद्दक, ३ पुलकेशिन्, ४ ध्रुवभट. ह्या राजांची सरासरीनें २७ वर्षांची कारकीर्द धरिली तर विक्रमार्काचा काळ ८३७ असा येतो; म्हणजे विक्रमार्क व कनोजचा राजा भोज हे समकालीन असावे.

ह्या दानपत्रांत चाप घराण्याची उत्पत्ति शंकराच्या धनुष्या-( चाप=धनुष्य ) पासून झाली असें म्हटलें आहे. ही उत्पति सत्य असणें शक्य नाहीं. शब्दावर श्लेष रचून दिलेली दिसते. डा. ब्यूलरचें असें म्हणणें आहे कीं, शब्दांवर श्लेष रचलेल्या दन्तकथा सामान्यत: काल्पनिक असतात व अशाच तऱ्हेची प्रस्तुत दन्तकथा आहे. असो, हें दानपत्र ‘ आमर्दक संतान ’ या नांवाच्या एका शिवोपासक महंताला दिलेलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, ह्या काळीं काठेवाडांत देखील शिवाची उपासना चालू होती व ज्याप्रमाणें बुद्धानुयायी विहारांतून रहात त्याप्रमाणेंच शिवोपासक महंत मठांतून रहात असावे.

# प्रकरण सहावें.

## धारचे परमार.

मध्ययुगीन कालाच्या दुसऱ्या भागांत रजपुतांचें चवथें नामांकित राज्य स्थापणारें घराणें म्हटलें म्हणजे अबूच्या व मागून धारच्या परमारचें समजलें पाहिजे. परमार कुलांचें मूळ ठिकाण अबू होय. धारची राजधानी मागाहून स्थापण्यांत आली. टॉडचें असें मत आहे कीं अग्निकुंडापासून जीं कुलें उत्पन्न झालीं त्यांत अत्यंत प्रतापशाली कुल परमारांचें होतें; व ह्या कुलाचा विस्तारही बराच होता. परमार कुलाचा विस्तार सर्व पृथ्वीभर होता, अशा अर्थाचें भाटांच्या कवनांतील एक वाक्यही टॉडनें आधारास घेतलें आहे. तथापि टॉडच्या मतें हें कुल अनहिलवाड येथील सोलंखी घराण्याप्रमाणें अगर अजमीरच्या चव्हाणाप्रमाणें वैभवशाली नसून अग्निकुलांत कनिष्ठ होय. परंतु आम्हांस असें वाटतें कीं टॉडच्यामतास फारसा आधार नाहीं. परमार घराणें अलीकडे मोडकळीस आलें असल्यामुळें व त्या घराण्याच्या वैभवाची साक्ष देणारे दाखले दानपत्रें, शिलालेख स्मारकें वगैरे टॉडच्यावेळीं अल्पप्रमाणांत उपलब्ध असल्यामुळें हें घराणें वैभवशाली नसावें असा टॉडचा ग्रह होणें साहजिक आहे. व अशाच तऱ्हेचा गैरसमज झालेल्या प्रतीहार घराण्याप्रमाणेंच परमार घराणें हें प्रतापी व वैभवशाली होतें. विशेषत: भोजराजाचें कालीं हें घराणें अत्यंत विख्यात झालें व ह्या कुलाची विद्येविषयीं प्रसिद्धि फारच होती. पण हल्लींच्या कालीं हें कुळ जवळ जवळ अस्तमान झालें आहे. मेवाडचे मांडलिक 'विजातिया' चे राजे हेच धारच्या

मूळ शाखेचे वंशज शिल्लक आहेत. शिवाय अरवलीच्या पायथ्याशीं असलेल्या चंद्रावतीची विहालशाखा व राजपुतान्यांतील ‘ धत ’ चे सोघा राजे व मारवाडांतील पुगलचे अधिपति साखला राजे हे ह्या घराण्याचे जवळपासचे संबंधीं हल्लीं आहेत. पूर्वीचे उम्र व सुम्र राजे ह्याच घराण्यांत मोडतात. मुसलमानी अमदानींत उम्र व सुम्र कुलें प्रसिद्धीस आलीं होतीं; पण सध्यां त्यांनीं महंमदी धर्म स्वीकारल्यामुळें त्यांची रजपुतांमध्यें गणना होत नाहीं.

परमार घराणें मूळ केव्हां व कसें उदय पावलें तें आतां पाहूं. टॉडचा असा समज आहे कीं, इ. स. ७१४ सालीं चितोड येथें परमार घराणें राज्य करीत असावें व गुहिलोतांनीं त्यांजवर स्वारी करून चितोड हस्तगत केलें असावें. गुहिलोतांनीं चितोड जिंकण्यापूर्वीं तेथें पाटलिपुत्राचे मौर्यवंशी राजे राज्य करीत असत हें निर्विवाद आहे. शिलालेखांतून देखील चितोडचें मोरी घराणें असा उल्लेख सांपडतो. पण मौर्यांचा व परमारांच्या मोरी नामक एका शाखेचा कांहींच संबंध नाहीं. चितोडचे मौर्य हे क्षात्रिय नसून शूद्र होते. चंद भाटानें जीं ३६ क्षत्रिय रजपूत कुलें सांगितलीं आहेत त्यांमध्यें या मौर्यांचा समावेश केलेला नाहीं. इतर यादींत मौर्यांचा उल्लेख सांपडतो पण चंदाच्या यादींत नाहीं. तसेंच आम्हीं या पुस्तकाच्या पहिल्या भागांत असें दाखविलेंच आहे कीं, ह्यूएनत्संगानें सिंध देशांतील जी राजांची हकीकत दिली आहे त्यावरून हे राजे चितोडचे संबंधी असून त्यांची गणना शूद्रांत होत असे; एकंदरीनें परमार घराण्याचा चितोडच्या मौर्यांशीं कोणताच संबंध नाहीं. अर्थात् परमार घराण्याचा उदयकाल नवव्या शतकापूर्वीं संभवत नाहीं. त्याचप्रमाणें परमार घराण्यासंबंधीं जे शिलालेख उपलब्ध आहेत त्यांतून कृष्णराजा-

च्यापूर्वीं होऊन गेलेल्या पूर्वजांची कांहींच माहिती दिलेली नाहीं. प्रतीहारी घराण्याच्या पूर्वजांची लांबच लांब यादी आढळते; परंतु परमारांविषयीं कांहींच माहिती शिलालेखांतून उपलब्ध होत नाहीं. १२ व्या शतकाच्या सुमारास खोदलेल्या उदेपूर प्रशस्तीमध्यें कृष्णराजाच्यापूर्वीं होऊन गेलेल्या कांहीं राजांची नामावळी दिली आहे पण ती विश्वसनीय दिसत नाहीं भाटादिक कवींना वस्तुस्थितीची अतिशयोक्ति करण्याची साहाजिक खोडच असते. त्यामुळें प्रसंगीं ते वंशावळींतील नांवें पुनः पुनः देऊन वंशावळ लांबच लांब बनवतात—असो, इंडि. एँटिक्करीमध्यें ( व्हॉ १ पान २२३ ) ब्यूलर साहेबांनीं निरनिराळ्या लेखांतून सांपडलेल्या परमार घराण्याच्या वंशावळी एकत्र दिल्या आहेत. ह्या वंशावळींचा परस्पर मेळ बसवून परमार घराण्याचा संगतवार इतिहास देण्याचा ब्यूलर साहेबांनीं प्रयत्न केला आहे व आधुनिक इतिहासकारांनीं ब्यूलरचींच मतें स्वीकारिलीं आहेत. पण ब्यूलर साहेबांनीं दिलेली माहिती सर्वथैव निर्दोष नाहीं हें आम्हीं पुढें दाखविणारच आहोंत. ब्यूलर साहेबांचे मतें परमार घराणें इ. स. ८०० च्या सुमारास उदयास आलें असावें. त्यांनीं कृष्ण राजाचा तोच काल धरला आहे. पण तो पुढील अनेक कारणामुळें युक्त नाहीं असें आम्हांस वाटतें व परमारांचा उदयकाल इ० स० ८०० इतक्या पूर्वीं नेतां येत नाहीं.

१ वाक्पतिराज उर्फ मुंज, त्याचप्रमाणें राजा भोज यांनीं देऊं केलेल्या भूमिदानपत्रांतून परमारांचा वंशानुक्रम दिला आहे तो असाः—( इंडि. ऍन्टि.—व्हॉ० ६ पा० ४८८ ) कृष्ण, वैरिसिंह, शीयक, वाक्पति—अनेक लेखांतून वगैरे यानंतरच्या राजांची यादी थेट सिंधुराज किंवा भोज राज यांजपर्यंत सांपडते. उदेपूर

प्रशस्तींत मात्र उपेन्द्र हें नांव प्रथम दिलेलें आढळतें. त्याचप्रमाणें वैरिसिंहाचे पूर्वीं आणखी एक वैरिसिंह, सीयक व वाक्‌पति होऊन गेले असें त्यांत म्हटलें आहे. पण हीं नांवें परमारांचें प्राचीनत्व संस्थापित करण्याकरितां पुनः पुनः सांगितलीं आहेत, त्यांत विशेष तथ्य नाहीं हें उघड उघड दिसतें. ( २ ) आणखीं असें कीं नागपूर प्रशस्तीमध्यें वैरिसिंव्हापासून वंशानुक्रम सांगितला आहे त्यांत हीं चार नांवें अजिबात गाळिलीं आहेत. [ ३ ] तिसरें असें कीं प्रतिहारसम्राट दुसऱ्या नागभटाच्या काळीं म्हणजे इ० स० ८०० ते ८२५ पावेतों परमारांनीं माळव्यांत स्वतंत्र राज्य स्थापणें संभवतच नाहीं. नागभटानें माळवा पूर्ण पादाक्रान्त केला होता हें त्यांच्या लेखांवरून सिद्ध आहे. व नागभटाच्या स्वारीच्या पूर्वीं माळवा प्रांत राष्ट्रकूटांच्या ताब्यांत होता हें बडोद्याच्या कर्क राजाच्या दानपत्रावरून ( ज० बंगाल ८ पान २९२ ) सिद्ध होतें.* अर्वाचीन इतिहासांत देखील हाच चमत्कार दृष्टीस पडतो कीं, कांहीं काळ माळवा उत्तराधिप सम्राटाच्या ताब्यांत असे तर कांहीं काल दक्षिणाधिप सम्राटाच्या ताब्यांत जाई. ( ४ ) तसेंच वाक्‌पति राजाला लेखांतून व दानपत्रांतून वगैरे कृष्णपादानुध्यत असें विशेषण लावलेलें आढळतें. कृष्णराज हा परमारांचा मूळ प्रसिद्ध पुरुष धरला तरच वरील विशेषण सार्थ होतें. तेव्हां वैरीसिंह ( पहिला ) शायंक ( पहिला ) व वाक्‌पति ( पहिला ) हीं नांवें गाळलीं तरच परमारांची खरी वंशावळ ठरवितां येते. भाटांच्या अत्युक्तिपूर्ण प्रशस्तीपेक्षां समकालीन दानपत्रें, शिला लेख—पण

---

*गौडेन्द्रवंगपतिनिर्जयदुर्विदग्ध सद्गुर्जरेश्वर दिगर्गलतां च यस्य ।
नीत्वा भुजं विहतमालवरक्षणार्थं स्वामीऽयमपि राजफलानि भुङ्क्ते ।

ते कितीहि त्रोटक व अपुरे असले तरी—इतिहासास जास्त उपयोगीं असतात हें कोणीही कबूल करील.

तेव्हां, कृष्णराज हाच परमारघराण्याचा संस्थापक धरला पाहिजे. कृष्णराज प्रथम मांडलिक या नात्यानें प्रसिद्धीस आला असावा व नंतर तो स्वतंत्र राजा झाला असावा. राष्ट्रकूटांचा राजा तिसरा गोविंदराज यानें आधींच उतरती कळा लागलेल्या कनोजच्या प्रतिहारी सम्राट घराण्यावर ज्यावेळीं स्वारी केली त्या सुमारास कृष्णराजानें कनोजची सत्ता झुगारून दिली असावी. कनोजच्या महीपालाची कारकीर्द सुमारें ९०८ ते ९४० अशी धरली जाते. गोविंद राजानें कनोजवर सुमारें ९१० चे सुमारास स्वारी केली. म्हणजे कृष्णराजाच्या स्वतंत्र राज्यस्थापनेचा काल सुमारें ९१० इ. स. हा ठरतो. निरनिराळ्या दिशेनें विचार करितां कृष्णराजाचा काल हाच ठरतो. वाक्पति उर्फ मुंजराजाच्या अगदीं पहिल्या दानपत्राचा काल इ. स. ९७४ असा आहे. तेव्हां मुंजराजाचा गादीवर बसण्याचा काल ९७० धरण्यास हरकत नाहीं. अर्थात् त्याचा पिता सीयक त्याचेपूर्वीं वीस वर्षें म्हणजे इ. स. ९५० मध्यें गादीवर आला असावा. सीयकाचा पिता वैरिसिंह याची कारकीर्द ९३० ते ९५० पर्यंत धरण्यास हरकत नाहीं. अर्थात् कृष्णराजाचा काल ९१० ते ९३० असा ठरतो. व ह्या कालाचा वरील अनुमित कालाशीं मेळ बसतो—असो, वरील सर्व दानपत्रांतून वाक्पतीपूर्वीं होऊन गेलेल्या राजांस "महाराजाधिराज परमेश्वर" अशीं विशेषणें दिलेलीं आहेत. हे किताब जरी फक्त सम्राट राजांचे आहेत तरी स्वतंत्र राजांनींही ते घेतलेले आढळतात. वरील किताबावरून कृष्णराजा स्वतंत्र राजा असावा असें दिसतें.

परमारघराण्याची मूळ गादी अवन्ती ऊर्फ उज्जन येथें असावी; व मागाहून ती ‘धारा’ येथें नेली असावी. धारानगरीचा उल्लेख ७ व्या शतकांतील एका लेखांत ( नंबर ५१ प्लेट नंबर ३२ कार्पस इन्स्क्रिप्शियोतरम् व्हा. ३ ) आढळतो. त्यावरून धारा हें ठिकाण परमारांनीं नव्यानें वसविलें नसून अनहिलवाड येथील सोलंखीराजांच्या उपद्रवास तोंड देण्यासाठीं परमारांनीं उज्जनी सोडून या शहराचा आश्रय केला असावा.

कृष्णराजानंतर वैरिसिंह पहिला सीयक व वाक्पति पहिला हीं नांवें काल्पनिक असल्यामुळें इतिहासदृष्टया गाळिलीं पाहिजेत हें वर सांगितलेंच आहे. ब्यूलर देखील असें म्हणतों कीं, उदेपूर वगैरे प्रशस्तीमध्यें वरील राजांच्या पराक्रमाचीं वगैरे जीं सामान्य वर्णनें आहेत त्यांत विशेष कांहींच नाहीं. हीं वर्णनें ह्याच राजांचीं असतील असेंहि नाहीं. कारण तीं कोणासही लागू पडतील. तसेंच ह्या तीनही राजांच्या कारकीर्दींतील अशी एकही गोष्ट दिलेली नाहीं कीं, जी इतिहासदृष्टया ग्राह्य असेल. तेव्हां हीं नांवें गाळणेंच युक्त होय. कृष्णराजानंतर वैरिसिंह ऊर्फ वज्रट हा सिंहासनारूढ झाला. व त्यानंतर त्याचा मुलगा सीयक ऊर्फ श्रीहर्ष हा गादीवर बसला. (सीयक हें नांव सिंहराज या शब्दावरून बनलें नसून श्रीहर्ष ह्या नांवाचेंच संक्षिप्तरूप आहे). सीयकाचा उल्लेख ‘नवसाहसांक व प्रबंधचिंतामणि यांतही सांपडतो. सीयकानें हूण राजांचा पराभव केला व गरुडाप्रमाणें खोट्टिग राजाच्या जामदारखान्यावर झडप घातली असें वर्णन आढळतें. सीयकानें पराभूत केलेले हूण हे एतद्देशीय क्षत्रिय होत, परद्वीपस्थ लोक नव्हते. किंवा ज्याप्रमाणें हूण शब्द हल्लीं आपण पाश्चात्य म्लेच्छ अविंधांस लावतों त्याप्रमाणें तो आरबांचाही वाचक सीयकाच्या वेळीं झाला असावा. मुख्या-

हूणाच्या उपलक्षणानें असें करितां येईल. तसेंच सीयकास गरुडाची जी उपमा दिली आहे ती अन्वर्थक आहे. दानपत्रांतून वगैरे परमारांच्या निशाणीची खूण गरुडच आहे. कदाचित् त्यांचें ध्वजचिन्हही गरुडच असावें. खोट्टिय हा मान्यखेटचा राष्ट्रकूट-वंशीं राजा असावा असें ब्यूलर म्हणतो. ह्या राजानें २२ अक्टोबर स. ९७१ सूर्यग्रहणाच्या दिवशीं देऊं केलेलें एक दानपत्र उपलब्ध आहे. राजाचा पुतण्या कर्कराज याच्या नांवचा सप्टेंबर ९७२चा ताम्रपट आज मिळतो त्यावरून असें दिसतें कीं, खोट्टिग राजा ९७२ सप्टेंबरपूर्वी मृत झाला असावा.—माळवाराज्याचें वैर राष्ट्रकूटांबरोबर होतें; सीयक व खोट्टिग हे समकालीन होत. हेंही वरील आख्येवरून सिद्ध होतें. सीयकाची कारकीर्द इ. स. ९५० ते ९७३ पर्यंत धरण्यास हरकत नाहीं; कारण धनपालकवीनें आपल्या पैयलच्छि नामक काव्यांत (प्राकृत) असें लिहिलें आहे कीं, ज्यावेळीं माळव्याच्या अधिपतीनें मान्यखेटाचा प्रांत लुटला त्याकाळीं नें काव्य मीं रचिलें. ब्यूलरच्या मतें त्यावेळीं म्हणजे इ. स. ९७२ मध्यें माळव्याचा अधिपति सीयक असावा. व त्यानें केलेल्या खोट्टिगराजाच्या पराभवाला अनुलक्षूनच या काव्यांतील हें वर्णन असावें. वरील कवीच्या काव्याचा काळ निश्चयेंकरून वि. सं. १०२९ म्हणजे इ. स. ९७२ होय. व हाच काळ मान्यखेटाच्या लुटीचा असावा, व ह्या काळाचा वाक्पति राजाच्या दानपत्राच्या ९७४ च्या काळाशीं विसंगतपणा येत नाहीं.

सीयकानंतर त्याचा मुलगा वाक्पति उर्फ मुंज हा गादीवर बसला. ह्यानें दिलेल्या सनदांतून वगैरे अमोघवर्ष व पृथ्वीवल्लभ अशीं ह्याचीं इतरही नांवें आढळतात. कदाचित् ह्यानें राष्ट्रकूटांचा पराभव केल्यानंतर हे किताब धारण केले असावे. पुढें मुंजराज ह्या

नांवानें जो अत्यंत प्रसिद्धीस आला तोच हा वाक्पति होय. कारण नागपूर प्रशस्तीमध्यें मुंज हें नांव आलेलें नाहीं. त्याऐवजीं वाक्पति असेंच नांव आढळतें. ह्यावरून असें दिसतें कीं, वाक्पतीचेंच दुसरें नांव मुंज असावें. मुंज हा स्वतः चांगला कवी असून त्याचे दरबारीं कवींना व इतर विद्वानांना चांगलाच आश्रय असे. संस्कृतवाङ्मयांत विख्यात असलेली पद्मगुप्त, धनिक, हलायुध धनपाल इत्यादीं विद्वद्रत्नें ह्याचीं आश्रित होत. मुंज हा जसा विद्वान् तसाच पराक्रमी होता. त्यानें राष्ट्रकूटांचा पराभव केला एवढेंच नव्हे तर कर्नाट, चोल व केरळ यांचाही पाडाव केला असें उदेपूर प्रशस्तीवरून दिसतें. तसाच त्यानें चेदींच्या हैहयांचा पराभव केला. ह्यावेळीं चेदीचा आधिपति युवराज नांवाचा राजा होता. केरळादिक सर्व राजे राष्ट्रकूटांचे सहायक दोस्त तसेच नातेवाईक होते, तेव्हां त्यांनीं राष्ट्रकूटांची बाजू घेणें साहजिकच होय.— पृथ्वीराजाप्रमाणेच ह्या राजाविषयीं अनेक दंतकथा उपलब्ध आहेत पण त्या विश्वसनीय दिसत नाहींत. वीर पुरुषांसंबंधीं अशा अद्भुत कथा नेहमींच रचल्या जातात व कालगतीनें लोकांचा त्यावरील विश्वास दृढ होतो पण त्यांचे मुळाशीं तथ्य असतेंच असें नाहीं. पृथ्वीराजानें शहाबुद्दीनचा १४ वेळ पाडाव करून त्यास तितक्याच वेळ बंदींत टाकिलें व सोडून दिलें; पण शेवटीं शहाबुद्दीनच्या हातून पृथ्वीराज जिंकिला गेला व शहाबुद्दीननें त्याचा शिरच्छेद केला. अशा तऱ्हेची पृथ्वीराजासंबंधीं दन्तकथा लोकांत प्रचलित झाली आहे. ह्या कथेचा उगम मेरुतुंगाच्या कल्पनेपासून झाला व ती आजतागायत प्रचलित आहे. पण पृथ्वीराजाच्या कथेपेक्षां अधिक काव्य मुंजाच्या दन्तकथेंत भरलें आहे. कथासरित्सागरांतील उदयनवासवदत्ता दन्तकथेचें अनुकरण होऊन असें कथन

केलें जातें कीं, कैदेंत असतां तैलपाची विधवा बहीण मुंजाची शुश्रूषा करीत असे ( रजपुतांचा रिवाज पाहतां ही गोष्टच संभवनीय नाहीं ). ती त्याजवर फिदा झाली. मुंजानें पळून जाण्याचा बेत केला, त्यांत तिचें त्यानें सहाय्य मागितलें; तिनें तो बेत फोडून तैलपास कळविला, आणि तैलपानें शेवटीं क्रोधानें मुंजाचा शिरच्छेद करविला. ही कथा फार काव्यमय असल्यानें सत्य नसावी. आणि तीस समकालीन किंवा नंतरचा कोणताही खोदीव लेखाचा पुरावा बळकटी देत नाहीं. अर्थात् ही कथा इतिहासांत दुर्लक्ष्य करण्यासारखी आहे. तथापि इतकें संभवनीय मानतां येतें कीं, मुंजानें तैलपाचा एकापेक्षां अधिक वेळां पराभव केला आणि पराभवानंतर दरवेळीं तैलपाचा सदय रीतीनें त्यानें आदर केला. परंतु तैलपानें पुन्हां त्याजवर स्वारी केली आणि शेवटीं त्याचा पराभव केला. या लढाईत मुंज मारला गेला असावा.

मुंजाच्या मागून त्याचा भाऊ सिंधुराज गादीवर बसला व सिंधुराजानें थोडकेच दिवस राज्य केल्यावर त्याचा मुलगा प्रसिद्ध भोजराज हा गादीवर आला. भोजाचें भावि वैभव मुंजानें पूर्वींच वर्तविलें होतें. आणि खरोखरच भोज हा धारच्या परमारकुलांत सर्वांत प्रसिद्ध पराक्रमी व विद्वान् राजा झाला. परंतु भोजाची कारकीर्द इ. स. १००० नंतरची असल्यानें आम्हीं तिचा या पुस्तकांत समावेश करीत नाहीं. विशेषतः तो गिझनीच्या महंमदाचा समकालीन असल्यानें तसें करणें सोईस्करही आहे. तथापि येथें एवढें सांगणें अवश्य आहे कीं, मुंजानें त्यास ठार मारण्याचा हुकूम केला होता, कारण तो मुंजाहून श्रेष्ठ होऊन मुंजाचीही गादी बळकावील असें भविष्य ज्योतिष्यांनीं केलें होतें, इत्यादि दंतकथाहि

वरील दन्तकथेप्रमाणेंच अनैतिहासिक असल्यानें कविकल्पनाच आहे.* मात्र सिंधुराज कधीं वारला आणि भोज कधीं गादीवर आला या प्रश्नाविषयीं आपणांस येथें ऊहापोह केला पाहिजे. " सुभाषित–रत्न-संदोह " ग्रंथाचा कर्ता अमितगति यानें हा ग्रंथ विक्रम सं. १०५० ( इसवी स. ९९४ ) वर्षीं मुंज राजा राज्य करीत असतां केला असें नमूद केलें आहे. तेव्हां ९९४ इ. स. त मुंज राज्यावर होता हें

---

* ह्या दन्तकथेविषयीं तसेंच, मुंजाचा मृत्यु, आणि भोजाचें राज्यारोहण याविषयीं ए. इं. भाग १ पान २३० येथील पुढील माहिती उतरून घेण्यासारखी आहे. " वाक्पति ऊर्फ मुंज यानें आपल्यामागें भोजानें गादीवर बसावें असें ठरविलें होतें ही गोष्ट खरी दिसत नाहीं. त्यानें भोजास मारण्याचा प्रयत्नही केला नाहीं. या कल्पना " नवसाहसांकचरित " नाटकांतील पुढील वाक्यावरून असंभवनीय ठरतात. " जेव्हां वाक्पतिराजानें अंबिकेकडे जाण्यास प्रयाण केलें त्यावेळीं त्यानें ही पृथ्वी सिंधुराजाच्या स्वाधीन केली." अर्थात् ज्यावेळीं मुंज हा आपल्या राष्ट्रकूटावरील शेवटच्या अपेशी स्वारीवर निघाला त्यावेळीं त्याच्या मागें राज्याधिकारी किंबहुना प्रत्यक्ष युवराज म्हणून सिंधुराज मागें राहिला. आणि जेव्हां मुंज लढाईत मारला गेला तेव्हां नेहमींच्या वारसक्रमाप्रमाणे ( मुंज अपुत्रिक असल्यानें ) सिंधुराज गादीवर बसला. या अनुमानाला " नवसाहसांकांतील " दुसऱ्या एका वाक्यानें दुजोरा मिळतो; कवि म्हणतो, " जेव्हां महाराज मुंज स्वर्गाला गेले तेव्हां त्यांनीं माझ्या मुखावर मोहोर मारली, परंतु त्या कविबांधवाच्या लहान बंधु सिन्धुराजानें ती आतां काढली आहे." याचें तात्पर्य असें कीं, मुंजाच्या वेळीं कवि पद्मगुप्त हा राजकवि होता, आणि सिंधुराज गादीवर आला तेव्हां त्यानें ती जागा त्यास पुन्हां दिली. नीलकंठ जनार्दन कीर्तने यांचें असें मत आहे कीं, मुंजानें भोजासच आपले पश्चात् अधिकारी ठरविलें होतें परंतु तो अल्पवयी असल्यानें सिन्धुराज गादीवर बसला; परंतु ही कल्पना वरील पहिल्या वाक्याशीं विरोधी आहे.

निश्चित आहे; आणि मुंजाचा मृत्यु इ. स. ९७७ त धरतां येईल. रा. ब. गौरी शंकर ओझा यांनीं सिंधुराजावरील आपल्या लघु निबंधांत सिन्धुराजाच्या मृत्यूचें वर्ष इ. स. १०१० मानिलें आहे. व सिंन्धुराज पाटणचा अधिपति चामुंडराज सोळंखी याशीं झालेल्या युद्धांत मरण पावला असेंही सिद्ध केलें आहे. ही गोष्ट कुमारपालप्रशस्ति वडनगर येथें वि. स. १०२८ त खोदली गेली आहे, त्यांतील एका श्लोकांत ग्रथित आहे* ब्यूलरनें या प्रशस्तीचें भाषांतर करतांना ' सिंधुराज ' शब्दाचें सिन्ध देशाचा राजा असें केल्यानें आतांपर्यंत गैरसमज झाला होता. गौरीशंकर म्हणतात, " सिन्धुराज हा शब्द माळव्याच्या सिंधुराजास उद्देशून आहे हें निश्चित दिसतें." पण सिन्धुराज व चामुंडराज यांचा युद्धाचा काल सदर प्रशस्तींत दिला नाहीं, यामुळें इ. स. १०१० त सिन्धुराज मेला आणि भोज गादीवर आला असें नक्की ठरत नाहीं. भोज-प्रबंधांत हा काल इ. स. १०२१ दिला आहे, पण तोही चुकीचा आहे असें दिसतें; कारण भोजानें कोंकण जिंकल्याच्या उत्सवांत दिलेलें एक दानपत्र इ. स. १०२० चें उपलब्ध आहे ( ए. इ. भाग ११ पा० ८१ तसेंच इं. अँ. भाग ६ पा० ४८ ). कोंकण जिंकण्याची शक्ति राज्यावर आल्याबरोबरच भोजास आली नसावी कांहीं काळ गेला असला पाहिजे. तथापि एकंदरींत असेंच

---

* जयसिंह देवसूरि या जैन ग्रथकाराच्या एका ग्रंथांत असलेल्या पुढील श्लोकावरून हीच गोष्ट सिद्ध होते. ( इं. अं. भाग १२ पान १९७ ) " राजा चामुण्डराजोथ यः.........। सिंधुराजमिवोन्मत्तं सिंधुराजं मृधे वधीत् ॥ तस्माद्वल्लभराजोऽभूत् यत्प्रता । मुंजोवन्तीश्वरो धीरो यंत्रेऽपि न धृतिं दधौ ॥ या श्लोकाचा अर्थ कसा लावावयाचा हें गूढ आहे.

म्हणावें लागतें कीं परमार राजांच्या राज्यारोहणाचा सर्वच काळ अद्याप अनिश्चित आहे.

रा. काशिनाथ कृष्ण लेले यांनीं मराठींत धारचा इतिहास लिहिला आहे; त्यांत प्राचीन इतिहासही थोडक्यांत दिला असून असें लिहिलें आहे कीं. मुंजानें धारानगरी येथें प्रथम राजधानी नेली, आणि तेथें अनेक तलाव बांधले. त्यांत ‘ मुंजसागर ’ या नांवाचा अद्याप सुन्दर तलाव प्रसिद्ध आहे. तसेंच सिन्धुराजानेंही एक आपल्या नांवानें तलाव बांधला तो ‘ कुंजसागर ’ म्हणून प्रसिद्ध आहे. ( सिन्धुराजाचें दुसरें नांव कुंज होय. ) मांडवगड येथेंही एक मुंजताल आहे. मुंजानें उज्जनी, महेश्वर, ओंकार व धर्मपुरी ( नर्मदेवर ) येथेंही कित्येक घाट व देवळें बांधलीं.

उज्जन–धार येथील परमार कुलांचा वंशक्रम येणेंप्रमाणें आहे. कारकीर्दीचे काळ अजमासाचे आहेत, नक्की नाहींत.

१ कृष्णराज ( इ. स. ९१४--९३४ सुमारें )
२ वैरिसिंह वज्रट ( इ. स. ९३४–९५४ सु. )
३ सीयक ऊ. श्रीहर्ष ( इ. स. ९५४–९७३ सु. )
४ वाक्पति ऊ. मुंज ( इ. स. ९७३ ते ९९७ सु. )
५ बंधुसिंहराज ऊ. कुंज ( इ. स. ९९७ ते १०१० सु. )
६ भोज प्रसिद्ध परमारभूप सुमारें १०१०.

# प्रकरण ७ वें

## बुंदेलखंडचे चंदेल्ल.

व्हिन्सेंट स्मिथनें रॉयल एशिॲटिक सोसायटीच्या जर्नलमध्यें बुंदेलखंड अगर जेजाकभुक्तीचा पूर्वेतिहास दिला आहे; तो बराचसा दंतकथात्मक आहे. त्यावरून असें दिसतें कीं, बुंदेलखंडांत चंदेल्लाचा प्रवेश होण्यापूर्वी तेथें प्रथमत गहरवारांचे व नंतर परिहारांचें वास्तव्य होतें. परंतु दन्तकथांतून सांपडणारें सत्य अगदींच थोडें असतें; व दुसरें असें कीं दन्तकथा कालाचा विपर्यास करितात. त्यामुळें दन्तकथांच्या आधारानें इतिहासांतील घडामोडींचा कालानुक्रम ठरविणें जरा कठीणच असत. दन्तकथांतून असें वर्णिलें आहे कीं, बुंदेलखंडांतील मनोहर तलाव गहरवारांनीं बांधिले. पण त्यास इतिहासाचा आधार मिळत नाहीं. त्यामुळें चंदेल्लांच्या पूर्वीं गहरवार बुंदेलखंडांत असावेत असें दिसत नाहीं. ह्यूएन्त्संगानें आपल्या इ. स. ६४० च्या प्रवासवर्णनांत तर असें लिहिलें आहे कीं, जज्होती येथें एक ब्राह्मण जातीचा राजा राज्य करीत होता. हा ब्राह्मण राजा कनोजच्या सम्राट हर्ष राजाचा सुभेदार असावा असें आम्हीं मागें सांगितलेंच आहे. हर्षानंतर कनोज येथें मौखरी ऊर्फ वर्मा घराणें राज्य करूं लागलें. जोंपर्यंत वर्म घराण्याची सत्ता अबाधित होती तोंपर्यंत जज्होती प्रांतावर कनोजची पूर्ण सत्ता असावी. पण कनोजच्या साम्राज्याला उतरती कळा लागल्याबरोबर तो प्रान्त हळू हळू स्वतंत्र झाला असावा. म्हणजे साधारणपणें ज्या वेळीं चक्रायुधानें इंद्रायुधाच्या गादीवर आरोहण केलें त्यावेळींच

ही घडामोड झाली असावी. आमच्या ह्या कालनिर्णयास बनारस येथें उपलब्ध झालेल्या चंदेल्लवंशाच्या अतिप्रसिद्ध धंगराजाच्या लेखाचा ( एपि. इं. भाग १ पा. १२९ ) आधार मिळतो. ह्या प्रसिद्ध धंगराजाच्या लेखांत चंदेल्ल घराण्याच्या मूळ पुरुषापासून जी वंशावळ दिलेली आहे त्यावरून नन्नुक हा ह्या वंशाचा मूळ पुरुष दिसतो व नन्नुकापासून धंगराजापर्यंतच्या कारकीर्दींचा विचार करितां नन्नुकाचा काल सन ८३१ ते ८५० असा ठरतो. महोत्राचे कानुगोजवळ सांपडलेल्या २०४ व २२५ हर्षशकावरून स्मिथ साहेबांनींही नन्नुकाचा राज्यारोहण काल इ. स. ८३१ ठरविला आहे. त्याकाळीं हर्षशक चालू होता. ह्याचा अर्थ असा होतो कीं, कनोजची सत्ता ह्या प्रांतावर अद्याप चालू होती. चंदेल्ल घराणें हर्षशक २०४ म्हणजे इ. स. ८१० मध्यें भरभराटीस येऊं लागलें असावें व ८३१ मध्यें पडत्या सम्राटाशीं एखादी लढाई होऊन त्यांत नन्नुकास विजय मिळाला असावा व त्यानें “ परिहारास ” हुसकावून देऊन बुंदेलखंडांत चंदेल्लांची स्वतंत्र राज्यस्थापना केली असावी.

नन्नुकानंतर विजयानें इ. स. ८७० पासून ८९० पर्यंत राज्य केलें असावें. पण वरील लेखांत नन्नुकानंतर जयशक्ति व विजयशक्ति यांनीं अनुक्रमें राज्य केलें व हे दोघेही भाऊ होते असें सांगितलें आहे. आणि हर्षराजाच्या एका लेखांत ( वरील पुस्तक पहा. ) नन्नुकाच्या पुढच्या राजाचें नांव नुसतें जेज्जक असें दिलें आहे. जेज्जक हें नांव कधीं कधीं जयशक्ती आणि विजयशक्ति या जोड नांवावरून निघालें आहे असें म्हणतात... ....पण जेजाकभुक्तीवरूनच निघालेलें स्पष्टपणें जजोति हें नांव आहे आणि तें तर खुद्द ह्यूएनत्संगानें ह्या प्रांतासंबंधानें वापरलें आहे.

अर्थात् हें नांव दोनशें वर्षांपूर्वी वापरलेलें असल्यानें जयशक्ति, विजयशक्ति या नांवावरून निघालेलें नाहीं हें निश्चित आहे. शिवाय भुक्ति हा शब्दभाग स्पष्टपणें असें सुचवितो कीं, हा एक मोठ्या साम्राज्याचा प्रान्त होता. मग तो गुप्ताच्या साम्राज्याचाही असेल व अयोध्या मुख्य ठिकाण असेल. कनोजच्या साम्राज्याचा तर तो भाग होताच आणि कनोज येथें मुख्य राजधानी होती. अर्थात् जेज्जक हें नांव चंदेल्लांत पुनरुक्तिरूढ आलें असलें पाहिजे. असो, विजयानंतर राहिल ( इ. स. ८९० ते ९१० ) यानें राज्य केलें. त्याची पराक्रमाविषयीं बरीच ख्याति होती. त्याचा राजधानीचा गांव महोबा असून महोबाजवळील विस्तृत सरोवराचें नांव राहिल्यसागर असेंच आहे. ह्या सरोवराचे कांठीं ह्या राजाच्या स्मरणार्थ एक भव्य शिवमंदीर बांधलें गेलें आहे. राहिलराजाच्या पराक्रमाचें वर्णन पृथ्वीराज चव्हाणाच्या चंद भाटानेंही केलें आहे. ह्या राजाच्या कन्येचा विवाह तत्कालीन चेदीच्या गादीवर असलेल्या कोक्कल राजाशीं झाला. राहिलानंतर त्याचा मुलगा हर्ष राज्य करूं लागला. त्याचा विवाह चाहमान कुलांतील कंचुका नामक कन्येशीं झाला होता. ह्या राजाची कारकीर्द इ. स. ९१० ते ९३० पर्यंत धरावयास हरकत नाहीं. स्मिथचें म्हणणें असें आहे कीं त्याचा विवाह " गंग " जातीच्या कन्येशीं झाला असावा; कदाचित् " गंग " जात चाहमानांची एक शाखा असावी. हर्षाचा मुलगा यशोवर्मा असून त्यानें आपल्या पराक्रमानें चंदेल्ल कुलाची अत्यंत महती वाढविली. त्यानें कलचूरीचा पराभव करून प्रासिद्ध कालंजर किल्ला काबीज केला. कालंजर हें महाभारत कालापासून तीर्थक्षेत्र म्हणून प्रासिद्ध असून हिंदुस्तानच्या इतिहासांत कालंजर किल्ल्याचें फारच महत्त्व आहे. कालंजर किल्ला ताब्यांत

असणें हें एक मोठें भूषणच आहे असें चेदीचे राजे समजत असत. कारण ते आपणांस ' कालंजर पुरवराधीश्वर ' असें म्हणवीत. परंतु यशोवर्म्यानें चेदीचा पाडाव केल्यामुळें वरील किताब यशोवर्म्यास मिळाला. लेखांत या कालंजर विजयाचें यर्णन आहेच. शिवाय यशोवर्म्यानें गौड, खस, कोसल, काश्मीर, मिथिला, मालवा, चेदी, कुरु, गूर्जर इत्यादि देश त्यानें जिंकले असेंही अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केलें आहे. पण ह्या वर्णनांतही थोडें फार तथ्य आहेच. कालंजर किल्ला ज्यावेळीं काबीज करण्यांत आला त्यावेळीं कलचुरीचा म्हणजे चेदीचा पराभव झाला. गुर्जर म्ह. प्रतिहार राजा कनोजच्या सम्राट् पदावर असलेला होय. कारण यशोवर्म्याच्या पित्यानें म्हणजे हर्षराजानें कनोजच्या देवपालाला राष्ट्रकूटांच्या तिसऱ्या इंद्रनामक राजा-विरुद्ध सहाय्य केलें होतें असें शिलालेखांतून लिहिलेलें आढळतें. म्हणजे त्याचकाळीं कनोजच्या सत्तेला थोडीफार उतरती कळा लागली असावी. ह्या उतरत्या काळाचा फायदा घेऊन यशोवर्म्यानें कनोजच्या सम्राटाचा पराभव केला असावा; व त्यापासून वैकुंठाची म्हणजे विष्णूची मूर्ति मिळविली असावी. यशोवर्मा विष्णुभक्त असावा असें दिसतें. " खजुराहो " लेखांत महीपालाला ही मूर्ति कोणापासून व कशी मिळाली हें सांगितलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं ही मूर्ति प्रथम भोट अगर तिबेटच्या राजाजवळ असावी; त्यापासून ती कीरच्या शाहीराजानें मिळविली, व नंतर ती महीपालास प्राप्त झाली. ह्या लेखांचें आणखी दुसऱ्या तऱ्हेनें महत्त्व आहेच. त्यावरून असें दिसतें कीं चंदेल्लाचा ' जज्होटी ' येथील राजा कनोज अगर इतर कोणत्याही सार्वभौमाचा मांडलिक नसून पूर्णपणें स्वतंत्र राजा होता. स्मिथचें देखील असेंच ह्मणणें आहे. स्मिथच्या ह्मणण्या-प्रमाणें भोज व महेन्द्रपाल यांच्या कारकीर्दींत चंदेल्लराजे कनोजचे

मांडलिक असून मागाहून ते स्वतंत्र राजे झाले. वि. स. १०५३ म्हणजे इ. स ९९९ च्या एका लेखांत हर्षाला व यशोवर्म्याला 'परमभट्टारक' व परमेश्वर अशीं विशेषणें लागलेलीं आहेत. (इंडि. अँटि. व्हा. १६ पृ० २०२). त्यावरून हर्ष हाच चंदेल्लाचा पहिला स्वतंत्र राजा झाला असें अनुमान केल्यास हरकत दिसत नाहीं. 'खाजुराहो' लेखांत देवपालाला हयपति असें विशेषण लावण्यांत आलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, हयपति, गजपति, नरपति, व भूपति अशा तऱ्हेचीं निरानिराळीं विशेषणें राजे लोकांस लावण्याचा ह्या काळीं प्रचार सुरू झाला असावा. ह्याचें कारण असें दिसतें कीं, कनोजचे सम्राटराजे मारवाडांतून आले असल्यामुळें घोड्यावर बसण्यांत फारच तरबेज असत व त्यांच्या सैन्यांत विशेष भरणा घोडदळाचा असावा. अशा प्रकारच्या सैन्याच्या स्वामित्वावरून राजे लोकांचे किताब ठरले असावेत.

यशोवर्म्याची कारकीर्द इ० स० ९२५ ते ९५० पर्यंत असावी व नंतर चंदेल्लांचा अतिपराक्रमी पुरुष धंग राजा राज्य करूं लागला असावा. खजूराहो लेखांत प्रथमच धंग राजाच्या राज्यविस्ताराच्या मर्यादा दिलेल्या आहेत. त्याच्या राज्याची उत्तरेकडील सीमा यमुना नदीपर्यंत असून दक्षिणेंत त्याच्या राज्याचा विस्तार मालवा नदीच्या कांठच्या भास्वत गांवापर्यंत असे. पूर्वेस कालंजर गडापर्यंत तर पश्चिमेस गोपाद्रि (ग्वालेर) पर्यंत त्याच्या राज्याचा विस्तार असे. माळवानदी म्हणजे हल्लींची बेटवानदी होय. कांहींजण "धसान" नदी असें समजतात. पण धसान नदी दशार्णप्रांतात असल्यामुळें हें म्हणणें बरोबर नाहीं. "भास्वत" म्हणजे भैल्लस्वामिन् उर्फ अर्वाचीन भेलसा गांव होय.

धंग राजाच्या कारकीर्दीचे बरेच लेख सांपडले आहेत. त्यांपैकीं इ० स० ९५४ च्या खजुराहो लेखाचा उल्लेख वर आलाच आहे. दुसऱ्या दोन महत्त्वाच्या लेखांचे काल अनुक्रमें इ० स० ९९८ व १००२ असे आहेत. ९९८ च्या लेखांत धंगराजाची तुलना हम्मिरावरोबर केली आहे. त्यावरून ९८९–९९० ' क्रम्मु ' येथें सबक्तगीनाबरोबर झालेल्या रणसंग्रामांत धंगराजानें विशेष पराक्रम दाखविला असावा असें दिसतें. फेरिस्त्यानें लिहिलेल्या वृत्तावरून हेंच दिसून येतें. फेरिस्ता म्हणतो कीं, लाहोरच्या जयपाळाच्या मदतीस कालंजर मोठ्या सैन्यानिशीं व खजिन्यासह धांवून आला. ह्या लेखावरून हिंदूंचा जय झाला असावा असें दिसतें; तर मुसलमानांच्या बखरीवरून हिंदूंचा पराजय झाला असावा असें दिसतें. कदाचित् ह्या लढाईंत कोणाचाच जय न होतां बरोबरी झाली असावी. पण ह्या लढाईचें विशेष वर्णन आमच्या पुढील पुस्तकांत पडत असल्यामुळें तत्संबंधीं जास्त माहिती येथें देणें आवश्यक नाहीं.

धंगाची कारकीर्द फार मोठी होती, तसेंच तो दीर्घायुषी होता. आयुष्याच्या अंतीं त्यानें आपणांस गंगायमुनेच्या प्रवाहांत वाहवून घेतलें अशी आख्यायिका प्रसिद्ध आहे. राजेन्द्रलालांस ह्या दन्तकथेंत विशेष तथ्य दिसत नाहीं. त्याच्या म्हणण्याप्रमाणें धंगराजानें आपणांस बळेंच प्रवाहांत वाहविलें नसून त्याला वृद्धापकाळांत सहज मृत्यु प्राप्त झाला असावा. पण आम्हांस वरील कथा काल्पनिक असावी असें वाटत नाहीं. हिंदू धर्मशास्त्रास अशा तऱ्हेचा शरीरत्याग संमत आहे. प्रयोपवेशन करून किंवा जीर्ण झालेला देह तीर्थाचे ठिकाणीं वाहवून इहलोकचा त्याग करणें पुण्यकारक

आहे. * धंगराजानें दिलेल्या तिसऱ्या दानपत्रावरून असें दिसतें कीं, धंगराजाच्या राज्याचा विस्तार काशीपर्यंत झाला असावा. हें जरी थोडेंफार विवादात्मक आहे, तरी धंग हा चंदेल्लवंशाचा विख्यात वीर पुरुष होऊन गेला यांत संशय नाहीं. तसाच तो मोठा शिवभक्त होता. त्याच्या दानपत्राच्या आरंभी "ॐ नमः शिवाय" अशीं अक्षरें सांपडतात. ह्या काळांत शिव, विष्णु सूर्य किंवा देवी इत्यादि देवतांची उपासना विशेष प्रचारांत होती असें मागें सांगितलेंच आहे. पण शैवमतवादी वैष्णवांचा विरोध करीत नसत. फाजील मताभिमानाचें वेड हिंदु समाजांत अद्याप शिरलें नसून परधर्मसमजुतीविषयीं सर्वत्र सहिष्णुता असे.

शेवटीं एक गोष्ट सांगावयाची; ती म्हणजे चंदेल्लांचीं स्वतंत्र नाणीं सांपडतात ही होय. चेदीराजांच्या व चंदेल्लांच्या नाण्यांत विशेष साम्य आहे. फरक इतकाच कीं चेदींच्या नाण्यांवर दुर्गेचा शिक्का असे तर चंदेल्लांच्या नाण्यांवर हनुमानाचा शिक्का आहे; पण त्याबरोबरच एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती अशी कीं धंगाच्या पूर्वींच्या व धंगासुद्धां राजांच्या काळचीं नाणीं आज उपलब्ध होत नाहींत. कदाचित् त्यांचीं स्वतंत्र नाणीं प्रचारांत नसून कनोजचीं नाणीं त्यांच्यावेळीं चालू असावीं. (स्मिथ साहेबांनीं

---

* राजेंद्रलालास धंगराजाच्या देहत्यागाचें वर्णन औपचारिक वाटतें. खालीं दिलेल्या श्लोकावरून वाचकांनीं आपलें मत ठरवावें.

रक्षित्वा क्षितिमम्बुराशिरशनामेतामनन्यायतिं
जीवित्वा शरदां शतं समधिकं श्रीधंगपृथ्वीपतिः ।
रुद्रं मुद्रित लोचनं स्वहृदये ध्यायन्जपन् जान्हवी
कालिंद्याः सलिले कलेवरपरित्यागादगान्निर्वृतिम् ॥

एपि. इंडि० १, १४६

इंडि. अँटि. व्हॉ. ३७ मध्यें चंदेल्लांची व त्यांच्या नाण्यांची १९०८ पर्यंतची माहिती दिली आहे ती पाहा.) स्मिथचें असें म्हणणें आहे कीं, धंगाच्या पूर्वजांच्या काळीं इंडोससेनिअन नाणीं प्रचारांत असावीं. पण हें विधान आम्हांस बरोबर वाटत नाहीं. आम्हांस असें वाटतें कीं, भोजादिकांच्या ' आदिवराह ' वगैरे नाण्यांचा प्रसार कनोजच्या साम्राज्यांत मोडत असलेल्या सर्व देशांतून असावा. ११ व्या शतकांत चेदींच्या गांगेय देवानें स्वतंत्र नाणीं पाडण्याचा उपक्रम सुरू केला; व चंदेल्लांनीं त्यांचें अनुकरण करून स्वतःच्या हनुमान शिक्याचीं सोनें, रुपें व तांबें यांचीं नाणीं पाडलीं असावीं. हनुमानाचा उपासक कोणता चंदेल्लराजा होता हें नक्की समजत नाहीं. असो, हा विषय पुढील भागाचा असून चंदेल्लांची बाकीची हकीकत पुढें येणारच आहे. खजुराहो लेखांत आलेल्या आणखी एकाच गोष्टीचा उल्लेख करून हें प्रकरण संपवूं. ह्या लेखाच्या शेवटीं " विनायकपालाच्या कारकीर्दींत " असे शब्द आढळतात. हा विनायकपाल कोण याचा खुलासा करणें जरा कठीण आहे असें किल्हार्न साहेबास वाटतें. आमचा असा तर्क आहे कीं विनायकपाल ऊर्फ महीपाल हा कनोजचा सम्राट असून त्याचें सार्वभौमत्व यशोवर्मा स्वतंत्र राजा असला तरी मानीत असावा. ज्याप्रमाणें मराठे स्वतंत्र झाले होते तरी हिंदुस्तानचें सार्वभौमत्व दिल्लीपतीकडे देत असत त्याप्रमाणेंच वरील प्रकार असावा. तसेंच मराठीशाहींत ज्याप्रमाणें मोंगलांचीं नाणीं प्रचारांत असत त्याप्रमाणें कनोजचीं नाणीं सर्वत्र म्हणजे एकेकाळीं कनोजच्या ताब्यांत असलेल्या पण मागाहून स्वतंत्र झालेल्या देशांत चालत असावींत.

## स्मिथ साहेबांनीं इंडि० ऍंटि ३७ मध्यें दिलेली चंदेल्लांची वंशावळ.

१ नन्नुक ८३१ इ. स.
२ वाक्पति ८४५ ”
३ जयशक्ति ७६० ”
४ विजयशक्ति ८८० ”
५ राहिल ९०० ”
६ यशोवर्मन् ९३० ”
७ धंग ९५० ”
८ गंड १००० ”

---

## टिप्पणी—चन्देल्लांच्या उत्पत्तीविषयीं स्मिथचें चुकीचें मत.

सर व्हिन्सेंट स्मिथ यांनीं आपल्या हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत व इतरत्र चन्देल्ल हे मुळांत गोंड किंवा भरजातीचे आहेत असें आपलें निश्चित मत दिलें आहे. आपल्या वरील पुस्तकांत (पृ० ३७० दु. आ.) तो लिहितो "मुळांत चन्देल्ल हे गोंड अथवा भर आहेत हें अनुमान बळकट धुराव्यावरून निघतें." युरोपीयन पंडितांची जी एक प्रवृत्ति, रजपूत हे बाहेरचे म्लेच्छ अथवा निदान हिंदुस्थानचे मुळ राहणारे द्रविड जातीचे आहेत, असें मानण्याकडे साहजिक पण विनाकारण दिसते, त्याच्याच परिणामाचें हें मत आहे. या अनुमानाचीं सबळ मानलेलीं कोणतीं कारणें स्मिथनें दिलीं आहेत तीं आपण पाहूं. आपल्या इतिहासांत तीं स्मिथनें दिलीं नाहींत; पण इंडियन ऍंटिकरी व्हाल्यूम ३७ पा. १३७ वर त्यानें ती विस्तारानें दिलीं आहेत. त्यांत तो म्हणतो "माझें अद्याप मत असेंच आहे कीं (इ. स. १९०८) चन्देल्लांची उत्पत्ति एका मुळच्या रहिवाशी

जातीपासून झाली आहे. मग ती जात भर असो किंवा गोंड असो." याविषयींचा पहिला पुरावा त्यानें दिला आहे तो चन्देल्लामध्यें चन्द्र व एक काशीनिवासी ब्राह्मण कन्या यांजपासून आमची उत्पत्ति आहे अशी जी दन्तकथा वेडगळस्वरूपाची प्रचलित आहे तीच होय. याजवर स्मिथ म्हणतो " या दन्तकथेचा अर्थ एवढाच कीं चन्देल्लांच्या पूर्वपीठिकेसंबंधानें शंका असून तिचें निराकरण करण्याकरितां एका दन्तकथेची जरूर होती. आणि या दन्तकथेनें तें काम चन्देल्लांस चन्द्रवंशी बनवून साधलें. इतकेंच नव्हे तर आणखी संभावितपणा येण्याकरितां एक ब्राह्मणकन्या मूळ वंश-जननी बनविली. पण वस्तुस्थिति पाहिली तर चन्देल्लांस कमी दर्जाचेच रजपूत मानतात." दुसरें सबळ कारण स्मिथ असें म्हणतो कीं, "चन्देल्लकुळ गोंड लोकांच्या मध्यप्रांतांत उत्पन्न झालें अशीं सूचकप्रमाणें स्पष्ट दिसतात. महोबा येथील चन्देल्ल जमीनदार आपण मूळचे येथचेच असें मानतात आणि केन नदीवरील मन्यागड किल्ल्यांत आपले पूर्वज होते असें म्हण-तात. या म्हणण्यास बळकटी आणखी अशी येते कीं चन्देल्लांची कुळ-देवता मणियादेव (देवी) आहे आणि त्या देवतेचें मंदीर मन्यागड किल्ल्यांत आहे. जेव्हां मन्यागडाहून चन्देल्लजवळच महोबा येथें राज्य स्थापून राज्य करूं लागले तेव्हां त्यांनीं आपली कुलदेवता मन्यागडाहून महोबास नेली या देवतेचें स्वरूपही गोंड लोकांच्या देवतांशीं जुळतें आहे. भाटकवि चंद यानें १२ व्या शतकांत सुद्धां मन्यागड येथें एक गोंड मांडलिक असल्याचें वर्णन केलें आहे" तिसरी गोष्ट स्मिथ अशी सांगतो कीं "चन्देल्ल राजकन्या दुर्गावती इचें लग्न गढामंडळच्या गोंड राजाशीं झालें होतें" शेवटीं स्मिथची अशी टीका आहे कीं "गेहरवार किंवा चेदीचे हैहय हे अशाच रीतीनें मूळ रहिवाशांच्या ह्या किंवा त्या जातींतून प्रसिद्धीस आले आणि राज्यकर्ते झाल्यानें आपण क्षत्रिय, ठाकूर, ऊर्फ रजपूत आहों असा दावा करूं लागले. ही तऱ्हा हल्लींच्या गोंड लोकांत ही प्रचलित आहे." हीं सर्व वरील कारणें किती चुकीचीं व पुळपुळीत आहेत हें प्रत्येक हिंदु वाचकाच्या सहज लक्षांत येण्यासारखें असल्यानें त्यांचें निराकरण करीत बसण्याच्या भानगडींत पडण्याची अवश्यकता नव्हती.

तथापि युरोपीय वाचक व तदनुयायी यांच्या समजुतीसाठीं यांजवर थोडेंबहुत लिहिणें अवश्य आहे.

पहिलें कारण चन्देल्लांत प्रचलित असलेल्या त्यांच्या उत्पत्तीच्या वेडगळ दन्तकथेवर रचलेलें आहे. याजविषयीं विचार करतांना ही गोष्ट कोणीही नाकबूल करणार नाहीं कीं अशा वेडगळ कथा प्रत्येक देशांत आणि प्रत्येक जातींत वीर पुरुष व वीर कुलें यांच्या उत्पत्तीसंबंधानें प्रचलित असतात. आणि म्हणून त्यांजपासून कांहींच अनुमान निघूं शकत नाहीं. उदाहरणार्थ ग्रीक लोकांत अशी दन्तकथा प्रचलित होती कीं, ॲकिलीजची उत्पत्ति थेटिसच्या पोटीं सूर्यापासून (अपॉलोपासून) झाली होती तेव्हां ही दन्तकथा खरी मानावयाची कीं काय आणि मानली तर त्यापासून असें अनुमान काढावयाचें कीं काय कीं ॲकिलीसच्या उत्पत्तीसंबंधानें शंका होती आणि तीवर पांघरूण घालण्यासाठीं ही कथा प्रचलित झाली !!! आम्हीं पूर्वींच स्पष्टपणें म्हटलें आहे कीं अशा वीर पुरुषांच्या उत्पत्तीच्या कथा सर्वच कल्पित असून ऐतिहासिक विचारांत त्याज्य असतात. त्या केवळ कविकल्पना वैदिक काळापासून चालत आल्या असून त्याजपासून कोणतेंच अनुमान काढणें योग्य नाहीं. तो वीर उत्पत्तीनें शंकनीय होता असेंही म्हणतां येणार नाहीं किंवा कुलीन होता असेंही नाहीं. खरोखर चन्देल्लांच्या भाटांनीं जेव्हां ही कथा प्रचलित केली आणि नेहमींच्या पद्धतीप्रमाणें (ज्यास कलिहानें नाममूलक कथा म्हणतो) नांवावर श्लेष करून आपल्या आश्रयदात्यांच्या कुलीनत्वाबद्दल गौरव वाढविण्याचा प्रयत्न केला त्या वेळेस त्यांच्या खचित स्वप्नांत आलें नसेल कीं हीच आपली कल्पना पुढील विद्वान् लोक भलत्याच अर्थानें उलटा सिद्धान्त प्रस्थापित करण्याकडे लावतील !!! जी कथा आपल्या यजमानाचें कुलीनत्वाचें दर्शक म्हणून कल्पिली तीच त्यांचें अकुलीनत्व सिद्ध करण्याकडे लाविली जाईल !!! चन्देल्ल नांवावरून चन्द्र वंशकर्ता आहे ही कल्पना सहज सुचते आणि उत्तम वंशजननी एक ब्राह्मणकन्या कल्पिली यांतही कांहीं आश्चर्य नाहीं. फार प्राचीन काळीं ब्राह्मण क्षत्रिय वैश्यांत प्रतिलोमविवाह प्रसंगानें होत असत. ब्राह्मणकन्या देवयानीपासून क्षत्रिय ययातीला यदु वंशकर्ता झाला.

मुख्य गोष्ट ही कीं असल्या कथा आम्हीं वारंवार निदर्शित केल्याप्रमाणें ऐतिहासिक विचारांत सोडावयाच्या आहेत. या कथेवरूनही एवढेंच अनुमान निघतें कीं चन्देल्ल कुल चन्द्रवंशी आहे असें प्राचीन काळापासून लोक मानीत आले आहेत. आम्हांस मुख्य पाहणें आहे तें हें कीं अशा मानण्यांत कधीं अंतर पडलें होतें कीं काय? चन्देल्लांना कधींतरी हीनवंशी मानीत कीं काय हा प्रश्न आहे. त्यांना जर कधीं अनार्य मानलें असेल तर त्यांचा रजपुतीचा दावा अग्राह्य ठरेल हें खरें आहे.

स्मिथचें जें महत्त्वाचें प्रमाण खरोखर आहे तें त्याच्या शेवटच्या वाक्यांत म्हटल्याप्रमाणे चन्देल्ल हीनकुलाचे आहेत असाच लोकांत समज आहे हें होय. या विधानाला त्यानें आधार दिला नसल्यानें आमचें उत्तर येथें हें आहे कीं हें विधान सपशेल खोटें आहे आणि याच्या उलट अनेक प्रमाणें आहेत.

प्रथम गोष्ट ही कीं आमच्या मतें चंदभाटानें ३६ रजपूत कुळींची जी यादी दिली आहे त्यांत चन्देल्ल आहेत; आणि तेही अगदीं प्रारंभीं आहेत. पहिल्या दोह्यांतील छंदशब्द चन्देल्लवाची आहे असा आमचा समज आहे. (रासामध्यें चंदशब्द कधीं कधीं चन्देल्लाबद्दल उपयोजिला आहे. महोबा समयांत 'आये लाखन साम रम, उचरे आल्हसुभाय। हम आवेंगे काम सब, राज चंद नही जाय॥' पा २५७५). बरें असें नसलें तरी टॉडनें ज्या प्राचीन यादी ३६ कुळींच्या आपल्या पुस्तकांत दिल्या आहेत त्यांत कुमारपालप्रतीच्या यादींत चन्देल्लांचें नांव आहे. तेव्हां कुमारपालचरिताच्या वेळेपासून (इ. स. १२०० सुमार) चन्देल्ल हे उत्तम रजपूत आहेत असें मानलें जात आहे हें सिद्ध आहे. दुसरें महोबा समयांत पृथ्वीराज रासांत चंदानें चन्देल्ल हे हीन रजपूत आहेत असें कोठेंच सूचित केलें नाहीं आणि याच चंदभाटाचा दाखला स्मिथ घेतो. तिसरी गोष्ट ही कीं प्राचीन शिलालेखांवरून चन्देल्लांचे विवाहसंबंध उत्तम गणलेल्या रजपूत कुळांत होत होते असें दिसतें. विशेषतः हैहय कुळाशीं त्यांचे संबंध होत आणि स्मिथ कांहीं म्हणो हैहयचेदि हें पूर्वीं व हल्लींही उत्तम रजपूत कुल समजलें जातें. शेवटली गोष्ट ही कीं चन्देल्लांचें

सध्याचें प्रधान कुल महाराजा गिधोर यांचें असून त्यांचे हल्लीं विवाहांत संबंध गुहिलोत चौहान इत्यादि उत्तम रजपूत कुळांत होत आहेत. तेव्हां चन्देल्ल हे हीन रजपूत मानले जातात हे स्मिथचें विधान केवळ खोटें आहे.

स्मिथनें पुढें आणलेलें तिसरें कारण पहिल्या कारणासारखेंच पुळ-पुळीत व न्यायविरुद्ध आहे. जरी तें योग्य व खऱ्या माहितीवर रचलें आहे तरी तें अप्रमाणच ठरतें. कारण गोंड लोकांच्या ऐन मध्य देशांत चन्देल्लांचा उदय झाला हें जरी खरें आहे तरी यावरून ते स्वतः गोंड कसे ठरतात ! कारण आपणांस इतिहासावरून माहित आहे की शेकडो रज-पूत कुळांनीं गोंड, भर, भिल्ल वगैरे मूळ रहिवाशी अडाणी लोकांच्या टापूंत लहान लहान राज्यें स्थापिलीं आहेत, रजपूत म्हणजे क्षत्रिय वर्णाचा हा उपजत स्वभावच आहे की रानटी लोकांच्या मध्य वस्तींत जाऊन जर आपल्यास आर्य देशांत राजा म्हणवून घेण्यास जागा नसेल तर तेथें तरी राजा म्हणवून घ्यावें ( दानमीश्वरभावश्च क्षात्रकर्मस्वभावजम् ।। असें गीताही म्हणते) उदाहरणार्थ बाप्पारावळ भिल्लांत जाऊन तेथें राज्य करूं लागला आणि गुहिलोत कुळ तेथें उदय पावलें. म्हणून गुहिलोत हे मूळचे भिल्ल ठरतात काय ? ब्रिटिशांनीं सुद्धां हिंदु मुसलमानांत येऊन एक प्रचण्ड राज्य स्थापन केलें आहे म्हणून ते हिंदु किंवा मुसलमान ठरतील काय ? आश्चर्य आहे कीं इतिहासकारांना सुद्धां अद्याप ही गोष्ट पटूं नये कीं, धाडशी क्षत्रिय वीर आर्य मध्यदेशांतून हिमालयाच्या खोऱ्यांत राज-स्तानाच्या रेतींत किंवा मेवाडच्या डोंगरांत जाऊन तेथें राज्यसंस्थापक झाले. तात्पर्य चन्देल्लांचें मूळ राज्य गोंड लोकांच्या ऐन मध्यवस्तींत प्रस्था-पित झालें एवढ्यावरून ते स्वतः गोंड आहेत ही गोष्ट अनुमित होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें महोबाच्या चन्देल्ल जमीदारानें जें हें सांगितलें कीं ' आम्ही लोक मूळचे येथीलच ' त्यांतही आश्चर्य करण्यासारखें कांहीं नाहीं. ऐतिहासिक पुराव्यावरून स्पष्ट सिद्ध होतें कीं चन्देल्लाचें राज्य महो-ब्यांत हजार वर्षांपूर्वीपासून निश्चित आहे अशा स्थितींत स. १९२० त चन्देल्ल जमीदार महोबांत आमची वस्ती काळाच्या सुरवातीपासून आहे

असें समजत असेल तर नवल नाहीं. किंबहुना महोबांत येण्यापूर्वीं चन्देल्ल हे मण्याराड येथें आहेत आणि ते तेथें केव्हां आले हें अद्याप इतिहासास ठाऊक नाहीं; तेव्हां चन्देल्ल गोंड देशांत हजारोंवर वर्षांपासून आहेतच. कदाचित् हूणांच्या स्वाऱ्यांवेळीं मध्य आर्यदेशांतून तेथें आले कदाचित् त्याही पूर्वीं कुशानांच्या वेळीं आले कोणास ठाऊक. असो, हिंदुस्थानांत आर्य बाहेरून आले असें इतिहास म्हणतो पण कित्येक विद्वान्बहुश्रुत आमचे इतिहासकार अजून असें मानतात कीं आर्य हे हिंदुस्थानांत बाहेरून आले नाहींत ते मूळचे येथचेच त्यांचें मूळस्थान ध्रुवाजवळही नाही किंवा व्होल्गाप्रदेशांत नाहीं तर हिंदुस्थानच आर्यांचें मूलस्तान मग महोब्याचे चन्देल्ल जमीदार आपणास बुन्देलखन्डचेच मुळचे समजतात या गोष्टीला महत्व काय आणि त्या समजावरून चन्देल्ल गोंड मूळतः आहेत हें अनुमान कसें निघालें ?

चन्देल्लाची कुल देवता मन्यादेवी आहे यावरून ते गोंड आहेत असें जें स्मिथ अनुमान काढतो तेंही चुकीचें आहे. प्रत्येक रजपूत कुळास एक कुळदेवता देवी असल्ये हें सुप्रसिद्ध आहे. त्यांच्या गोत्राचारांत तिच्या नांवाचा वेदाबरोबर उच्चार असतो. आतां चन्देल्ल गोंडदेशांत प्रथम येऊन त्यांनीं जर मन्यागड येथील किल्ला घेऊन भोंवतालीं एक लहान राज्य स्थापिलें ही गोष्ट सहज सिद्ध होणारी असून आपण मानली तर त्यांच्या कुळदेवतेचें नांव मण्या देवी असावें यांत आश्चर्य करण्याजोगें कांहीं नाहीं; आतां स्मिथ ही देवी आणि गोंड देवता यांत साम्य असें जें म्हणतो त्यांत अर्थ नाहीं. तें साम्य कोणतें आहे हें न सांगितल्यामुळें अस्पष्ट आहे. पण आम्हीं यापुढें जाऊन ही देवी त्यांनीं गोंड लोकांपासून घेतली असें जरी म्हटलें तरी चन्देल्ल हे स्वतः गोंड होऊं शकत नाहींत. कारण आम्हीं पुष्कळ वेळां म्हटलेंच आहे कीं आर्यांनीं शिव आणि दुर्गा या देवता अनार्यांपासून म्हणजे हिंदुस्थानच्या मूळ रहिवाशांपासूनच घेतल्या आहेत. त्यांचा वैदिक देवतांशीं संबंध जोडून त्या त्यांनीं आपल्या केल्या आहेत. म्हणून मन्यादेवीचा चन्देल्लांचा पूजाप्रकार गोंड देवतांच्या पूजाप्रकाराशीं मिळता असल्यासही नवल नाहीं.

शेवटीं, सोळाव्या शतकांत मन्यागड येथें एक गोंड मांडलिक असल्याचें रासांत लिहिलें असल्यास त्याजवरून चन्देल्लांच्या मूळ उत्पत्तिसंबंधानें कोणतेंच अनुमान निघूं शकत नाहीं. कारण जेव्हां चन्देल्ल मन्यागडाहून महोब्यास गेले आणि तेथें त्यांनीं एक मोठें राज्य स्थापन केलें व ते ९ व्या शतकापासून १३ व्या शतकापर्यंत चाललें त्यांच्या राज्यमर्यादेनंतर मन्यागड येथें एक गोंड मांडलिक असल्यास त्यापासून काय निष्पन्न होणार?

राणी दुर्गावतीच्या गोष्टीवरून उलट अनुमान निघत असतां ती गोष्ट आपल्या कल्पनेच्या पुराव्यास स्मिथ घेतो हें आश्चर्य आहे. अबुलफझलच्या अकबरनाम्यांत तिच्याविषयीं पुढील हकीकत दिली आहे. (बीव्हरिजचा तर्जुमा व्हा. २ पा. ३२३ याच पुस्तकावरून बहुधा स्मिथनें ही गोष्ट घेतली असावी) "राथ आणि महोबाचा राजा सालवाहन यांची कन्या राणी दुर्गावती होय. हा राजा चन्देल्ल कुलींचा होता. अमानदासाचा पुत्र दलपत यास ती दिली होती. दलपताचें कुल जरी कमी दर्जाचें होतें तरी तो श्रीमंत असल्यामुळें आणि सालवाहनाची स्थिति खालावलेली असल्यामुळें असा संबंध करणें सालवाहनास भाग पडलें होतें." सदर ग्रंथकार आणखी पुढें म्हणतो. "प्राचीन काळापासून राढांच्या राजांचा दर्जा फार मोठा होता परंतु जमीन उत्पन्नाशिवाय त्यांस पैदास नव्हती. खर्जी ( दलपतचा आजा ) हा पेशकष नांवाखालीं पुष्कळ पैसा जमवूं लागला." शेवटीं पृष्ठ ३२८ वर असें सांगितलें आहे कीं दलपत हा खराखुरा गोविंददास कछवाहा याचा मुलगा असून तो संग्राम यानें उपजतांच आपल्या ओटींत घेतला आणि त्याचें नांव दलपत ठेविलें आणि राणी दुर्गावतीचें लग्न त्यांशीं झालें." या तीन उताऱ्यांवरून असें स्पष्ट दिसतें कीं अबुलफझल सुद्धां असें मानतो कीं, चन्देल्ल उच्च रजपूत असून त्यास आपली मुलगी गरिबीमुळें दलपतास देणें भाग पडलें. उत्तम रजपुतांच्या मुली जर राज्याच्या आशेनें मुसलमान बादशहांस दिलेल्या आपण इतिहासांत पाहतों मग गढामंडळाच्या एखाद्या श्रीमंत पण हीन कुळींच्या राजास सालवाहनानें आपली मुलगी दिली तर सालवाहनाच्या उच्च कुळीस त्यानें बट्टा येत नाहीं. ईश्वरभाव हा स्वभावच गुण

असल्यानें राजांस मुलगी देण्यास रजपूत मागें पुढें पहात नाहींत. मग ते मुसलमान कां असत ना ! ! ! पण उच्च कुळीचा अभिमान त्यांच्या मुली करतांना व्यक्त होतो व उत्तम कुळ पाहून ते मुलगी करतात. पण सर्वांत आश्चर्य हें कीं, दलपत गोंड असल्याचें येथें मुळींच वर्णन नाहीं. तो गोंड असता तरीही सालबाहनाच्या उच्च कुळीस बाध न येता. पण तो किंवा त्याचे पूर्वज गोंड होते असें येथें तरी वर्णन नाहीं. स्मिथनें ही कल्पना कोठून केली आहे समजत नाहीं. वरील वर्णनावरून दलपत हा रजपूतच दिसतो. कुळ हलकें असलें तरी तें श्रीमंत आणि सामर्थ्यवान् असून गड्डा व भोंवतालच्या प्रदेशावर राज्य करीत होतें. तिसरी गोष्ट ही कीं दलपतचें कुळ हलकें असलें तरी तो स्वतः उच्च कछवाह कुळांत जन्मून गढा कुळांत दत्तक आला होता तेव्हां सालबाहनानें त्यास आपली कन्या दिली याचें मुळींच आश्चर्य नको. आणि शेवटली गोष्ट ही कीं, राणी दुर्गावतीनें आपला श्रेष्ठ रजपूत कुळांतील जन्म आपल्या विलक्षण पराक्रमानें सिद्ध केला. तो दलपत मारला गेल्यानंतर ही स्वतः मोंगल सैन्याशीं शौर्यानें लढली आणि रणांगणावर अपजय होऊन जखमी झाली तेव्हां पुढील विपत्ति व अपमान टाळण्यासाठीं तिनें आपल्या हस्तें आपणास मारून घेतलें. वरील हकीकतीवरून राणी दुर्गावतीचें चरित्र तिच्या पित्याच्या कुलाचा सर्वतोपरी श्रेष्ठपणा सिद्ध करीत असतां स्मिथ याच गोष्टीवरून चन्देल्लांस गोंड ठरवूं पाहतो हें आश्चर्य नव्हे काय ?

# प्रकरण ८ वें.

## चेदी ऊर्फ त्रिपुरचे कलचूरी

क्षत्रिय कुलवृक्षाची हैहयनामक एक शाखा फार प्राचीन-कालापासून प्रसिद्ध आहे. ह्या शाखेची उत्पत्ति सहस्त्रार्जुनापासून मानण्यांत येते. पुराणांतरीं सहस्त्रार्जुनानें रावणाचा पराभव केल्याचे उल्लेख आहेत. हैहयकुलाचें वसतिस्थान फार प्राचीनकालापासून नर्मदातटाकची खोरीं, दऱ्या इत्यादि ठिकाणें आहेत. अयोध्येच्या सूर्यवंशी सगर राजाचा पराजय हैहयांनीं केला असें पौराणिक इतिहास सांगतो. तदनंतर लवकरच हैहयांनीं दाक्षिण कोसल ऊर्फ छात्तिसगड काबीज केलें व तें त्यांच्या ताब्यांत अगदीं अलीकडेपर्यंत म्हणजे नागपुरच्या भोसल्यांच्या काळापर्यंत होतें. ह्या इतिहासाच्या पहिल्या पुस्तकांत मध्यप्रांतांतील या हेहयांची थोडी माहिती दिलेली आहेच व त्याबरोबर चेदीच्या कल्चूरी शाखेच्या इतिहासाची रूपरेखाहि पण दर्शविली आहे. कलचूरी घराणें हेहयकुलाची एक शाखा आहे हें निर्विवाद होय. पण ह्या शाखेचा प्रादुर्भाव कधीं व कसा झाला हें निश्चित सांगतां येत नाहीं. त्याप्रमाणें कलचूरींनीं त्रिपुर ( म्हणजे अर्वाचीन जबलपूर ) येथें स्वतंत्र राज्य स्थापना कां व कधीं केली हेंहि गूढच आहे. कलचूरी घराण्याची शकमान पद्धति अगदीं स्वतंत्र आहे. ते विक्रम अगर शालिवाहन शक न मानतां स्वतांचा चेदी शक मानतात. किलहार्न साहेबांनीं चेदी शकाचा प्रारंभ इ. स. १४८ पासून निश्चित केला आहे. तसेंच हा चेदी शक कलचूरींच्या इतिहासांतून व दानपत्रांतून

१४ वे शतकाचे अखेर पावेतों आढळतो. म्हणजे कलचूरी घराणें फार प्राचीन कालापासून विख्यात होतें असें अनुमानितां येतें. चेदी शक हा पाश्चिम हिंदुस्तानांत म्हणजे गुजराथ व कोंकण प्रांतांत प्रचारांत होता, त्यावरून असें दिसतें कीं दाक्षिणच्या चालुक्य घराण्याचा उदय होण्यापूर्वीं पाश्चिमेकडील प्रांतांत कलचूरींचा उत्कर्ष झाला असावा. निदान शातवाहनानंतर आंध्र साम्राज्याचा बराचसा भाग त्यांच्या कबजांत असावा. कालंजर किल्ला त्यांचे ताब्यांत फार प्राचीन काळापासून होता असें दिसतें. हळू हळू त्यांचा प्रवेश पूर्वेकडील प्रदेशांतून झाला. व शेवटीं त्यांनीं यमुनेच्या कांठचा प्रदेश हस्तगत केला असावा असें त्यांच्या ' चेदी ' ह्या अन्वर्थक नांवावरून दिसतें.

कलचूरींचा निरनिराळ्या प्रांतांत कसकसा प्रवेश झाला त्याचें हें त्रोटक वर्णन होय. पण ९ व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या पूर्वीं कलचूरींची स्वतंत्र राजांत गणना होत असावी असें दिसत नाहीं. कलचूरींचें स्वतंत्र राज्य ९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत बनलें असावें. ह्या कुलाचें कलचुरी असेंच नांव कां पडलें हें ठरविणें बिकट आहे. इतिहासप्रसिद्ध कुलांची किंवा वंशांची उत्पत्ति अनेक प्रकारानें दिली जाते, पण ह्या सर्व प्रकारांच्या मुळाशीं बीजभूत तथ्य फारच अल्प प्रमाणानें सांपडतें. ह्या कुलाच्या नांवाचें असेंच आहे. नांवें सदा अन्वर्थक असतातच असें नाहीं. पुष्कळ वेळां कवि नांवावर चमत्कृति जनक श्लेषरचना कारितात व त्यामुळें नांवाच्या वस्तुत: काल्पनिक असलेल्या उत्पात्तिहि खऱ्या असाव्यां असें वाटूं लागतें. नांवावरून रचलेल्या श्लेषपूर्ण कथा अति प्राचीन कालापासून प्रचलीत आहेत. ऋग्वेदांत देखील अशा श्लेषजन्य कथा वर्णिलेल्या आढळतात. पण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें त्यांत तथ्य असतेंच

असें नाहीं; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कुलांच्या नांवाच्या अन्वर्थकतेचा विचार करणें फार प्रयासाचें काम आहे, इतकेंच काय पण अशा तऱ्हेचे परिश्रम घेतले तरी त्यांतून सत्यांश निघेलच असें नाहीं. तेव्हां नांवांच्या व्युत्पत्तीचा फार खोल विचार न करणेंच बरें; यास्तवच आम्हीं हैहय, चालुक्य, चाहमान ( चव्हाण ) किंवा प्रतिहारी किंवा कलचूरी हीं नांवें कशीं पडलीं असावीं याचा विचार केला नाहीं.– असो, कलचूरी घराण्याविषयीं दोन मुख्य लेख उपलब्ध असून ते किलहार्न साहेबांनीं एपि. इंडि. व्हॉ. १ पा. २६५ व व्हा. २ पा. ३०५ मध्यें छापिले आहेत. त्यांचीं नांवें बिलहारी शिलालेख व बनारस ताम्रपटलेख अशीं आहेत; त्यावरून असें दिसतें कीं, कलचूरी वंशांत ८५० चे सुमारास कोक्कल नांवाचा एक विख्यात वीर पुरुष होऊन गेला. ह्या कोक्कलाची व त्याच्या वंशजांची हकीकत किलहॉर्न साहेबांनीं एपि. इंडि० च्या दुसऱ्या भागांत लिहिली आहे. ती लक्षांत घेऊन व त्यांत नवीन उपलब्ध झालेल्या माहीतीची भर टाकून खालील हकीकत आम्हीं देत आहों.

वरील लेखांतून कोक्कल देवाचें अत्यंत स्तुतिपर वर्णन केलें आहे. उत्तेरकडील भोजराजा व दक्षिणेकडील वल्लभराज हेच कोणीं नृपरूप जयस्तंभ त्यानें उभारले असें कोक्कलाविषयीं म्हटलें आहे. त्याचा अर्थ असा कीं, कोक्कलदेव इतका पराक्रमी होता कीं, त्यापुढें भोजराजाचें किंवा वल्लभराजाचें कांहीं एक चालत नसून उलट कोक्कल सम्राट् असून भोजादिराजे त्याचे मांडलिक होते. हा भोज म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून कनोजचा प्रसिद्ध मिहिर भोज होय. भोजाचे निश्चित लेख इ० स० ८६२–७६–८२ असे आहेत. वल्लभराज म्हणजे राष्ट्रकूटांचा राजा दुसरा कृष्ण होय व त्याचा काल इ० स० ८७५ ते ९११ असा आहे. कोक्कल राजानें चित्र-

कूटाच्या हर्षराजास मदत करण्याचें अश्वासन दिलें होतें वगैरेचा उल्लेख मागें आलाच आहे. तसेंच कोक्कल राजास वरील लेखांत त्रिकलिंगाधिपति म्हटलें आहे. असो, या लेखांतून कोक्कलराजाची अतिशय स्तुति केलेली असली तरी त्यानें भोजराजाचा किंवा कृष्ण-राजासारख्या वीर्यशाली राजांचा पाडाव केला असेल असें वाटत नाहीं. कदाचित् भोजराजाच्या व कृष्णराजाच्या दृढमैत्रीमुळें कोक्कल्लास त्याकाळीं फार महत्त्व मिळालें असेल. कोक्कलाचा वरील राजांशीं नुसता मैत्रीभावच नसून नात्याचाही संबंध होता. कोक्कल राजाची कन्या ही कृष्णराजाची पट्टराणी होती; कदाचित् कोक्कलाची दुसरी कन्या भोजराजास दिलेली असेल; स्वतः कोक्कलाचा विवाह चंदेल्ल हर्षाच्या ' नट्टा ' नामक बहिणीबरोबर झाला होता. हैहयांची गणना उच्च दर्जाच्या क्षत्रियांत होत असल्यामुळें ज्या त्या राजघराण्यास हैहयांशीं संबंध जोडावा असें वाटे. सातव्या, आठव्या व पुढच्या शतकांतून देखील दक्षिणच्या दोन्हीं चालुक्य घराण्यांचा हैहयांशीं संबंध जोडलेला आढळतो. १२ व्या शतकांत देखील प्रसिद्ध क्षत्रिय कुळें हैहयांशीं संबंध जोडण्यास उत्सुक असत. पृथ्वीराज चव्हाणानें हैहयांपैकीं एक कन्या वरिली होती. एकंदरीनें विचार करितां कोक्कलराजास त्या काळीं बरेंच महत्त्व प्राप्त झालें होतें हें निर्विवाद होय. पण त्याचें कारण कोक्कल राजाचा अनुपम पराक्रम नसून त्याचा निरनिराळ्या वैभवशाली राजपुरुषांशीं जमलेला स्नेहाचा व नात्याचा किंवा सोइरगितीचा संबंध होय. तेव्हां लेखांतून वर्णिलेलें कोक्कलांचें महत्त्व जरी खरें मानिलें तरी त्याचें कारण लेखांत दिलेल्याहून निराळेंच मानिलें पाहिजे.

कोक्कलानंतर त्याचा मुलगा मुग्धतुंग उर्फ प्रसिद्धधवल ( अगर

धवल ) हा गादीवर बसला. त्याला बालवर्ष व केयूरवर्ष असे दोन मुलगे होते. मुग्धतुंगानंतर बालवर्षानें फारच थोडे दिवस राज्य केलें व मग केयूरवर्ष गादीवर बसला. त्याच्या राणीचें नांव नोहलादेवी असून ती चालुक्य सामंताची कन्या होती. बिल्हारीलेखांत पहिला चालुक्य भारद्वाज गोत्री द्रोणाच्या चुळक्यापासून उत्पन्न झाला अशी चालुक्यवंशाच्या उत्पत्तीची दन्तकथा दिलेली आहे. पण तिचा पूर्वीं विचार केलाच आहे. नोहलादेवीनें एक शिवमंदीर बांधविलें. त्या देवालयाचें नांव नोहलेश्वर असें साहजिकच ठेविलें. या देवळाचे व्यवस्थेकरितां देऊं केलेल्या ग्रामांचा दानलेख देवालयांत कोरलेला मिळाला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, बौद्ध भिक्षु ज्याप्रमाणें विहारांतून राहत असत त्याप्रमाणेंच लकुलीशमतानुसारी शिवोपासक संन्यासी मठ व मंदिरें यांत या वेळींही राहात असत. ह्या सुमारास बौद्धमताच्या ऱ्हासास सुरवात झाली असल्यामुळें बहुतेक रजपूत राजे शिवोपासक असून ते " आगम वेद " अत्यंत प्रमाणभूत मानीत. या काळच्या धर्मसमजुतीविषयीं विवेचन स्वतंत्र प्रकरणांत आलेलें असल्यामुळें येथें फक्त तद्विषयक दिग्दर्शन केलें आहे.

केयूरवर्षाचेंच युवराज असें दुसरें नांव होतें. चंदेल्ललेखांवरून असें दिसतें कीं, त्याचा पराभव एका चंदेल्लराजानें केला होता. केयूरवर्षानंतर त्याचा मुलगा लक्ष्मण राज्य करूं लागला. त्याचे राणीचें नांव राहडा असें होतें. त्यास बोथादेवी नामक कन्या होती; तिचा विवाह उत्तर चालुक्य वंशांत झाला व तिला जो मुलगा जाहला तोच प्रसिद्ध तैलप चालुक्य होय. त्याचा काळ इ. स. ९७३ असा आहे. लक्ष्मणानंतर त्याचा पहिला मुलगा शांकरायण व तदनंतर लक्ष्मणाचा दुसरा मुलगा ( दुसरा ) युवराज राज्य करूं

लागला. युवराज व मुंज हे समकालीन होते. ( इ. स. ९७४, ९७९, ९९३ ). युवराजाचा मुलगा दुसरा कोक्कलराज होय. कोक्कलराजानंतर गांगेयदेव राजा झाला. ह्या कुलांत अत्यंत प्रसिद्धीस आलेला राजा हाच होय. पण त्याच्या कारकीर्दीचा काळ १००० च्या पुढें असल्यामुळें तिचें वर्णन पुढील भागांत करणें युक्त होईल. वरील हकिकतीवरून हें स्पष्ट आहे कीं, कलचूरी क्षत्रिय हे नवीन आलेले किंवा बनावटी क्षत्रिय नसून त्यांचें कुल हें फार प्राचीनकालापासून अस्तित्वांत आहे. त्याचा इ. स. ८९० पासून विशेष उत्कर्ष झाला असें दिसतें. हें कुळ पूर्वींपासून अस्सल क्षत्रियांत मोडत असे. त्यामुळें त्याचे इतर बऱ्याच प्रसिद्ध अशा क्षत्रिय कुलांशीं सोइरगतीचे संबंध झाले व हेंच त्या वंशाच्या वैभवाचें मूळ कारण होय. ह्या कुलांत गांगेय नांवाचा अति प्रसिद्ध राजा झाला व गांगेयानंतर हें कूळ वैभवाच्या शिखरावर चढलें. बहुधा त्याचें कारण असें असावें कीं, महंमदाच्या स्वारीनंतर कनोजला पक्कीच उतरती कळा लागली असल्यामुळें तिचा फायदा कलचूरी घराण्यास मिळाला. कलचूरीघराणें निस्सीम शिवोपासक होतें निरनिराळ्या राजांचे काळ जरी निश्चित नाहींत तरी बरीच विश्वसनीय अशी कलचूरीवंशाची गांगेयापर्यंत वंशावळ देऊन हें प्रकरण संपवूं. वंशावळीचा क्रम बरोबर आहे पण कारकीर्दीचीं वर्षें निश्चित नाहींत हें मांगणें नलगे.

---

## कलचूरी घराणें.—वंशावळ.

१ कोक्कलदेव इ. स. ८५०

२ मुग्धतुंग ऊर्फ प्रसिद्धधवल इ. स. ९००

३ बालहर्ष; ४ केयूरवर्ष ऊर्फ युवराज इ. स. ९२५ (लग्न-नोहलादेवी)

५ लक्ष्मणदेव इ. स. ९५०

६ शंकरगण इ. स. ९७० ७ युवराजदेव (मुंजराजाचा समकालीन) इ. स. ९८०

८ कोक्कलदेव (दुसरा) इ. स. १०००

गांगेयदेव इ. स. १०२०

# प्रकरण ९ वें

## बंगाल अथवा मोंगीरचे पाल.

हिंदुस्तानच्या इतिहासाच्या मध्ययुगीन कालाच्या दुसऱ्या भागाच्या ( इ. स. ८०० ते १००० ) इतिहासाचें आतांपर्यंत जें वर्णन आम्हीं दिलें आहे त्यांत मुख्यत्वेंकरून राजपुताना व मध्य-हिंदुस्थान येथें उदयास आलेल्या रजपूत राज्यांचाच विचार झालेला आहे. ह्या निरनिराळ्या राज्यांचे संस्थापक व चालक हिंदुधर्मानुयायी बहुधा शिवोपासक क्षत्रिय रजपूत वीर होते. व आरबांशीं लढण्यांत त्यांनीं जें शौर्य दाखविलें व यश संपादिलें त्यामुळें त्यांचा उदय होऊन त्यांचीं राज्यें भरभराट पावलीं. राजपुतान्याप्रमाणें अन्यत्रही म्हणजे बंगाल व महाराष्ट्र येथें रजपूत राज्यांची स्थापना याच कालांत झाली. पण त्याचीं कारणें निराळीं होतीं. हे प्रांत सिंधप्रांतापासून दूर असल्यामुळें येथील रजपूत वीरांस आरबांविरुद्ध लढावें लागलें नाहीं तर पूर्वींचीं आधींच मोडकळीस आलेलीं राज्यें पादाक्रांत करून तेथें नवीन बलिष्ठ राज्यांची स्थापना क्षत्रिय वीरांनीं केली. अशा तऱ्हेनें उदय पावलेल्या राजकुलांत बंगालचें पाल घराणें व दक्षिणेंतील राष्ट्रकूटांचें घराणें हीं मुख्य आहेत.

ह्या कालाचा अभ्यास करितांना एक विशेष गोष्ट नजरेस येते ती अशी कीं, आज इंग्रजांच्या एकछत्री अमलाखालीं राज्यशासनाचे व्यवस्थेकरितां हिंदुस्थान देशाचे जे निरनिराळे विभाग पाडावे लागले आहेत त्याच विभागांत पूर्वीं निरनिराळीं स्वतंत्र राज्यें स्थापिलीं

गेलीं. ह्याचें कारण त्या त्या प्रांताची विशिष्ट भूरचना, हवामान, लोकस्थिति, भाषाभिन्नत्व व निरनिराळे आचार हें असावें. सध्यांचे युनाइटेड प्रॉव्हिन्सेस व औंधप्रांत मिळून पूर्वींचें कनोजचें राज्य होतें. गंगेच्या कांठचा प्रदेश कनोजच्या राज्यांत मोडत असे. राजपुताना व मध्यहिंदुस्थानांत अनेक स्वतंत्र राज्यें असत, पण हल्लीं-प्रमाणेंच त्या प्रांताचा व इतर प्रांताचा संबंध फार थोडा असे. बंगाल व महाराष्ट्र हे प्रदेश देखील वरील प्रदेशांपासून अलग असल्यामुळें येथें स्वतंत्र राज्यस्थापना होणें अगदीं साहजिक होय; व त्याप्रमाणें ह्या कालांत त्या ठिकाणीं स्वतंत्र राज्यें उदयास आलीं; व पाल घराण्यानें अखिल बंगालप्रांताचें एक बलिष्ठ राष्ट्र बनविलें.

पालवंशाच्या उदयाचा व उत्कर्षाचा इतिहास त्यांच्या लिखितांतून वगैरे उत्कृष्ट तऱ्हेनें दिलेला आढळतो. अशा तऱ्हेचा इतिहास इतर घराण्यांतून इतक्या सुंदर रीतीनें दिलेला आढळत नाहीं. पालवंशाच्या दानपत्रादिकांवरून असें दिसतें कीं, हर्षराजाच्या निधनानंतर कनोजच्या साम्राज्यास विस्कळितपणा प्राप्त झाला, व बंगालमध्यें एकछत्री अंमल मोडून निरानिराळीं अनेक संस्थानें स्थापन झालीं. ह्या संस्थानांत परस्पर वैरभाव असल्यामुळें बंगाल-प्रांतांत एकसारखी बंडाळी सुरू असे. तरीपण वर्मा घराण्यांतील यशोवर्म्याच्या कारकीर्दींत बंगाल प्रांतांतील गौडराजाचा पाडाव होऊन बंगालचा कांहीं प्रान्त पूर्ववत् कनोजचा अंकित झाला. परंतु आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत कनोजची सत्ता पुनः क्षीण होऊं लागली. गौडांत सर्वत्र बेबंदशाही पुनः सुरू झाली. धर्मपाल राजाच्या खालिमपूर लेखांवरून असें दिसतें कीं, बंगाल्यांत तर त्यावेळीं ह्या अंदाधुंदीस भीषण स्वरूप प्राप्त झालें. त्या प्रांतांतील सरदारांच्या एकमेकांशीं एकसारख्या चकमकी झडत असत व

त्यामुळें समुद्रांतील माशाच्या न्यायाची ( बलिष्ठानें कनिष्ठास खावें याची ) उपमा ह्या चकमकीस सदर लेखांत दिली आहे. सरते शेवटीं सर्व सरदारांनीं आपसांत तडजोड जमवून आणिली व गोपालराजास बंगालचें आधिपत्य दिलें. गोपालराजा शूर व मुत्सद्दी असल्यामुळें त्यानें लगेच बंडाळी मोडून सर्वत्र शांतता प्रस्थापित केली. त्यानें पाटलीपुत्र येथें आपली राजधानी प्रथम स्थापन करून नंतर मोंगीर ऊर्फ मुद्गगिरि हें आपल्या राजधानीचें कायमचें ठिकाण केलें. तदनंतर लवकरच त्याच्या राज्याचा विस्तार सबंध बंगालप्रांतभर झाला. इतकेंच नव्हे तर मगधप्रांताची गणना बंगालच्या राज्यांत होऊं लागली. मगध हा प्रांत वारंवार बंगालच्या राज्यांत सामील होतांना आपण पाहिलेंच आहे. ( हल्लींही तो सामील होता पण आतां बिहार प्रान्त निराळा झाला आहे ).

मगध व गौड प्रांतांत बौद्ध धर्माचें विशेष प्राबल्य पूर्वींपासून असल्यामुळें गोपालराजा बुद्धधर्मानुयायी होता यांत नवल नाहीं. मगध प्रांतावर माधवगुप्त ज्यावेळीं राज्य करीत होता त्यावेळीं मगध प्रांतांत पुनः हिंदुधर्माची संस्थापना झाली होती. कर्णसुवर्ण देशाच्या शशांक राजाचेंही हिंदुधर्मसंस्थापनेंत विशेष महत्त्व आहे. पण तत्पूर्वीं ह्या प्रांतांतून बौद्धधर्मास विशेष मान असे. किंबहुना मगध प्रांतांतच बुद्ध धर्माचा प्रथम उदय व उत्कर्ष झाला असल्यामुळें ह्या प्रांतांतून त्या धर्ममताचें प्राबल्य विशेष असे. व त्याचा पुन्हां पुन्हां तेथें उत्कर्ष होत असल्यानें त्या मताचा तेथें उच्छेदही होण्यास बराच काळ लागावा हें युक्तच होय. गोपालराजा बुद्धमतानुयायी असला तरी त्यास वर्णाश्रमधर्म संमत असे व तो आपणांस सूर्यवंशी क्षत्रिय म्हणवीत असे. प्रारंभीं प्रारंभी बौद्धधर्माचा वर्णाश्रमधर्मसंस्थेविरुद्ध विशेष कटाक्ष असे; परंतु पुढें पुढें बौद्धधर्मानुयायी वर्णा-

श्रमधर्मास मानूं लागले. निदान वर्णाश्रमधर्माची घडी विस्कळीत करण्याचा त्यांनीं पुढें प्रयत्न केला नाहीं. ह्या बुद्धमतानुयायी राजांच्या दानपत्रांदिकांवरून असें दिसतें कीं, त्यांना वर्णाश्रमधर्मव्यवस्था संमत असे, इतकेंच नव्हे तर ते स्वतः त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवीत असत. ते ब्राह्मणांचा मान राखीत व त्यांस बहुमानपुरस्सर देणग्या देत असत. गोपालराजाच्या कारकीर्दींत वैदिक धर्ममतानुयायांस विशेष त्रास झाला नाहीं. त्याचे मंत्री व प्रजा बहुतांशीं वैदिकधर्म मानणारी होती तरी त्या सर्वांस त्याची कारकीर्द सुखमय झाली. कांहीं इतिहासकार गोपालराजाचा कनोजच्या प्रतिहारी वंशाच्या ' पाल ' शाखेशीं संबंध जोडतात. परंतु हें त्यांचें म्हणणें संभवनीय दिसत नाहीं. कारण स्मृत्यादिक ग्रंथांतून पाल ( रक्षणकर्ता ), गोप किंवा त्राता किंवा तत्समानार्थी शब्द क्षत्रियांच्या नांवाच्या शेवटीं असावेत, त्यायोगें तें नांव अन्वर्थक होतें असें सांगितलें आहे; व तदनुसार पुष्कळ क्षत्रियकुलांच्या नांवाच्या शेवटीं पाल हा शब्द आढळतो. तेव्हां गोपाल हा क्षत्रिय असावा हें " पाल " या शब्दावरून उघड दिसतें. दुसरें असें कीं, प्रतिहारीनंतर पाल प्रसिद्धीस आले नसून पाल व प्रतिहारी घराणीं हीं एकाच वेळीं उदयास आलीं असें पुढें दिसेल तेव्हां त्यांचा परस्पर संबंध असणें शक्य नाहीं असें वाटतें.

आतां पाल घराण्याच्या वंशक्रमाचा विचार करूं. आजतागायत उपलब्ध असलेल्या सर्व शिलालेखांचा विचार करून तिसऱ्या विग्रहराजाच्या " आमगाच्छी " ताम्रपटांचा विवेचन करणारा एक लेख कीलहार्नसाहेबांनीं लिहीला आहे. ह्या लेखांत पाल घराण्यांची वंशावळ दिली आहे. ह्या वंशावळींत राजांचा अनुक्रमही सांगितला आहे, व प्रत्येक राजाच्या कारकीर्दीचीं वर्षेंही सांगितलीं आहेत.

पण त्यावरून अमुक राजाचा राज्यारोहणशक अमुक हें मात्र ठरवितां येत नाहीं. कारण या दानपत्रांतून कोणताच शक वापरला नसून त्यांत केवळ राजाचें राज्यमानशकवर्ष वापरलें आहे. निश्चित काल ठरविण्यास ही मोठी अडचण आहे. तथापि ज्या कारणांनीं उत्तर हिंदुस्थानांत विक्रम संवत् पुढें आला तीं कारणें बंगालला लागू पडत नाहींत हें निष्पन्न होतें. असो, किलहार्नसाहेबांनीं दिलेली वंशावळ आधारास घेऊन आह्मी पुढील हकीकत लिहीत आहोंत. व तत्कालीन इतर प्रमाणांवरून त्या त्या राजांचा काल ठोकळ मानानें आम्हीं निश्चित करणार आहोंत.

गोपालराजापासूनच पालघराण्याची संस्थापना झाली असल्यामुळें गोपालराजाचा बाप व आजा यांचा इतिहास वगळला तरी चालण्याजोगें आहे. लोकांच्या इच्छेनुसार गोपालराजासच प्रथमतः बंगालचें स्वामित्व मिळालें. पाल घराण्याचा तो पहिला राजा होय. गोपालराजास पश्चिमेकडील वत्सराजाशीं, तसेंच कनोजच्या वर्मइंद्रायुधाशीं व राष्ट्रकूटांच्या तिसऱ्या गोविंदराजाशीं युद्ध करावें लागलें असावें असें मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. तेव्हां गोविंदराज इत्यादिकांचा काल लक्षांत घेतां गोपालराजाची कारकीर्द इ. स. ७८० ते ८०० पर्यंत धरावयास हरकत नाहीं.*

गोपालानंतर त्याचा मुलगा धर्मपाल गादीवर बसला. धर्मपालाची राणी राष्ट्रकूट घराण्यांतलि होती. खालिमपूर व भागलपूर दानपत्रांवरून असें दिसतें कीं, धर्मपालानें कनोजच्या सम्राट् इंद्र-

* जैन ग्रंथाच्या शेवटच्या उल्लेखांत आलेल्या वत्सराजादिकांबरोबर " पूर्वेस अवन्तिभूपति राज्य करीत होता " असा उल्लेख आहे. त्याचा असा अर्थ लावणें शक्य आहे कीं, गोपालचें दुसरें नांव अवन्ति भूपति असावें.

राजाचा पाडाव करून कनोजच्या राज्यपदावर चक्रायुधाची स्थापना केली. ह्यावरून असें ठरतें कीं, धर्मपालाची कारकीर्द इ. स. ८०० ते ८२५ पावेतों असावी. वत्सराजाचा मुलगा नागभट यानें चक्रायुधाचा पराजय करून कनोजचें सम्राटपद स्वतः मळकाविलें हें पूर्वीं आलेंच आहे. अर्थात् नागभटाला कनोज हस्तगत करण्यापूर्वीं धर्मपालाचा पराभव करावा लागला असावा हें उघड आहे. धर्मपालाची बाजू घेऊन राष्ट्रकूटाच्या तिसऱ्या गोविंद राजानें नागभटाचा पराभव केला. पण त्यास नागभटाला कनोजच्या सम्राटपदावरून हुसकवतां आलें नाहीं. गोविंदराज धर्मपालाचे मदतीस येण्याचें असें कारण दिसतें कीं, धर्मपाल हा गोविंदराजाचा जांवई असावा. भागलपूर लेखावरून ( इंडि. अंटि. भा. २१ पा. २५० ) असें दिसतें कीं, धर्मपालाची राणी रणदेवी ही राष्ट्रकूटांच्या परबल नामक राजाची कन्या होती; आणि परबल म्हणजेच गोविंदराज होय असें किल्हार्नसाहेबांनीं सिद्ध केलें आहे. तेव्हां धर्मपालाच्या मदतीस गोविंदराज धावून गेला हें युक्तच ठरतें. गोविंदराजाकडून पराभव झाला असल्याकारणानें नागभटाकडून बंगालच्या राज्यास उपद्रव झाला नाहीं.

धर्मपालानंतर त्याचा पुतण्या देवपाल गादीवर बसला. त्याची कारकीर्द इ. स. ८२५ ते ८५० पावेतों भरण्यास हरकत नाहीं. देवपालानंतर त्याचा पुतण्या पहिला विग्रहपाल गादीवर बसला. एका दानपत्रांत देवपालास धर्मपालाचा पुतण्या असें संबोधिलें आहे तर दुसऱ्यांत त्यास धर्मपालाची पत्नी रणदेवी हिचा मुलगा असें म्हटलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, धर्मपाल व देवपाल हे दोघेही निपुत्रिक असल्यामुळें त्यांनीं आपल्या पुतण्यांस दत्तक घेऊन गादीचा वारस केलें असावें. विग्रहपालाचा विवाह हैहयकुलांतील लज्जानामक राज-

कन्येशीं झाला असें भागलपूर लेखावरून दिसतें. विग्रहपालाची कारकीर्द इ. स. ८५० ते ८७५ पावेतों धरावी. विग्रहपालानंतर त्याचा मुलगा नारायणपालदेव गादीवर आला. याच्याच कारकीर्दींत भागलपूर दानलेख लिहिला गेला. भागलपूर लेखावरून नारायण-पालाचा काल ठरवितां येत नाहीं; कारण त्यांतील कालमानपद्धति शकावर अवलंबून नसून त्या घराण्यांतील राजांच्या कारकीर्दींच्या वर्षसंख्येप्रमाणें दिली आहे. नारायणपालानंतर राज्यपाल राज्यारूढ झाला. त्याचा विवाह राष्ट्रकूटांच्या तुंग ऊर्फ जगत्तुंग राजाच्या भाग्यवती नामक कन्येशीं झाला. राज्यपालानें इ. स. ९२५ पर्यंत राज्य केलें व नंतर त्याचा मुलगा( दुसरा ) गोपालराज राज्य करूं लागला. त्याची कारकीर्द इ. स. ९२५ ते ९५० पर्यंत धरण्यास हरकत नाहीं. गोपालानंतर दुसरा विग्रहपाल ( इ. स. ९५०–९७६ ) राज्य करूं लागला व त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा महीपाल गादीवर बसला. ह्या महीपालाच्याच कारकीर्दींत सारनाथ दानपत्र दिलें गेलें. ह्या सारनाथपत्रावरच काय तो विक्रम संवत् दिलेला आहे. त्यावरून असें दिसतें कीं, हें दानपत्र वि० सं. १०८३ म्हणजे इ. स. १०२६ सालीं लिहिलें असावें. आह्मीं प्रत्येक राजाची कारकीर्द अदमासें २५ वर्षांची धरिली आहे त्या दृष्टीनें पाहतां महीपालाची कारकीर्द इ. स. १००० मध्यें संपावयास हवी व हें दानपत्र १०२६ सालीं म्हणजे २६ वर्षांनंतर देण्यांत आलें आहे. हीं २६ वर्षें मागें होऊन गेलेल्या ९ राजांच्या कारकीर्दींत वांटलीं तर प्रत्येक राजाची कारकीर्द तीन तीन वर्षांनीं वाढते. महीपालाच्या कारकीर्दीच्या अखेर अखेर हें दानपत्र दिलें असावें असें धरून वरील अनुमान घेणें आहे. कदाचित् असेंही असूं शकेल कीं, एकाच राजाची कारकीर्द २५ किंवा २८ वर्षांहून अधिक वर्षांची

असेल. परंतु सारासार दृष्टीनें विचार करितां ती महीपालाचीच असावी असें आह्मांस वाटतें. असो. ह्या दानपत्रावरून असें दिसतें कीं, महीपालास त्याच्या शत्रूंनीं जरी स्थानभ्रष्ट केलें तरी आपल्या पराक्रमाच्या जोरावर तो आपलें पैतृक राज्य पुन्हां मिळवूं शकला. दानपत्रांत सांगितलेले हे महीपालाचे शत्रु कोण हें नक्की ठरवितां येत नाहीं. कदाचित् गजनीच्या महमुदाच्या स्वाऱ्यांनीं हिंदुस्तानची जी दुर्दशा उडविली त्या स्वाऱ्यांच्या फेऱ्यांत हा महीपाल दूरच्या प्रदेशांत असला तरी सांपडला असावा. पण त्याचा विचार आम्हीं पुढील पुस्तकांत करणार आहोंत. पालघराण्याचा ऱ्हास यापुढें लवकरच झाला व त्याचे जागीं 'सेन' घराणें राज्य करूं लागलें. पण कालमानानें विचार करितां पाल घराण्याच्या ऱ्हासाच्या कारणादिकांचा वगैरे विचार पुढील भागांत टाकिल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

महीपालाचेनंतर नयपाल गादीवर बसला व तदनंतर दुसरा विग्रहपाल राज्य करूं लागला. ह्यानेंच आमगाच्छि दानपत्र दिलें आहे; व ह्याच दानपत्रावर किल्हार्नसाहेबांनीं मननीय टिप्पणी लिहिली आहे. ह्या दानपत्रादिकांचा विचार करितां पालघराणें अस्सल क्षत्रियांत मोडत असे हें उघड दिसतें. ह्या घराण्याचे विवाहादिक संबंध दक्षिणच्या राष्ट्रकूटाशीं व चेदीच्या हैहयाशीं झालेले आहेत त्यावरून हेंच दिसतें. ह्या घराण्याचे प्रारंभीचे पुरुष जरी बौद्धमतानुयायी होते तरी पण लवकरच हें घराणें शिवोपासकांत मोडूं लागलें. पालांनीं शिवमंदिरांकरितां अनेक देणग्या दिल्याचा उल्लेख वरील दानपत्रांतून सांपडतो. तसेंच त्या काळीं प्रचलित असलेल्या लकुलीश मताप्रमाणें वागणाऱ्या शिवागम संप्रदायी संन्याशांचा ते चांगलाच परामर्ष घेत असत. भागलपूर दानपत्रांत तर असें लिहिलें आहे कीं, नारायणपालाचा पिता सौगत मतानुयायी असला तरी स्वतः नारायण-

पाल शिवोपासक होता व त्यानें एक हजारावर शिवमंदिरांची स्थापना केली. ( —स्वयंकारित सहस्रायतनस्य तत्र तत्र भगवतः शिवभट्टारकस्य पाशुपत आचार्य परिषदश्च........पूजाबलिचरु.... इ० ). ह्या दानपत्रावरून आणखी एक विशेष गोष्ट दिसून येते ती ही कीं, पालांनीं राज्यनियंत्रणपद्धतींत इतरांच्याहून अधिक सुधारणा घडवून आणिली होती. पण त्याबरोबरच एका हानि-कारक पद्धतीचा त्यांच्या सैन्यव्यवस्थेंत प्रवेश झाला. ती पद्धति म्हटली म्हणजे राज्यसंरक्षणाकरितां परकीयांचें भाडोत्री सैन्य उभा-रणें ही होय. हिंदुस्थानच्या परवशतेच्या मूळाशीं हीं पद्धति बहुतांशीं आहे असें ह्मणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. भाडोत्री सैन्यांत राष्ट्राभिमान तितपतच असतो; अशा भाडोत्री सैन्याच्या जोरावर परकीयांनीं हिंदुस्थानांत आपला अंमल बसविला. परंतु राज्य व सैन्य व्यवस्थेचा विचार आह्मी एका स्वतंत्र प्रकरणांत करणार असल्यामुळें तूर्त इतकेंच पुरे.

आतां पालघराण्याच्या राज्यविस्ताराचें थोडक्यांत दिग्दर्शन करूं. अर्वाचीन सर्व बंगालप्रांत, बहार तसेंच आसाम हे प्रान्त पालां-च्या आधीन असत. भागलपूर लेखांवरून असें दिसतें कीं, पालांनीं उत्कल व कामरूप ( प्राग्ज्योतिष ) ऊर्फ आसाम हे प्रांत जिंकले होते. खालिमपूर दानपत्रावरून असें दिसतें कीं, मगध व बहार हे प्रांत पालांनीं अगदीं प्रारंभींच हस्तगत केले होते. गोपालराजाच्या वेळीं बंगाल प्रांताचे पश्चिम व पूर्व, गौड व वंग असे विभाग प्रसिद्ध होते. पुढें पुढें ह्या विभागांचा उल्लेख येत नसल्यामुळें हे दोन्हीं विभाग एकछत्री अमलाखालीं एकवटले असावेत असें सहजच अनुमान निघतें.

पाल व सेन घराण्यांचा हल्लीं उपलब्ध असलेला इतिहास दंत-

कथात्मक नसून त्यास विश्वसनीय प्रमाणांचा आधार सांपडतो. दन्तकथांतून आदिसूरादिक अनेक राजांच्या कथा वर्णिलेल्या आढळतात; पण त्या इतिहासदृष्ट्या विश्वसनीय दिसत नसल्यामुळें त्यांचा ह्या प्रकरणांत आम्हीं समावेश केला नाहीं.

शेवटीं पालराजांची वंशावळ देऊन हें प्रकरण पुरें करूं. यांत राजांच्या कारकीर्दींचीं वर्षें ठोकळमानानें दिलेलीं आहेत. अर्थात् विश्वसनीय माहिती पुढें मिळाली तर या कारकीर्दींच्या वर्षसंख्येंत फेर पडेल.

## वंगालचे पालराजांची वंशावळ.

१ गोपाल ( इ. स. ७८०–८०० )
|
धर्मपाल ( इ. स. ८००–८२५ )
|
देवपाल ( दत्तक पुतण्या ) ( इ. स. ८२५–८५० )
|
विग्रहपाल ( दत्तक पुतण्या ) ( इ. स. ८५०–८७५ )
|
नारायणपाल ( इ. स. ८७५–९०० )
|
राज्यपाल ( ९००–९२५ )
|
गोपाल ( दुसरा ) ( ९२५–९५० )
|
विग्रहपाल ( दुसरा ) ( ९५०–९७६ )
|
महीपाल ( वि. सं. १०८३ म्हणजे इ. स. १०२५ सालीं ह्यानें दिलेलें दानपत्र प्रसिद्ध झालें आहे.

# प्रकरण दहावें.

## दक्षिणचे राष्ट्रकूट

राष्ट्रकूटांची उत्पत्ति सामान्यतः यदुकुलापासून मानण्यांत येते; परंतु वर्धातास्रपटांत राष्ट्रकूटांची उत्पत्तीची निराळीच हकीकत दिलेली आहे. चंद्रवंशाच्या सात्यकीशाखेंत रट्टा नामक राजकन्या असून तिला जो मुलगा झाला त्याचे नांव राष्ट्रकूट असें होतें. हाच राष्ट्रकूटांचा मूळपुरुष असल्यामुळें त्याच्या कुलास राष्ट्रकूट असें म्हणत अशा तऱ्हेची हकीकत सदर लेखांत सांपडते; पण ती खरी नसावी. कारण देशपांडे " या नांवाप्रमाणें 'राष्ट्रकूट' हें नांव अधिकारपरत्वें प्राप्त झालें असावें हें पूर्वीं सांगितलेंच आहे. असो; उपलब्ध झालेले लेख पाहतां राष्ट्रकूटांचे पहिले राजे गोविंद, कर्क (दुसरा) व इंद्र असे असावे. डॉ. भाण्डारकर म्हणतात कीं गोविंदराजापूर्वीं दन्तिवर्मन् व इंद्रराज हे राजे होऊन गेले. राष्ट्रकूटांच्या लेखांतून या गोविंदादिकाविषयीं फारशी माहिती दिलेली नाहीं. परंतु त्यांच्या शौर्याची, न्यायप्रियतेची व दातृत्वाची विशेष स्तुति केलेली आढळते.

इंद्रराजाचा एका शलिक्य (चालुक्य) कन्येशीं विवाह जाहला होता असें लेखावरून दिसतें; (राज्ञी सोमन्वयी तस्य पितृतश्च शलिक्यजा). पण इंद्रराजानंतर चालुक्यघराण्याशीं राष्ट्रकूटांचा स्नेहभाव राहिला नाहीं. राष्ट्रकूटांच्या उपलब्ध असलेल्या लेखांत सामनगडचे ताम्रपट प्राचीन होय. त्यावरून वरील राजांच्या काळाचा मेळ बसवतां येतो. हा लेख शके ६७९ म्हणजे इ. स.

७९३ मध्यें दन्तिदुर्गाच्या कारकीर्दींत लिहिला गेला. ह्या दन्तिदुर्गापूर्वीं तीन राजे होऊन गेले असावेत; म्हणजे प्रत्येक राजाची कारकीर्द २५ वर्षांची धरिली असतां गोविंदराजाचा काळ इ. स. ६६० असा ठरतो व कर्क व इंद्रराज यांचे काळ इ. स. ६८५ व ७१० असे धरावे लागतात.

ह्या कुलांतील प्रसिद्ध दन्तिराज हा इंद्रराज व त्याची चालुक्य कुलांतील राज्ञी यांचा पुत्र असून तो प्रथम प्रसिद्ध पुरुष झाला. त्यानें राष्ट्रकूटांचें राज्य चालुक्यांच्या शासनापासून स्वतंत्र केलें. महाराष्ट्रदेशास स्वातंत्र्य देणारा पहिला हाच राजा होय. त्याच्या राज्याचा विस्तार उत्तरेस नर्मदेपर्यंत असून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत होता. युवराज गोविंदाच्या ( दुसऱ्या ) आलासलेखांत तर असें स्पष्ट लिहिलें आहे कीं, कांची, केरल, चोल, पांड्य, श्रीहर्ष व वज्रट इत्यादिकांवर प्रभुत्व गाजविणाऱ्या चालुक्यांचा दन्तिराजानें सहज पराभव केला. चालुक्यांच्या पराभवाचें वर्णन सामनगड लेखांतहि केलेलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, दन्तिराजानें चालुक्याधिपति वल्लभराजाचा सहज रीतीनें पराभव केला व त्यामुळें त्यास स्वतंत्र राजाचा ‘ राजाधिराज—परमेश्वर ’ हा किताब मिळाला. तसेंच ‘ बौद्ध धर्मानुयायी कनोजच्या श्रीहर्षाचा पराभव केल्यामुळें विख्यात झालेल्या कर्नाटक सैन्याचाहि त्यानें सत्वर पाडाव केला’ असें वर्णन आढळतें. यांत वल्लभराज म्हणजे चालुक्यकुलांतील अखेरचा राजा दुसरा कीर्तिवर्मन् असें दिसतें.

दन्तिवर्म्याचा वध त्याचा चुलता कृष्णराज याच्याकडून झाला, असें म्हणतात; परंतु लेखांतून वगैरे ह्या म्हणण्यास आधार मिळत नाहीं. फक्त बडोदा दानपत्रांत याविषयीं थोडा उल्लेख आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, “ कृष्णराजानें एका अन्यायवर्ती

आप्ताचा नाश करविला व प्रजेच्या हितास्तव राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं. " ह्या बडोदा लेखावरून कृष्णराजासंबंधीं प्रचलित असलेला लोकप्रवाद खरा मानण्यास हरकत नाहीं. साधारण मानानें कवि आपल्या आश्रयदात्यांच्या अंतस्थ कलहादिकांवर पांघरूणच घालीत असतात, त्यामळें दान्तिदुर्गाच्या वधाविषयीं लेखांतून उल्लेख न मिळणें युक्त होय.

दन्तिवर्म्यानें सुरू केलेला उपक्रम कृष्णराजानें सारखा चालूच ठेवला व चालुक्यांचा पुरा मोड केला राधनपूरलेखांत असें लिहिलें आहे कीं, कृष्णराजानें चालुक्यांचें वैभव थोड्याच अवधींत नष्ट केलें. एलापुरचें ( वेरूळ ऊर्फ एल्लोर ) प्रसिद्ध कैलासेश्वराचें मंदिर यानेंच बांधिलें. वर्धा ' पटां ' त असें म्हटलें आहे कीं, कृष्णराजानें आपल्या राज्यांत अनेक शोभिवन्त मंदिरें बांधविलीं व त्यायोगें त्याच्या राज्यास अनेक कैलास पर्वताचीच जणूं काय शोभा आली. बडोदालेखांत तर नुसत्या कैलासमंदिराचेंच सुरम्य व विस्तृत वर्णन केलेलें आहे. "ज्यावेळीं देवादिकांनीं कैलासाधिपतीचें हें देवालय पाहिलें त्यावेळीं ते आश्चर्यानें थक्क झाले; त्यांना वाटलें कीं हें मंदिर ईश्वरसत्तेनें स्वयंभूच निर्माण झालें असावें कारण इतकें अतुल मनोहरत्व मानवी कृतींत उतरणें अशक्य होय "—अशा तऱ्हेचें वर्णन बडोदालेखांत आहे.

कृष्णराजानंतर त्याचा मुलगा दुसरा गोविंदराज राज्यारूढ झाला. हा राजा विशेष पराक्रमी होता असें दिसत नाहीं. वणी—दिंडोरी- राधनपूर व बडोदा लेखांत तर याचा नामनिर्देशच नाहीं; वर्धा ' पटां ' त तर असें म्हटलें आहे कीं, गोविंदराज अत्यंत विषयलोलुप असून त्याचें राज्यव्यवस्थेकडे बिलकुल लक्ष नसे; त्यानें आपला राज्यकारभार आपल्या धाकट्या भावाकडे सोंपवला।

असून तो स्वतः विषयसुखांत दंग असे. वणी—दिंडोरी व राधनपूर लेखांतून असा गर्भितार्थ निघतो कीं, गोविंदराजास त्याच्या धाकट्या भावानें पदच्युत केलें असावें.

गोविंदराजानंतर त्याचा धाकटा भाऊ ध्रुव गादीवर आला. त्याला निरुपम व धोर अशीं दुसरीं नांवें आहेत. हा राज्यव्यवस्थेंत निपुण असून पराक्रमी होता. त्यानें गंग नांवाच्या राजाचा पाडाव करून त्याला बंदींत टाकलें व गौडावर विजय मिळाल्यामुळें मदांध झालेल्या पश्चिमदिशेच्या वत्सराजास मरुप्रदेशाकडे पिटाळून लावलें; व त्यानें गौडापासून काबीज केलेलीं दोन राजछत्रें हस्तगत केलीं. (पहा राधनपूर दानपत्र. एपि० इंडि. ६, २४३) तसेंच दक्षिणेंतील पल्लवराजास त्यानें जिंकिलें. इ. स. ७८३ मध्यें लिहिलेल्या जैन हरिवंशांत ध्रुवराजाचा दक्षिणचा राजा असा उल्लेख आहे असें वाटतें कदाचित् पुढील गोविंदाचा असेल.

ध्रुव निरुपमाचा मुलगा तिसरा गोविंदराज नंतर राजा झाला. त्याचेंच जगत्तुंग असें नांव होतें. वणी–दिंडोरी व राधनपूर ताम्रपट ह्याच राजानें शके ७३० म्हणजे इ. स. ८०८ मध्यें लिहविले. राष्ट्रकूटराजांमध्यें अत्यंत श्रेष्ठ असा हा राजा होय. कावीलेखांत असें म्हटलें आहे कीं ध्रुवराजानें गोविंदराजाचे अनुपम गुण पाहून त्याचेकडे साम्राज्याचे सर्वाधिकार सोंपविले; गोविंदराजाविषयीं त्याच्या बंधुवर्गास व शत्रुवर्गास अति वैषम्य वाटून १२ राजपुत्रांनीं त्याचे विरुद्ध कट रचून बंड उभारलें. पण गोविंदराजानें न डगमगतां ह्या बंडाचा मोठ्या धैर्यानें मोड केला. त्यानें गंगराजास बंधमुक्त केलें. पण गंगराजानें त्याजवर वैरभावानें स्वारी केल्यामुळें त्यानें गंगराजावर फेर हल्ला करून त्यास पुन्हां जिंकिलें व बंदींत टाकलें. लवकरच त्यानें गुर्जरावर स्वारी करण्याची जय्यत तयारी केली;

हें वर्तमान ऐकतांच गुर्जराधिपति उत्तरेकडे पळून गेला; व त्यानें ह्या सुमारास कनोजवर स्वारी केली असावी. नंतर त्यानें माळवाधिपतीस आपलें सार्वभौमत्व कबूल करणें भाग पाडलें; त्यावेळीं माळवाप्रांत परमारघराण्याकडे नव्हता असें दिसतें. नंतर त्यानें विंध्यांद्रीकडे मोर्चा वळविला; मारशर्व राजा त्याला लगेच शरण आला व त्यानें गोविंदराजास मूल्यवान नजराणा अर्पण केला. त्या सुमारास पावसाळा सुरू झाल्यामुळें तो ४ महिने श्रीभवन ( मालखेड ) येथें तळ देऊन राहिला. पावसाळा लोटल्यानंतर तो लगेच तुंगभद्रेकडे ससैन्य परत फिरला व त्यानें पल्लवराजाचा पुनः एकवार पाडाव केला. नंतर त्यानें वेंगीराजाकडून एका शहराचा तट बांधण्याचें कबूल करून घेतलें.—गोविंदाइतका वीर्यशाली राजा राष्ट्रकूटांत झाला नाहीं. गोविंदराजाचें बिरुदनांव प्रभूतवर्ष ( विपुल वर्षाव करणारा ) असें आहे. त्याच राजाचे दिंडोरी व राधनपूर लेख होत; वरील लेख मयूरखंडी एथें लिहिले गेले; मयूरखंडी म्हणजे नाशिक जिल्ह्यांतील मोरखडचा डोंगरी किल्ला असें म्हणतात. ( ही राष्ट्रकूटांची जुनी राजधानी असावी ! )

गोविंदराजानंतर त्याचा मुलगा ' अमोघवर्ष ' राज्य करूं लागला. अमोघवर्ष हें बिरुदनाम दिसतें. त्याचे मूळचें नांव कोणतें हें समजत नाहीं. त्याच्या दानपत्रादिकांतून त्यास अतिशयधवल व लक्ष्मीवल्लभ असेंही म्हटलें आहे.

अमोघवर्षाच्या कारकीर्दीचा काळ निलगुंडलेखावरून सहज अनुमानितां येईल. (एप० इंडि. भा. ६ १००). ह्या लेखाचा काळ शके ७८८ म्ह. इ. स. ८६६ आहे व हा लेख अमोघवर्षाच्या कारकीर्दीच्या ५२ व्या वर्षीं लिहिला गेला असें म्हटलें आहे; म्हणजे अमोघवर्षाच्या कारकीर्दीस शके ७३६ म्हणजे इ. स. ८१५ त

सुरवात झाली असावी. अमोघवर्षाचा शेवटचा दानलेख शके ७९९ म्ह. इ. स. ८७७ मध्यें लिहिला गेला असें कन्नेरीलेखावरून दिसतें (इंडि० अं. भा. १३, १३५.) म्हणजे अमोघवर्षाची कारकीर्द फारच मोठी म्हणजे ६० वर्षांची झाली.

अमोघवर्षाच्या कारकीर्दींत मान्यखेटशहराची फारच भरभराट झाली असें कर्डा-लेखांवरून दिसतें. आतां सहजच असा प्रश्न निघतो कीं मान्यखेट शहर कोणी वसविलें ? वर्धालेखांत तर असें स्पष्ठ सांगितलें आहे कीं, मान्यखेट गांव अमोघवर्षानेंच स्थापलें * व तें इतकें शोभायमान दिसे कीं, त्यापुढें इंद्राची अमरावती ओस दिसली. मान्यखेट म्हणजे निझामच्या राज्यांतील हल्लींचें मालखेड गांव होय. अमोघवर्षानें वेंगीच्या चालुक्याशीं पुनः युद्धास सुरवात केली व त्यांत त्याला यश येऊन बराच प्रांत मिळाला. खारेपाटण लेखांत त्यानें बऱ्याच चालुक्य राजपुत्रांस यमसदनीं पाठवलें असें म्हटलें आहे. नीलगुंडलेखांवरून असें दिसतें कीं, त्याचें आधिपत्य वंग, अंग, मगध, मालव, व वेंगी इत्यादिकांनीं कबूल केलें होतें.

जैन विहारांकरतां अमोघवर्षानें बरीच संपत्ति दिली असें लेखांतरीं सांगितलें आहे. उत्तरपुराणनामक एका जैनग्रंथांच्या शेवटीं तत्कालीन इतिहास वर्णिला आहे; त्यांत अमोघवर्षासंबधीं एकदोन श्लोक दिले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं, अमोघवर्ष हा जिनसेन नांवाच्या एका जैनाचार्यांचा परम भक्त होता. (पहा० डॉ. भांडारकरांचा राष्ट्रकूटांवरील लेख बॉबे गझी० व्हॉल, ) अमोघवर्ष हा

---

* पण हें म्हणणें आक्षेपार्ह दिसतें; अमोघवर्षाच्या पित्यानें म्हणजे गोविंदराजानें श्रीभवन ऊर्फ मालखेड येथे तळ दिला होता असें वर वर्णन आलेंच आहे. तेव्हां गोविंदराजानें आपली राजधानी मालखेडला प्रथम आणली असें दिसतें.

विद्वज्जनांचा चहाता असून त्यांचा योग्य परामर्ष घेत असे—असें रत्नामालिका अथवा प्रश्नोत्तरमाला या लहानशा संस्कृत नीतिपर ग्रंथावरून डॉ० फ्लीट यांनीं आनुमानिलें आहे. ह्या संस्कृतग्रंथाचा दिगंबरजैनांनीं अनुवाद केला आहे. त्या अनुवादाच्या शेवटच्या श्लोकावरून असें दिसतें कीं, आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं अमोघवर्षानें आपण होऊन राज्यकारभार सोडला व तो आपला काल धर्माचरणांत घालवूं लागला. एकदंरीनें पाहतां अमोघवर्ष जैनानुयायी होता हें खरें असो वा नसो, तो दिगबरजैनांचा परामर्ष घेत असे हें निर्विवाद आहे.—अमोघवर्षाच्या वेळीं उत्तरेंत मिहिरभोज राज्य करीत असे; त्याचीही पराक्रमाविषयीं व विद्येविषयीं ख्याति होती; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ७ व्या शतकांत ज्याप्रमाणें हर्ष व पुलकेशिन् ( दुसरा ) हे अनुक्रमें उत्तर व दक्षिण प्रांतांत पराक्रमानें व दानशीलतेनें विख्यात व लोकप्रिय झाले, त्याप्रमाणेंच ९ व्या शतकांत अमोघवर्ष व भोजराज दक्षिणेंत व उत्तरेंत प्रसिद्धि पावले.

अमोघवर्षानंतर त्याचा मुलगा अकालवर्ष हा राज्य करूं लागला. सहस्रार्जुन ( हैहय ) वंशातील कोक्कलराजाच्या महादेवी नामक कन्येशीं त्याचा विवाह झाला होता. ह्या राजाचें मूळचें नांव कृष्ण-राज होतें हें वर्धा व कर्डा ताम्रपटांवरून उघड दिसतें.

वर्धालेखावरून असें दिसतें कीं, अकालवर्षानें गुर्जराधिपतीस भय-भीत केलें व लाटराजाचा पराकाष्ठेचा दर्प नाहींसा केला, व समुद्र-कांठच्या प्रदेशांतील लोकांस दहशत बसवली. आंध्र, कलिंग, गंग व मगध येथील राजे ह्याचे हुकुमाचे दास होते.

नवसारी ताम्रपटांचा काळ शके ८३६ आहे, त्यांत अकाल-वर्षाच्या गुर्जराबरोबर झालेल्या युद्धांचीं वर्णनें आहेत. त्यांवरून असें

दिसतें कीं शके ८३६ च्या पूर्वीं २९ अगर ३० वर्षांपूर्वीं म्हणजे शके ८०६ ते ८११ चे दरम्यान हें युद्ध झालें असावें.—ह्या राजाची कारकीर्द शके ७९७ ते ८३३ म्ह० इ. स. ८७९ ते९११ पर्यंत असावी असें डॉ. भाण्डारकर यांचें म्हणणें आहे.

अकालवर्षाला जगत्तुंग नांवाचा मुलगा असून त्याचा विवाह कोक्कलपुत्र रणविग्रहाच्या लक्ष्मीनामक कन्येबरोबर झाला असें सांगली. व नवसरी लेखांवरून दिसतें; कोक्कलपुत्राचें नांव शंकरगण होतें असें कर्डा 'पटांत' लिहिलें आहे. खारेपाटणलेखांत जगत्तुंगाचें नांव राजांच्या यादींत दिलेलें नसून त्याऐवजी अकालवर्षाचा नातू इंद्रराज याचें नांव अकालवर्षानंतर दिलें आहे. वर्धा-नाम्रपटावरून असें दिसतें कीं जगत्तुंगास राज्यपद मिळण्यापूर्वींच देवाज्ञा झाली व त्यामुळें अकालवर्षानंतर जगत्तुंगाचा मुलगा (तिसरा) इंद्र राज्यासनीं बसला.

इंद्रराजाचें नित्यवर्ष असें नांव नवसरीलेखांत दिलें आहे. नवसरी दानपत्रें इंद्रराजानेंच दिलेलीं आहेत. इंद्रराजाची राजधानी मान्यखेटलाच होती; तरीपण 'पट्टबंधोत्सवाचे (राज्याभिषेकाचे) वेळीं तो कुरुंदास होता; राज्याभिषेकाचे वेळीं त्यानें आपली सुवर्णतुला करवून तें सर्व द्रव्य त्यानें ब्राह्मणांस दिलें. नवसरीदानपत्रें त्याच्या राज्यारोहणवर्षीं म्हणजे इ. स. ९३४ मध्यें दिलीं असावीं परंतु डॉ फ्लीटनें इंडि०एंटि० मध्यें (१२. २२४) एक शिलालेख प्रसिद्ध केला आहे त्यावरून इंद्रराजा शके ८३८ म्ह० इ. स. ९१६ मध्यें राज्य करीत असावा असें दिसतें.

इंद्रराजानंतर त्याचा ज्येष्ठ मुलगा अमोघवर्ष याचा कनिष्ठ पुत्र गोविंदराज गादीवर बसला ह्याविषयीं निरनिराळ्या लेखांत थोडाफार फरक आहे. सांगली दानपत्रांत असें लिहिलें आहे कीं हैहय

वंशी कोक्कलराजाच्या अनंगदेव नांवच्या मुलाच्या द्विजंबा ( डॉ० भाण्डारकरांच्या मतें ' विजयंबा ' ) नामक कन्येशी इंद्रराजाचा विवाह झाला असून ह्या विवाहापासून इंद्रराजास गोविंदराजनामक पुत्र झाला; व ह्या गोविंद राजानेंच सांगली–दानपत्रें दिलीं आहेत. खारेपाटण लेखांत असें म्हटलें आहे कीं, गोविंदराज हा अमोघवर्ष नामक राजाचा कनिष्ठ बंधू होय. परंतु वर्धाताम्रपटावरून सर्वच गोष्टींचा निकाल होतो. कारण त्यांत असें लिहिलें आहे कीं, अमोघवर्षास राज्य मिळाल्यावर जणूं काय पितृशोकामुळें व्याकुल होऊन त्यानें लवकरच इहलोकाचा त्याग केला व त्याचा कनिष्ठ भ्राता गोविंद-राज राज्य करूं लागला.

वर्धा व खारेपाटण लेखांवरून असें दिसतें कीं, हा राजा विषय-लंपट असल्यामुळें लोकप्रिय झाला नाहीं. दोन्ही लेखांत याच्या विलासवृत्तीची निंदा केली आहे. ह्याचा दरबार सदा युवती जनांनीं व्याप्त असे, असें खारेपाटण लेख म्हणतो तर " हरि-णाक्षींच्या नेत्रकटाक्षरूपी जाळ्यांत सांपडल्यामुळें त्यास जनतेंत बिलकुल मान नसे; विषयलोलुपतेनें तो लवकरच क्षीण होऊं लागला व विषयातिरेकांतच त्याचा अंत झाला."—परंतु सांगली-दानपत्रांत गोविंदराजाची स्तुतिच केली आहे; याचें कारण असें दिसतें कीं, हें दानपत्र याच राजानें दिलें होतें.

सांगली दानपत्राचाकाल शके ८५५ म्ह० इ. स. ९३३ आ-हे. फ्लीट साहेबांनीं गोविंदराजाचें ( प्रभूतवर्ष असें नांव अस-लेलें ) एक दानपत्र छापलें आहे. त्यावरून गोविंदराज शके ८४०-४१ म्ह० इ. स. ९१८-१९ मध्यें राज्य करीत असावा असें दिसतें. इंद्रराज शके ८३६ मध्यें राज्य करूं लागला असें वर

सांगितलेंच आहे. तेव्हां गोविंदराजाची कारकीर्द फारच थोडे वर्षांची असावी असें अनुमान निघतें.

खारेपाटणताम्रपटांवरून असें दिसतें कीं, चवथ्या गोविंदराजानंतर त्याचा चुलता म्हणजे जगत्तुंगाचा कनिष्ठ मुलगा अमोघवर्ष राज्य करूं लागला. वर्धाताम्रपटांत असें लिहिलें आहे कीं, "चवथ्या गोविंदराजाच्या मृत्यूनंतर सामन्तांनीं साम्राज्यरक्षणाकरतां विनवणी केल्यामुळें अमोघवर्षानें राज्यपद स्वीकारलें."

तिसऱ्या अमोघवर्षानंतर त्याचा मुलगा कृष्ण राज्य करूं लागला. त्यानेंच वर्धादानपत्रें दिलीं असल्यामुळें त्या दानपत्रांत त्याचें विशेष वर्णन आढळतें. त्यानें आपल्या शत्रूंस वठणीस आणलें. दंतिग व बप्पट हे उन्मत्त झाल्यामुळें त्यांस देहान्त शिक्षा केली. गंगराजास त्यानें शरण आणलें; दक्षिणेंतील कृष्णराजाचा अशा तऱ्हेचा पराक्रम ऐकून गुर्जराधिपतीनें उत्तरेकडील कालंजर व चित्रकूट हे किल्ले घेण्याचा बेत रहित केला. हिमालयापासून तें सिंहल ( सीलोन ) पर्यन्त सर्व सामन्त राजे त्याची आज्ञा शिरसावंद्य मानीत. अशा तऱ्हेचें वर्णन वर्धादानपत्रांत आढळतें. वर्धादानपत्र त्याचा कनिष्ठ भाऊ जगत्तुंगदेव याच्या नांवानें केलेलें असून त्याचा काल शके ८६२ म्ह० इ. स. ९४० असा आहे. तो शके ८६२ मध्येंहि राज्य करीत असावा. ( इंडि० ॲन्टि. भा. १२, २५६ ). यशस्तिलकनामक एका जैनग्रंथाच्या शेवटील मजकुरावरून कृष्णराजा शके ८८१ मध्येंहि राज्य करीत असावा असें डॉ० भांडारकर यांचें म्हणणें आहे. म्हणजे कृष्णराजाची कारकीर्द इ. स. ९४० ते ९५९ पर्यंत धरण्यास हरकत नाहीं.

कृष्णराजानंतर त्याचा कनिष्ठ भ्राता खोट्टिग राज्य करूं लागला. 'ज्येष्ठ भ्राता कृष्णराजदेव स्वर्गस्थ झाल्यावर अमोघवर्षाचा

कुण्डकादेवीनामक राणीपासून झालेला खोट्टिगदेव राज्यासनीं बसला असें कर्डादानपत्रांत लिहिलें आहे; म्हणजे कृष्णराज व खोट्टिगदेव हे सापत्न भ्राते असावे. खोट्टिगदेव शके ८९३ मध्यें राज्य करीत असावा असें दिसतें. ( इंडि० आन्टि १२, २५५ )

खोट्टिगानंतर त्याचा पुतण्या कोक्कल गादीवर बसला असें खारेपाटण दानपत्रांवरून दिसतें. कोक्कलाच्या पित्याचें नांव निरुपम होतें असें कर्डादानलेखांत लिहिलें आहे. खोट्टिगाची पराक्रमाविषयीं विशेष ख्याति होती. गुर्जरांच्या मोठ्या सैन्याचा त्यानें पराभव केला व चोलाधिपतीस जणूं खेळविलें; हुनवीराजाचें त्यानें सदैव रक्षण केलें; पांड्यराजास त्याची चांगलीच दहशत बसली होती. पण अखेर चालुक्यवंशांतील तैलपानें कोक्कलाचा पूर्ण पराजय केला. त्यामुळें राष्ट्रकूटांकडून सम्राटपदाचे अधिकार निघून ते इ. स. ९७४ चे सुमारास चालुक्यांकडे आले इत्यादि माहिती लेखांतून दिलेली आढळते.

कोक्कलाच्या अमदानींतच करडादानपत्रें देण्यांत आलीं. त्यावरून कोक्कल शके ८९४ म्ह० इ. स. ९७२ मध्यें राज्य करीत असावाच. दुसऱ्या एका लेखावरून ( इंडि. अंटि. भा. १२, २७० ) तो. श. ८९६ म्ह ९७४ मध्येंहि राजा असावा असें दिसतें. असो, एकंदरीनें दाक्षिणचें साम्राज्यपद राष्ट्रकूटांकडे इ. स. ७५० ते ९७४ पर्यंत होतें. यापुढें पश्चिमेकडील गंगराजानें तिसऱ्या कृष्णराजाच्या गोविंद ( चवथ्या ) नामक राजपुत्रास साम्राज्यपदावर बसविण्याचा प्रयत्न केला ( इंडि. अंटि. भा. २३, १२४ ) पण तो सिद्धीस गेला नाहीं. सरतेशेवटीं इंद्रराजानें प्रायोपवेशन करून मार्च २७, ९८२ त इहलोकचा त्याग केला व त्यायोगें राष्ट्रकूटराजघराणें अंतास गेलें. ( एपि. इंडि. ६, १८२ ).

शेवटीं या घराण्यांतील राजांची यादी देऊन व शक्य तर त्यांचा राज्यशक अगर मृत्युशक देऊन हें प्रकरण पुरें करतों.

१ दंतिदुर्ग राज्यशक इ. स. ७५३ मृत्युशक
२ कृष्ण अकालवर्ष ,, ,, ७७३
३ ध्रुव निरुपम धारावर्ष ,, ७८३
४ गोविंद जगत्. प्रभूत ,, ८८८
५ अमोघवर्ष ,, इ. स. ८१५ ते ८७५
६ दुसरा कृष्ण, अकाल वर्ष इ. स. ८७५ ते ९११
७ तिसरा इंद्र नित्यवर्ष इ. स. ९१४ चें दानपत्र मिळतें.
८ अमोघवर्ष २ रा
९ गोविंद ( चवथा ) सुवर्णवर्ष इ. स. ९३३
१० अमोघवर्ष ३ रा.
११ कृष्ण. तिसरा; अकालवर्ष ९४०–९६१
१२ खोट्टिग नित्यवर्ष ९७१
१३ कोक्कल— इ. स. ९७२ व ९७४

ह्याच्याच कारकीर्दींत चालुक्य–तैलपानें राष्ट्रकूटांवर स्वारी केली; तैलपाचा विजय होऊन राष्ट्रकूटघराणें विलयास गेलें.

## उपसंहार.

राष्ट्रकूटघराणें महाराष्ट्रांत अतिशय प्रसिद्ध असल्यामुळें त्याचा थोडा अधिक विचार सामान्यतः करणें जरूर आहे. मालखेडचें राष्ट्रकूटघराणें व-राजपुतान्यांतील राष्ट्रकूट उर्फ राठोडघराणें हीं परस्पर भिन्न आहेत. दोन्हीं घराणीं क्षत्रियांत मोडतात; पण राजपुतान्यांतील घराणें आपणांस सूर्यवंशी म्हणवतें, तर मालखेडचे राष्ट्रकूट आपणांस चंद्रवंशी समजतात; तसेंच दोन्ही घराण्यांची

गोत्रें भिन्न आहेत. राठोडांचें गोत्र गौतम तर राष्ट्रकूटांचें अत्रि गोत्र आहे. चालुक्यांचें असेंच आहे. दक्षिणेंतलि चालुक्य राजपुतान्यांतील चालुक्यांहून अगदीं भिन्न आहेत. दोघेही क्षत्रिय खरे पण मराठा चालुक्य ' मानव्य ' गोत्री असून आपणांस सूर्यवंशी समजतात तर रजपूत चालुक्यांचें गोत्र भारद्वाज असून ते आपणांस सोमवंशी म्हणवतात. नामसादृश्यामुळें कुल एकच ठरेल असें नाहीं. अनेकदां अधिकारपरत्वें नांवें प्राप्त होतात. राष्ट्रकूट हें नांव अशाचपैकीं आहे. राष्ट्रकूट म्हणजे राष्ट्राचा कूट मुख्य वरिष्ठ कारभारी. देशमुख अगर देशपांडे या शब्दाप्रमाणें राष्ट्रकूट शब्द पूर्वीं अधिकारवाचक असून नंतर त्याचेंच आडनांव बनलें. महाराष्ट्रांत वमुलाच्या मुख्य अधिकाऱ्यास देशमुख अशी संज्ञा आहे; देशमुखाच्या हाताखालच्या मुख्य कारकुनास देशपांडे म्हणतात. ज्यावेळीं मराठा—आर्य महाराष्ट्रांत आले तेव्हां त्यांनीं नार्मन लोकांप्रमाणें राष्ट्र म्हणजे प्रांताधिकाराच्या जागा मराठे लोकांत वाटून दिल्या ( राष्ट्र हा शब्द निव्वळ महाराष्ट्रीय आहे ). त्या निरनिराळ्या अधिकारसंपन्न मराठ्यांस राष्ट्रकूट असा किताब असे; राष्ट्रकूट हे मुख्यत्वेंकरून मराठेच असत; त्यांतील एका कुळाचें महाराष्ट्रांत ७५० पासून ९७४ पर्यंत राज्य असून महाराष्ट्राच्या इतिहासाचा तो अत्यंत वैभवशाली भाग होता.

गुजराथ प्रांतांतील एका चालुक्यसरदारानें आरबांचा चांगलाच बंदोबस्त केल्यामुळें ( इ. स. ७३८ ) महाराष्ट्रास मुसलमानांच्या स्वाऱ्यांची भीति उरली नव्हती असें नवसरी लेखांवरून दिसतें. त्या गुजराथच्या सरदारास ' अजिंक्यजेता ' असा किताब दक्षिणच्या सम्राटाकडून देण्यांत आला होता. त्यावरूनच त्याच्या शौर्याची व कामगिरींची खात्री पटते. आरबांच्या स्वाऱ्या एखाद्या प्रचंड

झंझावाताप्रमाणें सर्वत्र नासधूस करीत होत्या. आरबांनीं सिंध, कच्छ, चापोत्कट, मौर्य इत्यादि राजे जिंकिले असून त्यांनीं दक्षिणेकडे आपला मोर्चा वळविला असतां मराठ्यांच्या खडतर तरवारीच्या तेजापुढें त्यांचें कांहीं एक चाललें नाहीं व त्यांना माघार घ्यावी लागली. त्यामुळें महाराष्ट्रावरील संकट निदान ९ शतकें तरी टळलें. त्यानंतर आरबांचा व मराठ्यांचा कनोजसम्राट हा समान शत्रु असल्यामुळें दोघांचें सख्य जमलें व दोघेहि परस्परांस साहाय्य करूं लागले असें दिसतें.

दन्तिदुर्गाच्या कारकीर्दीपासून राष्ट्रकूटाच्या उत्कर्षास सुरवात झाली. वेरुळ येथील मनास थक्क करून सोडणारें ' शिवलेणें ' दन्तिदुर्गाच्या पुढील कृष्णनामक राजानें बांधलें. हें शिवाचें देवालय एक प्रचंड डोंगर खोदून तयार केलें आहे. तें पाहिलें असतां मनुष्य आश्चर्यानें स्तंभित होतो व मंदिर खोदणाराच्या कल्पकतेची वाखाणणी करतो. या मंदिराचा घाट प्रशस्त असून नक्षीकाम तर विस्मयकारक आहे. त्या कालांतील कलाकौशल्याचें हें चिरंतन स्मारक आहे एवढेंच नव्हे तर जगांतील आश्चर्यकारक मानवीकृतींत त्याची गणना करण्यास हरकत नाहीं. ज्यानें ह्या मंदिराची रेखाटणी मनांत केली असेल (कारण त्यावेळीं नकाशे तयार करणें शक्य नसे ) त्याची धन्य होय. वेरुळच्या लेण्यांनीं राष्ट्रकूटांचें नांव अजरामर केलें आहे यांत संशय नाहीं; कारण राष्ट्रकूटांची राजधानी आज उद्ध्वस्त झाली आहे.

राष्ट्रकूटांचीं नांवें कृष्ण, गोविंद इत्यादि प्रमाणें अगदीं साधीं असत व महाराष्ट्रांत आजतागायत साधींच नांवें ठेवण्याचा प्रघात आहे. पण त्यांची **बिरुदावली**—किंवा त्यांच्या पदव्या—बहुमान निदर्शक व मोठेपणांनींयुक्त अशा आहेत. चालुक्यांनंतर ते आपणांस

पृथ्वीवल्लभ किंवा नुसतें वल्लभराज ( आरबी भाषेंत बलहरा ) असें म्हणवीत; त्याशिवाय " वर्ष " शब्दांनीं युक्त असे त्यांचे अनेक किताब असत. जसें—प्रभूतवर्ष, अमोघवर्ष, नित्यवर्ष इ०—या नांवांमुळें नवीनच इतिहासाचा अभ्यास करणाराचा घोंटाळा होतो.

चालुक्यांप्रमाणें किंवा अलीकडील गायकवाडांप्रमाणें लाट ऊर्फ दक्षिण गुजराथ प्रांत ( विशेषतः नवसरी प्रांत ) राष्ट्रकूटांच्याच ताब्यांत होता. माळवा प्रांतहि राष्ट्रकूटांच्या राज्यांत मोडत असे. त्याचप्रमाणें पूर्व चालुक्य अगर अलीकडील मराठ्यांप्रमाणें त्यांची सत्ता दक्षिणेंत तंजावरापर्यंत पसरली होती. पण पूर्व चालुक्याप्रमाणें महाराष्ट्र व्यापून स्वस्थ न बसतां हल्लींच्या मराठ्याप्रमाणें त्यांनीं उत्तरहिंदुस्थानांत स्वाऱ्या सारख्या चालू ठेविल्या होत्या. ज्याप्रमाणें अलीकडील मराठे सरदार दिल्ली जिंकण्याचा सारखा यत्न करीत तद्वत् त्यावेळची हिंदुस्तानची राजधानीं कनोज पादाक्रांत करण्याची उमेद राष्ट्रकूट बाळगीत असत; चालुक्य कधींच कनोजपर्यंत पोंचले असें दिसत नाहीं. पुलकेशीनें हर्षाचा व विनयादित्यानें यशोवर्म्याचा पराभव केला हें निर्विवाद आहे; पण तो कनोजला जाऊन नव्हे तर हर्षादिकांच्या सैन्यास नर्मदातटाकीं गांठून केला. चवथ्या गोविंराजाच्या खंबायतदानपत्रांत इंद्रराजाच्या कनोजच्या स्वारीचें वर्णन आहे; त्यांत असें म्हटलें आहे कीं, इंद्रराजाच्या घोडदळानें भयाण व विस्तृत यमुना नदी ओलांडली व कनोज उध्वस्त करून टाकलें. कनोजमधील मनुष्यवस्ती नष्ट होऊन त्याऐवजीं सर्वत्र गवताचें रान माजलें व कनोज गांवास 'कुशस्थली'चें स्वरूप नांवांप्रमाणें खरेंच प्राप्त आलें. ( तीर्णा यत्तुरगैरगाधयमुना सिंधुप्रतिस्पर्द्धिनी इ. ) यमुनेचें पाणी काळें व पात्र विशाल व खोल असल्यामुळें यमुना नदी भीषण स्वरूपी आहे; त्यांतून पूर्वीं कालवे काढलेले नसल्यामुळें तर

ती फारच मोठी व उग्र दिसत असेल. त्यावेळीं पूल वगैरे बांधण्याची साधनें नसल्यामुळें ही यमुना नदी कृष्णसर्पाप्रमाणें भयंकरच होती. घोड्यावरून सैन्यानें पोहून नदी ओलांडण्याचे प्रसंग मराठ्यांच्या इतिहासांत अनेकवार आलेले आहेत. घोड्यावर बसण्यांत मराठ्यांची पूर्वींपासूनच ख्याति आहे. राष्ट्रकूटांची मोठी भिस्त घोडदळावरच असे, व घोडेस्वारांचें सैन्य आटपशीर असल्यामुळें दूर दूर जाऊन त्यांस सहजच विजय प्राप्त होई. घोडदळाखालोखाल राष्ट्रकूटांच्या संग्रहीं पायदळ व गजसैन्यहि असे. ( पहा आरबी लेखक. )

राष्ट्रकुटांची राज्यव्यवस्था पद्धतशीर होती. त्यांची सैन्यव्यवस्था ही तशीच असून सैन्याचें वेतन वेळच्यावेळीं देण्यांत येई. त्यामुळें सैन्य नाखूष नसे. राष्ट्रकूट प्रारंभीं शिवोपासक होते पण पुढें पुढें त्यांचा कल जैनाचार्यांकडे विशेष होऊं लागला. कर्नाटकांत शेतकरी वर्गांतून जैन धर्माचा जो इतका प्रसार झाला आहे तो ह्यामुळेंच. राष्ट्रकूटांचे विवाहादि संबंध उत्तरेकडील रजपूतांशीं, बंगालच्या पालांशीं, व चेदीच्या हैहय घराण्याशीं होत. मेवाडच्या अल्लटाची आई राष्ट्रकूटघराण्यांतील कन्या होती असें लेखांतून वर्णिलें आहे. अल्लटाचे वेळीं उत्तर हिंदुस्थानांत राष्ट्रकूटवंश प्रसिद्ध नव्हताच असें म्हटलें तरी चालेल; म्हणजे अल्लटाची आई दक्षिणच्या राष्ट्रकूटांपैकीं होती असें म्हणावें लागतें. पहिल्या अमोघवर्षाच्या इ. स. ८६६ नीलगुंड लेखावरून असें दिसतें कीं, राष्ट्रकूटांचें चित्रकूटांशीं वैर उत्पन्न होऊन त्यांत चित्रकूटांचा पराभव झाला ( एपि. इंडिया ६,१०६ ). क्षत्रियांच्या आप्तेष्टांत युद्ध होणें युरोपच्या इतिहासांतहि दिसतें. तेव्हां तशा तऱ्हेचें प्रसंग हिंदुस्थानांत अनेकदां येत यांत नवल नाहीं.

नीलगुंड लेखावरून राष्ट्रकूटांचें " लांछन " किंवा निशाणाचें चिन्ह गरुड होता असें दिसतें; यांचीं राज्यचिन्हें म्हणजे चालुक्यांपासून हिरावून घेतलेले पालिध्वज म्हणजे तीन शुभ्र छत्रें होते. राष्ट्रकूटांस महाराजाधिराज, परमेश्वर, व भट्टारक असें नेहमीचे किताब असत. त्यांस ' लट्टलूर ' पुर—परमेश्वर असाही किताब असे, हें नांव त्यांस कसें प्राप्त झालें याचा आजवर कोणीच उलगडा केलेला नाहीं. आमच्या मतें ' लट्टलूरपुर ' गांव राष्ट्रकूटांची मालखेड स्थापन करण्याच्या पूर्वीं किंबहुना मयूरखंडीच्याहि पूर्वीं राजधानी असावी व त्यामुळें राष्ट्रकूटांस "लट्टलूरपुर परमेश्वर" असें म्हणतात.

---

## राष्ट्रकूट घराण्याची स्वितृत वंशावळ.

१ दन्तिवर्मन्
|
२ इंद्र १ ला
|
३ गोविंद १ ला
|
४ कर्क १ ला

५ इंद्र २ रा
|
६ दन्तिदुर्ग
इ. स. ७५३ मध्यें चालुक्यास जिंकिले

७ कृष्ण १ ला. अकालवर्ष
इ. स. ७७३

८ गोविंद रा.२
युवराज
आलासदानपत्र
इ. स. ७७०

९ ध्रुवनिरुपम
धारावर्ष
इ. स.
७९३

इ. स. ७८३ च्या जैनहरिवंशांत उल्लेख आहे.

१० गोविंद ३ रा. जगतुंग १ ला.
प्रभूतवर्ष इ. स. ८०८

इंद्र

कर्क गोविंद

गुजराथ–उपशाखा

११ शर्व नृपतुंग अमोघवर्ष
( इ. स. ८१४–८७५ )

१२ कृष्ण २ रा. अकालवर्ष
इ. स ८७५–९११ )

जगत्तुंग अल्पायुषी

दन्तिवर्मदेव
दानपत्र इ. स. ८६७
ए. इ. ६,२९२

१३ इंद्र ३ रा, नित्यवर्ष

१६ अमोघवर्ष ३ रा.

१४ अमोघवर्ष २ रा.

१५ गोविंद ४ था
सुवर्णवर्ष
इ. स. ९१८–९३३

१७ कृष्ण ३ रा.
अकालवर्ष
इ. स. ९४० ते ९६१ )
( फ्लीट. ए. इ. ६,१८० )

१८ खोट्टिग
इ. स. ९७१

निरुपम

कक्कल ऊर्फ कर्क २ रा
अमोघवर्ष
इ. स. ९७२ ते ९७४ चालुक्य
तैलपनें पराजित केले.

# प्रकरण ११ वें

## या काळांतील इतर लहान राज्यें—

आतांपर्यंत इ. स. ८०० ते १००० पर्यंत हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत उदय किंवा उत्कर्ष पावलेल्या प्रमुख राज्यांच्या इतिहासाचा विचार झाला; आतां तत्कालीन इतर लहान सहान राज्यांचा नामनिर्देश करून अवांतर गोष्टींचा विचार करूं. ह्या इतिहासाच्या प्रथम भागांत या बहुतेक राज्यांचीं नावें आलींच आहेत; पण ह्या भागाच्या पूर्ततेकरतां त्या राज्यांचा पुनः विचार करणें अवश्यक आहे. (१) ह्या लहान राज्यांत प्रमुख म्हणजे सिंधचें मुसलमानी राज्य होय. त्या राज्याचा विस्तार मुलतानपर्यंत झाला असून त्याचा कारभार बगदादच्या खलीफानें नेमलेल्या सुभेदाराकडून होत असे; परंतु या कालांत खलीपांची सत्ता कमी कमी होत असून सरते शेवटीं तूर्कांनीं सिंधचें राज्य हस्तगत केलें.— ( २ ) काबूलच्या 'शाहि' राजांचें सविस्तर वर्णन पाहिल्या पुस्तकांत आलेंच आहे. ह्यूएनत्संगानें वर्णिलेल्या बौद्ध धर्मी क्षत्रिय कुलाचा शेवट इ. स. ८८० त झाला व लल्लिय नामक ब्राह्मण सेनापतीचा अधिकार काबूल येथें सुरू झाला. लल्लिय हाच काबूलच्या ब्राह्मणी राज्याचा संस्थापक होय. हें ब्राह्मणी राज्य इ. स. ८८० पासून १०२१ पर्यंत टिकलें. अलबेरूनी, राजतरंगिणी व उपलब्ध असलेलीं नाणीं ह्यांवरून ठोकळ मानानें ठरणारी ह्या घराण्यांतील राजांची वंशावळ खालीं देत आहें.

१ लल्लिय इ. स. ८८० ते ९००

२ सामन्त ,, ९०० ते ९२०

३ कमलु ,, ९२० ,, ९४०
४ भीमदेव ,, ९४० ,, ९६०
५ जयपाल ,, ९६० ,, ९८०
६ आनंदपाल ९८० ,, १०००
७ त्रिलोचनपाल १०००,, १०२१

इराणांत राजास 'शहा' म्हणतात व त्यावरून काबूलचे क्षत्रिय तसे ब्राह्मण राजेही आपणांस शहा म्हणवीत. परंतु क्षत्रिय राजे बुद्धमतानुसारी होते तर ब्राह्मण राजे वेदानुसारी असून शिव अगर विष्णूचे उपासक असत.

(२) काबुलांत ब्राह्मणी राज्य चालू होतें तर कंदाहार प्रातांत क्षत्रिय राज्य चालू होतें. वस्तुत: काबुल व कंदाहार ह्या दोन्हींहि प्रांतांची हिंदुस्थानांतच गणना केली पाहिजे; पण तशी गणना हल्लीं न होण्याचें कारण असें दिसतें कीं, तूर्क लोकांनीं हे प्रांत काबीज केल्यावर तद्देशीय लोकांनीं तुर्कांचाच मुसलमानी धर्म स्वीकारला व त्यामुळें त्या प्रदेशांची तुर्की प्रांतांत गणना होऊं लागली. कंदाहारास राज्य करणारे क्षत्रिय रजपूत असून ते भट्टी कुलपैकीं असावे. मुसलमानी ग्रंथांतून कंदाहारच्या इतिहासाची माहिती मिळते; ती आम्हीं ह्या इतिहासाच्या तिसऱ्या भागांत देणार आहों.

हीं वरील छोटीं राज्यें सिंधुनदाच्या जवळील होत. सिंधुनदाच्या अलीकडच्या राज्यांच्या स्थितीचें निरीक्षण आतां करूं; काश्मीरच्या राज्याचा समग्र इतिहास आम्हीं पहिल्या भागांत वर्णिलाच आहे. कर्कोट घराण्यांतील जयापीड राजाची कारकीर्द इ. स. ७५१ ते ७८२ पर्यंत झाली व त्यानंतर कर्कोटवंशास जवळ जवळ उतरतीकळाच लागली. यापुढील काळांत काश्मीरच्या राजांनीं आपल्या राज्याच्या बाहेरच्या उलाढालींत विशेष लक्ष घातलें

नाहीं व कदाचित् यामुळेंच कर्कोटवंश कसाबसा इ. स. ८५५ पर्यंत टिकला. इ. स. ८५५ नंतर काश्मीरचें राज्य उत्पलवंशांतील अवन्तिवर्मा नांवाच्या कर्तबगार पुरुषाच्या हस्तगत झालें, परंतु उत्पलवंशही फार टिकला नाहीं. इ. स. ९३९ मध्यें उत्पलघराण्यांत कोणीही राज्यकर्ता पुरुष न उरल्यामुळें तें घराणें निर्वंश झालें व काश्मीरची गादी रिकामी पडली. तेव्हां सर्व प्रजाजनांनीं यशस्कर देवाकडे राज्यपदाचे अधिकार सोंपविले. यशस्करदेवाचा मुलगा दुर्बळ व राज्य करण्यास असमर्थ आहे असें पाहून " दिविर " कुलांतिल पर्वगुप्तानें त्याजवर स्वारी केली व त्यास पदच्युत करून स्वतःस राज्याभिषेक करविला. पर्वगुप्तानंतर आणखी एका राजाची कारकीर्द झाल्यावर " दिविर " कुलाचा शेवट झाला व काश्मीरच्या राज्याचीं सूत्रें ' दिद्दा ' राणीकडे गेलीं; ह्या राणीनें आपल्या मर्जीप्रमाणें अनेक अल्पवयी राजपुत्रांना गादीवर बसविलें; तिच्या मनास वाटेल त्यास ती अधिकारापन्न करी व वाटल्यास त्यास काढून ही लावी. ' दिद्दा ' राणीचा अंत इ. स. १००४ मध्यें झाल्यावर त्या राज्याचीं सूत्रें तिच्या भावाच्या मुलानें आपल्या हातीं घेतलीं. हाच मुलगा लोहरवंशाचा संस्थापक होय. लोहरवंशाकडे काश्मीरचें राज्य आल्याकारणानें त्याची व्यवस्था नीट लागली. लोहरवंशातील पुरुष शूर असल्यामुळें काश्मीरच्या राज्यास परचक्राची भीति राहिली नाहीं व ह्यापुढील काळांतही काश्मीरचें स्वातंत्र्य अबाधित राहिलें

पंजाबांतील विशेष महत्वाचें राज्य म्हटलें तर जालंधर अगर त्रिगर्ताचें कांग्राकोटचें राज्य होय. येथील राजे सोमवंशी क्षत्रिय असून त्यांचें फार प्राचीन काळापासून राज्य होतें; ह्या राजघराण्याचा मूळ पुरुष सुशर्मन् होय. हें राज्यहि महंमदाच्या स्वारीपर्यंत

टिकाव धरूं शकलें. पण महंमदापुढें त्यास हात टेंकणें भाग पडलें. जालंधरच्या विनाशाची हकीकत मोठी मनोरंजक आहे; पण ती पुढें येणार आहे. साधारणमानानें हिमालयाच्या आसपासचीं छोटीं राज्यें एका बाजूस व पहाडांत असल्यामुळें त्यांच्या वाटेस कोणी जात नसे. असो, ह्या घराण्यांतील राजांविषयीं फारशी हकीकत सांपडत नाहीं. एका लेखावरून जयचंद्रनामक राजा इ. स. ८०४ मध्यें राज्य करीत असावा असें दिसतें. इ. स. १०४० मध्यें राज्य करीत असलेल्या राजाचें नांव इंद्रचंद्र होतें असें कल्हण म्हणतो.

पंजाबांत इतरहि राज्यें असावींत. राजतरंगिणींत पंजाबांत टेक्कराज्य, गुजर आलखान राज्य व कनोजचें मिहिर भोजराज्य. अशीं एकंदर तीन राज्यें होतीं असें वर्णन केलें आहे. पण कनोज-शिवाय इतर दोन्ही राज्यांचीं दानपत्रें, शिलालेख इत्यादि कांहींच अवशेष शिल्लक नाहींत. महंमदाच्या स्वारीचे वेळीं लाहोरच्या राजांनीं महंमदास तीव्र विरोध केला; पण शेवटीं त्यांस माघार घ्यावी लागली असें मुसलमानी ग्रंथकारांनीं लिहून ठेविलें आहे; पण ही सर्व माहिती एकतर्फी असल्यामुळें व त्यास अन्य कोणताही आधार नसल्यामुळें नक्की कांहींच लिहितां येत नाहीं.

दिल्ली हें पूर्वी अगदींच लहान गांव होतें; ह्या सुमारास तेथें अनंगपाल तोमरानें लहानसें राज्य स्थापिलें असें दिसतें * ह्या राज्याचा उत्कर्ष यापुढील दोनशें वर्षांत झाला. पण चाहमानांचीं

टीपः—टॉडच्या इतिहासांत एका शाहिरानें वर्णिलेली एक दन्तकथा दिली आहे, त्यांत असें सांगितलें आहे कीं, वि. सं. ८४८ ( स. ७९२ ) मध्यें पांडवांचा वंशज अनंगपाळ यानें इंद्रप्रस्थास पुनः पांडवांची गादी स्थापिली.

तोमरांशीं १० व्या शतकांत सारखीं युद्धें होत असत असें लेखादिकांवरून दिसतें. दिल्लीचे तोमर व सांबरचे चाहमान ह्यांचें जवळ जवळ हाडवैरच असे; कारण दोघांचींही राज्यें अगदीं लागलेलीं असत. लेखादिकांवरून चाहमान चंदनराजाचें तोमर रुद्रेणाशीं इ. स. ९१३ त युद्ध झालें, तसेंच ९४३ मध्यें वाक्पति राजानें तोमर तंत्रपालाचा पराभव केला; व वाक्पतीचा मुलगा सिंहराज यानेंहि एका तोमराचा पराभव केला वगैरे माहिती आढळते; * पण ती खुद्द तोमरांच्या लेखावरून मिळते असें नाहीं. एकंदरीनें तोमरांचे फारच थोडे लेख सांपडतात; पण जे सांपडतात त्यांवरून असें दिसतें कीं, तोमरराजे कनोजचे मांडलिक होते.

मध्यहिंदुस्थानांतील राज्यांचा विचार करणें आवश्यक नाहीं कारण मध्यहिंदुस्थान व औंध प्रांतांत स्वतंत्र राज्यच नव्हतें. हे दोन्ही प्रांत कनोजच्या ताब्यांत होते.

या सुमारास नेपाळांतील लिच्छवी वंश लयास गेला व तेथें एका रजपूत राज्याची स्थापना झाली. ह्या नव्या घराण्यासंबंधीं कोणतेच लेख आज उपलब्ध नसल्यामुळें विश्वसनीय इतिहास देणें जरा कठिणच आहे. राजांच्या अनुक्रमांची माहिती फक्त दन्तकथांवरून जमवितां येते. पण त्यांतील सत्यांश ठरविण्यास कोणताच आधार सांपडत नाहीं. एवढें मात्र खरें कीं, ह्या रजपूत राजांनीं आपला एक नवीनच शक इ. स. ८७९ मध्यें सुरू केला; पण त्यावरून ह्या घराण्यांत पूर्वी किती राजे झाले हें समजत नाहीं. तथापि साधारणमानानें हें घराणें ८०० मध्यें सुरू झालें व तें १००० च्या पुढेंही होतें असें मानण्यास हरकत दिसत नाहीं.

---

* हर्ष शिलालेख, इ० स० ९८२ एपि० इंडि. पु० १ पा. २४२,

कामरूप ऊर्फ आसामचें राज्य भास्करवर्म्यानें स्थापिलेल्या भगदत्तवंशाकडेच होतें; मध्यंतरी कांहीं कालपर्यंत कामरूपाचें राज्य बंगालच्या पालांच्या आधीन असलें तरीं त्या राज्याचीं स्वतंत्र गणना करणेंच बरोबर दिसतें; कारण आरबी लेखकांनीं त्या राज्याचा गौरवानें उल्लेख केला आहे. निदान ९ व्या व १० व्या शतकांत तरी आसामचें स्वातंत्र्य अबाधित असावें.

पूर्व व पश्चिम बंगालप्रांत हे मोंगीरच्या पालांच्या एकछत्री अमलाखालीं होते, हें मागें सांगितलेंच आहे. तसेंच पहिल्या भागांत ओरिसाचा इतिहास विस्तारानें सांगितला आहे; ओढ्याप्रांत या कालांतही केसरीघराण्याच्याच अमलाखालीं होता. केसरीघराण्यांतील राजे श्रद्धाळू व धर्मनिष्ठ होते; व ह्या काळांतील इतर राजांप्रमाणें ते शिवोपासक होते. जगन्नाथ येथें उपलब्ध झालेल्या ताडपत्रांच्या लेखांत केसरीघराणें इ. स. ११३२ पर्यंत अव्याहत चालू होतें असें लिहिलें आहे; पण तें विश्वसनीय दिसत नाहीं; कारण इतर लेखादिकावरून ओढ्यास सूर्योपासक राजघराणें ११३२ पूर्वीं राज्य करीत असावें असें दिसतें. ११३२नंतरचे ओढ्याचे राजे जगन्नाथाचे म्हणजे विष्णूचे भक्त झाले; पण शिवोपासक केसरीघराण्यानंतर सूर्योपासक घराण्याकडे ओढ्याचें राज्य चालू होतें हें म्हणणें खोटें ठरत नाहीं. परंतु हें सूर्योपासक घराणें कधीं राज्य करूं लागलें वगैरे विषयीं कांहींच माहिती अद्याप मिळाली नाहीं.

आंध्रप्रांतात यावेळीं विन्ध्यशक्ति वगैरे कैंकिल यवन राज्य करीत होते. या यवनराजांचा उल्लेख विष्णु व भागवत पुराणांत आलेला आहे. पालांच्या खलिमपुरदानपत्रावरून यवनांचें राज्य कनोजच्या साम्राज्यांत मोडत असे असें दिसतें. कनोजच्या लेखांतही आंध्रप्रांत काबीज केल्याचें वर्णन आढळतें. यवनांचें राज्य आंध्रप्रांतांत इ. स.

९०० पर्यंत चालू होतें; नंतर तें एका वैष्णव घराण्यानें काबीज केलें; त्या घराण्याची हकीगत पुढें येणार आहे.

कोसल ऊर्फ छत्तिसगडचें राज्य पूर्वकालापासून हैहय वंशाकडे होतें; ह्या कालांतही तें राज्य हैहयांकडेच होतें. बेंगीच्या चालुक्यांचें राज्यही इ. स. १०१९ पर्यंत टिकलें. साधारणपणें एका वंशाकडे सुमारें २०० वर्षें राज्य चालतें; पण या चालुक्यघराण्याकडे बेंगींचें राज्य ( ६३२ पासून ते १०१९ पर्यंत ) सुमारें ४०० वर्षें टिकलें. मद्रास इलाख्यांत लहान लहान बरींच राज्यें होतीं पण तीं सर्व मालखेडच्या राष्ट्रकूटांच्या साम्राज्यांत मोडत असत.

कांचींचें पल्लवघराणें तसेंच बादामीचें चालुक्यघराणें यावेळीं अस्तंगत झालें होतें. कांचीस पल्लवांचें नवीन घराणें पुनः स्थापन झालें पण त्या घराण्यांतील दन्तिवर्म राजाचा इ० स० ८०३ मध्यें राष्ट्रकूटांनीं पराभव केला व तेव्हांपासून तें राष्ट्रकूटांचें आंकित झालें. अखेर पल्लवघराण्याचा पुरा मोड चोलराजानीं केला त्याची हकीकत पुढें येईल. पांड्य व इतर लहान राज्यें दक्षिणेंत बरींच होतीं; त्यांतल्या त्यांत प्रमुख म्हटलीं म्हणजे चोल, होयसळ व गंग राज्यें होत; पण त्यांचा समग्र इतिहास पुढील काळांत पडत असल्यामुळें येथें फक्त त्यांचा नामनिर्देश केला आहे.

# प्रकरण १२ वें

## —समकालीन आरब लेखक—

ह्या भागांतील कालासंबंधीं मनोरंजक पण विश्वसनीय माहिती देणारीं वर्णनें आरब लेखकांनीं आपल्या प्रवासवृत्तांत लिहून ठेविलीं आहेत. त्यायोगें या कालांतील इतिहासवृत्तास बळकटी येण्याजोगी असल्यामुळें या समकालीन आरबी लेखकांचा स्वतंत्र विचार करणें इष्ट आहे. ह्या आरबी लेखकांच्या ग्रंथांचें भाषांतर फक्त फ्रेंच भाषेंत झालें आहे. त्यामुळें त्यांचें समग्र अध्ययन करणें साधारणपणें दुष्करच आहे. पण इलियटनें आपल्या इतिहासांत ह्या भाषांतरांतून बरेच महत्त्वाचे उतारे घेतले आहेत. इलियटच्या काळीं संशोधनाचें कार्य बाल्यावस्थेंत होतें. आरबीलेखकांनीं वर्णिलेल्या राज्यांचा व राजांच्या नावांचा मेळ इलियटचे काळीं बसविणें बरेंच कठीण होतें. पण आतां ती परिस्थिति बदललीं आहे. राजस्थानच्या इतिहासाचें काम कालगतीनें व संशोधकांच्या परिश्रमानें बरेंच सुलभ झालें आहे, त्यामुळें आरबी लेखकांचे ग्रंथ आतां बरेच मनोरंजक वाटतात; कारण त्यांत चित्रित केलेल्या राजकीय, सामाजिक, व धार्मिक परिस्थितींचा मेळ योग्य तऱ्हेनें बसवितां येतो; याकरितां वाचकांचे सोईसांठीं आरब प्रवाशांच्या ग्रंथांतील उतारे देणें येथें आवश्यक आहे.

इलियटनें आपल्या इतिहासांत आरबी प्रवाशांचीं नावें दिलीं आहेत त्यावरून असें दिसतें कीं, पहिला प्रवाशी सुलेमाननावांचा व्यापारी असून त्यानें आपलें प्रवासवृत्त इ. स. ८५७ च्या सुमारास लिहिलें. ह्यानें व्यापाराच्या निमित्तानें इराणच्या आखातांतून

हिंदुस्थानांत व चीनांत अनेकदां प्रवास केला. त्यानें असें लिहिलें आहे कीं. त्यानें पाहिलेल्या जगांत एकंदर चार राज्यें श्रेष्ठ होतीं; तीं म्हटलीं म्हणजे बॅबिलान, 'खलीफा' चीन, कान्स्टॉन्टिनोपल (ग्रीकांचे राज्य) व बल्हारा हीं राज्यें होत, पण त्यांतल्यां त्यांत बल्हाराचें राज्यास श्रेष्ठतमत्व दिलें पाहिजे." बल्हाराचें राज्य म्हणजे कोणतें तसेंच मानकिर हें त्या राज्याचें राजधानीचें शहर होतें तें कोठें असावें याचा उलगडा इलियटास झाला नाहीं. पण इलियट-च्यानंतर झालेल्या संशोधकांनीं 'वल्लभराय' ह्या शब्दाचा 'बल्हारा' हा आरबी भाषेंतील अपभ्रंश आहे हें नक्की ठरवलें आहे; तसेंच समुद्रापासून दूर असलेल्या 'मान्यखेट' राजधानी-चा मानकिर हा आरबी अपभ्रंश होय. ह्या काळीं राष्ट्रकूटांच्या राज्याचा विस्तार दक्षिण प्रांतांत पूर्णपणें झाला असून तें अत्यंत प्रबळ राज्य होतें हें आपणांस तत्कालीन लेखांवरून दिसतेंच. राष्ट्रकूटां-कडेच सर्व दाक्षिण देशाचें सार्वभौमत्व होतें. सुलेमान म्हणतो:— "हिंदुस्थानांतील राजे एखाद्याचें सार्वभौमत्व मान्य करीत असले तरी हे आपला कारभार पूर्णपणें स्वतंत्र रीतीनें करितात." वारंवार आम्हीं वाचकांच्या असें निदर्शनास आणिलेंच आहे कीं, हिंदुस्थानां-तील प्राचीन साम्राज्याची कल्पना अन्य प्रांतीय कल्पनेपासून अग-दींच भिन्न आहे. बरोबरीच्यांवर श्रेष्ठत्व मिळवणें व त्यांस आपलें वर्चस्व कबूल करणें भाग पाडणें हेंच सम्राटाचें लक्षण होतें. परा-जितांची राज्यें खालसा करण्याची बुद्धि आमच्या प्राचीन राजां-तून दिसून येत नाहीं. पराजित राजा आपलें राज्य स्वतंत्रपणें चालवूं शकत होता, फक्त त्यास विजयी सम्राटाचें आधिपत्य मान्य करावें लागत असून प्रसंगविशेषीं त्यास सहाय्य करावें लागे इतकेंच. असो, वल्लभराजाच्या सैन्याचा एक विशेष असा दिसतो कीं, त्या

सैन्याची उभारणी फक्त प्रसंगींच होत असे, असें नाहीं; तर त्यानें हल्लींच्या पद्धतीप्रमाणें खडें लष्कर तयार केलें होतें व त्यास तो दरमहा वेतनही देत असे, असें या प्रवासवर्णनांत नमूद आहे. त्या काळीं आरबी सैन्याचीही अशीच व्यवस्था असे—"वल्लभराजाच्या सैन्यांत गजांची तशी अश्वांचीही भरती असे. ह्या राज्यांत Tataria (तातरीया) दीनार नाणीं प्रचारांत असत व त्यावर ह्या वंशाकडे हें राज्य ज्या वर्षीं चालू झालें तोच काय तो शक असे. आरबांप्रमाणें ते कोणताही निरनिराळा शक अगर सन मानीत नाहींत." हें वर्णन जरा चमत्कारिक वाटतें; कारण राष्ट्रकूटांच्या लेखांतून कालगणना, शकमान पद्धतीनें केलेली आढळते. कदाचित् त्यांच्या नाण्यावर राज्यारोहणाचें वर्ष असेल.— "बल्हाराच्या राज्यांत आरबांचा योग्य परामर्ष घेतला जातो व या राज्यांतील प्रजाजन आरबांशीं सलोख्यानें वागतात' बल्हारा हा सर्व राजांचा किताबच आहे"

"बल्हारा राजाची जुझ्रच्या राजांशीं सारखी स्पर्धा चालू असते" यावरून असें दिसतें कीं, त्यावेळीं राष्ट्रकूटांच्या इतकीच कनोजची महती होती. जुझ्र म्हणजे गुर्जर म्हणजे कनोजचे गुर्जर राजे. "कनोजच्या सैन्यांत विशेष भरणा पटाईत घोडस्वारांचा असतो इतके शूर घोडस्वार इतर सैन्यांत क्वचितच असतात. तसेंच त्याचेजवळ उष्ट्रदळहि बरेंच आहे व त्याचे जवळ सुंदर सुंदर अश्वांचाहि भरणा बराच आहे. पण तो आरबांशीं स्नेह भावानें वागत नाहीं" त्याचे राज्याचा आकार निमुळता "Tongue (जिव्हा स्वरूपाचा) आहे" शेवटच्या वाक्यावरून असें दिसतें कीं, कनोजराज्य काठेवाडपर्यंत पसरलें होतें. "त्या देशांतील व्यवहार सोनें व चांदी यांच्या "रजानें (नाण्यांनीं नव्हे) होतो." भोज-

राजानें ' आदिवराह द्रम्म ' नाणीं प्रथम पाडविलीं असा मागें उल्लेख आलाच आहे. " या देशांत चोरांची व लुटारूंची बिलकूल धास्ती नाहीं. " ह्यावरून असें दिसतें कीं, ज्याप्रमाणें हल्लीं ग्वालेर व बुंदेलखंड प्रांतांत इंग्रजी अमदानींतही चोर, लुटारू सोंदिया वगैरेची भीति वाटते तशीं १००० वर्षांपूर्वी हे प्रांत कनोजच्या साम्राज्यांत अंतर्गत होत होते तेंव्हां नव्हती. सर्वत्र शांतता व सुबत्तेचें साम्राज्य नांदत होतें.

सुलेमानानें ' ताफिक ' राज्याचा उल्लेख केला आहे व त्याचें असें वर्णन केलें आहे कीं, ह्या राज्याचा विस्तार फारसा नाहीं; पण येथील स्त्रियांइतक्या गौरवर्ण व सुंदर स्त्रिया हिंदुस्थानांत इतरत्र नाहींत." ताफिकच्या राज्यानें कोणतें राज्य समजावयाचें? ताफिक म्हणजे औरंगाबाद असें इलियटचें म्हणणें आहे. पण तें बरोबर नाहीं. कारण दुसरा एक आरब प्रवाशी असें लिहितो कीं, तें पर्वतांच्या रांगेंत वसलें आहे; तेव्हां तें हिमालयाच्या आसपास कोठें तरी असावें असें आम्हांस वाटतें. ताफिक शब्द हा कोणत्या हिंदी शब्दाचा अपभ्रंश आहे हें नक्की ठरवतां येत नाहीं; कदाचित् पंजाबांतील कोणतें तरी एखादें संस्थान असावें; तक्का किंवा जालंधरचें राज्यहि असूं शकेल. औरंगाबादेकडील स्त्रिया गौरवर्णी व सुंदर नाहींत हें सांगावयास नकोच.

ह्यानंतर रेहमींच्या राज्याचें वर्णन आहे, तें कोणतें हें ही दुर्दैवानें निश्चित करतां येत नाहीं. " हीं तिन्हीं राज्यें जुर्झच्या सभोंवतालच्या प्रदेशांत आहेत आणि त्यांचा जुर्झशीं नेहमीं वैरभाव असतो " या वाक्यावरून रेहमींचें राज्य म्हणजे बंगालचें राज्य असें निदर्शित होतें. " या राज्याचा विस्तार बंगालच्या उपसागरा-

पर्यंत होता " असें इतर लेखक म्हणतात. त्यावरून हें रहमीचें राज्य म्हणजे बंगालचेंच राज्य असावें, असें आम्हांस वाटतें. पण रहमी हा शब्द तत्कालीन कोणत्या शब्दाचा अपभ्रंश असावा हें समजत नाहीं. " ह्या राजाजवळ ५०००० वर गजदळ आहे. " असें अत्युक्तिपर वर्णन आहे. मगध व गौड प्रांतांतील जंगलांतून विपुल हत्ती सांपडत त्यावरून हें वर्णन बंगालप्रांतासच लागू पडतें. " ह्या देशांत एक तऱ्हेचें मऊ व अगदीं पातळ वस्त्र विणलें जातें, तसें इतरत्र पहावयास सांपडत नाहीं; तें इतकें बारीक व तलमदार असतें कीं त्याचा अंगरखा आंगठींतून पलीकडे जाईल. हें वस्त्र कापसाचेंच बनवलेलें असतें व तें आम्हीं स्वतः पाहिलें आहे " ह्या वर्णनावरून असें दिसतें कीं, ह्या काळीं देखील बंगालप्रांताची (डाक्याच्या) मलमलीविषयीं ख्याति होती.

ह्यानंतर हिंदुस्थानच्या सीमेवरील तीन राज्यांचें वर्णन आढळतें; तीं तीन राज्यें येणें प्रमाणें:–१ " कशबिन " चें राज्य; येथील लोक श्वेतवर्णी आहेत, त्यावरून हें राज्य हिमालयांत असावें असें दिसतें–– २ किरंजचें राज्य; ३ सेरंदीब ( सिंहलद्वीप ) चें राज्य. सुलेमाननें आपलें प्रवासवृत्त इ. स. ८५० मध्यें लिहिलें व तें तत्कालीन हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीचें बरोबर आदर्शभूत वर्णन आहे, ह्यांत संशय नाहीं. राष्ट्रकूट, प्रतीहार व पाल हे दक्षिण मध्यदेश व बंगाल प्रांताचे त्या वेळीं वैभवशाली राजे होते हें वर आलेंच आहे. सुलेमानच्या प्रवासवृत्तांत तत्कालीन सामाजिक व धार्मिक परिस्थितीचें बरेंच दिग्दर्शन आहे, पण त्याचा विचार स्वतंत्र प्रकरणांत होईल.

इब्न खुर्दादबा या प्रवाशानें आपलें प्रवासवृत्त लिहिलें आहे व तें ह्या काळासच अनुलक्षून आहे. कारण इब्न खुर्दादबा इ० स०

९१२ च्या सुमारास मरण पावला अशी माहिती सांपडते. हा प्रवाशी म्हणतो: "हिंदुस्थांनांतील श्रेष्ठतम राज्य बल्हाराचें होय; जाबल ( जावा ) ताफन, जुर्झ, रहमी व कामरून ( कामरूप ) इत्यादि अनेक राज्यें आहेत. रहमीच्या राज्याचें इतर प्रांतांशीं व्यापारी दळणवळण जहाजांच्या योगानें आहे.'—रहमींच्या राज्यांत ९००० हत्ती आहेत; व ह्या देशांत कापूस, कापड व 'अलोवुड' (मुवासिकल्लाकुड) तयार होतें." या वर्णनावरूनही रहमीचें राज्य ' म्हणजे बंगालचें राज्य असावें हें उघड दिसतें ह्या वर्णनानंतर यानें हिंदुस्थानांतील सात जातींचें सविस्तर वर्णन दिलें आहे; पण त्याचा आम्हीं स्वतंत्रपणें विचार करणार असल्यानें आपण तिसऱ्या प्रवासवृत्ताकडे वळूं.

अल–मसूदी नामक प्रवाश्यानें इ० स० ९५३ मध्यें लिहिलेल्या प्रवासवृत्तांत जास्त बारकाईचें वर्णन आढळतें. आपल्या कालाच्या पूर्वींच्या हिंदुस्थानच्या इतिहासाचें दन्तकथात्मकवर्णन केल्यावर तो म्हणतो:—' कोरेश राजा ( श्रीहर्ष ) नंतर साम्राज्याची एकवटता मोडून सिंध, कनोज व काश्मीर हे प्रांत अलग झाले व तेथलि रीतिभातींत व समाजव्यवस्थेंत व शासनपद्धतींत फरक पडला. मानकिर येथें बल्हारा राज्य करूं लागला. सर्वत्र भिन्न भिन्न भाषा सुरू असून आपसांत युद्धें चालू असतात. बल्हारा राजा सर्वांत श्रेष्ठ होय. काश्मीर, ताफीन सारखीं राज्यें समुद्रापासून फारच दूरवर पर्वतश्रेणींत बसलेलीं आहेत. बल्हाराचे सैन्यांत पायदळाचाच भरणा विशेष करून आहे; कारण बल्हाराची राजधानीं डोंगराळ प्रदेशांत आहे. त्याच्या जवळ गजसैन्यहि आहेच; पण पायदळाची संख्या अगणित आहे.'—' समुद्रापासून दूरच्या प्रदेशांत वसलेलें पण प्रख्यात असें ' बाउरा ' चें राज्य

असून तो कनोजचा अधिपति आहे. कनोजच्या सर्व राजांचेंच हें नांव आहे. ह्यांचें सैन्य पश्चिम, दक्षिण व उत्तरेकडे सदा जय्यत असतें "—

"बाउरा" हा शब्द कोणत्या शब्दाचा अपभ्रंश असावा हें नीटसें लक्ष्यांत येत नाहीं. परकीयांनीं बनवलेले एतद्देशीय शब्दांचे अपभ्रंश अगदींच विलक्षण असतात, व त्यांचा मूळ शब्दांशीं मेळ बसणें दुष्कर होतें. विजापुरच्या 'आदिलशहास' पोर्तुगीज लोक 'इदिलकाव' म्हणत; परंतु ह्या शब्दावरून आदिलशहा असा बोध होणें जरा कठिणच आहे. असो इतर आरब लेखांतही 'बाउरा' हें नांव आढळतें व त्यायोगें कनोजचें प्रतीहार घराणें असाच अर्थ घ्यावयास हवा असें आम्हांस वाटतें. 'रा' हा राय वाचक शब्द होय असें 'बल्हारा' (—वल्लभराय) ह्या शब्दावरून दिसतें; 'बाउर हा प्रतीहार शब्दाचाच अपभ्रंश घेतला तरच या शब्दाची संगति जुळते व प्रतीहार राय (पडिहाररा) असा शब्द जुळतो.

'मिहरान' नदी (सिंधु) सिंधच्या पलीकडील उंचवट्याच्या प्रदेशांतून, व कनोज, काश्मीर, कंदहार व ताफन' ह्या राज्यांतून वहात येते" यावरून असें दिसतें कीं, कनोजच्या साम्राज्याचा विस्तार पंजाबांतही झाला होता, व ताफनचें राज्य हिमालयच्या आसमंतांत होतें.

"कंदहारच्या राजास 'हाहज' असें म्हणतात. हाहज हा वास्तविकपणें सर्वच राजांचा किताब आहे. कंदहारास रहबूदांचा (रजपुतांचा) देश असें म्हणतात." काश्मीरच्या राजास 'राय' असा किताब आहे; काश्मीर सिंधप्रांताचाच एक भाग आहे" "हाहज" म्हणजे काय हें अद्याप गूढच आहे; पण कंदाहारास यावेळीं रजपूतांचें राज्य होतें त्याची साक्ष वरील उताऱ्या-

वरून पटते. काश्मीर सिंधप्रांतांत मोडतें हें म्हणणें अगदींच अनभिज्ञतेचें दर्शक आहे; कदाचित् आरबांनीं सिंध जिंकल्यावर त्यांनी काश्मीराकडे आपला मोर्चा वळवला असेल व काश्मीरच्या राज्याची हांव धरली असेल.

"कनोजच्या राजाचें प्रचंड सैन्य चारी दिशांस सदा सज्ज असे; प्रत्येक दिशेचें सैन्य कमींत कमी ७ ते ८ लक्ष असे. उत्तरेकडील सैन्याची कामगिरी अशी होती कीं, त्यानें मुलतान राजाचा व सरहद्दीवरील मुसलमानांचा बंदोबस्त ठेवावा. दक्षिणेच्या सैन्यानें मानाकिरच्या बल्हाराचा बंदोबस्त ठेवावा." या वर्णनावरून कनोजच्या दराऱ्याची साक्ष पटते; कनोज जोंपर्यंत वैभवाच्या शिखरावर होतें तोंपर्यंत त्यानें इतर लोकांची छाप आपणांवर चालूं दिली नाहीं. दक्षिणच्या राष्ट्रकूटांचें आरबांशीं सख्य होतें व दोघेहि मिळून कनोजवर स्वारी करीत; पण कनोजच्या भरभराटीच्या काळांत ह्या दोघांचेंहि कांहीं चाललें नाहीं. तथापि ह्या प्रवाशाच्या वर्णनावरून हिंदूंच्या मूर्खपणाची व भोळसटपणाची चांगलीच कल्पना येते; कारण हा प्रवाशी पुढें असें लिहितो कीं, "मूर्तिपूजक धर्मभ्रष्ट लोक जेव्हां मुलतानवर स्वारी करण्याची तयारी करतात व मुलतानी लोकांची त्यांच्याशीं तोंड देण्याची तयारी नसते, त्यावेळीं हे मूर्तिपूजकांस सूर्याची मूर्ति फोडण्याची भीति घालतात; त्याचा परिणाम असा होतो कीं, ते आपलें सैन्य माघारें नेतात" याहून हिंदूंच्या भोळसटपणाचा आणखीं काय पुरावा हवा!

अलमसूदीनें शेवटीं रहमीराज्याचें वर्णन केलें आहे. रहमीच्या राज्याचा विस्तार समुद्र किनाऱ्यापर्यंत आहे; रहमीचे सरहद्दीवरील जूर्झ व बल्हाराराजांशीं नेहमीं युद्ध सुरू असतें; ह्या राजाच्या दुसऱ्या सरहद्दीवर कामन राज्य आहे; तेथील प्रजाजन फारच

सुरेख आहेत; त्यांच्यांत कानाला भोंकें पाडण्याची चाल आहे. (" कामनचें राज्य म्हणजे कामरूप ऊर्फ आसामचें राज्य होय) येथील लोक धर्मनिष्ठ हिंदु आहेत."

४ अल्इस्तारवरी नांवाचा प्रवाशी इ. स. ९५१ च्या सुमारास हिंदुस्थानांत आला होता. त्यानें आपल्या प्रवासवृत्तांत लिहिलें आहे; " कमबाया (खंबायत) ते सैमूर (चेऊल) पर्यंत बल्हाराच्या राज्याचा विस्तार आहे " ह्यावरून दक्षिण व मध्यगुजराथ तसेंच बराच कोंकणप्रांत राष्ट्रकूटांच्या राज्यांत यावेळीं मोडत असे हें उघड दिसतें. " बल्हाराच्या राज्यांत पुष्कळच सामन्त आहेत " म्हणजे बल्हारा सम्राट असला तरी मांडलिकांचें राज्य मांडलिकांकडे असे खालसा होत नसे असें स्पष्ट दिसतें. ह्या मांडलिकांतच लाट उर्फ गुजराथदेशच्या मांडलिकांची गणना होते " येथील लोक काफर आहेत पण ह्या राज्याच्या एका भागांत मुसलमानहि वस्ती करून राहिले असून त्यांचेवर मुसलमानांचाच अंमल आहे व त्यांनीं तेथें मशिदीहि बांधिल्या आहेत " ह्यावरून दक्षिणचे हिंदु लोक कनोज व मध्यप्रांतांतील हिंदूंपेक्षां जास्त परमतसहिष्णु म्हणजे कमी कट्टे हिंदु होते असें उघड दिसतें.

५ इब्न् हौकलचे प्रवासवृताचा काल इ. स. ९७६ आहे; त्यांत तो म्हणतो:— " कंबायत (खंबायत) ते सैमूर (चौल) पर्यंत बल्हाराच्या राज्याचा विस्तार असून त्यांत अनेक मांडलिक राजे राज्य करीत आहेत; बल्हाऱ्याची राजधानी मानाकिर येथें आहे; कंबायत ते सैमूरपर्यंत एकसारखीं खेडीं लागलीं असून सर्वत्र पिकें उभीं आहेत. " ह्यावरून गुजराथ व कोंकणप्रांत राष्ट्रकूटांच्या अमदानींत पूर्ण भरभराटींत होतें हें सहज दिसून येईल.

# पुस्तक पांचवें

# सामान्य परिस्थिति

## प्रकरण १३ वें

### भाषा.

आरबी प्रवाशांनीं असें लिहून ठेविलें आहे कीं, हिंदुस्थानच्या इतिहासाच्या मध्ययुगीन कालांत हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रदेशांतून निरनिराळ्या बऱ्याच भाषा प्रचलित होत्या. त्या कोणत्या असाव्यात हा साहजिकपणेंच प्रश्न उद्भवतो. महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी व पैशाची ह्या भाषांपासून अनुक्रमें सध्यांच्या मराठी, हिंदी, बंगाली व पंजाबी इत्यादि भाषा तयार झाल्या आहेत व त्या एके काळीं दक्षिणेंत, मध्य देशांत, पूर्वेकडे व वायव्येकडील प्रांतांत चालू होत्या. महाराष्ट्री इत्यादि भाषांचा लोप होऊन ह्याच सुमारास ( इ. स. ८००–१००० ) त्यांचींच विकृत रूपें म्हणजे मराठी इत्यादि भाषा सुरू झाल्या असाव्यात असें मानण्यास थोडाबहुत शिलालेखांचा आधार मिळतो. इ. स. ८०० ते १००० या दरम्यानच ह्या भाषांचा प्रादुर्भाव झाला असावा; या नवीन भाषांत लिहिलेले सुमारें इ. स. ८०० चे पूर्वींचे लेख अद्याप उपलब्ध झाले नाहींत.

तेव्हां मराठी इत्यादि भाषा त्यापूर्वी प्रचलित असाव्यात असें दिसत नाहीं. हा आर्यभाषांचा विचार झाला; अनार्य अगर अगदीं दक्षिण टोकांकडे प्रचलित असलेल्या तामिळ, मल्याळी, कानडी व मद्रास-कडील तेलगू ह्या भाषा मूळ तामिळ भाषेचींच निराळीं रूपें आहेत. या भाषांविषयीं आमचें असें मत आहे कीं, इ. स. ८०० ते १००० या दरम्यानच तामिळ भाषेस हे नवपल्लव फुटले असावेत; व त्याचीं कारणें व मराठी इत्यादि भाषांच्या प्रादुर्भावाचीं कारणें एक असा-वीत. पण दक्षिणेकडील या भाषांचा सविस्तर विचार या प्रकरणांत येणें शक्य नाहीं.

बौद्धधर्माच्या उच्छेदानें व आर्यधर्माच्या पुनः संस्थापनेनें हिंदु-स्थानच्या धार्मिक व राजकीय परिस्थितींत एक विलक्षण क्रांति घडवून आणिली बौद्धधर्माचा प्रसार विशेषतः परकीय प्रदेशांतील लोकांतच झाला होता, हिंदुस्थानांत विशेष नव्हता. हल्लींच्या काळीं देखील परकीयांचाच बौद्धधर्माकडे विशेष ओढा दिसतो. त्याचें कारण असें आहे कीं, सनातन आर्यधर्म वेदादि ग्रंथांस प्रमाण मानतो; शिवाय बौद्धधर्मांत कोणाचाहि प्रवेश होऊं शकतो व बौद्धधर्म वेद प्रमाण धरीत नाहीं. बौद्धधर्म प्राचीन परंपरा झुगारून देतो तर आर्यधर्म प्राचीन परंपरेस बहुमान देतो. असो; या सुमारास आर्यधर्माच्या पुनः संस्थापनेबरोबर पूर्वींच्या क्षात्रिय राजघराण्यांस लोकांकडून बहु मान मिळूं लागला व लोकमताचा त्यांस पाठिंबा असल्यामुळें परदेशीय राजकुलांप्रमाणें एतद्देशीय वैश्य व शूद्र राज्यकुळें मावळूं लागलीं. क्षत्रिय राजे राज्य करूं लागल्याबरोबर त्यांनीं सं-स्कृत विद्येस उत्तेजन दिलें. तसेंच बौद्ध व जैन धर्मांचा ऱ्हास झाल्या कारणानें प्राकृत भाषा नष्ट होऊं लागल्या. संस्कृत विद्येच्या

पुनरुज्जीवनाचा लोकांच्या व्यवहारांतील भाषेवर परिणाम होऊं लागला, व प्राकृत भाषेंतील ढिलेपणा जाऊन हल्लीं प्रचारांत असलेला जोरकसपणा त्या भाषांस प्राप्त होऊं लागला. आर्यधर्मग्रंथांचा विशेष अभ्यास सुरू झाल्याकारणानेंहि संस्कृत भाषेचा सर्वत्र प्रसार होऊं लागला. ह्या सुमारास संस्कृत भाषेच्या प्रसारास आणखीं एक बलवत्तर कारण मिळालें; तें म्हणजे शांकरमताचा विजय हें होय. शंकराचार्यांचा उत्कर्ष इ. स. ८०० च्या सुमारासच झाला व त्यांच्या मताची छाप सर्वत्र कायम झाल्याकारणानें व त्या मताचा प्रसार संस्कृत भाषेंतूनच होत असल्यामुळें सामान्य लोकांच्या भाषेंत संस्कृत शब्दांचा जास्त भरणा होऊं लागला; व हळू हळू संस्कृत भाषेपासून मराठी इत्यादि संस्कृतशब्द-प्रचुर भाषा तयार झाल्या. तामिळ भाषेपासून तयार झालेल्या भाषांचाहि असाच इतिहास आहे. आतां ह्या नवीन प्रचारांत आलेल्या कोण कोणत्या भाषा होत्या हें पाहूं.

अलमसूदी नामक आरबी प्रवाशानें आपलें प्रवासवृत्त लिहून ठेविलें आहे, त्यांत इ. स. ९४३ च्या सुमाराच्या पूर्व व पश्चिम प्रदेशांतील लोकस्थितीचें वर्णन सांपडतें. त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, बल्हाराच्या मानाकिर राजधानींतील रहिवाशी 'कीरीय' भाषा बोलतात. कीरीय हें नांव कीर गांवावरून प्रचलित झालें आहे; "पश्चिम किनाऱ्यावरील लोकांत—म्हणजे सैमुर, सुपारा, ठाणा इत्यादि प्रांतांत—लारीय भाषा प्रचारांत आहे; लारीय हें पश्चिम किनाऱ्यास व्यापणाऱ्या समुद्राचें नांव आहे"—(इलियट भा. १). ह्या वर्णनांत त्याकाळीं प्रचारांत असलेल्या—विशेषतः ठाणा, सोपारा व घाटमाथ्यावरील प्रदेशांत चालू असलेल्या—मराठी व गुजराथी भाषांचा उल्लेख नाहीं. दक्षिण गुजराथेंत ( लाड

किंवा लाट प्रांतांत ) एके काळीं लाडी नावांची भाषा प्रचारांत असावी व तिचेंच रूपांतर हल्लींच्या गुजराथी भाषेंत झालें असावें, परंतु " किरीया " ह्या शब्दाचा महाराष्ट्र ( मराठी ) भाषा असाच अर्थ धरिला पाहिजे. कारण ह्या भाषेचें वर्णन कीरदेशाची भाषा असें मोघम रीतीनेंच केलेलें आहे. हिंदीभाषांतील नावांचे आरबी उच्चार अगदीं विलक्षण असतात; कित्येक वेळां आरबी अपभ्रंशाचा मूळ हिंदी शब्दांशीं मेळ बसवतां येत नाहीं. बल्हारा हा वल्लभराय शब्दाचा आरबी भाषेंतील अपभ्रंश आहे. मानकिर हें मान्यखेट शब्दांचें रूपांतर होय; व ह्या कीर शब्दावरूनच मान्यखेटच्या भाषेंत " किरीया " भाषा असें नांव पडलें असावें. " किरिया " शब्दांत नकार नसल्यानें किरिया भाषेचा कानडी भाषेशीं संबंध दिसत नाहीं; तसेंच कानडी भाषा मान्यखेट देशांत रूढ असली तरी पूर्वीं नसावी. ह्यावरून असें दिसतें कीं, किरिया भाषेनें मान्यखेट प्रांतांत पूर्वीं रूढ असलेली मराठी भाषाच समजली पाहिजे. अद्यापि मराठी भाषेचें स्वरूप पूर्णपणें बनलें नव्हतें व मराठी हा शब्दहि रूढ नव्हता असें दिसतें. मराठी भाषा बाल्यावस्थेंत असल्यामुळें हल्लींच्याप्रमाणें ती नियमबद्ध व एकरूपी नव्हती. प्रांतभेदांप्रमाणें तिच्या उच्चारांत व जोरकसपणांत, तसेंच वाक्यरचनेंत भेद दिसत असे. त्यांतून त्या काळीं निरनिराळ्या प्रांतांतील लोकांत दळणवळण फारच कमी असल्यामुळें भाषेंत हल्लींच्या मराठी भाषेंतल्याप्रमाणें एकवटता दिसून येत नसेल व त्यामुळें आरबी प्रवाशांस उत्तरकोंकण—पट्टींतील म्हणजे ठाणें येथें रूढ असलेली भाषा घाटमाथ्यावरील ( म्ह० मान्यखेटच्या ) भाषेहून निराळी वाटणें अगदीं साहजिक होय. हल्लीं व्याकरणशास्त्रानें कायम झाल्यामुळें व लोकांतील दळणवळण वाढ-

त्या कारणानें सर्व मराठी प्रांतांतील—देश, खानदेश, कोंकण, बडोदा, वऱ्हाड व नागपूर—सुशिक्षितांच्या भाषेंत एकवटता प्राप्त झाली आहे. तरी पण खालच्या वर्गांतून बोलली जाणारी मराठी भाषा सुशिक्षित लोकांच्या भाषेहून या प्रान्ता प्रान्तांत भिन्न वाटते. कल्याण, भिवंडी येथील मुसलमान लोक मराठीच भाषा बोलतात; पण ती भाषा ज्याप्रमाणें सुशिक्षितांच्या मराठी भाषेहून भिन्न, तशीच त्या प्रांतातील अडाणी लोकांच्या मराठी भाषेहून ही ती भिन्न वाटते. त्याप्रमाणेंच उत्तर कोंकणांतील मुसलमानांच्या मराठी भाषेंत व बोलण्याच्या पद्धतींत दक्षिण कोंकणांतील मुसलमानांच्या बोलण्याच्या भाषेहून बराच फरक दिसून येतो. गोवें प्रांतांतील लोकांची मराठी भाषा तर एक निराळ्या तऱ्हेचीच मराठी भाषा वाटते. मराठी भाषेच्या निरनिराळ्या प्रकारांचें सूक्ष्म परीक्षण केलें असतां प्राचीन महाराष्ट्री प्राकृत भाषेपासून हल्लींची मराठी भाषा संस्कृताच्या सहाय्यानें कशी तयार झाली हें शास्त्रयुक्त ठरवतां येईल.

संस्कृतभाषेप्रमाणें सर्व प्राकृतभाषा एके काळीं व्यवहारांत प्रचारांत असाव्यात. संस्कृत नाट्यशास्त्राचा असा एक नियम आहे कीं, नाटकांतील स्त्रिया, नोकरचाकर इत्यादिकांचे तोंडीं प्राकृत भाषाच असावी. नाटकांतील प्राकृत पद्यें, प्रगल्भ विचार महाराष्ट्री भाषेंत असावेत व स्त्रिया वगैरेचीं भाषणें शौरसेनी भाषेंत असावीं. नोकर लोकांची भाषा मागधी व चोर लुटारू इत्यादि लोकांची पैशाची भाषा असावी. ह्यावरून असें दिसतें की, निरनिराळ्या प्रांतांतून जसें भाषेचें भिन्नत्त्व दिसून येतें त्याप्रमाणेंच निरनिराळ्या प्रांतांतील लोकांचे मुख्य धंद्यांतही वैशिष्ट्य असावें. हल्लींप्रमाणेंच प्राचीन काळीं महाराष्ट्रांत विद्वानांचाच भरणा विशेष होता. नोकरचाकर इत्यादिकांचा भरणा पूर्वेकडील प्रदेशांतून होत असे व चोर, मारे-

करी हे वायव्य प्रदेशांतून येत असावे. ह्या लोकांच्या भाषाही भिन्न असल्यामुळें नाटकादिकांतून अशा तऱ्हेच्या लोकांची भाषा त्या त्या प्रांताप्रमाणें ठेवणें भाग पडलें. म्हणजे एके कांळीं प्राकृत भाषा प्रचारांत असाव्यात हें उघडच दिसतें; पण या प्राकृत भाषांचा ८ ते ९ व्या शतकांमध्यें व्यवहारांतून लोप झाला असावा व त्याऐवजीं मराठी इत्यादि भाषा सुरू झाल्या असाव्यात असें दिसतें. संस्कृतप्रमाणेंच प्राकृतभाषांनाही बोललेल्या भाषेचें स्वरूप जाऊन मृतभाषांचें कृत्रिम व अस्वाभाविक रूप यावेळीं प्राप्त झालें होतें. प्रसिद्ध राजशेखराचें नाटक महाराष्ट्री भाषेंत लिहिलेलें आहे व त्याचा प्रयोग कनोजमध्यें यावेळीं झाला होता. पण तें फक्त सुशिक्षित विद्वानांसच समजलें असावें असा आमचा तर्क आहे. राजशेखराचें महाराष्ट्री भाषेंत लिहिलेलें नाटक आज मराठी वाचकांस बहुतेक दुर्बोध आहे व त्यावरूनच दोन्ही भाषांतला फरक समजून येणार आहे.

त्या नाटकाच्या भाषेची घाटणी खालीं वर्णिल्याप्रमाणें आहे. ह्या नाटकांतील प्रत्येक महाराष्ट्री शब्द म्हणजे प्रत्येक संस्कृत शब्दाचें सौम्य केलेलें रूप होय. पण हल्लींच्या मराठींत अशा तऱ्हेनें संस्कृतापासून बनलेल्या म्हणजे तद्भव शब्दांचा भरणा महाराष्ट्रीभाषेइतका नाहीं तर संस्कृतच्या बरहुकूम तयार झालेल्या व संस्कृताहून भिन्न नियमान्वयें रूपें बनणाऱ्या शब्दांचाच विशेष भरणा आहे. हल्लींच्या भाषा संस्कृतावरूनच बनलेल्या आहेत. त्यांत संस्कृत शब्द जसेच्या तसे घेतलेले आहेत; फक्त त्यांच्या विभक्त्यांचीं व क्रियापदांचीं रूपें संस्कृत व्याकरणापेक्षां भिन्न तऱ्हेनें बनलेलीं आहेत हें आर्योत्पन्न भाषेविषयीं झालें; अनार्यभाषांविषयीं असेंच आहे. त्यांच्यांतहि संस्कृत शब्दांचाच भरणा यावेळीं विशेष होऊं लागला. फक्त त्यांच्या नामांच्या विभक्त्या वगैरे संस्कृत पद्धतीप्रमाणें

न बनतां त्या त्या भाषेंतील प्रचाराप्रमाणें बनल्या. कानडी भाषा अशाच तऱ्हेनें या काळीं बनली असावी. कानडी भाषा सध्यां ज्या भागांत आज प्रचारांत आहे व पूर्वीं होती तो देश मुख्यतः महाराष्ट्रांतच मोडतो. त्यास दक्षिणमहाराष्ट्र असें अद्यापि नांव आहे. पण त्या प्रदेशांत कर्नाटकी भाषेचा प्रसार कां व कसा झाला हें अद्याप एक गूढ आहे. ह्या इतिहासाच्या पहिल्या पुस्तकांत असें दाखवलेंच आहे कीं, ८ व्या शतकापूर्वीं त्या प्रदेशांत महाराष्ट्री भाषेचाच फैलाव झालेला होता. ४ थ्या शतकांतील उपलब्ध लेखांवरून सध्यांच्या कानडी भाषेच्या मुलखांत महाराष्ट्री भाषा उत्तान स्वरूपांत प्रचलित होती असें निर्विवाद सिद्ध आहे. पण ८ व्या शतकाच्या शेवटीं शेवटीं या देशांत कानडी भाषाच विशेष जोरांत आली असें दिसतें. कारण, युवराज गोविंदा ( २ रा ) च्या आलासताम्रपटांत असें म्हटलें आहे कीं, दन्तिदुर्गानें अल्पशा सैन्यानिशीं कांची, केरळ, चोल, पांड्य, श्रीहर्ष व वज्रट इत्यादिकांस पराजित करणाऱ्या कर्नाटक राजाचा पराभव केला. ( एपि. इंडि. ६, २६०). ह्याचाच अनुवाद गोविंदराजाच्या इ. स. ७९४ च्या पैठणच्या लेखांत केला आहे. कृष्णाराजाच्या दानपत्रांत ( इ. ७७२ ) हीं असेंच लिहिलें आहे. याचा अर्थ असा कीं, ८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत चालुक्यांचें बदामी येथील राज्य कर्नाटकी मुलखांत मोडे तर उत्तरेकडील राष्ट्रकूट राजे आपणास मराठे अगर रट्ट असें म्हणवीत असत. पण ८ व्या शतकाच्या पूर्वीं बदामीच्या चालुक्यांस महाराष्ट्रीच म्हणत असत; कारण ह्यूएनत्संगानें आपल्या इ. स. ६४० च्या प्रवासवृत्तांत असें लिहून ठेविलें आहे कीं, बदामीचा पुलकेशी हा **महाराष्ट्राचा** राजा होता म्हणजे महाराष्ट्राची त्या वेळची मर्यादा नर्मदेपासून तुंगभद्रेपर्यंत समजली जात असावी. पण ह्यानंतर दीड शत-

काच्या अवधींत बदामीराज्याची कर्नाटकी प्रांतांत कानडी भाषेच्या फैलाव्यामुळें गणना होऊं लागली. इ. स. ८ व्या शतकांत कानडी भाषेचा उत्तरेकडच्या गौडीय भाषांप्रमाणेंच उदय होऊन कृष्णे-पर्यंत जोरानें प्रसारही झाला.

तेलगू भाषाहि या सुमारास उदय पावली असें दिसतें. बदामीच्या चालुक्यांचीच एक शाखा पूर्वेकडे वेंगीस राज्य करीत होती. ह्या शाखें-तील लोकांस आंध्र किंवा तेलगू असें म्हणतात. आंध्र किंवा तेलगू हें आर्य चालुक्यच होत. पण ह्यावेळीं त्यांची भाषा तेलगू झाली; आंध्र लोक हे बदामी चालुक्यांचें सार्वभौमत्व मान्य करीत असत, पण पुढें कर्नाटकच्या ( बदामीच्या ) चालुक्यांचा राष्ट्रकूटांनीं पराभव केल्या-मुळें महाराष्ट्राचें सार्वभौमत्व राष्ट्रकूटांकडे आलें. प्रथम तेलगू चालु-क्यांनीं राष्ट्रकूटांस जुमानलें नाहीं; पण शेवटीं तरवारीच्या जोरावर राष्ट्रकूटांनीं त्यांना आपलें वर्चस्व कबूल करणें भाग पाडिलें. आलास-ताम्रपटांत राष्ट्रकूटांच्या तेलगू चालुक्याशीं झालेल्या झगड्याचें वर्णन आहे. ह्यापुढील दानपत्रांतून वगैरे ह्या चालुक्यांच्या उपशा-खेस " कलिंग किंवा तेलगू " अशी संज्ञा आहे. याचा अर्थ असा कीं, पूर्व चालुक्यांचे प्रांतपरत्वें भाषा व आचार बदलले, त्यांनीं तत्प्रांतीय लोकांशी रोटीबेटी व्यवहार चालू केले व त्यांची मूळची भाषाही बदलली. ते आपणांस आपल्या लेखांतून वगैरे ' चालुक्य ' म्हणवतात पण अन्य प्रांतीय लोक त्यांस कलिंग असेंच समजतात.

या कालांतच मागधी भाषेपासून बंगाली भाषा वरील मराठी इत्यादि भाषांप्रमाणेंच त्या प्रान्ताच्या विशिष्ट प्राचीन लकबीला धरून तयार झाली असावी. पश्चिम व पूर्व हिंदी भाषेचा अभ्यास केला तर अशा तऱ्हेचेंच साम्य दिसून येईल. पण हा भाषाशास्त्राचा स्वतंत्रच विषय असल्यामुळें येथें त्याचा विस्तार न करतां फक्त दिग्दर्शन

केलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हल्लीं हिंदुस्थानांत व्यवहारांत प्रचलित असलेल्या एतद्देशीय भाषांचा उदय इ. स. ८०० ते १०००या दरम्यानच झाला असें दिसतें. याच्या पुष्ट्यर्थ डाक्तर ग्रीयरसन यांच्या Linguishe Survey of India या ग्रंथांतून हिंदुस्थानांत निरनिराळ्या भाषांच्या इतिहासासंबंधें लोटक उतारे पुढील टिप्पणींत दिले आहेत.

---

# प्रकरण १४ वें.

## धार्मिक परिस्थिति.

या दोन शतकांत ( ८०० ते १००० पर्यंत ) हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांत व लोकांत कोणकोणत्या धार्मिक समजुती रूढ होत्या, त्यांच्या आचरणांत विशेष कोणत्या गोष्टी दिसून येत असत, इत्यादिविषयीं थोडा फार विचार करणें जरूर आहे. प्रथम तत्कालीन आरबी लेखकांनीं काय लिहून ठेविलें आहे हें पाहूं. अल् इद्रिसी नांवाच्या ११ वे शतकांतील प्रवाशानें असें लिहिलें आहे कीं, हिंदुस्थानांत निरनिराळे ४२ पंथ आहेत. कांहीं ईश्वर मानतात तर कित्येक प्रेषित पुरुष मानीत नाहींत; कांहीं तर अजिबात नास्तिक आहेत. कांहींचा खोदलेल्या मूर्तीवर संसारतारक म्हणून विश्वास असतो तर कांहीं फक्त स्वयंभू दगडाची घृतादिकानें पूजा-अर्चा करतात; कांहींची श्रद्धा अग्नीवर असते व शेवटीं ते आपणांस अग्नीस अर्पितात; कांहींची श्रद्धा सूर्यावर असते व ते त्यासच ईश्वर

व जगन्नियंता असें समजतात; कांहीं वृक्षादिकांचें पूजन करतात तर कित्येक नागांची सेवा करतात; आणि मोठमोठ्या नागांना ते विस्तीर्ण शाळांतून ठेवतात व त्यांस बाहेरून दूध वगैरे खाऊं घाल-तात. कित्येक असे आहेत कीं, ते हे सर्व प्रकार झूट मानतात; त्यांचा कशावरही विश्वास नसतो" दुसरा एक प्रवाशीही असें म्हणतो कीं, हिंदुस्थानांत एकंदर ४२ धर्म आहेत. मुसलमानी लोक म्हणजे पक्के एकेश्वरवादी व मूर्तिपूजेचे द्वेष्टे; त्यांस वरील हिंदुस्था-नांतील प्रकार विपरीत भासले असतील यांत नवल नाहीं व त्यांस एका मोठ्या धर्माचेच हे अनेक प्रकार आहेत असें लक्षांत आलें नाहीं. हिंदुधर्म हा बहुशाखामय महान वृक्ष आहे; त्या वृक्षाचा जीवनरस वेदमय आहे; सर्व शाखांचें एकाच जीवनरसानें पोषण होतें; पण भिन्न पुरुषांच्या विचारवैचित्र्याप्रमाणें हे पंथ निराळे भासतात. ह्या धर्मांत अनेक पंथ व परमार्थाचें मार्ग आहेत, तथापि त्या सर्वांचेंहि ध्येय एकरूप असल्यामुळें पंथा पंथांतून द्वेष, कलह, किंवा आग्रहबुद्धि दिसून येत नव्हती. असो, वस्तुतः पाहतां या निर-निराळ्या पंथांस एकरूपता या दोन शतकांतच प्राप्त झाली. यापूर्वीं पंथा पंथांत तीव्र मतभेद असे. यावेळीं मात्र सर्व पंथांचें एकीकरण झालें होतें. लोकांत शिव, विष्णु, आदित्य, देवी व गणेश या पांच देव-तांच्या पृथक् पृथक् उपासना चालू होत्या. तसेंच वृक्षादिकांचीहि पूजा लोकांत दिसून येत होती. पण त्यामुळें उपास्यदेवतांप्रमाणें लोकांचे धर्महि भिन्न होते असें मात्र नाहीं. सर्वच उपासकांचा वेदांवर दृढ विश्वास होता व वेदांसही बहुविध उपास्यें मान्य आहेत अशी समजूत होती. तेव्हां खरोखर पाहतां हिंदुस्थानांत यावेळीं एकच धर्म प्रचलित होता असेंच म्हटलें पाहिजे. कारण मगधाखेरीज इतर प्रांतांतून बुद्धधर्म जवळ जवळ नामशेषच झाला होता; व जैन

धर्माचा अद्याप विशेष प्रसार झाला नव्हता. तेव्हां हिंदुधर्माशिवाय देशांत इतर धर्मच नव्हता असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. या धर्मांत सर्वच उपासनेचें सारखेंच महत्त्व असल्यामुळें लोकांत अग्निहोत्राप्रमाणें वृक्षपाषाणांच्याहि उपासना दिसून येत आणि त्यांतल्या त्यांत शिव, विष्णु, गणेश, आदित्य व देवी यांच्या उपासना सर्वमान्य झाल्या होत्या.

या पंचायतनांपैकीं कोणत्या तरी देवाचें महत्व पुराणांतून वर्णि-लेलें असतें. मूळ पुराणांत या देवतांचें महत्व गाइलेलें असेल असें वाटत नाहीं. पण हल्लीं ज्याप्रमाणें पुस्तकांच्या सुधारून वाढविलेल्या आवृत्त्या निघतात त्याप्रमाणें त्याकाळीं पुराणांच्याही नवीन आवृत्त्या निघत. हल्लींचीं पुराणें हीं प्राचीन पुराणांच्या सुधारून वाढवलेल्या आवृत्त्या होत; व पुराणांच्या संख्येची तशीच मजकूराची वाढ याच कालांत झाली असावी; कारण या कालांतच पंचायतनांतील देवतांचें महत्त्व विशेष वाढलें. तत्रापि या पंचायतनांतील देवतांमध्यें शंकराचें महत्त्व राजकुलांतून विशेष वाटे; परंतु पूर्वींच्या काळाप्रमाणें आतांही पितापुत्रांचीं उपास्यदैवतें भिन्न असल्यास चाले. प्रतिहारी घराण्याच्या वंशावळींतलि भिन्नभिन्न राजपुरुषांचीं उपास्यदैवतें मागें दिलींच आहेत, त्यावरून पाहतां प्रत्येक पिढीचें उपास्यदैवत निराळें आहे असें दिसून येईल. पिता परमवैष्णव असेल तर मुलगा परममाहेश्वर असतो व नातू भगवतीभक्त असतो तर पणतू आदित्यउपासक होतो. पण त्यामुळें उपासकांमध्यें वैरभाव उत्पन्न होत असे असें मात्र नाहीं.

त्या काळचे लोक राजे, राण्या, मंत्री, श्रीमंत सावकार सर्वच आप-आपल्या उपास्य देवतांचीं मंदिरें बांधण्यांत अतिशय धन्यता मानीत. हे लोक देवालयें बांधण्याकरतां व देवतांची अर्चा चांगली व्हावी म्हणून जो पैसा खर्च करीत त्याची गणतीच करतां यावयाची नाहीं.

त्यामुळें सर्वदेश सुशोभित व विशाल देवालयांनीं अगदीं फुलून गेला. अर्थात् अशा देवालयांतील संपत्तीविषयी परकीयांस लोभ उत्पन्न होऊं लागला. असें सांगतात कीं, मुलतान जरी मुसलमानांच्या ताब्यांत असे तरी त्यांनीं तेथील सूर्य-मंदिरास आडकाठी केली नाहीं; कारण तेथील देवाचे यात्रेस सर्व हिंदुस्थानांतील लोक येत असत व त्यामुळें देवालयांत अलोट संपत्ति जमत असे. मुलतानचें सूर्य-मंदिर फार प्रसिद्ध होतें; प्रतापशाली प्रतीहारांना मुलतान सहज काबीज करतां आलें असतें; कारण ते कनोजहून बरेंच जवळ होतें. पण हिंदुलोकांच्या वेडगळ धर्मसमजुतीमुळें प्रतीहारांना मुलतान कधींच काबीज करतां आलें नाहीं, ज्या ज्या वेळीं कनोजचे राजे मुलतानवर स्वारी करीत त्या त्या वेळीं मुलतानचे मुसलमान मंदिरांतील मूर्ति फोडण्याचा धाक घालीत व हिंदुसैन्य मुलतानवर हल्ला न करतां परत फिरे. यावरून हिंदुलोकांत किती अन्ध धर्मश्रद्धा यावेळीं होती हें चांगलेंच निदर्शनास येतें.

असो; अशा तऱ्हेनें निरनिराळ्या देवतांचीं मंदिरें सर्व देशभर विपुल झालीं. मूर्तिपूजेचा प्रकार उत्पन्न करण्यांत आर्यांनीं व अनार्यांनी परस्परांत एकीभाव करून सारखीच मदत केली. साधारणपणें शिव, विष्णु व आदित्य हीं आर्यांचीं दैवतें होत तर गणपति व शक्ति किंवा भगवती हीं अनार्यांची दैवतें असावींत. या पंचायतनाबरोबरच ओबडधोबड ( म्हसोबारूपी ) दगडांची, वृक्षांची व नागांची पूजा आर्चा चालू असे. असो, हिंदुस्थानांतील तत्वज्ञानाचें वैभव पाहतां लोकांची मूर्तिपूजेवर श्रद्धा किंबहुना अंधश्रद्धा कशीं बसली ह्याचें प्रथम आश्चर्य वाटतें. मूर्तींच्या योगानें मन ईश्वराचे ठिकाणीं निश्चलपणें लावतां येतें यांत शंका नाहीं, व म्हणूनच चिंतनास मदत या नात्यानें मूर्तींचा उपयोगही आहे; पण त्यामुळें मूर्ती

या केवळ साधन आहेत येवढेंच ठरतें; त्या केव्हांही मुख्य उपास्य नव्हेत अगर त्यांच्यांत चांगलें वाईट करण्याची स्वतंत्र शक्तिही नाहीं. त्यांचे योगें भक्ति किंवा भाव दृढ करतां येतो; याचा अर्थ असा कीं, अलौकिक इच्छासामर्थ्य किंवा चमत्कार करण्याचें सामर्थ्य मानवी श्रद्धेंत किंवा तपांत असतें, मूर्तींत कोणतींही जादू नसते. असें असतांना देखील तत्कालीन लोकांचा ठिकठिकाणच्या मूर्तींवर अपरंपार भाव असे व त्यामुळें अनेक प्रसंगीं राष्ट्रास माघार घ्यावी लागत असे. मुलतानच्या सूर्यमंदिराची हकीगत पूर्वीं सांगितलीच आहे. एकाद्या ठिकाणच्या देवतेची प्राणप्रतिष्ठा झाल्यावरच त्या मूर्तीस देवत्व येतें; साध्या गणपतिपूजनाचीही अशीच गोष्ट आहे; गणपति बाजारांत विकत मिळतो पण मंत्रपूर्वक त्याची प्राणप्रतिष्ठा झाली म्हणजे त्यास देवतेचें रूप येतें; पण आपलें कार्य झाल्यावर किंवा प्रसंगविशेषीं गणपतीचें विसर्जनही करतां येतें व मूर्तीस आपण विहिरींत टाकतों. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मूर्तीचें खुद्द महत्त्व नसून आवाहन-विसर्जनादि विधींचें महत्त्व आहे. मुलतानच्या सूर्यदेवतेचें असेंच विधिपूर्वक विसर्जन करतां आलें असतें मग सूर्यदेवतेच्या मूर्तीचें सामान्य दगडाहून किंवा लांकडाहून जास्त महत्त्व लोकांस वाटतें ना; परंतु लोकांचा भाव मूर्तीवर विशेष असल्यामुळें त्यांस मुलतान कधींच काबीज करतां आलें नाहीं. हल्लीं आम्हीं नवीन युगांत वाढलों आहों आमच्या दृष्टीनें आम्हांस त्यावेळच्या हिंदुलोकांच्या अंधश्रद्धेची खरोखर कींव आल्याखेरीज राहत नाहीं. वेडगळ समजुतीमुळें त्या वेळच्या सामर्थ्यवान् हिंदूंस सुद्धां मुलतान परत घेतां आलें नाहीं. देवतेचें विसर्जन केल्यावर मुलतानच्या मुसलमानांनीं मूर्ति फोडली असती तरी त्याची किंमत काय? मुलतान जिंकल्यावर नवीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करितां आली

असती. या मूर्तिपूजेच्या भ्रान्तश्रद्धेमुळें हिंदुस्थानच्या इतिहासास पुढें र्‍हासाचें वळण कसें लागलें याचा विचार पुढल्या भागांत येणार असल्यानें त्याचा अधिक विचार येथें आम्हीं करीत नाहीं.

या वेळीं सर्व हिंदुस्थानभर लहान मोठीं अशीं असंख्यात मंदिरें बांधण्यांत आलीं. स्कंदपुराणाच्या नागरखंडांत (अध्याय १०७) हिंदुस्थानांतील शिवाच्या ६८ शिवलिंगाचें वर्णन केलें आहे, त्यांत नेपाळ, कालंजर, प्रभास व उज्जनीं येथील शिवलिंगांचेंही वर्णन आढळतें. विष्णूच्या देवळांची, तसेंच मुलतानच्या सूर्य-मंदिराचीही हकीकत पूर्वीं आलींच आहे; कांग्रा येथें ज्वालामुखी देवीचें व गाजीपूर येथें विंध्यवासिनीचें मंदिर प्रसिद्ध होतें असें वर्णन आढळतें. पण या सर्व देवतांत काशी येथील विश्वनाथाचें देवालय श्रेष्ठ होय अशी समजूत होती. ( काशी येथील मुख्य मंदिरांतील देवाचें नांव विश्वनाथ असतां स्कंदपुराणांत त्यास फक्त महादेव अशी संज्ञा आहे ).

निरनिराळ्या देवतांच्या मंदिरांची स्थापना झाल्यावर देवतांच्या पूजेअर्चेसंबंधीं नवींन नवींन प्रकार सुरू झाले. भिन्न देवतांचे आवाहनाचे तसेंच अर्चनादि प्रकार भिन्न असावे, असें साहजिकपणेंच माणसास वाटतें; त्याप्रमाणें देवतांचे अधिकारही निराळे असल्यामुळें त्यांच्या आराधनाची फलश्रुतिहि भिन्न होणार. या सर्व प्रकारांचें विस्तृत व सांगोपांग वर्णन करणारे ग्रंथ आतां तयार होऊं लागले. या ग्रंथांस ‘ आगम ’ असें म्हणत व ते त्या त्या देवतांच्या उपासकांस प्रमाणभूत असत; कित्येक प्रसंगीं तर वेदश्रुतीपेक्षांहि त्यांचें महत्त्व जास्त वाटे. या आगमांमुळेंच पुढें पंथा पंथांतून दुरभिमान व दुराग्रह वाढला. सर्वत्र आगमांचें अध्ययन सुरू असे व आगमांत निष्णात असणाऱ्याविषयीं लोकांत पूज्यभाव वाढे; पण अशा तर्‍हेचे लोक नेहमीं ब्राह्मणच होते असें मात्र नाहीं; तर त्यांत

शूद्रांचा भरणा विशेष असे. आगमांचा प्रचार सुरू झाल्यावर तपश्येचेंहि महत्त्व फार वाढलें व आगमानुसार तपश्चर्या आर्य व अनार्य या दोघांसही सारखीच करतां येई. प्राचीन काळीं तपश्चर्या व संन्यास यांचा अधिकार फक्त आर्यांसच असे; पण बौद्ध व जैन धर्मांच्या प्रसारानंतर अनार्यांसही तपश्चर्या करण्यास मोकळीक मिळाली. व पुढें बौद्धधर्माचा ऱ्हास झाला तरी तपश्चर्येचा प्रचार सर्वत्र चालू होता; फरक काय तो एवढाच कीं, अनार्यांस वेदानुमत संन्यासदीक्षा घेतां येत नसे किंवा तपश्चर्याहि करतां येत नसे; पण निरनिराळ्या देवतांच्या 'आगमांत' सांगितल्याप्रमाणें त्यांस तपश्चर्या करतां येत असे. विशेषतः अनार्य लोकांत शिवोपासकांचा भरणा विशेष असे. हे लोक मठांतून रहात व नाना प्रकारचीं खडतर व्रतें आचरीत. शिवागमांत शिवोपासनेचीं अत्यंत बिकट व्रतें सांगितली आहेत व तीं अनार्य लोक राकट शरीराचे असल्यामुळें सहज आचरीत असत. आर्य ब्राह्मणांस हीं व्रतें आचरणें जरा कष्टमयच असे. असो; सर्व देशभर तपश्चर्या आचरणारे यती दिसत असत. शहरांत, तसेंच जंगलांतूनही त्यांची वस्ती असे. सुलेमान प्रवाश्यानें मुलतानच्या बाजारपेठेंतील एका तपस्व्याचें वर्णन दिलें आहे; हा तपस्वी मुलतानच्या बाजारांत सूर्याकडे सर्व दिवस तोंड करून उभा असे. त्याचा हा क्रम अव्याहत १६ वर्षें चालू होता. तरी पण त्यास सूर्याच्या ' तापाची कधींच बाधा झाली नाहीं. ' जंगलांतून राहणाऱ्या तपस्व्यांचेंही वर्णन सुलेमाननें केलें आहे. " हे जंगलातील तपस्वी आपला सर्व काळ गिरिगुहांतून कंठतात; त्यांस एकांताची आवड असून त्यांचा इतर लोकांशीं क्वचितच संबंध असतो; ते आपला उदरनिर्वाह कंदमूळांवर करतात; कांहीं तर अगदीं नग्नस्थितींत असतात" ( इलिअट भा. १ ).

या तपस्व्यांतूनहि निरनिराळ्या आगमानुसार सांप्रदायिक भेद असत. आगमग्रंथ—विशेषतः पांचरात्र आगम—महाभारत काळीं- हीं प्रचारांत होते; पण त्यांचें महत्त्व या काळांत विशेष वाढलें. पांचरात्र आगमांतून पुढें वैष्णवागम ग्रंथ निर्माण झाले; या वेळीं पंचायतनांतील सर्व देवतांचे आगम विशेष प्रचारांत होते. शिवागमा- प्रमाणें सौर्यागम ग्रंथ निर्माण झाले व विनायकागमाप्रमाणेंच देवी— आगम ग्रंथ तयार झाले. या निरनिराळ्या आगम ग्रंथांचें बारकाईनें निरीक्षण झाल्यास तत्कालीन धार्मिक मतांचा पूर्ण उलगडा होण्या- सारखा आहे. पण हें काम फार मेहनतीचें आहे व त्याचा एक स्वतंत्र ग्रंथच तयार होईल.

असो, शहरांतून व ग्रामांतून वेदानुसार अग्नि म्हणजे स्मार्ताग्नि ठेवणारे अग्निहोत्रीही अद्याप बरेच असत; हल्लींच्या काळीं अग्नि- होत्री क्वचितच दृष्टीस पडतात. अग्नीची उपासना ब्राह्मणांप्रमाणें क्षत्रियांतहि चालू असे. अग्निहोत्रादिकांचें वर्णन सुलेमाननें आपल्या प्रवासवृत्तांत दिलें आहे. पण या वेळीं शिव, विष्णु इत्यादिकांच्या अर्चनाचा प्रसार विशेष रीतीनें सुरू असल्यामुळें अग्निहोत्रादि वैदिक मार्ग मागें पडत चालला. याचें दुसरें कारण असें आहे कीं, अग्निहोत्रादि ठेवणें हें जरा जास्त अडचणीचें व त्रासाचें काम असे; शालिग्रामादिकांच्या पूजेचे काम सुलभ असे; अग्निहोत्र्यास निर्बंध फार त्यामुळें त्यांची संख्या दिवसें दिवस कमी होऊं लागली. या कालानंतर झालेल्या स्मृत्यादि ग्रंथांतून अग्निहोत्राची कलिवर्ज्यांतच गणना केलेली आढळते.

क्वचित् प्रसंगीं यज्ञयागादिक कर्मे नजरेस पडत व त्यांविषयीं लोकांत बराच आदर असे, पण आतां पशुयज्ञाऐवजीं पिष्टयज्ञच होत असत. राजेलोक महत्त्वाच्या प्रसंगीं एखादा याग करीत व

त्यावेळीं ते ब्राह्मणादिकांस अपार संपत्ति देत. दानपत्रादिकांवरून असें दिसतें कीं, राजे लोक पर्वणीच्या स्नानकाळीं, शिवाराधनप्रसंगीं, तसेंच यागकाळीं ब्राह्मणांस खेडीं वगैरे इनाम देत. कित्येक प्रसंगीं जैन मंदिरासही देणग्या मिळत व त्याप्रसंगीं सुद्धां वैदिक विधींसच महत्त्व देण्यांत येई. व त्यांस जैन लोकहि मान्यता देत, हें आश्चर्य होय. यावरून असें दिसतें कीं, लोकांत वेदांविषयीं अत्यंत श्रद्धा असे; मग त्यांचे नित्याचार वैदिक धर्माहून बरेच भिन्न असले तरी चालत. आगमग्रंथाचा विशेष प्रचार झाल्यामुळें जनतेंत मूर्ति-पूजा फारच वाढली व ज्या त्या घरीं शालग्राम व बाण दिसूं लागले. स्नानसंध्येचा विधि सर्वत्र असावा, हल्लींच्याप्रमाणें संध्येचा लोप झालेला नसावा. इतर सर्व विधिहि—मुंज, लग्न, पितृतर्पण, श्राद्ध,—वेदविहित नियमाप्रमाणें चालत असत. फक्त श्राद्धप्रसंगीं मांसभक्षण आतां वर्ज्य मानण्यांत येऊं लागलें. ब्राह्मणकुलांत तर सर्वच प्रसंगीं मांसाचा निषेध होता. क्षत्रियांकडे श्राद्धप्रसंगीं मांसभक्षण निषिद्ध होतेंच असें नाहीं.

आरब लोकांना हिंदू लोकांच्या पुनर्जन्मादिविषयक भावनांचें आश्चर्य वाटे. पुनर्जन्माची तसेंच कर्मभोगाची कल्पना इतर कोण-त्याही देशांत रूढ नाहीं. हिंदुस्थानांतील तत्त्वज्ञानाचा हा अति उत्कट विशेष आहे असें म्हटलें तरी चालेल. पुनर्जन्माची कल्पना आर्य वाङ्मयांत फार प्राचीन कालापासून प्रचलित असलेली दिसते. वेदांत देखील ह्या कल्पनेचा परिपोष सांपडतो. जीव हा आपल्या कर्मानुसार मरणोत्तर निरनिराळ्या अवस्थांतून जन्म घेऊन आपल्या कर्माचें फल भोगतो. सध्यांचा जन्म हा पूर्व जन्मींच्या कर्माचा विपाक आहे व आतां आपण जीं कर्में करूं तदनुसार आपणास पशु, कीटक, वृक्ष किंवा याहून अन्य योनींत जन्म येईल, अशी ही

कल्पना आहे व ती सर्व हिंदू तत्वज्ञान्यांस संमत आहे--मग तो तत्वज्ञानी द्वैती असो कीं अद्वैती असो. ही कल्पना बौद्ध व जैन धर्मांतही दिसून येते. चार्वाकपंथी लोकांशिवाय सर्व हिंदु तत्वज्ञान्यांनीं ह्या कल्पनेच्या जोरावर उदात्त नीतितत्त्वांचा फैलाव सर्व समाजांत केला व समाजाचीं नीतिविषयक ध्येयें अति श्रेष्ठ झालीं. कारण आपल्या दुष्कर्मांचें फळ आपल्याला आज ना उद्यां नाहीं तर पुढल्या जन्मीं तरी खास भोगावें लागेल, अशी सर्व व्यक्तींस भीति वाटत असल्यामुळें सर्व जण नीतीनें वागण्याचा प्रयत्न करीत. ह्या समजुतींमुळेंच हिंदू समाजाची नीतिमत्ता सर्व जगांत श्रेष्ठ होती असें म्हणणें वावगें होणार नाहीं. आरबी व्यापाऱ्यांची हिंदूंच्या सचोटी व न्यायप्रियतेबद्दल फार श्रद्धा असे हें मागें सांगितलेंच आहे.

मद्यपानाचा प्रसार हिंदुसमाजांत प्राचीन काळापासून फारच अल्प प्रमाणांत आहे. ब्राह्मणांनीं सुरापान केल्याचें या काळांत वर्णन सांपडत नाहीं. सुरापान हें महापातक आहे अशीच सर्व ब्राह्मणांची फार पूर्वकालापासून समजूत आहे व शास्त्रांतूनही तशाच अर्थाचीं वचनें आढळतात ( नित्यं सुरा ब्राह्मणानाम् ). ब्राह्मणानें सुरापान केल्यास त्यास फार कडक प्रायाश्चित्त सांगितलें आहे. साधारणमानानें ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिहीनींही सुरापान करूं नये अशी वेदाज्ञा आहे. (तस्माद् ब्राह्मणराजन्यौ वैश्यश्च न सुरां पिबेत्). पण ब्राह्मणांशिवाय इतर जातींत सुरापान बंदच असेल असें मात्र म्हणतां येत नाहीं. क्षत्रियांत मद्यपान करण्याचा थोडा फार प्रघात होता. पण ते फार बेतानेंच सुरापान करीत. पण क्षत्रियांतही राजेलोक याकाळीं मद्यपान करीत नसत असें म्हटलें तरी चालेल. अगणित संपत्ति व यथेच्छ सत्ता असणारांनीं विषयाधीन न होणें हें एक दिव्यच होय व अशा वृत्तीचे राजे हिंदुस्थानांत असत हें हिंदुस्थान-

च्या इतिहासास भूषण आहे. मेवाडच्या गुहिलोत घराण्यांत सुरापान अगदीं वर्ज्य असे, असें आरबी प्रवाशांनीं लिहून ठेविलें आहे. वैश्यांतहि मद्याचा प्रचार अगदीं अल्पच असावा असें दिसतें. शूद्रादिकांतून मद्यपानाचा थोडा फार प्रचार असावा; कारण शिलालेखादिकांतून मद्य ही उत्पन्नाची चांगलीच बाब असे असा उल्लेख सांपडतो. पण शूद्रादिकांवरहि द्विजांच्या आचाराचा परिणाम होत असावा व त्यांच्यांतहि मद्यपानास आळा बसत असावा असें दिसतें.

मद्यपानापेक्षां मांसाशनाचा प्रचार जास्त प्रशस्त होता असें म्हटलें तरी चालेल. वैश्य व शूद्र यांत बौद्धधर्माचा बराच प्रसार झाल्याकारणानें त्यांनीं मांसाशन वर्जिलें होतें. तसेंच बऱ्याच क्षत्रियांनीं व ब्राह्मणांनींही अहिंसामतानुसारें मांसाशनाचा त्याग केला होता; पण असे लोक थोडे. वेदांनीं मांसाशन निषिद्ध मानलें नव्हतें तरी त्यांत कांहीं प्राण्यांच्या मांसाचा निषेध होता. आतां तर बुद्धधर्मानें नष्ट केलेली वेदांवरील श्रद्धा पुनः लोकांत जागृत झाली होती. बौद्ध व जैन धर्मांनीं निंदिलेले श्राद्धादि विधि लोकांत पुनः सुरू झाले होते. श्राद्धसमयीं मांसान्न अवश्य तयार करावें असें स्मृतींत सांगितलें असल्यामुळें श्राद्धादि प्रसंगीं पितृतर्पणांकरतां मांसान्न तयार होत असे. पितरांकरतां सिद्ध केलेल्या मांसान्नाचा जो ब्राह्मण स्वीकार करणार नाहीं त्यास दुर्गति प्राप्त होईल असे स्मृतींतून उल्लेख आहेत. तसेंच यज्ञाशिवाय क्षत्रियांनीं मृगयाविधीनें मारलेल्या पशूंचे मांस वैश्यांनीं विकत घ्यावें, ब्राह्मणांनीं यागाशिवाय अन्यप्रसंगीं हिंसा करूं नये, वगैरे स्मृतिवचनें सांपडतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मद्यप्राशनाच्या उलट मांसाशनाचा प्रकार क्षत्रिय व ब्राह्मण यांमध्यें प्रचलित असून वैश्यादिकांत त्याचा थोडासा निषेध होता. पुढें ब्राह्मणांतही अने-

कांनीं मांसाशन अगदीं निसिद्ध मानलें, तरीही कांहीं ब्राह्मणात मांसाशनाचा प्रचार सुरू होता व अद्याप आहे. ब्राह्मणादिकांत पोट-जाति होण्याचें एक जबर कारण म्हणजे मांसाशनाचा त्याग व स्वीकार हेंच होय. कित्येक ब्राह्मणांनीं मांसाशनाचा जो अजीबात त्याग केला त्याचें कारण जैनधर्माचा वाढता उत्कर्ष हेंही असेल. जैनधर्माचा उद्भव विद्यमान काळाच्या पूर्वींच झाला होता तरी देखील आतांपर्यंत त्याचा विशेष उत्कर्ष झाला नव्हता. पुढील काळांत मात्र त्याचा प्रसार विशेष जोरानें झाला. पण ह्याहि कालांत जैनधर्माचा प्रचार दक्षिणेकडील वैश्य जातींत हळु हळू होत असावा असें दिसतें. प्रथमपासूनच वैश्य लोकांचा ओढा अहिंसे-कडे जास्त असे; अर्थात अंहिसाप्रधानधर्मास त्यांचा पाठिंबा सर्वांत अगोदर मिळावा हें योग्यच आहे. वैश्यांप्रमाणें दक्षिणेकडील शेतकरी वर्गांतहि जैनधर्माचा प्रसार होत असावा. कांहीं राष्ट्रकूट-राजे देखील पुढें जैन साधूंचे उपासक झाले. पुढें पुढें तर जैनाचार्य मीमांसकांशीं संस्कृत भाषेंतूनच वादविवाद करूं लागले व मीमांस-कांस जिंकू लागले. ' मध्ययुगाच्या ' अखेरच्या कालांत (१०००-१२०० ) जैन पंडितांची संस्कृत भाषेवरील प्रभुत्वाबद्दल विशेष ख्याति होऊं लागली व त्या कालांतच हेमचंद्र नांवाचा प्रख्यात जैन पंडित कुमारपालाचा राजगुरु झाला. पण सध्यांच्या (८००-१००० इ. स. ) काळीं जैनमताचा गुजराथ प्रांतांत प्रवेश झाल्याचें दिसत नाहीं. गुजराथेंतील या वेळच्या लेखांदिकांतून ' शिवाचें महत्त्व गाइलें आहे. आमचा असा समज आहे कीं, जैनमताचा प्रसार प्रथम दक्षिणेंत झाला असून तेथून ८०० ते १२०० या दरम्यानच्या कालाच्या अखेरीस त्याचा प्रसार गुजराथ प्रांतांत झाला असावा.

पण ह्या कालांतील विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली

म्हणजे सर्व देशभर शिवोपासनेचा प्रसार ही होय. ह्या काळांत जीं जीं रजपूत राजघराणीं स्थापन झालीं व अभिवृद्धि पावलीं तीं सर्वच निस्सीम शिवोपासक घराणीं होतीं यांत शंका नाहीं. गुहिलोत, चाहमान, तसेंच राष्ट्रकूट घराण्यांत शिवोपासनाच प्रधान असे. चावडा घराण्याचा ओढा जैनधर्माकडे होता असें जैनांच्या ग्रंथादिकांनून दिसलें तरी चावडा घराण्यांतही शिवोपासनेचें प्राबल्य असे. पारमार, हैहय तसेच चंदेल्ल शिवोपासकच होते व तिघांनींहि आश्चर्यानें चकित करून सोडतील अशीं शिवमंदिरें बांधविलीं आहेत. बंगालच्या पालघराण्याचा बौद्धधर्माकडे विशेष ओढा असे; तरी पण त्यांनींहि शिवमंदिराप्रीत्यर्थ बराच खर्च केला आहे. कनोजचे प्रतिहारी घराण्यांत मात्र केवळ शिवोपासनाच चालू होती असें नाहीं. त्या घराण्यांतील राजपुरुषांत कांहीं परमशैव होते तर कांहीं परमवैष्णव होते व कांहीं भगवती ( देवी ) भक्त असत. पण साधारणमानानें शिवोपासना सार्वत्रिक होती यांत संशय नाहीं. याचें कारण काय असावें असा साहजिकपणेंच प्रश्न उद्भवतो. शिवोपासनेंत कांहीं करडेपण असून धर्मभावनांची तीव्रता परिपुष्ट होत असावी व लोकांत मुसलमानी धर्माविरुद्ध झगडण्याचें सामर्थ्य येत असावें अशी कदाचित् कल्पना होऊं शकेल.

पण अशा तऱ्हेनें कोणत्या देवतेच्या उपासनेचें कोणतें फल असावें याविषयीं तर्क काढण्यांत विशेष हंशील नाहीं; येथें फक्त एवढेंच सांगावयाचें आहे कीं, शिवोपासनेचें महत्त्व हिंदुस्थानांत अति प्राचीन कालापासून आहे; पण त्या काळीं शिवोपासनेचें स्वरूप भिन्न असे. लिंगपूजा प्राचीन काळापासूनच प्रचारांत होती. लिंगपूजा अनार्य लोकांत चालू असावी; व नंतर तिचा प्रसार आर्यलोकांत झाला असावा. लिंगपूजेचा उपहासास्पद प्रकार

आर्यांत कसा चालू झाला असावा ह्याचें जरा आश्चर्य वाटतें. पण आर्य लोकांनीं लिंगपूजेचें हिडिस स्वरूप घालवून त्यास उदात्तरूप दिलें. शिव व वेद-देवता रुद्र यांचें त्यांनीं एकच स्वरूप मानलें; वेदांत रुद्रदेवतेचें महत्त्व मोठें आहे. श्वेताश्वतर उपनिषदांत तर शिवास परब्रह्मच म्हटलें आहे. महाभारतकाळीं पशुपतीचें महत्त्व वर्णन करणारीं स्वतंत्र दर्शनें प्रचारांत होतीं. मध्ययुगांत तर लकुलीशानें रचिलेल्या आगमाचा सर्वत्र प्रसार असे, तेव्हां शिवोपासना शंकराचार्यांनीं सुरू केली असें म्हणतां येणार नाहीं. तिचा प्रसार फार पूर्वकालापासूनच आहे. शंकराचार्यांस तर लकुलीशाचें मत संमत नव्हतें व इतर देवतोपासनेचेंहि महत्त्व सिद्धान्तदृष्टीनें वाटत नसे. शंकराचार्यांनीं ह्या सर्व मतांचें भाष्यांत खंडनच केलें आहे. पण लोकमतानुसार त्यांनीं पंचायतनपूजेचा स्वीकार केलेला आहे; तथापि शंकराचार्यांच्या नंतरच्या काळीं लिंगपूजेचें महत्त्व विशेष वाढलें असें वाटतें. कारण त्यांच्या सांप्रदायांत आज तागायत शिवोपासनेचेंच प्राबल्य आढळतें शंकराचार्यांच्या तत्वज्ञानाचा तत्कालीन प्रचलित लिंगपूजेवर विशेष परिणाम झालेला दिसत नाहीं. कुमारिलाचा कर्मसंप्रदाय तर आतां मागेंच पडत चालला होता तेव्हां त्याचाही परिणाम होणें कठिणच होतें. पण त्यामुळें कुमारिलाच्या कामगिरीची योग्यता मात्र यत्किंचित् कमी होत नाहीं हें पुनः सांगणें जरूर आहे. शंकराचार्य व कुमारिलभट्ट यांच्या तत्वज्ञानाचें वास्तविक रीतीनें येथें जास्त विवेचन करणें अवश्य होतें; पण हा विषय इतका महत्त्वाचा व भानगडीचा आहे कीं, त्याचा स्वतंत्र टिप्पणींतच विचार करणें इष्ट आहे व त्याप्रमाणेंच आम्हीं केला आहे.

---

## टिप्पणी—कुमारिलभट्ट व शंकराचार्य.

प्रचलित हिंदुधर्माचे आद्यप्रवर्तक व आपल्या लोकोत्तर बुद्धीनें जगाच्या इतिहासांत सूर्याप्रमाणें तळपत रहाणाऱ्या या विभूतींच्या चारित्र्याच्या अवगाहनाशिवाय मध्ययुगीन कालांतील इतिहासास कधींच पूर्तता येणार नाहीं. आर्यधर्मावरील बौद्धधर्माचा प्रचंड हल्ला वरील विभूतींनींच हट-विला आणि पहिल्यानें हल्लींच्या हिंदुधर्माचा पाया घातला व दुसऱ्यानें त्या पायावर सुंदर इमारत रचिली. विस्कळित झालेल्या समाजघटनेस व्यव-स्थित रूप देण्याचें व आर्यधर्मास अद्वितीय तत्वज्ञानाची जोड देण्याचें अत्यंत कठीण काम वरील व्यक्तिद्वयांनीं घडवून आणिलें यांत शंका नाहीं.

पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, कुमारिल व शंकराचार्य यांच्या चरि-त्रांची फारच अल्प माहिती उपलब्ध आहे. त्यांच्या कालासंबंधीं तर विचारावयासच नको; कांहीं शोधकांचा असा समज आहे कीं, या दोघांचाहि जन्म खिस्तीशकापूर्वीच्या शतकांत झाला असावा. परंतु ह्यूएनत्संगानंतरच यांचा अवतार झाला असावा हें साधारणपणें कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं; एक तर ह्यूयनत्संग म्हणजे बुद्ध धर्माचा कट्टा अनुयायी, व धाडशी प्रचारक. त्याच्यापूर्वी झालेल्या शंकराचार्यांचा उल्लेख त्यानें केलाच असता; पण तसा उल्लेख सांपडत नाहीं. दुसरें असें कीं शंकराचार्यानंतर ह्यूएनत्संगाच्या बोलण्यास लोकांत अवसरच मिळाला नसता; तेव्हां ह्यूएनत्संग हा शंकराचार्यांच्या पूर्वी होऊन गेला असेंच मानलें पाहिजे. दुसरी अडचण ही कीं, शंकराचार्यादिकांच्या कालाची तसेंच चरित्राचीहि रूपरेखा ठरविणें पुढील कारणानें कठिण झालें आहे कुमारिलभट्टाचे तसेच शंकराचार्यांचेही बहुविध ग्रंथ उपलब्ध आहेत; पण ह्या ग्रंथांतून स्वतःविषयीं असा मुळींच उल्लेख मिळत नाहीं. एवढेंच नव्हे तर ते आपल्या मतविवेचनांत व मीमांसेंत इतके चूर झालेले दिस-तात कीं, त्यांच्या बाहेरच्या सामाजिक, नैतिक व राजकीय परिस्थितीचा त्यांच्या लेखांतून गंधही सांपडत नाहीं, व त्यामुळें त्यांच्या कालाचें किंवा परिस्थितीचें विवेचन करणें अत्यंत दुर्घट झालें आहे. तिसरें असें कीं लोक-

मतांत जरी त्यांनीं कल्पनातीत क्रान्ति घडवून आणिली व प्रत्यही विद्वान लोकांत त्यांचे ग्रंथाची चर्चा सारखी चालू असली तरी शंकराचार्यांच्या चरित्राचे निदर्शक तत्कालीन शिलालेख आज कोठेंच उपलब्ध नाहींत. शंकराचार्यांनीं हिंदुस्थानभर संचार करून अनेक पंडितांशीं वाद करून दिग्विजय संपादन केला असें महशूर आहे; पण त्यास तत्कालीन ग्रंथांचा किंवा ताम्रपटांचा आधार सांपडत नाहीं. त्यामुळें त्यांच्या चरित्राची व कामगिरीची विश्वसनीय माहिती देणें कोणासही दुरापास्तच आहे. तरी पण त्यांची कामगिरी असामान्य असल्यामुळें निरनिराळ्या ग्रंथांतली माहिती एकत्र करून तसेंच दन्तकथात्मक माहितीचें संशोधन करून सत्याचे कसोटीस साधारण मानानें उतरेल अशी या दोन अद्वितीय पुरुषांची हकीकत जिज्ञासू वाचकांचेसाठीं आम्हीं सादर करीत आहों.

कुमारिल भट्टाची अतिशय महत्त्वाची कामगिरी ह्मटली तर त्यानें केलेला बौद्धमताचा पाडाव व वैदिक मताची पुनःस्थापना ही होय. साधारणपणें लोकांत अशी समजूत आहे कीं, वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाचें सर्व श्रेय शंकराचार्यांस आहे; पण इतिहासाचा सूक्ष्म विचार केल्यास तें श्रेय कुमारिलभट्टासच दिलें पाहिजे; शांकरदिग्विजयावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते. शांकरदिग्विजयांत शंकराचार्यांच्या व कुमारिलभट्टाच्या भेटीची हकीकत वर्णिली आहे; ती अशी कीं आपल्या आयुष्याच्या सरत्या दिवसांत कुमारिलानें आपण होऊनच चिता रचली व अग्नीस देहसमर्पण केला. ह्याप्रसंगीं शंकराचार्यांची व त्यांची गांठ पडली, तेव्हां शंकराचार्यांनीं त्याची स्तुति केली; ती अशी 'श्रुत्यर्थधर्मविमुखान् सुगतान् निहन्तुं। जातं गुहं भुवि भवन्तमहं नु जाने।'—"वैदिक धर्मोच्छेदक पाखंडीबुद्धानुयायांचा विनाश करणारे आपण साक्षात् गुहाचाच कार्तिकेयाचा अवतार आहांत हें मी ओळखतों" पण ह्या स्तुतींतही थोडी व्याजोक्ति आहेच; शंकराचार्यांस शंकराचा म्हणजे कार्तिकेयाच्या पित्याचा अवतार समजतात; म्हणजे कार्तिकेयाच्या ( कुमारिलाच्या ) मताचा शंकरानें ( शंकराचार्यानें ) अल्पश्रमानें पराजय केला यांत नवल नाहीं. पण हा व्याजोक्तीचा भाग वगळला असतां कुमारिलभट्टानेंच बुद्धमताचा पाडाव केला हें पुढील श्लोकावरून

सिद्ध होतेंच; बौद्धधर्मास हर्षाच्या पूर्वींच ओहटी लागली होती; पण हर्षाच्या काळीं मावळणाऱ्या दीपज्योतीप्रमाणें बौद्धधर्माची ज्योत जास्त प्रकाशमान झाली होती. कुमारिलभट्टानें ही ज्योत साफ विझविली व शंकराचार्यांच्या कामगिरीस अवसर करून दिला. जनतेचा वेदावरील व वेदविषयक श्राद्धादि आचारांवरील उडालेला विश्वास त्यानें पुनः बसविला; अर्थात् कुमारिलभट्टाचा उदय हर्षानंतर मानणें योग्य आहे व संशोधकांच्याहि मतें कुमारिलाचा काल इ. स. ७०० असावा असें ठरतें.

पण आमच्या मतें इ. स. ७०० हा कुमारिलाच्या निधनाचाच काल धरला पाहिजे. शंकराचार्यांची व कुमारिलाची निधनप्रसंगीं भेट झाली होती वगैरे कथेस आधार नाहीं; एवढेंच नव्हे तर शंकराचार्य व कुमारिल यांचे कालांत एका शतकाचें अंतर असावें. कालिदास व भवभूति यांच्या भेटीच्या आख्येप्रमाणें किंवा विक्रम व शालिवाहन यांच्या युद्धवर्णनाप्रमाणें कुमारिल—शंकर भेट काल्पनिक समजली पाहिजे. कुमारिलाचा काळ ठरविण्यास आणखी एक प्रमाण सांपडतें शं. पां. पंडितास उत्तररामचरित्राची एक प्रत उपलब्ध झाली होती; तिचे शेवटीं कुमारिलाचा शिष्य भवभूति होय असा उल्लेख आहे. त्यावरून पंडितांचा असा तर्क आहे कीं हा कुमारिल म्हणजे प्रसिद्ध कुमारिलभट्टच होय. राजतरंगिणींत असा उल्लेख आहे कीं, कनोजच्या यशोवर्म्याच्या दरबारीं भवभूति हा कवि होता. यशोवर्म्याचा काळ इ. स. ७०० असा आहे, म्हणजे कुमारिलाचा काळ त्यापूर्वीं थोडीं बहुत वर्षें धरिला पाहिजे. म्हणजे इ. स. ७०० हा कुमारिलाचा निधनकाल धरणें युक्त होईल.

कुमारिलाच्या कालासंबंधी हा त्रोटक विचार झाला. आतां त्याचा देश कोणता होता ह्याचा विचार करूं. कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, त्याचा देश आसाम प्रांत असून कित्येकांच्या मतें तो द्रविड--ब्राह्मण असावा. आह्मांस असें वाटतें कीं, तो आर्यावर्ताचाच रहिवाशी असावा. त्याच्या तंत्रवार्तिकनामक ग्रंथांत आर्यावर्ताची फारच महती वर्णिली असून इतर प्रांतांतील लोकांची त्यानें म्लेंछ म्हणून निंदाच केली आहे. कुमारिल स्वतः आसाम—निवासी किंवा द्राविड जातीचा ब्राम्हण असता तर आर्या-

वर्तांची स्तुति व इतर प्रांतांची निंदा त्याचें ग्रंथातून दिसून आली नसती * द्रविड भाषेंतील अनेक शब्द संस्कृतावरूनच बनलेले आहेत अशा अर्थाचा ( चोर = भात; ततर = रस्ता, वैर = पोट इत्यादि ) त्यानें कांहीं ठिकाणीं ऊह केलेला आढळतो; पण त्यावरून त्याची भाषा द्रविड असावी, निदान त्यास त्या भाषेचा अभिमान असावा हें म्हणणें सिद्ध होत नाहीं. फार तर त्यास संस्कृत व्यतिरिक्त अनेक भाषा अवगत होत्या एवढेंच ह्यावरून ह्मणतां येईल. द्रविड व कानडी पंडितांनीं आपल्या भाषेची उत्पत्ति संस्कृतापासूनच झालेली आहे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न पुष्कळदां केलेला आढळतो; पण कुमारिलांनीं स्वतः द्रविड भाषेचा अनार्यभाषा म्हणूनच उल्लेख केलेला आहे.

द्रविड भाषेशिवाय, पारसीक, बर्बर, यवन, आणि रोमक इत्यादि अनार्य भाषांचा उल्लेख त्यानें केला आहे, त्यावरूनही कुमारिलाचा काल ८ व्या शतकाच्या पूर्वींचा ठरतो. कारण ७ व्या शतकानंतर हिंदुस्थानांत त्या भाषांचा लोप झालेला आढळतो. ८ वे शतकापूर्वी बौद्धधर्ममताच्या विशेष अध्ययनाकरतां किंवा तीर्थाटणें करण्याकरतां ह्यूएनत्संगासारखे बौद्धधर्मी लोक निरनिराळ्या देशांतून हिंदुस्थानांत येत असत; साहाजिकपणेंच ते आपल्या देशाची भाषा बोलत असत; व बौद्ध भिक्षूंचा भरणा या देशांत विशेष असल्याकारणानें हिंस्दुथानांत निरनिराळ्या म्लेच्छ भाषा चालू असत. या भाषांबरोबर दुभाष्यांचीही संख्या त्यावेळीं बरीच असे. कुमारिलानें दुभाष्यांचाहि उल्लेख केला आहे ( म्लेच्छैरवगतं पश्चादार्यैर्द्वैभाषिकैः क्वचित् ) फारसी भाषेंत पीलु शब्दाचा अर्थ ' हत्ती ' असा आहे तर संस्कृतांत तें एका झाडाचें नांव आहे असें कुमारिलानें लिहिलें आहे ( यथापील्वादि शब्दांना वृक्ष हस्त्यादि बोधने। समा विप्रतिपत्तिः। स्या दार्यम्लेच्छादिबोधने) कुमारिलाचें म्हणणें यथार्थच आहे; कारण फारसी भाषेंतलि फील शद्वाचा ' हत्ती ' असाच अर्थ होतो. अर्थात् वरील गोष्टीवरून एवढें मात्र खास दिसतें कीं, त्यावेळीं फारसी भाषा हिंदुस्थानांत बरीच प्रचलित असावी.

---

हिमवद् विन्ध्यान्तरालातुकृष्णमृगचरणाद्युपलक्षित आर्यावर्त निवासि व्यतिरिक्त बर्बरादि भाषागत म्लेछितत्वसमानाधिकरणापशब्द। इ०

कुमारिलभट्टानें छद्मवेषानें परधर्मी बौद्धाभिक्षूंजवळ बुद्धमताचें सांगोपांग अध्ययन केलें व या छद्माचाराची निष्कृति ह्मणून शेवटीं स्वतःस जीवन्तपणींच अग्नीस अर्पण केलें अशी एक आख्यायिका आहे; या आख्यायिकेंत थोडें फार सत्य आहेच, पण असत्यही बरेंच असावें, असें आह्मांस वाटतें. कुमारिलानें बौद्ध भिक्षूंशीं बौद्धमतानुयायी ह्मणून बरेंच अध्ययन केलें असावें पण त्यानें छद्मवेष व छद्मधर्म स्वीकारला होता असें म्हणणें अप्रयोजक दिसतें. बुद्धधर्म स्वीकारण्यास जात्यादि कोणतेच प्रत्यवाय नसत. उलट कोणासहि तो धर्म स्वीकारतां येत असे; हिंदुधर्म हा कोणसही स्वीकारतां येत नाहीं; पण बौद्ध अगर ख्रिस्ती धर्म कोणीही स्वीकारावा; त्यावेळीं पुष्कळ ब्राह्मण व क्षत्रिय बौद्धमताचा अंगिकार करीत व बौद्ध भिक्षु कोणासही आपलीं मतें समजाऊन देत. तेव्हां कर्णाप्रमाणें कुमारिलानें आपला धर्म लपवून आपल्या बुद्ध–गुरूस फसविलें असें म्हणण्याचें कारण नाहीं. अर्थात् कुमारिलानें आपणांस जीवंतपणींच अग्निसमर्पण करून या पापाची निष्कृति केली हें म्हणणेंहि खरें दिसत नाहीं; कारण अशा तऱ्हेनें जीर्ण झालेला देह अग्नीस आपण होऊन अर्पण करण्याचा प्रघात त्या कालीं शिष्टसंमत होता. पुढें पुढें या प्रघाताचा लोप झाला व त्यामुळें कुमारिलाच्या देहविनाशाचें लोकांस आश्चर्य वाटून त्यांनीं वरीलप्रमाणें समाधान करून घेतलें असावें; *

कुमारिल हा दाक्षिणात्य किंवा महाराष्ट्रीय नसावा असें मानण्यास थोडा फार आधार सांपडतो, तो असाः—महाराष्ट्रीय लोकांत ( आणि हल्लींहि ) आपल्या मामेबहिणीशीं लग्न लावण्याची चाल विशेष रूढ असे; इतर प्रांतांतून या चालीचा निषेध आहे; मराठ्यांची उत्पत्ति सोमवंशी

---

* मूळचे म्लेच्छ भाषेंतील शब्द असून नंतर संस्कृतांत प्रचारांत आलेले असे शब्द कुमारिल व शबर या दोघांनीं दिले आहेत; आश्चर्याची गोष्ट अशी आहे कीं, दोघांनीं दिलेले शब्द तेच आहेत. ते शब्द असे. पिक = कोकिल; नेमि = अर्धा; तामरस = कमळ; सत = लांकडी भांडें ह्यापैकीं नेमि हा शब्द फारसी भाषेंतील आहे; पिक व तामरस मूळ संस्कृतच दिसतात. सत–शब्द कोणत्या भाषेंतील असावा हें समजत नाहीं.

यादवांपासून मानण्यांत येते; यादवांत वरील चाल रूढ होती याविषयीं वादच नाहीं; अर्थात ती चाल महाराष्ट्रांतही असावी. कुमारिल हा महाराष्ट्रीय असता तर त्यानें वरील चालीचा फक्त उल्लेख केला असता; ती चाल निंद्य आहे अशा अर्थाचा शब्दप्रयोग त्याचे विधानांत आला नसता. पण " स्वमातुलसुतां प्राप्य दाक्षिणात्यस्तु तुष्यति "—या विधानांत 'तुष्यति' असा निंदाप्रचुर शब्दप्रयोग दिसतो, व यामुळेंच कुमारिल महाराष्ट्रीय नसावा असें वाटतें.

दुसरें असें कीं, महाराष्ट्रांत स्त्रिया लुगड्यासारखें एकच वस्त्र सर्व अंगभर नेसतात; आर्यावर्तांत किंवा उत्तर हिंदुस्थानांत दोन वस्त्रें—एक कमरेखालीं व दुसरें उत्तरीय—वापरण्याची चाल आहे; या चालीस अनुसरूनच 'अन्तरीयोत्तरीये हि योषितामिव वाससी '—असें कुमारिलानें लिहिलें आहे. अर्थात त्याच्या देशाच्या स्त्रियांत दोन वस्त्रें पेहरण्याची चाल होती हें उघड दिसतें; म्हणजे कुमारिल दाक्षिणात्य नसावा व आर्यावर्तांतील रहिवाशी असावा असें अनुमान काढणें अयोग्य होणार नाहीं.

वरील विधानांस आणखी एका गोष्टीवरून बळकटी येते, ती अशी:—कुमारिल ज्या प्रदेशांत रहात असे त्यांतील ब्राह्मण-क्षत्रियांत मांसादि खाण्याची चाल विशेष रूढ होती असें खालील श्लोकावरून दिसतेः" पशुहिंसादिसंबंधे यज्ञे तुष्यन्ति हि द्विजाः । तेभ्य एवहि यज्ञेभ्य शाक्याः क्रुद्ध्यन्ति पीडया ॥ " यज्ञादिसंबंधी व पशूंच्या हिंसेनें ब्राह्मणांस आनंद होतो तर बौद्धधर्मीयांस क्लेश होतात व ते संतापतात "—पण हर्षकाळापूर्वीपासूनच महाराष्ट्रीय ब्राह्मणांत हिंसाप्रधान यज्ञक्रिया लुप्त झाल्या होत्या; निदान त्यांतील हिंसेस अजिबात फांटा देण्यांत आला होता. परंतु उत्तरेकडील ब्राह्मणांनीं मांसादि वर्ज्य केलें नव्हतें; आज तागायत उत्तरेकडील व दक्षिणेकडील ब्राह्मणांत हा भेद दिसून येतो.—या वरील श्लोकावरूनहि कुमारिल हा दाक्षिणात्य नव्हता असें दिसून येतें.

मीमांसाशास्त्रावरील कुमारिलभट्टानें लिहिलेल्या ग्रंथाचें परीक्षण केलें असतां जी थोडी बहुत माहिती त्याविषयीं सांपडते ती वर सादर केली आहे. विशेष संशोधन केल्यास या माहितींत आणखीहि भर पडेल; पण

त्यामुळेंच तत्कालीन राजकीय; व सामाजिक परिस्थितीचें विशेष ज्ञान होईल असें मात्र नव्हे. तरी पण राजकीय परिस्थितीची द्योतक एक विशेष गोष्ट दिसून येते त्यायोगें कुमारिलभट्टाच्या कालासंबंधीं आम्हीं केलेल्या विधानास जास्त बळकटी येत असल्यामुळे ती येथें नमूद करतो. 'राजा राजसूयेन यजेत' या सूत्रावरील व्याख्यान करतांना साहजिकपणेंच असा प्रश्न उपस्थित होतो कीं, राजा शब्द अधिकारवाचक आहे कीं जातियुक्त अधिकारवाचक आहे? त्याचें उत्तर उघडच असें आहे कीं, राजाशब्दानें क्षत्रिय जातीचा राजा असा अर्थ घ्यावयास हवा. मग शंकेचें कारण काय? तर कुमारिलाचें असें म्हणणें आहे कीं, त्याचे काळीं केवळ क्षत्रियच राजे असत असें नाहीं तर इतर वर्णांचेहि लोक त्यावेळीं राज्यपदारूढ होते. ( तच्च राज्यमविशेषेण चत्वारोऽपि वर्णाः कुर्वाणा दृश्यन्ते ) दृश्यन्ते—दिसतात, आढळतात या शब्दावरून वरील वर्णन कुमारिलाच्या काळचें आहे हें सिद्धच आहे; त्यावेळीं फक्त क्षत्रियच राजे असावे ह्या परंपरेचा लोप उघड उघड झालेला होता व तो केव्हां झाला यास प्रमाण पुराणांत सांपडतें. 'नंदांतं क्षत्रियकुलम्' असा पुराणांतून उल्लेख सांपडतो ---म्हणजे नंद हा शेवटचा क्षत्रिय राजा होय. नंदापूर्वी अन्य वर्णांचे राजे झाले नाहींत. नंदाचा संहार झाल्यावर प्रथमच चन्द्रगुप्त नांवाचा शूद्रवर्णाचा राजा झाला व तेव्हांपासून पूर्वपरंपरेस बाध आला. म्हणजे या नव्या परंपरेस इ. सनापूर्वी ३०० वर्षें आरंभ झाला व ती हर्षाच्या कालापर्यंत चालू होती. ह्युएनत्संगानें हर्षकालीन राजकीय परिस्थितीचें वर्णन केलें आहे त्यावरून सर्व वर्णांचे राजे त्यावेळीं हिंदुस्थानांत राज्य करीत असें दिसतें; हर्षराजा जातीनें वैश्य असून, भिनमाल, महाराष्ट्र, कांची व वलभीचे राजे क्षत्रिय होते. उज्जनीं, महेश्वरपुर, चिचिटो येथें ब्राह्मण राजे राज्य करीत होते, तर सिंधप्रांतचा राजा शूद्र जातीचा होता, असें त्यानें लिहिलें आहे उलट आम्हीं प्रस्तुत या पुस्तकांत ज्या कालासंबंधीं लिहीत आहोंत, त्या काळीं म्हणजे मध्ययुगीनकालाच्या दुसऱ्या भागांत क्षत्रिय राजे राज्य करीत असून अन्यवर्णांचीं राजकुळें जवळ जवळ लुप्त झालीं होतीं. बाप्पारावळच्या वेळेपासून क्षत्रिय राजकुलांची

प्रस्थापना होऊं लागली; सुमारें इ. स. ८०० वर्षांनंतर पूर्वप्रमाणें क्षत्रियांकडेच राज्याधिकार आले. ह्या दोन कालांच्या दरम्यान कुमारिलभट्टाचा काल समजला पाहिजे; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कुमारिल भट्ट ह्युएनत्संगानंतर पण इ. स. ७५० पूर्वी होऊन गेला असावा; कारण त्या काळीं ह्मणजे इ. स. ६५० ते ७५० पर्यंत कुमारिलानें वर्णिलेली राजकीय स्थिति वस्तुतःयेथें होती असें मानण्यास हरकत दिसत नाहीं.

तन्त्रवार्तिकावरून आणखीं एक गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते पण तिचा उलगडा करणें जरा कठिण आहे. आंध्रप्रांतांत राजन् हा शब्द राज्यकर्त्या क्षत्रियासच लावतात असें नाहीं तर तो सामान्य क्षत्रियवाचक आहे असें शबरानें आपल्या भाष्यांत लिहिलें आहे--' ननु जनपदपुररक्षणमनुपजीवत्यपि क्षत्रिये राजशब्दमान्ध्राः प्रयुज्यन्ते )--यावर स्पष्टीकरणार्थ टीका करतांना कुमारिल ह्मणतो ' दाक्षिणात्यसामान्येनान्ध्रांणामिति भाष्यकारेणोक्तम् "--" हें विधान दाक्षिणात्यांच्या प्रचारास अनुसरून आंध्रप्रांतांतील लोकांसंबंधी भाष्यकारानें केलें असावें, कदाचित् त्याचे मनांत दाक्षिणात्य असेंच ह्मणावयाचें होतें पण चुकून हें विधान ' आंध्रप्रांतीयांसंबंधीं भाष्यकारानें केलें " असें कुमारिल तत्वतः ह्मणतो; आंध्रप्रांतांत कुमारिलाच्यावेळीं यवन राजे राज्य करीत असत, त्यामुळें दाक्षिणात्यांच्या व आंध्रांच्या प्रचारांत साम्य असेलच असें नाहीं; अधिक पुरावा मिळाल्याखेरीज भाष्यकार व वार्तिककार यांच्या विधानांचा मेळ बसवितां येणार नाहीं.

तन्त्रवार्तिकादि ग्रंथांवरून कुमारिलासंबंधीं जी थोडी फार माहिती अनुमित होण्यासारखी आहे, ती वर दिली आहे. कुमारिलाच्या ग्रंथाचा सूक्ष्म रीतीनें अभ्यास झाल्यास या माहितींत आणखी भर पडेल, पण तें फार मेहनतीचें व कालावधीचें काम आहे. इतक्या सर्व विवेचनाचा थोडक्यांत असा निष्कर्ष आहे कीं, कुमारिलाचा काल इ० स० पूर्वी २०० वर्षें धरणें चुकीचें आहे, " सतांहि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः " ह्या कालिदासोक्तीचा आधार कुमारिलानें घेतला असल्यामुळें कुमारिल कालिदासापूर्वी असणें शक्यच नाहीं. कालिदासाचा काल कांहीं-

च्या मतें इ० स० पूर्व ५७ मध्यें असावा; हें मत ग्राह्य धरिलें तरी कुमारिलाचा काल शकपूर्वी मानतां येत नाहीं. कुमारिल इ० स० ६५० ते ७०० या दरम्यान असावा असें आम्हीं वर दर्शविलेंच आहे. कुमारिलानें बौद्ध धर्माचें अध्ययन बुद्ध भिक्षूंपाशीं केलें असावें; तसेंच त्यास अनेक अनार्य भाषांची चांगलीच माहिती असावी असें दिसतें. तो न्याय-मीमांसादि शास्त्रांत पारंगत होता; वार्धक्यांत त्यानें आपला देह जीवंत-पणींच अग्नीस अर्पण केला असावा असें दिसतें; कुमारिलाची अत्यंत महत्त्वाची कामगिरी म्हटली म्हणजे बुद्धमताचा पाडाव करून लोकांची वेदांवरील उडालेली श्रद्धा पुनः दृढमूल करणें ही होय.

कुमारिलभट्टानंतर सुमारे शंभर वर्षांनीं शंकराचार्यांचा उदय झाला असावा. कुमारिलाची व शंकराचार्यांची भेट झाली होती ही कथा काल्पनिक आहे; कुमारिलाच्या कालापेक्षां शंकराचार्यांच्या कालाविषयीं जास्त विश्वसनीय माहिती मिळते व त्यावरून कुमारिलाची व शंकराचार्यांची भेट असंभाव्य ठरते. कुमारिलापेक्षां शंकराचार्यांच्या कामगिरीचें महत्त्व लोकांस अधिक वाटतें; म्हणजे त्यायोगें कुमारिलाचें महत्त्व कमी आहे असें मात्र नव्हे. परंतु शंकराचार्यांची जास्त कीर्ति आणि त्यांनीं मिळविलेला सर्वव्यापि विजय यांचें इंगित त्यांच्या वेळच्या लोकांच्या अतिशय तीव्र आकांक्षा त्यानें पूर्ण केल्या यांत आहे. लोकांच्या अत्यंत प्रिय भावनांशीं समरस होणें हेंच लोकोत्तर पुरुषांच्या विजयाची व त्यांच्या जगद्व्यापि लोकप्रियतेची किल्ली होय हें ध्यानांत धरलें पाहिजे. त्यांस " प्रच्छन्नबौद्ध " असेंच संबोधितात. कदाचित् शंकराचार्यांच्या मायावादांत व बौद्ध लोकांच्या विज्ञानवादांत साम्य असल्यानें त्यास प्रच्छन्न बौद्ध म्हणावें. तत्वज्ञानासंबंधानें कांहीं असो, यांत संशय नाहीं कीं, बौद्ध धर्मांचा कुमारिलानें उच्छेद केल्यावर शंभर वर्षांनीं नैसर्गिक रीत्याच बौद्धमताची लाट जी पुन्हां परतली त्या लाटेस मान देऊन लोकांच्या दोन प्रवृत्तींस आचार्यांनीं सहानुभूति दाखविली. या दोन प्रवृत्ति म्हणजे अहिंसा व संन्यास यांजविषयींचा ओढा होय. इ.स.पू. २००० पूर्वींपासूनच आर्य लोकांत संन्यास धर्मांची विशेष आवड दिसते व यज्ञयागादिकांतील हिंसेविषयीं बौद्ध

धर्मापासून विशेष अनादर बुद्धि लोकांत दृढमूल झाली असल्याकारणानें कुमारिलाचें मीमांसामत लोकांना सर्वस्वी मान्य होणें शक्य वाटत नव्हतें. शिवाय कुमारिलाचा उपासनामार्ग तत्कालीन प्रचलित पद्धतीहून भिन्न होता. कुमारिलाची सर्व भिस्त वेदांवर असून अग्निहोत्र व हिंसायुक्त यज्ञादिकर्मे हेच त्यांतील उपासना मार्ग होत. कुमारिलास संन्यास मार्ग तर अगदींच पसंत नव्हता. ; संन्यासी म्हटला कीं त्याच्या कपाळाची तिडीक उठे. पण लोकास जरी वेदांविषयीं श्रद्धा मान्य होती तरी उपासनेसंबंधीं मतभेद होता. पुराण–कालापासून अग्निहोत्रादि कर्मे मागेंच पडत चाललीं असून लोकात शिव, विष्णु, आदित्य, देवी व गणपति इत्यादि देवतांची उपासना विशेष रीतीनें चालू झाली होती असें दिसतें.लोकांत वेदाप्रमाणें या देवतांविषयींही आदर बराच असे; त्यामुळें अग्निहोत्रादि कर्माविषयीं विशेष आदरबुद्धि व या पुराणदेवतांच्या पूजेचा लोप होणें संभवनीय नव्हतें. हिंसाप्रयुक्त यागाविरुद्ध लोकमताचा उलटलेला प्रवाह तर याहीपेक्षां जोराचा होता. बौद्ध व जैन मतांचा प्रादुर्भाव होण्यापूर्वींच वेदान्तमताने हिंसेविषयीं आर्य लोकांस मनस्वी वीट आला होता; दाक्षिणेकडील आर्यांत मांसादि वर्ज असे; अर्थात त्यांस कुमारिलाचा हिंसाक्रियान्वित कर्ममार्ग कधींच पटण्यासारखा नव्हता. त्यामुळें कुमारिलाचें तत्वज्ञान व मते दाक्षिणेंत विशेष प्रिय होणें शक्य नव्हतें. साहजिकच ज्या दक्षिणकडच्या ब्राह्मणांनीं मांसाशन शेंकडों वर्षांपासून सोडून दिले होतें त्यांतून कुमारिलाच्या मताचा विरोध करणारा एक अद्वितीय पुरुष, वादविवाद करण्याच्या विलक्षण सामर्थ्यानें युक्त आणि मनोहर संस्कृत भाषा लिहिणारा, व्यवहारनिपुण व राजकीय धोरणाचा असा निर्माण झाला. त्यानें वेदांच्या आधारानेंच आणि वेदान्तसूत्राच्या पायावर आपलें नवीन तत्वज्ञान उपदेशिलें आणि संन्यासाचा पुरस्कार आणि अग्निहोत्राविषयीं अनादर जो लोकांना प्रिय होता तोच प्रतिपादन केला. याशिवाय शिव, विष्णु, देवी यांच्या पूजेसही अग्रस्थान नसलें तरी अनुमति दिली. या रीतीनें शंकराचार्यांनीं एका प्रकारं बौद्ध लोकांच्या जुन्या वृत्तीकडे वळलेल्या लोकमतासच दुजोरा दिला. मात्र वेदांविषयीं अपूज्यता व

वर्ण धर्मांविषयीं अनादर हीं जीं दोन बौद्धमतें लोकांनाही अप्रिय होतीं तीं त्यानेंहि खोडून काढलीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे बौद्ध अहिंसा मताकडील लोकांची आवड पाहून तीस मान देऊन पण कुमारिलभट्टानें स्थापिलेल्या वेदाच्याच प्रामाणाच्या पायावर शंकराचार्यांनीं हल्लींची हिंदु-धर्मांची विस्तृत, मनोहर व भक्कम इमारत उभारली यांत शंका नाहीं.

शंकराचार्यांच्या जन्मशकाविषयीं तसेंच जन्मस्थानाविषयीं कुमारिलभट्टा-पेक्षां जास्त विश्वसनीय माहिती मिळते. केरळ ऊर्फ मलबार प्रांतांत कालदी नगरींत नंबुद्री जातीच्या ब्राह्मणकुलांत इ० स० ७८८ (शके ८१०) मध्यें त्यांचा जन्म झाला अशी आख्यायिका आहे. कालदी येथें नुकतेंच मंदिररूपानें त्यांचें स्मारक उभें झालें आहे. कांहीं पुराणमतवादी शंकराचार्यांचा तसाच कुमारिलाचा काळ इसवीसनापूर्वी ५–६ शें वर्षे असावा असे मानतात, तसेंच बुद्धाचाही काळ त्यापूर्वी १–२ शतकें मानतात, पण या विधानास कोणताच आधार सांपडत नाहीं. प्राचीन इतिहासांतील ठळक ठळक गोष्टींचा काळ साधारणपणें आतां ठरल्यासारखा आहे. तत्कालीन ग्रीक इतिहासावरून चंद्रगुप्त राजाचा काळ इ. स. पू ३१२ असा निश्चित झाला आहे; व चंद्रगुप्ताच्या कालाच्या अनुरोधानेंच इतर गोष्टींचे काळ ठरविणें अवश्य झालें आहे. शंकराचार्यांचा काळ शकपूर्व मानणाऱ्या मताचें खण्डान यापेक्षां जास्त करणें अनवश्यक आहे; आणि एकंदरीनें पाहतां शंकर जन्माचा इ. स. ७८८ हा काल असंभवनीय वाटत नाहीं.

शंकराचार्यांचें चरित्र अनेक " दिग्विजयांतून वर्णिलें आहे, तें समग्र विश्वसनीय असेलच असें नाहीं. पण त्यावरून शंकराचार्यांच्या आयुष्याची रूपरेखा साधारणपणें खालीं लिहिल्याप्रमाणें ठरवितां येईल :— शंकराचा-र्यांचे वडील लहानपणींच निवर्तल्यामुळें त्यांची जोपासना त्यांच्या मातु:श्रीनें केली. अशा आपत्तींतहि अगदीं अल्पवयांतच त्यांनीं आपलें अध्ययन उत्कृष्टपणें संपविलें, यावरूनच त्यांच्या तीव्र बुद्धीची साक्ष पटते. त्याकाळीं लहान वयांतच लग्न करण्याचा रिवाज असल्यामुळें व त्यांच्या मातुश्रीचेंहि त्यांचेवर उत्कट प्रेम असल्यामुळें त्यांच्या मातुश्रींनी त्यांच्या लग्नाची खटपट चालविली, पण अगदी अल्पवयांतच शंकराचार्यांचें ध्येय व साध्य निराळें

असून तें सिद्ध करण्याचा त्यांचा निश्चय ठाम ठरला असावा असें दिसतें. कदाचित् मलबार प्रांताकडे बौद्धमताचें प्राबल्य विशेष असेल किंवा कुमारिलभट्टाचा प्रवृत्तिपर मार्ग शंकराचार्यांस इतक्या लहानपणींहि संमत नसेल. शंकराचार्यांनीं संन्यासदीक्षेचा निश्चय कायम ठरविला व तो आपल्या मातुःश्रीस विदित केला. मुलाच्या या विलक्षण निश्चयानें तिच्या अन्तःकरणास पीळ पडला असेल यांत शंका नाहीं. पण अखेर कसे तरी करून शंकराचार्यांनीं आपल्य निश्चयास मातेचा रुकार घेतला व आपल्या मातेस जरूर पडेल त्यावेळीं भेटण्याचें अभिवचन देऊन ते घर सोडून निघाले.

मलबार प्रांत सोडून योग्य गुरूचा शोध करीत करीत शंकराचार्य विंध्याद्रीच्या आसपास येऊन पोंचले; तेथें त्यांची गोविंदगुरूंशीं गांठ पडली. गोविंदाचार्य म्हणजे सांख्यकारिकांवर भाष्य लिहिणारे प्रसिद्ध गौडपादाचार्य यांचे पट्टशिष्य होते. गोविंदाचार्यांनीं शंकराचार्यांस योग्य उपदेश देऊन संन्यासदीक्षा दिली. यानंतर वेदान्तशास्त्राचें अविरत अध्ययन चालू होतें. अशा रीतीनें कांहीं वर्षें लोटल्यावर ते काशीस गेले. काशीच्या पण्डितांची विद्वत्तेबद्दल अखिल हिंदुस्थानांत बरीच ख्याति होती व सध्यांहि आहे. आपल्या असामान्य विद्वत्तेनें शंकराचार्यांनीं तेथील पण्डितांस चकित करून सोडिलें व त्यांस वादांत जिंकिलें. त्या वेळेपासून शंकराचार्यांची थोरवी सारखी वाढतच गेली व त्यांचें तत्वज्ञान लोकांस पटूं लागलें. नंतर लगेच शंकराचार्यांनीं प्रस्थानत्रयीवर आपलें प्रथनीय व चिरंतन असें भाष्य लिहिलें. त्याची प्रसिद्धि इतकी झाली; व त्याची महती इतकी वाढली कीं, कोणाही नवीन तत्वज्ञान्यास आपलें मत प्रस्थापित करणें झाल्यास त्यास उपनिषदें—भगवद्गीता व बादरायणांच्या वेदान्तसूत्रांवर भाष्य लिहिणें जरूर मानलें गेलें. असो, काशीस असतांनाच शंकराचार्यांनीं आणखींहि थोडे फार उपग्रंथ लिहिले असावे. हे सर्व ग्रंथ संस्कृतांतच असून त्यांतील भाषा अगदीं साधी, सरळ पण जोरदार व मनोहारि आहे. शारीरभाष्यांतील विवेचन व युक्तिवाद इतका भारदस्त पण विशद आहे कीं, या ग्रंथाची गणना जगांतील उत्तमोत्तम ग्रंथांत नेहमींच केली जाईल.

अशा तऱ्हेनें नवीन ग्रंथ लिहून व आपल्या असामान्य बुद्धिमत्तेनें व बुद्धिवादानें काशींतील सर्व पंडितांकडून विजयपत्र मिळविल्यावर आपल्या मतप्रसारार्थ शंकराचार्यांनीं सर्व हिंदुस्थानभर संचार केला व ठिकठिकाणच्या प्रसिद्ध विरोधी पण्डितांस वादांत जिंकून आपलें मत प्रस्थापित केलें. निरनिराळ्या ग्रंथांतून या वादांच्या हकीकती दिल्या आहेत. पण त्यांत अतिशयोक्ति नसेल असें मात्र नाहीं. तथापि शंकराचार्यांचा मण्डनमिश्राशीं वाद झाला व त्यांत मंडनमिश्रास हार जावें लागलें ही गोष्ट खोटी मानतां येत नाहीं. मंडणमिश्र हा प्रथम कुमारिलभट्टाचा कट्टा अनुयायी होता; पण अखेर त्यानें शंकराचार्यांचें म्हणणें कबूल केलें. वादाच्या अटींत ठरल्याप्रमाणें त्यानें संन्यासदीक्षा स्वीकारली. ह्या वादांतील लक्षांत ठेवण्यासारखी विशेष गोष्ट म्हटली तर या वादांत मंडनमिश्राची स्त्री पंच होती, यावरून तत्कालीन स्त्रियांची थोरवी व्यक्त होते. असो, मंडनमिश्रानें शंकराचार्यांचें शिष्यत्व स्वीकारलें; संन्यासाश्रमांतील त्याचें नांव सुरेश्वराचार्य असें होतें. शंकराचार्यांनंतर शृंगेरी मठाचे गादीवर जगद्गुरु या नात्यानें यांची स्थापना झाली. खिस्तशिष्य सेंटपीटरप्रमाणें हिंदुस्थानांतील पोप अथवा जगद्गुरु होण्याचा पहिला मान शंकरशिष्य सुरेश्वराचार्यांस आहे. असो; शंकराचार्यांनीं उज्जनीच्या पंडितांसहि जिंकिलें; फार प्राचीनकालापासून उज्जनी हें पाशुपतादि भीषणमतांचें व विद्यादेवीचेंही वसतिस्थान म्हणून प्रसिद्ध होतें. येथें महाकालेश्वराचें विख्यात देवालय होतें व आहे. उज्जनीस पाशुपताचार्य नांवाचा अति विख्यात पंडित असे; त्याचा व शंकराचार्यांचा वाद होऊन शंकराचार्य विजयी झाले. आसाम प्रांताची देखील प्राचीन काळीं विद्वत्तेबद्दल बरीच ख्याति होती. तेथील पंडितांशींही शंकराचार्यांचा वाद होऊन त्यांत शंकराचार्यांस विजयपत्र मिळालें. नंतर शंकराचार्यांनीं काश्मीरच्या पंडितांस वादांत जिंकिलें. काश्मीरांत शारदांबेचें प्रसिद्ध देवालय आहे. या देवालयाचें पुढील द्वार सदैव बंद असे व त्याविषयीं अशी आख्यायिका असे कीं, जो कोणी जगांतील सर्व पंडितांस जिंकील त्यासच फक्त ह्या देवालयाचें द्वार उघडण्यांत येईल. शंकराचार्यांनीं हें द्वार उघडलें.

शंकराचार्यांच्या मठांतून आजतागायत शारदा हें प्रधान दैवत समजलें जातें. यानंतर शंकराचार्य हिमालयांत बदरिकेदारकडे निघून गेले. बदरिकेदारासही शंकराचार्यांच्या गादीचें पीठ आहे. आम्ही पूर्वी म्हटलेंच आहे कीं, शंकराचार्य हे व्यवहारकुशल आणि त्याचप्रमाणें राजकीय धोरणाचे होते. याशिवाय त्यांचा स्वभाव शांत असून कोणासही निष्कारण प्रियता न दाखवितां सर्वांवर सारखें प्रेम करणारा होता. तात्पर्य त्यांची सर्वांभूतीं समत्व बुद्धि असल्यानें त्यांजविषयीं देशांतील भिन्नभिन्न मतांच्या लोकांचे ठिकाणीं त्यांजविषयीं अतिशय आदर उत्पन्न झाला, त्यामुळें लोकांनीं जगद्गुरु म्हणून जी पदवी दिली ती ( टिळकांच्या लोकमान्य या पदवीप्रमाणें ) सर्वमान्य झाली. आणि सर्व जगताचे ते खरोखर पूज्य गुरु झाल्यानें ती योग्य रीतीनें त्यांस दिली गेली. ती इतकी योग्य होती कीं, हळु हळु शंकराचार्य हें विशिष्ट नाम न राहतां सामान्य नाम झालें आणि त्याचा अर्थ मुख्य गुरु असाच इकडे रूढ झाला आणि यामुळें जैनांचे शंकराचार्य असा ही प्रयोग आपण पुष्कळदां करतों. असो; शंकराचार्यांनीं पाहिलें कीं, आपलें मत नेहमीं उपदिष्ट व्हावें आणि देशावर त्याचा नेहमीं पगडा रहावा यासाठीं कांहीं कायम संस्था असणें अवश्य आहे. या हेतूनें त्यांनीं चारी दिशांस धर्मपीठांची स्थापना केली व आजतागायत या चारी पीठांवर शंकराचार्यांच्या गादीची शिष्यपरंपरा चालू आहे,आणि त्यांच्या विशेष तत्वज्ञानाचा उपदेश चालू आहे. इतकेंच नव्हे तर या मठांची एक प्रकारें धर्मसत्ता स्थापन झाली असून मठामार्फत लोकांच्या धर्मविषयक शंकांचें व वादांचें निराकारण होत आलें आहे. यावरूनहि शंकराचार्यांच्या या कामगिरीचें महत्त्व दिसून येतें. शंकराचार्यांचे चार मठ आहेत, त्यांतील दाक्षिणेंतील शृंगेरी मठ हा सर्वांत श्रेष्ठ होय. पश्चिमेकडे द्वारकेस व पूर्वभागांत पुरी येथें व उत्तरेस बदरीकेदार येथें असे चारी दिशांस चार मठ आहेत. हें प्रसिद्धच आहे.

शंकराचार्यांनीं आपल्या मातुःश्रीस तिच्या आपत्कालीं भेटण्याचें अभिवचन दिलें होतें त्याप्रमाणें ते तिला भेटण्यास गेले. तिची व त्यांची गांठ झाली व नंतर थोडक्याच दिवसांनीं ती दिवंगत झाली. वास्तविक पाहतां

संन्याशास मृतांचें क्रियाकर्मान्तर करण्याचा अधिकार ( किंवा परिपाठ ) नाहीं. पण शंकराचार्यांनीं सर्व विधि मातृप्रेमामुळें स्वतः करण्याची इच्छा दर्शवली; परंतु त्यामुळें दहनादि विधीस देखील त्यांचे इतर नातेवाईक त्यांस साहाय्य करिनात, व म्हणूनच कीं काय त्यांचे मातुःश्रीचें शव स्वतःच्या घराच्या अंगणांत त्यांस दहन करावें लागलें. शव स्मशानांत न नेतां अंगणांतच दहन करण्याचा परिपाठ ह्या वेळेपासून आजतागायत कालदीस चालू आहे. कदाचित् ही चाल शंकराचार्यांच्या पूर्वींहि कालदीस सुरू असावी व ती पाठीमागून चमत्कारिक वाटून लोकांनीं ही आख्यायिका रचिली असावी; कारण शंकराचार्यांसारखा विरक्त संन्यासी मातृप्रेमानें कां होईना शास्त्रमार्ग मोडील असें वाटत नाहीं. कदाचित् मुसलमानांच्या जुलुमांमुळेंहि शवाचें दहन स्मशानांत न करतां घरानजीकच करण्याचा परिपाठ मलबार प्रांतांत पडला असावा.

मातुःश्रीचे क्रियादि विधि आटोपल्यावर शंकराचार्यांनीं पुनः एकवार धर्मप्रसारार्थ सर्व हिंदुस्थानभर संचार केला असें दिसतें. पण आश्चर्याची अशी गोष्ट ही कीं, शंकराचार्य इतके लोकोत्तर व दिगंत कीर्तीचे पुरुष होऊन गेले तरी त्यांच्या कामगिरीची साक्ष देणारा तत्कालीन लेखाचा पुरावा उपलब्ध नाहीं. नेपाळांतील कांहीं अलीकडील लेखांतून शंकराचार्यांच्या कामगिरीसंबंधीं थोडाफार उल्लेख सांपडतो तो असाः— नेपाळांतील लोकांची मुख्य देवता म्हणजे पशुपति होय. पशुपतीचें एक भव्य देवालय नेपाळांत आहे. पशुपतीच्या पूजेसंबंधीं शंकराचार्यांच्या आधीं १००० वर्षें पूर्वींच्या शंकराचार्यांनीं कांहीं निर्बंध घालून दिले होते; ते योग्य तऱ्हेनें पाळले जात आहेत कीं नाहीं हें पाहण्याकरितां म्हणून शंकराचार्य नेपाळांत गेले होते. नेपाळच्या पशुपतीचे पुजारी महाराष्ट्रीय ब्राह्मण असत व आजही महाराष्ट्र-ब्राह्मणासच फक्त पशुपतीच्या पूजेचा अधिकार आहे. कारण नेपाळांतील व उत्तर हिंदुस्थानांतील ब्राह्मणांस मांसाशन निषिद्ध वाटत नाहीं तर महाराष्ट्रीय ब्राह्मणांनीं फार प्राचीन काळापासून मांसादि अन्नें अगदीं वर्ज्य मानिलीं आहेत. दुसरें असें कीं उत्तरेकडील ब्राह्मण महाराष्ट्रीयांइतके व्युत्पन्न व वेदपारंगत आज तरी दिसत नाहींत, त्यावेळीं असल्यास सांगतां येत नाहीं. तेव्हां कदाचित्

शंकराचार्यांनींच पशुपतीचे पुजारी दाक्षिणात्य ब्राह्मण असावेत असा निर्बंध घातला असावा हें संभवनीय दिसतें. दुसरी एक अशी सांगण्यासारखी गोष्ट आहे कीं हिमालयांतील केदारनाथाचें देवालय शंकराचार्यांनींच बांधविलें; केदारेश्वराचे पुजारी केरळ ब्राह्मणच असतात; या दोन गोष्टींवरून शंकराचार्य नेपाळांत गेले असावे हें म्हणणें संभवनीय दिसतें. पण याबरोबरच वरील उल्लेखिलेले नेपाळांतील लेख शंकराचार्यांनंतर बऱ्याच शतकांनीं लिहिलेलें आहेत हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. शंकराचार्यांनीं आपला अवतार फार अल्पवयांत म्हणजे वयाच्या ३२ व्या वर्षी संपविला अशी आख्यायिका आहे. मॅकडोनेल साहेबांचें असें मत आहे कीं, ३२ व्या वर्षी त्यांनीं संन्यासाश्रम स्वीकारला असावा व नंतर ते इहलोकींच्या भानगडींत विशेष पडले नसावे. ते आपल्या संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासांत लिहितात कीं, शंकराचार्यांचा जन्म इ. स. ७८८ मध्यें झाला असून त्यांनीं ८२० मध्यें संन्यासदीक्षा घेतली असावी; संन्यासग्रहणानंतर शंकराचार्य बरींच वर्षे हयात असावे'' पण मॅकडोनेलनें आपल्या विधानास कोणताच आधार दाखविला नाहीं; ७८८ मध्यें ३२ मिळवून ८२० ही संख्या होते; ८२० हा काळ शंकराचार्यांच्या निधनाचा समजतात तर तोच काळ मॅकडोनेलनें त्यांच्या संन्यासदीक्षेचा असें म्हटलें आहे. आम्हांस असें वाटतें कीं, वयाच्या ३२वे वर्षी त्यांनीं आपली कामगिरी संपवून ते बदरीकेदारमध्यें गेले असावे व पुढील आयुष्य त्यांनीं गुप्तपणें योगाभ्यासांत व चिंतनादिकांत घालविलें असावें.

शंकराचार्यांच्या चरित्राविषयीं हा त्रोटक विचार झाला; त्यांच्या कामगिरीसंबंधानें तसेंच त्यांच्या तत्वज्ञानासंबंधानें थोडासा विचार केला पाहिजे हिंदुस्थानच्या धार्मिक इतिहासांत शंकराचार्यांच्या कामगिरीचें फारच महत्त्व आहे; अर्वाचीन धर्मकल्पनांचा विस्तार शंकराचार्यांच्याच तत्वज्ञानापासून झालेला आहे. साहाजिकपणेंच हल्लींच्या धार्मिक परिस्थितीचें विवेचन करतांना शंकराचार्यांच्या ग्रंथांचें अध्ययन अवश्य व्हावयास पाहिजे यापुढील इतिहासाचें विवेचन करतांना देखील शंकराचार्यांच्या तत्वज्ञानाचें सिंहावलोकन पुनः पुनः करावयास हवें. शंकराचार्यांच्या कामगिरीचा विचार

करतांना साहजिकपणें खालील प्रश्न उद्भवतातः—— शंकराचार्यांचा "मायावाद" मनुष्याच्या बुद्धीस थक्क करून सोडतो यांत शंका नाहीं व तो जगन्मान्य निदान हिंदुस्थानांत सर्वांस मान्य आहे यांत शंका नाहीं. पण मायावादामुळें हिंदी जनतेंत शैथिल्य आलें कीं काय? व त्यामुळें हिंदुस्थानच्या कर्तृत्व सामर्थ्यास उतरती कळा लागली किंवा कसें? तसेंच संन्यासमार्ग श्रेष्ठ मानल्यानें काय परिणाम झाला? शंकराचार्यांनीं पौराणिक देवतांची पूजाअर्चा विशेष रीतीनें सुरू केली. पूर्वींच्या अग्निहोत्राऐवजीं आज सर्वत्र मूर्तिपूजा सुरू आहे; शालिग्राम तर सर्व घरांतून सांपडेलच. या मूर्तिपूजेमुळें लोकांत तत्वविचार सुटून भोळसटपणा माजला कीं काय? वगैरे वगैरे अनेक महत्त्वाचे प्रश्न उद्भवतात, पण त्यांचा निर्णय केवळ तर्कवादानें न ठरवतां वस्तुस्थितीवरून ठरवणें योग्य असल्यामुळें या प्रश्नांचा ऊहापोह आमच्या इतिहासाच्या पुढील भागावर टाकणें जरूर आहे.

पुरवणी—श्रीमच्छंकराचार्यांचे आजपर्यंत पुढें आलेले निरनिराळे काळ त्यांच्या प्रमाणांसह रा. काशिनाथ कृष्ण लेले यांनीं "आचार्यांत" (ता. १३ मे. १९१६) एके ठिकाणीं ग्रथित केले आहेत. आचार्यांचा जो काळ आम्हीं मानला आहे तोच म्हणजे शके ७१० हा लेले यांनीं मान्य केला आहे. हा काळ प्रथम प्रो. पाठक यांनीं अनेक आधारांसह लोकांपुढें मांडला. ते आधार येणें प्रमाणेः—१ नीलकंठकृत शंकरमन्दारसौरभ; २ कुडलगीमठाची परंपरा "निधिनागेभवन्ह्यब्दे विभवे शंकरोदयः' म्हणजे शंकराचा जन्म कलि ३८८९ अर्थात् शक ७१० वर्षीं झाला. ३ शृंगेरी मठाच्या परंपरेंतही हाच काळ एका स्तोत्रांत दिला आहे ४ हा शंकराचार्यांनीं स्थापिलेला मुख्य मठ कलिवर्ष ३९०९ वर्षीं स्थापला गेला अशी तेथें समजूत आहे "कल्यब्दे निधिखाङ्काग्निशेषसंवत्सरे मठम्। संस्थाप्य भारतीपीठं सङ्गमे तुङ्गभद्रयोः" असा मठपरम्परास्तोत्रांत उल्लेख आहे. ५ सदर स्तोत्रांत याच मठांत आचार्यांचा गुहाप्रवेशकाळ कलिवर्ष ३९२१ दिला आहे; ६ म्हैसूरमधील शिमोगा जिल्ह्यांतील कुडलीमठांत ह्याच परंपरा आहेत.

ह्या बाह्यपुराव्याच्या जोडीला प्रो. पाठक यांनीं पुढील अन्तऽस्थ

पुरावा मांडला आहे. १ चिनीप्रवासी इत्सिंग आपल्या प्रवासवृत्तांत व्याकरणकार भर्तृहरि इ. स. ६५० त मरण पावल्याचें लिहितो. भर्तृहरीचें एक वाक्य कुमारिलानें आपल्या ग्रंथांत उधृद्त केलें आहे. अर्थात् कुमारिल व सहाजिक शंकर यानंतर झाले हें उघड आहे २ सुरेश्वराचार्य शंकरशिष्य आपल्या बृहदरण्यावरील वार्तिकांत बौद्ध आचार्य धर्मकीर्ति याचें नांव घेऊन त्याचें एक मत उल्लेखित करतो. चिनी प्रवाशी फाइियन धर्मकीर्ति आपला समकालीन असल्याचें इ. स. ६९५ त लिहितो. तेव्हां शंकर आणि सुरेश्वर यांस ६९५ चे फार नंतर नेतां येत नाहीं. ३ जैन पंडित अकलंकदेव, राष्ट्रकूट दन्तिदुर्ग, साहसतुंग ( इ. स. ८ वे शतक ) यांच्या अमदानींत झाला. शंकरानें याच्या मताचें खण्डन आपल्या ग्रंथांत केलें आहे. अर्थात् शकर ८ व्या शतकांत किंवा नंतर झाला असला पाहिजे. ४ पाणिनि-सूत्रावरील प्रसिद्ध टीका काशिकावृत्ति ही सातव्या शतकांत ( इ. स. ) लिहिली गेली. यांतील एक वाक्य शंकरानें उधृद्त केलें आहे. या अनेक प्रमाणांवरून शंकराचा काळ इ. स. ७०० च्या पूर्वी जाऊं शकत नाहीं. याविरुद्ध कामकोटीमठांतील परम्परा मान्य होण्यालायक नाहीं. विशेषतः शृंगेरीमठांतील परंपरेच्या मुकाबल्यांत तीस किंमत नाहीं. कामकोटीमठाचा इ. स. पू. दिलेला काळ व शृंगेरीमठाचा काळ यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न कामकोटीमठानें दोन शंकर मानून केला आहे, परंतु तो शंकास्पद आहे.आणि खुद्द आचार्यांच्या ग्रंथांत झालेल्या काशिकावृत्ति किंवा अकलंक यांच्या वाक्योद्धाराशीं जुळणें शक्य नाहीं.

कोचीनचे सरकारी ज्योतिषी मि. सी. पी. अय्यर यांनीं विद्यारण्यांनीं शंकरदिग्विजयांत दिलेल्या शंकरजन्माच्या वेळच्या उच्च गृहस्थितीवरून गणितानें काळ काढला आहे तो शक ७२८ ( इ. स. ८०५ ) येतो. हाच काळ एस. व्ही. वेंकटेश्वर यांनीं मान्य करून १९१५च्या रायल एशियाटिक सोसाईटीच्या जर्नलमध्यें प्रसिद्ध झालेल्या निबंधांत दिला आहे व तेथें असेंही म्हटलें आहे कीं, आचार्यांचा निधनकाळहि ठराविक काळाच्या ६० वर्षांनीं पुढें नेला पाहिजे म्हणजे इ. स. ८२० न मानतां ८८० इ. स. मानला पाहिजे. आमच्या मतें हे दोन्ही सिद्धान्त चुकीचे

आहेत. कारण विद्यारण्यांनीं शंकराचार्यांनंतर ५०० वर्षांनीं दिलेले आचार्य· जन्मींचे ग्रह काल्पनिकच दिसतात. आचार्य जन्माच्या वेळीं प्रसिद्ध नव्हते त्यांचें कुळहि गरीबच होतें. तेव्हां त्यांच्या जन्माचे ग्रह लोकांच्या लक्षांत असणें शक्य नाहीं. अप्रसिद्ध पुरुष पुढें कर्तृत्वानें जगप्रसिद्ध झाले म्हणजे उच्चग्रहांनीं त्यांच्या कुण्डल्या सजतात हें प्रसिद्ध आहे. या काळाच्या विरुद्ध शृंगेरीमठस्थापनेचा परंपरागत काळ असून तो काळ सर्वांत विश्वसनीय मानला पाहिजे. आतां शंकराचार्य ८५ वर्षांवर जगले असें जें अनुमान शंकराचार्यकृत एका स्तोत्रश्लोकावरून काढतात; तेंही चुकीचें असणें संभवनीय आहे. 'वयं पञ्चाशीतेरधिकमपनीतेतु वयसि ' या वाक्यांत वर्णिलेले वय स्तोत्रकर्त्या दुसऱ्या कोणा शंकराचार्यांचें असावें. गादीवर येणारे सर्वच शंकराचार्य या नांवानें प्रसिद्ध असतात यामुळें हें स्तोत्र आद्य शङ्कराचार्यांचेंच आहे असें निश्चित म्हणतां येत नाहीं. शिवाय १२ वर्षांपर्यंत वेद आणि १८ वर्षांपर्यंत शास्त्र धारण करणारे बुद्धिवान् पुरुष व ३२ वर्षांपर्यंत अलौकिक ग्रंथरचना व जगदुद्धार करणारे अद्वितीय कर्तृत्वाचे विद्वान् होणें असंभवनीय नाहीं. मधून मधून असे पुरुष निर्माण होतात हें काशी वगैरे ठिकाणच्या अनुभवावरून सिद्ध आहे. तेव्हां शृंगेरीमठपरंपरा मानणें युक्त आहे व कोणत्याहि दृष्टीनें ती इतिहासांशीं विसंगत नाहीं असें आमचें मत आहे.

# प्रकरण १५ वें

## सामाजिक स्थिति व वर्णव्यवस्था.

या प्रकरणामध्यें ९ व्या व १० व्या शतकांतील हिंदुस्थानच्या सामाजिक परिस्थितींचें व प्रगतीचें तसेंच वर्णधर्मव्यवस्थेच्या स्थितीचें निरीक्षण आम्हीं करणार आहोंत. वर्णाश्रमधर्मव्यवस्था हा हिंदुसमाजशासनपद्धतीचा मुख्य पाया होय, तेव्हां वर्णाश्रमधर्माचाच जास्त विचार केला असतां तत्कालीन समाजाचे स्थितीचा बोध सहजच होईल. पण अशा तऱ्हेचा इतिहास लिहिण्यास जीं साधनें लागतात तीं फारच अल्पप्रमाणानें उपलब्ध आहेत. परकीयांनीं लिहिलेल्या प्रवासवृत्तांवर जास्त भर ठेवणें आवश्यक आहे, कारण आपल्या समाजांत रूढ असलेल्या चालींतील विलक्षणपणा किंवा भोळसटपणा परकीयांच्या लक्षांत जितका चटकन येतो तितका स्वकीयांच्या लक्षांत येत नाहीं. मागील कालाचें परीक्षण करतांना ज्याप्रमाणें एतद्देशीय ग्रंथकारांचा उपयोग झाला त्याप्रमाणें या कालासंबंधीं होत नाहीं. पूर्वींच्या कालांत बाणभट्टासारखे विचक्षण ग्रंथकार होऊन गेले. त्यांच्या ग्रंथांवरून तत्कालीन चालीरीतींचा चांगलाच आढावा घेतां आला; पण या दोन शतकांतील ग्रंथकारांचे ग्रंथ फारसे उपलब्ध नसल्याकारणानें परकीयांच्या प्रवासवृत्तांवर भिस्त ठेवणें भाग आहे. त्याप्रमाणेंच स्मृतिग्रंथांवरून ह्या शतकांतील परिस्थितीचें अनुमान बांधतां येईल. स्मृतिग्रंथांसंबंधीं मुख्य अडचणीची गोष्ट म्हटली तर त्यांचा कालनिर्णय ही होय. पण तो ठोकळमानानें ठरवतां येईल. अर्वाचीन कालांत रचलेल्या

स्मृतिग्रंथांत व पूर्वकालच्या स्मृतिग्रंथांत बरेच सामाजिक फरक दिसून येतात व हे फरकच त्या त्या काळच्या परिस्थितीचे द्योतक होत; ह्या स्मृतिग्रंथांच्या सूक्ष्म अध्ययनानेंही समाजस्थितीचा इतिहास लिहिणें शक्य आहे.

असो; वर्णाश्रमधर्माचा विचार करतां त्या काळीं मुख्य चार वर्णच असून हल्लींच्याप्रमाणें पोटभेट उत्पन्न झाल्याचें दिसत नाहीं. हल्लींच्या ब्राह्मणांत स्थानपरत्वें व इतर अनेक कारणांमुळें बरेच पोटभेद उत्पन्न झाले आहेत व ते इतक्या कडक स्वरूपाचे आहेत कीं, ब्राह्मणाब्राह्मणांत रोटी-बेटी-व्यवहार घडणें अशक्यच झालें आहे. गुजराथेंतील ब्राह्मण दक्षिणेंतील ब्राह्मणांच्या पंक्तीला बसतीलच असें नाहीं, मग त्यांच्यांत विवाह घडतील का नाहीं याचें बोलणेंच नको. अशा तऱ्हेचे पोटभेद त्या वेळीं अस्तित्वांत नव्हते असेंच लेख व दानपत्रें इत्यादिकांवरून दिसतें. ब्राह्मणांना अर्पण केलेल्या दानपत्रांत या पोटभेदांसंबंधीं कोठेंच उल्लेख सांपडत नाहीं. नाहींतर लेखांतून 'कनोजी' ब्राह्मण, 'द्राविड' ब्राह्मण असे उल्लेख सांपडले असते. पूर्वींच्या प्रमाणें याही कालांतील दानपत्रांतून ब्राह्मणांच्या गोत्रांचें व शाखांचेंच मात्र वर्णन आढळतें. गोत्रांच्या पूर्वीं 'स' व शाखेपूर्वीं 'सब्रह्मचारी' असे शब्द वापरलेले आढळतात. राष्ट्रकूटांच्या अकाल वर्ष राजानें इ. स. ९४० मध्यें दिलेल्या वर्धादानपत्रांत वर वर्णिल्याप्रमाणें उल्लेख सांपडतो; त्यावरून आमचें म्हणणें वाचकांच्या सहज ध्यानांत येईल. त्या दानपत्रांतील प्रतिग्रहीत्याचें 'नन्दिवर्धन—विनिर्गत भारद्वाज सगोत्र वाजिकाण्व सब्रह्मचारिणे' असें वर्णन केलें आहे. हल्लींच्या बहुतेक ब्राह्मणांस त्यांच्या वेदांच्या शाखेचें किंवा 'सब्रह्मचारित्वाचें' ज्ञानच नसतें व गोत्रांचें ज्ञान असलें तर गोत्राचे पूर्वीं 'स' प्रत्यय लावावा लागतो हें ठाऊक

नसतें. ब्राह्मणांच्या शाखेचा व गोत्रांचा उल्लेख बहुतेक सर्व दानपत्रांत आहेच; तेव्हां त्यांचीं जास्त उदाहरणें देणें जरूर नाहीं. शाखा व गोत्र यांच्या उल्लेखावरून असें स्पष्ट दिसतें कीं, त्या वेळच्या ब्राह्मणांत ‘ गुजराथी ब्राह्मण ’ ‘ दक्षिणी ब्राह्मण ’ असे स्थान निर्मित पोटभेद उत्पन्न झाले नव्हते. प्रतिग्रहीत्याच्या जन्मस्थानाचा निर्देश होत असे; उदाहरणार्थ कर्कराजानें दिलेल्या दानपत्रांत वलभी गांवाचा उल्लेख आहे. “ वलभी–विनिर्गत चातुर्विद्य सामान्य वात्सायन सगोत्र माध्यंदिन सब्रह्मचारिणे ’. हल्लींच्या काळीं काठेवाडांतील वलभी गांवच्या ब्राह्मणांस ‘ लाट किंवा सौराष्ट्र ब्राह्मण ’ असें संबोधण्यांत येईल पण अशा तऱ्हेनें त्यावेळीं संबोधण्यांत येत नसे हें आणखी एका उदाहरणावरूनहि दिसून येईल. सांगलीदानपत्रांतील प्रतिग्रहीता पौन्ड्रवर्धन येथील रहिवाशी आहे. अर्थात् हल्लींच्या प्रघाताप्रमाणें तो गौडब्राह्मण ठरतो. पण दानपत्रांत त्याचें वर्णन “ कौशिक सगोत्र वाजिकाण्व सब्रह्मचारि” इतकेंच आहे. या सर्व वर्णनांवरून ब्राह्मणांत पोटभेद निर्विवाद नव्हते. हिंदुस्थानांतील सर्व ब्राह्मण सारखेच लेखिले जात. त्यांच्यांत फक्त भिन्न गोत्रें एवढाच काय तो फरक असे, असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. पराशरस्मृतींत अतिथीचें गोत्र किंवा त्याचें अध्ययन यांची पृच्छा करूं नये असें लिहिलें आहे. “ न पृच्छेत् गोत्रचरणे न स्वाध्यायश्रुते तथा ” या वचनावरूनहि ब्राम्हणांत “ गोत्र व चरण ” या खेरीज इतर पोटभेद नव्हते हें उघड दिसतें.

क्षत्रियांतहि ब्राह्मणांप्रमाणेंच पोटभेद नसावेत असें दिसतें; येथून तेथून सर्व क्षत्रिय एकसारखेच समजले जात असावेत. ‘ खत्री ’, ‘ रजपूत ’, बैस किंवा मराठा ’ अशा तऱ्हेचे भौगोलिक पोटभेद

त्यांच्यांत नसावेत व सर्वांत सरसकट विवाह होत असावेत. तत्कालीन ब्राह्मणांत व क्षत्रियांत एक भेद मात्र ठळकपणें दिसून येतो; या पूर्वीच्या कालांतील क्षत्रिय मोठ्या अभिमानपूर्वक आपल्या गोत्राचा दानपत्रादिकांतून निर्देश करीत. दक्षिणचे चालुक्यराजे आपणास 'मानव्य सगोत्र' असें अभिमानपूर्वक म्हणवीत तर कांचीचे पल्लवराजे आपणास 'भारद्वाज' सगोत्र म्हणवीत. पण या दोन शतकांत होऊन गेलेल्या राजकुलांत गोत्रांचा उच्चार क्वचितच होई; मालखेडच्या राष्ट्रकूटांच्या अगर कनोजच्या प्रतिहारीं घराण्याच्या अगर मेवाडच्या गुहीलोतघराण्याच्या लेखांतून गोत्रनिर्देश सांपडत नाहीं. परमारकुलोत्पत्तीची हकीगत वर्णितांना परमारांचें गोत्र वाशिष्ठ असावें अशी मात्र दन्तकथा दिलेली आढळते; तसेंच चालुक्यांच्या गोत्रांची माहिती अशीच कुलोत्पत्तीच्या दन्तकथेंत सांपडते. कदाचित् या कालांत गोत्रांचें महत्त्व कमी झालें असावें व कुलासच महत्त्व प्राप्त झालें असावें कारण पुष्कळ ठिकाणीं गोत्र शब्द कुलवाचक झालेला दिसतो. एका शिलालेखांत (बुचकुलालेख एपि० इंडि ९, १९९) तर प्रतिहारी गोत्राचा (अर्थात् कुलाचा) उल्लेख सांपडतो; नरवाहनलेखांत बप्पकास 'गुहिलगोत्र नरेंद्रचंद्र' असेंच संबोधिलें आहे. यावरून असें दिसतें कीं, बौद्धधर्म शिष्ट अहिंसामतामुळें यज्ञादि कर्में याकाळीं मागें पडल्यामुळें व पौराणिक देवतांच्या उपासना विशेषें करून प्रचारांत आल्यामुळें क्षत्रियांना आपल्या गोत्रांचा व प्रवरांचा विसर पडत चालला असावा. वैदिक कर्मांमध्यें गोत्रप्रवरांस विशेष महत्त्व असतें तसें तें पौराणिक देवतांच्या उपासनेंत नसतें; तरी देखील क्षत्रियांस आपल्या गोत्रप्रवरादिकांचा अजीबात विसर पडला होता असें दिसत नाहीं. हिंसाविहीन वैदिक कर्में लोकांत प्रचारांत असल्यामुळें गोत्रादिकाचें स्मरण असणें थोडें तरी अवश्य होतें.

वैश्य जातींत देखील पोटभेद उत्पन्न झाले नसावेत; कारण हल्लींच्या प्रमाणें त्यांच्यांत महेश्री, लाड वगैरे उपजाती असल्याचें आढळून येत नाहीं. बौद्धधर्माचा प्रसार अगदीं प्रथमपासूनच वैश्य-वर्गांतच विशेषें करून झाला असल्यामुळें वैश्य वर्गास आपल्या गोत्रादिकांचा विसर फारच लवकर पडला; वैश्य जातींत बौद्धधर्मा-चा प्रसार अशोककालापासूनच झाला असावा; कारण श्रौतसूत्रां-तील प्रवराध्यायांत वैश्यांच्या गोत्रांचा व प्रवरांचा विचार ब्राह्मण-क्षत्रिय यांच्या गोत्रादिकांबरोबर न करतां स्वतंत्र रीतीनें करण्यांत आला असून त्यांचें एकच गोत्र ( वत्सप्री ) व प्रवर मानण्यांत आले आहेत. बौद्धधर्माचा ऱ्हास झाल्यानंतर वैश्य जातीचा कल जितका विष्णु–उपासनेकडेच विशेष वळला, तितका वेदप्रतिपादित धर्माकडे वळला नाहीं; याचें कारण विशेष काय झालें याचा विचार पुढील पुस्तकांतच करणें कालदृष्ट्या वाजवी होईल.

या तीन जाति मुख्य होत्या; पण याशिवायहि स्वतंत्र अशा बऱ्याच उपजाति असत. पण त्यांची संख्या हल्लींच्या प्रमाणें अगणित नव्हती. या उपजातींचा उल्लेख लेखांतून क्वचितच आढळतो. कायस्थ लोक लेख लिहिण्यांत वाकबगार असल्यामुळें लेखांतून मधून मधून कायस्थांचा उल्लेख सांपडतो; पण त्यांच्यांतही पोटभेद होते असें दिसत नाहीं. इतर उपजातींमध्येंहि पोटभेद उत्पन्न झाले नसावेत.

त्या वेळीं मुख्य म्हणून समजण्यांत येणाऱ्या जातींची संख्या जास्त जास्त म्हणजे सात असावी असें आरबी प्रवाशांच्या वर्णना-वरून दिसतें. मेग्यास्थेनीसप्रमाणें इब्न् खुर्दादबा यानेंहि हिंदुलोकांत सात जाति आहेत, असें वर्णन केलें आहे. ह्या आरबी प्रवाशानें इ.स. ९०० मधील खालीलप्रमाणें जातींचे वर्णन दिलें आहे. "हिंदुस्थानां-

तील जातींचे सात वर्ग आहेत, ( १ ) सबकत्रियांचीं गणना उच्च जातींत होते; राजांची जात हीच होय व ह्याच जातींस सर्वजातींचे लोक मान देतात. ( २ ) ब्राह्मण वर्गः—या जातींत दारू व इतर मादक पदार्थ यांचा तीव्र निषेध मानण्यांत येतो. ( ३ ) क्षत्रियः— या जातींत मद्यपानाचा निषेध नाहीं; पण ह्या वर्गांतील लोक तिहीं-हून अधिक मद्याचे पेले पीत नाहींत. या वर्गांतील कुमारिकांचे ब्राह्मणांशीं विवाह होतात, पण ब्राम्हणकुमारिकांचे या जातीशीं विवाह होत नाहींत. ( ४ ) सुदरीय— ह्या जातीचा मुख्यत्वेंकरून शेतकीचा धंदा असतो. ( ५ ) बैसुरः—या वर्गांतील लोक कारागीर व घरकाम करणारे असतात. ( ६ ) सौंदलीय —या वर्गांतील लोक अगदीं हलक्या तऱ्हेचीं कामें करतात ( ७ ) लाहुद—या वर्गांतील स्त्रियांना दागदागिन्यांची फार हौस असते व या वर्गांतील पुरुषांना करमणुकीच्या तसेंच कौशल्याच्या खेळांचा शोक असतो." ९व्या व १०व्या शतकांतील समाजांचें ठोकळमानानें हें यथार्थ वर्णन आहे असें मानण्यास हरकत नाहीं. परकीय प्रवाशांच्या ध्यानांत आपल्याकडील चालीरीतींचें रहस्य आलें नाहीं तरी त्यांतील चमत्कारिकपणा त्यांचे ध्यानांत सहजच येईल. वरील यादींत " सबकतरीया ' ही स्वतंत्र व ब्राह्मणांहूनही जास्त वरिष्ठ दर्जाची जात मानली आहे. कदाचित् रजपूत क्षत्रियांच्या उच्च मनोवृत्तींच्या योगानें, त्यांच्या शौर्यशाली तेजानें व आरबांच्या सतत प्रतिरोधानें त्यांस हा दर्जा प्राप्त झाला असवा; २ रा वर्ग उघडपणें ब्राम्हणांचाच आहे. ३ रा वर्ग सर्वसामान्य क्षत्रियांचा होय. ४ था वर्ग शूद्रांचा होय, ह्या वर्गाकडे सध्यां शेतकीचा धंदा चालविलेला दिसतो; वास्तविकरीत्या बैसुरांच्या ( ऊर्फ वैश्य जातीच्या ) खालीं यांचा दर्जा यानां भगवद्गीतेंत देखील ( ' कृषिगोरक्ष्यवाणिज्यं ) वैश्यांचा

मुख्य धंदा म्हटला तर शेतकीचा होय असें सांगितलें आहे; पण बहुतेक वैश्यजातींनें पुरातनकालांतच ह्या धंद्याचा त्याग केला होता व जे अद्यापहि शेतकी करीत त्यांची गणना शूद्र वर्गांत होत असे, ह्याविषयीं जास्त विचार पहिल्या पुस्तकांत आलाच आहे. वैश्य जातींचें वर्णन कारागीर व घरकामें करणारे असें येथें दिलें आहे; पण त्यांचा धंदा व्यापार होय असें कोठेंच सांगितलेलें आढळत नाहीं; याचें कारण काय असावें हें समजत नाहीं. मेग्यास्थेनीसनें व्यापारीवर्गाचा समावेश कारागिरांतच केलेला आहे व कारागिरांस वैश्य असेंच म्हटलें आहे. पण 'वाणिज्य' हा वैश्यांचा विशिष्ट धंदा असे, असें कोणत्याहि प्रवाश्यानें वर्णिलें नाहीं, हें आश्चर्य होय. ६ व्या वर्गांत चांडालजातीचा समावेश होतो. ह्या जातीकडे सर्व प्रकारचीं हलकीं कामें सोंपवण्यांत येत. बाणाच्या हर्षचरितांत देखील ह्या जातीकडे सैन्यांतील मोत्तद्दारांचें काम असे, अशा अर्थाचें वर्णन आढळतें. ७ व्या वर्गांत भटकणाऱ्या व लोकांस शारीरिक कसरतीचे खेळ वगैरे दाखवून उदरनिर्वाह करणाऱ्या डोंबारी वगैरे सर्व लोकांचा समावेश होईल. सबकुतरिय व लाहुद हे शब्द कोणत्या संस्कृत शब्दांचे अपभ्रंश आहेत हें नीटसें समजत नाहीं. सबकुतरिय हा "सुक्षत्रिय" शब्दाचा कदाचित् अपभ्रंश असेल.

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें प्रत्येक जातीस धंद्यासंबंधीं व विवाहासंबंधीं ठराविक निर्बंध आहेत खरे पण ते कालमानाप्रमाणें बदलतात; तेव्हां ९ व्या व १० व्या शतकांत हीं बंधनें कितपत शिथिल किंवा कडक होतीं हें आतां पाहूं. वैवाहिक रीतिरिवाजांसंबंधीं खुरदादबाच्या वर्णनांत थोडासा धागा सांपडतो; तो आधारास घेऊन त्या बरोबरच तत्कालीन स्मृतिवचनांचा विचार करून तत्कालीन परि-

स्थितीचें चित्र काढण्याचा येथें प्रयत्न केला आहे. त्या कालांत सवर्णांतच विवाह होत असावेत. पण याहि नियमास मेग्यास्थेनीसप्रमाणेंच इब्न् खुरदादबानें एक अपवाद दिला आहे. तो हा कीं, ब्राह्मणांस क्षत्रिय कुमारिका वरितां येत असे. कदाचित् क्षत्रियांस देखील वैश्य कुमारिकेशीं विवाह करण्याचा ह्या कालांतहि अधिकार असेल. आतां ह्या कालाच्या सुमारास किंवा तत्पूर्वीं रचिलेल्या व्यासस्मृतिवचनांचा विचार करूं. त्यांत अनुलोम विवाहासंबंधीं खालील श्लोक आढळतात:—"ऊढायां हि सवर्णायामन्यां वा काममुद्वहेत् । तस्यामुत्पादितः पुत्रो न सवर्णाप्रहीयते । उद्वहेत्क्षत्रियांविप्रो वैश्यांच क्षत्रियो विशाम् । न तु शूद्रां द्विजः कश्चिन्नाधमः पूर्ववर्णजाम् ।" —या स्मृतींत वर्णिलेलीं स्थिति या दोन शतकांच्या पूर्वींच्या शतकांस तंतोतंत लागू पडेल; पण ती स्थिति एक अपवाद वगळतां कालाचीहि निर्देशक असूं शकेल. मनुस्मृतीच्या काळीं ब्राह्मणांस आपल्या जातीखेरीज क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र कुमारिकांशीं विवाह करतां येत असे; या कालांत ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य जातींच्या पुरुषांस शूद्र कुमारिकेशीं विवाह करण्यास प्रतिबंध असे. बाणाच्या कालीं देखील अशा तऱ्हेनें शूद्र स्त्री करण्यास प्रत्यवाय नसे असें दिसतें; कारण बाणास पारशव भ्राते होते असें मागील भागांत सांगितलेंच आहे. पण या कालांत कोणत्याहि द्विजास शूद्र जातीची स्त्री वरितां येत नसे. पूर्वींच्या कालीं वैश्यांस वैश्य वर्णाची तसेंच शूद्र वर्णाची कुमारिका वरितां येत असे, पण आतां त्यास फक्त वैश्य कुमारिकाच वरितां येई. पूर्वींच्या कालांत क्षत्रियांस क्षत्रिय, वैश्य व शूद्र कन्या वरतां येत असत; आतां त्यांस शूद्र कन्येशीं विवाह करतां येत नसे; पण ज्या त्या वर्णाच्या पुरुषांनीं प्रथम सवर्णास्त्री वरावी असा कडक निर्बंध असे. या निर्बंधामुळेंच पुढें

असवर्णा स्त्री वरण्याचा प्रघात बंद पडला असावा. असवर्णा स्त्रीं वरण्याचा प्रघात समाजांत सुरू असला तरी अशा तऱ्हेनें अधिक कुमारिका वरणें श्रीमान् किंवा सत्ताधारी ब्राह्मणांसच शक्य असे. असवर्णा स्त्री वरण्याचा प्रघात १० व्या शतकांत कांहीं चालू असावा. कारण प्रसिद्ध राजशेखराची स्त्री इतर जातीची होती असें इतिहास सांगतो. काबूल व सिंध प्रांतांत ब्राह्मणांचींच राज्यें असावींत; कारण तेथील राजपुरुषांस ब्राह्मणकन्या वरण्याचा अधिकार असे; बाकी ह्या सर्व राजपुरुषांचें आचरण क्षत्रिय राजांस साजेल असेंच होतें. अनुलोम विवाहाचा प्रचार समाजांत एकजीव उत्पन्न होण्यास पोषकच असे; तो प्रघात बंद झाल्यापासून समाजाच्या निरनिराळ्या अवयवांत तुटकपणा येऊं लागला व या तुटकपणाचें पर्यवसान जातिजातीमध्यें तीव्र मत्सर उत्पन्न होण्यांत झालें; पण वरील असवर्णाविवाह विधान करतांना हेंही लक्ष्यांत ठेवावयास हवें कीं, त्या वेळीं ह्या तिन्ही जातीच्या अन्नपानादि व्यवहारांत कसलाच फरक नव्हता.

अनुलोमविवाह प्रचारांत असले, तरी समाजांतील तुटकपणा वाढवण्यास दुसरा एक निर्बंध मात्र कारणीभूत झाला होता; तो असा कीं, अनुलोमविवाहापासून झालेली संतति मातृजातिसमान समजण्यांत येऊं लागली. व्यासस्मृतीच्या कालीं हा निर्बंध अस्तित्वांत नव्हता, त्यांत तर अशा तऱ्हेच्या संततीचा दर्जा पित्याच्या जातीचाच असतो असें वचन आहे “ तस्यामुत्पादितः पुत्रो न सवर्णात्प्रहीयते ”—एके काळीं व्यासस्मृतींतील नियमानुसार अनुलोमविवाहापासून झालेल्या संततीचा दर्जा पितृजातिसमान मानण्यांत येत असावा असें सर्व जातींत दिसून येणाऱ्या सारखेपणावरून अनुमानितां येतें. पण ९ व्या व १० व्या शतकांत हा दर्जा मातृजातीचा मानण्यांत आला. मध्यें एके काळीं अनुलोमविवाहापासून

झालेली संतति मिश्र जातीची मानण्यांत येई, पण या पद्धतीनें समाजांत अनंत भेद उत्पन्न होत. तेव्हां संततीचा दर्जा मिश्र न समजतां मातृजातिसमान मानण्यांत येऊं लागला. पण यामुळें समाजांतील एकजीवपणा नष्ट होऊन जातींत तुटकपणा जास्त वाटूं लागला या गोष्टींचा उल्लेख वर झालाच आहे.

जातिजातींत वैवाहिक निर्बंध कोणत्या प्रकारचे होते याचा येथवर विचार झाला. आतां जातिविशिष्ट उद्यम—धंद्यांचा विचार करूं. ज्याप्रमाणें ब्राह्मणजातींतील पुरुषांस इतर वर्णांतील स्त्रिया वरण्याचा अधिकार असे, त्याप्रमाणेंच त्यांस आपल्या वृत्तीखेरीज इतरहि सर्व प्रकारचे धंदे करतां येत. खालच्या वर्णांस मात्र वरिष्ठ जातीचे धंदे करतां येत नसत; परंतु श्रेष्ठ जातीस हीन जातीचा धंदा करण्यास हरकत नव्हती. याकाळीं बऱ्याच ब्राह्मणांनीं क्षात्रवृत्तीचा स्वीकार केला असून राज्यांतील वरिष्ठ हुद्यांवरहि त्यांची नेमणूक होत असे. शस्त्र व शास्त्र या दोहोंत ब्राह्मणांचा हातखंडा दिसतो. इब्न् खुर्दादबाप्रमाणेंच सुलेमान व्यापाऱ्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, या सर्व राज्यांतून सर्व सरदारांचें जणूं काय एकच कुल आहे असें वाटतें; विद्यावान् व वैद्यक वर्गाचेंहि एकच कुल आहे कीं काय असेंच वाटतें; कारण या धंद्यांतील लोक आपला धंदा किंवा विद्या दुसऱ्याकडे जाऊं देत नाहींत (इलि. १ पा. ६). अबू झैद म्हणतो कीं, ‘ धर्म व शास्त्र यांचें अध्ययन विशेष रीतीनें ब्राह्मणच करतात; ह्या जातींत बरेच कवि, ज्योतिर्विद, तत्वज्ञानी व दैवज्ञ आहेत व त्यांस राजाश्रय असतो. या वर्गांतील बरेच लोकांस भविष्यज्ञान असतें; ऐंद्रजालिक विद्येचीहि ह्याच लोकांस आवड आहे व प्रसंगविशेषीं ते असे कांहीं चमत्कार करून दाखवितात कीं, त्यांनीं मति गुंग होऊन जाते. ह्या सर्व लोकांचा विशेष भरणा कनोजच्या दरबारीं दृष्टीस

पडतो' वरील वर्णनावरून असें दिसतें कीं, बुद्धिप्रधान नानाप्रकारच्या धंद्यांत ब्राह्मणांचें याकालीं प्रावीण्य असे; कनोजचे किंवा साधारण-मानानें बाणाचे काळाप्रमाणें यावेळींहि उत्तर हिंदुस्थानचे ब्राम्हणांची सर्व कामांत अघाडी असे. अल्मसूदीनें आपल्या प्रवासवर्णनांत असें लिहिले आहे कीं, " सर्व जातींत ब्राह्मणांसच जास्त मान व प्रतिष्ठा असे; राज्याधिकार एकाच कुलाकडे असत, त्याचप्रमाणें वजिरांची गादी वंशपरंपरेनें चालत असे."

ब्राह्मणांप्रमाणेंच क्षत्रियहि याकालीं शस्त्रविद्येप्रमाणें शास्त्राध्ययनांत प्रवीण असत. ब्राह्मणांची मुख्य विद्या म्हटली म्हणजे शास्त्रविद्या होय. क्षत्रियांची मुख्य विद्या म्हणजे शस्त्रविद्या होय. पण या कालांत ब्राह्मण व क्षत्रिय हे दोघेही दोन्ही विद्यांत सारखेच निपुण असत. या कालांत क्षत्रियांस वेदपठणाचा अधिकार होता आणि प्रसंगविशेषीं क्षत्रियांचें शास्त्रविद्येमध्यें प्रावीण्य विशेष दिसून येई. रजपूत राजकुलांतून या दोन्ही विद्यांचा सारखाच अभ्यास होत असे व रजपूत राजांची या दोन्ही विद्यांबद्दल ख्याति असे. मेवाडच महाराज अमरसिंग यांनीं एके प्रसंगीं मजजवळ असे उद्गार काढिले होते कीं, " ब्रिटिश अमदानीपासूनच क्षत्रियांचें शास्त्रतेज व शस्त्रतेज नष्ट झालें. " हे उद्गार अगदीं यथार्थ आहेत यांत शंका नाहीं. या कालांतील दोन्ही विद्यांत अत्यंत पारंगत राजे म्हणजे परमार कुलांतील मुंज व भोजराज हे होत. इतर कुलांतील राजेही असेच प्रवीण असत. काश्मीरचा हर्ष राजा असाच विख्यात होऊन गेला- चालुक्यवंशांतील विनयादित्याची गणितविद्येंतील अधिकाराबद्दल ख्याति असे व त्यास " गुणक " असा अन्वर्थक किताब असे. लेखादिकांतूनहि वलभीराजांच्या शास्त्रविद्येवरील प्रभुत्वाचे उल्लेख सांपडतात. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्या वेळच्या सर्व रजपुतांनां

शस्त्रविद्येप्रमाणेंच शास्त्रविद्येचीही अभिरुचि असे; त्यांना वेदमंत्रांचें ज्ञान असे एवढेंच नाहीं तर वेदान्तर्गत निरनिराळ्या शास्त्रांतही ते चांगलेच पारंगत असत.

पराशरस्मृतीचा काल या सुमाराचाच धरला पाहिजे. पराशरस्मृतीवरून असें दिसतें कीं, बऱ्याचशा ब्राह्मणांनीं व क्षत्रियांनीं या कालांत शेतकीचा धंदा पतकरिला असावा. या कालापूर्वीं शेतकीचा धंदा फक्त वैश्यलोकच करीत; पण या कालांत वैश्यांनीं तो धंदा अजीबात सोडला. या कालांत मुख्यत्वेंकरून शेतकीचा धंदा शूद्रवर्गच करी; पण आतां तो धंदा ब्राह्मण व क्षत्रिय हे दोघेही करूं लागले. याचें कारण असें दिसतें कीं, बौद्धधर्माच्या उदयाबरोबर बहुतेक सर्व वैश्यलोकांनीं त्या धर्माचा स्वीकार केला; पण शेतकीच्या कामांत नाना प्रकारांनीं कृमिकीटकांची हत्या होत असल्यामुळें व बौद्धधर्म अहिंसाप्रधान असल्यामुळें वैश्यवर्गानें हा धंदा अजिबात सोडला. बौद्धधर्माचा पाडाव होऊन हिंदुधर्माची पुनः स्थापना झाल्यावर वैश्यांच्या ऐवजीं ब्राह्मण व क्षत्रिय शेतकी करूं लागले; पण त्यांना देखील शेतकीचा धंदा बरासा वाटत नसावा. यावर प्रायश्चित्ताच्या मिषानें पराशरस्मृतीनें तोड बसविली ती अशीः—

अतः परं गृहस्थस्य कर्माचारं कलौ युगे ।
धर्मं साधारणं शक्यं चातुर्वर्ण्यसमाश्रितम् ॥
तं प्रवक्ष्यामहं पूर्वं पराशरवचो यथा ।
षट्कर्मसहितो विप्रः कृषिकर्म च कारयेत् ॥
क्षुधितं तृषितं श्रान्तं बलीवर्दं न योजयेत् ।
वाहयेत् दिवसस्यार्धं पश्चात्स्नानं समाचरेत् ॥
स्वयं कृष्टे तथा क्षेत्रे धान्यैश्च स्वयमर्जितैः ।
निर्वपेत् पञ्चयज्ञांश्च क्रतुदीक्षां च कारयेत् ॥

शेतकीच्या धंद्यांत हत्येचें पातक घडतें हें स्मृतीकारांस कबूल आहे:—

संवत्सरेण यत्पापं मत्स्यघाती समाप्नुयात् ।
अयोमुखेन काष्टेन तदेकाहेन लाङ्गली ॥

पण दानादिकांनीं या पातकाची निवृत्ति होते असें पराशर-स्मृतींत सांगितलें आहे.

वृक्षं छित्वा महीं भित्वा हत्वा च कृमिकीटकान्
कर्षकःखल यज्ञेन सर्वपापैः प्रमुच्यते ।

कृषीपासून होणाऱ्या उत्पन्नाचा त्रिंशांशभाग ब्राह्मणांदिकांस दिला असतां कृषिजन्य पातक लागत नाहीं.

राज्ञे दत्वा तु षड्भागं देवानां चैकविंशकम्
विप्राणां त्रिंशतं भागं सर्वपापैः प्रमुच्यते ।

आमच्या पहिल्या पुस्तकांत कृषीच्या उत्पन्नाचा तीनशतांश भाग ब्राह्मणांदिकांस द्यावा असा सिंध प्रांतांत रिवाज होता व मुसलमानी अमदानींत देखील महमद कासिमनें त्या नियमास कायद्याचें स्वरूप दिलें वगैरेचें वर्णन आलेलेंच आहे.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या कालांत ब्राह्मणांनीं कृषि-कर्माचा स्वीकार केला व त्यास कांहीं निर्बंध घालून स्मृतिकारांनीं आपळी संमति दिली.

ब्राह्मणांप्रमाणें क्षत्रियादिकांनाही कृषिकर्माचा अधिकार असल्याचीं या स्मृतींत वचनें आढळतात.

“ क्षत्रियोपि कृषिं कुर्यात् देवान् विप्रांश्च पूजयेत्
वैश्यः शूद्रस्तथा कुर्यात् कृषिवाणिज्यशिल्पकम् ”

याचा अर्थ असा कीं, सरसकट सर्व वर्णासच कृषिकर्माचा अधिकार प्राप्त झाला. त्यांत ब्राह्मण व क्षत्रिय हे तो धंदा मुख्यत्वें-

करून करूं लागले. पण या वेळीं सर्वच क्षत्रियांनीं शेतकीचा धंदा पतकरिला असें मात्र नाहीं. रजपूत क्षत्रियांनीं कृषिकर्माचा स्वीकार केला नाहीं तर त्यांनीं आपला क्षात्रधर्माचाच बाणा कायम राखिला. अशा प्रकारें क्षत्रियांत दोन भाग उत्पन्न झाले (१) केवळ क्षात्रधर्मानुसार वागणारा; (२) क्षात्रधर्माबरोबरच कृषि कर्में करणारा. इब्न् खुर्दादबाच्या वर्णनांत तर हे दोन भेद स्पष्ट दिसतात व आजतागायत उत्तर हिंदुस्थानांतील रजपुतांप्रमाणेंच दक्षिणेंतल्या मराठ्यांतही हा भेद दिसून येतो.

वास्तविक पाहतां शूद्रादिकांनीं करावयाच्या कृषिकर्मादिकांचा जसा ब्राह्मण–क्षत्रियादिकांनीं अंगिकार केला, त्याचप्रमाणें क्षात्रवृत्तीचाही अंगिकार क्षत्रियांशिवाय इतरांनीं म्हणजे ब्राह्मण व वैश्य यांनीं याकालीं केला. क्षात्रधर्मासंबंधीं मनुस्मृति व वाशिष्ठस्मृति यांत बराच फरक दिसून येतो. धर्माचरणास बाध येत असल्यास मात्र द्विजांनीं शस्त्रधारण करावें असें मनुस्मृतींत सांगितलें आहे. "शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते" पण वशिष्ठस्मृतींत या नियमांतील आकुंचितपणा काढून टाकला आहे. "आत्मत्राणे वर्णसंकरे वा ब्राह्मणवैश्यौ शस्त्रमाददीयाताम् । क्षत्रियस्य तु तन्नित्यमेवरक्षणाधिकारात् ॥" मनुस्मृतींत द्विज असा शब्द आहे तर वशिष्ठस्मृतींत ब्राह्मण व वैश्य असा स्पष्ट उल्लेख आहे; व नुसत्या धर्माकरतां नाहीं तर आत्मरक्षणास्तव देखील **शस्त्रधारण करावें**, असें लिहिलें आहे. सिंधप्रांताच्या हकीकतीवरून असें दिसून येईल कीं, पूर्व कालांतील नियमांचें उल्लंघन त्याकालीं होत नसे; चचराजानें जाट लोकांना शस्त्रास्त्रें वापरण्याची तसेंच घोड्यावर बसण्याची मनाई केली होती.

क्रयविक्रयासंबंधींचे निर्बंध लक्ष्यांत घेण्याजोगे आहेत. आपद्धर्म

म्हणून ब्राह्मणानें जरी वैश्य जातीचा व्यापारीपेशा पतकरला तरी देखील त्यानें खालीं दिलेल्या वस्तूंचा क्रय करतां कामा नये. मीठ, तीळ ( स्वतःचे शेतांत स्वकष्टानें तयार झालेले तीळ विकण्यास हरकत नाहीं ) मध, मद्य, मांस, दूध व त्यापासून तयार होणारे पदार्थ व इतर असेच जिन्नस. ( गोविक्रय करूं नये असेंहि स्मृति-वचन आहे ). द्विजजातीपैकीं कोणीही तसें चांगल्या शूद्रांनींही मद्य विकूं नये असा निर्बंध असे. त्याप्रमाणेंच त्रैवार्णिकांनीं दूध विकूं नये असा सर्व स्मृतींत निषेध आहे. याचें कारण दूध हा सर्वोत्कृष्ट पदार्थ हेंच असावें. असा सर्वोत्कृष्ट पदार्थ विकणें म्हणजे मद्य विकण्याइतकें तिरस्करणीय समजलें जावें यांत नवल नाहीं. पण चांगल्या प्रतीच्या शूद्रांस दूध व त्यापासून बनणारे पदार्थ विकण्यास हरकत नव्हती; पण त्यांनादेखील मद्य विकण्याचा निषेध असे.

व्याजबट्टयाचा व्यवहार ब्राह्मण व क्षत्रिय यांनीं कधींहि करूं नये असा फार प्राचीनकालापासून धर्माचा निर्बंध असे. वशिष्ठस्मृतींत व्याजाचे योगानें दामदुप्पट किंवा धान्य तिप्पट द्यावी अशा अर्थाचे नियम सांपडतात, त्याचप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांस व्याजाचे निरनिराळे व क्रमशः वाढते दर असावेत असाहि निर्बंध आढळतो. " द्विकं त्रिकं चतुष्कं च पंचकं च शते स्मृतम् । मासस्य वृद्धिं गृण्हीयाद्वर्णानामनुपूर्वशः " सध्यां देखील अशाच तऱ्हेचा रिवाज आढळतो. याचें कारण वरिष्ठ जातींची पत हेंच असावें. तीस रुपयांस दरमहा ५ रुपये व्याज घ्यावें असेंही एक वचन आढळतें " पंच माषांस्तु त्रिंश धर्मान हीयते "—पण हा व्याजाचा दर असंभाव्य वाटतो, मग हा नियम शूद्र जातींस अनुलक्षून कां असेना ! सांप्रत शूद्र लोक जास्त जास्त म्हणजे महिन्याला शेंकडा २ टक्के व्याज देतात; तेव्हां ३० ला ५ हा दर दरमहाचा नसून दरसालचा असावा.

सरतेशेवटीं अलमसूदीचें हिंदूसमाजाविषयींचें मत देऊन जातिजातींतील अन्नपानादिकांचा विचार करूं. अलमसूदी म्हणतो कीं, 'झंजी व इतर कृष्णवर्णाच्या जातींमध्यें हिंदु लोक बुद्धीनें, शरीरानें व शुद्धतेनें जास्त वरचढ आहेत. त्यांची शासनपद्धति व तत्वज्ञान यांतही हाच फरक दिसून येतो.'

अन्नपानादिकांसंबंधीं विचार करतां असें दिसून येतें कीं, परकीयांना हिंदूंतील बहुसमाजाच्या मद्यमांसवर्जनाचा फारच अचंबा वाटला. अगदीं प्राचीन कालापासून ब्राह्मणांमध्यें मद्यपानाचा कडक निषेध होताच; पण क्षत्रियराजे देखील मद्य वर्ज मानीत असें अरबी प्रवाशांनीं लिहून ठेविलें आहे. अलमसूदी म्हणतो कीं, "हिंदूलोक मद्यपानापासून अलिप्त असतात. एकाद्या राजानें मद्य प्याल्याचें सिद्ध झाल्यास त्यास राज्यासनावरून दूर करतात; कारण मद्यप्यास विवेक व विचार नसतो अशी दृढ समजूत आहे" (इलियट १,२०). इब्न् खुर्दादबाचें म्हणणें जरासें चमत्कारिक आहे. तो म्हणतो "हिंदू राजे व जनता मद्य गाळणें हें पाप समजत नाहींत, पण मद्य पिणें पाप आहे असें समजतात." या विधानांतील उत्तरार्ध हिंदूसमाजास अत्यंत भूषणीय आहे यांत शंका नाहीं. धर्मशास्त्रांनीं क्षत्रियांस मद्यपानाची सवलत दिली असूनहि मेवाडच्या शिसोदिया राजासारखे क्षत्रियलोक दारूचा निषेध मानीत. क्षत्रियलोक मद्याचे ३ पेले पीत असत असें सुलेमानाचें म्हणणें आहे; पण तें सर्वांग लागू आहे असें वाटत नाहीं. वैश्यलोकांतही मद्याचा प्रसार बहुतेक बंद होता, पण थोडेबहुत वैश्यलोकहि मद्य प्राशन करीत असें दिसतें.

मांसाशनाचा निषेध बौद्धधर्माच्या प्रसारापासून विशेष जारीनें सुरू झाला व त्याकरतां बौद्धमतानुयायी हर्षराजानें फार परिश्रम घेतले. ब्राह्मणवर्णांत याकालीं मांसाशनाचा परिपाठ बंद होत चालला होता;

पण तो समूळ नाहींसा झाला नव्हता. इफ्रू मसूरी म्हणतो कीं, "ते (ब्राह्मण) लोक कोणत्याही प्राण्याचें मांस खात नाहींत." पण हें विधान हिंदू, बौद्ध किंवा जैन संन्याशांसच जसें लागू पडतें तसें इतर गृहस्थाश्रम्यांस लागू पडत नाहीं. कारण त्यानें या वरील लोकांचें असें वर्णन केलें आहे. "पुरुष व स्त्रिया, दोघेंही गळ्याभोंवतीं आपल्या विशिष्ट जातीचें निदर्शक चिन्ह म्हणून पीतवस्त्र यज्ञोपवीतासारखें धारण करतात." ब्राह्मणलोक यज्ञोपवीत धारण करतात पण तें पिंवळ्या रंगाचें नसतें; बौद्ध व जैन यतींचीं वस्त्रें पीतवर्णाचीं असतात, पण ते लोक यज्ञोपवीत धारण करीत नाहींत. तेव्हां वरील वर्णन कांहीं विशिष्ट ब्राह्मणांसच लागू पडेल. अद्यापहि उत्तर हिंदुस्थानांतील कांहीं ब्राह्मण मांसाशन वर्ज मानीत नाहींत. अर्वाचीन स्मृतिग्रंथांतून मांसाशनाचा निषेध केला आहे, पण व्यासस्मृतींत असें सांगितलें आहे कीं, "श्राद्धास निमंत्रण केलेल्या ब्राह्मणानें मांसाशन अवश्य करावें नाहीं तर तो पतित होईल" "नाश्नीयाद्ब्राह्मणो मांसमनियुक्तः कथंचन । क्रतौ श्राद्धे नियुक्तो वानश्नन्पतति द्विजः ॥" यावरून असें दिसतें कीं, क्वचित्प्रसंगीं होणाऱ्या यज्ञयागादिकांत व नियमितपणें होणाऱ्या श्राद्धादि प्रसंगीं क्षत्रियांत तसेंच ब्राह्मणांत व वैश्यांत मांसयुक्त पदार्थ अवश्य केले जात. वैश्याच्या श्राद्धसमयीं मांसाशनास निषेध नसे हें खालील श्लोकावरून दिसतें. मृगयोपार्जितं "मांसमभ्यर्च्य पितृदेवताः । क्षत्रियो द्वादशोनं तत्क्रीत्वा वैश्योपि धर्मतः ।" पण सर्वसाधारणपणें ब्राह्मणांनीं हत्या करूं नये किंवा मांसाशनही करूं नये असा नियम असे. "द्विजो जग्ध्वा वृथा मांसं हत्वाप्यविधिना पशून् । निरयेष्वक्षयं वासमाप्नोत्याचंद्रतारकम्" तसेंच ब्राह्मणांनीं गाय किंवा म्हैस यांशिवाय इतर प्राण्यांचें दूध पिऊं नये, कांदे व इतर हीन शाका खाऊं नयेत असे पुष्कळच निर्बंध होते. गोमांस तसेंच व्याघ्रादि-

यांच्या मांसाचा निषेध चाऱ्ही वर्णांस सारखाच असे; पण चांडालादि लोक या नियमांस जुमानीत नसत, त्यामुळें त्यांस गांवाबाहेर रहावें लागे. त्यांच्या स्पर्शाचा विटाळ मानण्यांत येई; एवढेंच काय, पण रस्त्यांतून देखील त्यांनीं बाजूनीं चालावें व इतरांवर आपली सावली सुद्धां न पडूं देण्याची खबरदारी घ्यावी अशा अर्थाचीं पुष्कळच स्मृतिवचनें दाखवतां येतील.

ह्या कालांतील विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे उच्च जातींत एकत्र होणारा अन्नपानादि व्यवहार ही होय. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे सर्व जातीचे लोक प्रसंगविशेषीं एकत्र भोजन करीत; एवढेंच काय तर विशिष्ट शूद्रांसमवेतही भोजन करण्यास त्यांस प्रत्यवाय वाटत नसे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनीं एकत्र भोजन करूं नये असें निषेधपर स्मृतिवचन सांपडतच नाहीं; तर उलट अशा भोजनास संमतिदर्शक अशींच वचनें सांपडतात. व्यासस्मृतींत असें सांगितलें आहे कीं, "धर्मेणान्योन्यभोज्यान्ना द्विजास्तु विदितान्वयाः" अशा तऱ्हेच्या भोजनप्रसंगीं ज्याच्याशीं आपण भोजन करतों तो द्विज आहे असें आपणास ठाऊक असलें म्हणजे झालें. "नापित, आपल्या कुलाचा मित्र, शीरी, चाकर व गुराखी" हे शूद्रवर्णाचे असले तरी त्यांच्याशीं अन्नोदकादि व्यवहार करण्यास हरकत नाहीं. अशा अर्थाचें वशिष्ठस्मृतींत वचन आहे. "नापितान्वयमित्रार्द्धसीरिणो दासगोपकाः। शूद्राणामप्यमीषां तु भुक्त्वान्नं नैव दुष्यति ॥" पण हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, त्या वेळीं निरनिराळ्या जातींच्या अन्नपानादिकांत कसलाच भेद नव्हता व ब्राह्मणांसही मांसाशनाची मोकळीक असे. अनुलोम विवाहाप्रमाणेंच एकत्र भोजनाच्या प्रघातानें समाजांत एकजीवपणा व जोम उत्पन्न होई यांत संशय नाहीं.

तत्कालीन पेहराव, वस्त्रें, अलंकार व भूषणें यांविषयीं एतद्देशीय ग्रंथांतून फारच थोडी माहिती मिळते. सर्व भिस्त तत्कालीन आरबप्रवाशांच्या वर्णनावरच ठेवणें भाग आहे. तत्कालीन लेण्यांवरूनहि पेहरावादिकांचा बोध होणें जरा कठीणच आहे. आरबीप्रवाशांच्या वर्णनावरून असें दिसतें कीं, सिंधप्रांतांत. मुलतानांत, तसेंच पश्चिमेकडील ज्या ज्या प्रांतांत आरबांचा अमल सुरू असे तेथील हिंदुरहिवाशांच्या पेहरावांत पुष्कळच फरक पडला होता. अल् इस्ताखरी म्हणतो कीं, ' मन्सुरा प्रांतांतील हिंदुरहिवाशांचा पोशाक इराकच्या लोकांसारखाच असतो, पण त्यांच्या राजांचा पोशाक व केश हिंदुलोकांप्रमाणेंच असतात. " (इलि १. २७) इब्न् हौकलचें असेंच म्हणणें आहे; फक्त " केश " या शब्दांच्या ऐवजीं " विजार " असा शब्द आहे. बल्हाराराज्यांतील लोकांविषयीं इब्न् हौकलनें खालीलप्रमाणें वर्णन दिलें आहे. " येथील हिंदू व मुसलमान यांचा पेहराव एकसारखाच असतो. दोघेहि दाढी वाढवितात. उष्णतेच्या प्रखरतेमुळें येथील लोक मलमलीचीं वस्त्रें वापरतात; मुलतानी लोकांचा पोशाक यांच्या सारखाच आहे" ( इलियट १.३९) मन्सूरा ( सिंध ) प्रांतांतील व बल्हाराराज्यांतील फरक कटिवस्त्रांमध्येंच दिसून येतो. सिंध प्रांतांतील लोक विजार वापरीत तर पंजाब व दक्षिणेकडील लोक पूर्वींप्रमाणेंच धोतरें नेसत. इनकराम ( पर्शियाच्या सरहद्दीवरील मुलुख ) येथील लोक तंग डगला वापरीत पण तेथील व्यापारी सद्रे व अंगरखे व पायघोळ झगे वापरीत.

हिंदुस्थानांतील लोकांस अलंकार व भूषणें यांची आवड फार पुरातन काळापासून आहे. आरबीप्रवाशांना हिंदुस्थानांतील राजपुरुषांच्या कानांतील कुंडलांचें फार कौतुक वाटे. अबू झैद म्हणतो

कीं, “ हिंदुस्थानांतील राजांचा रत्नखचित सुवर्णकुंडलें परिधान करण्याचा रिवाज पूर्वींपासूनचा आहे ” तहत पेशवाईंत देखील ही चाल होती असें नानाफडनवीसाच्या चित्रांतून ठळकपणें दिसून येणाऱ्या कुंडलांवरून दिसतें. प्रत्येक गृहस्थाश्रमी पुरुषानें कुंडलें धारण करावींत असें स्मृतींतून लिहिलेलें आढळतें ( धारयेद्रुक्म-कुण्डले—वसिष्ठ ), व ह्या चालीचा अवशेष पंजाबाकडे अजून सांपडतो. “ तसेंच माणकें व पाच यांच्या मूल्यवान् कंठ्या ते धारण करतात. तसेंच त्यांस मोत्यांच्या कंठ्यांची फार आवड असते. ” मुक्तामालांचा शोक धनाढ्य व्यापाऱ्यांतून तसेंच राजेरजवाड्यांतून आजतागायत दिसून येतो. श्रीमान् स्त्रियांच्या तसेंच पुरुषांच्या गळयांतून मोत्यांचीं पेंडें दृग्गोचर होत. कनोजच्या राजानें वर्म-कुलापासून विकत घेतलेल्या मुक्तामालेची हकीगत राजशेखराच्या एका नाटकांत सांगितली आहे. शेवटीं एवढेंच सांगावयाचें आहे कीं, आज सुवासिनींचा जो मुख्य सौभाग्यालंकार मानतात त्या “ नथीचा ” ह्या कालापर्यंतच्या कोणत्याच ग्रंथांत उल्लेख नाहीं. आमचा तर असा तर्क आहे कीं, नथ घालण्याचा प्रघात हिंदु-लोकांनी मुसलमानीं चालीपासून उचलला असावा.

गोषाची चाल हिंदूलोकांनीं मुसलमानांपासून उचलली असा एक समज आहे, पण तो यथार्थ नाहीं असें आम्हांस वाटतें. लग्नकार्यादि मंगलप्रसंगीं, यज्ञाचे वेळीं किंवा संकट काळीं स्त्रियांनीं ( गोषा टाकून ) उघडपणें वापरावें असें रामायणांत सांगितलें आहे. त्यावरून इतर काळीं त्यांनीं उघड वावरूं नये असें अनुमान निघतें. मुसलमानांत स्त्रियांनीं आपला गोषा कधींच सोडूं नये असा प्राचीन कालापासूनचा रिवाज आहे, पण हिंदुस्त्रियांच्या गोषाची चाल इतकी कडक कधींच नसे; यावरून

पहातां अबू झैदचें म्हणणें जरा चमत्कारीक वाटतें. तो म्हणतो " हिंदुस्थानांतील राजांच्या बहुतेक दरबारांतून राजस्त्रिया स्वकीयांच्या तसेंच परकीयांच्या देखत मोकळेपणानें वागतात "( इलियट) मलबार प्रांतांतील व दक्षिणेंतील कांहीं दरबारांतून अशी वस्तुस्थिति असेल; कारण या प्रांतांतून पडद्याची चाल कधींच नव्हती. पण वरील वर्णन उत्तर हिंदुस्थानांतील दरबारांविषयीं नसावें; कारण फार प्राचीनकालापासून उत्तर हिंदुस्थानांत पडद्याची चाल आहे. दरबारांतील सेवकस्त्रियांसंबंधीं वरील म्हणणें यथार्थ होईल. कारण बाणभट्टानें हर्षाच्या दरबारांतील स्त्रीसेवकांचें चटकदार वर्णन दिलें आहे. पण राजदरबारांत पट्टाभिषिक्त राजस्त्रिया उघडपणें वावरत असत हें म्हणणें वस्तुस्थितीस धरून आहे असें आम्हांस वाटत नाहीं. महाराष्ट्रांत देखील हिंदुस्थानाप्रमाणेंच पडद्याची चाल फार जुनी आहे. क्षत्रियांखेरीज इतर जातींच्या स्त्रियांत पडद्याची चाल सर्वत्र इतकी कडक नाहीं.

बालविवाहाच्या रूढीसंबंधीं असाच गैरसमज प्रचलित झालेला आहे. हिंदुस्थानांत मुसलमानांचा प्रवेश झाल्यावर मुसलमान लोक हिंदु कुमारिकांस बलात्कारानें पळवून नेत व आपणाशीं निका लावण्यास भाग पाडीत; या अनर्थाचा प्रतिकार व्हावा म्हणून बालविवाहाची चाल समाजांत सुरू झाली असें विधान नेहमीं करण्यांत येतें; पण त्यांत तथ्यांश फारच थोडा आहे, असें आम्हांस वाटतें. जेते लोकांच्या पापवासनेचा निरोध स्त्रियांच्या विवाहानें होईल या म्हणण्यांत हंशील नाहीं. स्त्रीचा विवाह झाला आहे कीं नाहीं याचा निवाडा कामासक्त करीत बसत नाहीं. बरें, स्त्रियांचें लहानपणीं लग्न झालं म्हणजे त्यांचें बलात्कारानें हरण होणार नाहीं हेंहि संभवत नाहीं. आम्हांला तर असें वाटतें कीं, बालविवाहाचें कारण अगदींच

निराळें असावें. बालविवाहाची चाल मुसलमानी अमदानींत सुरू झालेली नसावी; ती या पूर्व कालांतच रूढ झाली असावी. बाणभट्टानें राज्यश्रीच्या विवाहाचें जें वर्णन दिलें आहे त्यावरून बाणभट्टाच्या काळीं प्रौढविवाह रूढ होते असें दिसतें. पण ह्या कालांतच पराशर व व्यास स्मृति लिहिल्या आहेत त्यावरून पाहतां या कालांतच म्हणजे बाणभट्टाच्या कालानंतर—पण मुसलमानी अमदानीच्या पूर्वींही चाल रूढ झाली असावी असें अनुमान निघतें. पराशर व व्यास स्मृतींत मुलीचा विवाह ८ ते १० व्या वर्षापर्यंतच करावा असें स्वच्छ सांगितलें आहे. "विवाहयेदष्टवर्षामेवं धर्मो न हीयते' असें पराशरस्मृतीचें वचन आहे; तर कुमारिका परकर नेसत आहे तोंच तिचा विवाह करावा असें व्यासानें सांगितलें आहे (धृताधो वसनां गौरीं). या स्मृतिकारांनीं तर " गौरी " या शब्दाचा अर्थच साफ पालटून टाकिला आहे. अमरकोषांत गौरी शब्दाचा अर्थ " रजोदर्शन न झालेली कुमारिका" असा आहे ; तर पराशरस्मृतीप्रमाणें गौरी शब्दाचा अर्थ ' ८ वर्षांची कुमारी ' असा आहे. ही चाल समाजांत या सुमारास रूढ झाली हें निःसंशय; पण तिचें कारण काय हें सांगणें जरा बिकटच आहे; बौद्धधर्माविरुद्ध उसळलेल्या लाटेंतच ह्या चालीचा उद्भव असावा असें आम्हांस वाटतें. बौद्धधर्माप्रमाणें अविवाहित पण प्रौढ कुमारिकांस तपस्विनी होण्याचा हक्क असे. मुलींच्या प्रौढविवाहास आळा घातला असतां त्यांना बौद्ध जोगिणी बनण्याचा मार्गच खुंटेल या समजुतीनें समाजांत बालविवाहाची चाल रूढ झाली असावी. अनार्यलोकांत बालविवाहाची रूढी पूर्वापार चालत आलीच होती; तिचा अंगिकार सर्व समाजानें या काळीं केला असावा असें दिसतें. अति प्राचीन स्मृतींस तसेंच गृह्यसूत्रांस बालविवाह संमत होता असें दिसत नाहीं. कारण विवाहानंतर लगेच गर्भाधान-

संस्कार व्हावा असें त्यांतील वचनांवरून दिसतें. राज्यश्रीचा गर्भाधान-संस्कार विवाहानंतर लगेच झाला असें बाणभट्टानें वर्णिलें आहे. तेव्हां या कालांतच बौद्धधर्मास आला असावा म्हणून बालविवाहाची चाल सुरू झाली असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. या काळच्या क्षत्रियांत बालविवाहाची चाल कितपत रूढ होती हें सांगतां येत नाहीं. बिल्हणानें लिहिलेल्या काव्यावरून पाहतां ही चाल क्षत्रियांत नसावी असें वाटतें; पण क्षत्रियांत ही चाल रूढ होती असें दर्शविणारीं अन्यक उदाहरणें देतां येतील.

बालविवाहाची रूढि याच कालांत दृढमूळ झाली असावी असें म्हणण्यास आणखीही आधार सांपडतील. व्यासस्मृतींत तर असें सांगितलें आहे कीं, “ यदि सा दातृवैकल्याद्रजः पश्येत्कुमारिका । भ्रूणहत्याश्च यावताः पतितःस्यात्तदप्रदः ॥” कुमारिकेस विवाहाचे पूर्वी रजोदर्शन झाल्यास पित्यास भ्रूणहत्येचें पातक लागतें. पूर्वींच्या काळीं विवाहास कुमारिकेच्या रजोदर्शनाचा प्रत्यवाय होता असें गृह्यसूत्रावरून दिसत नाहीं. कालिदासाच्या कालींही स्त्रियांचे विवाह रजोदर्शनानंतर होत असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. शकुन्तलेचा विवाह प्रौढपणींच झाला असावा असें शाकुन्तल नाटकावरून सहज सिद्ध करतां येईल. शकुन्तला वयांत आल्यामुळें, आपणास भ्रूणहत्येचें पातक लागेल असें कण्वऋषीस वाटलें होतें असें कोठेंच दिसून येत नाहीं. पण रजोदर्शनानंतर कुमारिकेचा विवाह केल्यास पित्यास भ्रूणहत्येचें पातक लागतें असें शास्त्रकारांनीं ठरविल्याबरोबर प्रौढ-विवाहाचे चालीचा समाजांतून लोप झाला असावा हें निर्विवाद आहे. पराशरस्मृतींत तर रजोदर्शनाची काल्पनिकच मर्यादा ठरविली आहे. कुमारिकेला १० वें वर्ष लागलें कीं, तिला रजस्वला समजण्यांत यावें असा नवीनच नियम या स्मृतींत घातलेला आहे.

पतीच्या निधनानंतर वैधव्यदशेंत आयुष्य कंठावयाची चाल हिंदु समाजांत फार पुरातन कालापासून चालत आली आहे, व या कालांत ह्या चालींत बदल झाला नसावा हें उघड आहे. इतकेंच काय, पण ह्या कालांतच या चालीचें हिडिस व दैन्यवाणें स्वरूप प्रकट झालें. समाजांत बालविवाहाची चाल रूढ झाल्यामुळें बालविधवांची संख्या अर्थात् वाढली असावी; व हल्लींच्या प्रमाणेंच बालविधवांची स्थिति तेव्हां अत्यंत कारुणिक झाली असेल. ह्या कालांतील शास्त्रांत ही बालविधवांची स्थिति सुधारण्याचा प्रयत्न दिसून येतो. तो असा कीं, ह्या कालीं कुमारिकांस रजोदर्शन होण्यापूर्वीं वैधव्य प्राप्त झाल्यास दुसरा पति वरण्यास शास्त्राची आडकाठी नव्हती; तेव्हां बालविधवांची स्थिती सध्यांपेक्षां थोडी तरी बरी होती. पतिनिधनानंतर सती जाण्याचाहि रिवाज फार प्राचीन कालापासून चालत आला आहे, तो ह्याहि कालांत चालू असावा. राजाच्या मत्यूनंतर त्याचे विश्वासू सेवकहि सती जात म्हणजे आपणांस राजशवाबरोबरच जाळून घेत, ह्या चालीचा उल्लेख पहिल्या भागांत आलाच आहे. ह्या चालीविषयीं अबू झैदनें एक मनोरंजक हकीकत लिहून ठेविली आहे ती अशी:—“ हिंदुस्थानच्या कांहीं राजघराण्यांत अशी चाल आहे कीं, राज्यारोहण प्रसंगीं राजा व त्याचे विश्वासू एकच अन्न भक्षण करतात; थोडासा भात शिजवून तो वडाच्या पत्रावळींतून वाढतात. राजा ह्या पत्रावळींतील थोडा भात भक्षण करतो व बाकीचा विश्वासू नोकरांस भक्षावयास देतो. ज्या ज्या सेवकांनीं असें अन्न भक्षण केलें असेल ते सर्व राजाच्या निधनाच्या दिवशीं आपला देह अग्निनारायणास अर्पण करतात. ”

वृद्धापकाळीं आपण होऊन क्षेत्राचे ठिकाणीं आत्मघात करण्याचा परिपाठ या कालींहि सुरू होता; याविषयीं आरबी ग्रंथांतून पुरावा

सांपडतो. चंदेलघराण्यांतील धंगराजानें आपला जीर्ण देह प्रयागक्षेत्रीं गंगेस अर्पण केला असें ताम्रलेखांत वर्णिल्याची हकीकत मागें आलीच आहे. अबू झैद लिहितो कीं, " पुरुष अगर स्त्री यांचा देह वृद्धापकालांत विकल झाल्यावर त्यांचे आप्त त्यांस चितेवर चढवितात अगर पाण्यांत लोटून देतात" (इलियट १ पृ०). ज्या वृक्षावरून वृद्ध लोक आपला देह गंगेस अर्पण करीत त्या प्रयागक्षेत्रींच्या वृक्षाचें वर्णन अलीकडील आरबी प्रवाशांनीं केलें आहे, त्यावरून हा वृक्ष १० व्या शतकांतील तरी आहे असें दिसतें. अशा तऱ्हेचे आत्मसमर्पणाचे प्रसंग हरघडी येत नसावेत. कारण हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें आपण होऊन आपली प्राणहत्या करणें हें पाप मानिलें आहे.

मृत शवाचें दहन करण्याची चाल हिंदुसमाजांत फार पुरातन आहे. तसेंच मृतांच्या बद्दल शोक करण्याची व अशौच धरण्याची रीत फार जुनी आहे. आरबी प्रवाशांच्या वर्णनांत या चालीचा उल्लेख आहेच. " हिंदुरहिवाशी शवाचें दहन करतात, मुसलमानांप्रमाणें थडगीं बांधीत नाहींत. हिंदुस्थानांतील मुसलमान शवास गुप्तपणें रात्रीं पुरतात व हिंदूंप्रमाणें ते मृतांबद्दल विलाप करीत नाहींत."

गुजराथप्रांतांतील लोकांच्या अन्नादिकासंबंधीं अल इद्रिसीनें खालीलप्रमाणें वर्णन दिलें आहे. " नहरवाड येथील लोकांचें मुख्य अन्न म्हणजे तांदूळ होय; वाटाणे व इतर कडदण त्याचप्रमाणें खिचडी, मासे वगैरेवरही निर्वाह करतात. क्वचित्प्रसंगीं मृत प्राण्याचें मांसही भक्षितात; पण ते आपण होऊन पशूंची किंवा पक्ष्यांची हत्या करीत नाहींत. गाई व बैल या प्राण्यां-विषयीं त्यांस फार आदर वाटतो, व हीं जनावरें मेल्यावर त्यांस हे लोक पुरून टाकितात. थकलेल्या बैलाकडून ते कामें करवून घेत नाहींत, तर त्यांची जोगवण उत्तम प्रकारें राखितात "

सरतेशेवटीं हिंदुलोकांच्या प्रामाणिकपणाविषयीं आरबी प्रवाशांच्या वर्णनांतून एक उतारा देऊन हें प्रकरण संपवतों. अगदीं प्राचीन कालापासून म्हणजे ग्रीक लोकांचा हिंदुस्थानाशीं परिचय झाल्यापासून तों तहत १० व्या शतकापर्यंतच्या सर्व परकीय प्रवाशांनीं किंवा व्यापाऱ्यांनीं हिंदूच्या सचोटीची व नीतिमत्तेची वाखाणणीच केली आहे. गुजराथप्रांतांतील लोकांविषयीं अल इद्रिसीनें असें लिहिलें आहे कीं, ' हिंदूलोकांची न्याय व नीति यांजकडे स्वाभाविकच प्रवृत्ति असल्यामुळें त्यांच्या आचरणांत प्रामाणिकपणा, व विश्वास हीं नेहमींच दिसून येतात. या गुणांबद्दल त्यांची फार ख्याति असल्यामुळें परकीय लोकांचा देखील त्यांच्याचकडे ओढा असतो. हिंदूलोकांची सचोटी हेंच त्यांच्या वैभवाचें व भरभराटीचें मुख्य कारण होय. "

## टिप्पणी—तत्कालीन हिंदूंचीं नांवें.

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांतून जीं नांवें ठेवण्यांत येतात त्यांची सांप्रत काळीं एक विशिष्ट रीत ठरल्यासारखी दिसते. पण हीं सर्व नांवें देवादिकांचींच बहुधा असतात. महाराष्ट्रप्रांतांत गणेश असें नांव ठेवण्याचा प्रघात आहे तर गणेशीलाल असें नांव पंजाबप्रांतांत व गणेशीप्रसाद असें संयुक्तप्रांतांत ठेवण्यांत येतें. बंगालमधील नांवें देवतावाचक असलीं तरी काव्यास जास्त साजतील अशीं असतात. उदाहरणार्थ श्यामसुंदर किंवा पार्थसारथि हीं नांवें पहा. देवदेवतांचीं नांवें ठेवण्याचा प्रघात १० व्या शतकांत सध्यांच्या इतका नसला तरी थोडा फार असावा असें दिसून येतें. ग्वालेर व सियाडोनी येथील शिलालेखांतून कांहीं व्यापारी, माळी व तेली यांचीं नांवें व धंदे सविस्तरपणें दिलेले आढळतात; त्यांचीच नक्कल जिज्ञासू वाचकांच्या सोईसाठीं खालीं देत आहें.

१ चंदुक—सौगताचा मुलगा—व्यापारी.

२ चंदुक, साहस, माहप,—सौगताचे मुलगे व्यापारी.

३ नागक—व्यापारी. ( कुंभार मंडळीकडून यानें वर्षासन मिळवून दिलें तें असें कीं, प्रत्येक दारूच्या पिंपामागें अर्ध विग्रहपाल द्राम किंमतीची दारू विष्णूच्या देवालयास पुरवावी — दारूच्या ऐवजीं 'अर्ध विग्रहपालद्रम्म' ही रक्कम द्यावी असें लेखांत आहेसें दिसतें ).

४ नागक—चंदुकाचा मुलगा.

५ वासुदेव.

६ केशव—तांबोळी. यानें स्वतःची वेठी दिली होती.

७ शिलुक—महापामरचा मुलगा.

१० नागक—चदुक नामक व्यापाऱ्याचा मुलगा. ( याने दारू गाळणाऱ्यांना भांडवल म्हणून दिलेल्या १३५० आदिवराह द्रमाच्या रक्कमेंतून देवास वर्षासन करून दिलें; तें असें कीं, दारू गाळणारांनीं प्रत्येक महिन्याच्या शेवटीं दर दारूच्या पिपामागें $\frac{1}{2}$ विग्रहपाली याप्रमाणें होईल ती रक्कम द्यावी. )

११ भैलु—गोविंदनामक व्यापाऱ्याचा मुलगा.

१२ धमाक—तांबोळी.

१३ शवर व माधव—
तांबोळी. पानांच्या प्रत्येक 'पलेकामागें' $\frac{1}{20}$ द्रम्म येतील अशा तऱ्हेची नेमणूक यांनीं दिली.

१३ शावस—यानें ( वीथी ? ) दिली.

१५ नागक—यानें प्रत्येक घाण्यामागें एका पलिकाभर तेलाची नेमणूक करून दिली.

१६ मालुवाकादि पाथरवट—प्रत्येक भारणामागें अर्धद्रामाची रक्कम दिली.

१७ महादित्य व मोहल—पप्पाचे मुलगे—व्यापारी.

२८ देवैक, वार्ला, रुदक—आजूचे मुलगे; चित्रक—शाबाचा मुलगा—
या सर्वांनीं मिळून चतुष्कहात ' वीर्था ' दिली.

१ वरजार —X
२ नागरभट्ट कुमार.
३ वैल्लभट्ट.
४ कामरुक ( हें उपनांव आहे )
५ जज्जा ( स्त्रीचें नांव ).
६ अल्ल ( मुलाचें नांव ).
७ कंदुक.
८ वत्रा ( अल्लची स्त्री )—ब्राह्मण
९ सोमटा ,, मुलगी
१० गोग्गा ,, दुसरी स्त्री ,,
११ क्षिता ,, ,,
१२ इसटा ,, ,,
१३ वव्वीयाक—व्यापारी
१४ इच्छुवाक— ,,
१५ सोगदाक—शेतकरी
१६ दव्वक ( १४ चा मुलगा )
१७ मोचक —तेली
१८ सर्वस्वक ( १७ चा मुलगा )
१९ शिव धारी ,,
२० सहुल्ल ,,
२१ संगाक—तेली
२२ गग्गीक ,,
२३ देलवाक ,,
२४ जजट ,,
२५ वाच्छटक ,,
२६ गोग्गाक ,,

२७ देह्क
२८ जंयीक ,,
२९ रुद्रट ,,
३० जंबहरी—या सर्व तेली लोकांनीं प्रत्येक घाण्यामागें ( कोल्लुक )
१ पळीभर तेल देवाकडे द्यावें
३१ सिंघाक—तेली
३२ बल्लुक ,,
३३ लोहदाक ,,
३४ महार्गलीक—माळी
३५ तिल्लुक ,,
३६ देदुक ,,
३७ जासक ,,
३८ वहुलाक ,,
३९ सिदुक ,,
४० जंबूक ,,
४१ सहदाक ,,
४२ दंतिक ,,
४३ दुर्गधारी ,,
४४ नन्नुमाक ,,
४५ वनमाक ,,
४६ दीतक ,,
४७ वंटाक ,,
सर्व माळ्यांनीं मिळून दररोज ५० पुष्पहार देवालयास द्यावे.

## टिप्पणी २—अनुलोमविवाह व स्मृतिग्रंथ.

निरनिराळ्या कालांत लिहिल्या गेलेल्या स्मृतिवचनांवरून त्या त्या काळीं अनुलोमविवाह समाजांत कितपत प्रचारांत होते, अनुलोमविवाहापासून झालेल्या संततीचा दर्जा वारंवार कसा बदलत गेला वगैरेची चांगली कल्पना येईल; येवढ्याच हेतूनें स्मृतिकारांचीं वचनें येथें उध्दृत केलीं आहेत. राष्ट्रांतील अनेक घडामोडीचा अहवाल नमूद करणें हें जसें इतिहासकारांचें मूळ कर्तव्य आहे त्याचप्रमाणें समाजांतील वैवाहिकबंधनांत होत गेलेल्या फरकांचा ऊहापोह करणें समाजशास्त्रज्ञांचें प्रमुख कर्तव्य होय. पण समाजशास्त्रज्ञ या नात्यानें इथें विचार केलेला नसून इतिहासाच्या दृष्टीनें स्मृतिवचनांचें समालोचन केलें आहे. अनुलोमविवाह एके काळीं हिंदु समाजांत प्रचलित होते यांत शंका नाहीं. प्रतिलोमविवाह सर्वच स्मृतिकारांनीं निंद्य मानल्यामुळें त्यांचा विचार येथें केला नाहीं. अनुलोमविवाहाचा विचार येथें केला आहे त्यावरून तो समाजांतून कोण कोणत्या पायरीनें नष्ट झाला हें वाचकांच्या ध्यानांत येईल.

अनुलोमविवाहासंबंधानें मनुस्मृतींत खालील वचनें आढळतातः—

स्त्रीष्वनन्तरजातासु द्विजैरुत्पादितान्सुतान्
सदृशानेव तानाहुर्मातृदोषविगर्हितान् ॥ ६।१०
अनन्तरासु जातानां विधिरेष सनातनः
द्व्येकान्तरासु जातानां धर्म्यं विद्यादिमं विधिम् ॥ ७।१०
ब्राह्मणाद्वैश्यकन्यायामम्बष्ठो नाम जायते
निषादः शूद्रकन्यायां यः पारशव उच्यते ॥ ८।१०

"पतीच्या वर्णाच्या लगतच्या जातीच्या पत्नीपासून झालेल्या संततीचा दर्जा पतीच्या जातीचा समजावा (जरी अशा तऱ्हेच्या संततीस मातृपक्षाकडून थोडें वैगुण्य आलेलें असतें). असा रिवाज अनादि कालापासून चालत आला आहे. पति श्रेष्ठ जातीचा असून पत्नीच्या व त्याच्या जातींत एक किंवा दोन दोन जातींचें अन्तर असल्यास त्यासंबंधीं खालील नियम आहे. ब्राह्मणापासून वैश्य स्त्रीचे ठायीं उत्पन्न झालेल्या मुलांस अम्बष्ठ असें

म्हणावें व शूद्र स्त्रीचे ठायीं उत्पन्न झालेल्यास निषाद किंवा पारशव असें समजावें." मिश्रविवाहाची ही योजना पूर्व कालापासून ख्रिस्तीशकापर्यंत चालली असावी. ह्यांत पुढें कसकसा फरक पडत चालला तें आतां पाहूं.

याज्ञवल्क्य स्मृतींत शूद्र स्त्रीचा निषेध केलेला जरी आढळत नाहीं तरी स्वतः याज्ञवल्क्याचें मत असें आहे कीं, शूद्रा स्त्री श्रेष्ठ जातीनें वरूं नये. पण बाणभट्टास पारशव भ्राते होते ह्यावरून इ. स. ६०० पर्यंत शूद्रास्त्री वरण्याचा संप्रदाय नष्ट झाला होता असें दिसत नाहीं. पण यानंतर झालेल्या स्मृतींतून मात्र शूद्रास्त्रीचा स्पष्ट निषेध सांगितला आहे. उदाहरणार्थ व्यासस्मृतींत म्हटलें आहे:—

"उद्वहेत् क्षत्रियां विप्रो वैश्यां च क्षत्रियो विशाम्
न तु शूद्रां द्विजः कश्चिन्नाधमः पूर्ववर्णजात्रम्" ॥

द्विजानें शूद्रास्त्री वरिल्यास त्यास वृषलीपति असें म्हणत व त्याचा अनेक स्मृतींनीं कडक निषेध केला आहे; त्यांच्याशीं संभाषण करूं नये किंवा अन्नोदकादि व्यवहार करूं नये असें पराशरस्मृतींत सांगितलें आहे. "असंभाष्योऽह्यपांक्तेयः स विप्रो वृषलीपतिः" वगैरे वचनें पाहा.

ब्राह्मणांचे विवाह क्षत्रिय कुमारिकांबरोबर १० व्या शतकांतही होत असें राजशेखर कवीच्या विवाहावरून दिसतें. राजशेखराची पत्नी चाहमान क्षत्रिय कुलांतील होती असें त्यानेंच स्वतः सांगितलें आहे. मनूच्या कालीं क्षत्रिय स्त्रीपासून झालेली संतति ब्राह्मण असेंच समजण्यांत येई. पण याज्ञवल्क्यस्मृतींत अशा संततीचा दर्जा ठरविणारी एक निराळींच संज्ञा आढळते. याज्ञवल्क्यास अन्ततर किंवा एकान्तर स्त्रीपासून झालेल्या संततींतील भेद मान्य नाहीं. कारण 'फक्त आपल्याच जातीच्या स्त्रीपासून झालेल्या संततीचा दर्जा आपल्या वर्णाप्रमाणें असतो असें त्याचें मत आहे. "सवर्णेभ्यः सवर्णासु जायन्ते हि सजातयः"—क्षत्रिय स्त्रीपासून झालेल्या संततीस "मूर्धावसिक्त" अशी त्याची संज्ञा आहे. "विप्रान्मुर्धावसिक्तो हि क्षत्रियायां विशः स्त्रियाम्। अम्बष्ठो शूद्र्यां निषादो जातः पारशवोऽपिसः।"—याज्ञवल्क्य. व्यासस्मृतींत थोडा जास्त फरक केलेला आढळतो. "विप्रवद्विप्रविन्नासु क्षत्रविन्नासु क्षत्रवत्। वैश्यासु

विप्रक्षत्राभ्यां ततः शूद्रासु शूद्रवत् ॥" या श्लोकाचा अर्थ नीटसा लागत नाहीं तरीं पण तिसऱ्या ओळीवरून असें दिसतें कीं, ब्राह्मण व क्षत्रिय यांची वैश्य स्त्रियांपासून झालेली संतति वैश्य जातीची समजली जात असे. यावरूनही असें अनुमान निघतें कीं, ब्राह्मणास क्षत्रिय स्त्रीपासून झालेली संतति ही क्षत्रिय जातीचीच समजली जात असावी. याज्ञवल्क्याप्रमाणें अशा संततीचा 'मूर्धावसिक्त' असा निराळा वर्ग समजला जात नसे किंवा अशा संततीस मनूप्रमाणें ब्राह्मण जातीचेही अधिकार नसत. पण त्याच स्मृतींत असें एक वचन आढळतें कीं, ब्राह्मणांनीं किंवा इतरांनीं प्रथम सवर्ण स्त्री वरून अन्य जातीची स्त्री वरल्यास या अन्य जातीच्या स्त्रीपासून झालेली संतति सवर्णाची समजावी. "ऊढायां हि सवर्णायामन्यां वा काममुद्वहेत् ।" ह्या श्लोकानें वरच्या वचनांस थोडा विरोध येतो. असो, औशनस स्मृतींत तर असें स्वच्छ सांगितलें आहे कीं, ब्राह्मणांस क्षत्रिय स्त्रीपासून झालेली संतति क्षत्रिय जातीचीच समजावी. " नृपायां विधिना जातो विप्रान्नृप इति स्मृतः " व्यासस्मृतीप्रमाणें यांतही कांहीं विसंगत वचनें आढळतात. विवाहप्रसंगीं कांहीं विधि यथासांग केले असतां ब्राह्म-णास क्षत्रिय स्त्रीपासून झालेली संतति सुवर्ण ब्राह्मण अशी समजावी. पण सुवर्ण ब्राह्मणाचे जे धर्म या स्मृतींत सांगितले आहेत ते क्षत्रिय जातीचेच विशिष्ट धर्म आहेत. "अश्वं रथं हस्तिनं च वाहयेत् वा नृपाज्ञया । सेनापत्यं च भैषजयं कुर्याज्जीवेच्च वृद्धिषु ॥"—त्यावरून ही अशी संतति वस्तुतः क्षत्रिय जातीचीच समजली जात असावी हें उघड आहे. ब्राह्मणांची क्षत्रिय स्त्री-पासून झालेली संतति क्षत्रियजातीची समजली जाई व क्षत्रियांस वैश्य-भार्येपासून झालेली संतति वैश्यच समजली जाई हें खालील आणखी श्लोकां वरून उघड दिसेल. " नृपाज्जातोथ वैश्यायां गृह्यायां विधिना सुतः । वैश्य वृत्त्या हि जीवेत क्षत्रधर्मं न कारयेत् ॥ " —अशा रीतीनें असवर्ण जातीची भार्या करणें फक्त श्रीमानांसच शक्य असे; अति विद्वान् किंवा सत्ताधारी ब्राह्मणांसच क्षत्रिय भार्या करणें शक्य असे; इतरांस असवर्ण स्त्री वरणें क्वचितच शक्य असे.

क्षत्रियांत मात्र वैश्य स्त्रिया वरण्याचा प्रघात नेहमींच दिसून येई. व्यास स्मृतींत असें सांगितलें आहे ' प्रथम सवर्ण जातीच्या स्त्रीशीं विवाह करावा, नंतर शोकाखातर वाटल्यास आपल्याहून हीन जातीच्या स्त्रीशीं विवाह करावा " हें वचन क्षत्रियजातींत नेहमींच पाळलें जाई. क्षत्रियांची प्रथम विवाहाची स्त्री क्षत्रिय जातीची असे व दुसरी स्त्री वैश्य जातीची असे जयपुरांत असतांना मीं असें ऐकिलें आहे कीं, ह्या वैश्य भार्येस ' गुजरी ' असें म्हणण्याचा प्रघात आहे. बहुतेक करून ही स्त्री सशक्त व बांधेसूद अशा जाट किंवा गुजर जातींतील असावी. आमचा असा तर्क पूर्वी सांगितलाच आहे कीं, जाट किंवा गुजर लोक अव्वल वैश्य असावे त्यांच्या कडेच कृषि व गोरक्ष्य कर्म पूर्वीपासून चालत आलें आहे.

---

# प्रकरण १२ वें

## राजकीय परिस्थिति.

राजकीय कल्पनांची उत्क्रांति व वाढ पाश्चिमात्त्य व पौर्वात्त्य देशांत भिन्न प्रकारानें कां व कशी होत गेली व हिंदुस्थानांत स्वराज्यनिष्ठेचा उदय व विकास कोणत्या विशिष्ट कारणांनीं झाला नाहीं याचें सविस्तर विवेचन मागल्या भागाच्या ७ व्या प्रकरणांत झालेंच आहे. प्रत्येक प्रजाजन हा राष्ट्राचा घटकावयव आहे व त्याचे शिरावर राष्ट्राच्या हिताची जबाबदारी आहे; उलट राष्ट्राच्या शासनपद्धतींत अशी योजना असावी कीं, त्यांत प्रजेच्या कल्याणाकडे पूर्ण लक्ष्य देण्यांत यावें; अशा कल्पना हिंदुस्थानांत दृढमूल झाल्या नाहींत. अगदीं प्राचीन कालीं राष्ट्र जनतेचें आहे अशी कल्पना

प्रचलित असावीसें वाटतें. प्रजासत्ताक राज्याच्या कल्पनेची पूर्ण वाढ या देशांत कधींच झाली नाहीं; तरी राजाचेंच राज्य अशीही कल्पना प्रारंभीं नव्हती. लोकांवरूनच देशांची नांवें पूर्वी पडलेलीं आढळतात, पण पुढें पुढें ज्यांचा शासनपद्धतींत कोणताच संबंध ठेविला नाहीं अशा शूद्र लोकांचा राष्ट्रांत विशेष भरणा झाल्यामुळें राज्यशासनाचे अधिकार ब्राह्मणांतील कांहीं विशिष्ट कुलांत व क्षत्रियांकडे चालू राहिले व अखेर क्षत्रियांतील कांहीं विशिष्ट घराण्यांतच शासनाचा अधिकार आला. अशा तऱ्हेनें राज्यशासनाचें क्षेत्र प्रारंभीं अत्यंत विस्तृत असतांही राष्ट्रांत शूद्रांचा समावेश झाल्याकारणानें तें अत्यंत संकुचित व अनियंत्रित झालें. प्रारंभीं असा समज होता कीं, लोकांनीं आपल्या संरक्षणाकरितां स्वानुमतानें राजाकडे शासनाधिकार सोंपवले असून त्यांचा त्यानें प्रजेच्या कल्याणाकरतां योग्य रीतीनें उपयोग करावा. त्याऐवजीं आतां असा समज सुरू झाला कीं, पूर्वजन्मींच्या खडतर तपश्चर्येचें फळ म्हणजे या जन्मांत राजपद प्राप्त होणें होय. राजा हा विष्णूचा अंश होय, त्याला देवांच्याच कृपेनें राज्यपद प्राप्त होतें, राजाचा अधिकार अनियंत्रितच असतो, अशा तऱ्हेचा समज जों जों दृढमूल होत जाणार तसतशी लोकांतील राष्ट्रभक्ति किंवा देशाभिमान कमी कमीं होत जाणार हें अगदीं उघड आहे. कारण त्या कल्पनांच्या उदयाबरोबरच स्वामिनिष्ठेची जोपासना होते. पण एका विशिष्ट कुलाविषयीं अभिमानबुद्धि बळावत असतांना गुप्त रीतीनें मत्सरबुद्धीची तसेंच अराजनिष्ठेची व स्वार्थी महत्त्वाकांक्षेचीहि वाढ होत रहाणारच. 'बळी तो कान पिळी' या न्यायानें जो कोणी महत्त्वाकांक्षेनें पुढें होई त्याला विश्वासघातकी साथीदार मिळावयाचेच आणि ते विजयी झाले म्हणजे राजे झालेच; कारण राजाच्या निवडणुकीस प्रजेची सम्मति पाहिजे ही समजूतच नष्ट झालेली

होती. या रीतीनें राजद्रोही अधिकाऱ्यांच्या फितुरीनें नवीन राजवंश स्थापण्यास पुष्कळांस फावे.आतां हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं,राजवंश म्हटला म्हणजे शंभर दोनशें वर्षांनीं तो कर्तृत्वहीन व्हावयाचाच. जगतांतील प्रत्येक वस्तुप्रमाणें राजवंशालाही जीर्णता व पुढें मृत्यु येणें अपरिहार्य आहे. आणि म्हणूनच अशीं जीर्ण झाडें उपटून कोणी नवीन वृक्षारोपण केलें तर ते वाईट नव्हतेंच. नवीन कर्तृत्वसंपन्न राजवंश स्थापन वेळो वेळीं व्हावे हें इष्टच आहे. किंबहुना नवव्या शतकाच्या प्रारंभाला हिंदुस्थानांत जुने राजवंश उच्छिन्न होऊन नवे कर्तृत्वशाली वंश स्थापन झाले हें चांगलेंच झालें. या वेळीं जीं नवीन रजपूत राजघराणीं स्थापन झालीं तीं सर्व पूर्ण स्वतंत्र एकसत्तात्मकच होतीं. त्यांनीं आपली सत्ता लोकांच्या संमतीनें स्थापिली नसून केवळ आपल्या तलवारीनें व आपल्या कर्तृत्वानें व आपल्या कुलांतील भाईबंदांच्या मदतीनें. कुलाचे जे लोक असे राजसत्तेचे स्तम्भ असतात त्यांस रजपूत लोकांत भाईबंद म्हणावयाची चाल आहे, आणि इंग्रेजींत त्यांस क्लान्समन म्हणतां येईल. असो; तर हिंदुस्थानांत या वेळीं जे राजकीयसत्तासिद्धान्त प्रचलित होते त्याप्रमाणें हिंदुस्थानांत कोणतींही राजकुळें स्थापन होऊं शकतीं. तीं नितकीं जोरदार व भाग्यसंपन्न मात्र असलीं पाहिजेत. असें जरी आहे तरी आरब प्रवाश्यांच्या वर्णनांवरून लोकांच्या ठिकाणीं अद्याप कांहीं राजसत्ता अवशिष्ट होती व ते कोणत्याहि नवीन राजकुलाला आपली " अलीजन्स " अथवा मान्यता देतेवेळीं ती अमलांत आणीत असत. तात्पर्य; लोकांत थोडा जीव अजून शिल्लक होता.

हा पुरावा बहुतेक सर्व आरब प्रवाश्यांच्या प्रवासवर्णनांवरून मिळतो. हे प्रवाशी बहुधा एकाच मूळ लेखाचा अनुवाद करीत असतात; पण सर्वांत प्राचीन प्रवाशी सुलेमान लिहितो, " हिंदु-

स्थानचे राजे परमुलुखांवर जिंकण्याच्या हेतूनें कधीं कधीं लढाई करतात; परंतु असे प्रसंग फारच थोडे. एका देशाच्या लोकांनीं दुसऱ्या देशाच्या लोकांचें आधिपत्य केलें आहे असें मीं कधींच पाहिलें नाहीं. याला एक अपवाद आहे तो देश म्हटला म्हणजे मिऱ्याच्या देशास लागून असलेला देश होय ( मलबार ). जेव्हां एका देशाचा राजा दुसऱ्या देशाच्या राजास जिंकतो तेव्हां जित राजाच्या कोणा-तरी नातलगास त्या देशावर राज्य करण्यास नेमावा लागतो; मग तो जिंकणाऱ्या राजाच्या नांवानें कारभार चालवितो. **याविरुद्ध कोणतीही व्यवस्था तेथील लोक चालूं देणार नाहींत**" (इलियट भा. १ पा. ७ ). आम्हीं पूर्वीं अनेक वेळां नमूद केलेंच आहे कीं, प्राचीन किंवा मध्ययुगीन हिंदुस्थानांत साम्राज्यस्थापना म्हणजे राज्यें खालसा करणें नव्हतें. बहुधा जिंकलेल्या राजासच कायम गादीवर ठेविलें जाई; किंवा त्याच्या कुलापैकीं दुसरा कोणी गादीवर बसवून राज्यकारभार पूर्वींप्रमाणें चाले. मात्र जेत्या सम्राटास कांहीं करभार दिला जाई. याचप्रमाणें प्रतिहारांचें कनोजचें साम्राज्य होतें तेव्हां तत्कालीन शिलालेखांवरून त्या साम्राज्याखालीं कित्येक मांडलिक राज्यें असल्याचें दिसून येतें. उदाहरणार्थ वढवानचा चावोटक किंवा भारणचे चालुक्य हे आपल्या लेखांत आपल्यास स्पष्टपणें कनोजचे मांडलिक म्हणतात. त्याचप्रमाणें राष्ट्रकूटांच्या साम्राज्याखालीं कित्येक अन्तर्वर्ती राज्यें होतीं, ही गोष्ट अरब प्रवाशीही लिहितात; परंतु सुलेमाननें " लोक दुसरी व्यवस्था चालूं देणार नाहींत " असें जें स्पष्ट म्हटलें आहे त्यावरून अनुमान होतें कीं, लोकांत अद्याप कांहीं जोर अवशिष्ट होता; आपल्या हातांत कांहीं सत्ता आहे ही जाणीव त्यांच्यांत अद्याप जिवंत होती. सुलेमाननें जे एक अपवादक लोक सांगितले ते मिऱ्याच्या देशाजवळचे होते, म्हणजे मलबारच्या

जवळच्या चोळ, पांड्य, केरळ वगैरे देशांत लोकांस कोणीका राजा असेना चाले स्वदेशीच पाहिजे असें वाटत नव्हतें.या विधानांचें आश्चर्य वाटतें. दक्षिणेकडे जीं अनार्य द्रविड जातींचीं राज्यें होतीं, त्यांतील लोकांत इतकीसुद्धां कमी 'नॅशनॅलिटी' म्हणजे स्वराष्ट्रभावना नव्हती असें यावरून दिसतें. आमचें मत असेंच आहे कीं, आर्यलोकांत स्वराष्ट्रभावना सर्वांत अधिक जागृत असते आणि त्याचे खालोखाल मॅगोलियन वंशाचे लोकांत; आणि हेच दोन जगतांत हल्लीं पुढें आहेत. परंतु द्रविड व नीग्रो वंशाचे लोकांत अद्याप इतकी कमी संस्कृति आहे कीं, त्यांच्यांत ही मनोभावना अद्याप उत्पन्न झालेली दिसत नाहीं. हल्लींसुद्धां परकीय अमलासंबंधानें तो तिटकारा त्यांच्या मनांत वसत नाहीं, जो जगतांतील आर्य लोकांच्या किंवा पिंवळ्या लोकांच्या स्वभावांत आपल्यास दिसून येतो. दक्षिणोत्तर हिंदुस्थानांत सुद्धां आर्य व अनार्य अशा अर्धे अर्धे मिश्रणाचे लोक असल्यानें स्वराष्ट्रभावना केवळ जीवशेप आहे आणि हें एक मुख्य कारण हिंदुस्थान देश बहुतेक कायमचा परदास्यांत असण्याचें आहे. 'लोक याविरुद्ध व्यवस्था चालू देणार नाहींत" या लहानशा सुलेमानच्या वाक्यांत जी थोडीशी राष्ट्रभावना दृग्गोचर होते तीहि महमद घोरीनें उत्तर हिंदुस्थान पादाक्रांत केलें त्यावेळीं हिंदुस्थानांत शिल्लक नव्हती असेंच दिसतें.

असो तर, प्राचीनकाळाप्रमाणें मध्ययुगीन काळांतही हिंदुस्थानांत कित्येक राज्यें होतीं; आणि त्यांपैकीं कांहीं मोठीं असून साम्राज्यें होतीं व त्यांच्या आधिपत्याखालीं कित्येक लहान मांडलिक राज्यें होतीं. हीं साम्राज्यें वारंवार आपसांत लढत; परंतु तीं एकमेकांस जिंकण्याकरितां नव्हे तर कोणी कोणास जिंकूं नये यासाठीं. मालखेडचे राष्ट्रकूट व कनोजचे प्रतिहार, त्याचप्रमाणें

बंगालचे पालराजे यांच्यांत जीं या काळांत युद्धें चालत तीं अशाच प्रकारचीं व अशाच हेतूनें चालत हें आपल्यास तत्कालीन लेखांवरून स्पष्ट दिसतें. या सर्व राज्यांवर रजपूत कुळींचे राजेच राज्य करीत होते. कारण राज्य क्षत्रियांनींच करावें हा वर्णधर्म प्राचीन काळचा यावेळीं जागृत झाला होता. ईश्वरानेंच त्यांस हा अधिकार दिला आहे, असा सार्वत्रिक समज होता. लोकहि आपला अधिकार कधीं कधीं नवीन क्षत्रिय राजवंशाचे स्थापक राजे निवडून किंवा मान्य करून चालवीतहि होते. अशाच रीतीनें बाप्पारावळ याची निवडणूक निर्वंश किंवा निर्माल्य झालेल्या मौर्य घराण्याच्या ठिकाणीं चितोड येथें झाली. त्याचप्रमाणें बंगालमध्येंही लोकांनीं मात्स्यन्याय बंद पडावा यासाठीं गोपाळ यास राजा निवडलें.

अशा संस्थापकांच्या वंशजांचाच हक्क राज्य करण्याचा आहे असें लोक मानीत. लोकांची मनःप्रवृत्ति किंवा चाल अशीच होती. युरोपांतहि हीच स्थिति यावेळीं किंवा यानंतर सुद्धां दृष्टीस पडत्ये. राजवंशाचा पिढ्यानुपिढ्या राज्य करण्याचा हक्क किंहुबना देवानें दिलेला हक्क युरोपांतहि मानला जात असे; तेव्हां याच सुमारास हिंदुस्थानांतहि अशा प्रकारचा हक्क मान्य होता यांत आश्चर्य नको.

परंतु पाश्चात्त्य व प्राच्य देशांत एवढा फरक होता कीं पाश्चात्त्य देशांत लोक आपल्या प्रतिनिधिसभेच्या मार्फत राजकीय घडामोडीं-वर नजर ठेवून तीस योग्य वळण देण्याचा हक्क यावेळींहि बजावीत होते. परंतु हिंदुस्थानांत अशा प्रकारच्या संस्था कधींच अस्तित्वांत आल्या नाहींत. राजा मान्य करण्याचा किंवा नवीन निवडण्याचा जो अर्धामुर्धा हक्क हिंदुस्थानांतील लोकांस अद्याप होता ते तो कसा बजावीत असत हा एक महत्त्वाचा पण कठिण प्रश्न आहे. या प्रश्नाचा कांहींसा उलगडा सुलेमानच्या आणखी पुढील वाक्यांवरून होतो

असें आम्हांस वाटतें. " हिंदुस्थानच्या राजे लोकांजवळ बरीच फौज असते; परंतु या फौजेस सरकारांतून पगार मिळत नाहीं. कधीं धार्मिक युद्ध होईल तरच ही फौज बोलावली जाते. राजाच्या बोलावण्यावरून हे लोक जमतात आणि आपल्याच पदरचें खातात." ( इलियट भा. १ पा. ७ ). ही हिंदुस्थानची परिस्थिति त्याच वेळच्या यूरोपच्या परिस्थितीसारखीच होती. यावेळीं यूरोपांत काय किंवा हिंदुस्थानांत काय सरकारांतून पगार खाणाऱ्या खड्या फौजा बहुतेक नव्हत्या. प्रत्येक राज्यांत काहीं लढवय्ये सरमजामदार व भाऊबंद ( ज्यांस कुलपुत्र म्हणत ) असत ते सरकारच्या गरजेच्या वेळीं आपली जमैय्यत घेऊन येत आणि ही फौज त्यांच्याच खर्चानें व कधीं कधीं लुटीवर आपलें पोट भरी. अशा करारावरच त्यांस जमिनी किंवा गांव दिले गेलेले असत. अशी तात्पुरती फौज गांव किंवा जमिनी खाणारी आणि प्रत्यक्ष सरकारापासून तनखा न घेणारी नवीन राजवंश येण्याच्या वेळीं फारच महत्त्वाची असली पाहिजे आणि त्यांस पसंत न पडल्यास अशा नव्या राजास आपली मान्यता देणें न देणें त्यांच्या हातांत असे. यावरून सुलैमानचें जें म्हणणें कीं, लोक आम्हांस अमुकच एक राजा पाहिजे असा आग्रह धरूं शकत त्याची सत्यता व मीमांसा आपल्यास पटत्ये.

हिंदुस्थानांत साधारणतः सरकारी प्रत्यक्ष तनखा खाणाऱ्या खड्या फौजा नव्हत्या या सामान्य विधानाला कांहीं ठळक अपवाद होते ही गोष्ट येथें नमूद करावयास पाहिजे. हे अपवाद आरबलेखकांनींच लिहून ठेविले आहेत. ते असें लिहितात कीं, "बलहारा म्हणजे राष्ट्रकूट राजाजवळ खडी जय्यत फौज असे आणि **तीस नियमितपणें पगार मिळे**. नवव्या शतकांतील मराठ्यांना जी गोष्ट त्यांच्या भावि वंशजांना म्हणजे १८व्या शतकांतील मराठ्यांना साध्य झाली नाहीं ती

साध्य होती आणि ते आपल्या खड्या फौजेस वेळचेवेळीं मुशाहिरा देत हें आरब प्रवाशांनीं दिलेलें प्रशस्तीपत्र वाचून खरोखर आनंद होतो. असो, याशिवाय कनोजचे प्रतिहार आणि बंगालचे पाल हे राजेहि खड्या फौजा ठेवीत आणि त्यांस वेळच्यावेळीं तनखा देत असें दिसून येतें. हीं तिन्ही साम्राज्यें असून त्यांच्या आधिपत्याखालीं कित्येक मांडलिक राज्यें होतीं. कनोजविषयीं आरबांनीं असें लिहून ठेविलेलें आढळतें कीं, चार सैन्यें पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर नेहमीं सज्ज असत. मुख्यतः पश्चिमेकडे सैन्य सज्ज असे, याचें कारण पश्चिमेकडे साम्राज्याची हद्द आरबांच्या मुलतान राज्याशीं लागली होती; आणि हे आरब हिंदवर ( सिंधखेरीज हिंदुस्थानच्या बाकीच्या भागास अरब हिंद म्हणत ) झडप घालण्यास नेहमींच तत्पर असत. दक्षिणेकडील फौज बलहारा ( म्हणजे वल्लभराय राष्ट्रकूट ) याच्या तोंडावर तयार असे; कारण हे बलहारा आरबांचे दोस्त व सहायकर्ते असत. पूर्वेकडील व उत्तरेकडील फौजेस फारसें काम नव्हतें. या दिशांनाही भय बंगालचें पाल व काश्मीरचे राय यांजकडून होतेंच. तथापि आरबप्रवाशी लिहितात कीं, या दोन फौजा इकडे तिकडेही जात असत. या प्रवाशांच्या वर्णनावरून आणखी असें कळतें कीं, कनौजची फौज मुख्यतः घोडेस्वारांची असे. पण दाक्षिणात्यांच्या फौजेंत तिन्ही शाखांचा म्हणजे पायदळ, घोडदळ व गजदळ यांचा भरणा असे. बंगालच्या फौजेंत हत्तींचा भरणा विशेष असे;कारण बंगाल्याकडील हिमालय व विंध्याद्रि या पर्वतांच्या जंगलांत हत्ती पुष्कळ मिळत. बंगालच्या फौजेंतील हत्तींची संख्या ५०००० जी आरब प्रवाशांनीं लिहिली ती अर्थात् फार फुगलेली आहे.

असो, त्या वेळच्या शिलालेखांत या विषयाची फारशी माहिती मिळत नाहीं हें साहजिकच आहे; हे लेख बहुधा ब्राह्मणांना व

मंदिरांना दिलेल्या दानासंबंधींच सांपडतात हें उघड आहे. म्हणून या विषयासंबंधानें आरब प्रवाशांच्या वर्णनावर जास्त भिस्त ठेवणें जरूर पडतें. तथापि बंगाल्यांतील भागलपूर येथील शिलालेखावरून आपल्यास अशी माहिती मिळते कीं, वंगसेनेंत खस,मालवहूण कर्णाट,-लाट आदि बाहेरचे सैनिक भरलेले असत.(इ. अँ.भा. १५पृ.३०५).-

येथें हें नमूद करणें वाजवी आहे कीं, परकीय सैनिकांचें खडें सैन्य राजांच्या सत्तेला नेहमींच धोक्याचें असतें. जेव्हां जेव्हां कोणत्याहि देशांतील लोक आत्मसंरक्षणाचें तसेंच परराज्यावर चढाई करून जाण्याचें काम परकीयांवर सोंपवितात तेव्हां तेव्हां ते लवकरच आपलें शौर्य नष्ट करतात आणि परदास्याकडे हळुहळु घसरत जातात. याशिवाय त्या देशांतील राजकुल या परकी सेनेच्या हातांत बाहुलें होऊन बसतें आणि त्यांच्या नावाखालीं लोकांवर अनन्वित जुलूम करून लोकांस लुटण्याचें धाडस ही सेना करते. या गोष्टीचा अनुभव अगदीं अलीकडच्या पुण्याच्या इतिहासांत आलेलाच आहे व तसा तो दिल्लीस मोगलांच्या इतिहासांतहि आलेला आहे व कॉन्स्टॅन्टीनोपल येथील तुर्कांच्या अनुभवास आला आहे. प्राचीन इतिहासांत रोम येथें रोमन लोकांस आणि मधल्या कालांत बगदाद येथें आरब लोकांस तोच अनुभव घडला आहे. तेव्हां या वेळीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या खड्या फौजा कशा तऱ्हेच्या होत्या हें पाहणें महत्त्वाचें आहे. बहुधा राष्ट्रकूटांच्या फौजेंत मराठ्यांचाच भरणा असावा आणि कनोजच्या प्रतिहारांच्या सैन्यांत मारवाडी रजपुतांचा भरणा असावा. बंगालच्या फौजेंत मात्र परकीयांचा भरणा दिसतो व त्यांत वरील शिलालेखांत नमूद केल्याप्रमाणें हिंदुस्थानांतील त्या वेळच्या प्रसिद्ध लढवय्या जाती घेतल्या जात असें दिसतें. बंगालचे राजे बौद्ध आणि बहुतेक प्रजा

पूर्वींच बौद्ध असून नुकतीच हिंदुधर्मांत परत आलेली असल्यामुळें या गोष्टीचें आश्चर्य करणें नलगे. बंगाल्यांत फार दिवस बौद्धधर्माचें वर्चस्व असल्यामुळें आणि त्या धर्माचे या बाबतींतील अनिष्ट परिणाम अजूनहि तेथें जारी असल्यामुळें बंगालमधील लोक एकंदर क्षात्रतेजांत कमी पडले असावे असें दिसतें. तथापि मगध प्राचीन हिंदुराजांच्या वेळीं आपल्याच फौजेच्या बळावर सुमारें ८०० वर्षें म्हणजे चंद्रगुप्तापासून ( इ. स. पू. ३०० ) बुधगुप्तापर्यंत ( इ. स. ५०० ) सर्व हिंदुस्थानभर साम्राज्य गाजवीत होता असें इतिहास सांगत आहे.

हिंदुस्थानांतील सर्व राज्यें त्या वेळीं पूर्ण राजसत्ताक होतीं तथापि त्यांत एक गुण होता. भारतीय राजकीय शास्त्राप्रमाणें राजाला नवे कायदे करण्याची सत्ता नव्हती. राज्याला जितके कायदे अवश्य आहेत तितके स्मृतींत करून ठेविले आहेत अशी समजूत होती. आणि कोणत्याहि मानवी संस्थेस ईश्वरनिर्मित स्मृतींतील कायदे बदलण्याची सत्ता नाहीं अशीही समजूत होती. ब्रह्मदेवानें सृष्टीच्या आरंभीं मनुष्यांच्या व्यवहाराकरितां कायदे निर्माण करून मनूला दिले होते आणि ते मन्वादि स्मृतींत ग्रथित आहेत, त्यांत बदल करण्याचा किंवा भर घालण्याचा कोणासहि अधिकार नाहीं असा आम्हां भारतीयांचा सिद्धान्त आहे. आतां ही गोष्ट किंवा समजूत चुकीची असेल पण राजसत्ताक राज्यव्यवस्थेला घालून दिलेलें हें नियमन बरोबर आहे हें कबूल करावें लागेल. ज्या अर्थीं राजे स्वतंत्र अनियंत्रित सत्ता वापरीत होते त्या अर्थीं त्यांना असा ईश्वर-निर्मित कायद्यांचा आळा असणें जरूर होतें आणि यामुळें अनियंत्रित राज्यकारभाराच्या जुलमांत आणखी अनियंत्रित कायदे करण्याच्या सत्तेच्या जुलमाची भर पडत नव्हती. स्मृत्युक्त कायदे कित्येक

बाबतींत अपुरे किंवा अयोग्य असतील; पण ते कायदे मनुष्यांच्या अनुभवानें आणि सदसद्विवेक बुद्धीनें घालून दिलेले असल्यानें एकंदरीनें समाजाला कल्याणप्रदच आहेत. तसेंच पूर्वीं राज्याचा खर्च बराच संकुचित असे, यामुळें स्मृतींत सांगितलेले कर म्हणजे जमिनीच्या उत्पन्नाचा षष्ठांश आणि व्यापाराच्या उत्पन्नाचा १/५० यापेक्षां जास्त कर वसूल करण्याची कोणत्याहि राज्यास किंवा राजास जरूरी भासत नसे. राजानें चोरीच्या बंदोबस्ताकडे पूर्ण लक्ष दिलें ( आणि हेंच त्याचें मुख्य कर्तव्य असे ज्याप्रमाणें प्रतिहाराच्या राज्यांत मानीत ) म्हणजे झालें. यामुळें भारतीय राज्यें अनियंत्रित राजसत्तेखालीं होतीं तरी सुव्यवस्थित असून सुखी असत.

भरतखंडांतील हीं राज्यें बहुधा आपसांत लढत असत आणि त्यांचा एक संघ कधींच झाला नाहीं किंवा तीं एकछत्री साम्राज्याखालीं आलीं नाहींत. कित्येक लोकांचा असा समज आहे कीं, असें न झाल्यानें व लहान लहान राज्यांत आपसांत लढाया चालू असल्यानें हिंदुस्थानास मुसलमानांनीं पादाक्रान्त केलें. परंतु या बाबतींत आमचे मत असें नाहीं. आमच्या विरुद्ध मताचें विवेचन आम्ही पहिल्या भागांत सविस्तर केलें आहे म्हणून या ठिकाणीं आणखी कांहीं मुद्दे सांगण्यापलीकडे या विषयाचा जास्त परामर्ष घेण्याची जरूरी नाहीं. सतत लढाई असणें हें अनिष्ट होय; पण मधून मधून लढाया होणें हें समाजास हितावह असतें व त्यापासून एकंदर मनुष्य जातीचा उत्कर्ष होत जातो. लढायामुळें लोकांच्याअंगीं क्षात्रवृत्तीचें गुण कायम रहातात इतकेंच नव्हे तर समाजाची बौद्धिक प्रगतिहि होते. किंबहुना हल्लीं युरोपखंडाची प्रगति या मधून मधून होणाऱ्या लढायांमुळेंच होत आहे हें आपण पाहतों. याच न्यायानें हिंदुस्थानाच्या मध्ययुगीन इतिहासांतील राज्यांची भरभराट प्रासंगिक युद्धांमुळें

होत गेली. आणि राष्ट्रकूटांनीं प्रतिहाराशीं झालेल्या युद्धांत परकी अरबांची मदत कधीं कधीं घेतली तरी सुद्धां कांहीं बिघडलें नाहीं; म्हणजे प्रतिहारांचें नुकसान झालें नाहीं किंवा एकंदर देशाचेंहि झालें नाहीं. पहिला भाग प्रकरण ७ यांत आम्हीं दर्शविलेंच आहे कीं, फ्रान्सचा राजा फ्रान्सिस पहिला यानें जर्मनीशी झालेल्या युद्धांत तुर्कांची मदत घेतली होती आणि जर्मनी धर्मबन्धु असून तुर्क धर्म-शत्रुहि होते त्याचप्रमाणें राष्ट्रकूटांनीं अरबांची मदत घेतली यांत आश्चर्य किंवा नुकसान नाहीं. परंतु फरक इतकाच कीं, जर्मन किंवा फ्रेंच राष्ट्रांस तुर्कांनीं अथवा अरबांनीं पादाक्रांत केलें नाहीं. हिंदुस्थानांत मात्र मुसलमानांनीं राष्ट्रकूट व प्रतिहार यांच्या वंशजांस दोघांसही पादाक्रांत केलें आहे. युरोपीय राष्ट्रें अरब (सॅरसन) अथवा तुर्क यांच्या समोर अद्याप जशींच्या तशींच किंबहुना अधिक जोरदार कां आहेत या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं, युरोपीय राष्ट्रांतील लोकांच्या अंगीं राष्ट्रीयभावना (नॅशनॅलिटी) अतिशय तीव्रतेनें जागृत आहे. हिंदुस्थानांतील मध्ययुग-कालीन राष्ट्रें जरी आपसांत झगडत असत किंबहुना कधीं कधीं परकी अरबांची मदत घेत असत तरी पण त्यांच्यांत राष्ट्रीयभावना थोडीबहुत तरी जिवंत असे असे अरब लेखकांच्याच वर्णनावरून दिसतें आणि यामुळेंच तीं राष्ट्रें बरींच बलसंपन्न होतीं.

आमच्या मतें हिंदुस्थानची साधारणपणें नैसर्गिक परिस्थिति म्हटली म्हणजे प्रांताप्रांतांत निरनिराळीं राज्यें असणें हीच होय व होती. आणि सर्व देशाचें एकछत्री अमलाखालीं एकवटणें ज्याप्रमाणें अशोक अथवा हर्ष ह्यांच्या काळीं घडलें, ही हिंदुस्थानची गैरमामूली म्हणजे अनैसर्गिक स्थितिच होय. कारण लोकस्वभाव भिन्न, भाषा भिन्न, हवापाणी भिन्न, प्राचीन इतिहासपरंपरा भिन्न, किंबहुना

मानसिक व शारीरिक शक्त्या भिन्न अशा स्थितींत हिंदुस्थानांत प्रान्तवार निराळीं राष्ट्रं असणेंच अपरिहार्य आहे. आतां सर्व हिंदुस्थानाचा मिळून एक देश असून त्यास स्वतंत्र व मजबूत सीमा आहेत ही गोष्ट खरी; पण राष्ट्र बनण्याला नैसर्गिक भूगोलिक सीमांची अवश्यकता नाहीं. उदाहरणार्थ हालंड आणि जर्मनी यांमधील सीमा म्हणजे अगदीं कुचकामाची लहान दोऱ्याइतकी सुद्धां मजबूत नाहीं, आणि हीच गोष्ट बेलजम आणि फ्रान्स यांमधील सीमेची आहे. असें असूनहि हालंड व बेलजम यांनीं आपलें स्वातंत्र्य बलिष्ठ जर्मनी व फ्रान्स यांच्याविरुद्ध अनेक लढाया करून आज हजार वर्षेंपावेतों टिकविलें आहे. हिंदुस्थानांत सिंध, पंजाब, अयोध्या, राजपुताना, आग्र्याचा सयुंक्त प्रान्त व बंगाल यांच्या सीमा कांहीं विशेष मजबूत नाहींत. आणि या निरनिराळ्या देशांत मध्ययुगीन काळांत निरनिराळीं राज्यें होतीं व तीं बलवानहि होतीं आणि जर बलवान राष्ट्रीय भावना त्यांतील लोकांत जागृत राहून वाढत गेली असती तर तीं राष्ट्रं आजहि जिवंत असतीं यांत शंका नाहीं.

हल्लीं हिंदुस्थानावर सर्वदेशभर ब्रिटिश साम्राज्य पसरलें असून त्याचमुळें त्या अमलाखालीं हिंदुस्थानच्या लोकांत एकराष्ट्रीय भावना जागृत होऊं लागली आहे. ही भावना प्रान्तमर्यादा वलांडून गेली आहे हें खरें. आणि या कारणानें यापुढें हिंदुस्थानचें एक राष्ट्र किंवा प्रान्तवार राज्यें मिळून अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांप्रमाणें एक राष्ट्रसंघ होणेंच शक्य आहे. सर्व देश मिळून एक राष्ट्र होण्यास पोषक असे अनेक गुण उत्पन्न झाले आहेत, पण ते गुण मध्ययुगीन कालांत नव्हते. हिंदुस्थानची परिस्थिति मध्ययुगीन काळांत "होली रोमन एम्पायर"च्या वेळीं युरोपची जशी स्थिति होती तशी पुष्कळ विशिष्ट आणि महत्त्वाच्या बाबींत होती. युरोपांतील लोक मानववंशदृष्ट्या

एक वंशाचे म्हणजे आर्य आहेत, त्याचप्रमाणें हिंदुस्थानचे लोक एक वंशाचे म्हणजे आर्यवंशाचे किंवा मिश्र आर्यद्रविड वंशाचे आहेत. जरी युरोपप्रमाणेंच हिंदुस्थानांतहि प्रान्तोप्रान्त भाषाभेद होता तरी सर्वांचा धर्म एक असल्यानें युरोपांत धर्माच्या बाबींत लॅटिन भाषा होती तशी हिंदुस्थानांत संस्कृत भाषा सर्व प्रान्तांतील पंडित लोक जाणत होते व बोलूंहि शकत. जसा युरोपांत बायबल हा धर्मग्रंथ सर्वांना मान्य होता तसे हिंदुस्थानांत या वेळीं वेद सर्वांना मान्य होते. युरोपांत रोमन कॅथालिक धर्मामुळें मेरी, ख्राईस्ट वगैरेच्या मूर्ति पूज्य होत्या तशा हिंदुस्थानांतहि वेदांच्या अमलाखालीं शिव, विष्णु इत्यादि देवांच्या मूर्तिहि पूज्य होत्या. हिंदुस्थानांतील निरानिराळीं राष्ट्रें एकच कायदा ऊर्फ धर्मशास्त्र म्हणजे मनुयाज्ञवल्क्यादि स्मृत्या मानीत होतीं. यूरोपांतील 'रोमन होली एम्पायर' मधील निरनिराळीं राष्ट्रेंहि एकच म्हणजे रोमन कायदा मानीत असत. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राष्ट्रांच्या सीमा युरोपांतील राष्ट्रांप्रमाणेंच पुष्कळशा कल्पित व निर्बल होत्या आणि दोन्ही ठिकाणीं अशा राष्ट्रांची संख्या लहान नव्हती. इतक्या सम परिस्थितींतहि युरोप 'पवित्र रोमन साम्राज्य' नांवाखालीं जसें एकराष्ट्र बनलें नाहीं, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील मध्ययुगीन राष्ट्रांचें एक राष्ट्र बनलें नाहीं. कारण प्रान्तिक अभिमान व भिन्न राष्ट्रीयभावना त्यावेळीं इतकी तीव्र होती कीं, या एकीकरणाच्या संयुक्त परिणामालाहि ती पुरून उरली होती आणि यामुळें या भिन्न राष्ट्रांचें एकराष्ट्र बनणें शक्य नव्हतें. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं ही गोष्ट कोणत्याहि रीतीनें शोच्य नव्हती. युरोपांतील राष्ट्रें भिन्न राहिलीं आणि हिंदुस्थानांतीलहि राहिलीं यांत दुःख वाटण्यासारखें किंवा दोषास्पद दोन्हीं ठिकाणीं कांहीं नव्हतें. जशी युरोपांतील राष्ट्रांतील लोकांची एकराष्ट्रीयभावना वाढत गेली त्या-

प्रमाणें हिंदुस्थानांतील भिन्न राष्ट्रांचीहि राष्ट्रीयभावना बलवान होत गेली असती तर हिंदुस्थानची आणि युरोपची हल्लींची स्थिति भिन्न न होती. आणि पुढील भागांत आम्ही दाखविणार आहों त्याप्रमाणें पुढील कालविभागांत हिंदुस्थानच्या भिन्न देशांतील लोकांची राष्ट्रीय भावना नष्ट होत गेली आणि बाराव्या शतकाच्या अखेर हीं सर्व राष्ट्रें अफगाण व तुर्क या लोकांच्या हल्लयापुढें टिकलीं नाहींत. या राष्ट्रांनीं संघटनप्रयत्न परकी सत्तेविरुद्ध व परकीधर्माविरुद्ध केला नाहीं असें नाहीं. असा प्रयत्न दोनदां झाला आणि तुर्क व अरब या मुसलमानांच्या टोळधाडीविरुद्ध युरोपनें जितका कसून विरोध केला तितका हिंदुस्थाननें अफगाण व तुर्क यांच्या विरुद्ध केला. फरक एवढाच झाला, युरोपांतील राष्ट्रीयभावनेच्या जोरानें युरोपला यश आलें;पण हिंदुस्थानला ती भावना नष्ट झाल्यानें अत्यंत अपमानास्पद अपशय आलें, हें लक्षांत ठेविलें पाहिजे.अशाप्रकारचा एकजुटीचा प्रयत्न दोन्ही ठिकाणीं आणखी एका कारणानें शक्य झाला. हिंदुस्थानांतील राज्यें या वेळीं रजपूत कुळांच्या सत्तेखालीं होतीं. आणि अरब प्रवाशांनीं वर्णिल्याप्रमाणें या सर्व रजपुतांची एक स्वतंत्र जातच बनली होती. काबुलापासून कामरूपापर्यंत आणि काश्मीरापासून कोंकणापर्यंत सर्व लहानथोर राज्यें रजपुतांच्या अमलाखालीं होतीं आणि यांचीच आमच्या मतानें ३६ कुळींची एक रजपूत जात बनली होती. ही ३६ संख्या चंदानें सांगण्यापूर्वींच हिंदुस्थानांत परंपराभूत झाली होती. कारण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें या संख्येचा उल्लेख चंदापूर्वींच्या राजतरङ्गिणींतहि आहे; व याच ३६ कुळांत विवाहसंबंध होत असत. ही परिस्थिति युरोपच्या परिस्थितीप्रमाणेंच होय. कारण तेथील भिन्न देशांतील राजवंश एकधर्मी व एकवंशी असल्यानें परस्परांशीं विवाहसंबद्ध होते. अर्थात् दोन्ही ठिकाणीं भिन्नधर्मी व भिन्न-

वंशी मुसलमानांच्या विरुद्ध संघ करण्यांत कोणतीच अडचण नव्हती. असा संघ होऊनहि हिंदुस्थान राष्ट्रीयभावनेच्या अभावीं खालीं पडलें ही गोष्ट ध्यानांत धरली पाहिजे. हा शोचनीय प्रकार कसा घडला याचें सविस्तर वर्णन पुढील भागांत येईल हें सांगावयास नलगे.

# प्रकरण १७ वें

# मुलकी व लष्करी कारभार.

## ( अ ) मुलकी कारभार.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतून सातव्या व आठव्या शतकांत मुलकी व लष्करी व्यवस्था कशा प्रकारची चालू होती याचें सविस्तर वर्णन आम्हीं आमच्या पहिल्या भागांत दिलेंच आहे; आणि नवव्या व दहाव्या शतकांत या व्यवस्थेचें स्वरूप साधारणपणें पूर्वींचेंच कायम राहिलें असलें पाहिजे हें कोणाच्याहि लक्षांत येण्याजोगें आहे. तत्कालीन शिलालेखांवरून म्हणजे देवस्थानें व ब्राह्मण यांना दिलेल्या दानपत्रांवरून त्या वेळच्या राज्यपद्धतीची कांहींशी कल्पना करतां येते. आणि पूर्वींच्या शतकांत हुएनत्संगाच्या लेखानें इतिहास-संशोधनास जशी मदत होते तशीच नवव्या व दहाव्या शतकांत आरबी प्रवाशांच्या लेखानें मदत होते. आम्हीं या प्रकरणांत आमच्या इतिहासाच्या दुसऱ्या कालविभागांत म्हणजे नवव्या व दहाव्या शतकांत मुलकी व लष्करी व्यवस्थेचें स्वरूप कशा प्रकारचें होते याचें त्रोटक वर्णन देणार आहों.

हिंदुस्थानांत साऱ्या देशांत मिळून पांच पन्नास स्वतंत्र संस्थानें होतीं. त्यांना देश अशी संज्ञा असून प्रत्येक संस्थानावर अनियंत्रित

राजसत्ता चालू असे. कांहीं संस्थानें प्राचीनपरिभाषेप्रमाणें साम्राज्यें होतीं; म्हणजे त्यांच्या आधिराज्याखालीं पोट संस्थानें स्वतंत्रपणें नांदत असून तीं सम्राटाचें स्वामित्व वरपांगीं तरी मान्य करीत. अशा प्रकारचीं साम्राज्यें दोन किंवा तीन होतीं. पहिलें उत्तर हिंदुस्थानांत कनोज येथील राज्य, दुसरें दक्षिणेकडे मालखेड येथील; आणि तिसरें पूर्वेकडे बंगाल्यांत मोंगीरच्या पालांचें. या सर्व राज्यांतून अनियंत्रित राज्यपद्धति चालू असली तरी तेथें राज्याचा बंदोबस्त चांगला असे. आमच्या मागल्या ग्रंथांत सांगितलेंच आहे कीं, हिंदु राजनीति राजांना कायदे करण्याचा अधिकार देत नाहीं, यामुळें हानिकारक व सुलतानी कायदे चालू करणें हें जें राज्यकारभारांत अव्यवस्थितपणा उत्पन्न करण्याचें मूलभूत कारण तेंच इकडे अस्तित्वांत नव्हतें. कायदे ईश्वरप्रणीत समजले गेले असल्यामुळें त्यांची अंमलबजावणी करण्याचेंच काम तेवढें राजाकडे राही. जे राजे या ईश्वरप्रणीत कायद्यांना धाब्यावर बसवीत त्यांच्यावर जनता व धर्मगुरु यांचा संताप होई आणि यामुळें अर्थात् त्यांचें राज्य फार दिवस टिकत नसे. अशा प्रकारच्या राजांचीं उदाहरणें या काळीं सांपडत नाहींत असें मात्र नव्हे; उदाहरणार्थ काश्मीरचा शंकरवर्मा पहा. पण बहुतेक सर्व राजे धर्माच्या भीतीनेंच स्मृतिप्रणीत कायदे तंतोतंत पाळीत असत; आणि अशा रीतीनें हिंदुस्थानांतील संस्थानांतून अनियंत्रित राजसत्ताक राज्यपद्धति असून देखील तीं राज्यें सुव्यवस्थित व सुखी होतीं.

राजे लोक जमिनीच्या उत्पन्नाचा षष्ठांश व व्यापाऱ्यांच्या नफ्याचा पन्नासांश स्मृतिप्रणीत कायद्यानुसार लोकांकडून कर म्हणून वसूल करीत; आणि त्याच्या मोबदला परकीयांच्या स्वाऱ्या व देशांतील चोर दरवडेखोर यांचे जुलूम वगैरे अनर्थांपासून ते लोकांचें

संरक्षण करीत. कनोजचे प्रतिहार राजे हें आपलें कर्तव्य किती चोख रीतीनें बजावीत याची माहिती आरबी प्रवाशांच्या वर्णनावरून मागें दिलीच आहे; त्यावरून गुर्जर देशांत दरवडेखोरांचा त्रास मुळींच नसे हें सिद्ध होतें कनोजप्रमाणें इतर देश देखील लुटारू लोकांच्या त्रासापासून मुक्त असत असें दिसतें.

पूर्वींप्रमाणें याहि शतकांत मुलकी व लष्करी व्यवस्थेसाठीं देशाचे भुक्ति व विषय ( म्हणजे जिल्हे व तहशिली ) असे भाग पाडिलेले असत असें कित्येक तत्कालीन दानपत्रांवरून दिसून येतें. उदाहरणार्थ महेंद्रपालाच्या ( विक्रमशक ८९१ मधील ) दिघ्वादुबोलीच्या प्रतीहार साम्राज्यांतील दानपत्रांत असा उल्लेख आहे; " श्रावस्तिभुक्तौ श्रावस्ति-मंडलान्तःपाति वालयिकविषयसंबद्ध पाणियक ग्रामः" म्हणजे श्रावस्तिभुक्तिमधील (= जिल्ह्यांतील ) श्रावस्तिमंडलांत असणाऱ्या वालयिकविषयांतील (तहशिलींतील अ. तालुक्यांतील) पाणियक नांवाचा गांव ( इं. आं. XV. पृ. ११३. ). यांत भुक्ति व विषय यांच्यामध्यें मंडल नांवाचा विभाग सांगितला आहे आणि आजच्या भाषेंत त्याचा अर्थ सबडिव्हिजन असा करतां येईल. मंडल हा शब्द दक्षिणेकडे पूर्वींपासून भुक्ति या शब्दाचा समानार्थक प्रचारांत होताच; तो या काळांत उत्तरेकडेहि योजण्यांत येऊं लागला असें दिसतें. मंडलपति किंवा मंडलोई हा शब्द माळवा वगैरे प्रांतांत अद्याप जिवंत राहिला आहे.

निरनिराळ्या राज्यांतील दानपत्रांवरून देशविभागांच्या नांवांत थोडासा फरक असल्याचें दिसून येतें. महाराष्ट्रावर राज्य करणारे राष्ट्रकूट आपल्या दानपत्रांत फक्त 'विषय' या देशविभागाचाच उल्लेख करतात. उदाहरणार्थ शके ६९२ म्हणजे इ. स. ७७० मधील दुसऱ्या गोविंदराजाच्या आलास येथील दानपत्रांत भुक्तीचें नांव

न सांगतां फक्त विषयाचा उल्लेख केला आहे. अधिकाऱ्यांची व त्या गांवच्या उत्पन्नाच्या बाबींची विशेष माहितीहि त्यांत दिलेली नाहीं. कोंकण व कर्नाटक या प्रांतांसंबंधींच्या दानपत्रांतून विषय, भुक्ति किंवा मंडल या शब्दांऐवजीं त्यांतील गांवांच्या संख्येचा आंकडाच घातलेला असतो. उदाहरणार्थ वरेंगल येथील ध्रुवराजाच्या दानपत्रांत बनवासीचा उल्लेख द्वादशसहस्र बनवासी (ए. इं. ६ पृ. १६१) अशा शब्दांत केला आहे. त्याचप्रमाणें गुजराथेंतील दंतिवर्म्याच्या दानपत्रांत लाट देशांतील बेचाळीसींतील गांव; नीलगुंद येथील दानपत्रांत बेलवलत्रिंशती व त्याच्या पोटभागास मुळगुंदद्वादश (ए. इं. ६ पृ. २८७ व १०७) यांचा निर्देश आहे. कर्नाटक, कोंकण व दक्षिण प्रांत यांसंबंधीं ही विशेष गोष्ट दिसते; आणि हीं संख्याविषयक नांवें षट्षष्टि किंवा साष्टी वगैरे रूपानें अद्याप शिल्लक राहिलीं आहेत. राधनपूर येथील तिसऱ्या गोविंदराजाच्या दानपत्रांत (ए. इं. ६ पृ. २४९) फक्त भुक्तीचाच उल्लेख आहे [ रासीयन भुक्त्यंतर्गत रट्टजतनामग्राम ]. या दानपत्राचा संबंध गुजराथेंतील एका गांवाशीं आहे. त्याचप्रमाणें इ. स. ७९४ मधील राष्ट्रकूटांच्या पैठणच्या दानपत्रांत फक्त प्रतिष्ठानभुक्तीचाच उल्लेख आला आहे [ ए. इं. ३, पृ. १०८ ].

राज्यव्यवस्थेचें स्वरूप व कित्येक अधिकाऱ्यांचीं नांवें कांहीं दानपत्रांत आलीं आहेत तीं फार मनोरंजक आहेत. कनोजचीं दानपत्रें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें हर्षकालापासूनचीं आहेत. त्यांतील शब्द मोजके व कामापुरते असून त्यांत अधिकाऱ्यांचा नामनिर्देश मोघम शब्दांत केलेला आहे ( सर्वानेव यथास्थाननियुक्तान् ). पण नारायणपालाच्या भागलपूर येथील दानपत्रांत बाणानें उल्लेखिलेल्या बंगालच्या शब्दावडंबरप्रवृत्तीमुळें आपणास फारच उपयुक्त अशी

माहिती मिळते. गांवांच्या दानाशीं ज्यांचा संबंध पोंचतो त्या अधिकाऱ्यांचें परिगणन येणंप्रमाणें केलें आहे. ( अधिकाऱ्यांच्या हुद्यांचें भाषांतर इ. आं. १९ मध्यें केलेलें नाहीं पण आम्हीं तें करण्याचें धाडस करतों )

१ राजराजानक ( मांडलिक ).
२ राजपुत्र ( राजाचे आप्त क्षत्रिय योद्धे ).
३ राजामात्य ( प्रधान ).
४ महासांधिविग्रहिक ( तह व लढाई खात्याचा प्रधान ).
५ महाक्षपटलिक ( मुख्य मुलकी अधिकारी ).
६ महासामंत ( सरदारांवरील अधिकारी ).
७ महासेनाधिपति ( सेनाधिपति ). उ. सर लष्कर,
८ महाप्रतीहार ( मुख्य द्वाराधिपति अ० ए. डी. कँप ).
९ महाकर्ताकृतिक. ( ? )
१० महादौसाध्य-साधनिक ( किल्ल्याचा घेणारा ).
११ महादंडनायक ( मुख्य न्यायाधीश ).
१२ महाकुमारामात्य ( राजकुमारावरील मुख्याधिकारी ).

हे राज्यांतील मुख्याधिकारी झाले. आतां जिल्ह्यांतील यांचे प्रतिनिधि होते ते असे—

१३ राजस्थानीयोपरिक ( जिल्हाधिकारी ).
१४ दशापराधिक ( १० अपराधांना शिक्षा देणारा मॅजिस्ट्रेट).
१५ चौरोद्धरणिक (चोरांचा माग लावणारा पोलिस अधिकारी).
१६ दांडिक ( कैदखान्यावरचा अधिकारी ).
१७ दंडपाशिक ( शिक्षा अमलांत आणणारा ).
१८ शौल्किक ( जकात खात्याचा अधिकारी ).
१९ गौल्मिक ( पोलिस चौक्यांचा अधिकारी ).

२० क्षेत्रप ( शेती खात्यावरचा अधिकारी ).

२१ प्रांतपाल ( जिल्ह्याच्या हद्दीचा संरक्षक ).

२२ कोट्टपाल ( किल्ल्यांवरील संरक्षक ).

२३ खंडरक्षक. ( ? )

२४ आयुक्तक नियुक्तक ( प्रतिनिधी व कारकून ). यानंतर लष्करी अधिकाऱ्यांचीं नांवें दिलीं आहेत;

२५ हत्ती, घोडे, किल्ले आणि नावा यांवरील अधिकारी.

२६ गाई, बैल, मेंढ्या वगैरे वरचा अधिकारी.

२७ दूतप्रेषणिक ( हेर )

२८ गमागमिक ( ? ).

२९ अभित्वरमान ( ? ).

३० तहसिलीचा मुख्याधिकारी.

३१ ग्रामाधिकारी ( पाटील ).

३२ पोलिस शिपाई ( चाटभट ).

हे लाट, कर्नाट, कुलिक, हूण, खश, मालव व गौड देशांपैकीं आहेत असें वर्णिलें आहे.

अशा रीतीनें सविस्तर माहिती देऊन देखील हा पाल्हाळिक शिलालेखकार " याखेरीज न सांगितलेले इतर अधिकारी " हे शब्द घालतोच. या दानपत्राशीं या सर्व अधिकाऱ्यांचा संबंध कसा पोंचतो याची कल्पना करितां येण्यासारखी आहे; आणि चालू राज्यपद्धतींत ग्याझिटांतील हुकूम जसा सर्व अधिकाऱ्यांना त्याच्याखालीं परिगणित केलेल्यांना कळविण्यांत येतो त्यांतलाच हा प्रकार दिसतो. उदाहरणार्थ या गांवांत पोलीस व शिपाई यांचा प्रवेश होऊं नये अशी अट दानपत्रांत घातली असल्यामुळें हा हुकूम लष्करी अधिकारी, पोलीस, व न्यायखातें यांवरील अधिकाऱ्यांना कळणें

अवश्यक आहे. अधिकाऱ्यांच्या या तपशिलावरून असें दिसून येतें कीं, हिंदुस्थानची मुलकी व लष्करी व्यवस्था त्या वेळीं चांगली पूर्णावस्थेस पोंचली असून त्यांत हल्लींच्या सुधारलेल्या राज्यपद्धतीचीं सर्व खातीं व अंगें समाविष्ट झालेलीं दिसतात. बंगालच्या राज्यास अनुलक्षून अधिकाऱ्यांचीं हीं नांवें दिलीं असलीं तरी तींच नांवें इतर सर्व राज्यांतून थोड्या फार फरकानें चालू होतीं. पहिल्या भागांत आम्हीं वलभी अमलांत गुजराथेंतील अधिकाऱ्यांचीं नांवें दिलींच आहेत; आणि येथें दिलेला तपशील त्याहून फारसा निराळा नाहीं.

निरनिराळ्या राज्यांतील दानपत्रांचे नमुने निरनिराळे असले तरी तेथील राज्यपद्धति निराळी होती, असें समजण्याचें कारण नाहीं. तथापि ठिकठिकाणच्या पद्धतींतील कांहीं भेद नमूद करणें योग्य आहे. राष्ट्रकूटांचीं दानपत्रें राष्ट्रपति, विषयपति, ग्रामकूट, आयुक्तक–नियुक्तक व महत्तर यांना उद्देशून लिहिलेलीं असतात. राष्ट्रपति हा दक्षिणापथांतील विशिष्ट अधिकारी होता. देशविभाग-विषयक राष्ट्रशब्द महाराष्ट्रांतच आढळतो हें आम्हीं अनेकवार सांगितलें आहे. मुसलमानी अमदानींत या विभागावर सुभा व त्याच्या हाताखालीं तहशीलदार असे (ए. इं. ६ पृ. २४९). महत्तर हा गांवचा पाटील असून कोकणांत म्हातरे या शब्दांत तो अद्याप शिल्लक आहे. गुजराथेंतील दंतिवर्म्याच्या दानपत्रांत वर दिलेल्या नांवांखेरीज वासापक हा शब्द अधिक आला आहे, त्याचें कोणीहि भाषांतर केलेलें नाहीं आणि तो शब्द समजण्यास कठिण आहे. इ. स. ९३३ मधील सांगलीच्या दानपत्रांत (इं. ऍं. भा. १२) ‘ राष्ट्रपति विषयपति ग्रामकूट महत्तर आयुक्तनियुक्तकाधिकारान् ’ हे नेहमींचे शब्द आले आहेत; आणि कर्नाटकांतील तो गांव असल्यामुळें सामपुरी सातशेंपैकींचा गांव असें त्याचें वर्णन

केलें आहे. त्याचप्रमाणें इ. स. ९७२ च्या कर्डे येथील दानपत्रांत देखील याच अधिकाऱ्यांचीं नांवें दिलीं असून शतत्रयींतील गांव असें त्याचें वर्णन केलें आहे. ( इ. आं. भा. १२ पृ. २६३ ).

या दानपत्रांतून ग्रामवासि यांचें वर्णन निरनिराळ्या रीतीनें केलें आहे तें पाहणें महत्त्वाचें आहे. बंगाल्यांतील ताम्रपटांतून अर्थातच अतिशय सविस्तर वर्णन दिलेलें आहे. गांवच्या लोकांत प्रमुखपणें ब्राह्मण ( महत्तम ), व्यापारी ( उत्तम ) पुरोध यांपासून तो मेद आणि चांडाळ, झाडू व मांग यांचीं नांवें आहेत ( इं. आं. भा. १५ पृ. ३८९ ). राष्ट्रकूटांच्या दानपत्रांत फक्त " महत्तर वगैरे " एवढेंच म्हटलें आहे. महत्तर हा शब्द कोंकणांत अद्याप अस्तित्वांत आहे पण दक्षिणेंत घाटावरील देशांत तो आढळत नाहीं. परमारांनीं वाक्पति आणि भोज यांच्या वेळीं दिलेल्या माळव्यांतील दानपत्रांत " प्रतिवासिनः पट्टकिलजनपदादींश्च बोधयति " हे शब्द आहेत. त्यांचा अर्थ " रहिवासी, पट्टकिल आणि गांवांतील इतर माणसें " असा आहे. इ. स. १००० च्या सुमाराच्या माळव्यांतील या दानपत्रांत हा जो पट्टकिल शब्द प्रथम आढळतो तो हल्लीं हिंदुस्थानभर पसरला आहे व पंजाबपासून महाराष्ट्रपर्यंत ' पाटील ' या रूपानें गांवच्या मुख्याधिकाऱ्याचा हुद्दा होउन बसला आहे. पण पट्टकिल हा शब्द कोठून आला आणि त्याचा अर्थ काय ? आम्हांस असें वाटतें कीं हर्षाच्या काळीं उपयोगांत असलेला जो अक्षपटलिक (भाग पहिला ) शब्द त्याचें हें संक्षिप्त रूप असावें. पटलिक याचा पट्ट-किल व त्याचा पाटील असा अपभ्रंश झाला असावा. गांवें इनाम देतांना ' सोद्रंग सपरिकर सदशापराध सभूतवातप्रत्यायसोत्पद्य-मानविष्टिक सधान्यहिरण्यादेय अचाटभटप्रवेश सर्वराजकीयानाम हस्तप्रक्षेपणीय ' इत्यादि शब्द मागल्या शतकांतील दानपत्रांप्रमाणें

याहि वेळच्या दानपत्रांतून गांवच्या उत्पन्नाच्या बाबींत इनाम गांवांचे हक्क दाखविण्यासाठीं योजले आहेत. दोन्ही वेळचीं वर्णनें जवळ जवळ समानार्थकच आहेत. उद्रंग म्हणजे जमिनीच्या उत्पन्नावरील षष्ठांशरूपी मुख्य कर; उद्रंग शब्दाऐवजीं कधीं कधीं भोग हा शब्द घातलेला असतो; आणि हिरण्य याचा अर्थ बहुधा व्यापारांतील नफ्याचा $\frac{१}{५०}$ या प्रमाणांत जो पैशाच्या रूपानें कर घेत असत तो असावा. इतर विशेषणें प्रत्येक गांवाचे व गांवाच्या मालकाचे हक्क दर्शवितात; उदाहरणार्थ त्या गांवांत पोलीस किंवा शिपाई यांनीं शिरतां कामा नये इत्यादि. आपल्या हद्दींत गुरें चारण्याचा, आंबे घेण्याचा ( 'साभ्र' बद्दल 'आम्र' समजावें ) व मधूक म्हणजे मोहाच्या झाडांचा उपयोग करण्याचा गांवच्या मालकास हक्क असे. मोहाचीं झाडें बंगाल्यांत बहुधा गुजराथेप्रमाणें उत्पन्नाची बाब असावी. याचा अर्थ असा कीं, जंगल खात्याच्या अधिकाऱ्याला झाडें अगर चराईची जमीन राखून ठेवून त्यांत शिरण्याचा हक्क इनाम गांवात राहात नसे. गांव देतांना त्याबरोबर 'तळ व गर्ताधर' म्हणजे सखल जमिनीहि देण्यांत येत. बंगाल्यांत अशा जमीनी पुष्कळ आहेत व खालसा गांवांतून त्या सरकारच्या मालकीच्या असतात. त्याचप्रमाणें आंब्याचीं व मोहाचीं झाडें कोणीतरी खासगी इसमानें मुद्दाम लावलेलीं व त्याच्या मालकीचीं नसतील तेव्हां बंगाल्यांतील खालसा गांवांत तीं सरकारच्या मालकीची ठरतात; गांवकऱ्यांच्या मालकीचीं असत नाहींत. या खेरीज हेंहि सांगितलें पाहिजे कीं, सरकारास प्रत्येक गांवांतून कांहीं मर्यादेपर्यंत वेठ घेण्याचा अधिकार असे; म्हणजे प्रत्येक मजुराकडून वर्षांतून कांहीं दिवस सक्तीनें काम घेतां येत असे; आणि इनाम गांवांतील हा वेठीचा अधिकार इनामदारास देण्यांत येई; त्यामुळें " सोत्पद्य-

मानविष्टिक " हे शब्द बहुतेक दानपत्रांत आढळतात. माळव्यांतील दानपत्रांतूनहि यासारखेच उल्लेख म्हणजे "स्वसीमातृणकाष्टगोचरपर्यन्तः सवृक्षमालाकुलः सहिरण्यभागभोगः सोपरिकरः सर्वादायसमेतः " या शब्दांत हें वर्णन आलें आहे. गोचर ( किंवा आजच्या भाषेंत बोलावयाचें असल्यास गुरचरण ) याबरोबर काष्ठ म्हणजे जळणाचीं झाडें व इतर किमतीची व बिन किमतीची झाडें दिल्याबद्दल दान-पत्रांत उल्लेख असतो. " देव व ब्राह्मण यांना पूर्वीं दिलेल्या इनामा खेरीज करून " असे शब्द दानपत्रांत बहुधा घातलेले असतात. हा अपवाद आजकालच्या सनदांमधून देखील दिलेला आढळतो. ' भूत-वाटप्रत्यादेय ' हे शब्द दानपत्रांत इनाम दिलेल्या बाबींच्या परि-गणनांत या पूर्वींच्याहि सनदांमधून येतात पण त्यांचा अर्थ निश्चित करणें कठिण आहे.

गांवांतील मुलकी अधिकारी वंशपरंपरागत असत, पण तहशील व भुक्ति म्हणजे जिल्हा ( परमारांच्या राजवटींत माळव्यांतील दान-पत्रांत भुक्तिऐवजीं ' पथक ' शब्द आला असून त्यांत दक्षिणे-कडील, पूर्वेकडील वगैरे पोटभेद दिले आहेत) यांवरील अधिकारी राजे वाटेल तेव्हां नेमीत व काढून टाकीत यांत शंका नाहीं. शिलालेखांत अशा प्रकारच्या नेमणुकांचे उल्लेख आले आहेत. उदाहरणार्थ सिया-डोनी येथील दानलेखावरून (ए. इ. भा. १ ) तो प्रांत इ. स.९१२ मध्यें महाराज दुर्लभ याच्या अमलाखालीं व इ. स. ९६० मध्यें महाराज निष्कलंक याच्या अमलाखालीं होता अशी माहिती आप-णास मिळते. ग्वालेर येथील वल्लभस्वामीच्या शिलालेखांत (ए. इ. भा. १, ९५७ ) लाटमंडळ गुजराथेतील आनंदपूर शहरांतील अल्ल नांवाच्या

*नागर ब्राह्मणास आदिवराहानें म्हणजे कनोजच्या भोजराजानें त्याचे गुण ओळखून ग्वालेर येथील किल्लेदार नेमिलें अशी माहिती आली आहे ( श्रीमदादिवराहेण त्रैलोक्यविजिगीषुणा । तद्गुणान्यः परिज्ञाय कृतो गोपाद्रिपालने ॥ ). याचा बाप भोजाच्या बापाच्या म्हणजे रामभद्राच्या कारकीर्दींत एक अधिकारी होता. यावरून गुजराथ व ग्वालेर या दोहोंवर कनोजच्या राजांचा अंमल होता एवढेंच नव्हे तर गुजराथचा रहिवाशी ग्वालेरांत अधिकारी नेमला जाऊं शकत होता अशीहि माहिती आपणास मिळते. कनोज येथील लोकांना गुजराथेंत अधिकारी नेमल्याचा शिलालेखांतून उल्लेख आहे. त्याचप्रमाणें राष्ट्रकूटांच्या अमदानींत कर्नाटकांत ( उदाहरणार्थ बहोली येथें ) बाहेरचे अधिकारी नेमले जात. या अधिकाऱ्यांना सर्व प्रकारची सत्ता असे. किंबहुना आपल्या जिल्ह्याचे ते लहानसे राजेच असत. त्यांना पंचमहाशब्दांचा म्हणजे शंख, नगारा वगैरे वापरण्याचा अधिकार दिलेला असे ( समधिगतपंचमहाशब्दः ). मोगली व मराठी रियासतींतील सुभेदारांप्रमाणें त्यांना धार्मिक देणग्यांनाहि मंजुरी देण्याचा अधिकार होता असें दिसतें. हे अधिकारी वंशपरंपरागत नसत; पण पुष्कळ वेळा ते सामंत बनून वंशपरंपरागत होत. त्यांच्या पगाराची व्यवस्था काय होती तें शिलालेखांवरून लक्षांत येत नाहीं. एखादा सबंध गांवचा किंवा तहशिलीचा वसूल त्यांस लावून

*पोटजातींचीं नांवें अद्याप अस्तित्वांत आलीं नव्हतीं तरी या ठिकाणीं ' नागर ' हा शब्द जातिवाचक समजतां येईल. या ठिकाणीं नागरभट्ट कुमार हा आणखी एक शब्द असून त्यांत नागर, भट्ट, व कुमार असे पदभेद घ्यावयाचे नाहींत. तेराव्या शतकांत हीं नांवें प्रचारांत आलीं होतीं हें निश्चित आहे; कारण चितोडमधील शिलालेखांत नागर ज्ञाति असा स्पष्ट उल्लेख आहे.

देण्याचा मनूच्या काळांतील नियम कदाचित् चालू असेल. पण ते श्रीमान असत हें निःसंशय. कारण ग्वाल्हेर येथें बायकोच्या नांवानें देवालय बांधून त्यास नेमणूक करून देण्याची ऐपत अल्ल या अधिकाऱ्यास होती, असें शिलालेखावरून म्हणतां येतें. जिल्हाधिकाऱ्यास पुष्कळ अधिकार असत; परंतु लष्कर त्याच्या ताब्यांत नसून त्यावर दुसरा स्वतंत्र अधिकारी असे. उदाहरणार्थ ग्वालेर येथील शिलालेखांत ( ए. इ. भा. १, १५९ ) अल्लाची नेमणूक किल्लेदाराच्या हुद्यावर केलेली होती; पण त्याशिवाय लष्करी अधिकाऱ्याचें निराळें नांव दिलें आहे. या खासगी शिलालेखांतील एतद्विषयक उल्लेख येथें उतरून घेण्याजोगा आहे. "परमेश्वरश्रीभोजदेवे तदधिकृत— कोट्टपाल अल्ले बलाधिकृततत्तके ( तत्तक हा लष्करी अधिकारी ) स्थानाधिकृत श्रेष्ठिवाकियके" (वाकियक नांवाचा व्यापारी त्या ठिकाणीं शहरचा अधिकारी होता ) वगैरे.

या शेवटल्या वाक्यावरून शहरांतील स्थानिक वजनदार लोकांना गांवचे म्युनिसिपल अधिकारी नेमीत अशी माहिती मिळते. बहुधा हें स्थानिक अधिकारीमंडळ असून त्याजकडे गांवची व्यवस्था असावी; त्यांना महाजन अशी संज्ञा असून ते ग्वालेर येथील वाणियकाप्रमाणें आपल्या मुख्याधिकाऱ्याची नेमणूक करीत महाजनांच्या ताब्यांत शहराचे बाजार असत ही गोष्ट नवीन हाट उघडून त्यावर नवीन महाजन नेमण्याविषयीचे उल्लेख शिलालेखांत आहेत, त्यावरून दिसते.

या शहरांतील म्युनिसिपालिट्या व बाजार पुष्कळ वेळां विशिष्ट कर बसवून येणारें उत्पन्न देवस्थानास धर्मार्थ देणगी म्हणून देत असत. अशा आपखुषींच्या करांचे उल्लेख अनेक शिलालेखांतून आले आहेत. अशा प्रकारचा अत्यंत महत्त्वाचा लेख म्हटला

म्हणजे ग्वालेरच्या हद्दींत ललितपूरनजीक सांपडलेला सियाडोनीं शिलालेख हा आहे. हा शिलालेख स्वतंत्रपणें अभ्यासाचा विषय होण्याच्या योग्यतेचा आहे. (ए. इ. भा. १, १७४). त्यांत एक व्यापारी व इतर गृहस्थ यांनीं बांधलेल्या एका विष्णूच्या देवळास कित्येक वर्षेंपर्यंत अनेक बाबी लावून दिल्याचें नमूद केलें आहे. असें करण्यांत अक्षयनीमिका म्हणजे कायमचें उत्पन्न देवस्थानाच्या खर्चास मिळावें हा हेतु असे. अशा रीतीनें अनेक वीथिका देवस्थानास अर्पण केलेल्या होत्या. वीथिकेचा अर्थ काय तें नीटपणीं समजत नाहीं; परंतु बाजारांतील एक दुकानाची किंवा बैठकीची जागा असा तिचा अर्थ असून ती जागा भाड्यानें देऊन तें भाड्याचें उत्पन्न देवस्थानास लावून देत. अशा रीतीनें घरेंहि देवस्थानास लावून देत; पण त्यांत विशेष चमत्कार वाटण्याजोगें कांहीं नाहीं. तथापि दोन ठिकाणीं कलालांनीं दारूच्या दर मापास $\frac{1}{2}$ द्रम्म किंवा रुपया कर आपणावर बसवून घेतला होता ही गोष्ट मात्र चमत्कारिक आहे खरी. या संबंधींचे शब्द असे आहेत; "समस्तकल्लपालानां मध्ये यस्य यस्य सत्क मद्य भांडं निष्पद्यते विक्रयं याति स चाचंद्रार्कं यावद् विग्रहपाल सत्क द्रम्मार्धिका ताली दातव्या।" मानवी इच्छेच्या व्यर्थपणावर केवढी ही टीका! सूर्य व चंद्र आहेत तोंपर्यंत कलालांच्या दुकानांतून विकल्या जाणाऱ्या प्रत्येक दारूच्या भांड्यावर $\frac{1}{2}$ द्रम्मप्रमाणें येणारें उत्पन्न देवस्थानास मिळण्याची व्यवस्था करण्यांत येते!! या शिलालेखावर कोरल्याप्रमाणें कदाचित् कांहीं वर्षेंपर्यंत व्यवस्था चाललीहि असेल; आणि नंतर हा दगड कित्येक शतकें कोणासहि माहीत नाहीं अशा स्थितींत पडून राहिल्यानंतर तो कोणी एका चौकस युरोपियन शोधकाकडून उजेडांत आणला जातो!!! आतां तें देवालयहि

नाहीं आणि तो करहि नाहीं. पण कल्लपाल या संस्कृत शब्दापासून कलाल हा शब्द व्युत्पादितां येतो आणि दहाव्या शतकांत हिंदुस्थानांत दारू करीत असत व त्यावर विष्णूच्या देवळाप्रीत्यर्थ आपखुषीनें कर बसविण्यांत येई या गोष्टींचा शोध लागला ही मात्र चमत्कारिक गोष्ट खरी. अशा प्रकारच्या कराच्या उल्लेखावरून —चुकीचा अर्थ केला गेल्यामुळें—विष्णूच्या देवळांत करादाखल दारू देण्यांत येत असे असें विधान करण्यांत आलें आहे, पण तें साफ चुकीचें आहे. दारूविक्रीच्या उत्पन्नावर कर लादण्यास अर्थातच त्या वेळीं कोणी हरकत घेतली नसती. हल्लींहि दारूचें उत्पन्न शिक्षणखात्याकडे देण्यांत येतें !! आणि असा कर प्रत्यक्ष वसूलहि करण्यांत येई. कुंभारांना देखिल कर द्यावा लागे. कनोज येथें बांधलेल्या तीन देवालयांच्या खर्चासाठीं व पंजाबांतील सरस्वतीच्या तीरावर बांधलेल्या चौथ्या एका पेहेवा अगर पृथूदक येथील देवालयाच्या खर्चासाठीं घोडेविक्यांनीं विक्रीच्या रकमेवर कांहीं कर द्यावयाचा असे व त्याचे एका ठरीव प्रमाणांत भाग पाडण्यांत येत असत असें पेहेवा येथील शिलालेखांत म्हटलें आहे.

देवस्थानांची मुख्य गरज म्हटली म्हणजे तेल व फुलें. जेव्हां केरोसीन किंवा विजेचे दिवे माहीत नव्हते तेव्हां तेल्याला फार महत्त्व असे. हिंदुस्थानांत प्रत्येक खेड्यांत व शहरांत तेल्याची गणना प्रतिष्ठित माणसांत होई व ते ठेव ठेऊन घेऊन रोज कांहीं पळ्या तेल दर घाण्यामागें देण्याचें कबूल करीत. देवस्थानांतील तेलाच्या दैनिक पुरवठ्याचा उल्लेख शिलालेखांत पुष्कळ ठिकाणीं आहे. वर सांगितलेल्या सियाडोनी शिलालेखाशिवाय यासंबंधीं बिल्हैरी चेदी येथील शिलालेख (ए. इं. भा. १, २६३) पाहण्यासारखा आहे. यांतील ओळींचा अर्थ चांगलासा लागत नाहीं. “ पत्तनमण्डपिकायां

लवणस्य खंडिकायां षोडशिकघाणके च षोडशिका। तैलस्य मासि मासि दिनमनु च युगे युगे च चौर" येथें सांगितलेली मंडपिका इतर शिलालेखांतहि आहे व या शब्दाचा अर्थ शहरांतील जकातीचें नाकें असा दिसतो. त्याचप्रमाणें मठि बाजारांत व घाण्यावर षोडशिका नांवाचा कर घेण्यांत येई. तेली अर्थात हा कर आपखुषीनें देत असत; परंतु सर्व तेली जातीस बंधन घालणारी अशी एखादी संस्था अस्तित्वांत होती; किंबहुना प्रत्येक धंदेवाल्याचें एक मंडळ Bureau असे व या मंडळाविरुद्ध वागणारास शिक्षा होई.

माळी हा देखील खेड्यांतील व शहरांतील एक महत्त्वाचा इसम असे; व तो देवालयांना फुलें पुरवीत असे. देवस्थानांतून फुलांच्या पुरवठ्यासाठीं भाविक दात्यांनीं दिलेल्या इनाम जमिनींहि असत. (सियाडोनी शिलालेख पहा). देवस्थानांस व ब्राह्मणांस मिळणाऱ्या या धर्मादायांचा विस्तार व्यापाऱ्याखेरीज समाजाच्या इतर भागापर्यंत म्हणजे अत्यंत महत्त्वाचा जो शेतकरी वर्ग त्याच्यापर्यंत पोंचत असे. आतांपर्यंत सांपडलेल्या शिलालेखांत यासंबंधींचा उल्लेख आढळत नाहीं; पण कलियुगाला लागू असलेल्या पाराशर स्मृतींत एक श्लोक आहे तो असा:— "राज्ञे दत्वा तु षड्भागं देवानां चैकविंशकम्। विप्राणां त्रिंशकं भागं सर्वपापैः प्रमुच्यते॥" "राजाला सहावा हिस्सा, व देवाला एकविसावा हिस्सा देऊन ब्राह्मणाला उत्पन्नाचा तिसावा अंश देणारा शेतकरी सर्व पापांतून मुक्त होतो." उत्पन्नाचा त्रिंशांश ब्राह्मणाला देण्याविषयीं या स्मृतींतील नियमाचा अंमल सिंधप्रांतांत चालू असलेल्या वहिवाटीवरून ओळखतां येतो. दाहिराच्या वेळीं ब्राह्मणांना तीन शतांश उत्पन्न मिळे, आणि मुसलमानी अमदानींत देखील महंमद कासिमानें हें उत्पन्न चालविलें. पाराशरस्मृतींतील वर दिलेला श्लोक

लक्षांत येईपर्यंत सिंधप्रांतांत या आपखुषीनें बसवून घेतलेल्या कराची व्युत्पत्ति आम्हास लागली नव्हती आणि हा कर त्या काळीं आपखुषीनें सर्वसंमत झाला होता हें दाखविण्यासाठीं येथें आम्हीं वाचकांचें लक्ष मुद्दाम या गोष्टीकडे वळविलें आहे.

वसूली खात्याच्या, बारकाईच्या व दूरदर्शीपणाच्या व्यवस्थेचा पुरावा कनोजच्या भोज प्रतिहार महाराजाच्या दौलतपूरच्या दान-पत्रांत सांपडतो. या दानपत्रांत असें म्हटलें आहे कीं, " भोजाचा आजा वत्सराज यानें प्रस्तुत दान घेणाऱ्याच्या आजाला म्हणजे वासुदेव भट्टास अग्रहार दिला असून त्याचा तो उपभोग घेत होता; व त्याचा षष्ठांश वासुदेवभट्टानें दानपत्र करून देऊन भट्ट विष्णूस दिला होता व त्यास महाराज नागभट्टानें मंजूरी दिली होती. मूळचें दानपत्र व सरकारची मंजूरी देणारें पत्र हरवल्यामुळें पूर्वीच्या पत्राविषयीं, मंजूरीविषयीं व भोगवट्याविषयीं खात्री करून घेऊन, हा नवा हुकूम देण्यांत आला आहे." यांतील मजकुरावरून असें म्हणतां येतें कीं, लोक दान विकत असत व त्यांना सरकारमार्फत मंजूरी देण्यांत येई व या गोष्टीची केव्हांहि सरकारी दप्तरांत सत्या-सत्यता ताडून पाहतां येत असे व कायदेशीर व्यवहारांत हे दाखले व भोगवटा पहात असत. यावरून असें म्हणतां येतें की, वसुली खात्याचें दप्तर व्यवस्थितपणें ठेवण्यांत येत असे व कायदा व वसूली खातें यांच्या व्यवस्थेचीं सामान्य सुधारलेलीं तत्त्वें कनो-जच्या साम्राज्यांतील कारभारांत बारकाईनें पाळण्यांत येत.

हे दाखले कागदावर लिहून ठेवीत किंवा दुसऱ्या एखाद्या पदा-र्थाचा या कामीं उपयोग करीत हें पाहणें मनोरंजक आहे. या लेखाच्या उल्लेखांत पत्र हा शब्द वारंवार येतो यावरून कसलें तरी पान योजीत असले पाहिजेत. उत्तरेकडे बहुधा भूर्जपत्र व

दक्षिणेकडे ताडपत्र वापरीत असावे. सनदा बहुशः अशा पत्रांवरच लिहून देत आणि टिकाऊपणाच्या दृष्टीनें ताम्रपत्रावर त्याच्या नकला देत. शके ९३० (इ. स. १००८) मधील शिलाहारांच्या एका दानपत्रांत पुढें दिलेला श्लोक आला आहे, त्यावरून वसुली खात्याची व्यवस्था किती बारकाईची असे तें दिसून येईल. "मुद्राशुद्धं क्रियाशुद्धं भुक्तिशुद्धं सचिन्हकम् । राजस्वहस्तशुद्धं च शुद्धिमायाति शासनम् ॥" "सरकारी आज्ञापत्रावर योग्य मुद्रा (मोहर) झालेली असून, त्याप्रमाणें चिन्ह होऊन ताबा मिळाला असेल व राजाच्या हातची स्वहस्त म्हणजे हातानें केलेली सही झाली असेल तर तें आज्ञापत्र शुद्ध समजावें." शेवटच्या अटीवरून हें आज्ञापत्र कसल्या तरी कागदावर किंवा पत्रावर लिहिलें जाणें अवश्य आहे. या काळचीं (गुप्तराजांच्या अमदानींतील नव्हे) ताम्रपत्रें वरील नियमानुसारच शुद्ध ठरतात व दान देणाऱ्या राजांचें चिन्ह व ताम्रपत्राच्या कडीवर मुद्रा व खुद्दची सही नेहमीं आढळून येते. गांवाचा ताबा तेथील सरकारी अधिकारी देत असे. (चिन्ह याचा अर्थ बरोबर समजत नाहीं.)

पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें जमिनीची मोजणी नेहमीं करीत व जमीन मोजण्याचे सरकारी माप असे. निवर्तन हें या जुन्या मापाचें (काठ्यांनीं--दण्डांनीं मोजलेल्याचें) नांव होतें. (बिघा हा शब्द मुसलमानी व एकर इंग्रजी आहे). पण लहान सहान जमिनीचे तुकडे हातांनीं मोजीत. ग्वालेरच्या दुसऱ्या शिलालेखांत (ए.इं.भा.१, पृ. १५९) अशा मापांचा उल्लेख आहे. त्यांत 'परमेश्वरीय हस्त' म्हणजे सरकारी हात सांगितला आहे (लांबी २७० रूंदी १८७). पुढें मोजमाप न सांगतां दोन जमिनींच्या तुकड्यांचा उल्लेख केला आहे पण तथें ११ द्रोण बीं पेऱ्यास लागेल एवढी जमीन असें

म्हटलें आहे. ब्रिटिश अमलाच्या सुरुवातीपर्यंत कोकणांत अशा रीतीनें जमिनीचें माप सांगण्याची वहिवाट चालू होती. शेतांचीं बहुधा विशिष्ट नांवें असत. आणि तीं दानपत्रांत चतुःसीमांसह ( आघाट हा सीमा या अर्थीं शब्द येतो ) सांगितलेलीं असतात. गांवांच्या देखील चतुःसीमा दिलेल्या असतात. गांवांच्या चतुःसीमा निश्चितपणें ठरलेल्या असत व दिवाणी कज्यांत सीमांचे वाद विशेष महत्त्वाचे असत.

मुख्य वसूल धान्याच्या रूपानें येई व अशा रीतीनें जमलेलें धान्य प्रत्येक शहरांत सरकारी कोठारांत सांठवून ठेवीत. मुलकी नोकरांचा व शिपायांचा पगार बहुधा धान्याच्या रूपानें व अंशतः पैशाच्या रूपानें देण्यांत येई. व्यापारावरील करानें पैसा जमा होई; पण आपणांस हें एकदम ध्यानांत येण्याजोगें आहे कीं, वर सांगितलेल्या परिस्थितींत खजिन्यांत रोकडीचें प्रमाण बेताचेंच असून व्यापार देखील देवघेवीच्या स्वरूपांत चालत असावेत व धान्य हें विनिमयसामान्य योजण्यांत येत असलें पाहिजे. पहिल्या भागांत काश्मीर येथील यासंबंधींची माहिती ( पृ. २३८ ) आम्हीं दिलीच आहे आणि ब्रिटिश राज्य सुरू होईपर्यंत हिंदुस्थानांतील प्रत्येक भागांत हीच स्थिति चालू होती.

नाण्याची फारशी गरज पडत नसल्यामुळें हिंदुस्थानांत साहजिकपणेंच फार थोड्या टांकसाळी चालू होत्या व त्यांत नाणेंहि बेताचेंच पाडीत. शिलालेखांत याविषयींची फारशी माहिती सांपडत नाहीं. पण जी थोडीबहुत सांपडते ती येथें आम्हीं सांगतों. सियाडोनीं लेखात (ए. इं. भा. १,) पुष्कळ नाण्याचीं नांवें आलीं आहेत. तीं येथें सांगणें इष्ट आहे. त्यांत द्रम्म हें मुख्य नाणें आलें आहे व हा शब्द निःसंशय परदेशी आहे. द्रम्माचे दोन प्रकार सांगितले

आहेत. श्रीमदादिवराह द्रम्म व विग्रहपालीय द्रम्म. आदिवराह हा अर्थातच कनोजचा प्रख्यात प्रतिहार भोजराजा. त्यानें पाडलेलें नाणें पुढें मुलाच्या व नातवाच्या कारकीर्दींत चालू होतें. प्रत्येक राजा राज्याभिषेक होतांच आपल्या नांवाचीं नाणीं पाडीत असे असें हर्षचरितांतील बाणाच्या उल्लेखावरून दिसतें. त्याचप्रमाणें काश्मीरांत अशी चाल होती. किंवा निदान राज्याभिषेक होतांच मुहूर्तादाखल कांहीं नाणीं पाडीत असतील; पण लोकांच्या हातीं खेळण्याइतकी त्याची संख्या नसे. आदिवराह द्रम्म पाडण्यांत आल्यानंतर शंभर वर्षें तें नाणें प्रचारांत होतें. वरील सियाडोनी लेखांत ज्या विग्रह-पालाच्या नांवाचा द्रम्म अनेक वेळां उल्लेखिलेला आहे तो विग्रहपाल-राजा कोण हें निश्चित करणें कठीण आहे. परकी नाण्यास राज्यांत प्रति-बंध नसे असें दिसतें. हिंदुस्थानांतल्या किंवा बाहेरील परकी राज्यांतील नाणीं इकडच्या राज्यांत चालत असत. विग्रहपालीय द्रम्म सिया-डोणीच्या आसपास पुष्कळ प्रचारांत होते. पेशव्यांच्या वेळीं देखील निरनिराळ्या प्रकारचे रुपये महाराष्ट्रांत चालू होते व स्वतः पेशव्यांचे व मराठ्यांचे असे निराळे रुपयेच नव्हते. चांदवड व हल्लीं शिक्याचे रुपये पुष्कळ असत; परंतु इतर रुपयेहि त्याबरोबरच चालू होते.

येथें आपण थोडेंसें विषयांतर करूं. नाणें पाडण्याची कला परकीय असावी असें दिसतें. अर्थातच ती हिंदुस्थानांतील लोकांनीं फार पूर्वीं म्हणजे अलेक्झांडराच्या किंवा त्याच्याहि पूर्वींच्या काळीं ग्रीकांपासून उचलली असावी. चंद्रगुप्ताच्या काळांतील कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत टाकसाळीविषयीं मुद्दाम निराळे नियम दिले आहेत. निष्क हें जुनें संस्कृत नाण्याचें नांव लोक ग्रीकांच्या व शकांच्या अमदानींत विसरून गेले व दीनार हा शब्द नवा रूढ झाला. हा शब्द खात्रीनें परकीय आहे. पुढें हिंदु काळांत द्रंम शब्द

प्रचारांत होता तोहि परकीय आहे. याहि शतकांत रुपया शब्दाचा मागमूस सांपडत नाहीं. पण रुपया हा शब्द देखील परकीय आहे. तेव्हां यावरून आपणास असें अनुमान करतां येईल कीं, नाणें पाडण्याची कला परकीय देशांतून आलेली आहे. या कलेचा रसायनशास्त्राशीं संबंध पोंचतो व हिंदुस्थानांत सृष्टपदार्थविषयक शास्त्रांचा अभ्यास फारसा होत नव्हता. नाण्याचे लेख, मुखवटा व कडेची कांतणी करणें कठीण आहे; व पेशव्यांच्या हल्लीं शिक्याच्या रुपयांत मुसलमानी नाण्यांत आपल्या संस्थानाचें निदर्शक असें एक अक्षर घालण्याच्या साध्या फरकानें समाधान मानण्यांत आलें होतें.

याखेरीज ज्या चिल्हर नाण्यांचा उल्लेख आला आहे तीं अर्ध-द्रम्म व विंशोपका (म्हणजे द्रम्माचा विसावा हिस्सा) आणि कपर्दिका, काकिनी व वराटका हीं होत. या शेवटल्या तीन नाण्यांचें द्रम्माशीं काय प्रमाण होतें तें समजत नाहीं. रुपयांत सोळा भाग पाडण्याची रीति त्या काळीं अस्तित्वांत नव्हती; आणि द्रम्माचे वीस भाग पाडीत असत. मुसलमानी अमदानींत देखील हा विस्वांश रूढ होता. कपर्दिका हें सर्वांत कमी किंमतीचें नाणें असावें असें दिसतें.

---

## (ब) लष्कर--व्यवस्था.

आतां लष्कराची व्यवस्था कशा प्रकारें राखण्यांत येई याचा विचार करूं. लष्कराची उभारणी 'सरदार व इतर श्रीमान् अगर सत्ताधारी लोकांच्या तैनातींतील अगर अमलाखालील लोकांतून होत असे. बल्हाराच्या राज्याखेरीज खडें लष्कर ठेवण्याचा व

त्यांना दरमहा वेतन देण्याचा प्रघात इतर राज्यांतून नव्हता असें आरबी प्रवाशांच्या वर्णनावरून दिसतें. ह्यापुढील काळांत बल्हाराच्या राज्यांत खडें लष्कर कधींच ठेवलें गेलें नाहीं असें इतिहासावरून दिसतें; अलबत्ता शिवाजीनें खडें लष्कर ठेवण्याची योजना पुनः अमलांत आणिली; पण ती अखेरपर्यंत टिकूं शकली नाहीं. बल्हारांखेरीज बंगालच्या पालराजांचें किंवा कनोजच्या प्रतिहारी राजांचेंहि खडें लष्कर असावें असा आमचा तर्क आहे.

या सैन्यांत पायदळ, घोडेस्वार व हत्ती अशीं तीन प्रमुख अंगें होतीं. प्राचीनकाळापासून सुप्रसिद्ध असलेल्या चतुरंगदलापैकीं चतुर्थ अंग जे रथ त्याचा ह्यापूर्वींच लोप झालेला दिसतो. पण त्याची उणीव निदान बंगाल प्रांतांत तरी आरमारानें भरून काढली होती असें भागलपूर येथील लेखांवरून दिसतें. बंगाल प्रांतांत बऱ्याच नद्या असल्यामुळें व त्यायोगें व्यापारी वाहतुक सुलभ रीतीनें होत असल्यामुळें बंगाल्यांत जहाजें व आरमार असणें शक्य दिसतें. निदान चांचे लोकांपासून व्यापाराचें संरक्षण करण्याकरतां तरी सरकारी आरमार ठेवणें जरूर होतें.

त्या वेळच्या तीन्ही राज्यांत सैन्याच्या या तीन अंगांपैकीं एकेका अंगाची विशेष वाढ झाली होती. कनोजच्या सैन्यांतील घोडदळाची ख्याति होती, तर बंगालचें सैन्य गजदळाबद्दल प्रसिद्ध होतें. महाराष्ट्रीय सैन्यांत पायदळाचाच विशेष भरणा असे. याचें कारण एका आरबी प्रवाशानें असें सांगितलें आहे कीं, महाराष्ट्र-प्रांत डोंगराळ असल्यामुळें त्या प्रांतांत पायदळ असणें अत्यवश्यक होतें. पण हल्लींच्या प्रमाणें त्या काळांत पायदळाचें महत्त्व नसल्यामुळें राष्ट्रकूटांची भिस्त पायदळावरच मुख्यत्वेंकरून असेल

असें वाटत नाहीं. राष्ट्रकूटांच्या सैन्यांत गजदळ व अश्वदळही बरेंच असावें.

दुसरें असें कीं, दक्षिणेंतील मलबार प्रांताच्या जंगलांत, कारवार प्रांतांत व अपरांतांत म्हणजे ठाणें जिल्ह्यांत हत्तींची पैदास होत असल्यामुळें राष्ट्रकूटांना गजदळ ठेवणें फारसें कठिण नव्हतें. अपरान्त प्रांतांत उत्तम हत्तींची निपज होतें असें महाभारतांत देखील आढळतें. बंगालच्या राज्यास विंध्यपर्वताच्या व महेंद्रपर्वताच्या भोंवतालच्या प्रदेशांतून पुष्कळच हत्ती सांपडत. पण बंगाल प्रांतांत अश्वदळाची उणीव कायमचीच वाटे. कारण या प्रांतांत घोडे क्वचितच उपलब्ध होत. भागलपूर येथील लेखांत तर असें वर्णिलें आहे कीं, उत्तरेकडील राजांकडून नजर आलेल्या अश्वांच्या योगें बंगालच्या राजांच्या सैन्यांत अश्वदळाची उभारणी होत असे. दक्षिणेंत तसेंच मारवाड प्रांतांत अश्वदळास योग्य अशा घोड्यांचा भरपूर पुरवठा होत असे. पंजाब व अफगाणिस्थान येथील घोड्यांची तर ख्यातिच आहे. ह्यामुळेंच राष्ट्रकूट व प्रतीहारी यांस अश्वदळ सतत तयार राखणें शक्य होतें. परदेशीय पदार्थांविषयीं लोकांच्या मनांत नेहमींच कौतुक असल्यामुळें आरबी व इराणी घोड्यांची फारच तारीफ होत असे, व आरबी घोड्यांत तसेच विशेष गुणहि आहेत हें कबूल करावयास हवें. अरबस्थानांतून येणारे घोडे बहुधा समुद्रमार्गानेंच येत असावेत. या घोड्यांचा हिंदुस्थानांत फारच मोठा व्यापार चाले व आरबी व्यापाऱ्यांस ह्यामुळेंच बहुतेक राजदरबारीं बरेंच महत्त्व प्राप्त झालें होतें.

सैन्यांत स्वकीयांचाच मुख्यत्वें करून भरणा असला म्हणजे परचक्राची फारशी भीति रहात नाहीं; कारण स्वकीय सैनिक फितूर होण्याचा किंवा अंगचुकारपणा करण्याचा संभव फारच कमी. शिवाय

त्यांच्यांत स्वामिनिष्ठा किंवा स्वदेशप्रीति जास्त दिसून येते. भाडोत्री सैन्यांत परकीयांचा भरणा व्हावयाचा विशेष संभव, व भाडोत्री लोक केव्हां विश्वासघात करतील याचा नेम नाहीं. याविषयींचें विवेचन मागल्या भागांत आलेंच आहे. प्रतीहारी व राष्ट्रकूट राजांच्या सैन्यांत स्वकीयांचाच भरणा प्रामुख्यानें असावा. रजपूत व मराठे यांची लष्करी बाण्याबद्दल पूर्वींपासून ख्याति आहेच व ह्या काळांत त्यांना लष्करी बाण्यानें वागण्याचे नेहमींच प्रसंग येत. बंगालच्या राज्यांत मात्र याच्या उलट स्थिति होती. भागलपूर येथील शिलालेखावरून तर असें दिसतें कीं, बंगालच्या सैन्यांत खस, मालव, हूण, कुलंक, कर्नाट, लाट इत्यादि निरनिराळ्या जातींच्या सैनिकांचा भरणा होता.

या यादींत रजपूत व मराठेवीर यांचा नामनिर्देश नाहीं हें योग्यच आहे; कारण ह्या वीरांना आपल्या देशांत पुष्कळ कामगिरी होती. या यादींत वर्णिलेल्या सर्वच देशांतील सैनिकांची वीरश्रीबद्दल ख्याति होती असें नाहीं. उदाहरणार्थ माळवा व लाट ऊर्फ दक्षिण गुजराथेतील लोक लढवय्ये या नात्यानें कधींच प्रसिद्धीस आलेले दिसत नाहींत. कदाचित् लेख लिहिणारांनीं ह्या यादींत वरील लोकांचा समावेश गौरवानें केला असेल, कदाचित् ह्या काळीं ह्या लोकांची वीर-श्रीबद्दल ख्याति असावी व पुढें मुसलमानी अमदानींत तिचा लोप झाला असावा. परकीय लोकांच्या दडपणामुळें लोकांचा मूळ स्वभाव कधीं कधीं बदलतो असें निरनिराळ्या राष्ट्रांच्या इतिहासावरून दिसतें. या लेखावरून बंगालच्या लोकांत लढाऊ बाणा जागृत असल्याचें दिसत नाही. पण हल्लींच्या घडामोडीच्या काळांत बंगाली लोकांनीं आपणांत गुप्तपणें वास करीत असलेल्या वीरश्रीची साक्ष सर्वांस पटवून दिली आहे.

सैन्याच्या निरनिराळ्या अंगांची सुव्यवथा रहावी म्हणून प्रत्येक

अंगावर एक मुख्य सेनापति असे व त्याच्या हाताखालीं इतर अनेक अधिकारी असत. ह्या मुख्य सेनापतींवर एक महासेनापति असे; व त्याच्याच सल्ल्यानें राजा युद्धविषयक धोरण ठरवीत असे. " दौः साध्यसाधनिक " नांवाचा आणखी एक अधिकारी असे, त्याच्याकडे कोणतें काम सोंपविण्यांत येत असे हें समजत नाहीं; तरी पण साधारण मानानें असें दिसतें कीं, त्याच्याकडे शत्रूची तटबंदी सुरुंग वगैरे लावून उडविण्याची तसेंच शत्रु सुरक्षितपणें किल्ल्यांत वगैरे असतां अन्य मार्गांनीं त्याच्या सैन्यांत भीति उत्पन्न करण्याचें काम असावें. असो, सैनिकांना सरकारी खजिन्यांतून दरमहा वेतन मिळत असे व कोठारांतून ( धान्य ) मिळण्याची व्यवस्था केलेली असे. सेनाध्यक्ष व सैन्यांतले इतर अधिकारी यांस सालीना नगदी उत्पन्न देण्यांत येत असेल किंवा इनामाचे हिस्से तोडून देण्यांत येत असतील. पण ह्याविषयीं तत्कालीन लेखी पुराव्याच्या अभावीं निश्चित असें कांहींच लिहितां येत नाहीं. मनुस्मृतींत वेतन व मुशाहिरा देण्याची जी पद्धति वर्णिली आहे तीच ह्याहि कालांत चालू असेल असें आम्हांस वाटतें.

लष्करची व्यवस्था उत्तम राहण्याकरितां सैन्यास सामान पुरविण्याची, सैन्यांच्या हालचालीच्या प्रसंगीं धान्य व पाणी, जनावरांस गवत वगैरे पुरविण्याची, तसेंच जासूद पाठविण्याची; शत्रूच्या सैन्यांतील गुप्त बातमी मिळविण्याची इत्यादि व्यवस्था रहाण्याकरितां हि निरनिराळे अधिकारी असत. भागलपूर येथील लेखांत वर्णिलेल्या अधिकाऱ्यांत अशाही एका अधिकाऱ्याचें वर्णन असून महासाधनिक नामक काश्मीरच्या इतिहासांत अधिकारी आढळतो. त्याच्याकडे उत्तम घोड्यांची निपज व निवड हीं मुख्य कामें असत. ह्याच इतिहासांत हेरांवरील अधिकाऱ्याचें नांव "दूतप्रेषणिक" असें

दिलें आहे. भागलपूर येथील लेखांत आणखी दोन सेनाधिकाऱ्यांचीं नांवें दिलेलीं आहेत तीं अशीं; गमागमिक व अभिप्रतप पण यांच्याकडे कोणती कामगिरी होती हें सांगतां येत नाहीं.

हल्लींच्या रिवाजाप्रमाणें राजा सैन्याच्या मागल्या बाजूस न राहतां स्वत: होऊन सैन्याच्या आघाडीस असे व आपल्या शौर्याचें व धिटाईचें उदाहरण आपल्या सैन्यास घालून देत असे; राजानें युद्धांत अग्रभाग घेणें हें त्याचें मुख्य कर्तव्य होय अशीच इकडील समजूत आहे व अखेरचा बाजीराव वगळतां सर्व पेशवे युद्धांत कसा पुढाकार घेत हें महशूरच आहे. सध्याच्या काळांत सैन्यास यांत्रिक स्वरूप आलें असल्याकारणानें मुख्य सेनापतीस सूत्रधाराप्रमाणें मागेंच रहावें लागतें.त्या वेळीं युद्धें कशा प्रकारचीं असत ह्याची आज कल्पना होत नाहीं. तोफखाना, विमानें, पाणबुड्या इत्यादींनीं आज युद्धाचें स्वरूप पार बदलून टाकिलें आहे. तोफखान्याच्या अभावीं मुख्य भर तिरंदाजीवरच पूर्वीं असावा असें आम्हांस वाटतें. राजा हत्तिणीवर बसून बाणानें युद्ध करी; निरनिराळ्या लेखांतून राजाच्या पराक्रमाचीं व चलाखीचीं काव्यात्मक वर्णनें आढळतात. "इंद्र ज्याप्रमाणें कृष्णवर्ण मेघांतून पावसाची झोड उठवतो त्याप्रमाणें भूतलावरील राजेंद्र मेघासमान हत्तींच्या गंडस्थलांतून मोत्यांचा जणूं पाऊसच पाडतो" अशा अर्थाचीं वर्णनें बरींच आढळतात. असो, आज तोफखान्याचें जें महत्त्व युरोपांत आहे तेंच पूर्वीं हस्तिसैन्याला ह्या देशांत होतें. गजदळाच्या योगें व गजदळाबरोबर झुंज करण्याची कला या देशांत तेव्हां पूर्णत्वास गेली होती यांत शंका नाहीं. पण ह्या कालाच्या पूर्वींच बंदुकीची युक्ती निघाली होती, तिचें अवलंबन हिंदुस्थानांत कां झालें नाहीं याचें सखेदाश्चर्य वाटतें. पण ह्या संबंधींचा विचार पुढल्या पुस्तकांत होणारच आहे.

इकडच्या युद्धांतून एक मोठा चमत्कार दिसून येई तो असा कीं, राजा किंवा मुख्य सेनापति घायाळ झाला किंवा मारला गेला कीं, सैन्यांतला सर्व उत्साह जाई व तें सैरावैरा मागें परतूं लागे, मग त्याची शत्रुसैन्यानें दाणादाण उडविल्यास नवल तें काय? पण ह्यामुळें सैन्यांत पद्धतशीर कामें वांटलीं जात नसत किंवा राजा-शिवाय इतर जबाबदार लोक नसत असें मात्र नाहीं. सैन्य लढे तें स्वामिनिष्ठेनें प्रेरित होऊन जितकें लढे तितकें राष्ट्राच्या कळकळीनें लढत नसे. आमच्या देशांत पूर्वींपासून जर मोठी कांहीं उणीव असेल तर राष्ट्रभक्तीची होय. राष्ट्रासंबंधें आपल्यावर कांहीं जबाबदारी आहे अशी लोकांची कधींच भावना झाली नाहीं. राज्य हें राजाचें, तो जर मेला तर लढावयाचें कोणाकरतां? या समजुतीनें घेरल्यामुळें एतद्देशीयांचें पराक्रमाचें तेज लोपून जाई व शत्रूस विजय प्राप्त होई. राष्ट्रनिष्ठेच्या अभावीं हिंदुस्थान देश पराक्रम, वैभव, विद्या ह्यांनीं पूर्ण असतां हि परदास्यांत आज कित्येक शतकें खितपत पडला आहे!

# प्रकरण १८ वें.

## हिंदुस्थानच्या इतिहासांतील अत्यंत सुखी काळ

### इ. स. ८००–१०००

### समालोचन

हिंदुस्थानच्या आजपर्यंतच्या इतिहासांत या दोन शतकां इतका वैभवशाली, भरभराटीचा व सुखाचा काल झाला नाहीं. ह्या वेळीं हिंदुस्थान देश पूर्णपणें स्वतंत्र असून देशांत सुबत्ता व शांतता नांदत होती. धार्मिक परिस्थितिहि निर्दोष होती; सर्व देशभर एकच धर्म असल्यामुळें जनतेंत वैमनस्याचा अभाव व एकोपा दिसून येत असे. जातिजातींत भेदभाव नसल्यानें बेबनाव होत नसत. सैन्याची वगैरे व्यवस्था उत्तम असल्यानें परचक्राची भीति नव्हती व राज्यव्यवस्थाहि प्रजेस सुखावह होईल अशाच तऱ्हेनें चालली होती. असा सुबत्तेचा व शांततेचा काळ वेदकाळीं किंवा युद्धाच्या पूर्वीं असल्यास नकळे; पण बौद्ध काळापासून आजतागायत असा काळ हिंदुस्थानास लाभला नाहीं यांत संशय नाहीं.

तेव्हां या सर्वांगीण सुंदर कालाचा निरनिराळ्या बाजूंनीं विचार करणें अवश्यक आहे. ह्या कालांतील अत्यंत महत्त्वाची व विचारांत घेण्याजोगी गोष्ट म्हटली म्हणजे सर्व देशभर एकच धर्माचा प्रभाव हि होय. एकाच देशांत भिन्न धर्माचे लोक रहात असल्यास त्यांत शांतता नांदेलच असें नाहीं; तसेंच ते लोक राष्ट्राकरतां एक-

जुटीनें काम करतीलच असेंहि नाहीं. यापुढील काळांत मात्र ही स्थिति टिकली नाहीं. ह्या वेळीं मुसलमान लोकांचा प्रवेश फक्त सिंध प्रांतांत झाला होता; इतर प्रांतांतून त्यांचा मागमूस नव्हता. त्यामुळें धार्मिक कलहास किंवा तज्जन्य राजकीय अस्वस्थतेस वावच नव्हता. यापुढील काळांत मात्र मुसलमानांचा हिंदुस्थानांत जो शिरकाव झाला त्यामुळें सर्वत्र अंदाधुंदी व बेबंदशाही माजली; मोठ्या शहरांतूनच नव्हे तर लहान लहान खेड्यांपाड्यांतून सुद्धां दोन धर्मांचे लोक लहानसहान कारणांवरून आपसांत तंटे करूं लागले व या तंट्यांचें स्वरूप हि वेळ प्रसंगीं अत्यंत उग्र होत असे. ह्या काळीं मुसलमानांच्या मशिदी हिंदूच्या देवळांच्या शिखरांशीं स्पर्धा करताहेत कीं काय असा भास व्हावयाचें कारणच नव्हतें, कारण या काळांत हिंदुस्थानांत मशिदीच नव्हत्या; पुढें मात्र हिंदूंच्या देव मंदिराप्रमाणें सर्वत्र मशिदी झाल्या व त्यांचे उंच उंच मनोरे देवळांच्या कळसाशीं स्पर्धा करूं लागले व तेव्हांपासूनच हिंदुस्थानांत कायमच्या दुहीचे ध्वज उभारले गेले. ज्याप्रमाणें या काळांत मुसलमानी धर्माचा उदय झाला नव्हता त्याचप्रमाणें बौद्ध धर्माचा अत्यंत ऱ्हास झाला असल्यामुळें देशांत तिकडूनही धार्मिक दुहीस वाव नव्हता. कुमारिलभट्ट व शंकराचार्य यांनीं वैदिक धर्माचें (वैदिक विधि तसेंच वैदिक तत्वज्ञान यांचें) पुनरुज्जीवन केलें होतें. आणि या नवीन धर्ममतांत सांप्रदायिक मतभेद उत्पन्न झाले नसल्यामुळें लोकांची एकाच वैदिक धर्मावर निस्सीम श्रद्धा होती. ती इतकी कीं, बौद्ध धर्माचीं देवळें कोठेंच दिसेनाशीं झालीं. ह्युएनत्संग ज्या वेळीं हिंदुस्थानांत आला होता त्या वेळीं त्याला सर्वच ठिकाणीं बौद्धमंदिरें व स्तूप दृष्टीस पडले; पण आतां त्या वेळच्या परिस्थितींत इतका फरक पडला कीं, बौद्धधर्मानुयायी लोकांनीं खोदलेलीं लेणीं व मूर्ति

पहाण्यास एकांतांत असलेल्या पहाडांतून लोकांस जावयास लागे. बौद्ध लोकांचीं असंख्यात मंदिरें एकाएकीं कशीं लुप्त झालीं हें एक आश्चर्यच आहे; कारण हिंदु लोक परमतसहिष्णुतावादी असल्यानें मुसलमानां-प्रमाणें ते मूर्तिविध्वंसकहि नव्हते. मुसलमानांचा हिंदुस्थानांत प्रवेश झाल्यावर त्यांनीं अगणित देवालयें उध्वस्त केलीं व त्यांच्याऐवजीं कित्येक ठिकाणीं मशिदी उभारल्या; पण हीं सर्व देवालयें हिंदूंचीं होतीं. कदाचित् बौद्धधर्माचा पाडाव झाल्यानंतर या बौद्ध मंदिरां-च्या दुरुस्तीकडे कोणीच लक्ष्य न पुरविल्यामुळें कालांतरानें त्यांचा नाश झाला असावा, किंवा ज्याप्रमाणें मुसलमानांनीं हिंदूंच्या देवळाचे जागींच मशिदी उठविल्या त्याप्रमाणें बौद्धमंदीरांचेंहि रूपांतर हिंदूंच्या देवालयांत झालें असावें. असो, बौद्धधर्माप्रमाणें जैनांचा मात्र पुरा पाडाव झाला नसल्यानें त्या मताचा प्रसार थोडा फार दिसून येत होता. तरी पण जैन धर्माचा फैलाव अद्याप गुजराथ प्रांतांत, दक्षिण महाराष्ट्रांत, पंजाबांत किंवा राजपुतान्यांत फारसा झाला नसल्यानें त्यास तितपतच महत्त्व होतें. तेव्हां या काळीं सर्व हिंदुस्थानभर एकाच धर्माचा अंमल दिसून येत होता असें मानण्यास हरकत दिसत नाहीं. इतकेंच नव्हे तर लोकांत सांप्रदायिक पंथ, मतभेद किंवा कलहहि उत्पन्न झाले नव्हते. शंकराचार्यांचें अद्वैतमत सर्वांस मान्य झालें होतें व म्हणून जनसमाजांत शिव, विष्णु, भगवती, आदित्य किंवा गणपति यांच्या भिन्न उपासना सुरू होत्या तरी या निरनिराळ्या देवांच्या उपासकांत परस्पराविषयीं द्वेषबुद्धि किंवा आपल्याच उपासनेविषयीं दुराग्रह दिसून येत नसे.

याचें कारण एवढेंच कीं, बौद्धधर्माचा पाडाव होऊन हिंदूधर्मा-च्या पुनरुज्जीवनाची जी प्रचंड लाट सर्व देशभर एकदम पसरली त्या लाटेवर तरंगण्यांतच लोकांना जणूं काय नवजीवनाचा आनंद

चाटूं लागला व आनंदातिशयांत गौण भेदांचा उद्भवच झाला नाहीं; पण कालान्तरानें त्या प्रचंड लाटेविषयीं विस्मयबुद्धि कमी पडून व्यक्तिमहात्म्य वाढूं लागलें; वेदान्तमतांतहि पुढील काळांत द्वैतभाव उत्पन्न झाला व रामानुज व मध्व यांनीं सगुणोपासना विशेष प्रचारांत आणिली. सगुणोपासना हेंच ध्येय बनल्यावर उपास्यांविषयीं लोकांत दुराग्रह बळावले व कोणी कट्टे शिवोपासक तर कोणी कट्टे विष्णु-उपासक बनले. परस्परांचा अत्यंत द्वेष हेंच त्यांच्या सांप्रदायिक अभिमानाचें मूळ होऊन बसलें व त्यायोगें देशांत शांतता व सौख्य नांदणें दुष्कर झालें. त्यांतच मुसलमानांच्या करड्या अमलाची भर पडली व त्यामुळें लोकांस 'त्राहि भगवन्' अशी स्थिति प्राप्त झाली. गांवोगांव, शहरोशहरीं व खेड्यांतूनहि धार्मिक दुराग्रहाच्या योगानें तंटेबखेडे, लहान मोठ्या मारामाऱ्या व जुलूम दिसून येऊं लागले. त्यामुळें सर्व हिंदुस्थान देशास धर्मरणाचें स्वरूप प्राप्त झालें; पण ज्या काळाचा विचार सांप्रत आम्ही करीत आहोंत त्या काळीं ह्या सर्व तंटे बखेड्यांचा उदयच नव्हता. बुद्धमताचा पूर्ण पाडाव झाला असून मुसलमानी जुलमाचा उदय झाला नव्हता; एवढेंच नव्हे तर लोकांच्या धार्मिक समजुतींत बुद्धिभेद झाला नसून सर्वच एका धर्माच्या कक्षेंत सारख्याच प्रमाणानें बद्ध झाले होते; व त्यामुळें सर्वत्र धार्मिक शांततेचें साम्राज्य होतें.

या परिस्थितीसंबंधीं एक आक्षेप येण्याचा संभव आहे. तो असा कीं, तत्कालीन हिंदुधर्माचें स्वरूप रेखीव पूर्ण नसल्यामुळें त्यांत ज्ञान्यांपासून अडाण्याचाहि सारखाच समावेश होत असावा; तर्कशास्त्राच्या व शास्त्रीयविचाराच्या तीव्रतर मुशींत हिंदुधर्म-मतांचें परीक्षण झालें नव्हतें तें झालें असतें तर विद्वान लोकांत मतभेद साहजिकच उत्पन्न झाले असते; किंवा तत्कालीन धर्ममतेंच

पंगू असल्यामुळें विद्वानांनीं त्यांकडे दुर्लक्ष केलें असतें. या आक्षेपांत कदाचित् थोडें फार तथ्य असेल; जगांतील सर्व धर्मांचा तात्विक विचार एकसमयावच्छेदें करितां त्यावरून निघणाऱ्या सर्वसामान्य तत्वाशीं तत्कालीन हिंदुधर्मतत्वांची विसंगतता दिसून येणें अगदीं शक्य आहे. पण आमची अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, जगांतील सर्व धर्मांच्या मुळाशीं एकच अबाधित तत्त्व आहे; भिन्न धर्मांचीं स्वरूपें देशकालादि परिस्थितीप्रमाणें भिन्न होऊं शकतील पण 'अंतरी'ची वृत्ति सर्व धर्मानुयायांमध्यें एकच असते. यामुळेंच धर्माधर्मांच्या बहिरंगपरीक्षणाच्या भानगडींत आम्हीं पडूं इच्छित नाहीं. सर्वच धर्म अंतरंगानें सारखेच चांगले व बहिरंगानें सारखेच वेडे. आहेत अशी आमची समजूत आहे. यामुळें ह्या बहिरंगांतील चित्रविचित्र रंगापुढेंच प्रत्येक धर्मांत दुराग्रहवृत्तीस उत्तेजन मिळतें व त्यामुळेंच कलहाग्नीस इंधन मिळतें; तेव्हां हे बाह्यात्कारीं गौण दोष थोडे बाजूस सारिले असतां तत्कालीन हिंदुलोक एक धर्मछत्राखालीं होते असें मानण्यास हरकत दिसत नाहीं; मग तो धर्म कसाहि असो, या वेळीं धार्मिक वातावरण शांततामय होतें यांत शंका नाहीं; व या शांततेमुळें देशांत सुस्थिति होती हेंहि त्या काळच्या वैभवाचें एक प्रबळ कारण होय.

हें वरील आक्षेपांचें निराकरण झालें, पण त्याबरोबरच तत्कालीन हिंदूंच्या धार्मिक परिस्थितींतील गुणस्थलांचेंहि थोडेंसें दिग्दर्शन करणें योग्य होईल. हल्लींच्या व तत्कालीन हिंदुधर्माच्या परिस्थितींत एक अत्यंत महत्त्वाचा भेद दिसून येतो व त्यायोगें तत्कालीन लोक जास्त सुस्थितींत असावेत असें अनुमान काढण्यास बळकटी येते. हिंदुधर्माची सामाजिक इमारत वर्णाश्रमव्यवस्थेवर फार प्राचीन कालांतच रचिली गेली, पण त्यास हल्लीं अव्यवस्थित व बरेंच उद्वेगजनक

स्वरूप आलें आहे. मूळच्या जाती चार पण आज हिंदुस्थानांत त्याच जातींमधून दोन हजारांवर पोटभेद उत्पन्न झाले आहेत व ते अत्यंत हानिप्रद स्वरूपाचे आहेत. या पोटजाति अत्यंत संकुचित असून प्रत्येक पोटजातीचे निर्बंध कठिण व समाजाचें अंग खिळखिळें करणारे असे आहेत. समाजपुरुषाचे सर्व अवयव लहान मोठ्या पाशांनीं इतके जखडले गेले आहेत कीं, त्या पुरुपास स्वतंत्र चलन तर नाहींच; पण त्या पुरुपाच्या अवयवांचें विशिष्ट चलनहि बंदच आहे. त्या वेळीं ब्राह्मणां-ब्राह्मणांत तसे क्षत्रिया-क्षत्रियांत पोटभेद बिलकूल नव्हते. वैश्यांतही पोटभेद असल्याचें दिसत नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील रजपूत क्षत्रिय व दक्षिणेंतील महाराष्ट्री-क्षत्रिय यांजमध्यें रोटी-बेटी-व्यवहार निखालस होत असे, असें आम्हीं मागें दाखविलेंच आहे. एवढेंच नव्हे तर क्षत्रियांचीं ३६च कुळें किंवा घराणीं अशी गणना यापुढें झाली. अशा तऱ्हेनें पोटजाति किंवा भेद नसल्यामुळें देशांत शांतता जास्त असे. यामुळें पुढील काळाप्रमाणें या काळीं कनोजी क्षत्रिय श्रीमाळ्यांशीं तंटा करण्यास तयार तर दोघेही महाराष्ट्रीयांवर चाल करून येण्यास तयार; कर्नाटकी व दाक्षिणी यांचें सदैव हाडवैर तर दोघेही तामिळ लोकांस गट्ट करण्यास तयार, अशी स्थिति नव्हती.ही स्थिति पुढील काळीं फारच विकोपास गेली. यावेळीं सर्वत्र एकभाव जागृत असल्यामुळें एखादे वेळीं प्रांत केवळ नांवानें काबीज करण्यापलीकडे आंतरराष्ट्रीय लढायांची मदार जात नसे, व त्यामुळें परचक्राचें चांगलेंच निवारण होई. सारांश सर्वच क्षत्रियांत जूट असल्यामुळें परकीयांस देशांत फूट पाडणें कठिण होतें.

मुख्य जातींत पोटभेद नसल्यामुळें प्रत्येक जातींत आपसांत पूर्ण सलोखा व स्नेहभाव नांदत असे. यावेळीं उत्तरेकडील क्षत्रियांत व

दक्षिणेकडील क्षत्रियांत वैरभावास कारण नव्हतें असें वर सांगितलें. पण यावर कोणी अशी शंका घेईल कीं, एकाच जातींत कलहास थारा नसेल पण ब्राह्मण-क्षत्रिय; क्षत्रिय-वैश्य वगैरे भिन्न जातींत सलोखा असेलच कशावरून? तर ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य ह्या तीन वर्णांमध्यें अनुलोमविवाह चालू असल्यामुळें परस्परांत हि स्नेहभाव वृद्धिंगत होण्यास सबळ कारण होतें. पूर्वींच्या काळीं अशा तऱ्हेचे अनुलोमविवाह शूद्र जातींशींहि होत असत, पण या काळीं शूद्रादिकांशीं अनुलोमविवाहास निर्बंध घालण्यांत आले होते व तें युक्तच होतें. कारण शूद्र लोक म्हणजे मूळचे द्रविड अनार्य लोक होत व त्रैवर्ण लोक हे आर्य होत. आर्य व आर्येतर यांच्यामध्यें वंशमिश्रण होणें एक प्रकारें अनिष्ट आहे, कारण त्यायोगें कोणत्याही वर्णाची शुद्धता नष्ट होते; पण आर्यांआर्यांतच अशा तऱ्हेचे निर्बंध असणें हें संकुचितवृत्तीनें समाजावर संकट आणण्यासारखें आहे. तेव्हां ऋषींनीं शूद्रांशीं अनुलोम-विवाह बंद केला हें विचारास धरूनच झालें. असो, तर या काळीं ब्राह्मणास क्षत्रिय व वैश्य भार्या करतां येत असे; व क्षत्रियास वैश्य भार्या करतां येई; अशा तऱ्हेनें अनुलोमविवाह त्रैवर्णकांत सुरू असत. मात्र अनुलोमविवाहापासून झालेली संतति मातेच्या जातीची समजली जात असे; ब्राह्मणपिता व क्षत्रिय भार्या यांस झालेली संतति क्षत्रिय जातीची समजली जाई; अशा तऱ्हेच्या संततीची स्वतंत्र अशी जात मानण्यांत येत नसे; नाहींतर कितीतरी उपजाति नवीनच तयार झाल्या असत्या. यामुळें क्वचित्प्रसंगीं एकाच विप्र कुलांत क्षत्रिय व वैश्य भार्या तसेच ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य संतति एकाच गृहस्थाची असे; ही सर्व मंडळी लहानपणीं एकत्रच वाढल्यामुळें त्यांच्यांत भिन्नभाव नसे; सर्व एकत्रच जेवावयास बसत; मांसाशनाचा अद्याप निषेध नसल्या कार-

णानें सर्वांचें अन्न हि एकच असे. त्याचप्रमाणें ही भिन्न जातींची संतति एकाच भांड्यांतून पाणी पिई तेव्हां स्पर्शास्पर्शत्वाचें नांवहि नव्हतें. ह्या सर्वच संततीचे मुंज—इत्यादि संस्कार होत व सर्वजण सारखेच वेदाभ्यास करीत; तेव्हां ब्राह्मणांसच काय तो वेदाधिकार अशी स्थिति नसल्याकारणानें ब्राह्मणांविषयीं काय तो वरवर आदर पण अन्तर्यामी त्यांच्याविषयीं द्वेष अशी क्षत्रियांची स्थिति नसे. हल्लीं ह्याच्या उलट प्रकार आहे, ब्राह्मणांचें सोंवळें ओवळें, स्पर्शासहनत्व व वेदाधिकार यांचा इतर जातींस हेवा वाटत असल्याकारणानें त्यांचे मनांत ब्राह्मणांविषयीं वरपांगीं प्रेमभाव असतो व बहुधा मनामध्यें ते ब्राह्मणांविषयीं द्वेषभाव बाळगीत असतात; परंतु येथें आम्ही ज्या काळाचा विचार करीत आहों त्यावेळीं तिन्ही जातींना वेदाधिकार असल्यामुळें, सर्वांचे अशनादि व्यवहार एकच असल्याकारणानें, अनुलोमविवाह प्रचारांत असल्यामुळें व स्पर्शासहनत्व नसल्यामुळें लोकांत वैरभावास थाराच नव्हता व त्यामुळें समाजाची प्रेमबंधनें जास्त घट्ट व मजबूत होतीं.

तसेंच कांहीं विशिष्ट शूद्रांदिकांशींहि अन्नपानादि व्यवहारास प्रत्यवाय नसल्यानें शूद्र हे समाजानें बहिष्कृत केले होते असेंही नाहीं; हल्लीं शूद्रांच्या सावलीसही सोंवळा ब्राह्मण उभा रहात नाहीं मग अन्नपानादिकांचें भाषणच नको; पंचम किंवा अतिशूद्रांचा वर्ग वगळतां इतरांशीं म्हणजे कृषिकर्मादिकांचे प्रसंगी ज्यांचा निकट संबंध त्रैवर्णिकांशीं येत असे त्यांच्याशीं अन्नपानादिक व्यवहार त्रैवर्णिक त्यावेळीं करीत असत हें आमचें विधान वाचून आमच्या कित्येक वाचकांस आश्चर्य वाटेल; पण त्यास इलाज नाहीं. कारण वरील विधानास लेखादिकांचा स्पष्ट आधार मिळत नसला तरी अर्वाचीन स्मृतिग्रंथांचा पुष्कळच आधार सांपडतो. स्मृति ग्रंथांचें

निरनिराळ्या प्रश्नांस अनुलक्षून आम्ही सूक्ष्म परिशीलन केलें त्या-वरून समाजांतील चालीरीतींत कसकसा फरक पडत गेला हें चांगलें लक्षांत आलें. येथें मुख्य अडचण स्मृतिग्रंथाच्या रचनाकालनिश्चयासंबंधीं आहे. पण तेवढी दूर झाली तर समाजांतील बारीकसारीक फरक आदर्शवत् स्मृतिग्रंथांतून दिसून येतील. या स्मृतीग्रंथांवरून असें स्पष्ट दिसतें कीं फार प्राचीन कालापासून त्रैवर्णिकांच्या कांहीं विशिष्ट शूद्रांसमवेत अन्नपानादि व्यवहारास प्रत्यवाय नसे. हल्लींच्या काळीं अशा तऱ्हेच्या व्यवहारास फार कडक निर्बंध घालण्यांत आले आहेत. एखाद्या ब्राम्हणानें शूद्रासमवेत अन्नोदक घेतल्यास त्यास जाति-बहिष्कृत होणें भाग पडेल; पण पूर्वींच्या काळाचे निर्बंध फार सौम्य असत असें परिशिष्टांतील टिप्पणीच्या उताऱ्यावरून दिसेल. या टिप्पणी-मध्यें निरनिराळ्या स्मृतींतील विशिष्ट वचनें एकत्र केलेलीं आहेत, त्यांवरून अन्नोदकासंबंधींच्या निर्बंधाचें स्वरूप व त्यांत होत गेलेले फरक वाचकांचे ध्यानांत चटकन येऊं शकतील. सर्वांत अलीकडील स्मृति म्हटली म्हणजे व्यास-स्मृति आहे असें वाटतें. तिच्यांत असें लिहिलें आहे कीं, एखाद्या ब्राह्मणानें न्हावी, अगर आपल्या कुलाचें अभीष्ट चिंतणारा कुलागत मित्र तसेंच शेतकीसंबंधीं मदतगार, इतर नोकर, गाई पाळणारा या लोकांशीं ते शूद्र असले तरी अन्नोदकादि व्यवहार केल्यास त्यास दोष लागत नाहीं.* उघडच आहे कीं, वरील प्रकारच्या शूद्रादिकांशीं ब्राह्मणांचा धंद्यासंबंधीं हरघडी संबंध येत असे; व यावरून तत्कालीन ब्राह्मणादिकांच्या उद्योगधंद्यासंबंधीं अनुमान काढणेंहि सुलभ जाईल. पराशरस्मृति ही कलियुगांतील आचारासंबंधीं प्रमाणभूत मानतात. त्यांत असें सांगितलें आहे कीं,

*नापितान्वयमित्रार्द्धसीरिणो दासगोपकाः शूद्राणामप्यमीषां तु भुक्त्वान्नं नैव दुष्यति

ब्राह्मण व क्षत्रिय यांनीं आपले वैदिक आचार पाळून उदरानिर्वाहाचें साधन म्हणून शेती करावी. यावरून उत्तर हिंदुस्थानांतील शेतकरीवर्गांत ब्राह्मणांचा व क्षत्रियांचा विशेष भरणा कां आहे तसेंच दक्षिणेंतील बहुतेक मराठा क्षत्रिय लोक शेतीच कां करतात याचा उलगडा होतो. साहजिकपणेंच ब्राह्मण व क्षत्रिय शेती करूं लागले म्हणजे त्यांचा संबंध शूद्रांशीं येणारच व म्हणूनच त्यांच्याशीं अन्नोदकादि व्यवहार थोडा फार होणारच. अशा तऱ्हेनें ब्राह्मण–क्षत्रियांचें शूद्रांशीं जास्त दळणवळण त्याकाळीं होतें व परस्परांतील स्नेहभाव वृद्धिंगत होत असे. ब्राह्मण क्षत्रियांपूर्वींच वैश्य जातीचे लोक शेती करीतच होते, पण बौद्ध काळीं शेतीचा धंदा गौण मानला गेल्यामुळें अशा वैश्यांची गणना शूद्रांत होत असे; कदाचित् शूद्रांतील हल्लींचा उच्चनीचभाव वैश्यांच्या समावेशानेंच उत्पन्न झाला असावा. अत्रिस्मृतींत तर कांहीं प्रकारच्या शूद्रांनीं श्राद्धादिकर्मे करावीं व त्या वेळीं ब्राह्मणादिकांनीं उपाध्यायपणा स्वीकारावा व शूद्राकडेहि अन्नपानादि कर्मे करावीं असें स्वच्छ सांगितलें आहे; त्या स्मृतींतच शूद्राचे श्राद्धाधिकारी व अनधिकारी असे दोन भेद मानिले आहेत.*—ह्यावरूनहि सध्यांच्या व तत्कालीन परिस्थितींत किती भेद आहे हें सहज लक्षांत येईल. सध्यांच्या काळीं ब्राह्मणानें शूद्रापासून, वैश्यापासून, फार काय सांगावें ! पण क्षत्रियापासून सुद्धां, पाणी घेतल्यास, अन्नाविषयीं बोलणेंच नको, तो ब्राह्मण गर्हणीय ठरतो. ब्राह्मणांच्या या अलीकडच्या संकुचित वृत्तीमुळें जातिजातींत स्नेहभाव कमी कमी होत जावा यांत आश्चर्य नाहीं. ज्या वेळीं ब्राह्मण, क्षत्रिय वैश्य व शूद्र

* शूद्रोपि द्विविधो ज्ञेयः श्राद्धीचैवेतरस्तथा । श्राद्धी भोज्यस्तयोरुक्तो अभोज्यस्त्वितरः स्मृतः ।

यांजमध्यें अन्नोदकास प्रत्यवाय नसे त्या वेळीं सामाजिक कलहास कमी वाव मिळत असावा हें साहजिक आहे.

या पुढील काळांत मात्र अन्नपानादिकांविषयीं जास्त कडक निर्बंध घालण्यांत येऊं लागले; ते कां याचा विचार पुढील भागांत होईल. पण याचा परिणाम मात्र असा झाला कीं, ब्राह्मणांचा शुचिर्भूतपणा अधिक राहिला पण त्यांचा सामाजिक दर्जा मात्र उतरला. सध्यांच्या काळीं क्षत्रियवैश्यादि लोक ब्राह्मणांस आपल्याकडे पाणी भरणें विशेषत: स्वयंपाक करणें अशा कामाकडे नेमूं लागले आहेत. ब्राह्मण हा शब्द मुळांत विशिष्ट अधिकारवाचक असून हल्लीं स्वयंपाकी, पाणी भरणारा व भिकारी अशा अर्थानें रूढ होऊं लागला आहे. ब्राह्मण बबर्चा भिस्ती भिकारी या म्हणीव ब्राह्मणांच्या हल्लींच्या दशेची कल्पना सहज करतां येईल. ब्राह्मणांनीं एखाद्या वैश्याकडे स्वैंपाक्याचें काम करावें पण केवळ सोंवळ्या ओवळ्याच्या निर्बंधानें त्या वैश्यकुलांत हि आपणास कोणाचा स्पर्श न होऊं देण्याची खबरदारी घ्यावी व हे स्पर्शादि निर्बंध मोठ्या तोऱ्यानें आपल्या यजमानाचे घरीं पाळावे हें आश्चर्यकारक नव्हे काय?

या काळाच्या सुस्थितीचें आणखी एक लक्षण म्हटलें म्हणजे भिक्षावृत्तीनें उपजीविका करणारांचा बहुतेक अभाव हें होय. बौद्ध धर्माच्या उदयानें देशावर बरे वाईट जे ठळक परिणाम झाले त्यांत भिक्षावृत्तीनें रहाणारांचा सुळसुळाट हा वाईट परिणाम प्रामुख्यानें गणला जाईल. बौद्ध धर्मामुळेंच ह्या वृत्तीचा उदय झाला असें म्हणण्यापेक्षां बौद्ध धर्मानें ह्या वृत्तीला फाजील उत्तेजन दिलें असें म्हणणें जास्त सयुक्तिक होईल. बौद्ध धर्माची दीक्षा घेण्यास सर्वांसच मोकळीक मिळाली असल्याकारणानें व बौद्ध धर्मानुयायांकरतां मोठमोठ्या विहारांतून रहाण्याची सोय झाल्यामुळें जो तो आळशी

बौद्ध धर्माची दीक्षा घेऊं लागला. या धर्मान्तर करणारांत सत्यन्वेषी व धर्मरत लोकांपेक्षां उदरभरू व आळशी लोकांचा भरणा जास्त होऊं लागला यांत आश्चर्य नको. अशामुळेंच पुढें पुढें बौद्धधर्माचा ऱ्हास होऊं लागला; युरोपमधील “ मोनॅस्टारीस ” ची जी स्थिति झाली तीच हुबेहूब “ विहारांची ” व बोद्ध भिक्षूंची झाली. बौद्ध धर्माच्या उत्कर्ष-काळीं बौद्ध विहारांतून हजारों भिक्षूंची वस्ती असे व त्यांचा निर्वाह गावांतून संपादिलेल्या भिक्षेवर होत असे. पण त्या वेळीं लोकांत भिक्षूंविषयीं थोडीबहुत आदरबुद्धि वसत असल्या-मुळें त्यांस भिक्षेकरतां त्रास होत नसे ! पण पुढें पुढें बौद्ध भिक्षू लोकांस भिक्षेकरतां सतावून सोडूं लागले; ह्या बौद्ध भिक्षूंतही ब्राह्मणादिकांपेक्षां शूद्रादिकांचाच जास्त भरणा असल्यामुळें लोकां-तही त्यांच्यावरची श्रद्धा कमी होऊं लागली; ब्राह्मण व क्षात्रिय हे फार तर मठांत आपणांस प्रभुत्व मिळावें म्हणून संन्यासदीक्षा घेत. असो, बौद्ध धर्माचा कालवशात् ऱ्हास झाल्यावर बौद्ध भिक्षूंची संख्याहि कमी होऊं लागली, व लोकांसाहि ह्या भिक्षेक-ऱ्यांचा उपद्रव कमी झाला, पण तो अजीबात नाहीसा मात्र झाला नाहीं. बौद्धभिक्षूंचा पंथ लयास जाऊन १-२ शतकें होतात तोंच शैव व वैष्णव पंथी गोसावी व बैराग्यांचे पंथ उदयास येऊं लागले व बौद्ध भिक्षूप्रमाणेंच हे लोक हि अविवाहित राहुन माठांत व देवळांत राहून भिक्षा वृत्तीनें आपली उपजीविका करूं लागले. पण आपल्या प्रस्तुत कालीं या पंथांचा जोर अद्याप झाला नसल्यानें व बौद्ध-भिक्षूंचा अस्त झाल्याकारणानें देशांत भिक्षाचर्याचा उपद्रव फारच अल्प प्रमाणांत होता यांत संशय नाहीं.

पूर्वींच्या काळापासून भिक्षावृत्तीस कडक च निर्बंध घालण्यांत आले होते. कांहीं विशिष्ट ब्राह्मणांसच कायतो भिक्षेचा अधिकार

असे व तीही त्यांच्या धर्मवृत्तीस अनुसरूनच देण्यांत आला होता. सरसकट सर्वांना हा अधिकार नव्हता. अधर्मी ब्राह्मणांना त्या कालांत देखील भिक्षा मागण्यास प्रत्यवायच असे. ज्या ग्रामांत अशा तऱ्हेचे अधर्मरत ब्राह्मण भिक्षेवर निर्वाह करीत असतील त्या-ग्रामाधिकाऱ्यांस राजदंड सांगितला आहे " तं ग्रामं दण्डयेद्राजा चोर-भक्तप्रदो हि सः "—ब्राह्मणांस जर भिक्षाचर्याची इतकी बंदी होती तर इतर जातींतून त्याची अजिबात बंदी होती यांत संशय नाहीं. भिक्षाचर्याची सक्त बंदी असल्यानें जो तो आपल्या जाति विशिष्ट धंद्यानें उपजीविका करी; कारण त्यास दुसरा मार्गच नसे. ब्राह्मण मुख्यत्त्वें करून धर्माचरणांतच कालक्षेप करीत, नाहींतर क्षात्रवृत्तीनें रहात किंवा इलाजच नसला तर शेतकी करीत. असो, त्या वेळीं भिक्षा-वृत्तीस आळा असल्यामुळें कोणासहि निरुद्योगी रहातां येत नसे व राष्ट्रांत निरुद्योग्यांचा जितका कमी आदर तितकें राष्ट्राच्या उत्कर्षास चांगलें असतें!

पण भिक्षावृत्तींच्या वाईट परिणामाबरोबरच हिंदु समाजास बौद्ध धर्मापासून झालेल्या फायद्याचाहि उल्लेख करावयास पाहिजे, कारण हे फायदे लहानसहान नव्हते. बौद्ध धर्मानें हिंदूधर्मांतच मूळांत असलेल्या कांहीं कल्पनांवर इतका भर दिला कीं त्या कल्पना जणू काय बौद्ध धर्मा-च्याच अंगभूत आहेत असें लोकांस वाटतें. पुनर्जन्म व कर्माचा सिद्धांत फार कालापासून हिंदूतत्वज्ञानांत रूढ आहे. पण ह्या दोन्ही गोष्टींची बौद्ध धर्मानें नीतिसंवर्धनोपयोगी फारच जोरदार सांगड घालून दिली. या दोन तत्वांच्या पायावर बौद्धधर्मानें नीतीचें भक्कम मंदिर रचिलें आहे व त्यायोगें हिंदुसमाज नीतीच्या अत्युच्च शिखरावर विराज-मान झाला आहे. तत्कालीन परकीय व्यापाऱ्यांनीं व प्रवाशांनीं हिंदू लोकांच्या प्रामाणिकपणाची प्रशंसा केली आहे. सर्वसाधारण लोकांची

उत्तम नीतिमत्ता हा समाजाचा बहुमोल सद्गुण आहे हें सांगावयास नको.

बौद्ध धर्माच्या चिरंतन व इष्ट परिणामाची दुसरी गोष्ट म्हटली तर हिंसायुक्त यज्ञयागादिकांचा निषेध ही होय. बौद्ध धर्माचा नायनाट झाला तरी अहिंसाधर्माचा लोकमतावर इतका पगडा होता कीं, पुनः हिंसायुक्त यज्ञयागादि सुरू होणें जवळ जवळ अशक्यच झालें. बौद्ध धर्मानें झुगारलेली वेदावरील श्रद्धा मीमांसकांनीं पुनः दृढमूळ केली यांत संदेह नाहीं; पण त्याबरोबर वेदप्रणीत हिंसायुक्त यज्ञाचें पुनरुज्जीवन होणें दुष्कर होतें व तें कोणासही करतां आलें नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं यज्ञादि कर्मे अग्निहोत्रासुद्धां या वेळीं अजिबात लुप्त झालीं तर आमच्या म्हणण्याचा असा आशय आहे कीं, दिवसें दिवस हिंसाप्रचुर वैदिक कर्मांचा जो ऱ्हास बौद्धकाळीं झाला होता त्याचा परत उदय होणें दुरापास्त होतें. अग्निहोत्रादिकर्मांचें समाजास इतकें महत्व नाहीं, त्याचें महत्त्व काय तें व्यक्तीलाच. मोठाल्या यज्ञयागादिकांचें तसें नाहीं. या यज्ञाचें फारच मोठें अवडंबर असतें. त्यांत शक्तीचा व द्रव्याचा अनुपम व्यय होतो; व त्याचे क्रियादि प्रकार फारच घोटाळ्याचे असतात; ते यथासांग करणें फक्त धनाढ्यासच शक्य असतें; अश्वमेध व राजसूय इत्यादिक यज्ञयाग करणें तर फक्त राजे लोकांनाच शक्य असतें. शिवाय त्याकरतांहि रणें माजतात व लोकांत विनाकारण अस्वस्थता उत्पन्न होते व परलोकीं जें पुण्य प्राप्त होणार त्याच्या मानानें प्राणहानि मात्र विपुल होते. तेव्हां अशा तऱ्हेचे यज्ञयागादि बंद झाल्यापासून देशांतील फाजील खर्च व हिंसा थांबली व त्या योगें देशांत सुखसमृद्धि जास्त झाली असेंच म्हटलें पाहिजे. नवीन रजपूत राजांनीं या काळांत अश्वमेधादि यज्ञ केले नाहींत हें ध्यानांत धरण्यासारखें आहे.

९ व्या व १० व्या शतकांतील धार्मिक परिस्थितीचें स्वरूप समाजास कोणत्या तऱ्हेनें उन्नति करणारें झालें याचें येथवर विवेचन झालें. सर्व समाजाचा एकच धर्म असल्याकारणानें व त्यांतहि पंथ नसल्यामुळें धार्मिक दुहीस वावच नव्हता; जातिनिर्बंध सध्यांच्या इतके कडक नसल्याकारणानें जातिद्वेष सध्यांसारखा तीव्र नव्हता; त्याचप्रमाणें समाजाचें शोषण करणारा बेकार वर्ग नष्ट झाल्यामुळें व समाजाची नीतिमत्ता उच्च दर्जाची असल्यामुळें समाजाची परिस्थिति सर्वतोपरी विभवानुकुल अशीच होती; व राजसूय अश्वमेधादि तंट्याचे यज्ञ बंद असल्यानें देशादेशांत व्यर्थ युद्धें होत नव्हतीं. एवढें सांगून आपण देशाच्या आर्थिक स्थितीकडे वळूं. तत्कालीन समाजाची स्थिति आर्थिक दृष्ट्याहि समाधानकारक होती असें वाचकांच्या ध्यानांत येईल; तत्कालीन वैभवाचें वर्णन देण्यापेक्षां वैभवघातक गोष्टींच्या अभावाचें वर्णन देणें जास्त युक्त होईल; कारण त्यायोगें सध्यांच्या समाजाच्या वैभवास घातक गोष्टी कोणत्या आहेत हेंही वाचकांच्या निदर्शनास येईल. देशांतील उद्योग धंद्यांच्या वाढीनें त्याचप्रमाणें स्वराज्याच्या साधनानें कोणत्याहि देशांतील अभिवृद्धीस मदत होते हें उघड आहे. एक वेळ देशांत उद्योगधंदे नसले तरी चालतील पण देशांतील; संपत्तीचा द्रव्यौघ परकीय देशांकडे वहात नसावा. परकीयांचें राज्य किंवा अंमल म्हटला म्हणजे स्वदेशाच्या विपत्तीचें एक मोठें कारणच होय—मग तें परराज्य एतद्देशीयांचें असो किंवा परदेशीयांचें असो. जगांतील इतिहासाच्या अवलोकनानें एकच अबाधित सिद्धान्त नजरेस येतो तो असा कीं, परकीयांचा अंमल कोणत्याहि देशावर कोणत्याहि रूपानें एकदां बसला कीं, त्या देशांतील संपत्तीस ओहोटी लागलीच असें समजावें; मग त्यायोगें तो देश हळू हळू दुःस्थितीस जावो किंवा त्या देशाचा

ऱ्हास एकदम होवो; परकी अंमलामुळें देशांतील द्रव्य केवळ खंड-णीच्या किंवा करांच्या स्वरूपानें नष्ट होतें असें नाहीं तर मोठ-मोठ्या पगारांच्या व महत्त्वाच्या जागा परकीयच पटकावीत अस-तात त्या रीतीनें परकीय लोक आपला व्यापार वाढवून व इतर अन्य मार्गांनीं जित राष्ट्रास निर्जीव व निर्धन करीत असतात. परकीय अंमलामुळें देशांतील संपत्ति हरतऱ्हेनें धुऊन जाते हें विस्तारानें सिद्ध करण्याची अवश्यकता नाहीं. एकाच देशांतील परप्रांतीय सत्तेचेंहि असेच कमी प्रमाणानें अनिष्ट परिणाम होतात. उत्तरेकडील मौर्यांनीं दक्षिणेवर अंमल चालविणें किंवा दक्षिणच्या आंध्रभृत्यांनीं उत्तरे-वर अंमल बसविणें काय, दोन्ही प्रकार सारखेच अनिष्ट. पण ज्या कालासंबंधीं सध्यां विचार चालू आहे त्या वेळीं अशी जुलमी स्थिति सिंधप्रांताखेरीज हिंदुस्थानच्या कोणत्याही भागांत नव्हती हें ध्यानांत घेतलें पाहिजे. उत्तरेस, दक्षिणेस तसेंच पूर्वेस प्रांतवार स्वतंत्र राज्यें होतीं. कनोज, मालखेड व मोंगीर येथिल राज्यें तत्प्रांतीय असल्यामुळें त्या प्रांताच्या हितास संवर्धक होतीं. मराठ्यांचा अंमल बंगाल्यांत नव्हता किंवा बंगाल्यांच्या ताब्यांत आसाम प्रांत नव्हता. कनोजचा अंमल काठेवाड व उत्तर गुजराथ प्रांतांत होता पण शेवटीं गुजराथ प्रांतांत चावडा घराण्याची स्वतंत्र स्थापना झाल्यामुळें काठेवाड गुजराथ प्रांतांचेंहि स्वतंत्र राज्य लवक-रच झालें. इतर ठिकाणीं कनोजचें राज्य परकीय असें वाटण्याचें कारणच नव्हतें. दक्षिणेकडील राज्यांचीहि अशीच स्थिति होती. दक्षिणचें सम्राट् राजघराणें राष्ट्रकूटांचें होतें; त्यांचा अंमल सर्व दक्षिण प्रांतभर असून त्यांच्या छत्राखालीं बरेच मांडलिक राजे असत. पण त्या मांडलिकांसही आपल्या राज्यव्यवस्थेंत पूर्ण स्वतंत्रता होती; त्यांना प्रसंगविशेषीं सम्राटाचे दरबारीं मांडलिक

या नात्यानें हजर रहाणें भाग पडे व युद्धप्रसंगीं सम्राटास सहाय्य करावें लागे हें खरें; पण इतर बाबतींत ते पूर्ण स्वतंत्र असत. एका आरब प्रवाशानें तर असें लिहून ठेविलें आहे कीं, हिंदुस्थानांतील ज्या त्या प्रांतांत प्रांतीय राजेच राज्य करतात. दादाभाई नौरोजींनें परकीय अंमलापासून होणाऱ्या देशाच्या संपत्तीच्या ओहोटीचें जें अंत्यंत मार्मिक वर्णन केलें आहे तीं आर्थिक ओहोटी ( ड्रेन ) कोणत्याच राज्यांत नव्हती. यामुळें सर्व राज्यांची परिस्थिति भरभराटीची होती यांत नवल नाहीं. या भरभराटीचें दिग्दर्शन, देशांत पीकापाण्याची समृद्धि असून लोक हि पूर्ण समाधानी आहेत या आरबी प्रवाशाच्या वर्णनावरून मिळतें.

परराष्ट्रीय सत्तेची यत्किंचित हि छटा ज्याप्रमाणें देशांत कोठेंच दिसून येत नसे त्याप्रमाणेंच राज्यपद्धतीच्या अव्यवस्थेपासून हि लोकांची गांजणूक होत नसे; ह्याचें प्रमुख कारण म्हटलें म्हणजे तत्कालीन धान्याची पद्धति होय. हल्लींच्या काळीं शेतसारा एकदांच ठरवला जातो व तो रोकडीच्या रूपानें वसूल केला जातो; अवर्षणा-मुळें सूट मिळतेच असें नाहीं, त्यामुळें पाऊस पडला नाहीं तर शेत-कऱ्यास विनाकारण दुप्पट त्रास भोगावा लागतो. त्या काळीं अशी स्थिति नव्हती; शेतकऱ्यास आपल्या उत्पन्नापैकीं $\frac{1}{6}$ धान्य सरका-रांत द्यावें लागे व तें सुगीच्या वेळीं सरकारी अधिकारी वसूल हि करीत. एखादेवेळीं अवर्षण पडल्यास धान्य जसें कमी उत्पन्न होई तसेंच सरकारांत धान्य हि कमीच द्यावें लागे. नगदी धान्याची पद्धत सरकारच्या सोईची असते. धान्यवसुलीच्या पद्धतीनें रयतेची अडवणूक होत नाहीं.—दुसरें असें कीं, त्या वेळीं इतर करपट्टी नसे; जंगल किंवा अबकारीखातें नव्हतें हें पूर्वीं सांगितलेंच आहे व त्यामुळें हि रयतेवर नाहक बोजा पडत नसे; बिगारवेठीची पद्धति

त्या वेळीं होती हें खरें;पण त्यांत हि शेतकऱ्यास कमीच उपद्रव होई. शेवटची गोष्ट म्हटली म्हणजे राज्याचे अन्तस्थ शत्रु चोर व लुटारू यांचा चांगलाच बंदोबस्त होता असें आरबी प्रवाशांच्या वर्णनावरून दिसतें. कनोजच्या राज्यांत विशेषतः चोरादिकांस कडक शिक्षा असल्यामुळें तें राज्य चोर व लुटारूंच्या त्रासापसून मुक्त होतें. आणि या चोर लुटारूंच्या बंदोबस्तासंबंधीं इतर पूर्व व दक्षिणच्या राजांनीं कनोजचें अनुकरण केलें असावें.

कोणत्याहि देशांतील अनर्थांचें मुख्य बलवत्तर कारण म्हटलें तर परकीयांच्या स्वाऱ्या होत; हिंदुस्थान देशावर फार अनादि कालापासून तों तहत आतांपावेतों परकीयांच्या एकसारख्या स्वाऱ्या होत आल्या आहेत. फार प्राचीन काळीं ग्रीक, शक, कुशान, मुंड, व अलीकडे तिबेटी, हूण व अरब लोकांनीं अनुक्रमें स्वाऱ्या करून हिंदुस्थानास जर्जर करून सोडलें. अर्वाचीन कालांत तुर्क, मोंगल, पर्शिअन व अफगाण लोकांनीं हिंदूंचा पिच्छा पुरविला. पण ९ व १० या दोन शतकांची अशी मौज आहे कीं, त्या वेळीं हिंदुस्थान देशावर परक्यांची एक हि स्वारी झाली नाहीं;अरब लोकांनीं सिंधप्रांत काबीज केला होता परंतु ते पुढें सरले नाहींत,कारण त्यांचीच शक्ति दिवसें दिवस क्षीण होत चालली होती. तुर्क लोक अद्याप मध्यएशिया प्रांतांतच होते, त्यांस हिंदुस्थानच्या अलोट संपत्तीचा वास लागला नव्हता असें दिसतें. ह्या कारणामुळें परकीयांच्या स्वाऱ्यांमुळें होणाऱ्या जुलुमापासून हिंदुस्थान देश या काळांत मुक्त होता. यावर कोणी असें म्हणेल कीं, देशांत तर राहून राहून लढाया चालतच होत्या. जूर्झ व बल्हारा, तसेच राष्ट्रकूट व पाल यांजमध्यें सदैव वैर असे, मग देशांत लढाई नव्हती असें कसें म्हणतां येईल? यावर आमचें असें उत्तर आहे कीं, आपसांतल्या लढायांपासून किंवा

स्वाऱ्यांपासून देशाचें परकीयांच्या स्वाऱ्यांइतकें कधींच नुकसान होत नाहीं व लोकांसही उपद्रव पोहोंचत नाहीं. कारण आंतरराष्ट्रीय युद्धांत दोन्ही पक्षांतील लोक एकाच धर्माचे व जातीचे असतात; तसेंच दोन्ही पक्ष एकाच संस्कृतींत वाढलेअसून त्यांच्यांत परस्परांविषयीं थोडी फार सहानुभूति असते.परराष्ट्रांकडून व परधर्मीयांकडून होणाऱ्या स्वाऱ्या जास्त भयंकर व उपद्रवकारक असतात;कारण दोन्ही पक्षांत कोणत्याच प्रकारची सहानुभूति नसते; एवढेंच नाहीं तर परस्परांविषयीं तीव्र द्वेष असतो; दुसऱ्याचा नुसता पराभव व्हावा एवढीच बुद्धि नसून दुसऱ्याचा नायनाट व्हावा अशीच बुद्धि परकीयांच्या मनांत असते. राष्ट्रकूट किंवा पाल यांच्यांत ज्या लढाया किंवा स्वाऱ्या झाल्या त्यांतील उद्देश दुसऱ्यास आपलें वर्चस्व कबूल करण्यास भाग पाडणें एवढाच होता; दुसऱ्यांचें राज्य समूळ काबीज करण्याचा किंवा लोकांस उपद्रव देण्याचा उद्देश कधींच नव्हता; किंबहुना दुसऱ्या पक्षानें माघार घेतल्यास युद्धहि तत्काळ थांबे. युरोपच्या १५ व्या व १६ व्या शतकांतील इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व स्पेन यांच्यामधील वर्चस्वाकरतां झालेल्या चकमकींप्रमाणेंच ९ व्या व १०व्या शतकांतील हिंदुस्थानांतील युद्धें असत. युरोपांतील तुर्कांच्या स्वाऱ्यांप्रमाणें परकीयांचा प्रांत काबीज करण्यापेक्षां परकीयांस आपलें आधिपत्य कबूल करावयास लावणें एवढाच त्यांतील उद्देश होता. आंतां क्वचित्प्रसंगीं प्राचीन युद्धनीतीचा उच्छेद होत असे, शेतकऱ्यांच्या पीकांची नासाडीहि होई, क्वचित् प्रसंगीं जित प्रदेश उद्वस्त होत पण असले प्रकार ग्रीकांच्या स्वाऱ्यांनंतर हिंदुस्थानांत सुरू झाले एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे. हिंदुस्थानांत फार प्राचीन कालापासून युद्धप्रसंगीं हि अनीतींचें वर्तन क्वचितच होई. शत्रूस जेरीस आणणें, त्याचे प्रांत उध्वस्त करून त्यास क्षीणशक्ति करणें, वगैरे

प्रकार हिंदुस्थानच्या लोकांनीं ग्रीकांपासून उचलले यांत संदेह नाहीं. राष्ट्रकूटांचा गोविंदराज यानें कनोजची इतकी नासाडी केली कीं सुंदर हवेल्यांच्या ठिकाणीं गवताचीं रानें माजलीं व "कनोजला कुशस्थली हें नाव खरें शोभलें" पण असले प्रकार तेव्हां थोडे झाले असून मुसलमानांच्या स्वाऱ्यांनंतर अनंत झाले हें ध्यानांत घेतलें पाहिजे.

युद्धांपासून अनेक प्रकारची हानि आहे, पण त्याबरोबरच हेंहीं लक्षांत ठेविलें पाहिजे कीं बेतवार युद्धें राष्ट्राच्या वाढीस व प्रगतीस अवश्यक आहेत. लहानसहान चकमकींपासून लोकांत वीर्यस्फुरण कायम राहतें, व शौर्याची वृत्ति जागृत होते. लोकांतील धैर्यादि-गुणांची व कल्पकतेची वाढ होते. मात्र युद्धांत क्रौर्य किंवा अनुदारपणा नसावा. तेव्हां एक प्रकारें ९ वे व १० वे शतक अशीं थोडीं युद्धें नसल्यानें तेजस्वी व बलवानच होतें असें म्हणावयास हरकत नाहीं

या अत्यंत भरभराटीच्या काळींही हिंदूंचें एकराष्ट्र बनूं शकलें नाहीं किंवा या उत्कर्षाची पुढील काळांत लवकरच धुळधाण कां झाली वगैरे मनोरंजक प्रश्नांचा उलगडा होणें अवश्यक आहे. पण हे प्रश्न तितके बिकटहि आहेत व ते सोडवण्यास पुढील कालांतील इतिहासाचें ज्ञान अवश्य असल्यामुळें त्या प्रश्नांचा विचार पुढें ढकलणें प्राप्त आहे.

# परिशिष्ट

## १ सूर्यवंशी व चंद्रवंशी आर्यांचा वेदांतील उल्लेख.

पुस्त. ३ प्र. ३ पान १६ मध्यें सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रियांचा उल्लेख वैदिक वाङ्मयाइतका जुना आहे असें जें विधान केलें आहे त्याचें विस्तृतरीतीनें समर्थन करणें अवश्य वाटल्यावरून त्याचें विस्तृत विवेचन या टिप्पणींत केलें आहे—या विषयावर एक निबन्ध रायल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेपुढें सन १९१४ सालीं मी वाचला असून त्यांतील मुख्य मुद्दे मी येथें वाचकांपुढें ठेवीत आहें. हा निबंध एका दृष्टीनें या पुस्तकांत देणें योग्यहि आहे; कारण वैदिक आर्यांचा संबंध आठव्या नवव्या शतकांतील ब्राह्मण क्षत्रियांशीं येऊन पोहोंचतो आणि सूर्यशशिवंश मूळांत कविकल्पित असले तरी ते फार प्राचीन काळापासून कल्पिले गेले आहेत ही गोष्ट ऐतिहासिक रीत्या या पुराव्यावरून सिद्ध होते.

मिस्टर पार्गिटर यांनीं जर्नल रायल ऐशियाटिक सोसायटी १९१४ च्या एप्रिलच्या अंकांत एक निबंध प्रसिद्ध केला असून त्यांत पुराणांवरून क्षत्रियांच्या वंशावळी कशा सिद्ध आणि निश्चित होतात हें चांगल्या रीतीनें दाखविलें आहे. पण पार्गिटर साहेबांनीं त्या निबंधात एक दोन विधानें केलीं आहेत तीं मात्र साफ चुकीचीं आहेत असें प्रारंभींच सांगितलें पाहिजे. सूर्यवंशी क्षत्रिय हे द्रविडवंशाचे आहेत ही त्यांची समजूत केवळ चुकीची आहे. तसेंच चंद्रवंशी क्षत्रियांचें मूळ ठिकाण प्रयाग ऊर्फ अलाहाबाद होतें हेंहि त्यांचें म्हणणें ऐतिहासिक दृष्टीला सोडून आहे. या चुकीच्या कल्पनांचें मुख्य कारण असें आहे कीं पार्गिटर साहेबांनीं सर्वच भिस्त पुराणांवर ठेविली असून महाभारत व रामायण यांचाच तेवढा जास्त संग्रह आपल्या निबंधांत केला आहे. परंतु वैदिक वाङ्मयांतून मिळणाऱ्या पुराव्याशीं पुराणांवरून मिळणाऱ्या माहितीचा मेळ बसविण्याचा प्रयत्न त्यांनीं केला नाहीं; या साठीं या लेखांत प्रामुख्यानें वैदिक वाङ्मयांतील या-संबंधाची माहिती देण्याचा आम्हीं प्रयत्न करीत आहों. वैदिक वाङ्मय आम्हीं स्वतः चाळून पाहिलें नाहीं हें जरी खरें तरी अशा प्रकारची माहिती

मॅक्डोनेलचें वैदिक इंडेक्स या पुस्तकांत गोळा केली असल्यामुळें आमचें काम सुव्यम झालें आहे. जेथें जेथें आमचा मॅक्डोनेलच्या मतांशीं विरोध पडेल तेथें तेथें तसा उल्लेख करणें जरूरच आहे. पण प्रारंभीं एकंदर पाश्चात्त्य विद्वानांचे त्यांच्या शोधक बुद्धीनें केलेल्या वैदिक वाङ्मयांच्या आलोडनाबद्दल आभार मानणें अस्थानीं होणार नाहीं.

दुसरी एक महत्त्वाची विचारसरणीची चुकी पार्गिटर साहेबांच्या लेखांत आढळते, ती ही कीं ब्राह्मणांनीं जतन करून ठेवलेल्या माहितीपेक्षां क्षत्रियांनीं राखून ठेविलेली परम्परा जास्त विश्वसनीय आहे असें त्यांचें म्हणणें आहे. पुराणांतील वंशावळींतून जतन केलेली परम्परा ही क्षत्रिय परम्परा आहे, असें ते समजतात व यामुळेंच त्यांनीं पुराणांवर जास्त भिस्त ठेविली आहे. परंतु वास्तविक ब्राह्मण व क्षत्रिय यांत कमीजास्तपणा, विश्वसनीयतेच्या बाबतींत, मानणें चुकीचें होईल आणि अशा भिन्न परम्परा दोघांनीं निराळ्या ठेविल्या आहेत हेंही म्हणणें वाजवी नाहीं, कारण प्राचीन काळीं ब्राह्मण व क्षत्रिय हे एकमेकांचें क्वचित्प्रसंगीं विरोधी असले तरी बहुधा एकमेकांचे मित्र व साहाय्यकर्ते असत यांत संशय नाहीं. ते एकाच आर्यवंशाचे असून एकाच कुटुंबांतले हि होते ही गोष्ट या वंशावळीवरूनच सिद्ध होते. ज्याप्रमाणें जर्मनइतिहासांत सरदार कुटुंबांतील थोरला पुत्र प्रिन्स म्हणजे सरदार होत असे आणि धाकटा पुत्र प्रेवेट म्हणजे धर्माध्यक्ष होत असे तशीच स्थिति प्राचीन काळीं क्षत्रिय ब्राह्मणांची होती. अनेक क्षत्रिय राजपुत्र ब्राह्मण झाल्याचीं वर्णनें वंशावळींच्या पुराणांतील हकीकतींत दिसतात. बरें, अतिशयोक्ति करण्यांत दोघांचा मतलब असे हें उघडच आहे. क्षत्रियांनीं ब्राह्मणांच्या तपाची प्रशंसा करावी आणि ब्राह्मणांनीं क्षत्रियांच्या शौर्याची व औदार्याची प्रशंसा करावी. तेव्हां क्षत्रिय परम्परा जास्त विश्वसनीय आणि ब्राह्मणपरम्परा कमी असा भेद करणें शक्य नाहीं. आणि दोन्ही परंपरांच्या मनुष्य स्वभावाचा विश्वसनीयतेच्या चरकावर धरूनच विचार करावयास पाहिजे; व इतर मनुष्यसमाजांच्या परम्परांप्रमाणेंच त्यास लेखिलें पाहिजे. कारण सर्वच ठिकाणीं मनुष्य प्राचीन कथांविषयीं अतिशयोक्ति करण्यास प्रवीण असतो आणि सर्व देशांतल्या प्राचीन दन्तकथांत

कविकल्पना व अतिशयोक्ति भरलेली असते. त्यांतून ऐतिहासिक सत्य साधकबाधकप्रमाणें व मानवी शक्यता पाहून काढावें लागतें. तथापि थोडासा भेदच करावयाचा असेल तर ब्राह्मणांची मानलेली परम्पराच अधिक विश्वसनीय लेखावी लागेल. कारण हजारों वर्षांपूर्वी ऋषींनीं सूक्तांत किंवा ब्राह्मणग्रंथांत जे ग्रंथित केलें तें आज जसेंच्या तसे ब्राह्मणांनीं कायम ठेविलें आहे, वैदिक वाङ्मयांत फिरवाफिरव किंवा घुसवाघुसव झालेली नाहीं. तेव्हां जी काय अतिशयोक्ति किंवा कविकल्पना ऋषींनीं प्रथमच त्यांत घातली त्याहून जास्त मागाहून घुसली नाहीं किंवा त्याचें रूपान्तर झालें नाहीं. तात्पर्य प्राचीन भारती आर्यांच्या कल्पना व विचार आज हजारों वर्षें ब्राह्मणांनीं जसेंच्या तसेच मोहरबंद थैलींत घातल्याप्रमाणें जतन करून ठेविले आहेत याबद्दल ब्राह्मणांचे आभार मानावे तितके थोडे. वैदिक ग्रंथांप्रमाणें पुराणग्रंथ प्राचीन काळापासून भरतखण्डांत असून त्यांचेंहि रक्षण होण्यासाठीं आर्यांच्या प्राचीन समाजव्यवस्थेंत तरतूद होती, ही गोष्ट येथें नमूद केली पाहिजे. वेद पठण करून जतन करण्याची जबाबदारी जशी ब्राह्मणांनीं संभाळली होती त्याचप्रमाणें पुराणें म्हणजे वंशावळी व राजकथा जतन करण्याचें काम सूतांकडे सोंपाविलें होते. हें सूत पुराण सांगणारे व वंशावळी जतन करून ठेवणारे प्राचीन काळीं होते ही गोष्ट लोमहर्षण इत्यादिकांच्या कथेवरून स्पष्ट होते. हल्लीं वंशावळी जतन करण्याचें काम सूतांचे हल्लींचे वंशज भाट यांनीं चालविलें आहे. यामुळें हिंदुस्थानांत इतिहास-पुराण हा ग्रंथसमूह सूतांनीं बहुतेक वेदांप्रमाणेंच ढवळाढवळ झाल्याशिवाय हजारों वर्षें जतन करून ठेविला होता असें दिसतें. मिसर, खाल्डिया किंवा पालेस्टाइन या प्राचीन देशांत जशा वंशावळी काळजीपूर्वक जतन करून ठेविल्या होत्या तशाच हिंदुस्थानांतहि जतन करून ठेविलेल्या होत्या, इतिहासपुराण हा विषय शिष्यांच्या नेहमींच्या अभ्यासाचा असे व तो ब्राह्मण हि शिकत असें उपनिषदांवरून दिसतें. परंतु इतिहासपुराणांचा हा अविकृत प्रवाह बौद्धधर्माची सरशी झाल्यानंतर विच्छिन्न झाला. बौद्धकाळांत जातिव्यवस्था ढिली; पडली क्षत्रिय राजे नष्ट होऊन म्लेच्छ व शूद्र राजे आर्यावर्तांत झाले; अर्थात् त्यांस प्राचीन क्षत्रिय वंशावळींचा अभिमान राहिला

नाहीं; किंबहुना त्या त्यांनीं जाणूनबुजुन नष्ट केल्या असाव्या. यामुळें चद्रगुप्ताच्या वेळीं मेग्यास्थेनिसला ज्या वंशावळी मिळाल्या त्यांत व हल्लींच्या पुराणांच्या वंशावळींत बरेंच अन्तर पडलें आहे. या पुराणांच्या दुसऱ्या वाढलेल्या आवृत्त्या गुप्त राजांच्या अमदानींत इ. स. ३०० नंतर तयार झाल्या त्या वेळेस मागच्या विछिन्न वंशावळींना त्यांनीं कल्पना चालली तसें भलतेंच स्वरूप दिलें. मेग्यासथेनीस हा ६४५१ वर्षें व ३ महिने नक्की सांगून १३८ पिढ्या हिराक्लीज म्हणजे हरिपासून सांगतो तर पुराणांत एक हजार ठोकळ वर्षेंच आणि ५२ पिढ्या परीक्षितापासून नंदापर्यंत देतात. नंदांच्या नंतरच्या पिढ्या मात्र अलीकडच्या बौद्धांनीं ठेविलेल्या असल्यामुळें विश्वसनीय आहेत पण पुराणांत दिलेल्या पूर्वींच्या पिढ्या विश्वसनीय नाहींत असेंच म्हणावें लागतें. ब्राह्मणांनीं ठेविलेली वैदिक परंपराच अधिक विश्वसनीय असून पुराणांनीं दिलेली प्राचीन राजवंशावळ विच्छिन्न व कल्पनांनीं जमविलेली आहे असा आमचा सिद्धान्त आहे.

येथें पर्गिटरच्या आणि आमच्या दृष्टिकोनांतील हा मोठा फरक नमूद करणें जरूर आहे. आमच्या मतें पुराणांना पुराव्याच्या दृष्टीनें फार कमी किंमत आहे. पुराणांतील माहिती विच्छिन्न व बनावट आहे आणि नवीन कल्पनांना जुळती केलेली आहे. किंबहुना यवनग्रीकांच्या पूर्वींच्या ऐतिहासिक गोष्टींसंबंधानें विश्वसनीयतेच्या दृष्टीनें पुराव्याची क्रमवारी पुढीलप्रमाणें आहे असें आमचें मत आहे. व्याकरणशास्त्रभाषेंत बोलावयाचें तर पुढील पुराव्यांचें पूर्व प्रामाण्य आहे.

( १ ) ऋग्वेद सर्वांत अत्यंत जुना व अविकृत ग्रंथ असून त्याचें प्रामाण्य सर्वांत श्रेष्ठ आहे.

( २ ) यजुर्वेद व सामवेद यांचें कालदृष्ट्या यापुढचें प्रामाण्य आहे. ( या विचारांत अथर्व वेदाचा विचार करतां येत नाहीं. कारण त्याचा काळ अनिश्चित आहे. )

( ३ ) या तिन्ही वेदांचे ब्राह्मण ग्रंथ. मंत्रसंहितेनंतर यांचें पुराव्याच्या दृष्टीनें महत्व मोठें आहे. कारण ज्या ऋषींनीं मंत्र केले त्यांच्या कल्पना या ब्राह्मणकर्त्यांना जास्त परिचित होत्या हें निःसंशय आहे. अर्थात् अली-

कडील लोकांच्या किंवा ग्रंथकर्त्यांच्या विधानांपेक्षां ब्राम्हणांतील विधानांस जास्त महत्त्व दिलें पाहिजे हें निष्पन्न होतें.

( ४ )वेदांगें. यांच्या वेळीं संहिता व ब्राह्मणें हीं फार पुराणीं होऊन गेलीं होतीं; आणि बहुतेक हल्लींचे काळचे लोकांप्रमाणें वेदांगकर्ते हे वेदांच्या अर्थासंबंधानें बुचकळ्यांत पडलेले आहेत. परंतु त्यांच्या काळांतील गोष्टींसंबंधानें वेदांगें जास्त महत्त्वाचीं आहेत हें उघडच आहे. हीं सर्व वेदांगें बुद्धपूर्व असून ज्योतिष, निरुक्त, कल्पसूत्र, व्याकरण यांचा त्यांत समावेश होतो.

( ५ )गृह्य व धर्मसूत्रें हीं प्राचीन व कांहीं नंतरचीं आहेत.

( ६ )यांच्यानंतर कालानुरोधानें अलेक्झांडरबरोबर आलेले अरायन प्रभृति ग्रीक ग्रंथकार व मेग्यास्थेनीस यांचे ग्रंथ येतात. त्यांनीं प्रत्यक्ष पाहून व चौकशीअन्तीं ऐकिव जी माहिती नमूद करून ठेविली आहे, ती त्यांच्या काळासंबंधें अत्यंत विश्वसनीय आहे.

( ७ )महाभारत. हल्लींचें महाभारत इ. स. पू. २५० च्या सुमाराचें म्हणजे अशोकाच्या वेळचें म्हणून त्यांतील विधानें त्या काळासंबंधें महत्त्वाचीं आहेत.

( ८ )याच सुमाराचे बौद्ध व जैन यांचे प्राचीन धर्मग्रंथ त्रिपीटक वगैरे आहेत, त्यांतील माहितीहि महत्त्वाची आहे.

( ९ )वाल्मीकीचें रामायण. पतांजलीचें महाभाष्य, बादरायणाचीं सूत्रें व हरिवंश हे ग्रंथ यानंतर झालेले आहेत व जवळ जवळ एकाच काळाचे म्हणजे इ. स. पू. १०० च्या सुमाराचे असून या काळचा पुरावा देतात.

( १० )ज्योतिष ग्रंथ प्रारंभीचे, बौद्ध जैन ग्रंथ प्रारंभींचे,यानंतरचे ग्रीक लोकांच्या हिंदी राज्याविषयींचे इतिहास. यानंतरचे म्हणजे इ. सनाच्या प्रारंभीचे आहेत.

( ११ )यानंतर शेवटली पायरी पुराणांची आहे. हल्लीं जीं पुराणें उपलब्ध आहेत, त्यांचीं हल्लींचीं स्वरूपें इ. स. ३०० पासून ९०० पर्यंतचीं आहेत. अर्थात् पुराव्याच्या कागदांत त्यांचें महत्त्व शेवटचें आहे.

या सर्व ग्रंथांत मिळणारी ऐतिहासिक माहिती एकत्र केली पाहिजे हें

जरी खरें तरी त्यांचा पुराव्याच्या दृष्टीनें वरीलप्रमाणें क्रम आहे, आणि जर भिन्न भिन्न ग्रंथांत विरुद्ध पुरावा सांपडेल तर पूर्वप्रामाण्य मानलें पाहिजे.

परंतु पुराव्याच्या बाबींची यादी एवढ्यानें संपत नाहीं. अलीकडे दोन महत्त्वाचीं शास्त्रें अस्तित्वांत आलीं असून त्यांचे सिद्धान्तहि वरील विरोधांचा निर्णय करतांनां लक्षांत ठेविले पाहिजेत. हीं शास्त्रें म्हटलीं म्हणजे शीर्षमापनशास्त्र व भाषोत्पत्तिशास्त्र. मानवजातीच्या निरनिराळ्या वंशासंबंधानें व इतिहासासंबंधानें मनुष्यांचे चेहरे व मनुष्यांची भाषा यांच्या तुलनेवरून जीं अनुमानें निघतात तीं अतिशय महत्त्वाचीं असून बहुतेक अबाधित असतात. आणि अलीकडे हीं शास्त्रें बऱ्याच परिणत स्थितीला पोहोंचल्यामुळें व त्यांच्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या लोकांच्या भाषा व चेहऱ्यांच्या ठेवी यासंबंधानें बराच खोल अभ्यास पाश्चात्य विद्वानांनीं केला असल्यामुळें हिंदुस्थानच्या लोकांसंबंधानें विशेषतः वंशासंबंधानें या शास्त्रज्ञ पंडितांचीं अनुमानें मान्य करावयास पाहिजेत यांत शंका नाहीं.

यांशिवाय आणखी एका पुराव्याचा उपमान या नात्यानें आपल्या प्रस्तुत विषयासंबंधें उपयोग होतो असें आमचें मत आहे. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास पुष्कळ रीतीनें अमेरिकेच्या शोधापासून वसाहतीपर्यंतच्या अर्वाचीन इतिहासासारखा आहे असें आम्हांस वाटतें. प्राचीन काळीं हिंदुस्थान अमेरिकेप्रमाणेंच एक अरण्यावृत प्रचण्ड खण्ड होतें व यांत हीन संस्कृतीचे द्रविडवंशी लोक फारच तुरळक रीतीनें पसरलेले होते ज्या वेळीं भारती आर्य हिंदुस्थानांत आले त्यावेळीं हिंदुस्थानची परिस्थिति याप्रमाणें बहुतेक युरोपिय आर्य अमेरिकेंत गेले त्या वेळच्या अमेरिकेच्या परिस्थितीसारखी होती. 'व्हेंदिदाद' या पारशांच्या पुराणग्रंथांत आर्य लोक उत्तरेकडून निरनिराळ्या दक्षिणेकडच्या देशांत आल्याचा उल्लेख असून ते सप्तसिंधूंत जेव्हां आले तेव्हां अँग्रमन्यूनें त्या देशास सर्प आणि अतिशय उष्णता या दोषांनी ग्रासून टाकिलें तेव्हां तेथून हि निघून आर्य इराणांत गेले व तेथें त्यांस उत्तम देश वसाहतीस मिळाला अशी कथा आहे. अर्थात् यांत आर्य लोक उत्तरेकडून हिंदुस्थानांत म्हणजे पंजाबांत प्राचीन काळीं आल्याचा पुरावा मिळतो असें लोकमान्य टिळकांनीं आपल्या ऑर्क्टिक

होम या पुस्तकांत दाखविलें आहे. यापुढील हिंदुस्थानचा आर्यवसाहतीचा इतिहास अमेरिकेच्या आर्य वसाहतींच्या इतिहासासारखा असणें साहजिक आहे. मूळच्या रानटी लोकांशीं झालेले अनेक भयंकर युद्धप्रसंग तर त्यांत आहेतच व या लोकांपैकीं कित्येक जाति अमेरिकेंत व हिंदुस्थानांतहि नरमांसभक्षक होत्या हें प्रसिद्धच आहे. परंतु याबरोबरच येथील कित्येक प्राचीन गरीब जातींनीं बाहेरील आर्यांस मदत केली असली पाहिजे म्हणजे आपल्या जातभाईंच्या विरुद्ध त्यांनीं आर्यांस मदत करणें साहजिक अनुमानाला उतरतें. याशिवाय वसाहत करण्यास आलेल्या निरनिराळ्या आर्य लोकांच्या शाखांतच आपआपसांत तंटे झाले असले पाहिजेत. ज्याप्रमाणें अमेरिकेंत स्पॅनिश व फ्रेंच हे प्रथम गेले व मागून इंग्लिश व डच गेले व त्या दोघांत प्रथम कित्येक युद्धें झालीं त्याप्रमाणें हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत व अमेरिकेच्या वसाहतींच्या इतिहासांत युद्धादि बरेंच साम्य असलें पाहिजे हें उघड आहे.

याप्रमाणें हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचें स्वरूप ठरवितांना कोणकोणत्या पुराव्यांचा आपल्यास उपयोग होतो आणि त्यांची प्रतवारी कशी आहे ह्या गोष्टींचा ऊहापोह झाल्यावर आपण आपल्या विषयाकडे वळूं आणि सूर्यवंशी आणि चंद्रवंशी आर्य हिंदुस्थानांत आल्याचा इतिहास ऋग्वेदावरून आपण निश्चित करूं.

प्रथम गोष्ट निदर्शनास येते ती ही कीं, आर्यलोक दोन भिन्न समूहांनीं भिन्न वेळीं भिन्न रस्त्यानें हिंदुस्थानांत आले. हीच गोष्ट त्यांच्या या दोन नांवांवरून म्हणजे मानलेल्या वंशांवरूनच सिद्ध होते. आणि याचा आणखी पुरावा ऐतिहासिक परंपरा, शीर्षमापनशास्त्र आणि भाषोत्पत्तिशास्त्र यांतहि मिळतो. ह्या दोन भिन्न आर्यटोळ्यांच्या येण्याचा सिद्धान्त प्रथम डॉ. होर्नेल यानें जगतासमोर मांडला असें वाटतें आणि तो डाक्टर ग्रीयर्सन यांनीं हिंदुस्थानांतील संस्कृतोत्पन्न भाषांच्या तुलनेवरून मान्य केला ( इंपीरियल गाझेटीयर भाग पा. ३५८ पाहा ). १९११ सालच्या सेन्सस रिपोर्टांतील पुढील मजकूर महत्त्वाचा आहे. "ह्या ( हिंदुस्थानांतील संस्कृतोत्पन्न ) भाषा डाक्तर होर्नेल यांच्या मतानें दोन

आर्य टोळ्यांनीं हिंदुस्थानांत आणल्या. उत्तर हिंदुस्थानच्या मैदानी (गंगोत्तर) प्रदेशांत पहिल्या आर्यटोळीनें वसाहत केल्यानंतर दुसरी आर्यटोळी आली आणि वसाहत केलेल्या लोकांच्या मध्यें पाचरीप्रमाणें घुसली व तेथील पूर्वींची भाषा दाबून टाकून अंबाल्यापासून दक्षिणेकडे जबलपूरपर्यंत व नैॠत्येकडे काठेवाडापासून इशान्येकडे नेपाळपर्यंत पसरली. या दुसऱ्या आर्यांच्या टोळीच्या भाषेची हल्लींची वारसदार पश्चिम हिन्दी भाषा आहे; आणि पूर्वी आलेल्या आर्यांच्या भाषेचा प्रदेश राजस्तानी, पंजाबी, पाहाडी आणि पूर्व हिंदी यांनीं व्यापिला आहे." ( सेन्ससरिपोर्ट १९११ पा. ३२५ ).

हल्लींच्या संस्कृतोत्पन्न बोलल्या जाणाऱ्या भाषांच्या तुलनेनें उत्पन्न होणारा हा सिद्धांत शीर्षमापनशास्त्रावरून निघणाऱ्या सिद्धान्ताशीं जुळता आहे. सन १९०१ च्या सेन्ससच्या वेळीं सर एच. रिस्ले यांनीं शीर्षमापें अनेक ठिकाणीं घेतलीं त्यावेळीं असें दिसलें कीं, पंजाब आणि राजस्तान येथील लोक निःसंशय आर्य असून त्यांचीं डोकीं लांब आहेत व नाकें उंच व तरतरीत आहेत. संयुक्तप्रांतांतील लोक मध्यम डोक्याचे आणि मध्यम उंचीच्या नाकाचे आहेत आणि यावरून ते आर्यद्रविड मिश्रणाचे आहेत असें रिस्ले साहेबांनीं अनुमानिलें. परंतु येथें रिस्ले साहेबांची एक मोठी चूक झाली आहे ती ही कीं, हे आर्य पूर्वींचे आर्य म्हणजे लांब डोक्याचे आर्य होते अशी त्यांची समजूत दिसते. कारण द्रविडवंशी लोकांचीं डोकींहि लांबच असतात असें सिद्ध झालें आहे. त्यांच्या व आर्यांच्या चेहरेपट्टींतील मुख्य फरक म्हणजे पहिल्यांचीं नाकें बसकीं असतात आणि आर्यांचीं नाकें उंच असतात. तेव्हां संयुक्त प्रांतांतील मूळच्या द्रविडवंशी लोकांशीं ज्या आर्यांचें मिश्रण झालें असें नाकांवरून व डोक्यावरून सिद्ध होतें ते आर्य पूर्वींचे पंजाब राजस्तानच्या आर्यांहून भिन्न आर्य असले पाहिजेत; म्हणजे त्या आर्यांचीं डोकीं रुंद असलीं पाहिजेत तेव्हांच मध्यम प्रमाणाचीं डोकीं वंशमिश्रणानें होतील. तात्पर्य संयुक्तप्रांतांतील बऱ्याच भागांतील लोकांच्या शीर्षप्रमाणावरून या भागांत वसाहत केलेले आर्य दुसऱ्या टोळीचे आर्य होते हें निःसंशय आहे.

पंजाबांतील व राजपुतान्यांतील लोकांचीं हल्लीं डोकीं लांब असून त्यांचीं नाकें उंच तरतरीत असतात. ते लोक पहिल्या आर्य टोळी पैकीं आहेत हेंहि निःसंशय आहे. आर्यवंशांत युरोप खण्डांतहि दोन प्रकारच्या शीर्षमापाचे लोक आहेत हें येथें सांगितलें पाहिजे. दोघांचींहि नाकें उंच असलीं तरी डोकीं लांब किंवा रुंद अशीं दोन्ही प्रकारचीं आहेत. इंग्लिश, जर्मन, स्कॅंडिनेव्हियन वगैरे ट्यूटॉनिक आर्यवंशी लोक लांब डोक्याचे आहेत आणि आयरिश, फ्रेंच वगैरे केल्ट लोक रुंद डोक्याचे आहेत. तेव्हां हिंदुस्थानांत दोन प्रकारच्या डोक्यांचे आर्य लोक आले व आहेत यांत आश्चर्य नाहीं. संयुक्त प्रांत, गुजराथ, काठेवाड, महाराष्ट्र सुद्धां या प्रदेशांत रहाणारे आर्य उंच नाकाचे असून रुंद डोक्याचे आहेत. तात्पर्य ऐतिहासिक अनुमान, शीर्षमापनशास्त्र व भाषोत्पत्तिशास्त्र यांजवरून असें निघतें कीं, प्रथम आलेले लांब डोक्याचे आर्य पंजाब वगैरे प्रदेशांत मिथिलदेशापर्यंत पसरल्यावर मागाहून दुसरी आर्यांची रुंद डोक्याची शाखा मध्येंच गंगा खोऱ्यांतून उतरून अंबाला वगैरे ठिकाणीं सरस्वतीतीरानें दक्षिणेकडे पसरली. ही आर्यशाखा मूळच्या द्रविडवंशी लोकांशीं मिश्रित होऊन हल्लींची संयुक्त त्याचप्रमाणें मध्य प्रांत, वऱ्हाड, महाराष्ट्र, गुजराथ, व काठेवाड या प्रदेशांत दिसणारी मध्यमशीर्षमापाची व मध्यम उंच नाकाची जनता बनली आहे.

शीर्षमापनशास्त्र व भाषोत्पत्तिशास्त्र यांवरून निघणारें हें अनुमान हिंदुस्थानच्या पौराणिक परम्परेनें आणखी दृढ होतें. महाभारत, हरिवंश, पुराणें वगैरे प्राचीन दंतकथा संकलित करणाऱ्या ग्रंथांतून सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रिय असे जे दोन सांगितले आहेत तेच हे दोन निरनिराळ्या वेळीं आलेले आर्य लोक होत असें आमचें मत आहे. महाभारतांतील श्रीकृष्णाच्या एका भाषणांत याविषयीं स्पष्ट उल्लेख आहे. सभापर्वांत राजसूय यज्ञ मी करूं किंवा नको या युधिष्ठिराच्या प्रश्नास उत्तर देतांना श्रीकृष्ण म्हणाला " ऐल आणि ऐक्ष्वाक अथवा चंद्र आणि सूर्य यांपासून उत्पन्न झालेल्या क्षत्रियांचीं हल्लीं आर्यावर्तांत एकशें एक कुळें आहेत. यांपैकीं भोजकुल सर्वांत जास्त प्रसृत असून हल्लीं मध्य देशांत राहत आहे." यावरून महाभारत काळीं क्षत्रियांचे दोन वंश मानले जात

आणि त्यांपैकीं चंद्रवंशी जास्त पुढें असून मध्यदेशांत राज्य करीत असें स्पष्ट अनुमान निघतें. पहिले आलेले व विशेषतः पंजाबांत वसाहत केलेले आर्य हेच सुर्यवंशी समजले जात आणि कुरुक्षेत्र, पांचालचे वगैरेहि यमुना किनाऱ्यानें राज्य करणारे क्षत्रिय राजे चंद्रवंशी मानले जात हीहि गोष्ट तितकीच स्पष्टपणें दिसते आणि अयोध्या मिथिला वगैरे गंगोत्तर प्रांतांत राज्य करणारीं राजकुलें हीं मागें पडलेलीं असून सूर्यवंशी मानलीं जात होतीं असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. या अनुमानांना ऋग्वेदांतील पुराव्यावरून बळकटी कशी येते हें मुख्यतः पुढील विवेचनावरून वाचकांच्या निदर्शनास आणणें आहे.

ऋग्वेदांत ज्या आर्य लोकांचा वारंवार उल्लेख येतो त्यांना भरत अशी संज्ञा दिलेली आढळते. प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं, या नांवासंबंधानें बहुतेक पाश्चात्त्य व प्राच्य विद्वानांचा गैरसमज झालेला दिसतो. असा गैरसमज होणें साहाजिकहि आहे; कारण सामान्यतः आपल्यास भारत म्हणजे दुष्यन्तपुत्र भरत यांचे वंशज भरत अथवा भारत हीच कल्पना सुचते. महाभारती युद्ध व भारती ग्रंथ यांचा दृढ परिचय झाल्यानें हा गैरसमज सहज आहे; पण ज्याअर्थी पूरुवंशाचे म्हणजे चंद्रवंशी लोक कुरुक्षेत्रांत वसती करून पुढें यमुनेच्या किनाऱ्यानें पसरले हें आपण पूर्वी ठरविलें आहे तेव्हां ऋग्वेदांत मुख्यतः पंजाबांत वसाहत करणाऱ्या आर्य लोकांस भरत असें कसें म्हटलें ही जबर अडचण उपस्थित होते आणि मॅक्डोनलप्रभृति पाश्चात्त्य विद्वानांनीं ही अडचण न जुमानतां किंवा ही अडचण न पडल्यानें असेंच मानलें आहे कीं, ऋग्वेदांतील भरत म्हणजे महाभारतांतील भारत होत. परंतु ही समजूत चुकीची असून पुराणांतीलच कित्येक स्पष्टपणें ध्यानांत न येणाऱ्या वचनांवरून ही अडचण दूर होते. दौष्यन्ति भरताहून अगदीं भिन्न असा एक भरत राजा मनुकुळांत झाला होता त्याच्यावरून भरत हें नांव उत्पन्न झालें असें कित्येक पुराणांत स्पष्ट आढळतें. उदाहरणार्थ भागवत एकादश स्कंध अध्याय १२ यांत पुढील श्लोक आहेत.

प्रियव्रतो नाम सुतः मनोः स्वायम्भुवस्य यः। तस्याग्नीध्रस्ततो नाभिर्ऋ-

षभस्तत्सुतः स्मृतः ॥ तमाहुर्वासुदेवांशं मोक्षधर्मविवक्षया । अवतीर्णं पुत्रशतंतस्यासीद्ब्रह्मपारगम् । तेषां वै भरतो ज्येष्ठां नारायणपरायणः । विख्यातं वर्षमेतत्तन्नाम्ना भारतमुत्तमम् ॥ १७ ॥

भागवतांत पंचम स्कंधाच्या ७ व्या अध्यायांत हीच गोष्ट पूर्वीं सांगितलेली आहे. " अजनाभं नामैतद्वर्षं भारतमिति यत आरभ्य व्यपदिशन्ति ।" या वचनावरून हें स्पष्ट आहे कीं, हिंदुस्थानाला भारतवर्ष ही संज्ञा ज्या भरतावरून पडली तो भरत पहिल्या ( स्वायंभुव ) मनूचा प्रपौत्र भरतराजा होय. भागवताप्रमाणें वायुपुराणांतहि हीच परम्परा दिली आहे. प्रियव्रतानें सप्तद्वीपा पृथ्वी आपल्या सात पुत्रांत वांटून दिली त्यांत अग्नींध्राला जम्बूद्वीप मिळालें. त्यानें तें आपल्या मुलांस वांटून दिलें त्यांत नाभि याला जो मुलुख मिळाला तो त्याचा पुत्र ऋषभ यानें आपल्या पुत्रांत वांटला तेव्हां भरताला हिमालयाच्या दक्षिणचा देश मिळाला. या पुराणांत अध्याय ३३ मध्यें पुढील श्लोक आहे. हिमाद्रेर्दक्षिणं वर्षं भरताय न्यवेदयत् । तस्मात्तं भारतं वर्षं तस्य नाम्ना विदुर्बुधाः ॥ ५२ ॥ तेव्हां पुराणांच्या परम्परेवरून या देशाला भारतवर्ष नांव देणारा भरत हा दुष्यन्तपुत्र नसून स्वायंभुव मनूचा पणतु भरत होता हें निर्विवाद आहे.

वायुपुराणांत भरतवर्षशब्दाची आणखी व्युत्पत्ति दिली आहे त्यांत भरत म्हणजे मनुच असें म्हटलें आहे.

> वर्षोयं भारतो नाम यत्रेयं भारती प्रजा । भरणाच्च प्रजानां वै
> मनुर्भरत उच्यते । निरुक्तवचनाच्चैव वर्षं तद्भारतं स्मृतम् ॥
> ७६ अध्याय ४५.

मत्स्यपुराणांत हीच कल्पना दिली असून हेच श्लोक शब्दशः तेथेंहि आले आहेत. तेव्हां भरत म्हणजे मनु अशीहि परम्परा होती आणि निरुक्तांतहि तशीच आहे. दुष्यन्तपुत्र भरताचा संबंध कोणीहि लावीत नसून त्याच्या पूर्वीं हजारों वर्षें झालेल्या अन्य नृप भरताशीं किंवा प्रत्यक्ष मनूशीं पुराणपरंपरेनें संबंध जोडला आहे. वायुपुराणांतील व मत्स्यपुराणांतील श्लोकांत निरुक्तवचनांत म्हटलें आहे तेंहि साधार आहे, कारण यास्क भरत शब्दाचा अर्थ आदित्य असा देतो. भारती शब्दाचा अर्थ देतांना " भरतः-

आदित्यस्तस्य भा भारती" अशी त्यानें निरुक्ति केली आहे. निरुक्त आणि पुराणें यांनीं दिलेली ही कल्पना ऋग्वेदापासून चालत आलेली आहे आणि ऋग्वेदांत ज्या भरतांचा उल्लेख वारंवार येतो ते या भरताचे वंशज आहेत, दौष्यन्ति भरताचे नव्हत हें पुढील विवेचनावरून विशद होईल.

पण तें विवेचन करण्यापूर्वी आपण अमेरिकेच्या इतिहासाचें येथें तुलनेसाठीं उपमान घेऊं. हिंदुस्थानाप्रमाणेंच अमेरिकेची वसाहत पाश्चात्य आर्यांच्या दोन टोळ्यांनीं भिन्न वेळीं केली. स्पानिश व पोर्तुगीज व त्यांचेच बरोबर इतालियन व फ्रेंच हे जे प्रथम अमेरिकेंत गेले, ते एकवंशी म्हणजे लातिन वंशाचे लोक होते. त्यांच्या मागून नवीन प्रदेश शोधून वसाहत करणारे डच व इंग्लिश जर्मन वंशाचे होते. तथापि सर्व अमेरिकाखण्डाला अमेरिका हें नांव ज्यावरून पडलें तो अमेरिगो एक इतालियन होता व त्यानें दक्षिण अमेरिकेच्या भूमीवर प्रथम पाय ठेविला होता. तो बहुतेक कोलंबसाचा समकालीन होता. परंतु कोलंबसास मुख्य खण्ड न सांपडतां नुसतें एक बेट सांपडलें यामुळें सबंध खण्डाला नांव देण्याचा मान अमेरिगोला सर्वानुमतें मिळाला यांत आश्चर्य नाहीं. हीच गोष्ट हिंदुस्थानांत घडली. हिंदुस्थानांत प्रथम आलेल्या भरत राजावरून या देशास भारतवर्ष हें नांव मिळालें. याचेच वंशज सूर्यवंशी क्षत्रिय म्हणून पुराणांत प्रसिद्ध आहेत आणि ते पंजाबापासून मिथिलेपर्यंत पसरलेले पुराणांत दिसतात. हीच गोष्ट ऋग्वेदावरून कशी सिद्ध होते हें आतां आपण पाहूं.

मॅक्डोनेलनें आपल्या 'वैदिक इंडेक्स' नामक पुस्तकांत भरत शब्दापुढें खालील माहिती दिली आहे ( भाग २ पान ९५ ) "भरत हें नांव एका महत्वाच्या लोकांचें असून तें ऋग्वेदाच्या तिसऱ्या व सातव्या मंडळांत वारंवार येतें. सुदास व त्रित्सु यांच्यासंबधानें या मंडळांत तें येत असून सहाव्या मंडळांत त्यांचा संबंध दिवोदास राजाशीं जोडलेला आढळतो." येथें उल्लेखिलेलीं ऋग्वेदसूक्तें आम्हीं मुद्दाम काढून पाहिलीं त्यांत पुढील माहिती निष्पन्न झाली. पहिली गोष्ट ही कीं, या भरतांचे पुरोहित वसिष्ठ होते. पुराणांतील परम्परेनें वशिष्ठ हे सूर्यवंशी क्षत्रियांचेच पुरोहित होते, चंद्रवंशीयांचे कधीच नव्हते. अर्थात् प्रथम आलेल्या

आर्यांचे वसिष्ठ हेच पुरोहित असून या आर्यांचें ऋग्वेदांत भरत असें नांव आहे आणि पुराणांतून यांनांच सूर्यवंशी क्षत्रिय म्हटलें आहे. वसिष्ठ अनेक वचनी शब्द वसिष्ठकुलोत्पन्नवाची आहे आणि त्यास ऋग्वेदांत त्रित्सु अशीहि संज्ञा आहे. ऋग्वेदाचें सातवें मण्डळ हें वसिष्ठकुलऋषींनीं केलेल्या सूक्तांचें आहे तेव्हां साहजिकच त्यांत भरतांचा वारंवार उल्लेख येतो. या मण्डळांतील ३२ वें सूक्त फार महत्त्वाचें आहे. त्यांत एका दाशराज्ञ युद्धाचा उल्लेख असून त्यांत भरतांचा पराभव होऊन ते विस्कळित झालेल्या काठ्यांप्रमाणें झाले, तेव्हां वसिष्ठानें पुढें होऊन इंद्राच्या स्तुतीनें त्यांस जय मिळवून दिला असें वर्णिलें आहे (दण्डा उवेद्गो अजनास आसन् परिच्छिन्ना भरता अर्भकास:। अभवच्च पुरत वसिष्ठ आदित्रित्सुना र्विशो अप्रथन्त। ). याच सूक्तांत वसिष्ठाची उत्पत्ति मैत्रावरूण या दोन देवांपासून उर्वशीच्या पोटीं झाल्याचें वर्णन आहे. अर्थात् खुद्द वसिष्ठ ऋषि या सूक्ताच्या काळीं-हि प्राचीन देवपरंपरेपैकीं मानला गेला होता असें दिसतें. दुसरी गोष्ट भरताच्या अग्नीचा उल्लेख ऋग्वेदांतील कित्येक सूक्तांत आला आहे. भरत म्हणजे आर्य लोक हे अग्निपूजक असून दास म्हणजे हिंदुस्थानचे त्यावेळचे प्राचीन रहिवाशी या विरुद्ध होते असें ऋग्वेदावरून स्पष्ट दिसतें. कित्येक प्रसिद्ध राजांनीं पूजिलेले व नेहमीं संवर्धन केलेले अग्नि ऋग्वेदांत उल्लिखित आहेत. अर्थात् भरताचा अग्नि म्हणजे आर्यांचा धर्म अशी लक्षणा होऊन बसली. ऋग्वेदमण्डल ७ सूक्त ८ यांत या अग्नीचा उल्लेख असून भरत राजाचाहि स्पष्ट निर्देश आहे ( प्रप्रायमग्निर्भरतस्य शृण्वे अभि यः पूरुं पृतनासु तस्थौ ). हा भरताचा अग्नि ज्यानें युद्धांत पूरूचा पराभव केला असें हें वाक्य असून यांतील पूरु हा कोण हा एक वादग्रस्त प्रश्न येथें उपस्थित झाला आहे. पूरु शब्दाखालीं मॅकडोनेलनें या सूक्ताचा उल्लेख केला आहे व असेंहि सुचित केलें आहे कीं, पूरु म्हणजे दुष्यन्ताचा पूर्वज ययातिपुत्र असावा व पूरूचा उल्लेख कित्येक ऋग्वेदसूक्तांत अनेक वचनी पूरुवंशी लोक या अर्थानें आला आहे. परंतु शतपथ ब्राह्मणांत एके ठिकाणीं या सूक्तांतील पूरु हें एका असुराचें नांव आहे, असें म्हटलें आहे यावर मॅक्डोनेल म्हणतो " शतपथ ब्राह्मणांच्या काळीं पूरूची आठवण इतकी बुजली होती

कीं त्याचें रूपान्तर असुरांत झालें" हें मॅक्डोनेलचें म्हणणें अगदींच चुकलेलें आहे हें विस्तारानें दाखविण्याची जरूरी नाहीं. आम्ही प्रारंभीं म्हटलेंच आहे कीं, ऋग्वेदादि संहिताग्रंथानन्तर प्रथम प्रमाणभूत ग्रंथ ब्राह्मणग्रंथ होत. तेव्हां मॅक्डोनेलच्या कल्पनेपेक्षां शथपथाचेंच म्हणणें जास्त विश्वसनीय व मान्य आहे. शतपथकर्त्या याज्ञवल्क्यादि ऋषींना ऋग्वेदसूक्तांचा जितका खरा अर्थ कळत होता तितका आम्हांस कळणें शक्य नाहीं हें काय सांगावयास हवें !!! शिवाय ज्या पूरूचा पराभव भरतानें केला तो कोणी तरी असुर म्हणजे द्रविडवंशी दासांचा राजा असावा, तो ययातीचा पुत्र आणि दुष्यन्ताचा पूर्वज होऊं शकत नाहीं. कारण हा भरत पूर्वी आलेल्या सुर्यवंशी क्षात्रियांचा राजा असून तो पुरूचा समकालीन असणें शक्य नाहीं. पण या वाक्यावरून एक गोष्ट पक्की निश्चित होते ती ही कीं, हा भरत म्हणजे दुष्यन्तपुत्र भरत नव्हे कारण तो त्या दौष्यन्ति भरताचा अनेक पिढ्यांपूर्वींचा पूर्वज जो पूरु त्याच्याशीं कसा लढूं शकेल ? तेव्हां पूरूचा पराभव करणारा भरत हा सूर्यवंशी प्राचीन भरत राजा असून त्याच्याच अग्नीची प्रशंसा या व इतर सूक्तांत केलेली आहे. हें थोडेंसें विषयान्तर झालें खरें तरी त्यावरून केवळ नामसादृश्यानें पाश्चात्य पण्डित कधीं कधीं कसे चुकतात व ब्राह्मणग्रंथांनाहि बाजूला सारण्याकडे कसे प्रवृत्त होतात हें दिसून येईल. भरत आणि पूरु या दोन नांवांचा दुसरा भरत आणि पूरु यांशीं घोटाळा केल्यानें पाश्चात्य पंडित चकले आहेत आणि हिंदुस्थानच्या वैदिककालीन इतिहासासंबंधानें कित्येक चुकीचीं विधानें त्यांनीं केलीं आहेत.

असो, ऋग्वेदमंडळ सूक्त ३३ व ८ यांत भरतांचा उल्लेख असून त्या लोकांचे पुरोहित वसिष्ठ होते, भरत हा एक मूळचा राजा असून तो वैदिक धर्मी अग्निपूजक होता, त्यांच्या वंशजांस भरत म्हणत, त्यानें एतद्देशीय प्राचीन रहिवाशांच्या पूरु राजाचा पराभव करून येथें आपलें राज्य स्थापिलें त्याच्या वंशजाचे म्हणजे भरतांचें पुढें एक दाशराज्ञ युद्ध मोठें कडावयाचें झालें, त्यांत त्यांचा पराभव होत होता तो वसिष्ठानीं इंद्रस्तुति करून टाळिला अशी ऐतिहासिक हकीकत वरील विवेचनावरून निष्पन्न होते. तसेंच हे

दाशराज्ञ युद्ध परुष्णी नदीच्या कांठीं पंजाबांत झालें. यांत भरतांचा सुदास नांवाचा राजा होता, त्यांच्या विरुद्ध दहा राजे लढण्यास उभे होते. त्यांच्याशीं लढतांना कच खाऊन सुदास व भरत परूष्णी नदी ओलांडून पलीकडे गेला तेव्हां नदीनें वाट दिली; परंतु दहा राजांना पाठलाग करतांना परुष्णीनें वाट दिली नाहीं;व त्या नदचिा पाट फोडून पाणी कमी करीत असतांना पाण्याच्या पुरानें दहा राजांच्या फौजेची वाताहात झाली व शेवटीं, सुदास राजाला पुष्कळ लूट मिळाली वगैरे मनोरंजक हकीकत या सूक्तावरून ( मं. ७ सू. ३३ ) निष्पन्न होते ( यदङ्ग त्वा भरताः सन्तरेयुः गव्यन् ग्राम इषिते इन्द्र जूत ॥ वगैरे ऋचा पाहण्यासारख्या आहेत. ) हे दहा राजे भरताशीं लढणारे कोण होते याचा पुढें विचार येईल. तिसऱ्या मण्डळांतील भरतांचा उल्लेख करणारें महत्त्वाचें सूक्त ५३ वें आहे. यांत विश्वामित्रानें सुदास राजास ( अन्य प्रसंगीं ) आपल्या ऐंद्र स्तुतींनीं मदत केल्याचा उल्लेख आहे. (विश्वामित्रो यदवहत्सुदासमप्रियायत कुशिकेभिरिन्द्र ). या सूक्तांतील 'विश्वामित्रस्य रक्षति ब्रह्मेदं भारतं जनम्' ही ऋचा फारच महत्वाची आहे. ' विश्वामित्राचें हें ब्रह्म ( ईशस्तोत्र ) भारत लोकांचें रक्षण करतें' या वाक्यावरून तीन चार अनुमानें निघतात. या वेळीं भरताची संतति फार पसरली असून त्यांस भारतजन असें म्हणण्यांत येई. किंबहूना येथें हल्लींच्या भारतवर्षाची आठवण येते. दुसरें, भारतांचा राजा सुदास असून त्यास विश्वामित्रानें आपल्या ईशस्तुतींनीं वांचविलें. ह्या विश्वामित्राच्या कुलास कुशिक असें म्हणत. वसिष्ठ व विश्वामित्र यांच्या पौराणिक कथेंतील तंट्याचा येथें आपल्यास सुगावा लागतो. वसिष्ठ आणि विश्वामित्र हे दोघेहि सुदासाचे हितकर्ते व देवांची स्तुति करणारे पुरोहित दिसतात. अर्थात् ते कधीं कधीं आपसांत भांडतहि असावेत. रामायणकथेंत वसिष्ठ व विश्वामित्र हे दोघेहि रघुकुलाचे हितकर्ते दाखविले आहेत. सूर्यवंशी क्षत्रियांच्या हकीकतींत सुदास, राम, दशरथ, व हरिश्चंद्र यांच्याशीं विश्वामित्र व वसिष्ठ या दोघांचाहि संबंध येतो. हरिश्चंद्रानें आपला मुलगा वरुणास अर्पण करण्याचें कबूल करून वचन पाळलें नाहीं तेव्हां त्यास उदर झालें. पुढें शुनःशेप नांवाचा ब्राह्मणपुत्र विकत घेऊन त्यास( रोहित )पुत्रा-

च्याऐवजीं वरुणास बळी देण्याच्या तयारीनें यज्ञ आरंभिला, तेव्हां शुनःशेपानें वरुणाची प्रार्थना करून आपली सुटका करून घेतली;व विश्वामित्रानें शुनःशेपास आपला पुत्र म्हणून आपल्या कुलांत देवरात नावानें घेतलें वगैरे कथा ब्राह्मणांत व पुराणांत असलेली प्रसिद्ध आहे. शुनःशेपाचें वरुणस्तोत्र ऋग्वेद मण्डळ १ मध्यें आहे. तात्पर्य विश्वामित्र हा वेदांत भरतांचा एक ऋषि आहे आणि पुराणांत सूर्यवंशीयांचा आहे. सुदास—कल्माषपादाची कथा रामायण उत्तरकाण्ड अध्याय ६५ त आहे. वाल्मीकि शत्रुघ्नास ही कथा सांगतो. सुदास हा शत्रुघ्नाचा एक पूर्वज असून तो कुलगुरु वसिष्ठाशीं भांडला तेव्हां वसिष्ठशापानें कल्माषपाद झाला व शेवटीं त्यास विश्वामित्राच्या मदतीनें मुक्तता मिळाली अशी ही कथा आहे. वसिष्ठ विश्वामित्रांची ही चढाओढ ऋग्वेद सूक्तांतून पुराणांप्रमाणेंच दिसते, दाशराज्ञ युद्धांत वसिष्ठानें सुदासास मदत केली त्याप्रमाणें विश्वामित्रानें सुदासास पूर्वेकडे विपाशा व शतद्रु नद्या वलांडण्यास मदत केली. वसिष्ठ—विश्वामित्रांचा उल्लेख पुराणांतून सूर्यवंशी क्षत्रियांच्या कथेंत येतो; परंतु चंद्रवंशीयांच्या कथेंत येत नाहीं. सारांश आम्हीं जें अनुमान काढलें आहे कीं, ऋग्वेद मण्डळ ७।३ यांतील भरत म्हणजे सूर्यवंशी आर्य होत तें बळकट आधारावर काढलें आहे असें म्हणतां येतें.(३ रें मण्डळ विश्वामित्राचें आहे.)

भरतांचा आणखी ज्या एका मंडळांत उल्लेख असल्याचें मॅक्डोनेलच्या वैदिक इंडेक्समध्यें नमूद आहे, तें मंडल सहावें होय. या मंडलांत भरद्वाज ऋषीच्या व तत्कुलोत्पन्न ऋषींच्या सूक्तांचें ग्रथन केलेलें आहे. बार्हस्पत्य भरद्वाजाचें यासंबंधीं मुख्य सूक्त १६वें आहे. हें बरेंच मोठें सूक्त असून यांत भरतराजा, भारतजन, भरताचा अग्नि, व दिवोदास राजा याचा उल्लेख एकाहून अधिक वेळीं आला आहे. जसा पूर्वीच्या सूक्तांत वसिष्ठाचा उल्लेख आला आहे तसा यांत भरद्वाज ऋषीचाहि आला आहे. (त्वमिमा वार्या पुरु दिवोदासाय सुन्वते। भरद्वाजाय दाशुषे ॥ अग्निरगामि भारतो वृत्रहा पुरुचेतनः । दिवोदासस्य सत्पतिः ॥ प्रदेवं देववीतये भरता वसुवित्तमम्। आ स्वे योनौ निषीदतु). या ठिकाणीं पाश्चात्य विद्वानांस असें आश्चर्य वाटतें कीं दिवोदास याचा संबंध भरद्वाजाशीं या

सूक्तांत आला आहे, पण दिवोदासाचा पुत्र सुदास याचा संबंध पूर्वोक्त मण्डळांत वसिष्ठ व विश्वामित्र यांच्याशीं आलेला आहे. पुराणांत आणि खुद्द ऋग्वेदांत भरतांचे पुरोहित वसिष्ठ दिसतात यांत शंका नाहीं, पण यामुळें त्यांचा संबंध दुसऱ्या ऋषींशीं नसावा असें होत नाहीं. विश्वामित्राचा संबंध जसा सुदासाशीं येतो तसा दिवोदासाशीं भरद्वाजाचा संबंध आला तर त्यांत आश्चर्य कांहींच नाहीं. रामायणांतहि विश्वामित्राप्रमाणेंच दशरथ व राम यांचा संबंध भरद्वाजाशीं आलेला आहे. राम व भरत यांस भरद्वाजानें मदत केली असून दशरथाचा मी मित्र आहें असें त्यानें म्हटलें आहे. अर्थात् या मण्डांलतील वचनांवरूनहि भरत म्हणजे सूर्यवंशी क्षत्रिय असें अनुमान निघतें.

अशा या पुराणांतील व ऋग्वेदांतील एकाच हकीकतीवरून पुराणांतील सूर्यवंशी क्षत्रिय व ऋग्वेदांतील भरत हे एकच होत असा निश्चय होतो. हेच प्रथम हिंदुस्थानांत आलेले आर्य. हे सिंधु नदीपासून पूर्वेकडे पसरत पसरत शरयूपर्यंत ऋग्वेदकाळीं पसरलेले दिसतात. शरयूचा उल्लेख ऋग्वेदसूक्तांत आलेला आहे. त्यांचे ऋषि वसिष्ठ, विश्वामित्र आणि भरद्वाज असे होते. त्यांचे राजे म्हणजे पूर्वज भरत, पुढें दिवोदास आणि नंतर सुदास असे दिसतात. देवश्रवा आणि देववात, तसेंच पुरुकुत्स आणि त्रसदस्यु यांचाहि उल्लेख ऋग्वेदांत आहे, इक्ष्वाकूचा उल्लेख आहे आणि आमच्या मतें दहाव्या मंण्डळांत खुद्द रामाचा उल्लेख आहे. आतां निरुक्ताच्या मताप्रमाणें भरत म्हणजे सूर्यच होय. पुराणांनीं भरत म्हणजे मनु असेंहि म्हण्टलें आहे, पण मुख्यतः ज्याला मनूच्या पौत्रानें हिंदुस्थानचा मुलूख वांटणींत दिला तो भरत असें पुराणें मानतात. तेव्हां ऋग्वेद पुराणांची परम्परा एकत्र करून हिंदुस्थानांत प्रथम आलेला आर्य राजा भरत होय असें समजण्यास हरकत नाहीं. रामायणांत दिलेल्या सूर्यवंशाच्या वंशावळींत सुदासाचें नांव आहे. त्याचप्रमाणें सौदास कल्माषपाद होता, असेंहि वर्णिलें आहे. पुराणांत सुदासाचा पिता दिवोदास असा दाखविला नाहीं. पण ऋग्वेदाच्या विरुद्ध ही पुराणांची ग्वाही सोडली पाहिजे. दिवोदास हें नांव सूर्यवंशांतहि आढळतें आणि चंद्रवंशांतही आढळतें. पिजवन

हें दिवोदासाच्या बापाचें नांव ऋग्वेदांत दिसतें; कारण दिवोदासाला तेथें पैजवन असेंहि म्हटलें आहे. पैजवन हें नांव सूर्यवंशी कच्छवाहांत अलीकडेहि पैजवन सिंह (पज्जूनसिंग) अशा रूपानें आढळतें. पुरुकुत्स आणि त्रसदस्यु हे राजे सूर्यवंशांत पुराणांनींहि दिले आहेत. ते दुसऱ्या कोणत्याहि कुळांत, चंद्रवंशांत वगैरे नाहींत. याशिवाय याजबद्दल आणखी एक उल्लेख शतपथ ब्राह्मणांतील वरील विधानाच्या पुष्टयर्थ मिळतो तो असा कीं शतपथांत पुरुकुत्स व त्रसदस्यु हे ऐक्ष्वाक राजे होते असें म्हटलें आहे (वैदिक इंडेक्स पहा). हरिश्चंद्र हाहि ऐक्ष्वाक होता असें ब्राह्मणांत म्हटलें आहे आणि हरिश्चंद्राला सूर्यकुळांतच पुराणांनीं दिला आहे. तात्पर्य भरतांचे वैदिकवाङ्मयांत सांगितलेले राजे तसेच त्यांचे ऋषि आणि रामायण, महाभारत व पुराणें यांत सांगितलेले सूर्यवंशी राजे व ऋषि एक असल्यानें ऋग्वेदांतील भरत हेच पुराणांतील सूर्यवंशी क्षत्रिय होत, हा निश्चय होतो. हे भरत ऋग्वेदकाळांतच पंजाबापासून शरयूपर्यंत* हिंदुस्थानांत पसरले होते, तेव्हां ऋग्वेदांत रामाचा उल्लेख येणें आश्चर्यकारक नाहीं. ऋग्वेदकाळींच आर्य मिथिलेपर्यंत पोंचले होते. मिथिलेच्या जनकाचा जरी ऋग्वेदांत उल्लेख नाहीं तरी त्याचा पुरोहित गौतम याचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. हाच गौतम अहिल्येचा पति असें रामयणांत म्हटलें आहे. अहिल्येचा उल्लेख ऋग्वेदांतहि आहे. गौतम ऋषि म्हणजे सूक्तकर्ता आहे. तात्पर्य ऋग्वेदावरून हिंदुस्थानांत प्रथम आलेल्या आर्यांचा म्हणजे भरतांचा अर्थात् सूर्यवंशी क्षत्रियांचा इतिहास येथपर्यंत या प्रकारचा सांपडतो.

येथवर भरत अथवा सूर्यवंशी क्षत्रियांचा मूळ राजा भरत (ज्यावरून भारतवर्ष हें नांव या देशास पडलें) आणि मागूनचे राजे दिवोदास व

---

* शरयूचा उल्लेख ऋग्वेदांतील तीन सूक्तांत आहे. मॅक्डोनेलच्या मतें ती अयोध्येचीच नदी आहे. कित्येक वेदवित् पाश्चात्त्य विद्वान तिला क्रमु मानतात. पण क्रमूचा ऋग्वेदांतच स्वतंत्र उल्लेख आहे. शिवाय ६४ मध्यें सरस्वती व सिंधुबरोबर उल्लेख असून ती एक मोठी नदी दिसते.

सुदास, पुरुकुत्स व त्रसदस्यु व त्यांचे ऋषि वसिष्ठ–विश्वामित्र भरद्वाज–गौतम यांजविषयीं ऋग्वेदांतील माहिती सांगितली. आतां आपण चंद्रवंशी क्षत्रिय अर्थात् आर्यांची मागून आलेली शाखा हिच्या ऋग्वेदीय इतिहासाकडे वळूं. हेहि ऋग्वेदांत उल्लेखित आहेत. पण ते उघड उघड मागून आलेले आर्य दिसतात. परंतु ते त्याच आर्यवंशाचे, आर्यधर्माचे व आर्यभाषेचे लोक आहेत. त्यांचा इतिहास पुष्कळ अंशीं अमेरिकेचे दुसरे मागूनचे वसाहत करणारे इंग्लिश व डच यांच्या इतिहासासारखा आहे. पूर्वींच्या वसाहत करणाऱ्या फ्रेंच व स्पानिश लोकांप्रमाणें इंग्लिश व डच हे अमेरिकेच्या मूळच्या रहिवाशांशीं भांडले नाहींत; तर त्यांच्याशीं गुण्यागोविंदानें वागले असें दिसतें. किंबहुना इंग्लिश डचांचे जुन्या रहिवाशांशीं तहनामे झाले आहेत. या लोकांस उत्तर अमेरिकेच्या इतिहासांत पंचजन ( Five Nations ) असें म्हटलें आहे. परंतु वसाहतीस पूर्वीं आलेल्या फ्रेंच स्पानिशांशीं मात्र त्यांचे उत्तर अमेरिकेंत भयंकर संग्राम झाले असें अमेरिकेचा इतिहास सांगतो. शेवटची गोष्ट ही कीं, अशा लढाईंत त्यांस प्राचीन रहिवाशांची मदतच झाली आणि शेवटीं त्यांनीं फ्रेंच स्पॅनिशांस जिंकून उत्तर अमेरिकेंत आपलें वर्चस्व स्थापिलें. हल्लीं उत्तर अमेरिका टयूटानिक आहे; मध्य अमेरिका स्पानिश आहे आणि दक्षिण अमेरिका पोर्तुगीज आहे; किंबहुना या भागास लॅटिन अमेरिका असेंच म्हणतात. दोघांचा धर्म जरी एकच म्हणजे ख्रिस्ती आहे तरी त्यांत थोडा फरक आहे. हा अमेरिकेच्या अर्वाचीन वसाहतींचा इतिहास डोळ्यांसमोर ठेविला म्हणजे हिंदुस्थानच्या वसाहतींचा प्राचीन इतिहास आपल्यास नीट कळतो आणि बरेच तंट्याचे प्रश्न उलगडतात, असें आम्हांस वाटतें.

ऋग्वेदांतील भरतांचा आपण हिंदुस्थानच्या भाषांवरून पहिल्या आर्य टोळीशीं व पुराणांतील सूर्यवंशी क्षत्रियांशीं मेळ घातला आहे; त्याचप्रमाणें, किंबहुना अधिक निश्चित रीतीनें, नंतर आपले पश्चिम हिंदी बोलणाऱ्यांचे पूर्वज आर्य वसाहतवाले यांचा पौराणिक चंद्रवंशीयांशीं मेळ बसतो. प्रथम गोष्ट ही कीं, यदु, तुर्वसु, अनु, द्रुह्यु, आणि पूरु या पांची पुराणांत वर्णिलेल्या ययातिपुत्रांचा ऋग्वेदांत एकच ठिकाणीं उल्लेख सांपडतो, हें

पाहून आपल्यास मोठें आश्चर्य वाटलें. यांचा भिन्नस्थळीं उल्लेख तर पुष्कळदां आला आहे. त्यांतल्या त्यांत यदुतुर्वशांचा एकत्र उल्लेख अधिक येतो. अर्थात् हे पांच लोक एकवंशी मानले जात. यदुतुर्वश हे त्यांतहि जवळचे होते असें दिसतें. यांचा कधीं कधीं एकवचनी व कधीं बहुवचनी प्रयोग येतो. अर्थात् ह्या जाति होत्या आणि त्यांच्या मूळ पुरुषांवरून त्यांस हीं नांवें पडलीं होतीं. तात्पर्य महाभारतांतील व पुराणांतील ययातीच्या कथेस स्पष्टपणें ऋग्वेदांत पुष्टि मिळते. ययातीस देवयानीपासून यदु तुर्वसु ( ऋग्वेदांत तुर्वशरूप आढळतें ) व शर्मिष्ठेपासून अनु द्रुह्यु व पूरु असे पुत्र झाले, ह्या कथेस ऋग्वेदांत असा आधार मिळतो. पुराणांत तुर्वशाचें रूप बदलून ऊकारांत इतर नांवाप्रमाणें तुर्वसु केलें आहे इतकेंच. दुसरी महत्त्वाची गोष्ट ही कीं, या लोकांचा विशेषतः यदु-तुर्वशांचा ऋग्वेदसूक्तांत कधीं कधीं प्रेम व सन्मानयुक्त उल्लेख येतो तर कधीं कधीं तिरस्कारयुक्त उल्लेख येतो. कांहीं वैदिक ऋषि त्यांजवर ईश्वरापाशीं आशीर्वादयुक्त प्रसाद याचितात तर कांहीं ऋषि यांचा पराभव होवो, यांचा नायनाट होवो अशी शापयुक्त यांचा करतात. यावरून असें अनुमान निघतें कीं, हे मागाहून आलेले असून पूर्वीच्या आर्यांशीं यांना स्पर्द्धायुक्त शत्रुत्व करावें लागलें. परंतु जेव्हां शेवटीं ते यशस्वी होऊन येथें कायमचे रहिवाशी झाले तेव्हां ते एकवंशी, एकधर्मी, एकभाषी या नात्यांनीं प्रियच होऊन गेले. या अनुमानाला पुष्कळ पौराणिक कथांचाहि पाठिंबा आहे. सूर्यवंशी क्षत्रियांशीं चंद्रवंशीयांचे अनेक युद्धप्रसंग पुराणांत वर्णिलेले असून शेवटीं चंद्रवंशीयांनीं यमुनेच्या दक्षिण किनाऱ्यानें राज्यें स्थापिलीं असें वर्णन सांपडतें. याप्रमाणें ढोकळ मानानें चंद्रवंशीयांचा इतिहास असून आतां आपण या आर्यांच्या हिंदुस्थानांत शिरण्यापासून जमुनाकांठीं राज्यस्थापनेपर्यंतच्या इतिहासाचीं ऋग्वेदांतील प्रमाणें सविस्तर पाहूं.

पुराणांतील कथेप्रमाणें चंद्रवंशीयांचा मूळ पुरुष जो पुरूरवा त्याचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. तो ऋग्वेदांतहि फार पुराणा दिसतो. तो हिमालयांत राहणारा असून उर्वशी अप्सरेपासून त्यास पुत्र ययाति झाला व त्याचा पुत्र नहुष. या दोघांचाहि उल्लेख ऋग्वेदांत आहे. पुरूरवा हा गंधर्वा-

पासून अग्नि उत्पन्न करण्यास शिकला असें ब्राह्मणांत वर्णन आहे, त्यावरून पुरूरवा वैदिकधर्मी अग्निपूजक असून उत्तर कुरुंत म्हणजे गंगायमुनांचे उत्तरेस तिबेटांत राहाणारा दिसतो. आयु, नहुष व त्याचा पुत्र ययाति हे तिकडेच राहात असावे. ययातिहि ऋग्वेदांत उल्लेखित आहे. याची एक स्त्री देवयानी शुक्रकन्या व दुसरी शर्मिष्ठा असुरराज वृषपर्वा याची कन्या होती. या असुरसंबंधावरून हा हिमालयोत्तरच दिसतो. याचे पुत्र व त्यांच वंशज हिंदुस्थानांत गंगाखोऱ्यानें उतरले आणि पूर्वीच्या आर्यांच्या वसहातींत सरस्वतीतीरावर कुरुदेशांत मध्येंच पाचरेप्रमाणें घुसले. हें अनुमान सयुक्तिक आहे. पुराणांत ययातीचें राज्य सर्व हिंदुस्थानावर असून त्याची राजधानी प्रयाग होती, त्यानें आपल्या पांच पुत्रांत हिंदुस्थानची वाटणी केली त्यांत मध्यदेश म्हणजे प्रयाग आपल्या प्रिय पुत्रास म्हणजे पूरूस दिला अशी कथा आहे. पण ही कथा मागून उत्पन्न झालेली असून अलीकडच्या परिस्थितीस अनुसरून बनविलेली आहे. पार्गिटर हिच्यावर जोर देतो, परंतु पूर्वी सांगितल्याप्रमाणें पुराणकथांचा ऋग्वेदाशीं मेळ पडेल तरच त्या मान्य करण्यासारख्या असतात. जेथें विरोध येईल तेथें ऋग्वेदासच अधिक प्रमाण मानलें पाहिजे. तेव्हां, या दृष्टीनें पाहातां ऋग्वेदांत पूरु सरस्वतीच्या दोन्ही किनाऱ्यांवर वसला असा स्पष्ट उल्लेख आहे ( ७ मं ९६ सू. ). अर्थात् पूरूला मध्यदेश व प्रयाग मिळाला ही कल्पना मागूनची. कारण सरस्वती प्रदेश पुराणाच्या वांटणींत दुसऱ्यासच मिळाला होता. तेव्हां सरस्वतीतीरावर पुराणांच्या मतें पूरू येऊं शकत नाहीं. पुराणांच्या काळीं आर्यलोक हिंदुस्थानांत बाहेरून आले ही कल्पनाच नव्हती. सूर्यवंशी क्षत्रियांचें मूळ ठिकाण ज्याप्रमाणें मनु काळापासून अयोध्या मानलें गेलें, त्याचप्रमाणें चंद्रवंशीयांचें मूळ ठिकाण ययातीच्या काळापासूनच प्रयाग मानलें गेलें. चंद्रगुप्ताच्या पूर्वी हिंदुस्थानांतलि मुख्य पराक्रमी राजा उदयन हा पौरव असून कोशाम्बी येथें : म्हणजे प्रयागाच्याच भोंवतालच्या प्रदेशांत राज्य करीत होता. तेव्हां चंद्रवंशी मूळचे येथचेच असें पुराणानीं ठरविलें. ययातीनें भारतवर्षाची वांटणी केली व निरनिराळ्या पुत्रांस निरनिराळीं राज्यें दिलीं

त्यांचें वर्णन प्राचीन इतिहासास धरून नसून पुराणांनीं त्यांच्या काळच्या परिस्थितीवरून केलें आहे. खुद्द पार्गिटरसाहेबांच्या लिहिण्यावरूनच ही गोष्ट निष्पन्न होते. पुराणाच्या आठवणींत म्हणजे सुमारें इ. स. पू. ५०० च्या वेळेपासून पुराणांच्या हल्लींच्या आवृत्ति इ. स. ३०० च्या सुमारास निघाल्या त्यावेळीं बुद्धपूर्व आठवण बुजाली असली पाहिजे. अलाहाबाद प्रान्तांत उदयन पौरव राजा राज्य करीत होता, याचा उडत उडत उल्लेख महाभारतांतहि आहे. यदूला नैर्ऋत्येकडचा भाग मिळाला आणि मथुरेपासून नैर्ऋत्येस काठेवाडपर्यंत यादवच होते. तुर्वशाला अग्नेय भाग मिळाला आणि आग्नेयीकडील लोक पाण्डयसुद्धां द्रविड राजे पुराणांनीं यादव आर्य बनविले. द्रुह्युला पश्चिम आणि अनूला उत्तर मिळाली. द्रुह्यु हा सैंधवांचा पूर्वज मानला गेला आहे आणि आनव क्षत्रिय अजून पंजाबांत उत्तरेकडे कांहीं कांहीं ठिकाणीं आहेत. पार्गिटर यावर म्हणतो "या वांटण्या त्यांच्या मागूनच्या परिस्थितीला धरून आहेत". पण खरी वस्तुस्थिति उलट आहे. मागूनच्या परिस्थितीवरून पुराणांनीं वैदिक कालीन ययातीची वांटणी बनविली आहे. नवीन पुराणकारांना आर्य पंजाबापासून दक्षिणेकडे पसरले ह्याची कल्पनाच नव्हती. तथापि प्राचीन पुराणपरंपराहि पूरुरवा हिमालयोत्तर गंधमादन पर्वतावर होता अशीच आहे. असो, ऐतिहासिकरीत्या ऋग्वेदावरून असें दिसतें कीं ययातिपुत्र हिंदुस्थानांत गंगाखोऱ्यानें आले आणि पूरूनें प्रथम राज्य सरस्वतीतीरावर स्थापिलें व येथून चंद्रवंशी आर्य दक्षिणेकडे पसरले. यांचीच भाषा हल्लीची पश्चिम हिन्दी. डाक्तर ग्रीयर्सन म्हणतो, कीं ही भाषा अवध व पंजाबी व राजस्तानी भाषेहून भिन्न आहे.

असो तर, ऋग्वेद मं. ७ सू. ९६ यांत सांगितल्याप्रमाणें पूरूचें राज्य प्रथम सरस्वतीतीरावर प्रस्थापित झालें. हीच ऐतिहासिकरीत्या खरी गोष्ट. याच ठिकाणीं दुसऱ्या आर्य वंशांचा उत्कर्ष झाला. कुरुक्षेत्र हेंच त्यांचें मुख्य व पुण्य ठिकाण झालें. येथेंच सर्व वैदिक धर्माची प्रगति झाली. येथेंच बोलली जाणारी संस्कृत भाषा उत्तम असें समजण्यांत येऊं लागलें. "या ठिकाणीं हे आर्य वायव्येकडून खैबर घाटानें आलेले नसून गिल्जिट चित्राल

वगैरे रस्त्यानें गंगाखोऱ्याच्या दिशेनें आले असें जें आम्हीं म्हटलें आहे. तें ब्राह्मणामध्यें उत्तरकुरूंची आणि कुरुपांचालांची भाषा एक सारखी असे स्पष्ट म्हटलें आहे, त्यांच्या आधारानें आहे ( वैदिक इंडेक्स कुरु शब्द पहा). अद्यापिहि डाक्तर ग्रीयरसन म्हणतो गिल्जिट आणि चित्राल या ठिकाणीं कित्येक शब्दांचीं रूपें अगदीं वैदिक सूक्तांतील रूपांसारखीं आहेत आणि हिंदुस्थानच्या मैदानी प्रदेशांत तशीं क्वचित सांपडतात. ( इंपीरियल गॅझेटीयर भाग १ पान ३५६ ). तात्पर्य वैदिक सूक्तें, ब्राह्मणांतील विधानें व हल्लींची गिल्गिट वगैरे प्रदेशाची भाषा यावरून चंद्रवंशी आर्य या रस्त्यानें सरस्वतीतीरावर आले असें अनुमान निघतें. सिरहिंद, अंबाला वगैरे प्रदेशांत प्रथम वसति करून हे दुसऱ्या टोळीचे आर्य हळु हळू दक्षिणेकडे पसरले, त्याचा आपण ऋग्वेदसूक्तावरून आतां छडा करवूं.

प्रथम महत्त्वाची ऋग्वेद ऋचा पूर्वीं सांगितलेल्या पांची लोकांचा उल्लेख ज्यांत आहे ती होय. यांत इंद्राग्नी देवतांची स्तुति केली असून ऋषि म्हणतो " तुम्ही यदुतुर्वश, द्रुह्यु, अनु, पूरु यांच्या येथें असाल तरी माझ्याकडे या आणि हा काढलेला सोमरस प्या." ( यदिंद्राग्नी यदुषु तुर्वशेषु यद् द्रुह्युष्वनुषु पूरुषु स्थः । अतः परिवृषणावाहि यातमथा सोमस्य पिबतं सुतस्य ॥ मं. १ सू. १०८). यावरून असें दिसतें कीं यदुतुर्वश वगैरे कुळें गेहलोत, राठोड इत्यादि अर्वाचीन क्षत्रियांप्रमाणें क्षत्रियकुळें ऋग्वेदकाळीं झालीं होतीं. त्यांचाहि धर्म इंद्राग्नीची पूजा करणें असून इंद्राग्नी त्यांजवर फार संतुष्ट असत. या सूक्ताचा ऋषि कुत्स आंगिरस आहे या गोष्टीचें महत्त्व पुढें येईल.

दुसरी गोष्ट ही कीं, या आर्यांचा व पूर्वीं वसाहत करून असलेल्या भरतांचा अनेक ठिकाणीं झगडा झाला. प्रथम झगडा भरतांच्या दिवोदास राजांशीं झालेला दिसतो. हा दिवोदास अतिशय दानशूर असून त्याचें नांव अतिथिग्व असें ऋग्वेदांत दिलेलें आहे; म्हणजे ज्याकडे अतिथि ( आनंदानें ) जातात असा तो होता. या दिवोदासाच्या व यदुतुर्वशाच्या युद्धासंबंधें पहिली महत्त्वाची ऋचा ९ मं ६१ सू.२ ऋ. ही आहे. यांत ऋषि गाता " दिवोदासासाठीं इंद्रानें शंबराचे किल्ले आणि पुर तोडलें आणि

यदुतुर्वशांचा नाश केला.” ( धुरत्सद्य इत्थाधिये दिवोदासाय शंबरम् । अध त्यं तुर्वश यदुम्॥). या ऋचेवरून यदुतुर्वश बहुधा एकेठिकाणीं येत हें दिसतें व दिवोदासाचे ते शत्रु होते आणि मूळचे रहिवाशी शंबरादि तेहि त्यांच्या बाजूला होते. त्याच प्रकारचा दुसरा उल्लेख भरतांच्या व यदुतुर्वशांच्या लढाईचा ४ मं ३० सू. यांत असून ही लढाई शरयू नदीच्या तीरीं झालेली दिसते (उत त्या तुर्वशायदू अस्नातारा शचीपतिः । इंद्रो विद्वाँ अपारयत् ॥ उत त्या सद्य आर्या सरयोरिन्द्र पारतः । अर्णाचित्ररथावधीः ॥ ). अर्थात् यदु–तुर्वशांची प्रगती पूर्वेकडे शरयूपर्यंत चालली होती. आणि सर्वांत महत्त्वाचें युद्ध म्हणजे पूर्वोल्लिखित दाशराज्ञ युद्ध होय. या युद्धाचा उल्लेख वसिष्ठाच्या तीन सूक्तांत ( ७ मं. ) आला आहे. हें युद्ध भरतांचा राजा सुदास पुरोहित वसिष्ठासह आणि दुसऱ्या बाजूला दहा राजे म्हणजे पांच आर्य व पांच अनार्य यांमध्यें झालें असून हे आर्य राजे यदु, तुर्वश अनु द्रुह्यु आणि पूरु हेच होते. अर्थात् हें युद्ध सूर्यवंशी व चंद्रवंशी लोकांत आपआपसांत अमेरिकेंतील फ्रेंच इंग्रजांच्या युद्धासारखें झालें. पूर्वी सांगितल्याप्रमाणें तें परुष्णी नदीच्या कांठीं झालें; परुष्णी म्हणजे हल्लींची रावी ( ऐरावती ) नदी होय. पहिलें ७ व्या मंडळांतील सूक्त १८ होय. वैदिक सूक्तें देवतांच्या स्तुतीसाठीं बनलेलीं असतात, ऐतिहासिक माहिती देण्यासाठीं नसतात ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. पण वैदिक ऋषींना सुद्धा आपल्या वेळीं किंवा पूर्वीं झालेल्या महत्त्वाच्या ऐतिहासिक वृत्तांविषयीं उल्लेख केल्यावांचून राहणें अशक्य होतें आणि म्हणूनच सहजगत्या जे ऐतिहासिक उल्लेख सूक्तांतून येतात त्यांवरून आपल्यास अशा या अतिशय प्राचीन कालाविषयीं अंधुक ऐतिहासिक माहिती मिळते. सू. १९ हें वसिष्ठाचें एक सरसवर्णनपर सूक्त असून त्यांत या दाशराज्ञ युद्धाची बरीच रसभरित हकीकत दिली आहे. परुष्णीच्या कांठीं सुदासाचा बहुतेक पराभवच व्हावयाचा; परंतु वसिष्ठानें केलेल्या इंद्राच्या स्तुतीनें सुदासास परुष्णीनें सुखरूप जाऊं दिलें; परंतु त्याच नदीनें यदुतुर्वशादि त्यांच्या शत्रूंस बुडविलें. यावरून असें अनुमान निघतें कीं, सुदास किंवा त्याचे पुरोहित यांस नदी वलांडण्याची उताराची जागा माहित

झाली परंतु त्याचे शत्रु हे त्या प्रदेशांत अपरिचित असल्यानें भलत्याच ठिकाणीं नदी वलांडण्याचा प्रयत्न करीत असल्यानें बुडाले व पराभव पावले. नदीचा दुस्तर पाट फोडून काढण्याचा प्रयत्न सुदासाचे शत्रू करीत असल्याचाहि मजकूर या सूक्तांतून निघतो, म्हणजे चंद्रवंशी आर्य युद्ध शास्त्रांत व एकंदर संस्कृतींत बरेच पुढें गेलेले दिसतात. या प्रयत्नांत त्यांस यश आलें नाहीं व ते बुडाल्यानें त्यांस सुदासास लुटण्याची जी आशा होती, त्याऐवजीं त्यांस सुदासानें लुटलें. गुरें नेत असतांना सहा हजार अनु व द्रुह्यु रणभूमीवर निजले असें या सूक्तांत म्हटलें आहे. असो, पांच आर्य राजे अर्थात् अनु द्रुह्यु यदु तुर्वश व पूरु हे होते. यदूचें नांव स्पष्टपणें यांत नाहीं तरी तुर्वशाबरोबरच ते नेहमी येतात. अनार्य लोक यांत सांगितले आहेत ते पक्थ, भलान, भनन्तालिन, विषाणि आणि शिव होत. या नांवावरून पुष्कळ उलट सुलट अनुमानें विद्वान काढतात, डाक्तर ग्रीयरसन म्हणतो कीं, पख्तु या शब्दाचा उच्चार अजूनही वायव्येकडील लोक पक्थ असा करतात आणि यावरून सरहद्दीवरील डोंगरी अफगाण जातींपैकीं हे पक्थ असावे. शिव शब्दावरूनहि कांहीं अनुमानें निघतील पण हीं नामें आर्य लोकांनीं त्यांस दिलीं असावीं आणि विषाणि म्हणजे अमेरिकेंतील कांहीं रेडइंडियन लोक डोक्यांस मुद्दाम शिंगे बांधीत त्याप्रमाणें कांहीं अनार्य इकडे बांधीत असावेत त्यांस आर्य लोकांनीं विषाणि हें नांव दिलें असावें. कांहीं असलें तरी हीं खास अनार्य जातींचीं नांवें आहेत आणि ऋचेचा (ये पक्थासो भलानसो भनन्तालिनासो विषाणिनः शिवासः) जो अर्थ दिसतो तो सरळ सोपा असा लागतो. असो; या युद्धांत आर्य व अनार्य पांच पांच राजे सुदासाच्या विरुद्ध संयुक्त झाले होते ही गोष्ट मात्र निश्चित आहे. कारण दुसऱ्या सूक्तांत (७ मं ८३) त्याचा स्पष्ट निर्देश आहे. हेंही सूक्त वसिष्ठाचेंच आहे आणि त्यांत असें म्हटलें आहे कीं, "इंद्र व वरुण यांनीं जेव्हां दास व आर्य शत्रूंनीं सुदासावर हल्ला केला तेव्हां त्यास मदत केली." (दासा च वृत्रा हत मार्याणिच। सुदासमिन्द्रावरुणावसावतम्।). याच सूक्तांत दहा राजांनीं हल्ला केल्याचाहि स्पष्ट उल्लेख आहे (यत्र राजभिर्दशभिर्निबाधितम्। प्र सुदास-

मावतं तृत्सुभिःसह ). अर्थात् वर सांगितल्याप्रमाणें पांच आर्य व पांच अनार्य राजे या युद्धांत सुदासाच्या विरुद्ध होते. नवीन आर्यांनीं म्हणजे चंद्रवंशीयांनीं एतद्देशीयांची मदत घेऊन पूर्वी वसाहत करून प्रबळ झालेल्या सूर्यवंशीयांस सरस्वतीतीरावरून पंजाबांत पश्चिमेकडे जिंकण्याचा हा मोठा जोराचा प्रयत्न केलेला दिसतो; परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. या युद्धांत मदतीस आलेले पांच अनार्य लोक म्हणजे फ्रेंचांविरुद्ध इंग्लिशांच्या अमेरिकेंतील युद्धांत मदतीस आलेल्या पांच लोकांप्रमाणेंच (Five Nations) दिसतात आणि अमेरिकेंतील आद्यवसाहतींची हकीकत आणि हिंदुस्थानांतील वसाहतीची हकीकत बहुतेक कशी जुळते हें पाहून आश्चर्य वाटतें. अमेरिकेच्या उदाहरणाविरुद्ध जरी यावेळीं नवीन आलेल्या चंद्रवंशी आर्यांचा पराभव झाला, इंग्लिशांप्रमाणें जय झाला नाहीं, तरी पुढें भारतीय युद्धांत त्यांचा जय होऊन उत्तर अमेरिकेंतल्याप्रमाणें सरतेशेवटीं चंद्रवंशीयांचेंच वर्चस्व पंजाबवर प्रस्थापित झालें. तथापि पंजाबचे वसाहत करणारे पूर्व आर्यच सामान्यतः राहिले हें उघड आहे.

ऋ० मंण्डळ ७-१९ मध्यें वसिष्ठ पूरूविषयीं कांहींसें अनुकूल बोलत आहे तरी दिवोदासानें यदुतुर्वशांचा पराभव केला हें त्यांत म्हटलेंच आहे. कांहीं वैदिक विद्वान् या सूक्तावरून पुरुकुत्स हा राजा पुरुकुलांतलि आहे असें मानतात म्हणून त्याविषयींच्या ऋचांचा येथें जास्त विस्तारपूर्वक विचार करणें अवश्य आहे. (त्वं धृष्णोधृषता वीतहव्यं प्रावो विश्वाभिरूतिभि सुदासम् । प्र पौरुकुत्सिं त्रसदस्युमावः क्षेत्रसाता वृत्रहत्येषु पूरुम्) " हे इंद्रा, तूं आपल्या सर्व रक्षणशक्तींनीं वीतहव्य, सुदास व त्रसदस्यु पुरुकुत्साचा पुत्र आणि पूरु यांस वृत्राच्या अनेक लढायांत रक्षिलेंस " या वाक्यांत त्रसदस्यु म्हणजेच पूरु असें न घेतां त्रसदस्यु आणि पूरु असा अर्थ घ्यावा असा आमचा समज आहे. पूरु शब्दाला पुरुकुत्साचें विशेषण मानल्यास ब्राह्मणामध्यें पुरुकुत्साला ऐक्ष्वाक स्पष्टपणें म्हटलें आहे त्याशीं विरोध येतो. त्रसदस्यु आणि पुरुकुत्स हे चंद्रवंशांत असल्याचा कोठें पुराणांतहि उल्लेख नाहीं. अर्थात् हें नांव भरतांप्रमाणें दोन राजांचें नाहीं तेव्हां पुरुकुत्साला पूरुवंशी मानतां येत नाहीं. याच

सूक्तांत अन्य आर्य राजांना वृत्राविरुद्ध म्हणजे दासांविरुद्ध मदत केल्याबद्दल इंद्राची स्तुति केली आहे. उ. चुमुरि आणि धुनि या दासांविरुद्ध कुत्स व दभीति यांस मदत केलेली वर्णन केली आहे; अतिथिग्व दिवोदासाला यदु-तुर्वशांविरुद्ध मदत केल्याचाहि यांतच उल्लेख केला आहे. यावरून असें दिसतें कीं पूरुवंशाचे चंद्रवंशी क्षत्रिय हळु हळू कुरुक्षेत्रांत स्थिर होऊन प्राचीन आर्य ऋषींस मान्य झाले होते, आणि यदु तुर्वश हे अजून वसाहतीला जागा न मिळाल्यानें सूर्यवंशीयांना त्रास देत होते. पुढें दक्षिणेकडे यमुनाकिना-ऱ्यानें ते पसरले. भारत उपसंहारांत दाखविल्याप्रमाणें भारतीयुद्धांत पूरु-कुलांतले चंद्रवंशी क्षत्रिय आणि यदु पांडु पांचालादि इतर चंद्रवंशी क्षत्रिय यांच्यांत तंटा पडून पूरु-कुलाच्या दुर्योधनाकडे सूर्यवंशीयच विशेष होते. तात्पर्य याच सूक्तांत वसिष्ठानें " निर्तुर्वशं नि याद्वं शिशीह्यतिथिग्वाय शंस्यं करिष्यत् " असें म्हटलें असलें तरी पूरुसंबंधानें अनुकूल उद्गार काढणें शक्य आहे, आणि वरील ऋचेंत पूरू हा निराळा शब्द घेणें ब्राह्मणांना धरून होईल.

पूरु , सरस्वतीतीरीं आणि यदुतुर्वशादि यमुनाकिनाऱ्यानें स्थायिक झाल्यावर त्याच्यासंबंधानें चांगले उद्गार, ते आर्य असल्यानें, निघणें साहजिक आहे आणि म्हणून ऋग्वेदांतील कित्येक सूक्तांतून त्यांच्या आशीर्वादपर वचनें आढळतात. हीं वचनें विशेषतः आठव्या मंडळांत म्हणज कण्वांच्या मंडळांत आहेत हें लक्षांत घेतलें पाहिजे. 'वेदिक इंडेक्स' मध्यें दाखविल्याप्रमाणें आठव्या मंडळांतलि हीं सूक्तें ४, ७, ९, १०, ४५ असून पहिलें चौथें देवातिथि काण्वाचें आहे. या सूक्तांत कण्वऋषीचा आणि यदुवतुर्वशांचा दोघांचाही उल्लेख आहे. एका तुर्वशराजापासून कण्वास सहा हजार गाई मिळाल्या अशी यांत दानस्तुति आहे. ७ वे सक्त पुनर्वत्स काण्वाचें आहे व त्यांत मारुतांनीं यदुतुर्वश व कण्व यांजवर कृपा केल्याबद्दल स्तुति आहे ( येनाव तुर्वशं यदुं येन कण्वं धनस्पृतम् । राये सुतस्य धीमहि ॥). त्याचप्रमाणें ९ सूक्तांत शशकर्ण काण्व अश्विनाची कृपा यदुतुर्वश कण्वांवर याचितो, ( इमे-सोमासो अधितुर्वशे यदाविमे कण्वेषु वामथ १४ ॥ ). दहाव्या सूक्तांत

प्रगाथ काण्व अश्विनांची कृपा अनु, द्रुह्यु, यदु आणि तुर्वश यांवर निरनिराळ्या दिशांस भाकीत आहे (यद्द्रुह्यव्यनवि तुर्वशे यदौ हुवे वामथ मागतम् ॥ ५ ); आणि शेवटच्या ४५ सूक्तांत त्रिशोक काण्व इंद्राग्नींची स्तुति करून म्हणतो " तुम्हीं अनिर्वचनीय शक्ति यदु व तुर्वश यांना दिलीत " ( सत्यंतत्तुर्वशे यदौ विदानो अन्हवायाम् ॥ २७ ). हीं सर्व सूक्तें कण्वकुलऋषींचीं असून त्यांत यदुतुर्वशांना किंबहुना अनुद्रुह्यूना ईश्वरी कृपेची याचना केली आहे. यावरून या चंद्रवंशीयांचे कुळोपाध्याय काण्व होते असें दिसतें. याचें प्रत्यंतर पुराणांतहि मिळतें, कारण भरताचा कुलगुरु कण्व होता आणि दुष्यन्ताचाहि असावा. त्याच्याच राज्यांत कण्वाश्रम होता व तेथेंच त्यास शकुन्तला मिळाली. जसा सूर्यवंशी यांचा वसिष्ठ तसा चंद्रवंशी यदुतुर्वश अनुद्रुह्यूंचा कण्व दिसतो. किंबहुना पुराणवंशावळीप्रमाणें कण्व हा चंद्रवंशीच स्वतः आहे. यासंबंधानें अर्थात् ऋग्वेद व पुराणें यांचें ऐक्यमत आहे. याचें आणखी प्रत्यंतर पहिल्या मण्डळांतील ३६ व्या सूक्तांत मिळतें. घोर ऋषि या सूक्तांत यदुतुर्वश व कण्व यांचा अनेकदां उल्लेख करितो ( अग्निर्ववे सुवीर्यमग्निः कण्वाय सौभगम् । अग्निःप्रावन्मेध्यातिथि मग्निः साता उपस्थितम् ॥ १७ अग्निना तुर्वशं यदुं परावत उग्रादेवं हवामहे । १८ ). अर्थात् वरील अनुमानाला आणखीं बळकटी येते. हरिवंशांत पुरुकुळांत उत्पन्न झालेल्या व भरताच्या चौथ्या पूर्वजापासून म्हणजे मतिनारापासून कण्वाची उत्पत्ति सांगितली आहे.

यदुतुर्वशांचा अनुकूल उल्लेख करणारीं दुसरीं सूक्तें म्हणजे प्रथम मण्डळांतील ५४ वें सूक्त होय. यांत सव्य आङ्गिरस यदुतुर्वशांचें रक्षण केल्याबद्दल इन्द्राची स्तुति करितो ( त्वमाविथ नर्यं तुर्वशं यदुं त्वं तुर्वीति वय्यं शतक्रतो । ). दुसरें १०८ सूक्त पूर्वींच उल्लेखिलें आहे. त्यांत कुत्स आङ्गिरस पाचांचीं नांवें, यदुतुर्वश अनुद्रुह्यु—पुरु यांचीं, एके ठिकाणीं ग्रथित करतो. पूर्वीं कुत्स आङ्गिरस सूक्तकर्ता आहे याचें महत्व पुढें येइल असें म्हटलें आहे तें येथें सांगतां येतें. कण्वकुलऋषींप्रमाणें आङ्गिरसकुल ऋषि यांचाहि संबंध चंद्रवंशीयांशीं दिसतो. १–३६ चा ऋषि घोर म्हटला आहे आणि पुढच्या सूक्ताचा घोर काण्व म्हटला आहे. त्यावरून हा पूर्वींचा घोर आङ्गिरस दिसतो. १–५४ चा सव्व आङ्गिरस आहे आणि

१–१०८ चा कुत्स आङ्गिरस आहे. छान्दोग्योपनिषदांत देवकीपुत्र कृष्णाला घोर आङ्गिरसानें एक उपनिषद्विद्या सांगितली असें वर्णन आहे. हा देवकी पुत्र कृष्ण प्रसिद्ध महाभारतांतील श्रीकृष्ण गीता सांगणारा होय असें स्पष्टपणें वाटतें. तात्पर्य काण्वाप्रमाणें आङ्गिरसहि यदु तुर्वशादि चंद्र-वंशीयांचे ऋषि ठरतात.

'वेदिक इंडेक्स' मध्यें सांगितलेलीं दुसरीं यदु-तुर्वशांचा उल्लेख करणारीं सूक्तें म्हटलीं म्हणजे अगस्त्याचें इन्द्रसूक्त १–१७४, वामदेवाचें ४–३०, अवस्यु आत्रेयांचें ५–३१, शंयु बार्हस्पत्याचें ६–४५, व इन्द्र-वैकुण्ठाचें १०–४९ हीं होत. शेवटल्या सूक्तांत नहुषाचा व यदु-तुर्वशांचा एकत्र उल्लेख आहे ( अहं सप्तहा नहुषो नहुष्टरः प्रोश्रावयं शवसा तुर्वशं यदुम् ॥ ८ ॥ ). यापैकीं पहिल्या सूक्ताचा म्हणजे १–१७४ चा जास्त विचार केला पाहिजे. कारण यांत यदु-तुर्वशांबरोबर समुद्राचा उल्लेख आला आहे. ( त्वं धुनिरिन्द्र धुनिमतीर्ऋणोरपः सीरा न स्रवन्तीः । प्रयत्समुद्रमति शूर पर्षि पारया तुर्वशं यदु स्वस्ति ॥ ९ ॥". याचा अर्थ यदुतुर्वशांना इंद्रानें सुरक्षित समुद्राच्या पार न्यावें असा असल तर भुज्यु ह्या ऋग्वेद-प्रसिद्ध अश्विनांच्या प्रिय राजाप्रमाणें ( त्यास अश्विनांनीं समुद्रांत बुडत असतां आपल्या सुवर्ण नौकेंत घालून समुद्रपार केलें असें वर्णन ऋग्वेदांत वारंवार येतें ) यदु-तुर्वश हे समुद्रावरहि फिरूं लागले होते, असें म्हणावें लागेल. ऋग्वेदकाळांत भारतीय आर्य पश्चिम समुद्रापर्यंत पोंचले होते यांत शंका नाहीं. कारण समुद्राचा उल्लेख ऋग्वेदांत पुष्कळदां आला आहे. आणि यदु-तुर्वश दक्षिणेकडे पसरत काठेवाडापर्यंत पुढें पसरलेले दिसतातच. परंतु या सूक्तांतील समुद्र शब्दाचा अर्थ आकाश असा केला आहे. आकाशांत दिव्य आपें भरलेलीं आहेत अशी ऋग्वेदीय ऋषींची कल्पना आहे. असो, ५–३१ मध्यें सुदुघाचा पूर इंद्रानें यदु-तुर्वशांकरितां स्तब्ध केला असें वर्णन आहे ( त्वमपो यदवे तुर्वशायारमयः सुदुघाः पार इन्द्र ). तात्पर्य यदु-तुर्वश आर्य ऋषींना पुढें मान्य व प्रिय झाले असून त्यांचा प्रसार अनेक नद्या ओलांडून समुद्रापर्यंतहि झाला असावा असें दिसतें.

येथवर यदु, तुर्वश, अनु, द्रुह्यु, पूरु यांचा सामुदायिक विचार झाला. आतां आपण प्रत्येक कुलाचा निराळा विचार करूं. साम व यजुः यांत यदूंचा

उल्लेख नाहीं, ब्राह्मणांतहि त्यांचा उल्लेख येत नाहीं, असें वेदिक इंडेक्सच्या आधारें म्हणतां येतें. (सर्व वैदिक वाङ्मयाचा प्रत्यक्ष अभ्यास आम्हीं केलेला नाहीं ). पंजाबांत त्यांचा पराभव झाल्यावर ते दक्षिणेकडे वळले आणि शूरसेन (मथुरा) काठेवाडाकडे दक्षिण-नैऋत्य दिशेनें पसरले. महाभारतकालांत ते या प्रदेशांत आपल्यास दिसतात. या प्रदेशांत वसाहतीस पुष्कळ जागा होती, कारण पूर्वीचे सूर्यवंशी आर्य पंजाबांत व हिमालयाच्या पायथ्यानें पूर्वेकडे मिथिलेपर्यंत वसले होते. यदूंचीं स्वतंत्र राज्यें स्थापिलीं गेलीं नाहींत असें दिसतें. ते मथुरेसहि भोजांच्या अधिपत्याखालीं होते. यावरूनच यदूंना राज्याधिकार ययातीच्या शापानें नाहीं, ही कथा निघाली असावी. ही मथुराहि पौराणिक कथेंत मूळची मधुराक्षसाची, त्यास जिंकून प्रथम शत्रुघ्नानें वसाहत केली आणि त्याच्या वंशच्छेदानंतर यादव-भोजांनीं तेथें वसाहत केली. पार्गिटरसाहेबांच्या मतें हा मधुराक्षस नसून यादव मधु होय, ज्यांचे वंशज पुढें माधव नांवानें प्रसिद्ध पावले. पण ही चुकी आहे. रामायणाची व पुराणांची कथा इतिहासाच्या संगतीस धरून आहे. कारण प्रथम यमुनाकिनारा राक्षसांच्या म्हणजे हिंदुस्थानच्या मूळच्या रानटी रहिवाशांच्या ताब्यांत असावा. नंतर गंगोत्तर वस्ती केलेल्या सूर्यवंशी आर्यांनी तेथें वसाहत करण्याचा प्रयत्न केला व पुढें दुसऱ्या आर्य टोळ्यांनीं म्हणजे चंद्रवंशी यादवांनीं तेथें वसाहत करणें सहाजिक आहे. हे यादव अद्याप गुरें बाळगणाऱ्यांच्या स्थितींत होते, व श्रीकृष्णाच्या बुद्धिसामर्थ्यामें व शौर्यानें त्यांस कायमचें तेज व कीर्ति मिळाली नसती तर पुराणांतून त्यांचा उल्लेख पुढें आला नसता. श्रीकृष्णाचा उल्लेख वैदिक संहितेंत नसला तरी छांदोग्योपनिषदांत आला आहे हें वर दाखविलेंच आहे. आतां तुर्वशांचा विचार करूं. यांचा ऋग्वेदांत यदुसह व स्वतंत्र उल्लेख येतो तरी पुढें महाभारतांत किंवा पुराणांत उल्लेख आढळत नाहीं. हें कुल पुढें नष्ट झालें असेंच दिसतें व तसें शतपथ ब्राह्मणांत एके ठिकाणीं तें नष्ट होऊन पाञ्चालांत लुप्त झालें असें म्हटलें आहे. हरिवंश अ० ६२ मध्यें दक्षिणेकडील चोल पांड्य इत्यादि राजे तुर्वश कुलांतील आहेत असें म्हटलें आहे. पण ही पुराणांची नवी कल्पना दिसते. चोल पांड्य केरल राजे मूळ द्रविडवंशी असून पुढें सर्व

हिंदु राजांचा जेव्हां चंद्रसूर्यवंशांशीं संबंध जोडला गेला तेव्हां त्यांनीं तुर्वशांशीं आपला संबंध जोडलेला दिसतो. पण ही पुराणांची दंतकथा शतपथ ब्राह्मणकथेशीं बरीच विरोधी असल्यानें पूर्वोक्त न्यायानें त्याज्य ठरते. पुराणांच्या नवीन आवृत्ति करणाऱ्यांच्या वेळीं म्हणजे इ. ३००–९००च्या काळांत जे राजवंश हिंदुस्थानांत प्रसिद्ध होते, त्यांच्या महाभारत रामायणांत प्रसिद्ध असलेल्या पुरुषांशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न होणें साहाजिक आहे. पण अंग वंग कालिंग इत्यादि दक्षिण-पूर्व भाग प्राचीन काळापासून अनार्यच मानला गेला आहे, त्याचप्रमाणें चोल केरल पांड्य हेहि अनार्यच असावेत.

असो, आतां आपण अनु, द्रुह्यु, आणि पूरु या तीन दुसऱ्या आर्य जातींच्या प्रसाराचा विचार करूं. त्यांत पुरु हे वैदिककाळांतच फार प्रसिद्धि पावले असें दिसतें. महाभारतांत पूरूला ययातीचा जो आशीर्वाद मिळाला त्याचें मूळ हेंच होय. पृथ्वी चंद्र-सूर्य-रहित होईल पण अपौरव कधीं होणार नाहीं (अपौरवा तुहि मही न कदाचिद्भविष्यति) एवढा त्यांचा प्रसार हिंदुस्थानांत झाला होता. पहिली वसति सरस्वतीतीरावर झाल्याचा उल्लेख ऋग्वेदसूक्तांत आहे, हें पूर्वींच सांगितलें आहे. त्यांनीं तेथून पूर्व, पश्चिम व दक्षिण या दिशांनीं आपली सत्ता वाढविली व पांडवांच्या वेळीं ते सार्वभौम झाले. पूरूंना प्रथम मूळच्या राक्षस रहिवाशांशीं झगडावें लागलें हें उघडच आहे. या गोष्टीचा उल्लेख ऋग्वेद १—५९, १३१, १७४, ४–२१, २८, ६–२० आणि ७–५, १९ या सूक्तांत आढळतो. १–५९ हें सूक्त नोधा गौतमाचें असून त्यांत तो म्हणतो "वृत्र अथवा मूळचे रानटी अनार्य यांचा नाश करणारा म्हणून अग्नीची पूरु पूजा करतात (यं पूरवो वृत्रहणं सचन्ते।), १–१३१ हें परुच्छेपाचें सूक्त आहे, व त्यांत (विदुष्टे अस्य वीर्यस्य पूरवः पुरो) हें सामर्थ्य पूरूंना प्राचीन काळीं माहित होतें असें म्हटलें आहे. १–१७४ चा उल्लेख येथें चुकीनें मॅकडोनेलनें केलेला दिसतो. मागें दर्शविल्याप्रमाणें यांत यदुतुर्वशांचा उल्लेख आहे. पण पूरूंचा नाहीं. कदाचित् पुरुकुत्साचा उल्लेख असल्यानें तें येथें घेतलें असेल; पण माझ्या मतें पुरुकुत्स हा पूरु नाहीं; पूरु आणि पूरुकुत्स यांत फरक आहे आणि पूरुकुत्स हा सूर्यवंशी राजा निश्चित आहे. ४–२१ हें वामदेवाचें इन्द्रस्तुतिपर सूक्त आहे. यांत पूरूकरितां

वृत्राला मारून कोणी स्वातंत्र्य दिलें? असें म्हटलें आहे ( हन्ता वृत्रं वरिवः पूरवे कः ). ६–२० ह्या भरद्वाजाच्या सूक्तांत “ हे इंद्रा, पुरुकुत्साकरितां तूं दासाच्या सात गढ्यांना तोडलेंस अशी पूरु तुझी स्तुति करतात. ( सनेम तोवसा नव्य इन्द्र प्र पूरवः स्तवन्त एना यज्ञैः । सप्त यत्पुरः शर्म शारदी र्दर्द्दन्दासीः पुरुकुत्साय शिक्षन् ॥ १० ॥ ). ७–५ या वसिष्ठाच्या अग्नि-सूक्तांत ‘हे अग्नि, पूरुकरितां तूं दासांचे किल्ले तोडिलेस’ असें म्हटलें आहे. ( वैश्वानर पूरवे शोशुचानः पुरो यदग्ने दरयन्नदीदेः ॥ ); व शेवटचें सूक्त ८–१९ यांत वसिष्ठ ( पूर्वीं सांगितलेंच आहे कीं,) म्हणतो हे इन्द्रा, त्वां वृत्रांच्या लढाईत पुरुकुत्स, त्रसदस्यु आणि पूरु यांस रक्षिलें ( प्र पौरुकुत्सिं त्रसदस्युमावः क्षेत्रसाता वृत्रहत्येषु पूरुम् ). वरील सूक्तांतील उद्गारावरून दोन तीन गोष्टी स्पष्ट दिसतात. ऋग्वेदांत वृत्र शब्द मूळ रहिवाशाच्या अर्थीं वारंवार येतो. या लोकांशीं आर्यांच्या वारंवार लढाया होत. त्यांत त्यांच्या गढ्या किंवा तटबंदी केलेलीं पुरें आर्यांस तोडावीं लागत. दुसरी गोष्ट ही कीं, अशा लढाया दोन्ही आर्य शाखांस कराव्या लागल्या, त्यांत पूरूसहि पुष्कळ कराव्या लागल्या. ७–१९ वरून पूरु पूर्वकाळीं तूं पुरुकुत्साला मदत केलीस तशी मला कर अशी इन्द्राची स्तुति करितो. यावरून पुरुकुत्स हा पूर्वींचा असून पूरु हा मागूनचा आहे असें दिसतें. तिसरी गोष्ट ह्यापुढें पूरु इतके वाढले कीं, पूरु म्हणजे सामान्य मनुष्य असा अर्थ करावा असें यास्कानें सुचविलें आहे. आणि कित्येक सूक्तांचा अर्थ करतांना टीकाकारांनीं पूरु शब्दाचा मनुष्यच अर्थ केला आहे. पण मॅक्डोनेल म्हणतो त्याप्रमाणें या सर्व ठिकाणीं पूरु म्हणजे पौरव ( अर्थात् दुसऱ्या वंशाचे आर्य ) असाच अर्थ घेण्यास कांहींच हरकत नाहीं. असो, एवढी गोष्ट निश्चित आहे कीं, पूर्वीं आलेले सूर्यवंशी आर्य जसे अतिशय वाढले तेव्हां भरत किंवा भारत शब्द कोणत्याही क्षत्रिय वीराचा वाचक झाला तसाच प्रकार दुसऱ्या आर्य-वंशाच्या प्रसारानंतर पूरु शब्दाचा झाला.

पूरूंचा याप्रमाणें अनार्यांशीं अनेक युद्धें करून विजय झाल्यावर सरस्वतीतीरावर पक्का जम बसला, तेव्हां त्यांनीं पंजाबांतील पूर्वीं वसलेले आर्य यांजवर शस्त्र चालविण्याचें प्रयत्न केले. पण सुदासानें त्यांचा पराभव केला हें पूर्वीं आलेंच आहे. तथापि कुरुक्षेत्रांत पूरूंची भरभराट झाली. यांचा

राजा अजमीढ याचें नांव ऋग्वेदांत आढळतें व तें अनेक वचनीं आढळतें. म्हणजे अजमीढाचेंहि कुल फार विस्तारलें. पूरूंच्या पुढचा पुराणांत प्रसिद्ध राजा दुष्यन्त पुत्र भरत याचा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं. पण शतपथब्राह्मणांत अनेक अश्वमेधकर्ता म्हणून त्याचें नांव आलें आहे. हे यज्ञ सरस्वती, यमुना व गंगा किनाऱ्यानें त्यानें केले असें वर्णन आहे. त्यावरून त्याचें राज्य पूर्वेस व दक्षिणेस वाढलें. पूर्वीच्या भरताहून त्याचा भेद स्पष्टपणें कळण्यासाठीं शतपथांत त्यास नेहमीं दौष्यन्ति भरत म्हटलें आहे. याच्या पुढचा प्रसिद्ध राजा म्हणजे कुरु याचें नांव त्या देशालाच पडलें. याचा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं. भरत आणि कुरु यांचा उल्लेख ऋग्वेदांत नसल्यानें ऋग्वेदाची रचना झाल्यानंतर ते राजे झाले असें मात्र निष्पन्न होत नाहीं. ऋग्वेद या देवतास्तुतिग्रंथांत त्यांचा उल्लेख येणें न येणें एक ऐच्छिक गोष्ट आहे. त्यांचा विशेष गाजावाजा पुढें ब्राह्मणकालांत झाला. ब्राह्मणांत कुरुपांचालांचें जोडनांव नेहमीं येतें. यावरून भारतीयुद्धानें दोन्ही कुलें एक झाल्यावर ब्राह्मण ग्रंथ झाले असें अनुमान निघतें. जनमेजय पारीक्षिताचें व त्याच्या अश्वमेधाचें नांव ब्राह्मणांत अनेकदां येतें. कृष्णद्वैपायन व्यासानें ऋग्वेदाची रचना म्हणजे संघटना केली, ही गोष्ट खरी दिसते. कारण यावरूनहि हाच काल येतो म्हणजे ऋग्वेदघटनेनंतर भारती युद्ध व त्यानंतर ब्राह्मणग्रंथ झाले हें योग्यच आहे.

पांचालांविषयीं जास्त खुलासा केला पाहिजे. पौराणिक वंशावळीप्रमाणें पांचाल पूरूंच्या वंशांत एका वाकड्या शाखेचे लोक होत. त्यांचा मूळ राजा या वंशावळीप्रमाणें सृंजय होता. ह्या सृंजयाचा उल्लेख ऋग्वेदांत आला आहे. ६-२७ मध्यें सृंजय दैववात देववाताचा पुत्र होता असें म्हटलें आहे. ( स सृंजयाय तुर्वशं परारादाद्वृचीवतो दैववाताय शिक्षन् ) या ऋचेंत भारद्वाज ऋषीनें इन्द्रानें ऋचीवतांना व तुर्वशाला दैववात सृंजय यांच्या स्वाधीन केलें असें म्हटलें आहे. ४-१५ यांत सृंजयाचा याहून जास्त महत्त्वाचा उल्लेख आहे. यांत सृंजयाच्या अग्नीची स्तुति असल्यानें हा राजा फार मोठा आर्यधर्मी होता असें दिसतें ( अयं यः सृंजये पुरो दैववाते समिध्यते ). या सूक्ताच्या शेवटच्या चार ऋचांत सोमक साहदेव्य या सृंजयवंशोत्पन्न राजाची दानस्तुति असून वामदेवानें त्याला पुष्कळ दान दिल्या-

बद्दल आशीर्वाद दिले आहेत आणि हे आशीर्वादात्मक मंत्र हल्लीं प्रत्येक आशीर्वादाच्या वेळीं वैदिक म्हणतात (एष वां देवावश्विना कुमारः साहदेव्यः । दीर्घायुरस्तु सोमकः ॥ तं युवं देवावाश्विना कुमार साहदेव्यम् । दीर्घायुष्यं कृणोतन ॥ १० ॥). पुराणांच्या वंशावळीप्रमाणें सहदेव व तत्पुत्र सोमक हे सृंजयाच्या कुलांत म्हणजे पांचालांत झाल्याचें वर्णन आहे. आणि द्रुपदाचा चौथा पूर्वज हाच सोमक होय. यानें राजसूय यज्ञ करून फार कीर्ति मिळविली असें ऐतरेय ब्राह्मणांत वर्णन आहे. पांचालांचें ऋग्वेदकाळीं नांव सृंजय दिसतें आणि ब्राह्मणकाळीं पांचाल आहे. महाभारतांत तिन्ही नांवें सृंजय, सोमक, आणि पांचाल येतात. वरील हि हकीकतीवरून हीं नांवें एकाच अर्थी कां आहेत याचें गूढ उकलतें. हरिवंशांत पांचाल नांवाची व्युत्पत्ति एका राजाच्या पांच पुत्रांवरून (हे पांच अलं पुरे आहेत) अशा अर्थानें बसविली आहे; पण ही केवळ कविकल्पना आहे. कदाचित् पांच जाति एके ठिकाणीं मिळाल्या म्हणून त्यांस पांचाल म्हणूं लागले असावे. इतिहासांत अनेक जाति एके ठिकाणीं मिश्रित झाल्याचे कित्येक दाखले आहेत. एका जातीनें दुसऱ्या जातीचा राजा मान्य करून, बहुधा दुसऱ्या जातीस जिंकून असा प्रकार घडतो. अर्वाचीन इतिहासांत कानडांत इंग्लिश व फ्रेंच किंवा आस्ट्रिया-हंगरींत जर्मन व हन किंवा खुद्द ग्रेटब्रिटनमध्यें इंग्लिश, स्काच, वेल्श हे एक झालेले आहेत. त्याचप्रमाणें प्राचीन हिंदुस्थानच्या इतिहासांत कुरु व पांचाल एक झालेले दिसतात. व तसेंच तुर्वश हे सृंजयांत सामील झाले असें ऋग्वेदावरून दिसतें. शतपथ ब्राह्मणांत पांचालांत क्रिवि सामिल झाल्याचा आणखी उल्लेख आहे. तात्पर्य पांचाल हे पांच लोक एक झालेले दिसतात.

याप्रमाणें दुसऱ्या आर्यशाखेचे पूरु हे फार बलाढ्य आणि विस्तार पावलेले लोक होते, असें वैदिक वाङ्मयावरून दिसतें. कुरु पांचाल हे त्यांचेच वंशज महाभारतकाळीं व ब्राह्मणग्रंथात फार प्रसिद्ध होते व त्यांनीं सर्व भरतखण्डावर साम्राज्य केलें. अर्थात् पंजाबावरहि त्यांची सत्ता होती. पंजाबांत सूर्यवंशी म्हणजे पूर्वी आलेले क्षत्रिय होते. पण ते आतां राज्यसंपन्न राहिले नाहींत. यामुळेंच अलेक्झांडरच्या वेळीं त्यास पंजाबांत पौरव (Porus) राजा आढळला. या पोरसावरून कित्येक लोक असा तर्क

करतात कीं, पूरुवंशी क्षत्रिय प्रथम वायव्येकडून पंजाबांत आले आणि तेथून पूर्वेकडे पसरले. पण आम्हीं प्रारंभीं दाखविल्याप्रमाणें ग्रीक इतिहास हा चौथ्या नंबरावर प्रमाणांत असून त्याच्या विरोधी ऋग्वेदप्रमाण असेल तर तें अगोदर मानलें पाहिजे; तेव्हां ऋग्वेदावरून पूरू हे सरस्वतीतीरावर उत्तरेकडून म्हणजे उत्तरकुरूंतून आले आणि तेथोन पश्चिमेकडे त्यांनीं आपलें वर्चस्व स्थापिलें असें दिसतें. किंबहुना इतिहासाच्या या परंपरेला महाभारताचाहि आधार आहे. कारण जनमेजयानें हास्तिनापुरीं राज्य केल्यावर तक्षशिला पश्चिमेकडे जिंकली असें महाभारतांत आरंभीं वर्णन आहे. तक्षशिलेची मूळ स्थापना सूर्यवंशी म्हणजे रामाचा बंधु भरत याचा पुत्र तक्ष यानें केली असेंहि वर्णन रामायणांत आहे. तेव्हां पंजाबांत मूळ वसति सूर्यवंशीयांची. ऋग्वेदकाळांत पूरूंनीं पंजाब जिंकण्याचा प्रयत्न केला तो सिद्धीस गेला नाहीं, भारतीयुद्धानंतर गेला. यामुळें अलेक्झांडरला ग्रीककाळीं पौरव राजा पंजाबांत भेटला हें ठीकच झालें.

ब्राह्मणकाळीं व महाभारतकाळीं सूर्यवंशी क्षत्रियांचीं राज्यें फक्त पूर्वेसच राहिलेलीं होतीं. तीं कोसल-विदेह हीं होत. ब्राह्मणांमध्यें ज्याप्रमाणें कुरुपांचालांचा अभिमानयुक्त वारंवार उल्लेख येतो त्याचप्रमाणें कोसल विदेहाचाहि येतो. कुरुपांचालांहून हे लोक निःसंशय भिन्न होते. यांच्यांत तत्वज्ञानाचा विशेष विचार होता. पण डाक्तर ग्रियर्सन यांनीं भाषेच्या तुलनेवरून असें सिद्ध केलें आहे कीं यांची भाषा पंजाबच्या सामान्य लोकांच्या भाषेशीं जुळती असून ती पश्चिम हिन्दी भाषेहून निराळी आहे. ही गोष्ट मॅक्डोनेल याजलाहि मान्य असून कुरु शब्दाखालीं त्यानें असें लिहिलें आहे कीं, कुरुपांचालांनीं या कोसल-विदेहास पंजाबाच्या सरहद्दीवरून पुढें ढकललें असाव, आमचें मत पूर्वीं सांगितल्याप्रमाणें भिन्न आहे. प्रथमशाखेचे आर्य हिंदुस्थानांत आले ते पंजाबापासून मिथिलेपर्यंत म्हणजे सिंधुनदापासून तों थेट सदानीरानदीपर्यंत हिमालयाच्या पायथ्यापायथ्यानें पसरले आणि नंतर दुसऱ्या आर्यशाखेचे म्हणजे चंद्रवंशी आर्य हे हिंदुस्थानांत उतरले आणि मध्येंच सरस्वतीतीरावर पाचरीसारखे घुसले. पंजाब व अयोध्या—मिथिला पश्चिम व पूर्वबाजूकडे पसरण्यास वाव नसल्यानें हे आर्य दक्षिणेकडे यमुना किनाऱ्यानें पसरले. असो, कुरुपांचालांत व कोसळविदेहांत भेद होता

ही गोष्ट मॅक्डोनेलनें कबूल केली आहे खरी. त्याजविषयीं कुरुशब्दाला खालीं टीप दिली आहे त्यांत त्यानें थोडीशी शंका प्रदर्शित केली आहे. या शंकेस आधार ब्राह्मणग्रंथांत ( शतपथ ) सरस्वतीतीराहून पूर्वेस आर्यांचा अग्नि सदानीरेपर्यंत गेल्याची जी कथा दिली आहे ती दिली आहे. दोन्ही लोक एकच होते, असें अनुमान निघूं शकेल असे मॅक्डोनेल म्हणतो. पण या कथेवरून हें अनुमान निघतेंच असें नाहीं. कारण ही गोष्ट पूर्वींच्या आर्यांच्या वसाहतीच्या वेळचीहि असूं शकेल. विदेहाचा राजा माठव्य हा अग्नि तोंडांत धारण करून निघाला तो सदानीरा नदीपर्यंत गेला; तेथें गौतम राहूगण यानें एक प्रश्न विचारल्यावरून त्यानें तोंडांतील अग्नि खालीं काढून ठेविला. तो पुढें गेलाच नाहीं. यामुळें कोणीहि ब्राह्मण सदानीरा नदी वलांडीत नाहीं, ( शतपथ अ. ४–१–१० ), अशी ही कथा आहे. गौतमकुळाचे ऋषि मिथिलाधिपांचे पुरोहित असल्याबद्दल रामायणांत पुरावा मिळतो आणि पुराणांवरून कोसल विदेह राजे सूर्यकुलोत्पन्न आहेत. तेव्हां ही कथा पूर्वींच्या आर्य वसाहतीच्या वेळची असावी. शिवाय या कथेंत कुरुपांचालांचा उल्लेख नाहीं. माठर विदेह हा कुरुवंशी किंवा पूरुवंशी होता असेंही म्हटले नाहीं. तेव्हां कोसलविदेहाच्या भाषेवरून व पुराणांवरून ते सूर्यवंशी क्षत्रिय अतएव पंजाबच्या क्षत्रियांशीं संबद्ध ठरतात या गोष्टीस ब्राह्मणकथेवरून मुळींच बाध येत नाहीं. कोसलविदेह तत्वज्ञानाच्या बाबतींत याज्ञवल्क्यजनक संवादांनीं उपनिषदांत प्रसिद्ध आहेत. तसेंच पुढील काळांत बुद्धमहावीर या वेदविरुद्ध नवीन मतें स्थापन करणाऱ्याचें जन्मक्षेत्र व कार्यक्षेत्र याच कोसलविदेहांत होतें हें इतिहासप्रसिद्ध आहे. याच्या उलट कुरुपांचालभूमि म्हणजे वैदिक विद्येची व वेदधर्माच्या कर्मठ व आस्तिक्य मताभिमान्यांची भूमि ही गोष्ट प्राचीनकाळीं म्हणजे ब्राह्मणादि-भारतादिकाळीं तितकीच प्रसिद्ध दिसते.

अनु आणि द्रुह्यु यांच्या वंशांचा वृतान्त देणें बाकी आहे. द्रुह्यूंचा स्वतंत्रपणें उल्लेख ऋग्वेद मंडळ ८ सूक्त १० यांत आहे. तसाच ६–४६ त आहे. या दुसऱ्यांत पूरु आणि द्रुह्यु यांचा एके ठिकाणीं आहे. ( यद्वा तृक्षौ मघवन्द्रुह्यावि जने यत्पूरौ यच्च वृष्ण्यम् ॥ ८ ॥ ) हा उल्लेख दोघांनांहि अनुकूल असा आहे; यापरून द्रुह्यूचे राजे पूरूंप्रमाणें पुढें ऋग्वे-

दाच्या ऋषींना संमत झालेले असावे. यापेक्षां जास्त उल्लेख ऋग्वेदांत नसून ब्राह्मणग्रंथांतहि नाहींत. भारतांत गांधारांचा उल्लेख आहे आणि पुराणांच्या मतें गांधार द्रुह्युकुलांतले आहेत. तसें मानण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. कारण गांधार राजे जरी पंजाबांत सिन्धु नदीच्याहि पलीकडे आहेत; तरी पंजाबांत चंद्रवंशी राज्यें पुढें पुढें स्थापित झाल्याचें आपण पूर्वींच मान्य केलें आहे. मद्र केकय वगैरे राजे सूर्यवंशी होते त्याचप्रमाणें कांहीं चंद्रवंशी पौरस वगैरेचीं राज्यें ग्रीक काळांत आपल्यास दिसतात. तेव्हां द्रुह्यूचा वंश गांधारांत ब्राह्मणकालानंतर प्रतिष्ठित झाला असल्यास नवल नाहीं. आतां अनूचा वंश ऋग्वेदकालांतच प्रबल झालेला दिसतो. कारण त्याच्या अग्नीचा स्वतंत्रपणें उल्लेख आढळतो. ( आगन्म वृत्रहन्तमं ज्येष्ठमग्निमानवम् ॥ ). या सूक्ताचा कर्ता ( ८–४६ ) एक आत्रेय ऋषि आहे आणि त्यांत आर्क्षश्रुतर्वा याची दानस्तुति आहे. ऋक्षपुत्र श्रुतर्वा हा कोणत्या वंशांत झाला हें पाहिलें पाहिजे. अनवांचा उत्तर वैदिक वाङ्मयांत उल्लेख आढळत नाहीं. पुराणांच्या वर्णनावरून अनुवंशांत बरींच प्रसिद्ध कुलें झालीं. शिबि औशीनर यांचें नांव प्रसिद्ध आहे. हा १६ प्रसिद्ध अश्वमेध कर्त्यांपैकीं एक असें महाभारतांत वर्णन आहे. येथें चंद्रवंशी क्षत्रियांचा म्हणजे यदु, तुर्वश, अनु, द्रुह्यु आणि पूरु यांच्या वंशांचा ऋग्वेदांतील उल्लेख समाप्त झाला. आतां आपण या विस्तृत विवेचनाचा थोडक्यांत गोषवारा पाहूं.

भाषोत्पत्ति शास्त्र आणि शीर्षमापन-शास्त्र यांचे हिंदुस्थानच्या लोकांना सिद्धान्त प्रत्यक्ष डा. ग्रीयर्सन व सर एच्. रिस्ले यांनीं लाविले त्यावरून डॉ. होर्नेल यांच्या मतांस पुष्टि देऊन इंपिरियल गॅझेटीयरनें असा निष्कर्ष काढला आहे कीं, हिंदुस्थानांत प्राचीन काळीं आर्यांच्या दोन टोळ्या निरनिराळ्या रस्त्यानें आल्या व त्यांनीं या देशांत निरनिराळ्या वेळीं व स्थळीं वसाहत केली. पहिली टोळी लांब डोक्याची असून तिनें पंजाबापासून मिथिलेपर्यंत देश वसविला आणि हल्लीं यांचे वंशज पंजाबांत राजपुतान्यांत व औंध बिहारमध्यें आढळतात. पूर्व हिंदी ही औंध-बिहारची भाषा असून ती पंजाबी-राजस्तानीशीं जुळती आहे आणि पश्चिम हिन्दीहून भिन्न आहे. दुसरी आर्यांची टोळी रुंद डोक्याची असून तिचा प्रवेश हिंदुस्थानांत नेहमींच्या वायव्येकडून न होतां उत्तरेकडून होऊन ती सरस्वतीतीरावर प्रथम

वसली आणि तिला पश्चिम व पूर्व म्हणजे पंजाब व अवध वगैरेकडे अवकाश न मिळाल्यानें ती दक्षिणेकडे पसरली आणि येथील मूळ द्रविडवंशी रहिवाशांशीं जास्त मिश्रित झाली. हल्लींची संयुक्त प्रांतातील व मध्य प्रांतांतील लोक हे आर्यांचे द्रविडमिश्रित वंशज आहेत, व अंबाल्यापासून दक्षिणेकडे त्रिकोणाकृति काठेवाड ते जबलपूर या प्रदेशांत ते हल्लीं आढळतात आणि यांची भाषा पश्चिम हिन्दी आहे. यानंतर पुराणांच्या दंतकथा परंपरेवरूनहि असा निष्कर्ष निघतो कीं हिंदुस्थानांत दोन आर्यवंश आले, एक सूर्यवंश व दुसरा चंद्रवंश; आणि वरील सिद्धान्ताशीं मेळ घालतां असें दिसतें कीं, प्रथम आलेला आर्यवंश पुराणांचा सूर्यवंश होय आणि दुसरा आलेला चंद्रवंश होय. अयोध्या-बहारांतील राजे कोसल विदेह सूर्यवंशी होते, आणि कुरु, पांचाल, शौरसेन, चेदि वगैरे सरस्वती व यमुना यांच्या तीरावर वसलेले क्षत्रिय चंद्रवंशी होतें अशी पुराणांची कथा आहे. तेव्हां पहिले आलेले आर्य सूर्यवंशी व दुसरे आलेले आर्य चंद्रवंशी हाच मेळ बसतो. या सिद्धान्ताला ऋग्वेदांत व तदुत्तरच्या वैदिक वाङ्मयांत कितपत आधार मिळतो हें आपणास या प्रकरणांत पाहावयाचें होतें तसा विचार करतां वेदांतहि याच सिद्धान्तास पुष्टि मिळते हें आपणास समजते. तें थोडक्यांत येणेंप्रमाणें.

ऋग्वेदांत भरत नांवाचा उल्लेख वारंवार येतो. हे कोण आणि यांचें पुढें काय झालें याबद्दल पाश्चात्य वैदिक विद्वानांस गूढ पडलेलें दिसतें. मॅक्डोनेलनें कुरु शब्दखालीं ( वेदिक इंडेक्स पाहा ) असें दर्शविलें आहे कीं, बहुतेकांचा समज भरत हे लोक कुरु लोकांत सामिल झाले असा आहे. परंतु भाषोत्पत्तिशास्त्र व शीर्षमापनशास्त्र व पुराणपरंपरा यांवरून प्रथम आलेली जी आर्यांची टोळी म्हणजे सूर्यवंशी क्षत्रिय तेच हे भरत ऋग्वेदांतील होत. यांचें ऐक्य सिद्ध करण्यास आपल्यास सबळ प्रमाणें मिळतात. भरतांचे पुरोहित वसिष्ठकुलाचे त्रित्सु दिसतात. पुराणांतहि सूर्यकुलाचे पुरोहित वसिष्ठ कुलोत्पन्नच आहेत. दुसरें ऋग्वेदांत भरताचा, राजा सुदास आहे. रामायणांतहि रामाच्या पूर्वजांत सुदास आहे, आणि पुराणांतहि सूर्यवंशावळींत सुदास आहे. आतां ऋग्वेदांत सुदासाचा बाप दिवोदास दिसतो तसा पुराणांत नाहीं, हें खरें. सुदास, पैजवन, दिवोदास

आणि वध्यश्व हीं चढत्या पिढीचीं नांवें ऋग्वेदांत आढळतात. अश्वान्त नांवें बहुधा सूर्यवंशांत आहेत आणि त्यांचा संबंध अस्पीज या अर्द्धयुक्त पर्शियन नांवांशीं सहज जुळतो. ऋग्वेद ६-६१ आणि १०-१९ यांत वध्र्यश्व हा सूर्यवंशी राजा दिसतो. तिसरी गोष्ट म्हणजे विश्वामित्र हा ऋग्वेदांत भरतांचा ऋषि दिसतो, आणि पुराणांतहि विश्वामित्र हा सूर्यवंशाशीं संबद्ध आहे. पण पुराणाशीं विरोध रामायणाचा आहे. रामायणांत विश्वामित्राचा पूर्वज कुशिक हा प्रजापतीचा प्रत्यक्ष पुत्र होता असें सांगितलें आहे. कुशिकाचें नांव ऋग्वेदांतहि आहे. पुराणांत विश्वामित्राची चंद्रवंशांत दोन प्रकारांनीं उत्पत्ति दिली आहे. तात्पर्य पुराणांची ही परंपरा नवीन बनविलेली रामायणाला विरोधी म्हणून सोडिली पाहिजे. चौथें पूरुकुत्स आणि त्रसदस्यु हे भरतांचे राजे आहेत, ब्राह्मणांत ते ऐश्वाक म्हटले आहेत आणि पुराणांतहि ते सूर्यवंशांतच आले आहेत. कुरुश्रवण हा त्रासदस्यव होता, असें स्पष्ट म्हटलें असल्यानें कुरु शब्दावरून त्याला कुरुवंशांतील कांहीं मानतात तसा मानणें शक्य नाहीं. या पांच कारणांवरून ऋग्वेदांतील भरत आणि पुराणांतील सूर्यवंशी हे एक होत असें आम्हीं समजतों. भरत शब्दानें घोंटाळा होऊन कांहीं पाश्चात्य विद्वान त्यांस महाभारतांतील भरत समजतात. पण ब्राह्मणांत या भरताचा दौष्यन्तिभरत असा नेहमीं भिन्न निर्देश केलेला असतो. खुद्द पुराणेंच सांगतात कीं, हिंदुस्थानाला भारतवर्ष नांव या भरतावरून पडलेलें नसून स्वायंभुव मनूचा पणतु भरत याजवरून पडलें. भरत म्हणजे मनु किंवा खुद्द सूर्य असा अर्थ निरुक्तकार देतो. तेव्हां ऋग्वेदांतील भरत म्हणजे सूर्यवंशी हा संबंध बरोबर जुळतो. हे भरत पुढें इतके प्रसृत झाले कीं ऐतरेय ब्राह्मणांत एके ठिकाणीं भरत शब्द सामान्य वरि या अर्थीं योजिला आहे. निरुक्तांत तर भरत शब्द कुरुप्रमाणें सामान्य ऋत्विज या अर्थीं ऋग्वेदांत आहे असें म्हटलें आहे आणि यज्ञाच्या वेळीं कुरु शब्दाच्या ऐवजीं मंत्रांत भरत असेंहि म्हणावें असें सांगितलें आहे. ( वेदिक इंडेक्स). याचा अर्थ मॅक्डोनेल म्हणतो तसा नाहीं. तर जसे कुरु तसेच भरत यज्ञांत घेण्यांत योग्य असून दोन भिन्न वंशाचे भिन्न लोक होते असेंच यावरून दृढ होतें आणि भरत म्हणजे सूर्यवंशी आर्य हा निश्चय होतो.

आतां दुसऱ्या टोळीचे आर्य म्हणजे चंद्रवंशी आर्य यांजबद्दल फारसा मतभेद राहणें शक्य नाहीं. त्यांच्या यदु, तुर्वश, अनु, द्रुह्यु, पूरु या पांच मुख्य शाखांचा उल्लेख ऋग्वेदांत आला आहे. पूरूचा पुढें इतका उत्कर्ष झाला कीं, भरताप्रमाणें पूरु शब्द सामान्य वीर किंवा ऋत्विक या अर्थीं झाला. रामाचा उल्लेख ऋग्वेदांतलिच एका सुक्तांत आहे. * तर श्रीकृष्णाचा उल्लेख छांदोग्योपनिषदांत आहे. श्रीकृष्ण ऋग्वेद रचनेनंतर झाला हें निर्विवाद आहे. म्हणजे भारती युद्धापूर्वी थोडींच वर्षे व्यासानें वेदांची रचना म्हणजे संकलन केलें अशी आपली समजूत यथार्थ आहे. अर्थात् भारती युद्धांतील प्रसिद्ध व्यक्तींचीं नांवें ऋग्वेदांत न येतां ब्राह्मणांत येतात. ब्राह्मणांत कुरुपांचालांचें तसेंच धृतराष्ट्राचें, जनमेजय पारीक्षिताचें व श्रीकृष्णाचें नांव आलें आहे. हे सर्व चंद्रवंशी होते. यांचे पूर्वज पुरूरवा, नहुष आणि ययाति. यांचा उल्लेख ऋग्वेदांत येतो यांत नवल नाहीं; यदु पुरु वगैरेंचा येतो तर त्यांचा आलाच पाहिजे. यांचा पिता अथवा पूर्वज ययाति होता याजबद्दल मॅक्डोनेल यास शंका आहे. ( ययाति शब्द वेदिक इंडेक्स पहा ). पण जरी ऋग्वेदांत ययातीचा पुत्र म्हणून यदु–पुरु साक्षात् सांगितले नाहींत तरी असा संबंध १–३१ सूक्तावरून निघतो. हें सूक्त हिरण्यस्तूप आङ्गिरसाचें आहे आणि आङ्गिरसाचा संबंध चन्द्रवंशीयांशीं जास्त दिसतो. या सूक्ताच्या चवथ्या ऋचेवरून पुराणांनीं चंद्र सूर्य दोन वंश योग्य कल्पिले हें बहुतेक निश्चित होतें. अग्नि प्रथम आङ्गिरस ऋषीला प्रकट झाला असें सांगून पुढें मनु आणि पुरूरवस् यांस प्रकट झाला असें यांत म्हटलें आहे ( त्वमग्ने मनवे धामवाशयः पुरूरवसे सुकृते सुकृत्तर ॥ ४ ) मनु आणि पुरूरवस हे दोन प्रसिद्ध अग्नि-पूजा करणारे होते असें यावरून निघतें आणि सूर्यचन्द्रवंशीयांचे पूर्वज होत. १७वी ऋचा महत्वाची आहे. त्यांत मागचाच ऊह घेऊन म्हटलें आहे "मनु

---

* रामाचें नांव १०—यांत आलें आहे तेथें राम एक अज्ञात मनुष्य आहे असें मॅक्डोनेल म्हणतो. पण वेन वगैरे राजांबरोबर हा उल्लेख अस-ल्यानें राम राजा आहे असें स्पष्ट दिसतें आणि एकंदर पुराणांत राम राजा एकच अयोध्येचा आहे.

ष्वदग्ने आङ्गिरस्वदङ्गिरो ययातिवत्सदने पूर्ववच्छुचे''।। 'मनुप्रमाणें आङ्गिरसाप्रमाणें ययातिप्रमाणें तूं अमुक कर' म्हणण्यांत मागील पुरूरवसाच्या ठिकाणीं ययातीचा उल्लेख आला आहे अर्थात् तद्वंशी असल्यानें तो युक्त आहे. अजमीढाचें नांव ऋग्वेदांत आहे आणि महाभारतांत कौरवपांडवांस आजमीढ अशा नांवानेंहि संबोधिलें आहे. तात्पर्य ऋग्वेदांत चंद्रवंशाच्या प्राचीन सर्व प्रसिद्ध राजांचें नांव आलें असून हाच पुढें चन्द्रवंश म्हणून पुराणांत प्रसिद्ध झाला.

ऋग्वेदांत दोन वंशाचे आर्य दिसतात तरी सूर्यचन्द्र वंशाचें नांव नाहीं ही गोष्ट मान्य करावी लागेल. पुराणांनीं हीं नांवें दिलीं आणि तीं पुढें आजतागायत मान्य झालेलीं आहेत. पण हीं नांवें कशीं दिलीं या प्रश्नाविषयीं थोडक्यांत विवेचन होणें इष्ट आहे. प्रसिद्ध वीरपुरुषांची उत्पत्ति देवतांपासून विशेषतः सूर्यचन्द्रादि प्रत्यक्ष देवांपासून झाली असा समज सर्व प्राचीन लोकांत आढळतो, किंबहुना अर्वाचीन काळींहि सांपडतो. ग्रीक लोक आकिलीज वगैरे वीर सूर्यादि देवतांपासून झालेले मानीत हें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें अर्वाचीन काळांत अझटेक लोक स्पानिश लोकांना सूर्यपुत्र मानीत. भारती पुराणांनीं सूर्य आणि चंद्र हे या दोन आर्य शाखांचे उत्पन्नकर्ते मानले यांत आश्चर्य करण्यासारखें नाहीं. त्यांत मनु हा विवस्वानाचा पुत्र होता ही कल्पना ऋग्वेदांतच आहे आणि भरत म्हणजे मनु किंवा सूर्य हीहि कल्पना वैदिक आहे. अर्थात् ऋग्वेदीय भरत हे सूर्यवंशी सहजच निश्चित होतात. त्यांच्या विरोधानें पुरूरव्याच्या वंशीयांना चंद्रवंशी मानणेंहि सहज आहे. दुसरी व्युत्पत्ति अशी दिसते कीं, पुराणकाळीं सूर्यवंशीयांचीं राज्यें अयोध्या मिथिला पूर्वेस होतीं तीं पूर्वदिशेच्या अधिपतींच्या कुळांतील आणि चंद्रवंशीयांचीं राज्यें उत्तरेकडून आलेलीं म्हणजे उत्तरकुरु देशांतून आलेलीं उत्तरेची आणि उत्तराधिपति सोम अथवा चांद्र यांच्या वंशांतील मानलीं गेलीं. तिसरी उपपत्ति आम्ही विस्तारानें महाभा-

रत उपसंहार या ग्रंथांत दिल्याप्रमाणें हे लोक वर्षमान सौर आणि चंद्र असे भिन्न मानीत होते (हें भारतीयुद्धाच्या मूळ तंट्यावरून स्पष्ट दिसतें.) या भेदावरून बसूं शकतें. यजुर्वेदावरून वैदिककाळीं म्हणजे भारती युद्धकाळीं दोन्ही प्रकारचीं वर्षे म्हणजे ३५४ दिवसांचें चांद्र व ३६५ दिवसांचें सौर हिंदुस्थानांत मानीत होते असें दिसतें. हल्लीं सर्वत्र चांद्रमास आणि सौरवर्ष प्रचलित असलें तरी पूर्वी असा फरक होता आणि पांडवांनीं चांद्र वर्षमानानें १३ वर्षांचा वनवास पुरा केला असें पांडवांचे सर्व साथीदार म्हणजे चंद्रवंशी क्षत्रिय मानीत होते आणि त्यांचे शत्रु बहूतेक सौरवर्ष मानणारे पंजाबी व अयोध्येकडचे राजे होते असें भारतावरून दिंसतें. तेव्हां या फरकावरून हीं वंश नांवें पडलीं असणेंहि संभवनीय आहे.

---

# परिशिष्ट २

## ठाण्याच्या शिलाहारांचा एक नवीन ताम्रपट व त्यांवरून मिळणारी उपोद्बलक या काळची माहिती.

प्रोफेसर वेलणकर ( वुइल्सन कालेज ) यांना एक ठाण्याच्या शिलाहारांचा शके ९१५ म्ह० इसवी सन ९९३चा अपराजितदेव राजाच्या वेळचा ताम्रपट सांपडला असून तो ते लवकरच प्रसिद्ध करणार आहेत. ह्या लेखांत राष्ट्रकूट घराण्याची विश्वसनीय वंशावळ साद्यन्त दिली आहे. कारण ठाण्याचे शिलाहार राष्ट्रकूटांचे मांडलिक होते आणि साभिमान मांडलिक होते. तेव्हां त्यांनीं आपल्या सम्राटांच्या घराण्याविषयीं प्रशंसायुक्त साद्यन्त माहिती आपल्या लेखांत दिली आहे यांत नवल नाहीं किंबहुना कक्कल राजास शेवटीं तैलप चालुक्यानें खाऊन रट्ट-राज्य नष्ट केलें याबद्दल यांत दुःखोद्गार काढलेले दिसतात. या पुस्तकांत दिलेल्या वंशावळींहून ही वंशावळ बिलकूल भिन्न नसून तिलाच उपोद्बलक आहे, सबब या ताम्रपटांत दिलेली वंशावळ आम्ही पुन्हा खालीं देतों.

जे राजे अनुक्रमानें झाले त्यांना १,२,३ असे आंकडे दिले आहेत.

गोविन्द
|
कर्कराज
|
इंद्रराज — २ कृष्णराज
इंद्रराज → १ दंतिवर्मा
२ कृष्णराज → ३ गोविंद, ४ ध्रुव
४ ध्रुव → ५ शर्व जगत्तुंग, अमोघ; (?) गोविंद
५ शर्व जगत्तुंग, अमोघ → ६ कृष्ण शुभतुंग, अकालव.; इन्द्र नित्यव.; १० बड्डिग अमोघव. ३
इन्द्र नित्यव. → ८ अमोघव. एकच वर्ष राज्य केलें.; ९ गोविंद सुवर्णवर्ण
१० बड्डिग अमोघव. ३ → ११ कृष्ण → १२ खोट्टिग निरुप → १३ ककल

बाजूस दिल्याप्रमाणें ही वंशावळ असून फक्त गोविंद ध्रुवपुत्र यांत अधिक दाखविलेला आहे. बाकी वंशावळ पूर्वी पुस्तकांत दिल्याप्रमाणें आहे. या वर्णनांत ११ वा राजा कृष्ण याचें फारच वर्णन केलेलें आहे. समग्र हिंदुस्थानदेश हिमालयापासून लंकेपर्यंत आणि पश्चिमाद्रीपासून पूर्वाद्रीपर्यंत याच्या एकछत्री अम्मलाखालीं होता असें एका श्लोकांत म्हटलें आहे. तथापि त्या श्लोकापूर्वीच्या श्लोकांत याच्या वेळीं कोण कोणतीं मोठीं राज्यें हिंदुस्थानांत होतीं हें दिलें आहे, तें फारच महत्त्वाचें आहे. आम्ही वर्णन केलेली त्या वेळच्या राज्यांची स्थिति या श्लोकांत दिलेल्या स्थितीशीं तंतोतंत जुळते. तो श्लोक येथें देण्यासारखा आहे.

चोलो लोलो भियाभूद्गजपतिरपतज्जान्हवीगव्हरान्तः ।
वाजीशस्त्रासशेषः समभवदभवच्छैलरन्ध्रे तथान्ध्रः ॥
पाण्ड्येशः खण्डितोऽ भूदनुजलधिजलं द्वीपपालाः प्रलीना ।
यस्मिन्दत्तप्रयाणे सकलमपि सदा राजकं न व्यराजत् ॥

चालू राजाची स्तुति अतिशयोक्तियुक्त कोणीहि करील; पण कक्कल राज्य नष्टभ्रष्ट झाल्यावर त्याच्या मांडलिकांनीं कृष्णराजाचें असें अभिमानयुक्त वर्णन करावें यांत तथ्यच असलें पाहिजे. या वर्णनांत प्रथम चोलांचें वर्णन पूर्वेस आहे. या वेळीं चोल प्रबल होते. नंतर गजराज जान्हवीच्या गव्हरांत लपला हें वर्णन अर्थात् बंगालच्या पालांस अनुलक्षून आहे. बंगालचे पाल या वेळीं पूर्वेस प्रबळ होते व त्यांजवळ गजसैन्य फार मोठें होतें असें आरबांनींहि लिहिलें आहे. यानंतर वाजीशाचें वर्णन आहे, अर्थात् तें कनोजच्या प्रतिहारांचें वर्णन आहे. त्यांजवळ अश्वसैन्य फार होतें आणि ते मारवाडच्या रेंगस्तानचे मूळचे रहिवाशी असून या वेळीं उत्तरेचे सम्राट होते. दक्षिणेस पांड्य प्रबळ होते; आणि मध्यन्तरीं आंध्रांचें राज्य पूर्व घाटाजवळ म्हणजे हल्लींच्या निजामशाहीच्या पूर्व भागांत होतें. तात्पर्य या श्लोकांत त्या वेळची हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति बरोबर प्रतिबिंबित आहे. गजपति आणि हयपति हीं सार्थ विशेषणें बंगाल व कनोजला लाविलीं आहेत. हींच बिरुदें पुढें रूढ झालीं.

या दानपत्रांत रट्टराज्य हा शब्द मालखेडच्या राष्ट्रकूटांच्या राज्यास लाविला आहे तो अन्वर्थ आहे हें खरें. तें रट्टाचें म्हणजे मराठ्यांचें प्राचीन राज्य होतें आणि तें एक हजार वर्षांनंतरच्या मराठी राज्याप्रमाणेंच बहुतेक सर्व हिंदुस्थानभर गाजत होतें. याशिवाय या शब्दाचें महत्त्व असें कीं, स्कन्दपुराणांत रट्टराज्य शब्द आला आहे तो आतांपर्यंत मला अन्यत्र दिसला नाहीं; परंतु येथें दिसला, तेव्हां हा शब्द महाराष्ट्र देशाला त्या वेळीं रूढ होता असें दिसतें. मराठेराज्य हा शब्द आरबांनीं उपयोगिला आहे, पण तो शब्द या दानपत्रांत सांपडला तेव्हां स्कन्दपुराणांतील रट्टराज्य हेंच.' यावरून हेंही निश्चित होतें कीं, स्कंदपुराणाची हल्लींची आवृत्ति राष्ट्रकूटांच्या नंतरची, फार झालें तर शेवटच्या सुमाराची इसवी सन दहाव्या शत-

कांतील आहे. दंतिवर्म्याच्यापूर्वी म्हणजे इ. स. ७५३ पूर्वी रट्टराज्यच नव्हतें व तो शब्दही रूढ नव्हता. अर्थात् हल्लींचें स्कन्दपुराण यापूर्वीचें नाहीं हें निश्चित होय.

शेवटली गोष्ट ही कीं, हे शिलार क्षत्रिय समजले जात होते यांत शंका नाहीं. कारण यांचें नांव चंदाच्या ३६क्षत्रियकुलांच्या यादींत आहे. शेलार नांव फक्त हल्लीं मराठ्यांत आहे रजपुतांत नाहीं. ३६तील कांहीं नांवें मराठ्यांतहि आहेत, विशेषत: राठोड चालुक्य वगैरे; पण शेलार हें नांव केवळ मराठ्यांचें, क्षत्रियांच्या या ठराविक यादींत आहे. तेव्हां दहाव्या शतकापर्यंत मराठे राजे क्षत्रियांत मोडत होते ही गोष्ट निर्विवाद दिसते. ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य यांत देशभेदानें भिन्नता व कमी-अधिकपणा दहाव्या शतकानंतर उत्पन्न झाला. पंच-द्राविड, पंच-गौड, रजपूत-मराठे, वाणी-बनीये हा भेद दहाव्या शतकानंतरचा आहे. शेलार आपल्यास जीमूतवाहनवंशी मानीत असें या व अन्य अनेक लेखांवरून दिसतें. तेव्हां सूर्य-चंद्र वंशाहून तिसरा हा एक वंश उत्पन्न होतो हें खरें.परंतु हा लेख चंदापूर्वीचा सुमारें तीनशें वर्षांचा आहे. आणि जीमूतवाहन म्हणजे नागवंशी नव्हत कारण नाग खाणारा जो गरुड त्याजपासून नागांस सोडविणारा पूर्वज शिवाचा गण होता. यांत ज्या ब्राह्मणाला जमीन दान दिली आहे त्याचें वर्णन, गोत्र व शाखा यावरूनच केलें आहे. देशस्थ, कोंकणस्थ इत्यादि प्रकारचें नाहीं म्हणजे हे भेद वर सांगितल्याप्रमाणें अद्याप उत्पन्न झाले नव्हते.

असो, या लेखींत पुणें, खेड, आणि कोंकणचें चिपळूण या गांवांचा उल्लेख आहे, एवढी आणखी मनोरंजक गोष्ट सांगून ही टिप्पणी पुरी करतों.

# परिशिष्ट ३

## अर्वाचीन भाषोत्पत्ति

हिंदुस्थानच्या हल्लींच्या भाषांतील वाङ्मय किती जुनें आहे, याजबद्दल डाक्तर ग्रीयर्सन यांच्या Linguistic Survey of India या ग्रंथांतील उताऱ्यांचें भाषान्तर.

**कानडी**—यांतील सर्वांत जुने ग्रंथ सुमारें कमींत कमी इ. स. १० व्या शतकापर्यंत मागें जातात. कानडी वाङ्मयाचा प्रारंभ जैन ग्रंथकारांच्या प्रयत्नामुळें झाला; आणि पहिले वाङ्मयात्मक कानडी ग्रंथ पुष्कळसे संस्कृत भाषेच्या नमुन्यानें तयार झाले. कानडी वाङ्मयाचे कालानुरोधानें तीन भाग पडतात. ( १ ) पुराणी कानडी, कमींत कमी दहाव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत. या काळांतील मुख्य मुख्य ग्रंथ संस्कृत छंदः शास्त्र व व्याकरण यांच्या आधारावर संस्कृत ग्रंथांच्या नमुन्यानें बनले आहेत; आणि हे ग्रंथ अतिशय कृत्रिम भाषापद्धतीचे काव्य ग्रंथ आणि मताभिनिवेशाचे ग्रंथ असेच बहुधा आहेत. त्यांची भाषा जुनी कानडी असून ती एकसारखी आणि अतिशय संस्कृतीची आहे. तींत संस्कृतांतून घेतलेले तत्सम शब्द फार आहेत आणि उच्चारानें व तसेंच हल्लींच्या कानडींतील नामांच्या रूपाहून भिन्न रूपानें निराळी आहे. या वाङ्मयाचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे पंपाचें आदिपुराण ( इ. स. ९४१ ) हें होय. (२) मध्यकालीन कानडी—१३ व्या शतकापासून १५ व्या पर्यंत. यांत नामाचे जुने विभक्तिप्रत्यय व वाक्यरचनेचे प्रकार नाहींसे होऊन नवीन प्रत्यय व वाक्यरचना सुरू झाली. ( ३ ) हल्लींची कानडी; यांतील वाङ्मय १६ व्या शतकापर्यंत मागें जातें. यापैकीं वैष्णव मताच्या कवितेचा बराच भाग मध्यकालीन कानडीच्या धरतीवर आहे. त्यांतील वाङ्मय मुख्यतः शैव व लिंगायत मताचें आहे.

( २ ) **तेलगू**—परंपरा असें सांगते कीं तेलगुभाषेंतील पहिला ग्रंथकार कण्व होता. त्याचा ग्रंथ अनुपलब्ध आहे. हल्लीं जुन्यांत जुना उपलब्ध ग्रंथ इ. स. ९०० च्या सुमाराचा आहे. यावेळीं वेंगीचा राजा

विष्णुवर्धन ऊर्फ राजराजनरेन्द्र तेलगूवाङ्मयाचा मोठा पुरस्कर्ता होता. हल्लीं उपलब्ध असलेल्या तेलगू भाषेचा व्याकरणकार व महाभारताचा तेलगूंत भाषान्तरकार त्याच्या दरबारीं नन्नभट्ट होता ( व्हा. ४ पा. ५८० ). ह्युएनत्संग म्हणतो कीं, आंध्र लोकांची भाषा निराळी होती; पण त्यांची लिपी उत्तरेकडील लिपीहून फारशी भिन्न नव्हती. कुमारिलानें आंध्रद्राविडी भाषेचा उल्लेख केला आहे. ( हें विधान चुकीचें आहे असें वाटतें; कारण कुमारिलानें फक्त द्राविडी भाषेचा उल्लेख केला आहे ).

बंगाली—प्राच्य मागधीभाषेपासून हल्लींची बंगाली प्रत्यक्ष उत्पन्न झाली आहे याबद्दल मुळींच शंका नाहीं. बंगाल्यांच्या पूर्वजांस ८०० वर्षांपूर्वी जे उच्चार करतां येत नव्हते तेच हल्लींही त्यांस करतां येत नाहींत. त्यांस जसा क्ष हा उच्चार साधत नसे तसा हल्लीं बंगाल्यांसही साधत नाहीं. त्यांस सहि उच्चारितां येत नाहीं. त्याऐवजीं त्यांचे तोंडून घ्य निघतो ह्य हें संयुक्त व्यंजन त्यांची घांदल उडवतें आणि त्यांच्या मुखांतून ज्झ असा उच्चार निघतो. वाङ्मयांत त्यांचा पहिला ग्रंथकार चण्डीदास होय. हा चवदाव्या शतकांत झाला आणि त्यानें कृष्णस्तुतिपर गीतें लिहिलीं ( व्हा. ५ पा. १५ ).

( ४ ) पूरबिया हिन्दी:—फार प्राचीन काळापासून औधप्रान्त वाङ्मयात्मक चळवळींचें स्थानच आहे. येथील वाङ्मयाचें वर्णन करणें अर्थात् दूरापास्त आहे. कारण त्यास अनेक ग्रंथांचा अभ्यास अवश्य आहे. परंतु तुळशीदासानें जेव्हां आपला अमोल ग्रंथ लिहिला तेव्हांच या अवधीभाषेला शेवटची स्थिति प्राप्त झाली ( निधनकाळ इ. स. १६२४ ). यापुढील प्रत्येक ग्रंथकार तुळशीदासाच्या नमुन्यानें लिहितो. मलिक महंमद जैसी यानें आपलें पद्मावती हें महाकाव्य तुलसीदासापूर्वी लिहिलें ( इ. स. १५४० ). ह्या काव्यांत चितोडचा राणा रतनसिंग याच्या पराक्रमाचें व अल्लाउद्दीनानें केलेल्या चितोडच्या वेढ्याचें आणि लुटीचें वर्णन आहे. ( व्हा. ६ पा. १३ ).

( ५ ) पश्चिम हिन्दी:—( राजपुताना व खानदेश यांतील भील जरी द्राविडी वंशाचे आहेत तरी त्यांनीं आपली द्राविडी भाषा टाकली आहे

आणि ते एक प्रकारची पश्चिम हिंदी बोलतात; तीस भीली हेंच नांव चालू आहे ). राजस्तानी आणि मारवाडी या भाषांत प्राचीन वाङ्मय बरेंच आहे पण त्याचा अद्याप अभ्यास झालेला नाहीं. याशिवाय चंद बरदाईचा पृथ्वीराजरासा हा ग्रंथ जरी सर्वांत जुना उपलब्ध ग्रंथ समजला जातो तरी त्या विषयीं शंका आहे. मारवाडी भाषेंतील वाङ्मयास डिङ्गल असें म्हणतात. मीराबाईच्या कविता व्रज भाषेंत आहेत आणि या भाषेला पिंगल म्हणतात. ( व्हा. ९ पा. १५ ).

( ६ ) **मराठी**:—रामतर्कवागीश आणि क्रमदीश्वर हे प्राकृतग्रंथकार दाक्षिणात्या नांवाच्या महाराष्ट्र अपभ्रंशाचा उल्लेख करतात. परंतु साहित्यदर्पणकार दाक्षिणात्या म्हणजे वैदर्भिका असें म्हणतो. हल्लींची मराठी ही इतकी जुनी भाषा आहे कीं, तिचेंच नांव दाक्षिणात्या व वैदर्भिका असूं शकेल. हल्लीं उपलब्ध असलेला सर्वांत जुना मराठी शिलालेख इ. स. १११५ इतका मागें जातो. याहून बराच मोठा लेख मराठींतलि इ. स. १२०७ एपि. इं. व्हा. १ पा. ३४३ आणि व्हा. ९ पा. १०९ यांत दिला आहे. (व्हा. ७ पान १५).

# परिशिष्ट ४

## मनु आणि याज्ञवल्क्य या दोन स्मृतींशिवाय बाकीच्या महत्वाच्या स्मृतींतून मध्ययुगीन कालांतील सामाजिक अक्लिष्टस्थितीचे दर्शक उतारे.

अत्रिः—

१ राजन्यैः श्वपचैर्वापि बलाद्विचलितो द्विजः ।
पुनः कुर्वीत संस्कारं पश्चात्कृच्छ्रत्रयं चरेत् ।

२ ( यतिः ) चरन्माधुकरीं वृत्तिमथ म्लेच्छकुलादपि ।
एकान्नं नैव भोक्तव्यं बृहस्पतिसमो यदि ॥

३ गोकुले ऋतुशालायां तैलयन्त्रेक्षुयन्त्रयोः ।
अमीमांस्यानि शौचानि स्त्रीणां च व्याधितस्य च ॥

४ देवयात्राविवाहेषु यज्ञप्रकरणेषु च ।
उत्सवेषु च सर्वेषु स्पृष्टास्पृष्टिर्न विद्यते ॥

५ आरतालं तथा क्षीरं कन्दुकं दधिसक्तु च ।
स्नेहपक्वं च तक्रं च शूद्रस्यापि न दुष्यति ॥

६ आर्द्रमांसं घृतं तैलं स्नेहाश्च फलसंभवाः
अन्त्यभाण्डस्थिता ह्येते निष्क्रान्ताःशुचिमाप्नयुः ॥

विष्णुः—

१ परिणीय तु षण्मासान् वत्सरं वा न संविशेत् ।
औदुम्बरायणो नाम ब्रह्मचारी गृहे गृहे ॥

२ शूद्रोपि द्विविधो ज्ञेयः श्राद्धी चैवेतरस्तथा ।
श्राद्धी भोज्यस्तयोरुक्तो अभोज्यस्त्वितरो मतः ॥

३ त्रिदण्डलिङ्गमाश्रित्य जीवन्ति बहवो द्विजाः ।
न तेषामपवर्गोस्ति लिङ्गमालोपजीविनाम् ॥

उशनाः—

१ विधिना ब्राह्मणः प्राप्य नृपायां तु समन्त्रकम् ।
जातः सुवर्ण इत्युक्तः सानुलोमद्विजःस्मृतः ॥

२ नृपायां विधिना विप्राज्जातो नृप इति स्मृतः ॥

आपस्तम्बः—

१ ब्राह्मण्यासह योऽश्नीयादुच्छिष्टं वा कदाचन ।
न तत्र दोषं मन्यन्ते नित्यमेव मनीषिणः ॥

२ उच्छिष्टमितरस्त्रीणामश्नीयात्स्पृशतेपि वा ।
प्राजापत्येन शुद्धिः स्याद्भगवानङ्गिरोऽब्रवीत् ॥

३ ब्राह्मणस्य सदा भुंक्ते क्षत्रियस्य तु पर्वणि ।
वैश्यस्य यज्ञदीक्षयां शूद्रस्य न कदाच न ॥

४ आममांसं मधु घृतं धानाः क्षीरं तथैवच ।
गुडस्तक्रं रसा ग्राह्या निवृत्तेनापि शूद्रतः

५ शाकं मांसं मृणालानि तुम्बुरुः सक्तवस्तिलाः ।
रसाः फलानि पिण्याकं प्रतिग्राह्या हि सर्वतः ॥

संवर्तः—

१ तस्माद्विवाहयेत्कन्यां यावन्नर्तुमती भवेत् ।
विवाहोष्टमवर्षायाः कन्यायास्तु प्रशस्यते ॥

कात्यायनः—

१ अजातव्यंजनालोम्नी न तया सह संविशेत् ।
अयुगूः काकवन्ध्याया जाता तां न विवाहयेत् ॥

बृहस्पतिः—

१ बहुभिर्वसुधा दत्ता &c. दशहस्तेनदण्डेन त्रिंशद्दण्डान्निवर्तनम् ।
दश तान्येव विस्तारो गोचर्मैतन्महाफलम् ( निवर्तन=३०० हस्त आणि गोचर्म=३००० हस्त )

२ वीरासनं वीरशय्या वीरस्थानमुपाश्रितः ।
अक्षय्यास्तस्य लोकाः स्युः सर्वकामगमास्तथा ॥

पराशरः—

१ अव्रता ह्यनधीयाना यत्र भैक्ष्यचरा द्विजाः ।
तं ग्रामं दण्डयेद्राजा चोरभक्तप्रदो हि सः ॥

२ षट्कर्मसहितो विप्रः कृषिकर्म च कारयेत् ।

क्षुधितं तृषितं श्रान्तं बलीवर्दं न योजयेत् ॥
३ राज्ञे दत्वा तु षड्भागं देवानां चैवविंशकम् '
विप्राणां त्रिंशकं भागं सर्वपापैः प्रमुच्यते ॥
४ क्षत्रियोपि कृषिं कृत्वा देवान् विप्रांश्च तोषयेत् ।
वैश्यः शूद्रस्तथा कुर्यात् कृषिवाणिज्यशिल्पकम् ॥

व्यासः—

१ ब्राह्मणक्षत्रियविशस्त्रयोवर्णा द्विजातयः ।
श्रुतिस्मृतिपुराणोक्तधर्मयोग्यास्तु नेतरे ॥
२ शूद्रो वर्णश्चतुर्थस्तु वर्णत्वाद्धर्ममर्हति ।
वेदमन्त्रस्वधास्वाहावषट्कारादिभिर्विना ॥
३ वर्धकिर्नापितो गोपः आशायः कुम्भकारकः ।
वणिक्किरातकायस्थमालाकार भोज्यान्नाः कुटम्बिनः ॥
४ ऊढायां हि सवर्णायामन्यां वा काममुद्वहेत् ।
तस्यामुत्पादितः पुत्रो न सवर्णात्प्रहीयते ॥
५ उद्वहेत्क्षत्रियां विप्रो वैश्यां च क्षत्रियो विशाम् ।
न तु शूद्रां द्विजः कश्चिन्नाधमः पूर्ववर्णजाम् ॥
३ नापितान्वयमित्रार्द्धसीरिणो दासगोपकाः ।
शूद्राणामप्यमीषां तु भुक्त्वान्नं नैव दुष्यति ॥
४ नाश्नीयाद्ब्राह्मणो मांसमनियुक्तः कथंचन ।
क्रतौ श्राद्धे नियुक्तो वा अनश्नन्पतति द्विजः ॥
५ मृगयोपार्जितं मांसमभ्यर्च्य पितृदेवताः ।
क्षत्रियो द्वादशोनं तत्क्रीत्वा वैश्योपि धर्मतः ॥

शंखः—

१ आपद्यपि न कर्तव्या शूद्रा भार्या कथंचन ।
तस्यां तस्य प्रसूतस्य निष्कृतिर्न विधीयते ॥

दक्षः—

१ एको भिक्षुर्यथोक्तस्तु द्वौ चैव मिथुनं स्मृतम् ।
त्रयो ग्रामः समाख्याता ऊर्ध्वं तु नगरायते ॥

२ नगरं नैव कर्तव्यं ग्रामो वा मिथुनं तथा ।
एतत्त्रयं तु कुर्वाणः स्वधर्माच्च्यवते यतिः ॥
३ नीरुजश्च युवा चैव भिक्षुर्नावसथार्हणः ।
स दूषयति तत्स्थानं वृद्धादीन्पीडयत्यपि ॥

गोतमः—

१ व्यवहारप्राप्तेन सार्ववर्णिकं भिक्षाचर्यमभिशस्तं पतितवर्जम् ।
२ राज्ञे बलिदानं कर्षकैर्दशममष्टमं षष्ठं वा पशुहिरण्ययोरप्येके पञ्चाशद्भागं विंशतिभागः शुल्कः पण्ये मूले फलमधुमांसपुष्पौषधतृणेन्धनानां षष्ठं तद्रक्षणधर्मत्वात्तेषु तु नित्ययुक्तः स्यात् ॥
३ प्रशस्तानां स्वकर्मसु द्विजातीनां ब्राह्मणो भुञ्जीत प्रतिगृह्णीयात् ॥
४ वृत्तिश्चेन्नान्तरेण शूद्रात् पशुपालक्षेत्रकर्षककुलसंगतकारयितृपरिचारका भोज्यान्ना वणिक् चाशिल्पी

वसिष्ठः—

१ आत्मत्राणे वर्णसंकरे वा ब्राह्मणवैश्यौ शस्त्रमाददीयाताम् ।
क्षत्रियस्य तु नित्यमेव रक्षणाधिकारात् ॥
२ अष्टौग्रासा मुनेर्भक्तं वानप्रस्थस्य षोडश ।
द्वात्रिंशच्च गृहस्थस्य अमितं ब्रह्मचारिणः ॥
३ न मृगयोरिषुचारिणः परिवर्जमन्नम् ।
विज्ञायते ह्यगस्त्यो वर्षसाहस्त्रिके सत्रे मृगयां चचार तस्यासंस्तु रसमयाः पुरोडाशा मृगपक्षिणां प्रशस्तानामपि ह्यन्नम् ।
४ राजा सह नागरैश्च कार्याणि कुर्यात् ।
५ पाणिग्राहे मृते बाला केवलं मन्त्रसंस्कृता ।
सा चेदक्षतयोनिः स्यात्पुनः संस्कारमर्हति ॥

# परिशिष्ट ५

## महाराष्ट्रांतील मध्ययुगीन राजवंश मराठे क्षत्रिय होते.

प्रसिद्ध इतिहाससंशोधक वि. का. राजवाडे यांनीं राधामाधवविलास-चंपू या नांवाच्या एका शहाजीकालीन जयराम पिंड्येकृत काव्याच्या संशोधनप्रसंगानें शहाजीचें अत्युत्कृष्ट चरित्र प्रस्तावनेंत दिलें आहे, त्याचे शेवटीं मराठे महाराष्ट्रांत केव्हां व कां आले, आणि त्यांची संस्कृति हीन असल्यानें त्यांजवर परकीय राज्य इ. स. पू. २५० पासून इ. स. १५०० पर्यंत कसें होतें याचें विद्वत्तापूर्ण विस्तृत विवेचन केलें आहे. त्यांतील कित्येक मुद्दे मला मान्य नसून विशेषतः "महाराष्ट्र लोकांना उत्तरे-कडील उच्च संस्कृतीच्या लोकांच्या अमलाखालीं सुमारें १६०० वर्षें रखडावें लागलें" (पृ. १७३) हें विधान मान्य नसून त्यासंबंधानें या पुस्तकांत उत्तर देणें अवश्य आहे. कारण चालुक्य, राष्ट्रकूट, यादव या वंशांना मी अस्सल मराठे क्षत्रिय समजतों तर याच्या उलट रा. राज-वाडे त्यांना उत्तरेकडील परकीय क्षत्रिय समजतात. "चालुक्यादिकांना परकीय म्हटलेलें पाहून वाचकांना आश्चर्य वाटेल" असें राजवाडेच म्हणतात. माझ्या दृष्टीनें आश्चर्यच नव्हे तर सखेदाश्चर्य वाटेल असें म्हटलें तरी चालेल. कारण राजवाड्यांसारख्या महाराष्ट्राभिमानी व चिकि-त्सक बुद्धिवान् संशोधकानें असा सिद्धान्त मांडावा, हें पाहून मराठी वाचकांस खेदयुक्तच आश्चर्य वाटेल. डॉ. भाण्डारकर यांनीं सुद्धां चालुक्य, राष्ट्रकूट इत्यादि राजवंश मराठे क्षत्रिय आहेत हें मान्य केलें आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. असो, या नवीन मुद्याचा या ग्रंथांत जरूर विचार झाला पाहिजे. इकडील जुन्या पद्धतीचे विद्वान शास्त्री हे राजवंश मराठे आहेत, क्षत्रिय नाहींत असें म्हणत आहेत तर याउलट रा. राजवाडे हे क्षत्रिय आहेत पण मराठे नाहींत असें म्हणूं लागले आहेत. पहिल्या पक्षाला उत्तर या इतिहासाच्या पहिल्या भागांत आम्हीं दिलें आहे व कांहीं याहि भागांत आलें आहे. दुसऱ्या पक्षाला उत्तर कोठें आलें नसल्यानें या टिप्पणींत देणें अवश्य आहे आणि पहिल्या पक्षाच्याहि

खण्डनाचा थोडक्यांत उपसंहार शेवटीं करतां येईल. तसें म्हटलें तर महाराष्ट्रांतील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य सर्वच उत्तरेकडून आलेले आर्य आहेत. तेव्हां चालुक्य, राष्ट्रकूट, यादव हे उत्तरेकडचे क्षत्रिय आहेत या म्हणण्यास हरकत घेतां येत नाहीं. पण सर्वच मराठे असे उत्तरेकडील क्षत्रिय आहेत म्हणून त्यांस परकीय म्हणतां येणार नाहीं. विशेषतः मराठे आर्यांनीं महाराष्ट्रांत जेते या नात्यानें तात्पुरता रहिवास केलेला नसून कायमचा रहिवास वसाहतीच्या नात्यानें केला असल्यानें त्यांस परकीय म्हणतांच येणार नाहीं. ते महाराष्ट्राचेच लोक समजले पाहिजेत हें उघड आहे. दुसरी गोष्ट परकीय राजे जेव्हां आपलें सैन्य व आपले मुख्य मुख्य मुलकी अधिकारी बाहेरच्या देशांतून नेहमीं आणतात आणि त्यांचा अन्तिम हेतु नेहमीं स्वदेशांतच परत जावयाचा असतो त्यावेळेस तें राज्य खरोखरच पूर्ण परकीय असतें. हल्लींचें इंग्रजाचें राज्य अशा रीतीनें पूर्ण परकीय आहे. त्यांचें सैन्य व त्यांचे मुलकी अधिकारी मुख्य मुख्य नेहमीं परकी असतात. ते येथें कायम राहण्याच्या हेतूनें कधींच येत नाहींत. नेहमीं त्यांची दृष्टि परत जाण्याची असते. अर्थात् इंग्रजाचें राज्य निर्भेळ परकी आहे. मुसलमानांचें राज्य महाराष्ट्रांत काय व उत्तरेकडे काय, परकीयच मानलें पाहिजे. मुसलमानी राजांना मुख्य शिपाई सरदारांचा व मुत्सद्यांचा पुरवठा अरबस्तान, सीरिया, इराण, खुरासान व मोगल देश येथून होत असे. हे जरी राजे खुद्द व पुष्कळ अधिकारी कायमचे येथें राहत आणि तेवढ्या अंशानें मुसलमानी राज्य निर्भेळ परदेशी नव्हतें तरी बहुतेक फौजी व मुलकी अमलदार व व्यापारी स्वदेशास संपत्तीचा ओघ नेत असत. तात्पर्य मुसलमानी राज्य पुष्कळ अंशानें परकीयच होतें.

प्राचीन काळीं व अर्वाचीन काळीं मौर्यांचें महाराष्ट्रावरील राज्य किंवा आंध्रभृत्यांचें मगधावरील राज्य तसेंच मराठ्यांचें दिल्लीवरील व बंगाल्यावरील राज्य स्वदेशाच्या स्वदेशांतच होतें तरी बहुतेक परकीय मानलें गेलें पाहिजे. उ. आर्वाचीन मराठी साम्राज्यांत फौजी मुलकी अधिकारी नेहमीं महाराष्ट्रांतील असत आणि त्यांची दृष्टि नेहमीं महाराष्ट्राकडे असे. सध्याचें गायकवाड, होळकर, शिंदे यांनें गुजराथेंतील आणि उत्तरेकडील राज्य

मात्र परकी मानतां येत नाहीं. त्यांचा कायमचा रहिवास त्या त्या मुलखांत महाराष्ट्राबाहेर आहे, त्याचे फौजी मुलकी अधिकारी बहुतेक तत्तद्देशीय असतात, व त्यांची दृष्टि महाराष्ट्राकडे कधींहि वळत नाहीं. तथापि त्यांचे विवाहसंबंध महाराष्ट्रांत आहेत, त्यांची भाषा मराठी आहे आणि त्यांचे कित्येक सरदार व फौजी अफिसर मराठी आहेत. यामुळें त्यांस एकचतुर्थांश परकी व मराठी म्हणतां येईल. परकी राज्याची मीमांसा याप्रमाणें केल्यावर चालुक्य, राष्ट्रकूट, यादव हे राजवंश व त्यांचीं राज्यें उत्तरेकडील व परकी होतीं काय या प्रश्नाचा आपण विचार करूं.

या दृष्टीनें विचार करितां चालुक्य-राष्ट्रकूट-यादवांचे राजवंश व यांचीं राज्यें बिलकूल परकी नव्हतीं असेंच म्हटलें पाहिजे. शिंदे, होळकर, गायकवाड यांच्या राज्यांप्रमाणेंच तीं चतुर्थांशहि परकी नव्हतीं. त्यांचे फौजी व मुलकी अधिकारी महाराष्ट्राबाहेरून येत होते असें मानण्यास बिलकुल आधार नाहीं. यांचें कायमचें वास्तव्य महाराष्ट्रांत असून यांची दृष्टि कधीं महाराष्ट्राबाहेर गेली नाहीं. यांचे शरीर संबंध बहुतेक महाराष्ट्रांतच होत. कधीं कधीं उत्तरेकडील क्षत्रीयाशीं होत हें जरी खरें आहे तरी त्यांत आम्ही महाराष्ट्राबाहेरचे म्हणजे उत्तरेकडचे क्षत्रिय आहोंत ही भावना त्यांचे ठिकाणीं कधींच जागृत नव्हती. तेव्हां हीं राज्यें व हे राजवंश परकी होते असें म्हणण्यास कोणतीच जागा नाहीं; व या राजवंशांनीं जें कर्तृत्व दाखविलें तें सर्व मराठे क्षत्रियांचें होय असेंच म्हटलें पाहिजे. कदाचित् असें कोणी म्हणेल कीं, ह्या राजवंशांचीं सर्व साधनें व सर्व दृष्टि स्वदेशी असलीं तरी त्यांची व्यवस्थापक बुद्धि परदेशी वंशाची होती. हे ताज्या दमाचे उत्तरेकडून आलेले क्षत्रिय असून उच्च संस्कृतीचे होते. आणि याच दृष्टीनें रा. राजवाडे यांनीं त्यांस उत्तरेकडील परकीय राजवंश मानलें आहे. परंतु माझ्या मतें तशीहि गोष्ट दिसत नाहीं. उत्तरेकडील आर्य महाराष्ट्रांत वसाहत करण्यास इ. स. पू. ६०० च्या सुमारें आले, पाणिनीच्या नंतर व कात्यायनापूर्वी आले, या बाबतींत राजवाड्यांचें माझें ऐकमत्य आहे. ते बुद्धपूर्वकाळीं आले असें मी म्हणतों आणि राजवाड्यांच्या मतें ते बुद्धानंतर आले एवढाच फरक आहे. पण हा विषय अप्रस्तुत आहे.

हा विषय चित्रमयजगतांत ( जाने १९२३ ) मी विस्तारानें मांडला आहे. येथें प्रश्न एवढाच आहे कीं ख्रिस्त-पूर्वकाळीं प्रथम आर्य उत्तरेकडून महाराष्ट्रांत आले आणि येथें मराठे बनले त्यांपैकीं हे चालुक्यादि राजवंश आहेत. किंवा नवीन ताज्या दमाचे उत्तरेकडील क्षत्रिय त्यांच्या त्यांच्या राज्यस्थापनेच्या सुमारें आलेले आहेत ? याविषयीं आपण प्रत्येक राजवंशाचा विचार करूं.

प्रथम पूर्वचालुक्यांचा पुलकेशि वगैरे राजवंश घेऊं. ह्यांचें महाराष्ट्रांत राज्य इ. स. ५०० च्या सुमारें प्रस्थापित झालें. हे नवीन आलेले अयोध्येकडील क्षत्रिय होते असें राजवाडे म्हणतात; पण ज्या लेखांच्या आधारें असें म्हणतां येतें ते लेख मागाहूनचे असून ही कल्पना नवीन आहे. ही कल्पना पूर्व चालुक्यांच्या कोणत्याहि लेखांत नाहीं. याबद्दल विस्तारपूर्वक आमच्या इतिहासाच्या पहिल्या भागांत ( दुसरें पुस्तक प्रकरण ९ यांत ) आम्हीं ऊहापोह केला आहे. चालुक्य अयोध्येहून आले वगैरे कथा प्राच्य चालुक्यांच्या वेंगी येथील शाखेच्या लेखांत मागाहून आलेली असून बहुतेक कपोलकल्पित पुराणांच्या नवीन सूर्यचंद्रवंश--कल्पनेला जुळती येईल अशी बनविलेली आहे. हे चालुक्य नूतन आलेले क्षत्रिय नसून जुने आलेले मराठे क्षत्रिय आहेत, असा आमचा समज तेथें आम्हीं नमूद केलेला आहे. तें प्रकरण वाचकांनीं वाचून पहावें. शिलाताम्रलेखांत लिहिलेल्या गोष्टी सर्वच खऱ्या असतात असें नाहीं. विशेषतः प्राचीन काळच्या गोष्टी काल्पनिक दन्तकथात्मक असून त्या खऱ्या किंवा खोट्या हें तपासून घेतलें पाहिजे. हे चालुक्य मानव्य गोत्री असून उत्तरेकडच्या चालुक्यांहून भिन्न आहेत. त्यांचें गोत्र भारद्वाज आहे. यांनीं आपल्या लेखांत आपण अयोध्येहून आलों असें कोठेंच म्हटलें नाहीं. त्यांच्या दोनशें अडीचशें वर्षांच्या कारकीर्दींतील लेखांत ही गोष्ट नमूद नाहीं. ही कल्पना प्रथम प्राच्य चालुक्यांच्या रणस्तिपुंडीलेखांत इ. स. १०११ त नमूद आहे. म्हणजे पूर्व चालुक्याच्या राज्यारंभानंतर ५०० वर्षांनीं प्रचलित झालेली आहे. या चालुक्यांचे पल्लव, राष्ट्रकुट, कदंब, सेन्द्रक इत्यादि निर्भेळ मराठी राजघराण्यांशीं संबंध झालेले आहेत. तेव्हां हें पूर्वींचेंच मराठे कुळ आहे यांत शंका रहात नाहीं.

दुसरा राजवंश राष्ट्रकूटांचा यांचें राज्य इ. स. ७५० च्या सुमारास सुरू झालें. हें यावेळेच्या जवळ आलेलें परकीय क्षत्रिय घराणें होतें असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. किंबहुना निश्चितपणें प्राचीन मराठे आहेत असेंच दिसतें. हे राष्ट्रकूट चेदि देशांतील रतनपूर येथील आलेले परदेशी क्षत्रिय आहेत, असें राजवाडे म्हणतात. राष्ट्रकूटांच्या लेखांत लट्टलूरपरमेश्वर असा शब्द येतो. पण हें नांव त्यांस कसें मिळालें याचा उलगडा आजवर कोणी केला नाहीं असें आम्हीं या भागांत पृष्ठ २५३ वर म्हटलें आहे. लट्टलूर म्हणजे चेदि देशांतील रतनपूर असें राजवाडे म्हणतात, परंतु तें मान्य करतां येणार नाहीं. संस्कृत लेखांत मान्यखेट इत्यादि नांवांप्रमाणें संस्कृत स्वरूप देऊन लट्टलूरच्या जागीं रत्नपूर असें म्हणतां आलें असतें. पण हा वादग्रस्त मुद्दा सोडून देऊं. राष्ट्रकूट चेदि देशांतून आले असें मान्य केलें तरी ते कधीं आले हा महत्वाचा प्रश्न आहे. त्यांचें साम्राज्य इ. स. ७५० च्या सुमारास प्रस्थापित झालें त्यावेळच्या सुमारास ते खास आलेले नाहींत. राष्ट्रकूटांपासूनच पूर्वचालुक्यांनीं राज्य घेतलें असे लेख आहेत. म्हणजे इ. स. ५०० च्या सुमारास राष्ट्रकूटांचेंच राज्य होतें ही गोष्ट पूर्व चालुक्यांच्याच लेखांत नमूद आहे (पहिला भाग पुस्तक १ प्र. ९ पहा). राष्ट्रकूटांच्या लेखांतहि असेंच आढळतें. चालुक्यांच्या पूर्वी राज्य आमचें होतें तें आम्हीं पुन्हां प्रस्थापित केलें ही जाणीव त्यांच्या ठिकाणा जागृत होती. नित्यवर्षाच्या श. ८३४ (इ. स. ९१२) च्या एका लेखांत (जर्. मुं. ब्रा. रा. ए. सो १८ पा. २६०) राष्ट्रकूटांचा पहिला दन्तिदुर्ग यांविषयीं म्हटलें आहे, "निमग्नां यश्चलुक्याब्धौ रटराज्यश्रियं पुनः। पृथ्वीमिवोद्धरन्धीरो वीरनारायणोऽभवत् ॥". तात्पर्य पूर्वचालुक्यांपूर्वी राष्ट्रकूटांचें राज्य होतें म्हणजे इ. स. ४०० च्या सुमारें महाराष्ट्रांतच त्यांचें वास्तव्य होतें. अर्थात् त्यांच्या साम्राज्यापूर्वी निदान ३५० वर्षें ते महाराष्ट्रांत होते; तेव्हां त्यांस नवीन आलेले उत्तरेकडील क्षत्रिय म्हणतां येत नाहीं. त्यांचेंही संबंध दक्षिणेकडील चालुक्यादि मराठे कुळांशींच होत होते हेंहि लेखांवरून उघड आहे. पूर्वचालुक्य राष्ट्रकूटांचेच संबंधीं होते असें कित्येक लेखांत नमुद आहे.

पण आमच्या मतें हे राष्ट्रकूट इ. स. ४०० च्याहि पूर्वीचे महाराष्ट्रांतील रहिवाशी आहेत. ज्या राष्ट्रिकांचा अशोकाच्या लेखांत उल्लेख आहे तेच हे राष्ट्रकूट. किंबहुना महाराष्ट्राला नांव देणारे हेच रट्ट अथवा राष्ट्रकूट होत. मराठ्यांचा मूळ मुख्य राष्ट्र शब्द असून त्याचे लोक तेच राष्ट्रिक अथवा रट्ट होत. सात्यकीच्या वंशांत रट्ट नांवाचा एक राजपुरुष झाला त्याला राष्ट्रकूट नांवाचा पुत्र होता, त्याजवरून हा वंश राष्ट्रकूट नांव पावला असें यांच्या लेखांत वर्णित आहे. पण ही मागूनची कल्पना. राष्ट्रिकांत मुख्य ते राष्ट्रकूट. आणि हा शब्द सामान्यरीत्या उपयोगांत येत असे हें आम्हीं मागील भागात दाखविलेंच आहे. राष्ट्रकूट शब्द मराठे पाटील या अर्थानें प्राच्य चालुक्यांच्या लेखांत आल्याचें आम्हीं दाखविलें आहे ( भाग १ पु. ३ प्र. ११ ). तात्पर्य राष्ट्रकूट अथवा रट्ट हें नांव फार जुनें असून ते लोक मूळचे राष्ट्रिकच होत असें आम्हांस वाटतें. यांच्या राज्यास रट्ट-राज्य म्हणत असत हें वरील श्लोकावरून व इतर लेखांवरून स्पष्ट दिसतें; आणि हे आपल्यास कर्नाटकाच्या विरोधानें स्पष्टपणें मराठे समजत असेंहि म्हणतां येईल. कर्नाटकांतील ब्राम्हण क्षत्रिय वैश्य हेहि मूळचे मराठे म्हणजे महाराष्ट्रीय आहेत हें आम्हीं पूर्वभागांत दाखविलेंच आहे. तेव्हां कर्नाटकी व मराठे हा भेद अप्रस्तुत आहे. तथापि येथें इतकेंच नमुद करण्यासारखें आहे कीं पूर्वचालुक्य राज्य शेवटीं शेवटीं कर्नाटक राज्य समजण्यांत येऊं लागलें आणि म्हणूनच राष्ट्रकूटांच्या लेखांत दन्तिदुर्गानें चालुक्य कर्नाटकाचें राज्य अल्प प्रयासानेंच उलथून पाडिलें असा उल्लेख येतो (या भागाचें पृष्ट २३८ व २७७). तात्पर्य चालुक्यांस विशेषतः उत्तर चालुक्यांस कानडी म्हणतां येईल, पण राष्ट्रकूटांस कधींच ह्मणतां येणार नाहीं. ते अस्सल मराठेच होते असेंच म्हणतां येतें. असो, ही एक मौजच आहे कीं चालुक्य-राष्ट्रकूटांस कित्येक लोक कानडी ठरवूं पहातात तर राजवाडे त्यांस उत्तरेकडून आलेले क्षत्रिय मानतात; आणि आम्हीं त्यांस अस्सल मराठे म्हणतों. वास्तविक पाहतां सर्वांच्याच मतें ते आर्यवंशी क्षत्रिय आहेत. भेद इतकाच कीं राजवाडे त्यांस नूतन उत्तरेकडून आलेले म्हणतात तर कित्येक

त्यांस नूतन दक्षिणेकडून आलेले समजतात. आपच्या मतें ते महाराष्ट्रांत आलेल्या प्रथम आर्य लोकांपैकींच आहेत.

असो, राष्ट्रकूट आमच्या मतें अस्सल मराठे आहेत, यांत वादास जागा नाहीं. यादवांचाहि असाच प्रकार आहे. ते कृष्णाच्या वंशांतील असल्याबद्दल वादच नाहीं. पण त्यांचें राज्य इ. स. ११०० च्या सुमारास झालें, त्यावेळीं हे नूतन आलेले उत्तरेकडील क्षत्रिय होते कीं काय हा प्रश्न आहे. त्यांची जी प्रशस्ति हेमाद्रीनें दिली आहे त्यावरून हे नूतन आलेले दिसत नाहींत. " सर्वेपि पूर्वे मधुराधिनाथाः कृष्णादितो द्वारवतीश्वरास्ते। सुबाहुसूनोरनु दक्षिणाशाप्रशासिनो यादववंशवीराः॥" असा हेमाद्रि प्रशतींत श्लोक आहे. ह्यावरून सुबाहूचे वंशज दक्षिणेंत राज्य करूं लागले त्याचें अनेक वंशजांनीं राज्य केल्यानंतर सेऊणादि राजांचा उल्लेख येतो. तात्पर्य हे नूतन आलेले उत्तरेकडील वीर होते असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. जाधवांचा दक्षिणेकडील चालुक्यादि घराण्यांशींच संबंध होता तेव्हां ते मराठ्यांपैकींच एक होते म्हणजे झालेले होते असेंच म्हणतां येईल. येथें ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, चालुक्य, राष्ट्रकूट, यादव हीं कुलनामें दक्षिणचींच मुळांत आहेत. आणि नसलीं तरी तीं उत्तरेकडचीं कुळें निराळीं आहेत. उत्तरेचे चालुक्य भारद्वाज गोत्री आहेत, राठोड सूर्यवंशी गौतमगोत्री आहेत आणि जाधवहि निराळे आहेत.

पण चालुक्य, राष्ट्रकूट, यादव यांच्या वंशांना व राज्यांना जर राजवाडे परकी लेखतात तर शिवाजीच्या भोंसले कुळाला व राज्याला ते परकी कां मानीत नाहींत? शिवाजी शिसोदियांच्या कुळांत जन्मला होता ही गोष्ट राजवाड्यांनाहि मान्य आहे. किंबहुना या चपूंत जयराम पिंड्ये शहाजीचें कुळ शिसोदिया असल्याचें स्पष्ट लिहितो, यावरून ही कल्पना शिवाजीच्या राज्याभिषेकाच्या वेळीं चिटणीसांनीं प्रचलित केली या शंकेस जागाच राहत नाहीं. ही गोष्ट राजवाड्यांनींच जगताच्या निदर्शनास उत्तम रीतीनें आणून दिली आहे आणि या शंकेस कायमची मूठमाती दिली आहे. आम्हींहि हेंच मत या भागाच्या पहिल्याच प्रकरणांत दिलें आहे,

(पा.७). आम्हांपुढें सदर ग्रंथ नव्हता तरी ज्याअर्थीं हा समज फार जुना असून शिवाजीच्या पूर्वकालीन मराठ्यांच्या यादींत भोंसल्याचें नांव अद्याप मिळालें नाहीं, त्याअर्थीं भोंसले नवीन आलेले रजपूत होते ही समजूत सुयुक्तिक दिसते. कदाचित् यांचें गोत्र कौशिक आणि शिसोदियांचें गोत्र बैजवाप हें विरुद्ध वाटेल, पण हा गोत्रभेद अन्य कारणानें उत्पन्न झाला आहे असें आमचें मत आहे. दक्षिणेंत विज्ञानेश्वराच्या लेखापासून क्षत्रियांना स्वतःचें गोत्र नाहीं, त्यांनीं पुरोहिताचें गोत्र घ्यावयाचें, ही समजूत प्रचलित असल्यानें भोंसल्यांनीं आपलें गोत्र दक्षिणेंतलि प्रथम पुरोहितावरून कौशिक लाविलें असें दिसतें. आणि विचार केला तर हेंच बरोबर दिसतें. कारण शिवाजीच्या राज्यारोहण-प्रसंगीं शिसोदिया वंश नवीन मानला गेला असता तर गोत्रहि बेजबाप धरलें जाण्यास कोणतीच हरकत नव्हती. त्याचप्रमाणें शहाजीच्या वेळीं हा नवीन वंशसंबंध कल्पिला गेला असेंहि मानण्याचें कारण नाहीं. त्या वेळेस उदेपूरचें कुळ इतकें भरभराटीस आलेलें दिसत नव्हतें किंवा शिसोदेवंशाशीं संबंध जोडण्याची अवश्यकताहि नव्हती. तात्पर्य, शिवाजीचें भोसले कुल हें शिसोदिया वंशांतलें होतें यांत शंका उरत नाहीं. पण आमच्या मतें हेंहि कुल दोन तीनशें वर्षांच्या अवधींत मराठे कुलच झालें होतें. त्यांचे सर्व शरीरसंबंध महाराष्ट्रांतील मराठे कुळांशींच झाले. त्यांची दृष्टि कधींहि राजपुतान्याकडे वळलेली दिसली नाहीं; व महाराष्ट्रांतच स्वराज्य स्थापण्याची आकांक्षा शिवाजीची होती. तात्पर्य, भोसलेकुळाचें राज्य म्हणजे महाराष्ट्रांत स्वराज्यच होतें, परराज्य नव्हतें. पण राजवाडे जर चालुक्यांच्या राज्याला परराज्य मानतात तर भोसल्यांच्या राज्याला कां मानीत नाहींत हें एक गूढच आहे.

राजवाडे मराठ्यांची संस्कृति हीन समजतात हीच त्यांची मुख्य चूक आहे. मराठे माझ्या समजुतीप्रमाणें आर्य क्षत्रिय आणि नागवंशी यांच्या मिश्रणाचे महाराष्ट्रांतील लोक होत. नागवंश हा आर्य आहे कीं काय हा प्रश्न आपण बाजूस ठेवूं. पण हे नागवंशी लोक द्रविड वंशाच्या लोकांहून कांहीं भिन्न निदान विशेष कर्तृत्ववान् व शूर असे दिसतात. याची साक्ष दक्षिणेकडचे तामिल लेख देतात इतकेंच नव्हे तर महाभारतहि देत आहे. महाभारतांत नाग लोकांचें पांडवांशीं वैर तक्षका-

पासून जें सुरू झालें तें जनमेजयापर्यंत पुरलें. सर्पसत्राच्या वेळीं पुष्कळ नागकुलांचा नाश झाला, परंतु पुष्कळ वांचलीं. महाभारतांत दिलेल्या नाग कुलांचीं नांवें आणि मराठ्यांच्या कुलांचीं नांवें पुष्कळ जुळतात असें राजवाड्यांनींच सिद्ध करून दाखविलें आहे. त्यांचें आणि सूर्यवंशी व चंद्रवंशी यांचें मिश्रण होऊन हल्लींचे मराठे बनले. उत्तरेकडील क्षत्रियांतहि असेंच मिश्रण झालेलें आहे. असो, मुख्य सांगावयाची गोष्ट ही कीं, हीं अस्सल मराठा कुळें कमी संस्कृतीचीं व बुद्धिमत्तेचीं मुळींच नाहींत. राणोजी शिंदे किंवा मल्हारराव होळकर हे कमी धोरणाचे होते असें कोण म्हणेल? महादजी शिंदे तर सर्वांत श्रेष्ठ राजधोरणी होते हें सर्वमान्य आहे. एकंदर शूर जातींत मराठेच जास्त राजधोरणी आहेत असें हल्लींहि समजलें जातें.

शिवाजीमहाराजांचें भोसले कुळ उत्तरेकडून मुसलमानी अम्मल सुरू झाल्यावर दक्षिणेंत आलें, त्याप्रमाणें वेळोवेळीं आणखीहि कांहीं उत्तरेकडचीं क्षत्रिय कुळें महाराष्ट्रांत आलीं; कारण महाराष्ट्रांत मर्दुमकी गाजविण्यास वाव होता. याजबद्दल तत्कालीन ऐतिहासिक पुरावे मिळणें शक्य आहे. उदाहरणार्थ, राष्ट्रौढविजय काव्यावरून बागलाणचे बागुल हे उत्तरेकडचे गौतम-गोत्री राठोड आहेत, असें सिद्ध होतें. त्याचप्रमाणें पाटणकर हे उत्तरेकडचे सोळंखी ( चालुक्य ) भारद्वाज गोत्री असून त्यांनीं दक्षिणेंत येऊन चाळके ( बहुधा पूर्व चालुक्य मानव्य गोत्री ) यांस जिंकून त्यांची जागा घेतली अशी त्यांच्या कुळांत दन्तकथा चालत आली आहे. कऱ्हाडचे डुबळ हेहि भारद्वाज गोत्री चालुक्य आहेत. म्हसवडचे माने हे अत्रि गोत्री गौर आहेत अशी माहिती लागते. निंबाळकर प्रसिद्ध वसिष्ठ-गोत्री परमार आहेत. तात्पर्य उत्तरेकडचे क्षत्रिय मुलसमानी अम्मल उत्तरेकडे झाल्यावर किंवा तत्पूर्वींहि दक्षिणेंत आल्याचें ऐतिहासिक प्रमाण मिळतें. पण हे सर्व मराठ्यांत म्हणजे दक्षिणच्या क्षत्रियांत मिळाले आणि मराठे झाले हें विसरतां नये. त्यांची दृष्टि उत्तरेकडे कधींच वळली नाहीं, किंवा त्यांनीं आपले शरीरसंबंध उत्तरेकडे केले नाहींत. याबरोबर हेंहि सांगणें अवश्य आहे कीं, मुसलमानी अंमलापूर्वीं जेव्हां, विशेषतः राष्ट्रकूटांच्या वेळीं, सर्व हिंदुस्थानावर महाराष्ट्र क्षत्रियांचें वर्चस्व होतें त्यावेळीं, दक्षिणेंतील क्षत्रिय उत्तरेकडे गेल्याचाहि इतिहास पुरावा देतो. किंबहुना

जी भरभराटीची स्थिति १८ व्या शतकांत मराठ्यांची होती आणि ज्यामुळें गायकवाड गुजराथेंत, व पवार,होळकर,शिंदे माळव्यांत व उत्तरहिंदुस्थानांत राजे या नात्यानें कायम झाले, त्याचप्रमाणें हजारवर्षांपूर्वीच्या राष्ट्रकूटांच्या वेळींहि झालें. गुजराथेंत चालुक्य व राष्ट्रकूट यांचीं माडलिक राज्यें होतीं असें इतिहास सांगतो. त्याचप्रमाणें एक राष्ट्रकूट घराणें दक्षिणेंतून उत्तरेकडे जाऊन तिकडे प्रस्थापित झालें आणि तेंच हल्लींचें प्रसिद्ध उत्तरेकडील राठोड घराणें होय ही गोष्ट आम्ही पुढील भागांत राठोडांच्याच परम्परेवरून दाखविणार आहोंत. हे सर्व लोक तिकडील क्षत्रियांत सामिल झाले. असो; तर वरील अनेक गोष्टींवरून उत्तरेकडील क्षत्रिय दक्षिणेंत आल्याच्या पुराव्यानें दक्षिणेंतील मराठे क्षत्रियांचे अस्तित्व किंवा त्यांचे सामर्थ्य व राजकीय तेज नष्ट होत नाहीं. अशा दक्षिणच्या मराठे क्षत्रिय वंशांपैकींच चालुक्य, राष्ट्रकूट व यादव हीं ऐतिहासिक घराणीं होतीं; आणि हल्लींचीं शिर्के, शेलार, म्हाडिक, गुजर वगैरे मराठे घराणीं प्राचीन क्षत्रिय मराठे घराणीं आहेत, असें आमचें मत आहे. याचा जास्त विस्तार अन्यत्र करतां येईल.

शेवटीं पूर्वी नमूद केल्याप्रमाणें महाराष्ट्रांतील मराठे हे क्षत्रिय आहेत, याविषयींचा ऐतिहासिक पुरावा या पुस्तकांत आला आहे तो थोडक्यांत येथें एकत्र देऊं. प्रथम महाराष्ट्रांत क्षत्रिय आहेत ही गोष्ट नाशिकच्या लेण्यांतील शातवाहनांच्या लेखांत 'खतिय दपमान दमनस्स' या शब्दांत स्पष्ट नमूद आहे. हा पुरावा इ. स. १०० च्या सुमाराचा आहे (पृष्ठ ९२). यानंतर शबर भाष्यांत (इ. स. ४०० सु.) 'जनपद पुररक्षण-वृत्तिमनुपजीवत्यपि क्षत्रिये राजशब्दमान्ध्राः प्रयुञ्जन्ते' असें वाक्य आहे. यांत दक्षिणेंत क्षत्रिय आहेत हें शबर स्वामी मीमांसासूत्राचे भाष्यकार यांनीं मान्य केलें आहे. यानंतरचा पुरावा ह्युएनत्संगाचा (इ.स. ६४०).यानें चालुक्य पुलकेशी महाराष्ट्राचा राजा यास स्पष्टपणें क्षत्रिय म्हटलें आहे. तसेंच कांचीचे पल्लव यासहि क्षत्रिय म्हटलें असून हे महाराष्ट्रीय मराठे होते हें प्रथम भागांत दाखविलेंच आहे. यापुढील सर्वांत श्रेष्ठ पुरावा कुमारिलभट्टाचा (इ. स. ७०० सु.). हा शबरभाष्यावरचा प्रसिद्ध मीमांसक वृत्तिकार आहे. तो वरील भाष्यकाराच्या वचनावर म्हणतो

'आन्ध्राणामिति दाक्षिणात्यसामान्येन भाष्यकारेणोक्तम्' म्हणजे दाक्षिणात्य अर्थात् महाराष्ट्राच्या सामान्येन भाष्यकारानें राजा शब्द क्षत्रिय जरी पुर व जनपद यांचें रक्षण करणारे नसले तरी वापरतात असें लिहिलें आहे. यावरून असें दिसतें कीं, महाराष्ट्रांत प्रत्यक्ष राज्य करणारे नसले तरी सामान्य लोकांत क्षत्रिय असून ते आपल्यास राजे म्हणवीत. अर्थात् महाराष्ट्रांतील पाटील किंबहुना सामान्यतः शेती करणारेहि लोकांत क्षत्रिय होते आणि ते आपलें क्षत्रियत्व राजा ही संज्ञा वापरून स्पष्ट करीत. ही भाषा अजूनहि वापरण्यांत येते (पृ. ९२). यानंतरचा हेमाद्रीच्या यादवकुलप्रशस्तीचा पुरावा (इ. स. १२०० सु.). यांत रामदेवरावाच्या वंशास कृष्णकुलोत्पन्न मानलें आहे. किंबहुना, ज्ञानेश्वरमहाराजांनींहि रामदेवरावास यदुकुल वंश-तिलक म्हटलें आहे. अर्थात् ते क्षत्रिय आहेत असें यांनीं मान्य केलें आहे. तेव्हां इ. स. १३०० पर्यंत मराठ्यांचें क्षत्रियत्व उत्तम उत्तम धर्मशास्त्रज्ञ ब्राह्मणांस मान्य होतें. बरें, चालुक्य पुलकेशि यानें अश्वमेध करून आपलें क्षत्रियत्व पूर्णपणें सिद्ध केलें. राष्ट्रकूट यादव• यांच्या लेखांतहि त्यांनीं आपलें यदु-वंशोत्पन्नत्व लिहिलें आहे. अर्थात् आम्ही क्षत्रिय आहों असें त्यांनींहि स्पष्टपणें दाखविलें आहे. पल्लव व शिलाहार यांच्या लेखांतहि क्षात्रियांत चूडामणि इत्यादि विशेषणें सांपडतात. तेव्हां महाराष्ट्रांतील मराठ्याचें क्षत्रियत्व धर्मशास्त्रकार ब्राह्मणांच्या लेखांवरून व राजवंशीयांच्या लेखांवरून इ.स.१३०० पर्यंत मान्य व सिद्ध आहे असें ऐतिहासिक प्रमाण सांगतें यांत शंका नको. अर्थात् 'कलावाद्यन्तयोः स्थितिः' हें वाक्य या नंतरचें आहे. आणि तें उत्तरेकडच्या क्षत्रियांनीं केव्हांच मानलें नाहीं. आतां ही शंका शेवटीं येईल कीं, उत्तरेकडचे क्षत्रिय मराठ्यांस कमी कां लेखतात व त्यांच्याशीं विवाह-संबंध कां ठेवीत नाहींत? या शंकेचें निराकरण विस्तृत रीतीनें पुढच्या भागात येणारच आहे. पण थोडक्यांत सांगणें तर यापुढील काळांत म्हणजे १२ व्या शतकांत जातिबन्धनें सर्वत्र अधिक कडक झालीं आणि उत्तरेकडील क्षत्रियांनींच काय, उत्तरेकडील ब्राह्मणांनीं सुद्धां, दक्षिणेंतील ब्राह्मणांशीं शरीरसंबंध बंद केले. जर कनोजिया वगैरे पंचगौड दक्षिणेंतील ब्राह्मणांस कमी लेखतात व त्यांच्यांशीं अन्नव्यवहार सुद्धां करीत नाहींत, पण त्यामुळें इकडील ब्राह्मणांचें ब्राह्मणत्व

नष्ट होत नाहीं, तर त्याचप्रमाणें उत्तरेकडील क्षत्रियांशीं संबंध न जाइल्यानें मराठ्यांचें क्षत्रियत्व नष्ट होत नाहीं.

मराठे हे क्षत्रिय असल्यानें त्यांस स्वतःचीं गोत्रें आहेत हें यावरून निष्पन्न होतें. व त्याप्रमाणें त्यांच्या गोत्रांचा उल्लेख प्राचीन शिलालेखांत आढळतो. पल्लव ( पालवे ) ह्यांचें भारद्वाज, चालुक्यांचें मानव्य व कदम्ब ( कदम ) यांचेंहि मानव्य अशीं गोत्रें इ. स. चौथ्या पांचव्या शतकांतील लेखांत आढळतात. पण पुढे राष्ट्रकूट, यादव, शिलाहार यांच्या लेखांत गोत्रें नमूद केलेलीं दिसत नाहींत. ही गोष्ट आठव्या नवव्या शतकांतील इतर शिलादि लेखांप्रमाणेंच आहे. कारण उत्तरेकडील प्रतिहार, चालुक्य, शिसोदे, वगैरेंच्या लेखांत हि गोत्रें दिलेलीं दिसत नाहींत; यामुळें अलीकडील कुलांच्या गोत्रांची जुनी माहिती मिळत नाहीं. तथापि कांहीं गोत्रें चौकशीअन्तीं व लेखांतून मिळालीं तीं खालीं नमूद करणें जरूर दिसतें. भोसले-कौशिक ( दानपत्रांवरून ), पाटणकर व डुबल ( सोळंखी )—भारद्वाज, निंबाळकर—पवार वसिष्ठ, गायकवाड–भार्गव, माने ( गौर )—अत्रि. मराठ्यांच्या जुन्या वंशावळी शिवपूर्वकालीन मिळणें या दृष्टीनें अत्यंत अवश्य आहे एवढें सांगून हें परिशिष्ट पुरें करूं.

( समाप्त ).

# सूची


अग्निकुल १३, १५.
अग्निकुल कल्पना खोटी १६–२४, २१, २२, २४.
अग्निकुल गुजर आहेत काय ? ३१–४९, १५२.
अग्निहोत्र २८६, ३९९.
अंगिरस गोत्र ६६ (ऋषि) ४३६ ४४५–६.
अधिकारी ३६४–५, ३६९.
अनंगपाल तोमर २५८.
अनहिलपट्टण २०, १८६.
अनुलोम विवाह व स्मृत्या ३४१–४, ३९२.
अनद विक्रम शक २८.
अन्नपान ३२७–९, ३३६, ३९२.
अपराजितदेव ४४७.
अबु झैद ३२१, ३३२, ३३५–६.
अमितगति कवि २०१.
अमेरिकेचा इतिहास ४११–२, ७.
अमेरिगो ४११.
अमोघवर्ष (१ ला) २४१ (२ रा) २४५ (३ रा) २४६, २५४.
अरब ( आरब )६,७,११२,१२१, १२७, १५८, १५९, २४९, २६०, ३५१, ३५५, ३८१.
अरिकेसरी १७१.
अर्बुद १०३,
अल्इद्रिसी २७९, ३३६–७.
=अल्इस्ताखरी २७०, ३२०.
=अल्मसऊदी १६९, २६७, २६९, २७३, ३२७.
=अल्लट १२४, २५२.
=अवंतिभूभृत् १६२, २३०.
अश्वपति–अश्वसैन्य ४४९.
अश्वमेध ३९९.
अहिच्छत्र ४६, ४८, १४५.
अहिंसा ३०३, ३९९.

आगमग्रंथ २८४.
आघाट (सीमा) २७७.
आटपुरालेख ११९, १२०, १२२–७, १३१, (मुळ संस्कृत) १४०–१.
आदिवराह १७६, २६४, ३७०, ३७८.
आनंदपूर १३१.
आनर्त ९९.
आंध्र२६०-१, ३००, ४४९, ४५२.
आभीर ९९, १०१.
आमगाछी लेख २३०, २३४.
आरबी घोडे ३८१.
आरमार ३८०.
आर्य ३२. ( राजपुतान्यांतील वसाहती ) ९८–१०७.
आसाम ३०५.

इंद्र (३ रा) १७१–२, २०७, २४४,२५१ (शेवटचा) २४७,
इंद्रायुध १६२,१७९,२०४,२३०.
इब्न खुर्दादबा २६६,३१६,३२१.
इब्न हौकल २७०, ३३०.

ईडर ११२, १३७.

उदयन ३०, ४२६.
उद्रंग ३६८.
उपासनांचा द्वेष ३८९.

एकराष्ट्रीयभावना ३५६.
एकलिंग १४०, १५०.
एलापूर (एल्लोर) २२९.

ऐतिहासिक ग्रंथांच्या धुराव्याची क्रमवारी ४०९, ४१०.

ओढ्या (ओरिसा) २६०.

ककुत्स्थ (कक्कुक) १५९, १६०.
कक्कुक (मांडोरचा) १७७–८.
कण्वकुल ४३३.
कर्निंगहॅम ५९, ९२, १०५.
कनोज ३८,४०, (ग्रामसंख्या) ५०, १५७, १६०, १६५, १६७, १७३, १७९, १८८, ४४९.
कंदहार(चे क्षत्रिय राजे)२५६,२६८
कपर्दिका ३७९.
कर्कराज (राष्ट्रकूट) १९५.
कर्कोटवंश (काश्मीर) २५६.
कर्नाटक ४७, ४८,२७७.
कलचूरी २२०–५,(वंशावळ)२२६
कलावाद्यन्तयोः स्थितिः ९५–७.
कल्हण ७७.
कानडी भाषा २७७, ४५१.
काबूल (चे शाहीराजे) २५५–६.
कामरूप २६०, २६९, २७०.
कायस्थ प्रभु ३७.
कायदे करण्याचा अधिकार ३५३–४, १३६१.
कालभोज १२२.
कालंजर २०६,२०७,२०९,२२१.
काश्मीर २५६, २६८, २६९.
किलहॉर्न २२१, २२२, २३५, २३४.
कीरी (भाषा) २७३–४.
कुन्डलें ३२१.
कुंडिका देवी २४७.
कुमारिलभट्ट ९३, २९२, २९३–३०२, २९४, २९५, ४५२.
कृष्ण (राष्ट्रकूट) २२२, २२३, २३९ (२ रा) २४३. (३ रा) २४६, ४४८, ४४९.
कृष्णराज (परमार) १६२, १९४–५–६.
केयूरवर्ष २०, २२४
केसरी घराणें (ओढ्या) २६०.

कैलासमंदिर २३९.
कोक्कलदेव १६८, २०६, २२२, (२ रा) २२४.
कोक्कल (राष्ट्रकूट) २४७, ४४९.
कोसल २६१.
कोसल विदेह ४४१.
क्रुक (सर व्युल्यम) १२,१३,१४.

खजुराहो लेख २०७,२०८,२११.
खारेपाटण लेख २४६.
खालिमपूर लेख २२८.
खिजर १८, ४६.
खुमान १०९. (खोमाण पहा)
खोट्टिग १९८, २४७.
खोम्माण १२२. (रासा) १२३.

गजदळ ३८२, ३८४,
गजपति ४४९.
गहरवार २०४.
गांगेयदेव २११, २२५.
गुजर ११,१३,१४,१५,३१,३६, ३७, ३९, ४०,४६,१०५.
गुजराथी भाषा ४२.
गुर्जरत्रा ३९, ४२, १५९, १६९, १७८.
गुहदत्त १२५, १२७, १३३.
गुहिल ११२, (२ रा) १२१, १३७-८.
गुहिलोत ( गेहलोत ) ११ (गोत्र) १०६,१०८ ( अनार्य नाहींत ) १२७-१४०, १२८, १३७, २८९
गूवक १९, १४७, १४९, १५०
गोंड ११, २१६-१७.
गोत्रप्रवर ५५,५८,५९,६५-७६, ३१४-६.४५०,
गोपाल १६४, २२९, २३०, ( २ रा. )२३३.
गोपेंद्र १४७,
गोविंद ( १ ला ) २३७,
( २ रा ) २३८, २३९,
( ३ रा ) १७१, १९६, २३०, २३२, २४०.
( ४ था ) २४५.
गोविंदगुरु ३०४.
गोषाची चाल ३३१-२.
गौडपादाचार्य ३०४.
गौरीशंकर ओझ्या २०२.
गौल्मिक ३६४.
ग्रीअरसन् २७९, ४१२, ४२७, ४४०, ४४२.

घटिआला लेख १७७, १७८.
घोडदळ ३८०,३०१.

चक्रायुध १६६, २०४, २३०.
चंदभाट १७, १८, २१,२२,२५, २६,७७,८४,२०६,२१५.

चंदेल ११,८३,१७२,२०४-१२, (ची नाणीं) २१०-१( ची वंशावळ ) २१२ ( उत्पत्ती-विषयीं स्मिथचें चुकीचें मत ) २१२-९
चाप ( वर्धमानचे ) १९१.
चालुक्य १३, १८, २०, ४१. ( गोत्र ) ५६, १३६, (पूर्वेचा. महाराष्ट्रांतील ) ४६१.
चावडा ( चा इतिहास )१८६-९१ ( शिवोपासक ) १९०.
चाहमान ( चौहान ) १३, १८, १९, २१, ४४, (गोत्र) ५५, १०६, १३६ ( चा इतिहास ) १४१-७,१४६,१५०,१५२.
चित्तोड १९३.
चेदि २०, २२०, (शक) २२०.

छत्तिसगड २२०
छत्तिस राजकुल ७७-८४, २१५, ३५८

जगत्तुंग ( गोविंद ३ रा ) २४०, ( २ रा ) २४४.
जजोती जझोती जजहुती २०५.
जमीन ( कर ) ३६१, ( मोजणी ) ३७६.
जयपाल १७३, ( लाहोर ) २०९.
जयराज १४७.
जयशक्ति २०५.
जाति ३३-४-५, ८९ ,३२०-१
जालंधर ( वंश ) २५७-८.
जुर्झ ( गुर्जर ) २६४.
जेजाक २०५
जैनधर्म २९०, ३८८.
ज्वालामुखी देवी २८४.

टॉड १०,१८,२४,५६,७७,७८, १०८, ११०, १११, ११५-६. १२२, १५६, १५८, १५८, १९२, १९३,२१५.
टिळक ( लोकमान्य ) ४११.

डेंडानक

तपस्वी ( तपश्चर्या ) २८५.
तंत्रपाल २६९.
तंत्रवार्तिक २९५, ३००.
ताफिक,ताफन (देश)२६५,२६८
तेलगू ( भाषा ) २७८, ४५१-२
तैलप २२४.
तोमर १५०, २५८-९
त्रिपुर २२०
त्रिंशांश कर ३७४-५

दंतिदुर्ग ( वर्म ) २३८, ४४९.
दाशराज्ञयुद्ध ४१८,४२०, ४२९.
दीनार ३७८.

दुर्गावती २१३, २१८, २१९.
दुर्लभ १४७, १५१,
देवपाल ( प्रतिहार ) १७२, २०७, २०८.
देवपाल ( बंगाल ) २३२.
देवशक्ति १६०
देहत्याग ३३६.
दौलतपुरा लेख १७८.
द्रम्म ( नाणें ) ३७८.
द्राविड ( वंश ) ३२.

धंग २०५–८–९–१०.
धनपति १९८.
धरणीवराह (चाप.) १७१,१९१.
धर्माचें अंतरंग व बहिरंग ३९०.
धर्मपाल १६७, २२८, २३२
धवल २२४.
धारचे परमार १९२–२०३,१९७.
धारावसुली ४०२.
धार्मिक परिस्थिति २७९–९२.
ध्रुव १६४, ( निरुपम ) १६८, ( धोर ) २४०.

नंद २९,३०.
नन्नुक २०५.
नयपाल २३४.
नरवाहन १२४,१३३.
नवसरी लेख २५४.
नवसाहसांक २०१.

नॅशनॅलिटी ३४८, ३५५.
नागदा ११२, १३२.
नागभट ३८,१४९,१५७,१५९, (२ रा) १६५, १६६, १६८, १८८, १९५, २३२.
नागरब्राह्मण १२८, ३७०.
नाग लोक ४६५.
नाणीं ३७७.
नारायणपाल २३३, २३४.
नांवें ३३७, ३४०.
नाहरराय १५८.
निवर्तन (बिघा) ३७६.
निष्क (नाणें) ३७८.
नीतिमत्ता (हिंदूंची) २८८, ३३७, ३९८.
नेपाल (रजपूत शक) २५९,३०५.
नोहलादेवी २०, २२४.

पंचमहाशब्द ३७०.
पंचायतनपूजा २८०.
पद्मगुप्त कवि २०१.
पंप (कानडी कवि) १७१.
परकीय अंमल ४००–१, (स्वाऱ्या) ४०३,(राज्य) ४५९, ४६०.
परबल (गोविंदराज) २३२.
परमार १८, २१, ४४, ५६, (गोत्र वसिष्ठ) १०८, १०६, (धारचे) १९२–२०३, १९४.
पल्लव २६१.

पशुपति ( नेपाळ ) ३०५.
पांचाल ४३८–९.
पाटलीपुत्र १६१.
पाणिनि ८८–८९.
पायदळ ३८०.
पार्गिटर ४०६–७–९, ४२६–७, ४३५.
पाल ( मोंगीरचे ) २२७–२३६. ( वंशावळ ) २६६, ४४९.
पुनर्जन्मकल्पना २८७.
पुराणें २८०.
पूरु ४३६ वगैरे.
पूर्वमीमांसा—२.
पृथ्वीराज १७, १९, २५, १४२, १९९.
पृथ्वीराज रासा १८, २०, २१, ( ची ऐतिहासिक किंमत )२५–३१, २६, ३०, ३१, ७८.
पेहराव ३३०.
पेहवा लेख १७९, ३७३.
पैजवन ७.
पोटजाती ३१३–४, ३९१, ( उत्पत्ति ) ४, ४५०.
प्रताप १०९.
प्रतिनिधिसभा ३४९
प्रतिहार ११, १८, १९, २१, ( ब्राह्मण ) ३५, ३८ ३९, ४१, १०६,(कनोजचे सम्राट्) १५६, १७६, १७७, २८२, ३५५, ४४९.
प्रवर ६७.
प्राकृत भाषा २७५–६.

फेरिस्ता २०९.
फौज (खडी व हंगामी) ३५०–२ ( परकी लोकांची ) ३५२.
फ्लीट ( डॉक्टर ) २४३, २४५.

बडोदा लेख २३९.
बप्पय १४७.
बप्पा ( बाप्पा ) रावळ ७, १०९, १११–२–३, ११५, ११७, ११८, १३०–१ , १३३, १३७, १३९, १८८.
बलवर्मा ( चालुक्य ) १७०.
बलहरा २६३,२६४,२६७,२७०.
बंगाल ( चे पालराजे ) २२०–२३६, २२८, ( परकी फौज ) ३५२–३,४४९.
बंगाली भाषा २७८,४५२.
बाऊरा ( कनोजचे राजे ) २६७, २६८.
बालविधवाविवाह ३३५.
बालविवाह ३३३,–४.
बिलहारी शिलालेख २२२, २२४, ३७३.
बुंदीकोटा २३.
बुंदेलखंड २०४.

बोंथादेवी २२४.
बौद्धधर्म ( लोप ) १९, २७२, २८०, २८५, ३५३, ३८७-८, ३९६,-७-८.
ब्यूलर १९४,१९७, १९८,२०२.

भटार्क १२९.
भंडिकुल १६०, १७९.
भरत ( भारत ) ४१५-६-७-८ -९, ४४३-४.
भर्तृपट्ट १२१.
भागलपूर लेख ३८२-३.
भाग्यवती २३३.
भाडोत्री फौज ३८२.
भारतवर्ष ४१६.
भारद्वाज ( गोत्र ) २०, १३६, ४२१-२.
भाण्डारकर डी. आर. १२, १३, १४,१८,३१, ३६, ३७,३९, ४४, ४५, ४६, ४८,९९, १०५, ११२, १२५, १२६, १२७, १२८, १३२, १४०, १४५, १४६, १७७,१७८.
भाण्डारकर डॉक्टर २४२, २४४, २४६, ४५८,
भाषा (अर्वाचीन ) ४, २७१-९, ( उत्पत्ति ) ४५१-४५३.
भाषोत्पत्तिशास्त्र ४११.
भिक्षावृत्ति ३९६-७-८.
भीम १०९.
भुक्ति ३६२,-३.
भूयड १८९.
भृगु ६६.
भोज (प्रतिहार) १९,१५७,१६८, १७६, ( प्रशस्ति मूळसंस्कृत ) १८२-५, १८९,२६४.
भोज ( परमार ) १९३, १९४, २००, २०२, २२२.

मग ( ब्राह्मण ) ३३.
मगध २१९.
मंडनमिश्र ३०५.
मंडापिका ३७४.
मंडल ३६२.
मंडोर १५८, १८७, १८८.
मराठी ( भाषा ) २७१, २७२, २७४, २७५.
मरुदेश १००, १०२.
महाजन ३७१.
महादेवी २४३.
महायक १२२.
महाराष्ट्र ४२, २७७, ४४९.
महाराष्ट्री ४, १४२, २७६.
महासांधिविग्रहिक वगैरे ३६४.
महीपाल १७०, १७१, १९६, २०७, २११, ( बंगालचा ) २३३.
महेंद्रपाल (प्रतिहार) १६९,१७०.

महोबा २०६, २१७.

मानकिर ( मान्यखेट ) २४२, २६३, २६७.

मारवाडी भाषा ( डिंगल ) ४५३, ( पिंगल ) ४५३.

मार्टेल चार्ल्स ६, १११, ११४.

मांसाशन २८९ ( निषेध ) ३२८.

मिहिर ( भोज ) १६८.

मुग्धतुंग २२३.

मुंज १९४, १९८-९, २००, २०१, २०३.

मुंडराज ( भुयड ) १८९.

मुद्रा ( मोहोर ) ३७६.

मुलतान २६९, २८१, ( चें सूर्य-मंदिर ) २८३.

मुलकी कारभार ३६०,—३७९

मूर्ति २८३,३०९.

मूर्तिपूजा २८२, २८४.

मेगस्थेनिस ३३, ४०९.

मेवाड ( मेदपाट ) १२१.

मोंगीर ( चे पाल ) २२७-२३३, २२९,

मोरी (मौर्य) ११३,११५,१९३.

मोहनलाल पांड्या २५, २८, ७८, ८३, १३२.

म्युनिसिपल अधिकारी ३७१.

यदुतुर्वश ४२५, ४३३, ४३६

यशस्करदेव २५७

यशोवर्मा ( चंदेल्ल ) १७२, २०६,-७-८.

यज्ञयाग २, ३९९.

यादव ( अस्सल मराठे ) ४६४.

युद्धं ४०५.

युधिष्ठिर २९, ३०, ३२.

युवराज २२४ (२रा)२२४,२९५.

योगराज १८९.

रजपूत ५, ७, ८, ९ ( परदेशी नाहींत ) ९-१५, १२, १५, ४६ ( शब्दाचा अर्थ ) ८५-९५ ९१( राजे ) ३४९.

रट्ट २७७, २४९.

रटराज्य ५३, ४४९.

रणदेवी २३२.

राजकीय परिस्थिति ३४४-३६९.

राजपुताना ९८, १०२,१०५-६.

राजवंश ३४६, ३५८.

राजशेखर ३८,१७०,१७१,२७६.

राजवाडे वि. का. ४५८-४६६.

राजाधिकार ३१५.

राज्यपाल१७३, (बंगालचा)२३३.

राठोड ११ ( गोत्र गौतम ) ५७, १०५, १५८, २४९.

राधनपूर लेख २३८.

रावळ ११२

राष्ट्र २४९

राष्ट्रकूट ३९, १२४,१६४,१६८,

१९५, १९९, २०२, २३२, २३३, २३७–२५४, २५२, (वंशावळ) २५३–४ २७७, २७८, ३०५, (वंशावळ) ४४७–८, ४४९, (अस्सल मराठे) ४६२–३.
राष्ट्रपति ३६६.
राष्ट्रीयभावना ३५७–८.
राष्ट्रीय निष्ठा ३८५
रामचंद्र (प्रतिहार) ३६८
राहडादेवी २२४.
राहिल २०६.
रिस्ले (सर. एच्.) ४१३, ४४२.
रुद्रेण १५०, १५९.
रुपया ३७९.
रेहमी २६५, २६७, २६९.

लकुलीश १५०,२२४२३४,२४२.
लक्ष्मण (कलचूरी) २२४.
लक्ष्मी २४४.
लछमन १४८, १५१.
लज्जादेवी २३५.
लल्लिय २५५
लष्कर(खडें ठेवण्याची पद्धति), ३८०
लष्करी व्यवस्था ३७९–८५.
लाट ४२, २५१, २७०, २७३,
लाडी (भाषा) २७४.
लाहोर राज्य २५८.
लिंगपूजा २९२.
लेले (के. के.) २०३, ३०९.
लोहरवंश (काश्मीर) २५७.

वंग १६४.
वणीदिंडोरी लेख २३९.
वत्सगोत्र १३५.
वत्सराज ३८ (प्रतिहार) १६०, १६१–२१६४,१७९, २३०.
वनराज १८७, १८८–९.
वराहमिहिर ४९.
वर्णव्यवस्था ३१२, ३५२.
वर्धा लेख २४३.
वलभी शक ११७.
वल्लभराय (बलहरा) २५१.
वंशभास्कर (ग्रंथ) २३,८२.
वसिष्ठ २१, ६६, १०३, १०४, ४१७–८, ४२९, ४३७.
वसुली खात्याची व्यवस्था ३०५.
वाक्पतिराज——१४७, १४८, १५१, २५९, (परमार) १९४–५, १९९.
वासुदेव ४५.
विग्रह १४७,–८, १५१(बंगाल) २३०, २३२–३.
विग्रहपालीय द्रम— ३७८.
विजय २०६.
विजयपाल १७३.
विनायकपाल (महीपाल) १७०, १७२.

विवाहपद्धति ३१९, ३२०.
विशालदेव १४२.
विश्वामित्र ६६, ४२०.
विषय (तालुका) २६२.
विज्ञानेश्वर ५९, ६०,६१.
वीथिका ३७२.
वेगि २६१.
वेठ ( विष्टि )३३८.
वेदाधिकार ३९३.
वैदिक इंडेक्स ४०६,४१७,४३२.
वैदिक विधि २८७.
वैरिसिंह १९४, १९५, ( ऊर्फ-
वज्रट ) १९७.
वेंदिदाद ४११.

शक्तिकुमार १२४.
शंकरगण २२४, २४४.
शंकराचार्य२९२–३–४,३०१–८
( मायावाद) ३०९,(चा काळ)
३०९–३११,३८८.
शवसंस्कार ३३६.
शाकंभर ४७,(सांभर)१४१,१४४.
शालिवाहन १२४.
शासनपत्रें ३७६.
शास्त्रविद्या ३२२.
शाहिराजे २५५–६.
शिलाहार ४४७.
शिवाजी ७, ९५, ११२, १८७,
४६४–५.
शिवोपासना २९१–२
शीर्षमापनशास्त्र ४११, ४१३–४.
शील ( राजा ) १२१, १२२.
शुचिवर्मा १२४.
शूद्रकमलाकर ९५.
शेतकीचा धंदा ३२३.
शेलार (शिलाहार) ४४८, ४५०.
शौल्किक ३६४.
श्यामलदास (कविराज) २२–५–.
श्रीचंद्र १४७.
श्रीहर्ष ( चाहमानांचें कुलदैवत
शंकर ) १५०.
श्रीहर्ष ( सम्राट ) २६७.

सती व सत ३२५.
सदानीरा ४४१.
संन्यास ३०१, ३०२.
सपादलक्ष ४६, ४७, ५१, १४५.
सबक्तगीन १७३.
समरसी २५, ३१, १०९.
संस्कृत भाषा २७३.
सागरताल लेख १५७.
सांगा ( राणा ) १०९.
सामनगड लेख २३८.
सामंत १४६, १८८.
सामाजिक स्थिति ३१२–३३७.
सारडा हरबिलास १९,४९, १४५.
सारस्वतमंडल(उत्तर गुजराथ)१८७.
सालवाहन ( चंदेल्ल )२१८.

सियाडोनी शिलालेख १७०, ३३७, ३६९, ३७२, ३७७–८.
सिंधुराज—२००, २०१–२–३.
सिरोही १५१.
सिंह–१२२, सिंहराज (चाहमान) १५१, १४९.
सीयक १९५ (ऊर्फ श्रीहर्ष) १९७.
सुदास ४२०–१, ४२९ ४३०.
सुलेमान ( अरबी प्रवासी ) २६२, २८५, ३२१, ३४६.
सूरजमल ( भाट ) २३, ८२.
सूर्यचंद्रवंश ( अर्थ ) ९, १६, १८, २२, २३, ६२, ८०, ८१, ( चा वेदांतलि उल्लेख ) ४०६–४४७, ४२५, ४४६–७.
सेनापति ३८३.
सैमूर ( चेऊल ) २७०.
सोळंखी ( चालुक्य ) ४०.
स्कंदपुराण ४७ ( देशांची यादी ) ४९–५२, १०७.
स्टेन कोनाऊ २४९.
स्मिथ ( सर व्हिंसेंट ) १०, १३, १०५, १५६, १६९, २०४, २११, ( चंदेलाविषयींचें मत चुकीचें ) २१२–२१९.
स्मृतिग्रंथा ३९४ ( तील उतारे ) ३९४, ४५४–७.
हंमीर १०२ ( काव्य ) १५२.
हयपति २०८.
हर्ष १७४, १७५, २६६, २९[illegible] २९९.
हर्षशिलालेख १४३, १४९, १५[illegible] ( मूळ संस्कृत ) १५३–४.
हर्ष ( चंदेल्ल ) २०६–७–८.
हाहज २६८.
हिंदीभाषा ( पश्चिम ) ४५२,–३ ( पूर्व ) ४५२.
हिंदुधर्म १, ३, ११, २८०.
हिंदुस्थानचा सुखी काळ ३८६-४०
हुल ८४–८५.
हूण ११, १२, ३६, ३७, ८३ ८४, ८५.
हैहय २०, ३६, ३७, १६८ २१५, २२०, २२३, २३२.
होर्नेल डॉक्टर ४१२, ४१३, ४४२
होली रोमन एंपायर ३५६–७.
ह्यूएनत्संग ३४, ४९, १९३ २०४, २९३, २९९, ४५[illegible]
क्षत्रिय ९१, ९२, २७२.
क्षितिपाल ( महीपाल ) १७२.

2315

# हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राज्यांतील समकालीन राजे इ. स. ७५० पासून इ. स. १००० पावेतों.

| अनुक्रम | राज्य व घराणें | ७५०–७७५ | ७७५–८०० | ८००–८२५ | ८२५–८५० | ८५०–८७५ | ८७५–९०० | ९००–९२५ | ९२५–९५० | ९५०–९७५ | ९७५–१००० | विशेष खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मेवाड (गुहिलोत) | बाप्पारावळ गुहिल | भोज महेन्द्र नाग | शील (दुसरा) अपराजित महेन्द्र (दुसरा) | कालभोज खोम्माण सन ८३६ मट्ट | भर्तृपट्ट सिंह | खोम्माण (दु.) | महायक | खोम्माण (ति.) स. ९३६ भर्तृपट्ट (दु.) | अल्लट इ. स. ९५१ नरवाहन स. ९७१ | शक्तिकुमार इ. स. ९७७ शुचिवर्मा इ. स. ९८१ | दिलेल्या सनाचे शिलालेख आहेत; त्यांवरून तीं वर्षें निश्चित आहेत. |
| २ | सांबर (चौहान) | सामन्त | जयराज विग्रह | श्रीचन्द्र गोपेन्द्र | दुर्लभ | गूवक | चन्द्र | गूवक (दु.) चन्दन | वाक्पतिराज | सिंहराज विग्रहराज | दुर्लभराज | |
| ३ | कनोज (प्रतिहार) | नागभट कक्कुक | देवशक्ति वत्सराज | नागभट (दु.) कनोजचा प्रथम सम्राट | रामचंद्र मिहिर भोज | मिहिरभोज | मिहिरभोज स. ८९० महेंद्रपाल | महेन्द्रपाल महीपाल स. ९१० | महीपाल (९४०) देवपाल (९५३] | विजयपाल | विजयपाल (९९०) राजपाल | |
| ४ | अनहिल पाटण (चावडा) | वनराज | वनराज | योगराज | योगराज ८४१ रत्नादित्य | वैरिसिंह खेमराज | खेमराज भुयड (८८१) | घाघड ऊर्फ राहप (९००) | घाघड | भूभट (९९१) | × | मुळराज सोळंखीनें राज्य घेतलें ९६१ इ. स. |
| ५ | धार (परमार) | | | | | | | कृष्णराज | विग्रहराज वज्रट | सीयक ऊर्फ श्रीहर्ष | वाक्पति ऊर्फ मुंज | हें घराणें भोजादि राजे नामांकित होऊन १३०० पर्यंत चाललें. |
| ६ | त्रिपुरचेदि (कलचूरी) | | | | | कोक्कलदेव | कोक्कल | मुग्धतुंग ऊर्फ प्रसिद्धधवल | केयूरवर्ष ऊर्फ युवराज | लक्ष्मणदेव शंकरगण (९७०) | युवराजदेव (९८६) | हेंही घराणें पुढें जास्त उदयास आलें. |
| ७ | बुंदेलखंड महोबा (चन्देल) | | | | नन्नुक वाक्पति | वाक्पति जयशक्ति | जयशक्ति विजयशक्ति | राहिल हर्ष | हर्ष यशोवर्मन् | धंग | धंग | |

| | राज्य व घराणें | ७५०-७७५ | ७७५-८०० | ८००-८२५ | ८२५-८५० | ८५०-८७५ | ८७५-९०० | ९००-९२५ | ९२५-९५० | ९५०-९७५ | ९७५-१००० | विशेष खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | बंगाल(मोंगीर) पाल. | × | गोपाल | धर्मपाल. | देवपाल | विग्रहपाल | नारायणपाल | राज्यपाल | गोपाल दु. | विग्रहपाल दु. ( इ.स९७६ ) | महीपाल ( दानलेख १०२६इ. स.) | |
| ९ | महाराष्ट्र ( मालखेड ) राष्ट्रकूट | दंतिदुर्ग ( ७५३ ) | (१) कृष्णराज अकालवर्ष ( इ.स.७७३ )<br>(२)गोविंद दु. युवराज<br>( ३ ) ध्रुव | ( १ ) ध्रुव निरुपमधारावर्ष इ. स.७९३<br>(२)गोविंद ति. ( ८०८ )<br>( ३ ) शर्व | शर्व निरुपम अमोघवर्ष ८१४ | अमोघवर्ष ८१४–८७५ | कृष्ण ( दु. ) शुभतुंग अकालवर्ष दु. | (१ कृष्ण दु.) अकालवर्ष ९११<br>२) इंद्र (ति.) नित्यवर्ष ( ९१४ )<br>(३) अमोघवर्ष | १गोविंद(चौ.) सुवर्णवर्ष ९१८–९३३<br>( २ ) बड्डिग अमोघवर्ष नि. | (१)कृष्ण(ति.) अकालवर्ष ९४०–९६१<br>(२) खोट्टिग<br>(३) कक्कल ९७४ | | तैलप(दु.चालुक्य) यानें राज्य जिंकलें |
| १० | काश्मीर | जयापीड (कर्कोट) ७५१ | १ संग्रामापीड ७८२–७८९<br>२ ललितापीड | चिप्पटजयापीड | उत्पलापीड अजितापीड वगैरे अल्पवयी | अवन्तिवर्मा ( उत्पल ) | शंकरवर्मा ८८४–९०२ | ह: पालवर्मन्<br>स: कटवर्मन्<br>▪. सुगन्धा | पार्थ पंगु वगैरे यशस्करदेव ९४०–९४८ संग्रामदेव | पर्वगुप्त क्षेमगुप्त ९५८–९७३ अभिमन्यु | नंदिगुप्त वगैरे -दिद्दा ९८०–१००३ | पुढें लोहरवंश संग्रामराज वगैरे |
| ११ | काबूल | क्ष त्रि | य हिं | दु वं | शी य | रा जे | कल्लर ऊर्फ लल्लिय ब्रा. ८८०–९०० | सामन्त | १ कमलु<br>२ भीम ९४७ | १ भीम<br>२ जयपाल ९६० | १ जयपाल ९८०<br>२ आनंदपाल१००० | त्रिलोचनपाल महंमद गझनवीनें मारला १०२१ |
| १२ | ओढ्या ( ओरिसा ) | केसरी | वं | शी | य | रा | जे | या | का | ळां | त | राज्य करीत होते |
| १३ | वेंगी ( पूर्व चालुक्य ) | विजयादित्य विष्णुवर्धन चवथा. ७६४ | विष्णुवर्धन चवथा ७९९ पर्यंत | नरेन्द्रमृगराज | १ नरेन्द्रमृगराज<br>२ कलि विष्णु<br>३ गुणकविजयादित्य ८४४ पासून | गुणकविजयादित्य (३) | १ गुणकविजः ८८८ पर्यंत<br>२ चालुक्य भीम | ८ चालुक्य भीम ९१८ पर्यंत<br>: विजयादित्य ( ४ )<br>: अम्मराज | १ ताडब ( तोतया )<br>२ युधामल्ल ( ९३४ )<br>३अम्मराज २ | ◂अम्मराज २ ९७३ पर्यंत<br>२ दानार्णव ९७४ | अराजक १००३ पर्यंत | |
| १४ | आन्ध्र. | | कैलकिल<br>१ विन्ध्यशक्ति | यवन<br>२ पुरञ्जय<br>३ रामचंद्र | ४ धर्मवर्मन्<br>५ वंग | ६ नंदन<br>७ सुनंदि | ८ नंदियशाः<br>९ शुकप्रवीर | | | | | |
| १५ | कोंकणचे शिलाहार( बांबे गॅझेटियर व्हा. १ भा. २ ) | | सनफुल्ल ७८३ | | अय्यपराज | अवसर (१) | आदित्यवर्मन् | अवसर (२) | इंद्रराज | भीम | अवसर (३) | रट्टराज (१००)८ |